# मराठवाडा परिचय





११६०
म. ग्रं. स. ठाणे
REFBK-0011397

# मराठवाडा व्यापार उद्योग सूचि

विश्वभारतीय प्रकाशन

यांनीं त्वरित वरील खतें सोसयटीमार्फत किंवा
गत खरेदी करून आपले पिकांना भरपूर खतें देऊन
चे अन्नधान्य उत्पादनांत भर घालावी.

नैट्रोजन खताचे सरकारनें ठरविलेले विक्रीचे दरः–

| | | | |
|---|---|---|---|
| अमोनियम सल्फेट | रु. | ३८० | दर टनास |
| अमोनियम नैट्रेट | ,, | ४५० | ,, |
| युरिया | ,, | ७४० | ,, |

या संस्थेकडून नैट्रोजनयुक्त खताचें वांटप करणाऱ्या
.रीं संस्थांना सब् एजन्सि दिल्या जातात त्यांस दर
..स रु. १७.०६ कमिशन मिळेल.

२) गुरांचे अनेक रोगांवर शोनान प्रॉडक्टस् कंपनीचे–
ांदा येणें, खरकत, फुगांरा, डायरिया वगैरे रोगांवरील राम-
बाण औषधें आमचे प्रत्येक डेपोतून मिळणेची व्यवस्था केली
आहे.

३) तसेंच क्रुडऑईल, मोबील ऑईल औरंगाबादचे
प्रत्येक तालुक्याचे ठिकाणीं मिळेल. त्याचबरोबर पंपींग
कामी मंजूर असलेली ऑईल एंजिन्स, क्रशर वगैरे
कमिशन देऊन हजर मालांतून त्वरित देण्याची खास
ली आहे.

सोसायटयांना सबएजन्सि देऊन माफक भावांत शेत-
ा लागणारा सर्व माल खात्रीनें व गॅरंटीनें देण्याचे
हेंच जिल्हा मार्केटींग सोसायटीचे व्रत आहे.

| | |
|---|---|
| व्हा. जी. वाळासकर | काकासाहेब देशमुख |
| सेक्रेटरी | चेअरमन |

# दि औरंगाबाद

नवमहाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यश
यांच्या आशिर्वादानें प्रगतीपथावर चालत सलेली व
कऱ्यांच्या सर्वांगिण उन्नति करण्याकरितां दपारिकर झालेली
औरंगाबाद जिल्ह्यांतील एक आदर्श सं म्हणजेच " दि
औरंगाबाद जिल्हा सहकारी मार्केटींग सो लि. " च्या काम-
काजाचे कांहीं अन्दाजी बोलके आंकडे

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल [सरकारचे धरून] | | रु. | ८८,००० चे वर |
| शेती माल विक्री | कपास | ,, | ९२,००० |
| | गूळ | ,, | ८,१०० |
| | भुसार | ,, | १२,००० |
| आयर्न ॲन्ड स्टिल विक्री | | ,, | २८,००० |
| मिश्र खत व पेंड विक्री | | ,, | १,५२,००० |
| नैट्रोजनयुक्त खत विक्री | | ,, | १,६०,००० |
| साखर विक्री | | ,, | ४९,९१,००० |
| मशिनरी विक्री | | ,, | १,२५,००० |
| खेळते भांडवल | | ,, | ११,००,००० |
| गंगाजली व इतर निधी | | रु. | १,००,००० चे वर |
| एकूण उलाढाल | | रु. | २,५०,००,००० चे वर |

शेतकऱ्यांच्या सोईच्या दृष्टीनें संस्थेनें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत एकूण १२ विक्रीकेंद्रें उघडलें आहे. चालू वर्षांत कांहीं तालुक्यांत आडत दुकानें उघडण्याचे विचार आहे.

१) सदरहू विक्री केंद्रांतून सल्फेट, मिक्श्चर, युरिय नैट्रोजनयुक्त खतें, ढेप व खर विक्रीची व्यवस्था केलेली अ



# आपले संपूर्ण सामर्थ्य एकवटून प्रयत्न करूं या

आपल्या जीवनासाठीं
पंचवार्षिक योजना
अत्यावश्यक आहे.

पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठीं महाराष्ट्र राज्यांतील आपण सर्व लोकांनी जात, धर्म, भाषा, प्रदेश अथवा आपली वैयक्तिक मतें यांचा विचार न करता अंत:करणपूर्वक व कसोशीचे प्रयत्न केले पाहिजेत.

भारताच्या व महाराष्ट्राच्या हितासाठीं
आपण आपलें संपूर्ण सामर्थ्य एकवटून प्रयत्न करूं या.

## योजनेबरोबर विकास व प्रगति साधा

प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक लि. नांदेड.

## स्टेशन रोड, नांदेड

( स्थापना इ. स. १९२३ )

## शाखा

देगलु, किनवट, उमरी, हदगाव, कंधार, मुखेड, बिलोली.

**श्री. शामराव कदम**, ( एम्. एल्. सी. ) चेअरमन

**सांपत्तिक स्थिती ३०-६-६० अखेर**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ,, १०,७३,१०० |
| गंगाजळी | ,, १,८९,१०० |
| ठेवी | ,, २२,६६,७०० |
| कर्जे | ,, ५६,९३,५०० |
| खेळते भांडवल | ,, ७६,०१,५०० |

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारणें, बीलें वसूलीस घेणें व पाठविणें. महाराष्ट्र राज्यांत कोणत्याहि सहकारी बँकेवर ड्राफ्ट विकणें वगैरे सर्व बँकींगचे व्यवहार माफक दरांत केले जातात.

**... ठेवींचे दर ...**

| | | | |
|---|---|---|---|
| सेव्हिंग्ज खाते | व्याजाचा दर द. सा. द. शें. रु. | २ टक्के | |
| मुदतीचे ठेवी ,, | ,, | ३ टक्के | १ वर्षाकरितां |
| ,, ,, | ,, | ४ ,, | २ ,, |
| ,, ,, | ,, | ३½ ,, | ३-९ महिने सहकारी संस्था रु. ५००० चे वर |
| ,, ,, | ,, | ३¾ ,, | ३-९ महिने व्यक्तींना रु. १०,००० चे वरती |

ह्या बँकेंत गुंतविलेला सर्व पैसा शेतकऱ्यांचे उन्नतीसाठीं उपयोगांत येतो. ( अधिक चौकशीसाठीं बँकेत भेटा )

**श्री. एम. एस. कुलकर्णी**, एम. ए. एच्. डी. सी. (मॅनेजर)

र. नं. २१२५०　　　　( स्थापना:- १९१८ इ. )

# बीड डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., बीड

बीड जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचे केंद्रस्थान

या बँकेमध्ये ठेवलेला सर्व पैसा केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठींच उपयोगीला जातो.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ........ रु. | ९,२५,००० |
| ठेवी | ...... रु. | १८,२०००० |
| खेळते भांडवल | ........ रु. | ६७,००००० |

—: ठेवीवरील व्याजाचे दर :—

सेव्हिंग — २½ %

मुदत बंद — ३½ % १ वर्षाकरितां,

— ४ % २ वर्षाकरितां

— ४½ % ३ वर्षाकरितां.

## मुख्य ऑफिस- नवा पूल, बीड

शाखा

मोमिनाबाद, गेवराई, माजलगांव,
पाटोदा, आष्टी, केज.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

मॅनेजर　　　　　　　　चेअरमन

श्री. पा. एम्. कुलकर्णी　　　　श्री. श्रीपतराव कदम
B. Com G. D C. & A., H. D C.　　　　B. A. L. L B

# मराठवाडा परिचय

अ० २८३०
९.५.
२८५
दि. १५।१८

## ( व्यापार उद्योग सूची )

REFBK-0011397

मराठवाड्याचा विविध अंगाचा परिचय

मराठवाडा ग्रंथालय
भाग २ क्र. ९१३८७

मुंबई, महाराष्ट्र, भारत, नित्य उपयोगी माहिती

किंमत ७ रुपये

विश्वभारतीय प्रकाशन, मालेगांव [शहर] जि. नासिक

१९६० शके १८८२

प्रकाशक, संपादक:-

जयनारायण रामनारायण शर्मा
" विश्वभारतीय प्रकाशन संस्था "
१५०९ इस्लामपुरा, मालेगांव

मुद्रक:-

जयनारायण रामनारायण शर्मा
" विश्वभारतीय मुद्रणालय "
१५०९ इस्लामपुरा, मालेगांव

द. शं. पोतनीस
गांवकरी प्रिंटींग प्रेस
आग्रारोड, नासिक

# निवेदन

हा संकलित मराठवाडा संदर्भग्रंथ आज मराठवाड्याचे हवाली करतांना आम्हांस आनंद लाभत आहे. मराठवाड्याचे सर्वांगीण दर्शन घडवणारे असे हे पहिलेच पुस्तक तयार करण्याचे भाग्य आम्हास लाभले याबद्दल मी मराठवाड्यांतील जनतेचा आभारी आहे.

मराठवाडा परिचय लिखाणाचा संकल्प मार्च १९५९ चे सुरवातीस औरंगाबाद रोटरी क्लबच्या मिटींगमध्ये जाहीर केला व गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कार्यास सुरवात केली. हे पुस्तक मागील दसऱ्याचे सुमारास प्रसिद्ध करावे अशी कल्पना होती. परंतु एक वर्षानंतर हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे.

एखाद्या कामाला अडचणी यायच्याच झाल्या तर किती अपेक्षीत व अनपेक्षित येतात ! प्रकाशन धंद्यास किती अडचणी असू शकतात याचा संपूर्ण अनुभव आम्हास या मराठवाडा परिचय पुस्तकांचे प्रकाशनांत आला. पुस्तकाची केलेली कल्पना 'मराठवाडा व्यापार उद्योग सूची' म्हणजे मराठवाड्यांतील फक्त व्यापारविषयक संदर्भ पुस्तिका लिहिण्याची होती. व्यापारविषयक माहिती मिळवत असतांनाच मराठवाड्यांतील आमच्या कांहीं मित्रांनीं मराठवाड्याचा परिचय करून देणारे पुस्तक तयार करण्याचा सल्ला दिला व मग त्या दृष्टीनें आम्ही प्रयत्नास सुरवात केली, अशा तऱ्हेनें मराठवाडा व्यापार उद्योग सूची हे नांव बदलून आम्ही 'मराठवाडा परिचय' असे या पुस्तकाचे नाव जाहीर केलें.

मराठवाडा विषयाचे पुस्तक लिहितांना मराठवाड्यांतील तज्ञांचा लाभ मिळावा म्हणून प्रयत्न करण्यांत आला. ज्यांच्या लेखावर अवलंबुन रहावे त्यांना अनेक अपरिहार्य कारणामुळें लेख देता आले नाहीं. म्हणून दुसऱ्या लोकांस विनंती केली. परंतु तेथेंहि आम्हांस बहुतांशी अपयश आले व मग तज्ञांनीं लिहिलेल्या लेखांचीं कात्रणें, वृत्तपत्रीय कात्रणें तसेंच जुनी नियतकालिकें संकलित केली. सरकारी, निमसरकारी प्रकाशनें शोधलींत, संस्थांचे अहवाल मिळविले कांहीं व्यक्तींशी प्रत्यक्ष चर्चा करून माहिती गोळा केली. त्याच बरोबर ज्ञानकोष, शब्दकोष, चरित्रकोष, भारत १९५९, मुंबई १९५९ आदि संदर्भ ग्रंथांचा उपयोग करून घेण्यांत आला आहे.

'मराठवाडा परिचय' या आम्ही प्रसिद्ध करीत असलेल्या पुस्तकांत आमचे म्हणून कांहीं नसून मराठवाड्या विषयीची माहिती संकलित करण्यांत आली आहे. या पुस्तकांतील प्रकरणावरून त्यांतील क्रमवार विषयांवरून आधारासाठीं दिलेल्या कोष्टकावरून, आंकड्यांवरून यथासांग माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे हे स्पष्ट दिसून येईल. मराठवाड्याचा एकमेव अधिकृत संदर्भ ग्रंथ म्हणून याला महत्व प्राप्त व्हावे यासाठीं आम्ही बाळगलेली दक्षता उपकारक झाल्यास आम्हास कृतकृत्य वाटणार आहे. संकलन करीत असतांना कांहीं गोष्टी आम्हास प्राप्त होऊं शकल्या नाहींत म्हणून म्हणा किंवा त्या आम्हास मिळाल्या नाहींत म्हणून म्हणा, उदधृत करण्याचे राहिले असल्यास आम्ही त्याबद्दल आपली क्षमा मागतो.

हे पुस्तक अनेक हितचिंतकांनीं अनेक प्रकारांनीं वैचारिक लेखनरूपानें सहानुभूतीनें, आर्थिक रूपानें साह्य केल्यामुळेंच प्रसिद्ध होत आहे. पूर्वप्रकाशनाचा अनुभव नसल्यानें त्या सर्व लोकांचा माझ्यावरील विश्वास उडावा अितका विलंब या पुस्तकाला सहजासहजी झाला परंतु लिखाणाचे व छपाईचे कार्य चालूं असतांनाच माहिती मिळवण्याचे दृष्टीनें आम्ही चालवलेले कष्ट, लोकांचा होणार अविश्वास, गैरमर्जी, असंतोष हे सर्व रोखून धरू शकलो आणि आज हे पुस्तक प्रसिद्ध करीत आहोंत, हे पाहून उशीर झाला पण काम चागलें झाले असेच उद्‌गार सर्वांच्या तोंडून निघतील अशी या पुस्तकाचे स्वरूप पाहून आमची खात्री झाली आहे. आपल्या प्रेमामुळें आजचा दिवस सोनियाचा उगवला आहे.

'विश्वभारतीय प्रकाशन' अशाच राष्ट्रोपयोगी प्रकाशनाचे कार्य सतत करणार आहे. अशा कार्यांत मोठासा आर्थिक लाभ नाहीं, तथापि आम्हांस सात्विक जनसेवेचे समाधान लाभते. महाराष्ट्राच्या जनताजनार्दनानें आमच्याकडून अशीच निरंतर सेवा घ्यावी आणि विश्वभारतीय प्रकाशनाच्या कार्यावर नेहमी सहानुभूतीची दृष्टी ठेवावी अशी अपेक्षा आणि अिच्छा !

जयनारायण रामनारायण शर्मा

# आभार

'मराठवाडा परिचय' या स्वरुपांत निघेल अशी अनेकांना कल्पना नव्हती म्हणून अनेक व्यक्तींनी व संस्थांनी या पुस्तकास माहिती व परिचय देण्याचे तसेंच जाहिरातदारांनी जाहिराती देण्याचें नाकारलें. त्यांना हे पुस्तक पाहून आपण माहिती व संस्थेचा परिचय या पुस्तकांत दिला नाहीं याची खात्रीने हळहळ वाटेल.

ज्या व्यक्तींनी आणि संस्थांनी आम्हास साह्य केले त्यांचा निर्देश करण्याचे आंम्ही टाळू शकत नाहीं. मराठवाड्यांतील जनतेला 'विश्वभारतीय प्रकाशन'ची ओळख व्हावी म्हणून श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. काशीनाथ शेठ अग्रवाल श्री. सरदार राजेबहादूर यांनी प्रशस्तीपत्रे दिलीत. श्री. चिं. य. काळे गुरुजी डॉ. कोटणीस, औरंगाबाद येथील श्री. स. कृ. वैशंपायन, श्री. पोहनेरकर श्री. गणोरकर, श्री. ज प. मुळे, श्री. अनंत भालेराव, महाराष्ट्रराज्याचे प्रसिध्दी अधिकारी श्री. विनोदराव, प्रकाशन अधिकारी, मराठवाडा विभाग प्रसिध्दी कार्यालयांतील श्री. माडखोलकर. श्री. इनामदार, श्री. द. शं. पोतनीस संपादक गांवकरी यांनी अडीअडचणीचे वेळीं मार्गदर्शन करून कार्यास उत्साहित केलें श्री. रा. य. सराफ श्री. वा. ह. घारपुरे, हुद्दार, संपादक प्रगती जालना, रघुनाथ रावजी रांजणीकर यांनी आम्हांस हवी असलेली माहिती लिखाण स्वरूपानें पुरविली म्युनिसिपल हायस्कुलचे प्रिन्सीपाल श्री. रामस्वामी यांनी ज्ञानकोषचे २३ खंड न्यू इंग्लिश स्कूलचे प्रिन्सीपॉल श्री. रहाळकर यांनी शब्दकोश, सयाजीराव कॉलेजचे प्रिन्सीपॉल श्री. शिंदे यानी चरित्रकोष आम्हास सदर्भासाठीं दिलेत याबद्दल आम्ही सर्वांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानतो प्रकाशनाची, आर्थीक बाजू जाहिरात ही प्रामुख्यानें असते आम्ही चालवलेल्या कार्याचे महत्व ओळखून श्री. रामचंद्रराव पाटील, श्री. श्रीपतराव कदम, श्री. काकासाहेब देशमुख महाराष्ट्र राज्याचे प्रसिध्दी अधिकारी तसेच इतर जाहिरातदारांनी आम्हास, जाहिराती देऊन कायमचे ऋणी करून ठेवले आहे. गांवकरी मुद्रणालयाचे चालक व कर्मचारी तसेच विश्वभारतीय मुद्रणालयाचे कर्मचारी यांनी छपाईचे काम सहकार्य केले तसेंच नागरीक कार्यालयातील श्री. हरीभाऊ कुलकर्णी यांनी कांहीं प्रकरणाचे प्रेस मॅटर तयार करण्यास आम्हास साह्य केले त्यांचे आभार अव्यक्त रहावेत, नाहीतर ते अनौपचारीक दिसेल.

मराठवाड्यातील तसेच स्थानीक हितचिंतक आणि सहानुभूती दाखवणारे अशा अनेकांच्या श्रमाने हे पुस्तक तयार झाले आहे. नाम मात्र मी पुढे असलो तरी श्रेय सर्वांनाच आहे. मी सर्वांचे आभार मानतो.

झालेल्या उशीराबद्दल आणि राहिलेल्या उणीवाबद्दल वाचकांनी तसेच जाहिरातदारांनी उदार हृदयाने क्षमाशील दृष्टीने पहावे अशी नम्र प्रार्थना करतो

संचालक

विश्वभारतीय प्रकाशन

**मालेगाव**

# — अनुक्रमणिका —

## ( भाग १ )

## म रा ठ वा डा


*इतिहास—* १ ते ५०

मानवाची उत्पत्ति, सैंधव संस्कृती, दक्षिणापथ महाराष्ट्राचा इतिहास, खिस्तपूर्व ३० ते इ. स २५० आंध्र राजे, सातवाहन घराण्याचे ३० राजे, समालोचन शक, क्षहरात, कार्दमक, अभिरादी, वाकाटक राजघराणीं व समालोचन ( इ. स. ३०० ते ६०० ) चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, व बहामनी राजवट, निजामीचे १० सुलतान, समालोचन १९४६ स्वातंत्र्य संग्राम.

*भूगोल—* १ ते ८

मराठवाड्याचे अक्षांश रेखांश, भू-प्रकृति, डोंगर, नद्या, इतर माहिती. औरंगाबाद, परभणी, नांदेड, बिड, उस्मानाबाद जिल्ह्याची माहिती.

*प्रेक्षणीय स्थळें—* १ ते २१

निपट निरंजन, बिबीचा मुकबरा, पानचक्की, औरंगाबादची लेणी, घृष्णेश्वराचे मंदिर, औरंगाबाद, पैठण, रुद्रेश्वर, दौलताबाद, रोजा खुलदाबाद, वेरूळची लेणीं, अजिंठा, आपेगांव, गोताळे, जांब, असई, जालना, नांदगीरवाडी, नळदुर्ग, ओवासा, दाबर, धुमार, लचिंदर लेणी परंडा तेर, तुळजापूर, वडवळ, मैलार, उदगीर, कुलपाक, औंढा, बामणी, खैरी, गंगाखेड, नांदेड, मालेगांव, उनकेश्वर बासर, बीड, अंबेजोगाई, परळीवैजनाथ व इतर किरकोळ प्रेक्षणीय स्थळे

*यात्रा- उरुस मेळावे—* १ ते ४

मराठवाड्यांत प्रामुख्याने व सध्या भरणारे यात्रा-उरुस, मेळावे, स्थळे, तिथी, तालुका, रेल्वेस्टशन पासूनचे अंतर

*सन्त आणि कवि—* १ ते २५

मुकुंदराज, ज्ञानेश्वर, जनार्दनस्वामी, एकनाथ, मुक्तेश्वर, दासोपंत रामदास, श्रीधर, कृष्णदयार्णव, भास्कराचार्य, चक्रधरस्वामी, कृष्णदासमुद्गल, विसोबा खेचर, जगमित्र नागा, नागेश, शिवदिननाथ, अमृतराय, गोपाळनाथ, गोरा कुंभार, रेणूकानंदाचा विठा, गिरीधर स्वामी, नरसोबा, मुकुंदसुत, श्री. शुकानंद, हंसराज, जनीजनार्दन गंगाभट्ट, उमरीकर, स्वामी सदानंद, ब्रम्हानंदाश्रम, विष्णुदास माहूरकर, भानुदास, बहिणाबाई, महिपती, बळवंतरावजी पाटील, दातार, दासगणु महाराज, यशवंतराव कोरेकल, भगवंतराव तोडेवाले देवीदास महाजन, माणिक प्रभु, गोपाळराव बिडकर बी. रघुनाथ, नांदापूरकर

*शिक्षण:—* १ ते ४८

निजाम राजवटीतील मराठवाड्याचे शिक्षण, सद्यस्थीती, माध्यमिक शिक्षण. मराठवाडा, विद्यापिठ सरस्वती भुवन, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे, राजाभाऊ रेडिओ इन्स्टीटयुट, मिलींद महाविद्यालय, महेश विद्यालय, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, मराठवाड्यातील माध्यमिक शिक्षण संस्थांची माहिती दर्शविणारे तक्ते.

*शेती:—* १ ते १०

जिल्हावार शेती भूभागाची माहिती, पिकवार जमीनीचा तक्ता, शेती संशोधन केंद्रे, पाणी पुरवठा साधनेचा तक्ता, पाटबंधारे विद्युत पंप, समपातळी बांध, बागायतीचे क्षेत्राची वाढ, गुरांची निपज, मार्केट कमेटया, मार्केट कमेटीचे उत्पन्नाचे आकडे.

*सहकारी चळवळ—* १ ते २०

निजाम राजवटीतील १९१३ या वर्षी सुरु झालेल्या सहकार चळवळीचा इतिहास, टाका आणि हाका 'टाकाचे' जिल्हावार माहितीचे तक्ते ग्रेन बँक, ग्रेन बँकेची जिल्हावार परिस्थती दर्शविणारे तक्ते, पतपुरवठा संस्था, जिल्हावार तक्ते, ग्रामीण बँका, परिस्थिती दर्शक तक्ते, सहकारी बँक, बँकांची परिस्थिती दर्शविणारे तक्ते, प्रांत पुनर्रचनेनंतरच्या ग्रामीण पत पेढया विकास दर्शविणारे तक्ते १९५८ अखेर सहकारी चळवळी संबंधी माहितीचा तक्ता, सहकार समाचार, सहकारी विद्यालय,

*मराठवाड्यांतील प्रकाशनें:-* १ ते ६

अजिंठा, मराठवाडा, रचना, पंचशिल, प्रगति, परभणी समाचार, प्रतिभा शिवसंदेश,

*ग्रंथालयें—* १ ते ८

ग्रंथालय कायदा, व मराठवाडा ग्रंथालय संघ, या विषयावर लेख, ग्रंथालयांची ग्रँट, ग्रंथालयांची संपूर्ण माहिती देणारा तक्ता, ग्रथालयांची यादी.

*व्यापार:—* १ ते ६४

व्यवसायिक वर्गीकरण, शेतीचे उत्पादन, व्यापारीपिके, उद्योग व्यवसाय बाजार पेठेची माहिती दर्शविणारे तक्ते, १९५७-५८,-५८-५९,-५९-६०, धान्याची आवक तक्ते, व्यापारी शिक्षण, कुटीर उद्योग, हस्तकला, तातडीच्या गरजा, उद्योगाची तरतूद हवी, उद्योगधंद्याच्या आवश्यक बाबी, वाहतुकीचे मार्ग, सडका- कृषि बेकारांना काम, इतर गरजा, याद्या- मेडीकल स्टोअर्स, डॉक्टर, कापड, व्यापारी, किराणा व्यापारी,

*रस्ते:—* १ ते २०

मोटार, बैलगाडीचे मराठवाड्यातील ७५ चालू रस्ते व त्यांचे अंतर. ५ रेल्वे रस्ते व स्टेशनचे अंतर.

*नकाशा:—*

मराठवाड्याचा नकाशा १०" × १५" इंच.

# भाग २

*महाराष्ट्र—* १ ते ५२

नकाशा, सिमारेषा, लोकसंख्या, लोकसंख्येची वर्गवारी, डोंगर, नद्या, हवामान, शिक्षण, भारतीय अकादमी, विकासाचा कार्यक्रम, नगरपालिका, लोकल-, बोर्ड, ग्रामपंचायती, शेती, शेतकी विषयक शिक्षण संस्था, पिकसंशोधन केंद्रे, कोणत्या महिन्यात कोणती कामे करावी, सहकार, सहकारी बँका साखर उत्पादन, खनिज संपत्ती, व्यापार व इतर माहिती.

*मुंबई:—* १ ते ५०

पार्श्वभूमी, इतिहास, प्रेक्षणीय स्थळे, कॉलेजेस, हॉस्पिटल्स्, डाकघर बटवडा विभाग क्रमांक, सिनेमा गृहे, बँक, कोर्ट, कोठे काय मिळते, लोकल रेल्वे स्टेशन, सिटी बुकींग ऑफिसेस, महाराष्ट्र राज्याचे मंत्री, उपमंत्री, सेक्रेटरी कार्यालये, केंद्र सरकारची कार्यालये, पुणे व नागपुर येथील कार्यालये.

*भारत:—* १ ते ३४

भारताचा भूभाग, हवामान, जनसंख्या, घटनामान्य भाषा, भारताचे मान चिन्ह, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रिय पंचांग, राष्ट्रदिन, भारताची राज्य घटना-शासन व्यवस्था, केंद्रीय सरकार, राष्ट्रपती, उपराष्ट्रपति, मंत्रिमंडळ, मध्यवर्ती कायदे मंडळ, राज्यसभा, लोकसभा, महत्वाची खाती, घटक राज्यें, उच्च पदस्थ कार्यालये, संरक्षण, शिक्षण, अकादमी, आकाशवाणी, वृत्तसंस्था, चित्रपट उद्योग, अर्थसंकल्प, शेती विभाग, वाहतुक, अंतरराष्ट्रीय संघटना, सन्मान पदके परदेशी वकिलाती, पारितोषिके, परदेशातील वकिलाती.

*शिक्षण:—* १ ते ४८

निजाम राजवटीतील मराठवाड्याचे शिक्षण, सद्यस्थिती, माध्यमिक शिक्षण. मराठवाडा, विद्यापिठ सरस्वती भुवन, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे, राजाभाऊ रेडिओ इन्स्टीटयुट, मिलींद महाविद्यालय, महेश विद्यालय, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, मराठवाड्यातील माध्यमिक शिक्षण संस्थांची माहिती दर्शविणारे तक्ते.

[illegible] [illegible]

जिल्हावार शेती भूभागाची माहिती, पिकवार जमीनीचा तक्ता, शेती संशोधन केंद्रे, पाणी पुरवठा साधनेचा तक्ता, पाटबंधारे विद्युत पंप, समपातळी बांध, बागायतीचे क्षेत्राची वाढ, गुरांची निपज, मार्केट कमेटया, मार्केट कमेटीचे उत्पन्नाचे आकडे.

*सहकारी चळवळ—* १ ते २०

निजाम राजवटीतील १९१३ या वर्षी सुरु झालेल्या सहकार चळवळीचा इतिहास, टाका आणि हाका 'टाकाचे' जिल्हावार माहितीचे तक्ते ग्रेन बँक. ग्रेन बँकेची जिल्हावार परिस्थती दर्शविणारे तक्ते, पतपुरवठा संस्था, जिल्हावार तक्ते, ग्रामीण बँका, परिस्थिती दर्शक तक्ते, सहकारी बँक, बँकांची परिस्थिती दर्शविणारे तक्ते, प्रांत पुनर्रचनेनंतरच्या ग्रामीण पत पेढ्या विकास दर्शविणारे तक्ते १९५८ अखेर सहकारी चळवळी संबंधी माहितीचा तक्ता, सहकार समाचार, सहकारी विद्यालय,

*मराठवाड्यांतील प्रकाशनें:-* १ ते ६

अजिंठा, मराठवाडा, रचना, पंचशिल, प्रगति, परभणी समाचार, प्रतिभा शिवसंदेश,

*ग्रंथालयें—* १ ते ८

ग्रंथालय कायदा, व मराठवाडा ग्रंथालय संघ, या विषयावर लेख, ग्रंथालयांची ग्रँट, ग्रंथालयांची संपूर्ण माहिती देणारा तक्ता, ग्रथालयांची यादी.

*व्यापार:—* १ ते ६४

व्यवसायिक वर्गीकरण, शेतीचे उत्पादन, व्यापारीपिके, उद्योग व्यवसाय बाजार पेठेची माहिती दर्शविणारे तक्ते, १९५७-५८,-५८-५९,-५९-६०, धान्याची आवक तक्ते, व्यापारी शिक्षण, कुटीर उद्योग, हस्तकला, तातडीच्या गरजा, उद्योगाची तरतूद हवी, उद्योगधंद्याच्या आवश्यक बाबी, वाहतुकीचे मार्ग, सडका- कृषि बेकारांना काम, इतर गरजा, याद्या- मेडीकल स्टोअर्स, डॉक्टर, कापड, व्यापारी, किराणा व्यापारी.

**पोष्ट-** पोस्टकार्ड, पाकिट, बुकपोस्ट, एक्सप्रेस डिलिव्हरी, पार्सल रजिस्ट्रेशन फी, लेट फी, मनीऑर्डर, व्हि. पी, पोस्टल आर्डर, परदेशी पत्र, नमुना पाकीट, **तार**-खास माहिती, दर, संदेश क्रमांक, फोनोग्रॅम, महत्वाच्या सूचना **आकाशवाणी-** स्टेशनचे नंबर, कार्यक्रम, परवाना फी, परवाना मुक्त. **कोर्ट फी स्टॅम्प-** स्टॅपच्या किमती, प्रकार व कोणत्यावेळी वापरावयाचे **रेल्वे-** खंडित प्रवास, भाडे परतीची योजना, पार्सल, डबा रिझरवेंशन गरम पाण्याची व्यवस्था, प्रवासात जेवण, मनमाड स्टेशन पासून भारताच्या कांही महत्वाचे स्टेशन मधील अंतर. **स्टेट ट्रॅन्सपोर्ट-** रिझर्वेशन, रिफंड, पार्सल,

**प्राप्तीकर-** प्राप्तीकर, प्राप्तीकर खात्याचे अधिकारी, कर भरणाऱ्यांचे प्रकार, आकारणी, सुपरटॅक्सची आकारणी

**बॅंक-** चेकचे प्रकार, ड्राफ्टपध्दती, सरकारी, निमसरकारी सुट्या वजन मापे जुनी, मेट्रिक वजन मापे, रुपांतर कोष्टके, रोजंदारीचे कोष्टक मराठवाड्यातील सरकारी कार्यालये.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम 21303 दि. [illegible]
[illegible]ांक 266 नों. दि. [illegible]

# मराठवाड्याचा

# अितिहास

# कालाचीं उमटलेलीं पाऊलें !

मराठवाड्याच्या भूमीवर कालानें आपलीं जीं पाऊलें उमटविलीं, त्याचें हें नम्र विवेचन. 'मराठवाड्याचा अितिहास' हा भाग या संदर्भग्रंथांतील महत्त्वाचा भाग होय.

मराठवाड्याचा अितिहास हा पर्यायानें महाराष्ट्राचाच अितिहास होय. मराठवाड्याच्या नकाशांतील पैठणवर बोट ठेवून जर वर्तुल काढलें तर त्या परिसरांत घडलेला अितिहास हा महाराष्ट्राचाच म्हणावा लागेल.

या विषयावर प्रसिद्ध झालेल्या लेखनांतील संदर्भ घेऊन हा अितिहास लिहिला आहे. पूर्णांशानें नसली तरी कालाची जी चाहुल अितिहासतज्ज्ञांनीं नोंदून ठेवली त्याचीच चाहूल अल्पांशानें आम्ही घेतली आहे.

मानवाची उत्पत्ती, भरतखंडांतील आर्य यांचाहि ओझरता उल्लेख आम्हीं करीत आहोंत. महाराष्ट्राचा–मराठवाड्याचा–सुसंगत अितिहास कोठेंच उपलब्ध नाहीं. कालानें जीं आपलीं पाऊलें उमटविलीं, त्याच पावलांचा मागोवा घेऊन हें प्रकरण सादर करीत आहोंत

◆ ◆

११३८७

# मानवाची उत्पत्ति

या भूतलावर सर्व प्राणी आणि वनस्पती कांहीं एकदम एकाच वेळीं निर्माण झालेल्या नाहींत. प्रथम समुद्रांत मासे निर्माण झाले. मग जमिनीवर वनस्पती आणि सरपटणारे प्राणी निर्माण झाले. शेवटीं पक्षी आणि सस्तन प्राणी निर्माण झाले; असें शास्त्रज्ञ सांगतात. सस्तन प्राण्यांमध्येंदेखील मानव प्रथम निर्माण झालेला नसावा. तो बहुधा शेवटीं निर्माण झाला असावा, असें म्हणतात. हा मानवाच्या उत्पत्तीचा काळ १० लाख वर्षांपूर्वींचा तरी खास आहे. हें व या सारखींच पृथ्वी-वरील अतिप्राचीन जीवजन्तूंच्या अस्तित्वाची अनुमानें काढण्याला खरेखुरे आधार सांपडले आहेत. हे आधार म्हणजे खडकांवरील प्राचीन प्राण्यांचे अवशेष व खुणा होत. याखेरीज शिपा, तन्तु, फळें, पावलांचे ठसे, ओरखडे वगैरे अनेक साधनांवरून संशोधक पृथ्वीवरील प्राचीन घटनांची कल्पना बांधीत असतात.

आज उपलब्ध असणाऱ्या अवशेषांवरून सुमारें ४०-५० हजार वर्षांपूर्वींच्या मानवी संस्कृतीची कांहीं कल्पना येते. अितक्या प्राचीन काळींहि सर्व माणसें एकाच वंशाचीं वा एकाच वर्णाचीं नसावीसें वाटतें. ज्याप्रमाणें पांढरे ( आर्य ) काळे ( नीग्रो ), पिवळे ( मंगोली ) आदि आपण वर्णभेद पाडतो त्याचप्रमाणें त्यावेळीं कांहीं २-३ तरी वर्णभेद असावेत. त्यावेळचे लोक शिंपल्यांच्या माळा करून गळयांत घालीत. हाडा-दगडांच्या मूर्ती तयार करीत, आपल्या कल्पनेप्रमाणें चित्रेंहि काढीत, यालाच संस्कृतीचा उदयकाल म्हणतां येअील. वेगवेगळे मानवसमूह पृथ्वीवर विखुरले गेले. वेगवेगळ्या वेळीं सुधारत चालले त्यामुळें सर्व मानव समाजाची एक संस्कृति अशी राहिली नाहीं.

◆ ◆ ◆

# पाषाणयुग

पाषाणयुग हें मानवी संस्कृतीचें आद्ययुग आहे. त्यातील सुधारणांच्या अवस्थानुरुप दोन भाग पडतात. (१) पुरातन पाषाणयुग, (२) नूतन पाषाणयुग.

## *पुरातन पाषाणयुग*

( खि. पू. ५०,००० वर्षे ) या युगामध्यें मानव शिकार करून राहात असे. मानवाचीं हत्यारें व अवजारें मुख्यतः लांकडें व पाषाण यांच्यापासून बन-विलेलीं असत. धनुष्यबाण या काळांत नव्हता. तसेंच जनावरें पाळण्याचें व त्यांचा

उपयोग करण्याचेंहि मानवास माहित नव्हतें. या काळांत गवे व तट्टे असत पण कुत्रें मात्र नव्हतें. शेती करणें, घरें बांधणें, या गोष्टी माहित नव्हत्या. स्वयं-पाकाचीं भांडीं करतां येत नव्हतीं तर टोपल्या व कापड विणणें त्याला कसें जमणार? तो घ पांघरावयास कातडी घेई. पण एरव्ही नग्न अवस्थेंतच हा मानव फिरत असे. या कालांतील संस्कृतीचे अवशेष आजहि उत्खननांतून आढळतात. त्यावरूनच तत्कालीन संस्कृतीचें अनुमान करावें लागतें, उपलब्ध अवशेपावरून दक्षिण भारतांतील आंध्र, हैद्राबाद, मद्रास राज्यांत अनेक ठिकाणीं पुरातन पाषाणयुगांत मनुष्यवस्ती होती, हें निश्चित.

## *नूतन पाषाणयुग*

( ख्रि. पू. १०,००० वर्षे ) या युगामध्यें मानव बराच सुधारला. शेती करणें, जनावरें पाळणें या गोष्टी अवगत झाल्या. कालांतरानें त्याच्या अनुभवांत वाढ झाली. हत्यारासाठीं तो काळ्या फत्तरांची निवड करूं लागला. त्याचीं हत्यारें पूर्वीसारखीं तासीव दगडाचीं असलीं तरी ते दगड घासून सुन्दर व एक-सारखे गुळगुळीत करीत. यावरून त्यांना सुबकतेची वा सौंदर्याची थोडी तरी जाणीव प्राप्त झाली, असें दिसतें. ओबडधोब्रड भांडीं बनविणें, वल्कलें परिधान करणें या गोष्टींची उमज पडली. गुहा सोडून लांकूड, बांबू, चिखल यांच्या घरा-मध्यें मानव राहूं लागला. पंचमहाभूतांची कल्पना या मानवास आली. पंचमहाभूतां-बद्दल वाटणारा आदर वा भीति यांतून मंत्र-तंत्र, जादुटोणा शांति आदि भाव-नेचा उगम झाला. ख्रिस्तपूर्व ५ व्या सहस्त्रकामध्यें कृपि विकास व स्थिर ग्रामीण जीवन भारतामध्यें निर्माण झालें होतें, असें नाल, अमटी, कुली आदि ठिकाणच्या उपलब्ध अवशेषांवरून दिसून येतें. या संस्कृतीचे वारस आजहि भारतांत अवशिष्ट आहेत. पूर्वेकडील नाग, कांचार, खाशी लोक, गोंडवनांतील गोंड, सन्ताळ, शबर मुंड जमाती आणि दक्षिणेकडील ओरायन, कुरुंब आदि जमाती व मराठवाड्यां-तील अंध, भिल, गोंड, कोया आदि जमाती या अश्मयुगीन संस्कृतीमध्यें वावरत असतात.

# लोहयुग

कालांतरानें पाषाणयुगाचा विकास लोहयुगांत झाला. या युगामध्यें मान-वाला पृथ्वीवर प्रथम सांपडलेला धातु लोह नसून सोनें होतें. मात्र सोनें सांपडलें

तरी त्याचा उपयोग कसा करावा, हें त्या मानवाला माहीत नव्हतें. सोनें मऊ असल्यानें हत्यारांसाठीं सोन्याचा उपयोग करता येत नव्हता. ख्रि. पू. ३–४ हजार वर्षांपासून मानव तांब्याचा उपयोग करूं लागला होता. सोनें, तांबे या धातूंप्रमाणें कांसे या धातूचाहि मानवाला शोध लागला होता. या वेळेपर्यन्त मानवाचा विकास बराच झाला होता. त्याला लोखंडाचा शोध लागला. हा धातु विपुल सांपडणारा. लोखंड अतिशय कठीण असल्यानें हत्यारें, अवजारें आदि कितीतरी गोष्टींना उपयुक्त ठरतें. आजहि लोखंडाला 'काळें सोनें' म्हटलें जातें. पृथ्वीवरील सर्व भौतिक सुधारणांचा पाया पाषाणांनीं आणि लोखंडानें घातला आहे. मानवाला पाषाण युगानंतरच्या धातु युगामध्यें प्रथम लोखंडाचा शोध लागला नाहीं, याचें मुख्य कारण लोखंड गाळणें तेव्हां फार त्रासाचें व तत्कालीन साधनच्या मानानें अवघड होतें. आणि दुसरें लोखंड गाळणें जितकें अवघड तितकेंच त्याचीं हत्यारें बनविणेंहि अवघड होतें. या अवघड गोष्टी मानवानें साध्य करून घेतल्या व लोखंडाच्या साह्यानें आपलें सारें जीवन उजळून टाकलें, म्हणून हा कालखंड लोहयुगाचा मानला जातो. उत्खननांवरून पाषाणायुगाची परिणति दक्षिण भारतांत लोहयुगामध्यें झाल्याचें दिसतें.

◆ ◆

# सैन्धव संस्कृति

लोह युगाच्या प्रारंभ कालापूर्वींच माणूस निर्वाहासाठीं शेती करूं लागला होता, वस्ती करणें, शेती करणें, हीं एकट्या दुकट्याचीं कामें नव्हेत. शेती करण्यासाठीं सर्व प्रकारें सोयीची जमीन शोधीत शोधीत माणसें टोळ्याटोळ्यांनीं फिरूं लागलीं. पृथ्वीवर अिकडे तिकडे भटकतां भटकतां त्यांना नदीकांठचे प्रदेश सोयीचे आढळले. ज्यांना जो प्रदेश सोयीचा वाटला, तिथें त्यांनीं वस्ती केली. नदीकांठची गाळाची जमीन फार सुपीक. अशा ठिकाणीं जेथें त्यांची वस्ती झाली, घरेंदारें, शेतीवाडी झाली, समाजाची वाढ झाली, तेंच त्यांचें वस्तीस्थान बनलें. आणि तेव्हांचें त्यांचें भाषण, लेखन वास्तव्य, निर्वाहाचीं साधनें वगैरे जीवन दर्शन म्हणजेच त्यांची संस्कृति होय. नदीच्या कांठानेंच संस्कृतीचे मळे फुललेलें आपणांस आढळतील.

युरो- भारतीय आर्यांची एक टोळी आग्नेयेस हिंदुकुश पर्वतापर्यंत आली, हेच पर्शू- भारतीय आर्य होत, ते पारशी आणि वैदिक आर्यांचे वंशज होत.

म्हणूनच पारशी व भारतीय संस्कृतींत विलक्षण साम्य आढळतें. पुढें या टोळीं- सहि फाटाफूट झाली. आणि त्यापैकीं एक भाग पूर्वेकडे भारतांत आला. वैदिक आर्यांचे आगमन लहान लहान टोळ्यांनीं दीर्घकाळ चाललें होतें. भारतांत बारा महिने दुथडी भरून वाहणारें सिंधू नदीचें अफाट पात्र, नदीच्या दोन्ही तीरांवर दूरवर पसरलेलीं कुरणें, आजूबाजूचा समृद्ध पण रमणीय निसर्ग, असे अपूर्व वैभव पाहिल्यावर आर्यांनीं आपली भ्रमन्ति सोडली व ते येथेंच वस्ती करून राहूं लागले. सिंधु नदीच्या खोऱ्यांतच आर्यांची संस्कृति बहरली. म्हणून या संस्कृतीस " सैन्धव संस्कृति " असें स्थलवाचक नांव दिलें जातें. मोहेंजोदडो येथील उत्खननांवरून या संस्कृतीची पूर्ण कल्पना येऊं शकते.

◆ ◆

## - दक्षिणापथ

उत्तरेकडे जेव्हां लोकवस्तीची दाटी झाली तेव्हां या आर्यांपैकीं कांहीं साहसप्रिय व धैर्यवान लोक दक्षिणेकडे थावयास निघाले. परन्तु त्यांच्या मार्गांत विंध्य पर्वताची अडचण आली. हा पर्वत प्रथम अगस्ति ऋषीनें ओलांडला. या ऋषीनें प्रथम दक्षिण भारतांत येऊन आपला आश्रम स्थापन केला. प्रभु रामचंद्र जेव्हां दक्षिणेकडे आले तेव्हां त्यास प्रथम अगस्ति ऋषीचा आश्रम लागला असल्याचें पुराणांत वर्णन आहे. अगस्ति ऋषीप्रमाणें भृगु ऋषींचेहि आश्रम ठिकठिकाणीं असल्याचें पौराणिक वर्णनामध्यें आढळून येतें. रामानें दण्डकारण्यांत प्रवेश करतांना विंध्य पर्वत ओलांडून न जातां पूर्वेकडून विंध्य पर्वताला वळसा घालून दक्षिणेंत प्रवेश केला असावा. दक्षिणेकडून काशीयात्रेस जाण्याचा मार्ग रतनपूर (बिलासपूरजवळ) या प्राचीन राजधानीवरून जात असल्याचें ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध होत आहे.

◆ ◆

## महाराष्ट्र

याप्रमाणें महाराष्ट्रांत-दण्डकारण्यांत-दक्षिणापथांत जी आर्यांची वसाहत झाली ती कांहीं आर्य समुद्रतीरावर समुद्रमार्गे येऊन स्थायिक झाली. व कांहीं विंध्य पर्वतास वळसा घालून पूर्वेकडून येऊन स्थायिक झाले. अशा या दोन मार्गांनीं ही वसाहत झालेली दिसते. ज्या प्रमाणें आर्यांचें आगमन भारतांत टोळ्याटोळ्यांनीं झालें त्याचप्रमाणें दक्षिणेमध्यें-महाराष्ट्रांतहि-आर्यांचें आग-

मन टोळयाटोळयांनीं व दीर्घकाळपर्यंत चाललें होतें. परंतु उत्तरेकडे आर्य ज्या प्रमाणांत आले त्या प्रमाणांत ते दक्षिणपथांत आले नाहींत. दक्षिण भारतांत विकास व प्रसार पावलेली द्राविड संस्कृति उत्तरेकडे विशेष प्रसारीत झालेली नसावी. दक्षिणपथांतील महाराष्ट्र हा आर्य-द्राविड संस्कृतीच्या संघर्षाचा सीमा प्रांत आहे, असें म्हणावें लागेल. त्यामुळें महाराष्ट्रांत आर्य-द्राविड संस्कृतीचें मिश्रण दिसून येतें. याप्रमाणें महाराष्ट्राची वसाहत ही अत्यन्त प्राचीन कालापासून प्रथम वन्य लोक, नंतर द्राविड लोक व त्यानंतर आर्य लोक यांच्या दीर्घकालपर्यंत पसरलेल्या व निरनिराळया काळीं झालेल्या आगमनानें होत गेली. या सर्व गोष्टींचा परिणाम त्यांचे आचार, विचार, चालीरीति, धार्मिक विधी, सांप्रदाय, भाषा, वेशभूषा यांच्या बाबतींत दिसून येतो. महाराष्ट्राची वसाहत होण्यास बराच कालावधि लागला असावा. महाराष्ट्रापैकीं विदर्भ हा लवकर वसला असावा, कारण तो पूर्णा, वर्धा या नद्यांमुळें सुपीक व सपाट असून शेती करून राहण्यास अनुकूल आहे. वैदर्भीयांचे उल्लेख वारंवार पौराणिक वाङमयांत आढळून येतात. त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. त्यामानानें दण्डकारण्य म्हणजे आजचा मराठवाडा बऱ्याच वर्षांनीं वसला असावा. कारण तेथें दीर्घकालपर्यंत दाट जंगल होतें. बालाघाट व सातपुडा पर्वतांच्या कांहीं भागानें हा प्रदेश व्यापला असल्यानें दण्डकारण्याच्या कांहीं भागास ' अश्मक ' हें नांव पडलें असावें. या भागांतहि नाशिकजवळचा व गोदावरी नदीकांठचा भाग खानदेशपेक्षां अधिक लवकर सुसंस्कृत झाला असला पाहिजे. नाशिकजवळच्या पंचवटीमध्यें रामाचें वस्तीस्थान होतें. व सीताशोधासाठीं निघालेल्या रामाची पायवाट मराठवाडयाच्या तुळजापुरापासूनच गेलेली आहे.

◆ ◆

# महाराष्ट्राचा इतिहास

महाराष्ट्राचा अितिहास हा भारताच्या अितिहासाशीं निगडीत आहे. खि. पू. सहाव्या शतकांपासून भारताचा सुसंगत अितिहास उपलब्ध होतो. अैतिहासिक घटनांचा निश्चित कालनिर्णय या वेळेपासून करता येतो. वाङमयीन पुराव्यावरून सहाव्या शतकामध्यें सर्वत्र लहान लहान राज्यें विखुरलेलीं होतीं. मगध देशांवर शिशुनाग घराणें राज्य करीत होतें. शिशुनाग वंशांतील उदयभद्रानतर नंदिवर्धन गादीवर आला. नंदीवर्धन हा शिशुनाग वंशांतील असल्याचें पुराणांतरी आढळतें. पण नंदीवर्धन हा नंद वंशाचा संस्थापक असावा असें वाटतें. याच नंद

वंशामध्यें महापद्म हा एक असामान्य राजा झाला. त्यानें गंगेच्या खोऱ्यांती[illegible] [illegible]वं राज्यें जिंकून आपल्या मगध देशाला जोडलीं. कलिंगवरहि स्वारी केली. [illegible] [illegible]ीं नदीच्याकांठीं असलेल्या नांदेड (नवनंद–डेरा) या ग्राम नावावरून [illegible] [illegible]यानें दक्षिणवरहि स्वारी केली होती, बराच प्रदेश पादाक्रांत केला होता, असें दिसतें. पण या कालामध्यें कोणतीं राज्यें महाराष्ट्रांत होतीं. हें समजण्यांस साधन उपलब्ध नाहीं. परंतु त्यावेळच्या एकंदर सामाजिक व राजकीय अितिहासावरून व परंपरेवरून असें अनुमान काढावयास हरकत नाहीं कीं, त्या काळीं महाराष्ट्रांत एकादें मोठें साम्राज्य अस्तित्वांत नसून निरनिराळी लहान लहान राज्यें अस्तित्वांत होतीं. ही सामान्यतः स्वतंत्र नसून एकाद्या बलाढ्य सम्राटानें कधीं दिग्विजय केल्यास तेवढ्यापुरतों त्या सम्राटाची मांडलीक म्हणून समजण्यांत येत असत. व तात्पुरत्या कालापर्यंत खंडणीहि देत. अशा प्रकारें कदाचित अशोकानें आपल्या वैभवकालीं या प्रदेशांवर आपली सत्ता प्रस्थापित केलीं असावी. कारण अशोकाची शिलाशासनें महाराष्ट्राच्या सीमा प्रदेशावर सर्व दिशास आढळतात. अशोकाचे वा बौद्ध धर्म प्रचारक मरहट्ट देशांत आलें असल्याचे उल्लेख महावसो आदि ग्रंथांत आढळतो. तसाच तो पेत्तनिक म्हणजे म्हणजे पैठण या राजधानी–बद्दलहि आढळतो. अर्थात मौर्यांची सत्ता महाराष्ट्रांत कांहीं काल असल्याचें संभवतें. त्यानंतर होवून गेलेल्या शुंग, कण्व, आंध्र यांच्या सत्तेविषयीं पाहूं गेल्यास शुंग, कण्व या दोन वंशांचा महाराष्ट्राशीं संबंध असलेला दिसत नाहीं.

◆◆

## आंध्र ( ख्रि. पू. ३० अि. स. २५० )

आंध्र वा आंध्रभृत्य या घराण्याचा मात्र महाराष्ट्राशीं निकटचा संबंध आलेला आहे. आंध्राची राजधानी पैठण होती. अंध्राचा लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत चंद्रगुप्ताच्या खालोखाल नंबर होता. प्लीनीच्या ग्रंथामध्यें आंध्राच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याचा उल्लेख आहे. ३० तटबंदी शहरें, अनेक गांवें, १ लाख पायदळ, २ हजार घोडदळ, १ हजार हत्ती होते, चंद्रगुप्त वा बिंदुसार यांच्या वेळीं हें राज्य मौर्यांचें मांडलीक बनलें असावें. राजा अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य सत्ता विस्कळीत झाली. आणि हें आंध्र राज्य स्वतंत्र बनलें. आंध्र हें जमातीचें नांव असून सातवाहन वा शालिवाहन राजे हे त्या जमातीचे होते, एवढाच निष्कर्ष काढता येतो. सध्यां आंध्र प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाचा समावेश

गौतमीपुत्राच्या साम्राज्यांत होत नव्हता, ही गोष्ट लक्षांत घेतां सातवाहन हे मूळचे महाराष्ट्रांतीलच होत, हें निर्विवाद सिद्ध होतें.

◆ ◆

# सातवाहन राजे

या घराण्याचा संस्थापक सिमुख सातवाहन हा होय.

ज्या भविष्य-पुराणांतून अितर पुराणांनीं कलियुगांतील राजघराण्यांच्या वंशावळ्या उतरविल्या, त्या भविष्य-पुराणांची शुद्धप्रत आज उपलब्ध नाहीं. त्यामुळें निरनिराळ्या पुराणांतील वंशावळ्यांचें चिकित्सक बुद्धीनें संशोधन करून त्यावरून भविष्य-पुराणाचा पाठ शुद्ध करून घेतला पाहिजे. हें थोडेबहुत कार्य पार्गिटेर साहेबांनीं केलें आहे. आंध्र घराण्यामध्यें जे राजे झाले त्यांचे नावापुढें कंसांत वर्षांचे आंकडे आहेत. भविष्य-पुराणामध्यें हा अमुक वर्षें राज्य करील, हा अमुक वर्षें राज्य करील, अशी भविष्यकालीन माहिती दिली आहे. यावरून आंध्र घराण्यांतील राजांची माहिती आपणांस मिळते.

| | |
|---|---|
| १) सिमुक – (२३) | २) कृष्ण (सिमुकाचा धाकटा भाऊ) १० |
| ३) श्रीशातकर्णी (मल्लक)[१०] | ४) पूर्णोत्संग – (१८) |
| ५) स्कंधस्तांभि – (१८) | ६) शातकर्णी — (५६) |
| ७) लंबोदर – (१८) | ८) अपिलक (दिविलब) — (१२) |
| ९) मेघस्वाति – (१८) | १०) स्वाति – (१८) |
| ११) स्कन्दस्वाति – (७) | १२) मृगेंद्र स्वातिकर्ण — (३) |
| १३) कुंतल स्वातिकर्ण – (८) | १४) स्वातिवर्ण – (१) |
| १५) पुलोमावि (पदुमान (३६) | १६) अरिष्टाकर्ण – (२५) |
| १७) हाल – (५) | १८) मंतलक (पत्तलक) – (५) |
| १९) पुरिकेषेण – (२१) | २०) सुन्दर शातकर्णि (१) |
| २१) चकोर शातकर्णि-(६ म.) | २२) शिवस्वाति – (२८) |
| २३) राजा गौतमीपुत्र-(२१) | २४) पुलोमा – (२८) |
| २५) शिवश्री पुलोमा – (७) | २६) शिवस्कन्ध शातकर्णि – (३) |
| २७) यज्ञश्री शातर्किण-(२९) | २८) विजय – (६) |
| २९) चंडश्री शातर्किण-(१०) | ३०) पुलोमावि – (७) |

सिमुख सातवाहनानें शेवटचा कण्व राजा सुशर्मा यास ठार मारून सातवाहनाचें स्वातंत्र्य पुकारलें. विदिशी व विदर्भ हे मुलूख सातवाहन सत्तेखाली

वंशामध्यें महापद्म हा एक असामान्य राजा झाला. त्यानें गंगेच्या खोऱ्यांतील सर्व राज्यें जिंकून आपल्या मगध देशाला जोडलीं. कलिंगवरहि स्वारी केली. गोदावरी नदीच्याकांठी असलेल्या नादेड (नवनंद-डेरा) या ग्राम नांवावरूनहि महापद्मानें दक्षिणवरहि स्वारी केली होती, बराच प्रदेश पादाक्रांत केला होता, असे दिसतें. पण या कालामध्यें कोणतीं राज्यें महाराष्ट्रांत होतीं. हें समजण्यांस साधन उपलब्ध नाहीं. परंतु त्यावेळच्या एकंदर सामाजिक व राजकीय अितिहासावरून व परंपरेवरून असें अनुमान काढावयास हरकत नाहीं कीं, त्या काळीं महाराष्ट्रांत एकादें मोठें साम्राज्य अस्तित्वांत नसून निरनिराळी लहान लहान राज्यें अस्तित्वांत होतीं. ही सामान्यत: स्वतंत्र नसून एकाद्या बलाढ्य सम्राटानें कधीं दिग्विजय केल्यास तेवढ्यापुरतीं त्या सम्राटाची मांडलीक म्हणून समजण्यांत येत असत. व तात्पुरत्या कालापर्यंत खंडणीहि देत. अशा प्रकारें कदाचित अशोकानें आपल्या वैभवकालीं या प्रदेशांवर आपली सत्ता प्रस्थापित केली असावी. कारण अशोकाची शिलाशासनें महाराष्ट्राच्या सीमा प्रदेशावर सर्व दिशास आढळतात. अशोकाचे वा बौद्ध धर्म प्रचारक मरहट्ट देशांत आलें असल्याचे उल्लेख महावसो आदि ग्रंथांत आढळतो. तसाच तो पेत्तनिक म्हणजे म्हणजे पैठण या राजधानीबद्दलहि आढळतो. अर्थात मौर्यांची सत्ता महाराष्ट्रांत कांहीं काल असल्याचें संभवतें. त्यानंतर होवून गेलेल्या शुंग, कण्व, आंध्र यांच्या सत्तेविषयीं पाहूं गेल्यास शुंग, कण्व या दोन वंशांचा महाराष्ट्राशीं संबंध असलेला दिसत नाहीं.

◆◆

# आंध्र ( खि. पू. ३० ।अि. स. २५० )

आंध्र वा आंध्रभृत्य या घराण्याचा मात्र महाराष्ट्राशीं निकटचा संबंध आलेला आहे. आंध्राची राजधानी पैठण होती. आंध्राचा लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत चंद्रगुप्ताच्या खालोखाल नंबर होता. प्लीनीच्या ग्रंथामध्यें आंध्राच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याचा उल्लेख आहे. ३० तटबंदी शहरें, अनेक गांवें, १ लाख पायदळ, २ हजार घोडदळ, १ हजार हत्ती होते, चंद्रगुप्त वा बिंदुसार यांच्या वेळीं हें राज्य मौर्यांचें मांडलीक बनलें असावें. राजा अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य सत्ता विस्कळीत झाली. आणि हें आंध्र राज्य स्वतंत्र बनलें. आंध्र हें जमातीचें नांव असून सातवाहन वा शालिवाहन राजे हे त्या जमातीचे होते, एवढाच निष्कर्ष काढता येतो. सध्या आंध्र प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाचा समावेश

गौतमीपुत्राच्या साम्राज्यांत होत नव्हता, ही गोष्ट लक्षांत घेतां सातवाहन हे मूळचे महाराष्ट्रांतीलच होत, हें निर्विवाद सिद्ध होतें.

# सातवाहन राजे

या घराण्याचा संस्थापक सिमुख सातवाहन हा होय.

ज्या भविष्य-पुराणांतून अितर पुराणांनीं कलियुगांतील राजघराण्यांच्या वंशावळ्या उतरविल्या, त्या भविष्य-पुराणांची शुद्धप्रत आज उपलब्ध नाहीं. त्यामुळें निरनिराळ्या पुराणांतील वंशावळ्यांचें चिकित्सक बुद्धीनें संशोधन करून त्यावरून भविष्य-पुराणाचा पाठ शुद्ध करून घेतला पाहिजे. हें थोडेबहुत कार्य पार्गिटेर साहेबांनीं केलें आहे. आंध्र घराण्यामध्यें जे राजे झाले त्यांचे नावापुढें कंसांत वर्षांचे आंकडे आहेत. भविष्य-पुराणामध्यें हा अमुक वर्षें राज्य करील, हा अमुक वर्षें राज्य करील, अशी भविष्यकालीन माहिती दिली आहे. यावरून आंध्र घराण्यांतील राजांची माहिती आपणांस मिळते.

| | |
|---|---|
| १) सिमुक – (२३) | २) कृष्ण (सिमुकाचा धाकटा भाऊ) १० |
| ३) श्रीशातकर्णी (मल्लक) [१०] | ४) पूर्णोत्संग – (१८) |
| ५) स्कंधस्तांभि – (१८) | ६) शातकर्णी — (५६) |
| ७) लंबोदर – (१८) | ८) अपिलक (दिविलब) — (१२) |
| ९) मेघस्वाति – (१८) | १०) स्वाति – (१८) |
| ११) स्कन्दस्वाति – (७) | १२) मृगेंद्र स्वातिकर्ण — (३) |
| १३) कुंतल स्वातिकर्ण – (८) | १४) स्वातिवर्ण – (१) |
| १५) पुलोमावि (पदुमान (३६) | १६) अरिष्टाकर्ण – (२५) |
| १७) हाल – (५) | १८) मंतलक (पत्तलक) – (५) |
| १९) पुरिकेषेण – (२१) | २०) सुन्दर शातकर्णि (१) |
| २१) चकोर शातकर्णि-(६ म.) | २२) शिवस्वाति – (२८) |
| २३) राजा गौतमीपुत्र-(२१) | २४) पुलोमा – (२८) |
| २५) शिवश्री पुलोमा – (७) | २६) शिवस्कन्ध शातकर्णि – (३) |
| २७) यज्ञश्री शातकर्णि-(२९) | २८) विजय – (६) |
| २९) चंडश्री शातकर्णि-(१०) | ३०) पुलोमावि – (७) |

सिमुख सातवाहनानें शेवटचा कण्व राजा सुशर्मा यास ठार मारून सातवाहनांचें स्वातंत्र्य पुकारलें. विदिशी व विदर्भ हे मुलूख सातवाहन सत्तेखालीं

आणलें. नन्तर त्याचा भाऊ कृष्ण हा गादीवर आला. त्यानें आंध्रांची सत्ता बरीच वाढविली. कृष्ण राजाचा शिलालेख नाशिक येथें सांपडला आहे, त्यावरून उत्तर महाराष्ट्रांत सातवाहनांची सत्ता दृढमूल झाली असावी, असें दिसतें. राजा शातकर्णि याचा उल्लेख नाणेंघाटाच्या शिलालेखांत आहे. त्यानें नानिका या महारट्टी तरुणी-बरोबर विवाह केला होता. राजा शातकर्णीची बरींच नाणीं माळव्यांत सांपडतात. राजा शातकर्णीनें आपल्या आंध्र राज्याची सत्ता अपरान्त, काठेवाड, गुजराथ, माळवा, उत्तर महाराष्ट्र या प्रदेशांत पसरविली होती. अिसवी सनाच्या सुरवा-तीला शकांची सत्ता दक्षिणेकडे वाढत होती. या शकाचा अितिहास यथानुक्रमें येई-लच. या शकांनीं आंध्र राज्यावर हल्ले करण्यास सुरवात केली. राजा गौतमीपुत्र शातकर्णीनें राज्याची विसकटलेली घडी नीट बसविली. शकांच्या टोळ्यांवर मिळ-विलेल्या विजयाचें चिन्ह म्हणून शकांच्याच नाण्यावर आपल्या नांवाचा शिक्का मारून तीं प्रचारांत ठेवलीं. या विजयाप्रीत्यर्थ राजा गौतमीपुत्रानें कांहीं प्रदेश दान केल्याचा उल्लेख आढळतो. ही दानाज्ञा त्यानें दिग्विजयी सैन्याच्या एका तळावरून दिली आहे. या स्वाऱ्यांसाठीं गौतमीपुत्र हा बराच काळपर्यंत नाशिकच्या परिसरांत असल्याचे उल्लेख सांपडतात. या स्वाऱ्यामध्यें अपरांत, अनूप, सुराष्ट्र, कुकुर, आकर, आवन्ती, हे प्रदेश गौतमीपुत्रानें शकांपासून जिंकून घेतले. या प्रदेशाखेरीज ऋषिक ( कृष्णेवरील ऋषिनगर ), अश्मक [ बोधनजवळील प्रदेश ], मूलक ( पैठणचा परिसर ) विदर्भ यांवरहि गौतमीपुत्राचा ताबा होता. गौतमीपुत्राची आई गौतमी बालश्री हिनें आपल्या मुलाचें " त्याचे घोडे तिन्ही समुद्राचें पाणी प्यालें आहेत. " असा यथार्थ उल्लेख केला आहे. पुलुमावी शातकर्णीचे शिलालेख नाशिक, कार्ले, अमरावती येथें सांपडले आहेत. त्याचीं नाणीं कृष्णा, बेल्लारी या जिल्ह्यामध्यें सांपडतात. कृष्णा नदीच्या मुखाकडे आंध्रसत्ता बजाविण्याची काम-गिरी पुलुमावीनेंच बजाविली आहे, असें वाटतें. शिवश्री शातकर्णि याची नाणीं कृष्णा व गोदावरी नदीकांठच्या जिल्ह्यांत सांपडतात. कान्हेरी येथील शिला-लेखांत उल्लेखिलेला रुद्रदामनाचा जांवई शातकर्णि हाच असावा. सासऱ्याच्या पश्चात उत्तर कोंकण जिंकून घेतला व शक सत्तेला उत्तरेंतच थोपवून धरले. राजा हाल शातकर्णि याचें नाव वाङ्मयाशीं संबंधित आहे. महाराष्ट्रांतील प्राचीन भाषेंत लिहिलेला " सप्तशती " हा ग्रंथ हाल राजाचा म्हणून प्रसिद्ध आहे. राजा यज्ञश्री शातकर्णि यांचे शिलालेख नाशिक, कान्हेरी येथें सांपडले आहेत. याचीं नाणीं कृष्णा-गोदावरी जिल्हे, चांदा-विदर्भ, उत्तर कोंकण, बडोदे, काठेवाड एवढ्या विस्तीर्ण प्रदेशांत सांपडतात. बडोदे भागांतील नाण्यांवर जहाजाचें चित्र

आढळतें. सोपारा येथील नाण्यावर राजमुद्रा आहे. एरव्ही कोणाहि सातवाहनाच्या नाण्यांवर राजमुद्रा नाहीं. राजा यज्ञश्री नंतर राजा विजय, राजा चंडश्री, चौथा पुलुमावि हे तीन राजे होऊन आंध्रसत्तेचें विभाजन झालें.

◆ ◆

# आंध्र राज्याचें समालोचन

सातवाहनांच्या राजवटीमध्यें महाराष्ट्र संपन्न होता. सातवाहन हेच शालि–वाहन किंवा शातकर्णि होत. हें नांव घराण्याचें आहे, व्यक्तीचें नव्हे. परन्तु हें लक्षांत नसल्यानें बराच घोटाळा होऊन शालिवाहनाच्या दंतकथा प्रचारांत आल्या. नर्मदेच्या दक्षिणेकडे पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंतच्या विस्तृत प्रदेशावर आंध्रांचें साम्राज्य पसरलेलें होतें. दक्षिणेंतील या पहिल्या साम्राज्यानें उत्तरेकडेहि सत्ता स्थापन करून नेहमीचा पायंडा मोडला, असेंच म्हणावें लागेल. आंध्रांच्या साम्राज्यांत बौद्ध आणि वैदिक हे दोन्ही धर्म भरभराटीस आले होतें. शालिवाहन राजे स्वतः वैदिक धर्माभिमानी असूनहि त्यांनीं बौद्ध धर्माला उत्तेजन आणि सहाय्य दिलें. त्यांच्या कारकिर्दीत कार्ले, अजिंठा, वेरुळ नाशिक आदि ठिकाणीं डोंगरांतून विहार, स्तूप, लेणीं खोदलीं गेलीं. व्यापारहि भरभराटीस आला होता. मुसलमान व पाश्चात्य लोक भडोच, सोपारे, चोल आदि बंदरांमार्फत पैठण, तगर–आजचें तेर– ( मराठवाडा ) आदि राजधान्यांशीं मलमल, ओनिक्स दगड, कापड वगैरे वस्तूंचा व्यापार करीत, लोक सधन असल्यामुळें चैत्य, लेणीं, देवळें, अिमारतीं बांधण्याकडे पैशांचा विनियोग होई. गंधी, तेली, भुसारी वगैरे लोकाचे संघ अथवा पंचायती असत. व्याजाचा दर पांचपासून साडेसात टक्क्यापर्यंत असे. ग्रामपंचायती वाढीस लागल्या होत्या. दळणवळण, प्रवास त्रासाचा नव्हता. वैजयंतीचा सावकार व सोपाऱ्याचे लोक यांच्या देणग्यांचा उल्लेख कार्ल्यांच्या लेण्यांत आहे. उत्तर भार-तांतील, सिंधमधील आत्यांचा उल्लेख नाशिकच्या लेण्यामध्यें आहे. दळणवळण, प्रवास त्रासाचा असतां तर हा सांस्कृतिक व्यवहार झाला नसता. विद्या व कला यांना बरेंच उत्तेजन मिळालें. वाङ्मयांत बरीच वाढ झाली. प्रसिद्ध गुणाढ्याची "बृहत्कथा" व हालाची "सप्तशती" हे ग्रंथ याच राजवटीमधील होत. हिंदु-स्तानांतील राजवंशांतील आंध्रांचें ( सातवाहनांचें ) स्थान अग्रगण्य आहे. भविष्य पुराणांत सातवाहनांची वंशावळ दिली असल्यानें त्यांचा राजकीय दर्जा प्रथम श्रेणींत असल्याचें दिसतें. पुराणांत समावेश झालेल्या या एकाच वंशाबद्दल मुद्रा

शिलालेख आदि प्रत्यक्ष साधनांचा पुरावा मिळतो. राज्यकर्ते, राज्यकाल, राज्य-विस्तार या दृष्टीनें आंध्र घराणें अनुपमेय आहे. दक्षिणेंत विशेषतः महाराष्ट्रांत पहिली राजकीय संघटना, पहिली चलनपद्धति, नाण्यावरची राजमुद्रा, राजाचें नांव कोरण्याची पद्धत याच घराण्यानें प्रथम सुरवात केली. यांच्याच कारकिर्दीत चिरंतन शिल्प-कृति निर्माण झाली. प्राकृताला राजाश्रयच नव्हे तर राजकर्तृत्व या घराण्यानें दिलें. परकियांचें उच्चाटन, यज्ञ संस्कृतीचा पुरस्कार, धार्मिक सहिष्णुता या बाबतींत सातवाहन राजांचें कर्तृत्व चिरंजीव आहे. "गोदावरी तीरीं असलेले प्रतिष्ठान नगर म्हणजे अर्वाचीन पैठण शहर ही त्यांची ( आंध्रांची ) राजधानी होती. त्यांच्यामध्यें सातवाहन ( हाल ) नांवाचा प्रसिद्ध राजाहि होऊन गेला. तेव्हां दक्षिणेंतील पंडितांनीं त्याचेंच नांव आपल्या शकाला लावणें संभवनीय आहे. खुद्द सातवाहन वंशातील कोणाहि राजानें हा शक चालू केला नाहीं, ही गोष्ट मात्र निश्चित आहे. कारण त्यांच्यापैकीं एकाहि राजानें आपल्या शिलालेखांत हा शक दिला नसून ज्यानें त्यानें स्वतःच्या कारकिर्दीचें वर्णन दिलें आहे." असें ज्ञानकोशकार शालिवाहन शकाबद्दल म्हणतात.

## शक-क्षत्रप

शक टोळ्यांनीं बोलन घाटातून सिंधमध्यें मुसंडी मारली. व इसवी सनाच्या सुरवातीस छोटी छोटी शक राज्यें निर्माण झालीं. शकांची सत्ता राजपुताना, काठेवाड, गुजराथ, कोंकण येथपर्यंत होती. कुशान सत्तेला मांडलिक म्हणून या शकांनी क्षत्रप ही पर्शियन पदवी कायम राखली. व पुढें स्वतंत्र झाल्यावरहि याच नांवानें ते अितिहासांत ओळखले जाऊं लागले. या क्षत्रपांपैकीं क्षहरात हें घराणें महाराष्ट्रांत विशेष प्रसिद्धीस आलें.

## क्षहरात

या घराण्याचा संस्थापक क्षहरात भूमक हा कनिष्काचा मांडलिक म्हणून पश्चिम भारताचा कारभार पाहात असे. त्यानें आपली स्वतंत्र नाणीं व्यवहारास चालू केलीं होतीं. भूमकानंतर नहपान हा गादीवर आला. नहपानचीं नाणीं अजमीरपासून नाशिकपर्यंतच्या प्रदेशांत आढळतात. त्याचा अमात्य आर्यमन याचा एक शिलालेख जुन्नर येथें सांपडला आहे. गौतमीपुत्र शातकर्णि यानें नहपानास ठार मारून

क्षहरात वंशाचा शेवट केला. आंध्र घराण्याच्या राज्यामध्यें शक-क्षत्रपांनीं महाराष्ट्रांत २१ वर्षे वंडाळी करून आंध्रसत्ता खिळखिळी केली होती.

## कार्दमक

नहपानाच्या मृत्युनंतर पश्चिम भारताचा कारभार राजा चषन यांच्याकडे आला. व सातवाहनांनीं जिंकलेला मुलूख पुन्हां परत जिंकून घेण्याची जबाबदारी त्यांचेकडे आली. चषनचा नातू पहिला रुद्रदामन हा शूर पुरुष होऊन गेला. नाशिक व पुणें जिल्हे सोडून बाकीच्या सर्व क्षहरातच्या प्रदेशावर रुद्रदामनचें स्वामित्व होतें. रुद्रदामनची मुलगी दक्षमित्रा ही गौतमीपुत्र शातकर्णीच्या मुलास दिली होती, असा उल्लेख आहे. सासऱ्याच्या मृत्युनंतर जांवयानें मुलुख जिंकून घेतल्याचा उल्लेख वर आलाच आहे. अिसवीसनाचें तिसरें शतक हे भारताच्या ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें पाहतां पूर्ण अज्ञात आहे. पौराणिक यांग्रंमधून ऐतिहासिक सत्य शोधणें अशक्य आहे. म्हणून कांहींतरी तर्क लढवित बसण्यापेक्षां इ. स. २०० ते ३२५ हा अज्ञातकाल म्हणून मानणें बरें.

## अभिरादी राजवंश

आंध्रांचें राज्य संपल्यावर त्यांच्या नोकरांचे वंशज राज्य करतील असें भविष्य पुराणांत म्हटलें आहे. अभार, गर्दभी, शक, यवन, तुषार, गुरुंड आदि राजवंशांची कारकीर्दीच्या वर्षासह भविष्य पुराणानें यादी दिली आहे. या किरकोळ राजवंशाची दिलेली माहिता घोटाळयाची वाटते. आंध्रसत्तेच्या विनाशानन्तर दक्षिणेंत अनेक राजघराणीं ठिकठिकाणीं उदयास आलीं, एवढाच स्पष्ट अर्थ निघतो. वऱ्हाडच्या वाकाटक राजांनीं मात्र महाराष्ट्रावर कांहीं दिवस राज्य केलें आहे.

## वाकाटक राजघराणें

वऱ्हाडच्या वाकाटक घराण्याचा मूळ संस्थापक विंध्यशक्ति नांवाचा ब्राम्हण होता. या घराण्यांतील राजांनीं वऱ्हाड, पैठण, खानदेश सातपुड्याचें पठार येथपर्यन्त राज्यविस्तार केला होता. महाकवि कालिदासहि या घराण्याच्या आश्रयाला

होत. मेघदूत हें महाकाव्य कालिदासानें याच घराण्याच्या कारकीर्दीत व यांच्याच आश्रयाला राहून लिहिलें. अशी आख्यायिका आहे. वाकाटकांनीं विद्या—कला यांना उत्तेजन दिलें. अनेक प्राकृत ग्रंथाचें कर्तृत्व वाकाटक राजांना दिल्याचें आढळतें. अजिंठा येथील बरेचसे शिल्प व चित्रें ही वाकाटकांच्या उदार आश्रयानेच पूर्ण होवूं शकली. अजिंठ्याच्या १६ क्रमांकाच्या लेण्यांमध्यें वाकाटक घराण्यांतील ७ राजपुरुषांची नांवें कोरलेली आढळून येतात. वाकाटकांनीं पुनरुज्जीवनाची चळवळ सुरुं केली. धर्म—कला—विद्या यांना उत्तेजन देवून विधायक शक्तींना आवाहन केलें. गुप्त घराण्यांतील सुवर्ण-युगाचा प्रत्यय समकालिन वाकाटक घराण्यांतहि आपणांस येतों.

◆ ◆

# समालोचन (इ. स. ३००—६००)

स्वराज्य व स्व—धर्म यांच्या रक्षणासाठीं व समाजाच्या स्थैर्यासाठीं स्थिर राजसत्तेची आवश्यकता होती. त्यामुळें राजसत्ता प्रबल करण्याकडे राजांचे अधिकार व महत्त्व वाढविण्याकडेच विचारवंतांची प्रवृत्ति होती. राजा हा परमेश्वराचा अंश आहे, ही कल्पना समाजांत पक्की रुजली होती. राजानें प्रजेच्या तंत्राप्रमाणें वागण्याचें कारण नाहीं, प्रजेच्या हितासाठीं कर्तव्यबुद्धीनें झटलें म्हणजे राजधर्म पार पाडला, अशी समजूत होती. राजाचें खालोखाल युवराजाचें स्थान असे. राजसत्ता वंश परंपरेप्रमाणें बापाकडून थोरल्या मुलाकडे जात असे. राज्यव्यवस्था नोकरशाही पद्धतीची होती. कारभाराची वेगवेगळीं खातीं असून त्यांवर राजाला जबाबदार असे अधिकारी नेमले जात. कांहीं महत्वाचे हुद्दे वंश-परंपरागत एकाच कुटुंबांत चालत असल्याचें दिसतें. मुलकी व लष्करी अधिकार पुष्कळदां एकाच व्यक्तीकडे सोंपविल्याचें इतिहासावरून दिसून येतें. राजाला सल्ला मसलत देण्यासाठीं मंत्रि परिषद वा विद्वत् परिषद असे. राज्याचे कारभाराच्या सोयीचे दृष्टीनें भाग पाडलेले असत. व त्यावर अधिकारी नेमलेले असत. सर्वांत शेवटचा घटक ग्राम (गांव) हें असे तेथील ग्रामक [मुख्याधिकारी] आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्यानें गांवचा कारभार पाहात असे.

जमीन महसूल रोख पैसा वा धान्य रुपानें जमा होई. त्यासाठीं सर्वत्र सरकारी धान्य गुदामें असत. जमीन महसूलाखेरीज वेगवेगळें कर वसूल केले जात असत.

इ. स. ३०० ते ६०० या कालामध्यें धार्मिक जीवन सुसंपन्न व जोमदार होते. धार्मिक पंथोपंथाची वाढ हे या संपन्नतेचे कारण होते. जुन्या वैदिक धर्मांचें स्वरुप पालटत होते. धार्मिक जीवन अव्यक्ताकडून व्यक्ताकडे, अमूर्ता-कडून मूर्ताकडे वळले होते. भक्तीनें जनमनाची पकड घेतली होती. मूर्तिपूजा देवालयें, स्तूप, स्तंभ उभारणें यांना धार्मिक महत्व प्राप्त झालें. पण या काळाचें दुसरें एक वैशिष्ठ्य आहे ते म्हणजें धार्मिक सहिष्णता हें होय. हिंदु राजांनी बौद्ध, जैन पंडीतांना आश्रय दिला. हिंदु, बौद्ध, जैन यांच्या आगमांची नवी संस्करणें याच काळांत झाली.

जाति संस्था अधिकाधिक प्रगत झाली. जातींची कर्तव्यें व संबंध यांच्यात निश्चितता आली. प्रभावती गुप्ता ही वैश्य राजकन्या ही रुद्रसेन या वाकाटक घराण्यांतील ब्राह्मण राजाला दिली, कंदबाच्या ब्राह्मण घरा-ण्यांतील राजकन्या गुप्तांच्या वैश्य घराण्यांत दिली ही अपवादात्मक गोष्ट आहे. ब्राह्मण हे सर्वश्रेष्ठ ठरले. आणि चांडाल हे कनिष्ट ठरवून इतर जातींची उच्चनीचता ठरविली गेली. चांडालाना कनिष्ट स्थान प्राप्त झाल्यानें त्यांच्यावर अनेक सामाजिक निर्बंध घातले गेले. यांतून अस्पृश्यता निर्माण झाली. त्यांच्या सांवलीनेही विटाळ होऊं लागला. वेदाध्ययनांचा अधिकार ब्राम्हणापुरता मर्यादित केला. याकाळीं संयुक्त कुटुंबपद्धति प्रचलित होती.

शेती व तद्नुषंगिक उद्योगधंदे हेंच आर्थिक जीवनाचें दृश्य या काळांत पाहावयास मिळतें. कालवे व पाठबंधारे यांत वाढ झाल्यानें उत्पादनांत वाढ झाली होती. वेगवेगळीं पिकें वेगवेगळ्या प्रदेशांचीं वैशिष्ठ्यें होतीं. अनेक व्यापारी शहरें इ. स. ३०० – ६०० या कालामध्यें भरभराटीस आलीं. त्यांना जोडणारे राजमार्ग सुस्थितींत ठेवले जात. पैठण हें महत्वाचे व्यापारी शहर होतें. उत्तरेकडून नैऋत्येकडे – श्रावस्तीपासून प्रतिष्ठानपर्यंतचा राजमार्ग या काळीं असल्याचा पुरावा सांपडला आहे. या काळांत शिक्षण प्रामुख्यानें ब्राम्हणाच्या हातीं होतें. दरिद्री राहुनहि विद्यादानाचें कार्य करण्याचा उत्साह व कर्तव्यबुद्धी या ब्राम्हणांनीं दाखविली आहे. नाशिक व पैठण हीं महाराष्ट्रांतील प्रमुख शिक्षणकेंद्रें त्या काळीं होतीं.

भारतीयांची सौंदर्यभक्ति व धर्मनिष्ठा यांचा मनोहर संगम होवून या काळांतील शिल्प निर्माण झालें. अजिंठा, वेरूळ येथील अनेक चैत्य – विहार या काळांत खोदले गेले. चैत्य – विहार सुंदर करण्याकडे प्रवृत्ति होती. पूर्वींचा

साधेपणा लोपून त्या ठिकाणीं कलात्मकता निर्माण झाली होती. वेरूळ येथें एकाच परिसरांत बौद्ध, जैन व ब्राम्हणी लेणीं खोदलीं आहेत.

या कालांमध्यें अनेक राजांनी आपआपल्या नांवांची नाणी काढून ती वापरांत आणली. त्याकाळीं हल्लीसारखी संघटीत व सुसंगत अशी अर्थव्यवस्था नव्हती. पण या राजानीं काढलेल्या नाण्यांमध्यें शुद्धता, वजन व कला या बाबतीत उत्तरोत्तर ऱ्हास झालेला दिसून येतो.

◆ ◆

# चालुक्य (इ. स. ५३५–७५३)

वाकाटकांच्या पडत्या काळांत विजापूर जिल्ह्यांतील बदामी येथें चालुक्य घराण्याची स्थापना झाली. या घराण्याची स्थापना पहिल्या पुलकेशीनें केली उत्तरेंतील हर्षवर्धनानें नर्मदा ओलांडून दक्षिणेवर स्वारी करण्यासाठीं केलेला प्रयत्न या चालुक्य घराण्यानें अयशस्वी केला. आंध्रसत्तेनंतर खऱ्याखुऱ्या अर्थानें चालुक्य घराणें दक्षिणाधिपती बनले. इराणचा बादशहा खुश्रु यानें आपल्या वकीलाबरोबर नजराणा पाठवून या चालुक्य घराण्याशी मैत्रिचा संबंध जोडला होता. इराणी प्रतिनिधी व पुलकेशीन यांची भेट होत असलेला प्रसंग अजंठ्याच्या क्रमांक १ च्या लेण्यांमध्यें आहे. सिंधमधील अरबांनीं उत्तर गुजराथ जिंकून दक्षिणेवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. पण गुजराथच्या चालुक्याच्या सुभेदारानें यांचा फडशा उडविला; व दक्षिणेचे मुसलमानांपासून संरक्षण केले. कालांतरानें चालुक्य सत्तस उतरती कळा लागली. व सार्वभौम सत्ता राष्ट्रकूट घराण्याकडे गेली.

◆ ◆

# राष्ट्रकूट

राष्ट्रकूट हें मुळचे लट्टालूर (लातूर) चे रहिवाशी असून वऱ्हाडांत गेले. या घराण्याचा मूळ पुरुष दंतिदुर्ग हा होय. त्यानें मध्यप्रदेशापर्यंत राज्य विस्तार केला होता. या घराण्यांतील कृष्णराजानें राष्ट्रकूट साम्राज्याची भक्कम उभारणी केली. या कृष्ण राजानेंच वेरुळचे कैलास मंदिर खोदविले. राजा अमोघवर्ष हा शांततेचा भोक्ता असल्यानें त्यानें राजकारणांत आक्रमक वृत्ती दाखविली नाहीं. हिंदु असूनही बौद्ध धर्माला राजाश्रय दिला. त्यानेंच राष्ट्रकुटाची राजधानी

मान्यखेट (मराठवाड्यांतील मालखेड) येथें हालविली. कालांतरानें ही राजसत्ता नाश पावली.

• •

# समालोचन

ज्या कालखंडाचे समालोचन आम्ही करींत आहोत; तो गुप्त साम्राज्या-नंतरचा कालखंड होय. गुप्त हें भारतांतील प्रमुख राजघराणें होय. या घराण्या-नंतरच्या कालाचें समालोचन हे भारताच्या बहुतेक सर्व भागास लागू पडते म्हणून जरा व्यापक दृष्टीनें आम्हीं हे समालोचन करीत आहोत.

**राज्यव्यवस्थाः-** भारताच्या राजशास्त्र विषयक सिद्धांतांत या काळांत फारशी महत्वाची भर पडली नाहीं. देशांत वाढते राजकीय अस्थैर्य होते. कोणाही एका सत्तेची फार काळ हुकमत चालली नाहीं. त्यामुळें संकुचित राजनिष्ठ वाढीस लागली. त्यामुळें व्यापक राष्ट्रनिष्ठेचा उदय त्याकाळीं होवूं शकला नाहीं. राजपद क्षत्रियतर जातीतही जावूं शकते; राजाला कार्यसिद्धीचें अधिकार असलें तरी धर्म व रुढी विरोधी आचाराचे स्वातंत्र्य राजाला नाही असे नवें सिद्धांत या कालांत प्रस्थापित झाले. गादीच्या वारशां द्दलची भांडण होवूं नये म्हणून राजेलोक पुष्कळदा आपला वारस जाहीर करीत. व त्याला यौवराज्या-भिषेक करून त्याचें आसन बळकट करीत. तरीही राजपद सत्ता यादवा झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. बरेचसे राजे आपले राज्य सुरक्षितपणें सांभाळण्यातच धन्यता मानीत. पण त्या धामधुनीमध्ये महत्वाकांक्षी राजांना भरपूर संधी मिळाली. या महत्वाकांक्षी राजामुळे, त्यांच्या लढायांमुळें राजकीय अस्थिरता वाढली व राजघराण्याचे उदयास्त भरभर होवूं लागले. प्रत्येक अशा मध्यवर्ती सत्तेच्या अभावाने ठिकठिकाणी सरंजामशाही वाढीस लागली. याचे प्रत्यक्ष उदाहरण त्या काळांतील महाराष्ट्रामध्यें दिसून येते. या धामधुमीच्या कालमध्ये राजे लोक स्वतः लढाईमध्ये भाग घेत. सैन्याचे नेतृत्व स्वीकारून दूरवर मोहिमेस जात. राजाला मुलुखा मसलत देण्यामाठीं व अंतर्गत व्यवस्थेसाठीं मंत्री व इतर नोकरशाही यांची आवश्यकता असे. सत्तेचे विकेंद्रीकरण या कालामध्यें अधिकारी यांच्या हातात राज्य कारभाराचा विविध खाती असून त्यावर जबाबदार मंत्र्याची नेमणूक होई. हें मंत्री राजा तिज ब्राम्हण किंवा राजाचे आप्त अधिकारी यांतून निवडलेले असत. प्रत्येक नेमणूक स्वतंत्रपणे होई. राजाच्या मर्जीमध्यें

असेल तो पर्यन्त अधिकारांवर राही. पुष्कळ अधिकारी वंशपरंपरेनें ठराि काम करीत असत. प्रत्येक संस्थाकडे स्वतंत्र खाते असे. सामान्यत: त्यां सल्लाही घेतला जात असे. कारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें राज्याचे भाग पाडे असत. चालुक्य; राष्ट्रकूट साम्राज्यांमध्यें राष्ट्र; विषय (जिल्हा) ग्राम अ.. विभागणी केलेली असे.

## स्थानिक कारभार:-

वैदिक कालापासून ग्रामसंस्था स्वायत्त होती. व पुढेंही ग्रामसंस्थे मध्यें फारसा फरक पडला नाहीं. दक्षिण भारतामध्यें ग्रामसंस्था ही जीवन स्पर्शी संस्था बनली. ग्रामप्रमुखाला महाराष्ट्रामध्यें ग्रामकूट असें म्हणत. गुप्तोत्तर कालांमध्यें दक्षिण भारतामध्यें ग्रामसभांची वाढ झाली. गांवच्या सीमेमध्यें राज्याचें सर्व अधिकार या ग्रामसभेला मिळालेलें असत. ग्रामसभेचे कामकाज स्थानिक देवालयाच्या सभामंडपांत चालत असे. वेगवेगळ्या कामासाठीं वेग-वेगळ्या समित्या असत. गांवातील प्रमुख व्यक्तींची ग्रामसभा होत असे.

राज्याचें प्रमुख उत्पन्न जमीन महसूल हें असे. धान्य व त्याकाळीं प्रचलित असलेल्या चलन नाण्यांमध्ये हा महसूल गोळा केला जात असे. व्यापार व उद्योग-धंदे यांवर व्यावसायिक कर असें. साखर व मीठ यांची मक्तेदारी शासन संस्थेकडे असे. जंगल, खाणी, डोंगर, नद्या ही राजाच्या मालकीची संपत्ति असे. आयात निर्यात मालावर कर आकारणी केली जात असें. दक्षिण भारतामध्यें विवाह, घरबांधणी, वृक्षारोपण यांना परवाना फी द्यावी लागत असें. विविध राज्यामध्यें राजाच्या लहरीनुसार जादा कर द्यावा लागत असे. जहाज फुटुन किनाऱ्यावर आलेला सर्व सागरी माल राजाच्या ताब्यांत जाई. खर्चाच्या विविध बाबी असत. सर्व उत्पन्न राजाच्या मर्जीनुरुप खर्च केले जाई.

## लष्कर:-

सैन्य दलापैकीं आतां रथ अजिबात नाहींसे झाले होते. राजे लोकाच्या सततच्या लढाईमुळें भाडोत्री सैनिकांचा पेशाच निर्माण झाला होता. या खरीज राजे लोकांनी एकनिष्ठ लोकांचे स्वतंत्र सेनादल उभारल्याचें उल्लेख येतात. विशेष मर्दुमकीबद्दल सैनिक अधिकाऱ्यांना जाहागिरी व इनाम देण्याची प्रथा या काळीं निर्माण झाली होती. ज्या ठिकाणी सेनेचा तळ असेल; छावणी असेल त्या ठिकाणच्या प्रजेला सैन्याच्या खर्चासाठीं वेगळा कर द्यावा लागत असें,

सैन्यासाठीं शिधासामुग्रीं, चारावैरण बैलगाड्या फुकट वापरण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणांत होती. सैन्यासाठीं फारशी अरबी आदी जातीवंत घोडे आणविले जात असत. युद्धांतील क्रुरता व विध्वंसकपणा वाढीस लागला होता.

## न्याय....

न्यायदानाच्या बाबतींत रुढी व परंपरा, धर्म यांचा अंतर्भाव केलेला असल्यानें निबंध वा स्मृति-ग्रंथांतून कायद्याची बरीच वाढ झालेली दिसून येते. स्मृतींचे वेगवेगळे अर्थ लावल्यानें भिन्न परंपरा निर्माण झाल्या. न्यायदानाच्या कामाचे बारिकसारिक नियम तयार करण्यांत आले होते. न्यायदानामध्यें जातीप्रमाणें कमीजास्ती सवलती मिळत. सार्वजनिक सुरक्षितेसाठीं ठिकठिकाणी दंडपाल, दंडनायक नांवाचे पोलिस अधिकारी असत. ठिकठिकाणी कोट किल्ले बांधून बंदोबस्त केला जात असे. ज्या अधिकाऱ्याच्या भागांत चोरी घडली असेल त्याच्यावर नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी असे; त्यामुळें स्थानिक कारभार कार्यक्षम रहात असे.

## धार्मिक परिस्थिती...

या काळांतील राजेलोकांनी आपले वैभव आणि सामर्थ्य यांच्या प्रदर्शनासाठीं अनेक वैदिक यज्ञयाग केले तरी यज्ञमार्ग कांहीं लोकप्रिय होवूं शकला नाहीं. हिंदु बौद्ध, जैन याचा एकमेकांवर परिणाम होवून त्याचे स्वरुप पालटणें चालूच होते. तांत्रिक पंथाची वाढ झाल्यानें व या पंथाचा धर्मावर प्रभाव पडल्यानें त्यांच्यात कांहीं समान गोष्टी निर्माण झालेल्या दिसतात. शैव व वैष्णव या पंथाच्या प्रवक्त्यानीं आपआपल्या पंथांना तात्विक अधिष्ठान निर्माण केले. भक्ति, ज्ञान, कर्म यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल वैचारिक संघर्षाची लाट तत्वज्ञानांच्या क्षेत्रामध्यें उसळलेली आपणांस पहावयांस सांपडते राष्ट्रकूट घराण्यानें शिवमंदिरें बांधण्यांत धन्यता मानली तर चालुक्य घराण्यानें विष्णूमंदिरे उभविण्यांत कृतार्थता मानली. सामान्य जनतेस धर्मांचें स्वरुप मूर्ति, मंदिरे, विहार यांतूनच समजत असे. वेगवेगळ्या धर्मांतील, वेगवेगळ्या पंथातील द्वेष निर्मूलन करून धार्मिक सलोखा निर्माण करण्याच्या दृष्टीनें देवता पंचायतनांची कल्पना वाढीस लागली. हरिहर, उमामहेश्वर, अर्धनारी नटेश्वर, दत्तात्रेय, त्रिमूर्ती अशा देवतां अस्तित्वांत आल्या. शिवपार्वतीचा संबंध जोडून शैवशाक्त एकत्र आणले गेलें, तर लक्ष्मीनारायणाच्या कल्पनेने शाक्त वैष्णव जोडले गेले.

## सामाजिक परिस्थती....

या कालामध्यें जन्मजात जातिव्यवस्था समाजामध्यें दृढमूल झाली. जाती व उपजाती यांची संख्या वाढत होती. या वाढत्या संख्येबरोबरच उच्चनीचतेचे बडही वाढतच होते. त्यामुळें क्षुद्र संकुचितपणा व अलिप्तता वाढली.. समाजामध्यें ब्राम्हणाचें वर्चस्व वाढले. प्रत्येक संस्काराच्या वेळीं ब्राम्हण मुखानें कृत्यें व्हावीत व ब्राम्हणास दान दक्षिणा देवून संतोषवावें, असें शिकविलें गेले. ब्राम्हण्य हे सदाचारा ऐवजी जन्मावर अवलंबून असे. जरी ब्राम्हण होई पातकी । तरी तो वंद्य तिही लोकी ।। ब्राम्हणांस देहान्त व कोणतीही शारिरीक शिक्षा करूं नये असा नियम सांगितला गेला. शूद्र व चांडाल यांचे सामाजिक हक्क हिरावून घेतलें. व त्यांना बरीचशी अनुदार वागणूक मिळू लागली. उच्च जातींना व्यवसाय स्वातंत्र्य होते. पण हीन जातींना विशिष्ठ व्यवसायांची परवानगी नव्हती. ठरवून दिलेलें व्यवसायच त्यांनी करावें, असें बंधन या जातीवर असें. गांवातील विशिष्ठ भागांत विशिष्ट लोकांची वस्ती असे. शूद्र व चांडाल यांना गावाबाहेरची जागा रहावयास दिली जात असे. या काळीं एकत्र कुटुंबपद्धति अस्तित्वांत होती. कुटुंबातील व्यक्तीचे परस्पराशीं संबंध प्रेमाचे आपुलकीचे असत. कुटुंबांतील कर्त्या पुरुषाला विशेष अधिकार असत. पुराण, प्रवचन, कीर्तन यांच्या द्वारा स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार होत असे. आहारा विहाराच्या बाबतींत समाज अधिकाधिक सनातनी व कर्मठ बनला होता समाजातील वाढते भेद व संकुचित वृत्ती यामुळें सामाजिक ऐक्याच्या जाणिवेअभावी भारतीय समाज परकीय आक्रमणांस बळीं पडला: दक्षिणेमधील इस्लामी धर्म प्रसार, वा ख्रिस्ती धर्मप्रसार वरील विधानास पुष्टी देतील.

## आर्थिक परिस्थिती ..

देशांतील राजकीय अस्थिरतेचा आर्थिक व्यवहारावर फारसा परिणाम झाला नाहीं. एकाद्या राजानें स्वारी केली तरी तात्कालिक आर्थिक परीस्थिती बदलत असे. पण मूलभूत अर्थरचनेचा पाया कांहीं ढांसळत नसे. शेती, कापड विणणें, साखर, सुतारी, शिल्पी आदी अनेक व्यवसाय उर्जितावस्थेत होते. मालाला मागणी चांगली असल्यानें मालाची विक्री मोठ्या प्रमाणांत होई. भरपूर किंमत मिळे, व पैसा खेळता राही. त्यामुळें जनतेची क्रयशक्ती भक्कम होती. हवापाणी व जमिनीचा मगदूर पाहून पिकें काढली जात असत, ह्यु-एनत्संगच्या वर्णनावरुन शेतकरी कष्टाळू, उद्योगी व सुखी होता असे दिसते.

जाती व व्यवसाय यांची सांगड घातल्यानें व्यावसायिक नीतिची कसोशीनें अंमल बजावणी होत असें. व्यावसायिकांच्या संघटना या जाति पंचायती म्हणून ते त्याचा निवाडा करीत असत. भारताचा इराण आदि देशांशी व्यापार चालू असे.

## शिक्षण ..

ज्ञान साधना, शील, व्यक्ती विकास, व सामाजिक वारसांचें संरक्षण असें चतुर्विध ध्येय त्याकाळी शिक्षणाचें असे. या ध्येयाला अनुसरुनच शिक्षण पद्धति व शिक्षण संस्था निर्माण झाल्या. घरामध्यें वा शहरामध्यें शिक्षणाला अनुकूल वातावरण मिळूं शकत नाहीं म्हणून आश्रम, गुरुकुलें शहराबाहेर असत. गुरुगृही विद्यार्थ्यांची जेवण्याची व राहाण्याची मोफत सोय असल्यानें गरीब पण होतकरु विद्यार्थ्यांसही ज्ञानार्जन निश्चितपणें करतां येत असे. समाजहि अशा शिक्षकांचा वारंवार समाचार घेऊन त्यास सर्व प्रकारचें साह्य देत असे. राजाहि विद्वत संभावना करून शिक्षण संस्थास मदत देत असे. शिक्षणास मदत देऊनहि राजा वा समाज शिक्षणाच्या अंतर्गत व्यवस्थेमध्यें ढवळाढवळ करीत नसे. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी हा जीवनादर्श या आचार्यांचा असल्यानें तें आपले स्वातंत्र्य अबाधित राखीत. शिक्षक वर्गाला आर्थिक स्पर्धेच्या क्षेत्रापलिकडे ठेवून ज्ञान साधनेंस समाज सहाय्य करीत असे. विद्वान कधीही राजसत्तेपुढें आपले मस्तक लववत नसत. नालंदा, कांची, उज्जयिनी, काशी, पाटलीपुत्र येथें लहानमोठी शिक्षणकेंद्रे होती. त्याचप्रमाणें प्रतिष्ठान (पैठण) हेंही महत्वाचें शिक्षण केंद्र होतें. इ. स. ६२१ ते ६४५ च्या दरम्यान हु–एनत्संग या चिनी प्रवाशानें भारतांत प्रवास केला होता. त्यानें भारतांतील बहुतेक सर्व राज्यांना भेटी दिल्या होत्या. त्यानें आपल्या अनुभवाची व पाहिलेल्या परिस्थितीची मुद्देसूद व उद्बोधक माहिती लिहून ठेवली आहे. "महाराष्ट्रांतील लोक शूर व मानी आहेत. उपकाराबद्दल तें कृतज्ञ असतात. व अन्यायाबद्दल खुनशी असतात. संकटात सापडलेल्या शरणागतांसाठीं ते आत्मबलिदान करतील तसेंच, आपला अपमान करणाऱ्याचा सूड घेण्यासाठीं, रक्त सांडण्यासाठीही ते तयार असतात. त्यांचे शूर योद्धे बेहोश होऊन युद्धांमध्यें शिरतात" अशी महाराष्ट्राची मार्मिक स्वभाव वैशिष्ठ्यें हु–एनत्संगनें आपल्या प्रवास वर्णनांत नमूद करून ठेवली आहेत.

**कलाविकास: —**

या काळातील राजकीय अस्थिरतेचा कलेवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाहीं. उलट देशांतील आर्थिक सुबत्ता व संत–आचार्यांची शिकवण यामुळें लोकांची धर्म प्रवृत्ति वाढीस लागली. व या धार्मिकतेच्या अविष्कारांसाठीं विविध कला राबविल्या गेल्या. बहुजन समाजाला आकृष्ट करण्यासाठीं पंथोपपंथामध्यें चुरस वाढून आपलीं धर्मस्थानें – मंदिर मठ – मूर्ति – अधिक कलापूर्ण करण्याचा प्रयत्न होवूं लागला. कलावंतांनी धर्मस्थानाच्या उभारणींत व शोभेंत आपले सर्वस्व ओतलें. त्यामुळें कलेचा विकासच झाला. वेरुळचे कैलास–लेणें हें साक्षात् उदाहरण आहे. भारतीय कलेचें वैशिष्ठ्य या कालांतच निश्चित झालें.

◆ ◆

# यादव (अि. स. ११८७–१३१८)

मराठवाड्याचा इतिहास म्हणतां येईल अशा भूभागाचा इतिहास यादव या राजघराण्यापासून सुरू होतो. पैठण ही पूर्वीच्या राजघराण्यांची राजधानी असली तरी त्या राजधानीतून साऱ्या मराठवाडा भागाला व्यापणारें राजकारण होतेंच असें नाहीं. त्यावेळीं मराठवाडा हे नांव नसल्यानें त्या भूभागाचा नेमका इतिहास शोधणें दुरापास्त ठरलें होतें. पैठण व पैठणच्या आजूबाजूचा परिसर म्हणजे मराठवाडा – महाराष्ट्राचा भूभाग होय. अशी कल्पना गृहीत होती. त्यावेळची राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीचें मूल्यमापन ढोबळ मानानेंच करणें आवश्यक होतें. शिलालेख, मंदिरें, आदि ज्या खुणा दिसत, त्या खुणांवरूनच इतिहासाचा मागोवा घेणें जरूर होतें. मराठवाडा हें नांव व त्याची भूरचना आज निश्चित असली तरी त्या काळीं ही भूरचना निश्चित नव्हती. त्यामुळेंच नेमका "मराठवाड्याचा इतिहास" असें संबोधितां येईल, असा यादव पूर्वकालाचा इतिहास उपलब्ध नाहीं. आज जो मराठवाडा आहे; या नांवाखालीं जो भूप्रदेश आहे, त्यावरून मात्र यादवोत्तर कालाचा इतिहास हा "मराठवाड्याचा इतिहास" असें मानणें चुकीचें ठरणार नाहीं.

पण या बरोबरच आणखी एका मुद्याचा या संदर्भात विचार करावयास हवा. यादवकालीन अितिहास हा कांही अकस्मात घडलेला नाहीं.

राजकीय, सामाजिक क्रिया–प्रतिक्रिया चालू असतातच. या क्रिये-प्रतिक्रियेतून–अितिहास घडत असतो. यादव पूर्वकालांतील क्रिया–प्रतिक्रिया ज्ञात असल्या तरी त्या मराठवाडा या विशिष्ट भूप्रदेशांतीलच आहेत असें मानावयास निर्णायक आधार नाहीं. हा विशिष्ट भूप्रदेश यादवोत्तर कालामध्यें घडलेल्या प्रसंगानें स्पष्ट निर्देशित होत आहे. म्हणून हा 'मराठवाडयाचा अितिहास' असें म्हणावें लागेल. असो.

महाराष्ट्रांत यादव वंशाचें महात्म्य अतिशय आहे. यादवांचेच वंशज जाधव होत. हें जाधव घराणे म्हणजेच श्री शिवछत्रपतींचे आजोळ घराणें होय. हें यादव घराणें मूळचे मथुरेचे राहणारे असून; त्यांचीं कित्येक घराणीं प्राचीन काळीं केव्हांतरीं गुजराथेंत व महाराष्ट्रांत आलीं. हेमाद्रीच्या व्रत खंडांत या यादव घराण्यांची माहिती दिलेली आहे. यादवांचे महाराष्ट्रांमध्यें दोन वंश प्रसिद्ध आहेत. एक वंश नाशिकजवळ चंद्रादित्यपूर (आजचे चांदवड) येथें राज्य करीत होता. आणि दुसरा देवगिरी (दौलताबाद) येथें राज्य करीत होता. पहिल्या वंशाची राजधानी सिन्नर येथे होती. 'सुबहू' नांवाचा पराक्रमी यादव राजा उत्तर हिंदुस्थानांत झाला. त्याचा मुलगा 'दृढप्रहार' यानें प्रथम महाराष्ट्रांत प्रवेश करून आपलें राज्य स्थापिलें दृढप्रहाराचा मुलगा 'सेऊणचंद्र' यानें सेऊणपूर शहर वसवून राज्याचे नांवहि सेऊणदेश (आजचे सिन्नर) असें ठेवलें. देवगिरी शहर हे सेऊण या उत्तर सरहद्दीवर होतें. पहिल्या सेऊणचंद्राच्या पश्चात त्याचा मुलगा, 'धाडियप्पा' व नंतू 'भिल्लम' '(पहिला)' हें अनुक्रमें गादीवर आले 'राजगी', 'वडुगी', 'भिल्लम' '(दुसरा)' हे व त्याचप्रमाणें याच यादव वंशातील इतर राजे गादीवर आले. दृढप्रहारापासून पांचव्या भिल्लमापर्यंत २३ राजांचीं नांवे आढळतात.

पांचव्या भिल्लमानें' सोमेश्वर चालुक्याचे मांडलिकत्व झुगारून दिलें. व द्वारसमुद्राच्या वीर बल्लाळ यादवाचा पराभव करून देवगिरी येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. (११८७) देवगिरी हें शहरही पांचव्या भिल्लमानेंच वसविलें याच भिल्लमाचा वंश महाराष्ट्रांत सर्व सत्ताधारी झाला. भिल्लमानें आपणास प्रताप चक्रवर्ति व महाराजाधिराज ही बिरुदें लावली. त्याचा मुलगा 'जैतुगी उर्फ जैत्रपाळ पहिला' (११९१–१२१०) हा पराक्रमी राजा होऊन गेला. यानें 'समस्त त्रिभुवनाश्रय महाराजाधिराज' हीं बिरुदें आपणास लावली त्याचा सेनापति शंकर नांवाचा ब्राह्मण होता. प्रसिद्ध

ज्योतिषी भास्कराचार्य याचा मुलगा लक्ष्मीधर हा जैत्रपाळाचा मुख्य पंडित होता. जैत्रपाळास वेद, मीमांसा, तर्कशास्त्र यांचा चांगला व्यासंग होता. प्रसिद्ध मराठी आद्य कवि श्री. मुकुंदराज हे या जैत्रपाळाचे पदरीं होते. "सिंघण" (१२१० – १२४७) हा पहिल्या जैत्रपाळाचा मुलगा. याच्या कारकीर्दीत यादवांची सत्ता अतोनात वाढली. सिंघण हा पराक्रमी राजा होता. माळवा, गुजराथ देशांतील छतिसगड आदि ठिकाणच्या राजांस मांडलिक केले. पद्मनाल (पन्हाळा) येथें शिलाहार भोज राजा राज्य करीत होता. त्याचे राज्य सिंघणानें आपल्या राज्यास जोडले. कोल्हापूरच्या ताम्र लेखांमध्यें शिलाहाराचें नांव येत नसून यादवांचे नांव येते. त्यावरुन वरील विधानास पुष्टी मिळते. सिंघणानें गुजराथवर अनेक स्वाऱ्या केल्या ह्या स्वाऱ्यांत खोलेश्वर नांवाचा ब्राह्मण त्याचा सेनापति होता. गुजराथेंत या वेळीं वाघेल वंशाचा अंमल चालू होता. खोलेश्वरानें या वाघेल राजांचा अनेक वेळां पराभव केला. 'कीर्ति कौमुदि' कर्ता सोमेश्वर यानें वाघेल–चालुक्य– यादव या राजांच्या युद्धाचें वर्णन केले आहे. कांहीं वेळां खोलेश्वराचा मुलगा राम हाहि स्वारीवर असे. तो बिसलदेव याचेशी लढत असतां मारला गेला. सिंघणचा तिसरा सेनापति विज्जण यानें कोंकण व दक्षिण महाराष्ट्र पूर्णपणें जिंकला. दक्षिण महाराष्ट्रावर यादवांची विशेष भक्ति होती. सिंघण हा मोठा धार्मिक असून त्याला देवळे बांधण्याचा विशेष नाद असे. 'पृथ्वी वल्लभ' 'विष्णु वंशोद्भव' आदि विशेषणे त्यानें धारण केली होती. त्याचा ध्वज सुवर्ण गरुड चिन्हांकित असे. यादवांच्या मुख्य मंत्र्यास श्रीकरणधिप अशी संज्ञा असे. हा कारभार प्रथम सोधल नावाच्या गृहस्थाकडे होता. सोधलाचा मुलगा शार्ङ्गधर यानें 'संगीत रत्नाकर' हा ग्रंथ सिंघणाच्या कारकीर्दीत लिहिला भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा सिंघणाच्या दरबारी मोठा ज्योतिषी म्हणून नांवाजला होता. भास्कराचार्यांच्या ज्योतिष व्यासंगी घराण्यांस यादव राजांचा आश्रय होता, सिंघणचा पराक्रमी व विद्वान मुलगा 'जैत्रपाळ दुसरा' हा सिंघणाच्या आधीच मरण पावल्यानें सिंघणाचा नातू 'कृष्णदेव' (१२४७–१२६०) हा राजा झाला. यानें गुजराथवर स्वाऱ्या केल्या. पुष्कळ यज्ञ केले. कृष्णदेवाचा मंत्री जल्हण हा फार विद्वान होता. याच्यावेळीं संस्कृतभाषा विशेष भरभराटींत होती. कृष्णदेवानंतर 'महादेव' (१२६०–१२७१) हा कृष्णदेवाचा धाकटा भाऊ गादीवर आला. त्यानं तेलंगण, गुजराथ, कोंकणांत स्वाऱ्या केल्या. महादेवानें ठाणे येथील सोमेश्वर शिलाहार राजास ठार मारुन उत्तर कोंकण यादव राज्यास जोडले. यावेळची लढाई हा समुद्रावर झाली. या लढाईमध्यें

सोमेश्वराचीं बहुतेक गलवतें बुडाळीं. हेमाडपंत हा यादव साम्राज्याचा श्रीकरणाधिप झाला. महादेवानंतर ' रामदेव ' ( १२७१-१३०९ ) हा गादीवर आला. हा कृष्णदेवाचा मुलगा. यादव राजवंशामध्यें सिंघणानंतर रामदेव हाच विशेष नाव घेणारा राजा झाला. महाराष्ट्रांतील शेवटचा वैभवशाली सम्राट रामदेव हाच होय. त्यानें ब्राम्हणांना कांहीं गांवें दान दिलीं होतीं. त्या दानपत्रांमध्यें गावें सोडूं नयेत वा गहाण टाकूं नयेत. गांवांत वेश्याची वस्ती ठेवूं नये, जुगार खेळूं नये, सत्कर्मात वेळ घालवावा अशी सूचना रामदेवानें दिलेली आढळते. त्यावरून रामदेवाची सन्मार्गी प्रवृत्ती दिसून येते. मराठी भाषेच्या वाग्विलासास याचवेळीं प्रारंभ झाला. ज्ञानेश्वर, बोपदेव, हेमाद्री आदि ग्रंथकार व महानुभावी पंथ याच्या वेळींच प्रसिद्धीस आले. ज्ञानेश्वरांनीं रामदेवास ' सकलकला निवास, न्यायानें क्षिती पोसणारा ' अशीं विशेषणें दिलीं आहेत. महादेवाचे वेळीं प्रधान असलेला हेमाडपंत रामदेवाचे वेळींहि प्रधान होता. हा अत्यंत बुद्धीमान होता. मोडी लिपी यानेंच सुरू केली. हेमाडपंती देवळें बांधण्याची कल्पना याचीच होती 'चतुर्वर्ग चिंतामणी' व 'राजप्रशस्ति' हे हेमाडपंताचे ग्रंथ होत. 'राजप्रशस्ति या ग्रंथामध्यें यादव वंशाचा इतिहास आलेला आहे.

या देवळांच्या बांधणीची रचना विशिष्ठ प्रकारची असल्यानें, हेमाड पंताच्या कारकिर्दीमध्यें या वस्तुरचनेचा विशेष प्रसार झाला. महाराष्ट्रामध्यें हेमाडपंती बांधणीचीं देवळें खालील ठिकाणीं आहेत.

नाशिक जिल्हा- १) झोडगा २) देवळाणे ३) वांदारे ४) अंजनेरी ५) सिन्नर ६) त्रिंगलवाडी

अहमदनगर जिल्हा- १) कोकमठाण २) अकोला ३) टाकी ४) पेडगाव ५) कर्जत ६) श्रीगोंदे ७) मालेगाव ८) रतनवाडी.

पूर्व खानदेश जिल्हा- १) एरंडोल २) संगमेश्वर ३) घरखेड ४) चांगदेव ५) वाघळी ६) पाटणा.

विदर्भ- १) बारशी टाकळी २) सातगांव ३) साकेगांव ४) मेहकर ५) शिरपूर ६) लोणार ७) धामा.

सातारा जिल्हा-१) सिंघणपूर २) खटाव.

सोलापूर जिल्हा-१) माळशिरस २) वेळापूर ३) पंढरपूर.

पश्चिम खानदेश जिल्हा १) बाळस.ने.

पुणें जिल्हा-- १) पूर २) बेलदे
ठाणे जिल्हा-- १) अंबरनाथ.

रामदेवांच्या वेळींच अल्लाउद्दीन खिलजी हा गंगा-यमुनेच्या अंतर्वेदींतील भागाचा - कोरा प्रांताचा - सुभेदार होता. अल्लाउद्दीन भिलसा येथें असतांना देवगिरी शहराच्या ऐश्वर्याची माहिती त्यास समजली. अल्लाउद्दीनाच्या तोंडास पाणी सुटलें. आपला खरा बेत कोणास न कळवितां अल्लाउद्दीन ८-१० हजाराची फौज घेवून १२९३ मध्यें कोराहून निघाला. त्यानें बुंदेलखंडाच्या जंगलांतून दक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला. सहा महिनेपर्यंत त्याचा मागमूस पाठीमागें कोणासहि लागला नाहीं. दिल्लीच्या सुलतानाचा मी पुतण्या असून चुलत्या बरोबर माझें भांडण झालें आहे. मी तेलंगणाच्या राजाकडे चाकरीसाठीं जात आहे असें तो रस्त्यांत सांगत असे. अल्लाउद्दीन नर्मदा नदी पार करून एकाएकीं देवगिरीच्या तटाखालीं उतरला. यावेळीं रामदेवरावाची फौज दुसरीकडे गेली होती. अकस्मात आलेल्या परचक्रामुळें रामदेवराव घाबरून गेला. अल्लाउद्दीनानें किल्ल्यास २५ दिवस वेढा घातला. याचवेळीं किल्ल्यामध्ये फितुरी झाली. आणि धान्याच्या पोत्याऐवजी मिठाची पोती कोठारांत भरलीं, हा प्रकार पाहून रामदेवराव फारच घाबरून गेला. आणि एकदम पुष्कळ द्रव्य देवून त्यानें अल्लाउद्दीनाशीं तह केला. अल्लाउद्दीन परत जाणार तोंच रामदेवरावाचा पुत्र शंकरदेव मोठी फौज जमवून बाहेरून आला व त्यानें वडिलांच्या तहास न जुमानतां अल्लाउद्दीनाशीं लढाई केली. या लढाईंत मुसलमानांचा समूळ नाश होण्याची वेळ आली होती. पण पुढचें विधिलिखित वेगळें होतें. यादवांचा एक सरदार आपली फौज घेऊन शंकरदेवाच्या मदतीस येत होता. त्या फौजेच्या पायाची उडालेली धूळ पाहून, अल्लाउद्दीनाच्या मदतीस दिल्लीहून लवकरच मागून मोठी फौज येत आहे; असें अल्लाउद्दीन म्हणत होता. तीच ही फौज असावी, अशी यादवांच्या सैन्याची समजूत होवून तें सैन्य सैरावैरा पळूं लागले. व अल्लाउद्दीनास जय मिळाला. तेव्हां रामदेवरावानें अपरंपार द्रव्य; एलिचपूर व आसपासचा प्रांत देवून आपला बचाव करून घेतला. पुढें रामदेवरावानें खंडणी देण्याचें नाकारलें. म्हणून १३०६ मध्यें अल्लाउद्दीनानें आपला सरदार मलिक काफूर यांस मोठी फौज देऊन दक्षिणेकडे रवाना केलें. मलिक काफूरनें या स्वारीमध्यें महाराष्ट्रांत लुटालूट केली. व रामदेवरावास आपल्याबरोबर दिल्लीस आणलें. तेथें अल्लाउद्दीनानें रामदेवरावाचा चांगला सन्मान केला. त्यांस छत्र, राजाधिराज हा किताब व एक

लाख रुपये बक्षीस देऊन रामदेवरावास प्रतिष्ठेनें देवगिरीस पाठविलें. दिल्लीहून आल्यावर मात्र नियमितपणानें रामदेवरावानें खंडणी पाठविली. यानंतर रामदेवराव १३०९ मध्यें मरण पावला. शांततेच्या काळांत राज्यकारभार करणाऱ्या रामदेवरावाला आणि हेमाद्रीला राजकारणी दूरदृष्टी नसावी हे उघड दिसत आहे. 'शंकरदेव' (१३०९–१३१२) हा रामदेवरावाचा मुलगा, पित्याच्या मृत्युनंतर हा गादीवर आला. हा स्वाभिमानी आणि शूर होता. यानें मुसलमानाविरुद्ध उचल करुन दिल्लीला खंडणी पाठविणें बंद केले. परंतु इतर हिंदू राजांनीं शंकरदेवास मदत केली नाहीं. त्यामुळें तो एकटा पडला, खंडणी वेळेवर आली नाहीं, म्हणून मलिक काफूरनें १३१२ मध्यें देवगिरीवर स्वारी केली. व शंकरदेवास ठार मारून यादवांची राजधानी आपल्या ताब्यात घेतली व आपला सुभेदार नेमून व अपरंपार संपत्ति लुटून मलिक काफूर दिल्लीस गेला. १३१६ मध्यें अल्लाउद्दीन मेल्यावर दिल्लीला जी बंडाळी माजली त्या बंडाळीचा फायदा हरपाळदेवानें घ्यावयाचा ठरविलें "हरपाळदेव" (१३१६ – १३१८) हा रामदेवरावाचा जांवई होय, दिल्लीच्या बंडाळीचा फायदा घेवून हरपाळदेवानें मुसलमान सुभेदारांस हांकलून दिलें व देवगिरीस पुन्हा: यादवांची सत्ता स्थापन केली, पण ही सत्ता फार काळ टिकली नाहीं. मुबारक खिलजीनें देवगिरीस येवून हरपाळदेवाचा पराभव केला व त्याला ठार मारले. या वेळेपासून महाराष्ट्रांत मुसलमानांची राजवट चालू झाली.

या कालानंतर मराठवाड्यांत आणि साऱ्या दक्षिणेंतच इस्लाम धर्मानें प्रचंड आक्रमण झालेलें आहे. सय्यद हजरत बुऱ्हाणुद्दीन नांवाचा एक मुसलमान साधु आपल्या १४०० शिष्यांसह दक्षिणेंत इस्लामी धर्माच्या प्रसारार्थ आला होता. अल्लाउद्दीनाच्या स्वारीस जे यश मिळालें त्याला बुऱ्हाणुद्दीनची करामत बरीच कारणीभूत झाली होती. हा इ. स. १३४४ मध्यें मरण पावला. याची कबर राजगास आहे. दुसरा विख्यात साधु सय्यद जैनुद्दीन (मृत्यु १३७०) व गुलबर्गाचा बंदेनवाज गेसुराज (मृत्यु १४१३) यांनीही आपल्यापरी इस्लामीकरण चालविलें होतेच.

◆ ◆ ◆ ◆

# बहामनी राजवट

मराठवाड्यामध्यें धार्मिक स्थित्यंतराप्रमाणें राजकीय स्थित्यंतरेही होत होती. हा कालच संघर्षमय झाला होता. दिल्लीच्या सिंहासनावर १४...

घराणें जाऊन तुघलख घराणें आरूढ झालें होतें. महंमद तुघलखानें हसन यांस सरदारी देऊन देवगिरीच्या सुभेदाराच्या मदतीस पाठविलें. परंतु दक्षिणेच्या सुभेदारानें हसनच्या साह्यानें सुलतानाविरुद्ध बंड केलें आणि नासिरुद्दीन नामक गृहस्थाला दौलताबादचा नामधारी सुलतान बनविलें. तेव्हां महंमद तुघलखानें देवगिरीस येऊन स्वत: वेढा घातला पण उत्तरेकडे बंड झाल्यानें महंमद वेढा उठवून उत्तरेकडे गेला. याचवेळीं हसन यास जाफरखान हा किताब मिळाला. त्यानें कंधार आणि बेदर हे किल्ले जिंकले. कांहीं दिवसांनीं नासिरुद्दीनानें आपलें सुलतानपद स्वखुषीनें जाफरखानास दिलें. जाफरखानानें अल्लाउद्दीन हसन हें नांव धारण करून स्वत:च्या नांवाचीं नाणीं पाडलीं व गुलबर्गा ही राजधानी केली. ( १३४७ ) गंगू नांवाच्या ब्राम्हण धन्याची आठवण म्हणून गंगू-अी-बहामनी असा किताब धारण केला. बहामनी राज्याचा विस्तार जवळ जवळ महाराष्ट्रभर झाला होता. बहामनी राज्याचा दौलताबाद हा एक प्रमुख सुभा होता. १५२६ मध्यें बहामनी राज्याची ५ छकलें उडालीं. तोपर्यंत मराठवाडा मुसलमानी सत्तेखालीं होता. आदिलशाही व निजामशाही यांचाच मराठवाड्याशीं जास्त संबंध आला पण निजामउलमुल्कानें जो मराठवाड्यावर अंमल बसविला तो शेवटपर्यंत राहिला.

बहामनी राजानंतर मोंगलानीं दक्षिणेंत स्वाऱ्या सुरू केल्या. हैद्राबादच्या निजामाचा मूळ पुरुष असफजा हा होय. बापाच्या बाजूनें याचा संबंध पहिल्या खलिफाशीं पोहोंचतो तर आईच्या बाजूनें याचा संबध महंमद पैगंबरापर्यंत पोहोंचतो असें म्हटलें जातें. असफजा हा मोठा कावेबाज व पराक्रमी होता. यानेंच दिल्लीच्या बादशाहीविरुद्ध बंड उभारलें. व हैद्राबाद येथें गादी स्थापन केली. तेव्हांपासून मराठवाडा लढाईच्या कचाट्यांत सांपडला. निजामशाही, आदिलशाही व हैद्राबादची नवी गादी यांच्या सत्तेपैकीं जो बळी तो कान पिळी या नात्यानें मराठवाडा व त्याचें भाग त्या सत्तेच्या अंकीत होत. अहमदनगरची निजामशाही आणि बिजापूरची आदिलशाही यांनीं वेळोवेळीं मराठवाड्यावर स्वाऱ्या केल्या. मराठ्यांच्याही निजामाशीं होणाऱ्या लढाया प्रामुख्यानें मराठवाड्यांतच लढल्या गेल्या. सिंदखेड ( १७५७ ), उदगीर ( १७६० ) राक्षसभुवन (१७६३), खर्डा (१७९५), असअी (१८०३) या मराठवाड्याच्या भूमीवर लढलेल्या लढाअींनी इतिहासाची पानें उलटविली आहेत. मिजासखोर बनलेल्या निजामाला वठणीवर आणण्यासाठीं पेशव्यांनीं निजामावर हल्ला करावयाचा ठरविलें. शिंदे होळकरांच्या मदतीनें हा हल्ला सिंदखेडा येथें

चढविला. निजाम सलाबतजंग याच्या मदतीस त्याचा भाऊ निजामअल्ली हा आला होता. पण पेशवे, शिंदे, होळकरांच्या पुढें निजामाचें कांहीं चाललेलें नाहीं, त्याचा पराभव झाला व २५ लाखांचा मुलुख देण्याचे निजामाकडून कबूल करवून घेतलें पण पेशव्यांची पाठ फिरतांच निजामानें टाळाटाळ चालू केली. हें पाहून बाळाजी पेशव्यानें सदाशिवराव भाऊस निजामावर पाठविलें. ही उद्‌गीर येथें लढाई झाली. तींत निजामाचा फार मोठा पराभव झाला. निजामानें मराठ्यांस अशिरगड – बऱ्हाणपूरपासून नगर, नांदेड, विजापूरपर्यंतचा ६० लाखांचा मुलुख तोडून दिला. या लढाईनें निजामाची बहुतेक सत्ता संपुष्टांत आली उद्‌गीरच्या तहानें निजाम दुखावला होता त्यानें मराठे सरदारांत फूट पाडण्याचें कारस्थान रचलें. औरंगाबादेस सैन्याची छावणी ठेवली पावसाळ्याची संधी साधून पेशव्यांच्या फौजेनें निजामांवर राक्षसभुवन येथें एकदम हल्ला केला. या वेळीं फार मोठी लढाई झाली व निजामाचा पूर्ण पराभव झाला. खुद्द माधवराव पेशव्यानी पराक्रमाची शर्थ केली. " चिरंजीव रावांनीं यंदा शिपाईगिरी कांहीं कमी केली नाहीं. त्याचे कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला." असें राघोबानें गोपिकाबाईस ( माधवरावांच्या आईस ) लिहिलें आहे. या लढाईनें निजामापासून एकंदर ८२ लाखांचा मुलुख मराठ्यांनीं घेतला. या वेळीं मग्रूर निजाम अगदीं गोगलगाय बनला. राक्षसभुवनाच्या लढाईमध्यें मराठ्यांनीं निजामास नामोहरम केलें तरी पुढें त्याचें प्रस्थ वाढलें. निजामानें कबूल केलेला मुलुख मराठ्यांस दिला नाहीं. मध्यंतरी मराठेशाहीस संकटांनीं घेरले असल्यामुळें नाना फडणवीसांनीं निजामास दुखविलें नाहीं. शेवटीं १७९५ मध्यें नाना फडणवीसानें निजामाकडे किती येणें निघतें याची यादी करून ती निजामाकडे पाठविली. परंतु नुकतेच महादजी शिंदे व हरिपंत फडके वारले होते, तेव्हां मराठ्यांचा पूर्वीचा जोर दिसणार नाहीं, असें निजामांस वाटलें. व त्यानें नानांच्या पत्रांस बेपर्वाईचे उत्तर दिलें. निजामाच्या दिवाणानें तर " पेशव्यांस लंगोटी लावून, लोटा घेऊन काशीस जावयास लावूं " अशी दर्पोक्ति केली यामुळें प्रकरण चिरडीस गेलें व युद्ध उपस्थित झालें. निजामांस इंग्रज मदत करतील असा भरंवसा वाटत होता. पण मराठे सरदारांची एकजूट पाहून सर जॉन शोअरनें निजामांस मदत देणें नाकारलें. इंग्रजांच्या भरंवशावरच निजाम मोठ्या मोठ्या गोष्टी बोलत होता. १७८२ च्या सालबाईच्या तहाप्रमाणें वागावयाचें तर निजामांस मराठ्यांशीं निष्कारण युद्धहि उपस्थित करतां येत नव्हतें. नाना फडणवीसानें मात्र कडेकोट तयारी केली. शिंदे, होळकर, गायकवाड,

भोसले, पटवर्धन आदि सर्व सरदार एकत्र झाले होते. एकूण ८० हजारांची फौज झाली. परशुरामभाऊ हा मुख्य सेनापति होता. निजामाच्या व मराठ्याच्या सैन्याच्या प्रथम चकमकी परिंडे या गांवीं झाल्या. या चकमकीमध्यें निजामाची सरशी होती. परंतु पुढें लवकरच निजामाची सारी फौज खर्डे या गावात कोंडली गेली व त्यामुळें निजामाचा नाईलाज होऊन तो शरण आला. मराठ्यांनीं त्याजपासून परिंड्यापासून उत्तरेकडील तापी नदीपर्यन्तचा मुलुख घेतला. व युद्धाचें खर्चाबद्दल ३ कोट रुपये निजामानें द्यावे, असें ठरलें. खर्ड्याची लढाई ही मराठ्यांनीं जिंकलेली शेवटची लढाई होय. सिंधखेड, उद्‌गीर, राक्षसभुवन खर्डा या लढाया मराठवाड्याच्या भूमीवर लढल्या गेल्या. प्रत्येक लढाईच्या वेळीं निजामाचा पराभव झाला. पण तह करतांना निजामाचें (दुसरा आसफजाह) डावपेंच आणि धूर्तपण मराठ्यांहून सरस ठरलें. या सर्व घटना इतिहास प्रसिद्ध आहेतच. पण असईच्या लढाईनें महाराष्ट्राचें स्वातंत्र्यच नष्ट केलें. म्हणून या लढाईची विस्तृत माहिती देत आहोंत.

पुण्याचा दुसरा पळपुटा बाजीराव वसईस गेला. आणि कर्नल क्लोज मार्फत इंग्रजाशी तह केला. या तहांमध्यें इंग्रजानी बाजीरावास गादीवर बसण्यास मदत करावी, त्याच्या तैनातीस ६० हजार फौज द्यावी, या फौजेच्या खर्चासाठीं २६ लाखांचा मुलुख तोडून बाजीरावानें इंग्रजास द्यावा ही मुख्य कलमें होतीं. इतर सर्व कलमें तैनाती फौजेच्या तत्त्वावरहुकुमच होती. अशा रितीनें " मराठ्यांच्या स्वातंत्र्य सौभाग्याचा कुंकमतिलक तिच्यात्र त्या नादान पोरानें त्या तहाच्या चिटोऱ्यानें पुसून टाकला " ( वासुदेवशास्त्री खरे याची ' मराठे व इंग्रज ' प्रस्तावना)

दक्षिणेचा इंग्रजांचा सेनापति सर आर्थर वेलस्ली यानें बाजीरावास पुण्यास आणून गादीवर बसविलें. बाजीरावानें आपणांस न विचारता तह करावा, ही गोष्ट मराठे मंडळीस आवडली नाहीं. त्यानीं तो वसईचा तह मान्य केला नाहीं. शिंद्यांनीं तर जणूं काय तह झालाच नाहीं; अशा दृष्टीनें सैन्य जमविलें. या उलट गव्हर्नर जनरल शिंदे, होळकर, भोसले, आदि मराठे सरदारांस म्हणूं लागला कीं, मराठेशाहीचा प्रमुख बाजीराव यानें केलेला तह तुम्हां प्रत्येकांवर बंधनकारक आहे. त्याअर्थी तुम्हीं तो पाळला पाहिजे. मराठे सरदारांनीं अर्थातच गव्हर्नर जनरलचें हें म्हणणें मान्य केलें नाहीं. व उभयपक्षीं युद्धाची तयारी झाली. शिंदे, भोसले एक झाले. दोघांचें मिळून १ लाखांवर सैन्य जमलें. त्यांतील फक्त ३० हजार कवायती सैन्य होतें. परंतु दुर्दैवानें होळकर मात्र शिंद्यांशीं वैर असल्यानें तटस्थ राहिले.

वेलस्लीनें शिंद्यांस दक्षिणेंतून सैन्य परत नेण्याविषयीं सांगितलें. व शिंद्यांनीं तसें करण्यास नकार दिला. आणि युद्धास सुरवात झाली. प्रथम वेलस्लीनें निजामाच्या सरहद्दीवरील शिंद्यांच्या ताब्यांतील अहमदगरचा किल्ला जिंकला (ऑगस्ट १८०३) २१ सप्टेंबर १८०३ रोजीं मराठ्यांच्या फौजेचा तळ भोकरदन आणि जाफराबाद या दोन गांवांचें दरम्यान पडला होता त्याच दिवशी जनरल वेलस्ली व कर्नल स्टीव्हन्सन यांची गांठ बदनापूर या गांवीं पडली. तेव्हां त्यांनीं आपापसांत असें ठरविलें कीं आपण वेगवेगळ्या मार्गानें जाऊन २४ तारखेस मराठ्यांवर हल्ला करावा. त्याप्रमाणें स्टीव्हन्सन पश्चिमेकडील मार्गानें निघाला व वेलस्ली पूर्वेकडील मार्गानें निघाला. २३ तारखेस वेलस्ली नौलनी गांवापाशीं येवून पोंहचला. या वेळीं त्याच्या हेरांकडून त्याला माहिती कळाली कीं, मराठ्यांच्या फौजा तेथून ६ मैलाच्या आंतच कैलना नदीवर तळ देवून आहेत. स्टिव्हन्सन अद्याप येवून पोंहचला नव्हता. तरी वेलस्लीनें त्याची वाट न पाहतां मराठ्यांच्या फौजेवर हल्ला करण्याचा निश्चय केला. तो कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन टेहळणीकरितां निघाला. तो एका उंच टेकडावर येतांच त्याला असें दिसून आलें कीं, मराठ्यांचें सैन्य कैलना नदीच्या पैलतीरांवर आहे. सैन्याच्या उजव्या बाजूस फक्त फौज असून पायदळ व तोफा या डाव्या बाजूच्या असई या गांवाजवळ आहे.

मराठ्यांच्या तोफा हस्तगत करून त्या निकामी करावया या उद्देशानें वेलस्ली वळसा घालून मराठी फौजेच्या डाव्या बगलेपलिकडे कलना नदी उतरण्याकरितां गेला. नदीपार झाल्यावर वेलस्लीनें फौजेचे तीन भाग केले. १ भाग शिल्लक ठेवून मराठी फौजेच्या दोन्ही बाजूस आपल्या फौजा उभ्या केल्या. आपल्या एका बाजूवर हल्ला आलेला पाहून मराठ्यांनी आपल्या फौजेचे दोन भाग केले, १ भाग शत्रुसमोर उभा राहिला, व दुसरा भाग काटकोनांत उभा राहिला. इंग्रजांचे सैन्य शिस्तीनें उभें होते तोंच मराठ्यांच्या तोफखान्यानें जोराचा भडिमार सुरू केला. या अकस्मित वर्षावामुळें इंग्रजांच्या उजव्या बाजूच्या फौजेची भयंकर हानी झाली. अशाही स्थितींत वेलस्लीनें दुसऱ्या तुकडीस मराठ्यांवर हल्ला चढवावयाचा हुकूम सोडला. स्वतःजवळ तोफा राहिल्यानें या तुकडीस मराठी तोफांचा मारा सहन करावा लागला. या तुकडींतील बरेच लोक गतप्राण झाले होते. तेवढ्यांत मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीनें पुन्हा जोरदार हल्ला चढविला. तेव्हां वेलस्लीनें शिल्लक व राखीव ठेवलेल्या फौजेची व मराठ्यांच्या फौजेची घनघोर रणधुमाळी झाली. यावेळीं उभय पक्षीय फौजांचे

चांगलेंच शौर्य दिसून आलें. पण महाराष्ट्र चें दुर्दैव ओढवलें, आणि मराठ्यांच्या फौजेचा पराभव झाला. ही हातघाईची लढाई असई या गांवाजवळ झाली. असई हा गाव औरंगाबाद-अजिंठा रस्त्यावरील सिल्लोड गांवापासून ८-१० मैलांवर आहे. मराठी फौज इंग्रजी फौजेच्या मानानें अधिक होती. मनुष्यबळ साधनसामुग्री भरपूर असली तरी शिस्त व नियोजन यांचा अभाव असल्यानें ही असईची लढाई हरली गेली. ही लढाई हरली गेली नसती तर पुढील इतिहास वेगळ्या रीतीनें घडला असता. पण महाराष्ट्राचें दुर्दव. याच लढाईनें महाराष्ट्राचे स्वातंत्र्य संपुष्टांत यावयाचें होतें कीं काय कोण जाणे !

खर्ड्याच्या तहाची शाई वाळते न वाळते तोंच पुण्यास सवाई माधवरावांना अपघातानें मृत्यू आला. आणि पेशवे पदासाठीं मुत्सद्दी आणि सरदार यामध्यें भांडणें सुरू झालीं. खर्ड्याच्या तहाचे वेळीं ओलीस म्हणून ठेऊन घेतलेल्या मशीरास सोडावे आणि निजामाकडून थकबाकी वसूल करावी अशी कल्पना निघाली. मशीरला पुण्यास राजाप्रमाणें अतमामानें ठेवलें होते. हा पाताळयंत्री पुरुष तेथून बसल्या बसल्या राजकारण खेळूं लागला. कारस्थान रचूं लागला नाना फडणीसानें खर्ड्याच्या तहाचे बाबतीत सूट देण्याचे कबूल करून त्याला आपल्या बाजूस ओढण्याचा डाव टाकला. शिंद्यांचे कारभारी व परशुराम पटवर्धन यांनीं मशीरला खर्ड्याचे लढाईचे करार पुरे करण्याच्या अटीवर जून १७९६ मध्यें मुक्त केलें. पण त्यानें उलट हा कररच रद्द करून घेण्याच्या अटीवर नानाचाकों पुण्यास फौज उभारली ! मराठ्यांच्या यादवींत निजामाचा शक्य तो फायदा करून देण्याचे मशीरचें धोरण होतें व तें धोरण यशस्वी केल्लेंही. बाजीरावांसाठीं नानानें निजामास जी सूट कबूल केली होती ती बाजीराव गादीवर आल्यावर मान्य करीना. मशीर रागाऊन चालूं लागला तेंव्हां निजामाचे आणि त्यामार्फत इंग्रजांचे साह्य संपादण्यासाठीं नाईलाजानें बाजीरावानें तहांतील बाबींत पाऊण हिस्सा सूट दिली. याप्रमाणें खर्ड्याच्या विजयावर बोळा फिरला !

मशीरची सुटका झाल्यावरही तो पुण्यास एक वर्ष होता. एवढ्या अवधीमध्यें मराठ्यांची लंगडी बाजू कोणती, ती व त्यांच्यांतील कलहाचीं इंगितें समजून घेतलीं. हैद्राबादेस परत गेल्यावर मशीरनें इंग्रजाशीं जास्त मिळतें घेऊन १८०० सालीं तैनाती फौज ठेवण्याच्या पद्धतीस प्रथम कबुली दिली. बरीच वर्षे अपंग असलेला निजाम वारल्यावर मशीरनें निजामी तैनाती फौज मराठ्यांविरुद्ध लढविली. भोसले-होळकराचा पाडाव करण्यास इंग्रजांशीं सहकार्य केलें, मशीरच्या या उपद्व्यापामुळें निजाम दरबारी मशीर विरुद्ध

वातावरण निर्माण झालें होतें. पण अिंग्रजांनीं मशीरलाच हातीं धरून तें वातावरण बदलून टाकलें. भोसल्यांचा वऱ्हाड त्यांनीं निजामास दिला. पण कांहीं दिवसांनीं तो परतहि घेतला. फक्त सारा मराठवाडा आणि पूर्वीचा ताब्यांत असलेला प्रदेश निजामास दिला. याप्रमाणें निजाम कायमचा ब्रिटीशांच्या हातांतील बाहुलें बनला. ब्रिटीशांच्या कृपाछत्राखालीं निजामनें राज्य केलें.

'निजाम' हें अेका व्यक्तीचें नांव नव्हे. ती पदवी आहे. १७१३ मध्यें मीर–कम्र–अुद्दीन–हा दख्खनचा सुभेदार होता. त्याला 'निजाम–अुल–मुलक' ही पदवी फरूकसियर बादशहानें दिली. हैद्राबाद स्वतंत्र संस्थान असलें तरी त्या गादीवर येणारी प्रत्येक व्यक्ति स्वतःस निजाम म्हणवून घेत असे.

# निजामी राजवट

वर सूचित केल्याप्रमाणें मराठवाडा हा निजामचा शासित प्रदेश बनला. मराठवाड्याचें भवितव्य हैद्राबादहून हालविल्या जाणाऱ्या सूत्रांवर अवलंबून असे. अिस्लामी धर्माचे राज्यकर्ते असल्यामुळें राजकारभारांत मुसलमानांचाच वरचष्मा होत असे. तो अितिहास पुढें पाहूं. हैद्राबादच्या गादीवर खालील व्यक्ति निजाम म्हणून आल्या व त्यांनीं कारभार केला.

१ नबावमीर कमरोद्दीन खाँ फत्तेहजंग निझाम–अुल्मुक आसफ जाँह (पहिले) १७२४–१७२८.

२. नबाबमीर अहमदखां नासिरजंग निझामुद्दोला १७४८–१७५०.

३ नवाब हिदायत मोहियोद्दीन खाँ मुजफ्फरजंग १७५०–१७५१.

४. नवाब सय्यद महम्मद खाँ सलाबतजंग असफोद्दोला अमीरूल मुमालिक १७५१–१७६३.

५. नबाब मीर निझाम अलीखां फत्तेहजंग निझामुद्दोला निझामुल मुलक आसफ जाह (दुसरें) १७६३–१८०३.

६. नवाब सिकंदर जाहमीर अकबर अलीखाँ आसफ जाह (तिसरे) १८०३–१८२९.

७. नवाब नासिरद्दोला मीर फरखुंदा अलीखां आसफ जाह (चौथें) १८२९–१८५७.

८. नवाब अफजलुद्दोल्ला मीर तहनियत अलीखां आसफजाह (पांचवे) १८५७–१८६९.

९. नवाब मीर मेहबूब अली खाँ निजाम मुलुमुलक आसफजाह (सहावें) १८६९––१९११.

१०. नवाब मीर अुस्मान अलीखाँ निझाम मुलमुलक आसफजाह (सातवें) १९११–सप्टेंबर १९४८; १९४८ पासून १९५६–राजप्रमुख.

निजामाची राजवट कांहीं मराठवाड्याला फलदायी ठरली नाहीं. मराठी भाषेला सापत्य भावानेंच वागविलें गेलें. अेकतंत्री राज्यकारभार हें निजामी राज्य कारभाराचें वैशिष्ठ्य होतें. मराठवाड्याकडे राज्यकर्त्यांचें दुर्लक्षच झालें. हैद्राबाद संस्थानाचा कारभार मुख्यत्वेंकरून तेथील मुख्य प्रधानांनीं पाहावा, अशी पूर्वींची वहिवाट होती. अेखादें विशेष–खास–प्रकरण आपणाकडे आलें पाहिजे असे निजामाने फर्माविलें असेल तेवढेंच प्रकरण त्यांच्या हुकुमासाठीं त्यांच्याकडे पाठविलें जात असे. अर्थात त्या प्रकरणाचा निकाल निजामाच्या लहरीनुसार लागत असे. अितर वेळीं निजाम आपल्याच रंगविलासांत व चैनबाजींत मशगुल होअून रहात. १८५४ सालीं पहिले सर सालारजंग हे मुख्य दिवाण असतांना दफ्तर–गी–माल व दफ्तर–अी–दिवाणी अशीं सरकारचीं मुख्य दोन खातीं राजधानीमध्यें असत. या खात्यांच्या मुख्य कार्यालयांतून सरकारचा सर्व कारभार चालत असे. या दोन खात्यांवरील मुख्याधिकाऱ्यांना दफ्तरदार असें म्हणत. जहागिरींची नोंद ठेवणें व सरकारचे हिशेब राखणें हीं कामें दफ्तरदार पहात. खुद्द हैद्राबाद शहरांत न्यायालय व पोलिस व्यवस्था होती. परंतु हैद्राबादबाहेर –मराठवाड्यांत– न्यायालयें व पोलिस व्यवस्था नव्हती. मराठवाड्यांतील –बाहेरील भागांतील– सर्व व्यवस्था तालुकादारांकडे सोपवलेली होती. तालुकादाराकडून जमीन महसूल घेणें अेवढेंच निजाम सरकार आपलें काम समजत असे. पण पहिल्या सालारजंगानीं ही सारी अव्यवस्था मोडून काढली. ठिकठिकाणीं तालुकादारांना वेतन ठरवून दिलें. न्यायदानासाठीं न्यायधिशांच्या नेमणूका केल्या. प्रत्येक तालुकदाराच्या हाताखालीं कांहीं पोलिस व लष्करी शिपाअी देअून त्यांनीं आपापल्या भागांत शांतता ठेवावी, अशी जबाबदारी त्यांवर टाकली. या पद्धतीला जमीयत जिलहारी असें म्हणतात. या जमीयत जिलहादारीवर देखरेख करण्यासाठीं हैद्राबाद येथें अेक कमेटी नेमण्यांत आली. यानंतर मुनशी खाना या नांवाचें अेक नवें ऑफीस सुरू केलें. १८५६ सालीं सरकारी तिजोरी खातें, १८६१ सालीं जकात खातें, १८६२ सालीं न्याय खातें, १८६३ सालीं सेक्रेटरीअेट हीं सुरू करण्यांत आलीं. १८६५ मध्यें मुनशी खात्याचें काम बोर्ड ऑफ रेव्हिन्यूकडे देण्यांत आलें. येथून जमीन महसूलाच्या पद्धतीत क्रांति घडून आली. तालुकादारांच्या हाताखालीं तहशीलदार नेमण्यांत येऊन तालुक्यांत सरकारी तिजोरी स्थापन करण्यांत आली.

हैद्राबाद राज्यामध्यें प्रत्येक खेड्यांमध्यें अेक पाटील आणि अेक कुलकर्णी असे. ज्या खेड्यांतील महसूल रु.५५० पेक्षां अधिक असेल, तेथें दोन पाटील असत. अेकाला माली (रेव्हिन्यू) व दुसऱ्याला पोलिस–पाटील म्हणत. १८७७ पर्यंत पाटील–कुलकर्ण्यांना इनामी जमीनी दिलेल्या होत्या. परंतु त्यानंतर त्यांच्या जमिनीवर अितरांप्रमाणें सारा बसविण्यांत आला व वेतन म्हणून त्यांना त्यांच्या गांवांत होणाऱ्या महसूल वसूलापैकीं, कांहीं भाग द्यावा असें ठरलें. १८८० च्या सुमारास

पोलिस, वैद्यकीय, जंगल, शिक्षण वगैरे खातीं सुरु करण्यांत आलीं. जमीन महसूलाचें खातें मुख्य प्रधानाकडेच ठेवण्यांत येत असे. १८९३ सालीं मुख्यप्रधानांना सल्ला देण्यासाठीं मंत्री मंडळ निर्माण झालें. राज्याचें वार्षिक अंदाजपत्रक तयार करणें, कारभाराच्या महत्वाच्या प्रश्नांवर विचार करणें, निर्णय घेणें, आदि कामें मंत्री-मंडळाकडे सोपविलेलीं असत. मंत्री मंडळाचे अध्यक्ष, मुख्यप्रधान हेंच असत. १९१४ पर्यंत ही पद्धत अंमलांत होती. यानंतर ५ वर्षे निजामांनीं स्वतःच राज्यकारभार पाहिला. १९१४ पासून कारभार पाहणारे निजाम म्हणजे पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचे राजप्रमुख होत. त्यांच्याबद्दलची अधिक माहिती कालानुक्रमें देऊंच.

## निजाम-अुल-मुळक (१७२४-१७४८)

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोंगल दरबारामध्यें गोंधळ माजला. दरबारांत अिराणी, तुराणी, दुराणी, आणि हिंदुस्थानी असे चार पक्ष पडले होते प्रत्येक पक्ष बादशहास आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करी व आपल्या धोरणाप्रमाणें मोंगलाअीचा कारभार चालावा, असा प्रयत्न करी. निजाम-अुल-मुलक यांस सय्यद बादशहाचें मराठ्यांशी संगमनत करण्याचें धोरण पसंत नव्हतें. तो मोठा अनुभविक असून औरंगजेबाच्या तालमीमध्यें तयार झाला होता. निजाम-अुल-मुलकांचें मूळ नांव कमरुद्दीन असें होतें. फरूखसियरच्या कारकीर्दीत तो १७१३ ते १७१५ पर्यंत दक्षिणेचा सुभेदार असतांना त्यानें मराठ्यांमध्यें कलागत लावून देण्याचा चांगलाच प्रयत्न केला. मोंगलाअीच्या अुत्तर कालामध्यें मोंगलाअीस सांवरून धरणारे जे कर्ते पुरुष होऊन गेले त्यांतील निजाम अुल-मुलक हा एक होय.

मराठ्यांचा निजाम-अुल-मुलक हा कट्टा शत्रू होता. मराठ्यांनीं दिल्लीच्या राजकारणांत हात घातला हें त्यांस मुळीच आवडलें नाहीं व अतःपर मराठे हे दिवसें-दिवस जास्त प्रबळ होत जाणार हें जेव्हां त्यास स्पष्ट दिसूं लागलें, तेव्हां कधीं अुघड विरोध करून तर कधीं सलोखा दाखवून त्यांना अडथळा आणण्याचा त्यानें कसून प्रयत्न केला. परंतु अेकामागून अेक आलेल्या पराक्रमी पेशव्यांनीं त्याचें कांहीं चालूं दिलें नाही. तो मोठा धोरणी होता. फरूखसियरच्या मृत्यूनंतर सय्यदांचें वर्चस्व पाहून तो मुका-ट्यानें अनुकूल संधीची वाट पाहात बसला. सय्यदांस प्रबळ विरोधी निजामच होता. तेव्हां त्याचा कांटा काढून टाकावा म्हणून १७२० मध्यें निजामास सय्यदांनीं दक्षिणेस पाठविलें व तिकडे आपले सरदार दिलावरखान व अलीखान यांना त्याचा नाश करावयास सांगितलें. परंतु निजामानें दोघांचाहि वेगवेगळा पराभव केला. निजा-माचा कडक स्वभाव दिल्लीच्या दरबारी मंडळीस आवडेनासा झाला. निजामानें राज्यकारभारांतील ढिलाअी काढून टाकण्यास सुरवात केली पण ही शिस्त बाद-शहास सहन न होअून तो व त्याचे चैनी मित्र निजामाची भर दरबारांत टवाळी करूं

लागले. निजामाम या गोष्टीची चीड येऊन त्यानें दक्षिणेची वाट धरली (१७२४). तेव्हांपासून त्यानें नांवाला बादशहाची तावेदारी पत्करुन जवळजवळ स्वतंत्रपणें दक्षिणेचा कारभार करण्यास सुरवात केली व औरंगबादेहून आपलें ठाणें अुठवून मराठ्यांपासून बरेच दूर हैद्राबाद (भागानगर) येथें आपली राजधानी स्थापिली. निजाम हा महाकपटी आणि कावेबाज गृहस्थ होता. स्वतःचा स्वार्थ साधणें, आणि आपला राज्यविस्तार करणें हें त्याचें धोरण त्याच्या सर्व हालचालींत दिसून येतें. मराठे हे त्याचे प्रमुख विरोधक. नेहमीं मराठ्यांशीं कटकटी निर्माण करून त्यांच्या राज्यविस्तारास तो अडचण निर्माण करीत असे. पण कोणत्याच पेशव्यानें त्याचें चालूं दिलें नाहीं ही गोष्ट वेगळी. नादीरशहाच्या स्वारीच्या वेळीं निजाम दिल्लीस होता. तो दिल्लीच्या सुलतानाच्या बाजूनें लढला होता (१७३९). नादीरशहानें ३० हजार माणसांची कत्तल केली आणि रक्ताचे पाट दिल्लीमध्यें वाहविले. नादीरशहा-पुढें जाऊन कत्तल बंद करण्याची विनंति करण्याचें धैर्य दिल्लीच्या बादशहालाहि होओीना. तेव्हां निजाम स्वतः पुढें झाला व त्यानें नादीरशाहाला शांत केले. असें मांगतात कीं, नादीरशाहाची त्यावेळीं निजामावर अितकी मर्जी बसली होती कीं, त्यानें सबंध मोंगल साम्राज्य निजामास देऊं केलें. पण मी बादशहाचा नोकर आहे व नोकरानें असें करणें कृतघ्नपणाचें आहे. शिवाय तुम्हांलाहि वचनभंगाचा दोष लागेल, असें निजामानें अुत्तर दिलें. हें अुत्तर अैकून नादीरशाहा खूष झाला. मराठ-वाडा– हैद्राबाद प्रदेशावरील चौथाअी–सरदेशमुखीचे हक्क मराठ्यांनीं कांहीं मोबदला घेऊन सोडून द्यावेत असे आपल्या प्रतिनिधीतर्फे निजामानें शाहूशीं बोलणें सुरू केलें. पण याला बाजीराव तयार झाला नाहीं. तेव्हां निजामानें मराठे सरदारां-मध्यें फितुरी सुरू केली. कोल्हापूरकर भोसले, निंबाळकर आदि मराठे सरदारांना त्यानें आपल्याकडे वळविलें. चौथाअी–सरदेशमुखीचे हक्क कोल्हापूर व सातारा येथील छत्रपतींपैकीं कोणांस द्यावे, याचा प्रथम निकाल करा असा धूर्त प्रश्न त्यानें पेशव्यांना टाकला व शिरजोरीनें वागण्यास सुरवात केली. तेव्हां बाजीरावानें १७२८ मध्ये पालखेड येथें निजामाला नामोहरम केलें व "चौथाअी–सरदेशमुखीच्या हक्कास बाध आणणार नाहीं" असें मुंगी–शेवगांवच्या तहांत त्याच्याकडून कबूल करवून घेतलें. तरी पण त्रिंबकराव दाभाड्यास बाजीरावाविरूद्ध निजामानें अुठवलेंच. पण बाजीरावानें दाभाड्याचा चांगलाच काटा काढला. हें पाहून निजाम बाजी-रावाशीं गोडीनें वागू लागला. थोर मुत्सद्दी पण महाकपटी निजाम–अुल–मुल्क हा १७४८ मध्यें ब-हाणपूर येथें मृत्यू पावला आणि निजामी राजवटीचा अेक मोठा अंक संपला. औरंगजेबाप्रमाणें हाहि मराठ्यांच्या पाठीमागें लागला होता. औरंगजेबाला शिवाजी तसा या निजामाला बाजीराव भेटला. निजाम, पेशवे, अितर मराठे सरदार, रजपूत हे सारख्याच तोलाचे होते. स्वार्थ पाहणें, राज्यविस्तार करणें आणि दिल्लींच्या पातशाहीवर कबजा ठेवून भारतीय राजकारणावर वरचष्मा ठेऊं पाहणें, हाच अुद्योग

निजामासह सर्वांनीं केला. पण तो सर्वांनाच अखेरपर्यंत जमला नाहीं. दिल्लीला अेकछत्री सत्ता निर्माण करण्याचें सामर्थ्य मुळांतच कोणाच्याहि अंगीं नव्हतें.

आज जो पांच जिल्ह्यांचा मराठवाडा समजला जातो, तो तसा ब्रिटिश अमदानीपूर्वी कधीहि निजामाच्या हुकुमतींत नव्हता. सबंध नांदेड जिल्हा, बीडचा अर्ध्याहून अधिक भाग, अुस्मानाबादचे तीन तालुके, परभणी जिल्ह्याचा जालन्यास लागून असलेला पाथरी तालुका, औरंगाबादचे जालना, जाफराबाद, सोयगांव हे तीन तालुके, पेशवाअीचें पतन होअीपर्यंत त्यांच्याकडे किंवा त्यांच्या या ना त्या सरदाराकडे होते. मोंगलांची राजवट जोपर्यंत प्रबळ होती, तोपर्यंत, म्हणजेच औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत, आजचें मराठवाड्याचें मुख्य केंद्र औरंगाबाद हें मोंगलांच्या अमलाखालीं होतें. यावेळीं आसफशाहीचा (निजामशाहीचा) जन्मसुद्धां झाला नव्हता. त्यामुळें आसफशाहीच्या जन्मापासून तो ब्रिटीश अमदानीपर्यंत मराठवाड्याच्या पांचहि जिल्ह्यांचा अर्ध्याहून अधिक भाग हा नेहमीच मराठे किंवा मोंगल याच्या हुकमतीखालीं होता. आणि त्यामुळें सबंध मराठवाड्यावर अेकछत्री निजामी राजवट स्थापन होण्यासाठीं निजामाला ब्रिटिश अमदानीपर्यंत थांबावे लागलें,.

यावरून हें ध्यानी येईल कीं, निजामी राजवट येण्यापूर्वी मराठवाडा ही युद्धभूमि बनली होती. मराठवाड्याच्या प्रदेशांवर निजामानें स्वारी केली कीं, मोंगल वा मराठे यांचेशीं युद्ध ठरलेलें. दिल्लीपती मोंगलाचें लक्ष कमी असलें तरी मराठ्यांचें लक्ष मराठवाड्याकडे चांगलेंच होतें. अर्थात पेशव्यांनीं निजामाची डाळ शिजूं दिली नाहीं, ही गोष्ट अलाहिदा.

## *नासरजंग* (१७४८–१७५०)

निजाम–अुल–मुल्क असफशाहाचा हा दुसरा मुलगा. असफशाहानें याची दख्खनच्या कारभारावर नेमणूक करून माळव्याकडे प्रयाण केलें. वडील तिकडे गेल्यावर नासरनें आपल्या वडिलांविरुद्ध बंड अुभारलें. यामुळें असफशाहा परत दख्खन मध्यें आला. मोंगलांनीं कबूल केलेला मुलुख नासर देईना म्हणून थोरल्या बाजीरावानें नासरवर स्वारी केली व मुंगीपैठणचा तह केला. अेवढ्यांत असफशाहा नासरवर चालून आला. पिता–पुत्रांची लढाअी झाली. (१७४१) असफशाहानें नासरला पकडलें व त्याचा प्राण घेण्याचें ठरविलें. पण असफशाहाच्या सरदारांनीं असफशाहाची समजूत घालून नासरचा जीव वांचविला. असफशाहानें नासरला कंदार येथें कैदेंत ठेवलें व त्यास १७४३ मध्यें सोडून दिलें. असफशाहाचें मुजफरजंग नांवाच्या नातवावर प्रेम होतें. नासरवर नव्हतें. आपल्या पश्चात मुजफरजंगला निजामी देण्याचें असफशाहानें ठरविलें होतें. म्हणून असफशाहा मृत्यू पावताच नासरनें मुजफरजंगवर स्वारी करून त्याला कैदेंत ठेवलें. फ्रेंच सेनापती डुप्ले यानें

नासरच्या ठाण्यांतील जिंजी घेतली. तेव्हां नासरनें डुप्लेवर स्वारी केली. त्या स्वारीमध्यें फ्रेंचाच्या कारस्थानानें दगा होऊन नासरच्या अेका नोकरानें नासरचा खून केला असें म्हणतात. (५–१२–१७५०). फ्रेंचांनीं नासरचा दिवाण रामदासपंत यास फितूर करून कडपेकर नबाव महंमद यांच्याकडून नासर यास गोळी घालविली, असें ग्रँट डफ म्हणतो. नासरजंग जवळ बापासारखा दूरदर्शीपणा नव्हता. तो विषयासक्त, पण शूर व अुदार होता. काव्य व वाङमयाची त्यास आवड होती. नासरच्या 'खुनानंतर' फ्रेंचांनीं मुजफरजंग यास निजाम केले.

## *निजामअली* (१७६३–१८०३)

निजामी राजवटीमधील हा महत्त्वाचा राज्यकर्ता. पहिला निजाम मृत्यू पावल्यावर त्याच्या चौघां मुलांमध्यें तंटे सुरू झालें. याचवेळीं विश्वासराव व शिंदे यांना पेशव्यांनीं औरंगाबादेवर पाठविलें व स्वत: पेशवे शिदखेड्यावर गेले. शिदखेड्याची लढाअी व तिची पार्श्वभूमि मागें वाचकांच्या वाचनांत आलेली आहेच. निजामअलीच्या तिघां भावांमध्यें गादीबद्दल भांडणें चालु होतीं. तेव्हां निजामानें मोठ्या धूर्तपणानें सलाबतचें कारभारीपण स्वीकारलें व हळू हळू सलाबतची सत्ता बळकावून त्यास नामधारी बनविले. पुढें त्याला कैदेंत ठेऊन व अेका वर्षानें त्याचा खून करून तो स्वत: गादीवर बसला. सिंदखेडा, अुदगीर, राक्षसभवन व खर्डा येथील लढायांस कारणीभूत झालेला निजाम हाच होय. या लढायांचा अितिहास मागें दिलेला आहेच.

टिपूवरील शेवटच्या स्वारीमध्यें निजामनें अिंग्रजास अुत्तम मदत केली. त्याबद्दल अिंग्रजानीं निजामास ५३०००० चा मुलूख दिला. शिवाय पेशव्यांच्या वांटणीपैकीं १।।। लाखाचा मुलूख गोड बोलून निजामानें मिळविला. अिंग्रजांनीं निजामाशीं तैनाती फौजेचा तह केला व निजामाच्या संरक्षणाची जबाबदारी अिंग्रजांनीं आपल्याकडे घेतली. याप्रमाणें निजाम सर्वस्वीं अिंग्रजांच्या अंकीत झाला (१८०३) यानंतर निजाम फार दिवस जगला नाही. तो १८०३ मध्यें मरण पावला.

निजामअल्ली सर्व निजामांत शहाणा व मुत्सद्दी असल्यानें मराठ्यांच्या प्रचंड सामर्थ्यापासून वांचला. त्याच्या दोन्ही बाजूंस नागपूरकर–पुणेकर मराठे, अितर बाजूस हैदर व अिंग्रज असें असल्यामुळें त्याला सर्वांशीं नेहमी दूरदर्शीपणानें वागावें लागत असे. वेळ पडेल तशी चढाअी करून किंवा पड खाऊन त्यानें आपलें राज्य राखलें. पेशवे–भोंसले भांडणाप्रमाणें पेशव्यांच्या गृहकलहांतहि निजामानें भाग घेतला होता. त्यानें हेस्टिंग्जला पत्रांत "राघोबावर विश्वास न ठेवतां पेशव्यांशीं तह केला हें चांगले केलें" असें लिहिलें आहे. पहिला निजाम (असफशाह) व हा निजाम या पितापुत्रांनीं पेशव्यांच्या पांच पिढ्या पाहिल्या. १७२७–१७६३ पेशवाअीचा चढता

काळ पाहिला व त्याच पेशवाओीचा शेवटहि पाहिला १७१३–१७९५ हा खर्ड्याच्या लढाओीपर्यंत) पेशवे–निजाम संबंधांत ज्या घडामोडी झाल्या त्यांचा अितिहास हा मराठ्यांच्या अितिहासांतील महत्त्वाचा भाग होय. या ८२ वर्षांत जें घडलें त्यामुळें अेकंदर भारताचाहि अितिहास घडविला गेला.

## मेहबुब अलिखान (१८६९–१९११)

गादीवर आले तेव्हां अवघ्या ३ वर्षांचे होते. प्रथम रीजन्सीमार्फत राज्य–कारभार चालला. १८८४ मध्यें यांना अधिकार मिळाले. १९०१ मध्यें यांनीं महाराजा सर किशनप्रसाद यांना दिवाण नेमलें. हिंदुस्थानांतील विस्तारानें, संपन्नतेनें, दर्जानें सर्वांत श्रेष्ठ असणाऱ्या राज्याचे हे अधिपति आचार–विचारानेंहि तसेंच अुदार होते. हे अत्यंत साधे, धर्मभीरू व हिंदु–मुसल-मानांच्या आदरास पात्र झाले होते. हे संकट-ग्रस्त प्रजेच्या मदतीसाठीं जातीनें धांवून जात. यांच्यावर लोकांची अितकी श्रद्धा होती कीं, लोक यांना नवस करीत, असें म्हणतात.

## सर अुस्मान अलिखान

(जन्म १८८६–राज्यरोहण–२९:८ १९११. सप्टेंबर ते १९४८ पर्यत निजाम –१९४८ पासून १९५७ अखेर राजप्रमुख) यांची कारकीर्द महत्त्वपूर्ण झाली. २२५ वर्षे चाललेली निजामी राजवट यांच्याच कारकिर्दीमध्यें भारतीय संघ राज्यामध्यें विलीनझाली व लोकशाही सरकार स्थापन झालें. हैद्राबाद राज्याचें विभाजन झालें. आणि भारतीय स्वातंत्र्याचा आनंद जनता अुपभोगूं लागली. निजामी राजवटीला सारी जनता विटली होती. तींत राज्यकारभाराचा तराजू नेहमींच मुसलमानांकडे झुकलेला असे. भारतीय संघराज्यामध्यें विलीन होण्यापूर्वीं राज्यकारभार कसा चालत असे व मराठवाड्यावर कसा अन्याय झाला याची पूर्ण कल्पना सर्वांना आहेच.

सर अुस्मान अलीखान यांचें शिक्षण खाजगी रीतीनें झालें. हे गादीवर येतांच त्यांनीं अलीगड विद्यापीठाचे संस्थापक सर अहमद सय्यद यांचे नातू डॉ. रास मसूद यांना आणून त्यांना शिक्षणखात्याचे मुख्याधिकारी नेमले. तेव्हांपासून यांच्या राज्यांत जुनें समानतेचें धोरण जाऊन नवें मुसलमानी संस्कृतीच्या वर्चस्वाचें युग सुरू झालें.

# समालोचन

प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें, निजामांनीं ५ वर्षेपर्यंत सर्व राज्यकारभार स्वत: चालविला आणि पांच वर्षांनंतर बहुतेक सर्व कारभार अेका कार्यकारी मंडळाकडे सोपविला (१९११–१९१९) आणि अधिकाराची विभागणी केली. या मंडळाचे अध्यक्ष म्हणून सर अली अिमाम यांची नेमणूक करण्यांत आली. त्यांनीं कर्जाच्या

पोटी १८५३ मध्यें गेलेला वऱ्हाड प्रांत परत मिळविण्याची खटपट केली. पण त्यांना या कामी अपयश आलें व त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पण पुढें यांच्या चिकाटीच्या प्रयत्नानें वऱ्हाडवरील निजामाचें स्वामित्व नाममात्र का होईना पण ब्रिटीश सरकारनें मान्य केलें.

## कायदे मंडळ :–

कार्यकारी मंडळानंतर दुसरें महत्त्वाचें मंडळ म्हणजे कायदे मंडळ हें होय. या कायदे मंडळाची स्थापना १८७० मध्यें झाली. पहिला सालारजंग यानें ब्रिटिश हिंदुस्थानांतील कायद्याच्या धर्तीवर हैद्राबाद संस्थानाकरितां कायदे करण्यासाठीं मुसलमान कायदे पंडितांचें अेक मंडळ नेमलें. नंतर कांहीं दिवसांनीं कार्यकारी मंडळाकडेच कायदेमंडळाचें काम सोपविलें गेलें. १८९० मध्यें संस्थानांतील जुन्या कायद्याची दुरुस्ती व नवीन कायदे तयार करण्यासाठीं अेक खास समिति नेमली. १८९३ मध्यें कायदे करण्याकरितां कायदे मंडळाची पुनर्रचना केली. कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षानेच कायदे मंडळाच्या अध्यक्षांचें काम करावें, अशी नवीन व्यवस्था करण्यांत आली या कायदे मंडळाची सदस्य संख्या २५ होती. पैकीं १४ सरकारी अधिकारी, ४ अध्यक्षांनीं नेमलेले (म्हणजे सरकार नियुक्त) बिन सरकारी. बाकीचे ७ बिनसरकारी निवडून आलेलें प्रतिनिधि. असे या कायदे मंडळांत असत. यावरून कायदेमंडळांमध्यें जनतेला योग्य प्रतिनिधित्व होतें असें दिसून येतें. या कायदेमंडळाचे अधिकारहि अत्यंत मर्यादीत असत. सार्वजनिक पैशासंबंधीचें कोणतेहि बिल आणतां येत नसे. धर्मविषयक कायदे आणण्यास मनाअी होती. निजाम सरकारचें लष्कर, ब्रिटीश सरकारबरोबरचे संबंध या संबंधीचा निर्णय हें कायदे मंडळ घेऊं शकत नसे. कायदे मंडळानें नामंजूर केलेले, दुरुस्त केलेले वा नवीन तयार केलेले कायदे यांची अंमलबजावणी निजामच्या लहरीवर अवलंबून असे. सारांश कायदे मंडळ हें अेक नामधारी मंडळ होतें. अिंग्रजी कायद्याचें भाषांतर, त्यांत कांहीं थोडा फेरबदल करून तो कायदा प्रसिद्ध करणारे अेक खातें होतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं, कारण प्रजेनें निवडून दिलेला प्रजेचा हितचिंतक त्या कायदेमंडळामध्ये नव्हता. राज्यकारभारासंबंधीं कसलीहि चर्चा होऊं शकत नव्हती- सर्व कायदे कानून धाब्यावर बसवून कोर्टामार्फत चौकशी न करतां आपल्या लहरीप्रमाणें त्यास कैदेंत टाकणें, पाहिजे त्याची मालमत्ता जप्त करणें, थोडक्यांत मनास येअील तसें वागण्याचा निरंकुश अधिकार निजामास होता.

हैद्राबाद संस्थानच्या अुत्पन्नाच्या दृष्टीनें विचार करतां मराठवाड्यावर नेमका खर्च किती केला जात असे, याची माहिती नसली तरी हैद्राबादच्या अुत्पन्नाचे मार्ग कोणते व खर्चाच्या बाबी कोणत्या या जरूर पाहतां येतील. प्रजेकडून पैसा

कोणत्या मार्गानें वसूल केला जात असे व प्रजेच्या कोणत्या सुखसोयींसाठीं पैसा खर्च होत असे याची आपण माहिती घेतली तर असें दिसून येईल कीं, अुत्पन्न जास्त, खर्च कमी, शिल्लक भरपूर अशी अवस्था या राज्याची असे. खर्चदेखील जनतेच्या सोयींवरच होत असे, असें नाहीं. अुत्पन्नाच्या बाबी पुढीलप्रमाणें होत्या. जमीन-महसूल, जंगल, कस्टम्स्, अबकारी, अफू व गांजा, स्टँप, रजिस्ट्रेशन, खाणी, वऱ्हाड-बद्दलचा मोबदला, व्याज, टांकसाळ नोटा (पेपर करन्सी), पोस्ट, पाटबंधारे, रेल्वे-वीज,टेलीफोन, वर्कशॉप, हुंडणावळ, विकास, दुष्काळ फंड, किरकोळ आदि अुत्पन्नाच्या बाबी होत्या. अिस्लामी धर्माच्या कट्टर अभिमानी म्हणविणाऱ्या निजामाच्या राज्यांत दारू–अफू–गांजा आदि गोष्टी अिस्लाम धर्माविरूद्धच्या असतां अुत्पन्नाच्या बाबी कशा ठरतात हें पाहून आश्चर्य वाटतें. खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणें– जमीन-महसूल, पाटबंधारें, जंगल, कस्टम्स्, अबकारी, अफू, स्टँप, रजिस्ट्रेशन, खाणी, व्याज, टांकसाळ , पेपर करन्सी, हुंडणावळ, निजामाच्या खाजगी खर्चाकरतां देणगी, राज्य-कारभार, पोलिटिकल खर्च, लाअीफ अिन्शुरन्स, मनसब, लष्कर, न्यायखातें, तुरुंग, पोलिस, शिक्षण, आरोग्य, धर्म, शेतकी, व्हेटनरी, सहकार, म्युनिसिपालिट्या, रस्ते व बांधकामें, रेल्वे, छापखाना, अुद्योगधंदे, किरकोळ आदि खर्चाच्या बाबी होत. या राज्यांतील खर्चाच्या बाबींवर बरेंच लिहितां येण्यासारखें आहे. पण प्रथम डोळ्यांत भरण्यासारखीं प्रचंड खर्चाची बाब म्हणजे निजामच्या खाजगी खर्चासाठीं दिली जात असलेली रक्कम. हिंदुस्थानांतल्या कोणताहि संस्थानिक अेवढी रक्कम खाजगी खर्चासाठीं घेत नसेल. या देणगीखेरीज निजामाच्या खाजगी जहागिरींतून येणारी नक्त रक्कम १।। कोट व त्याचें व्याज ही वेगळीच.

## *शिक्षण :–*

मराठी – वगैरे प्रादेशिक भाषेचें महत्त्व कमी करून सरकारी कामकाजाची भाषा अुर्दू ही ठरविली. राजभाषा व बोधभाषा म्हणून सर्वत्र अुर्दूला स्थान देण्यांत आलें. सर अकबर हैदरी यांच्या साहाय्यानें १९१८ सालीं अुस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापन झाली. तिला व्यापक आणि भव्य स्वरुप देण्यासाठीं कोट्यावधि रुपये खर्च करण्यांत आले. तेथें अुच्च शिक्षणासाठीं अुर्दू हीच माध्यम–भाषा म्हणून मान्य करण्यांत आली. व ५०० वर ग्रंथ अुर्दूत करवून घेतलें. परिभाषा ठरवून त्यांचा समावेश अभ्यास-क्रमांत केला. हैद्राबाद राज्यामध्यें लोकशिक्षणाची तरतूद योग्य प्रकारें केली गेली नव्हती. मुसलमानांची लोकसंख्या शेकडा १० टक्के नसतांनाहि त्यांच्या शिक्षणासाठीं लक्षावधि रुपयें खर्च केले जात. व ९० टक्के हिंदुप्रजेच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें जाई. हिंदू लोकांनीं चालविलेल्या खाजगी शाळांवर सरकारची विशेष कडक नजर असे.

## जमीन महसूल :–

जमीन महसूलाच्या पद्धतीचे सामान्यत: दोन प्रकार असत. अेक दिवाणी किंवा खालसा जमिनींचा महसूल व दुसरी निजामच्या सर्फखास व अितर जहागिरींतील जमिनीचा महसूल. खालसा जमिनी रयतवारी पद्धतीनें शेतकरी वर्गाकडे असत. या जमिनीची मालकी सरकारची नसून सरकार फक्त साऱ्यापुरतें हक्कदार असे. दर ३० वर्षांनीं साऱ्याची फेर आकारणी म्हणजे वाढ केली जात असें.

## सर्फेखासच्या जमिनी :–

ज्या जमिनीचा महसूल निजामाच्या खाजगी खर्चाकडे जात असे त्या जमिनीस सर्फेखासच्या जमिनी असे म्हणत. या जमिनींचें क्षेत्रफळ ८११० चौरस मैल होतें. निजामाचा खाजगी व व्यक्तिविषयक ख चप्रथम सरकारी तजोरीं-तून दिला जात असें. परंतु निजाम नासिरुद्दौला यांनीं अशी युक्ती काढली कीं, आपल्या खाजगी खर्चासाठीं सरकारी तिजोरींतून रक्कम घेण्याअैवजीं कांहीं तालुकेंच राज्यांतून स्वतंत्र तोडून निराळे करावे म्हणजे पैशासाठीं वरचेवर दिवाणाकडे मागणी करण्याचें कारण नाहीं. अेकदम् अेवढा मोठा प्रदेश आपल्या खर्चासाठीं घेणें निजामाला सोयीचें झालें तरी त्या प्रदेशांतील प्रजेचे हक्क मात्र संपुष्टांत आले. खाजगी खर्चासाठीं राज्याचा अेवढा मोठा भाग अेखाद्या राजानें तोडून घेतल्याचीं अुदाहरणें क्वचितच सांपडतील. हा भाग स्वतंत्र रीतीनें घशांत टाकावयास मिळाल्या-मुळे पैशांच्या बाबतींत निजामाला कार्यकारी मंडळाची मुळीच पर्वा राहिली नाहीं. निजामाचा कोणीहि नातेवाअिक निपुत्रिक मेला कीं, त्याच्या जमिनी व जहागिरी खालसा करून ती सर्फेखासमध्यें सामील केली जात असे. १८५८ मध्यें अिंग्रजांनीं सुरापूर हा तालुका निजामास दिला. निजामानें हा सबंध तालुका सर्फेखासमध्यें सामील केला. १८६० मध्यें अुस्मानाबाद व बिदर जिल्ह्यांतील कांहीं तालुके निजा-माला मिळाले. ते तालुके निजामानें सर्फेखासमध्यें जमा केले. नासिरुद्दौलाच्या वेळीं सर्फेखास जमिनीचें जें क्षेत्रफळ होतें तें या निजामाच्या वेळीं किती तरी पटीनें वाढलें.

## जंगल :–

९६१४ चौरस मैल जंगल या राज्यांत होतें. पैकीं ७२४५ चौ. मैल जंगल संरक्षित म्हणून जाहीर केलें होतें. शेतकरी लोकांना गुरें चारावयास परवानगी नसे.

देशी व विलायती दारू, अफू, गांजा आदि मादक पदार्थांच्या विक्रीचें अुत्पन्न वाढलेलें असे. प्रजेमध्यें दुर्व्यसनें, गुन्हेगारी, दारिद्र्य यांची वाढ भरपूर होत असे.

## जकात (करोडगिरी) :–

निजाम सरकारच्या हद्दींतून बाहेर जाणाऱ्या व हद्दींत येणाऱ्या मालावर जकात द्यावी लागे. १८६० पूर्वी जकात खातें अस्तित्वांत नव्हतें. तरी जहागिरदार वेगवेगळ्या नांवांखालीं मालावर कर आकारीत. १८७६ मध्यें जकात खातें निर्माण झालें व नाझम–करोडगिरी नांवाचा मुख्य अधिकारी नेमला गेला.

## पोस्टखातें :–

राज्याचें स्वतंत्र पोस्टखाते असे. पोस्टाची तिकिटें, कार्डें, पाकिटें, राज्यांतच तयार केलीं जात. पत्रव्यवहाराच्या देवघेवीबाबत निजाम सरकारनें अिंग्रज सरकारशीं करार केलेला होता. ब्रिटीश हद्दींतून येणाऱ्या पत्रांवर निजाम सरकार कांहींहि पोस्टाचा स्टँप न घेतां तीं मालकास पोचवीं. अुलट निजाम सरकारचीं तिकिटें लावलेलीं पत्रें मात्र ब्रिटीश सरकार आपल्या राज्यांत आपलीं तिकिटें असल्याखेरीज पोचतीं करीत नसे. १८६९ पर्यंत निजाम सरकार पत्रें वांटण्याचें काम कंत्राट पद्धतीनें देत असे. सर सालारजंग यांनी निराळें पोस्ट खातें निर्माण करून तें स्वतंत्र करून घेतलें. निजाम सरकारचे स्वतंत्र तारखातें नसे. ब्रिटिश सरकारच्या तार खात्यानें जिल्ह्यांच्या कांहीं मुख्य ठिकाणीं तार ऑफिसें अुघडलीं होतीं.

## पोलीस :–

सर सालारजंग दिवाण होण्यापूर्वीं राज्यामध्यें पोलिस खातें नव्हतें. रेव्हिन्यू अधिकारी आपल्या सोयीप्रमाणें व जरूरीप्रमाणें कमीजास्त शिपाअी नोकरीला ठेवीत असत. १८६६ मध्यें प्रथम पोलिस खातें सुरू झालें. त्याचें नियंत्रण रेव्हिन्यू अधिकारी करीत. पण ही पद्धत असमाधानकारक वाटल्यानें १८८४ मध्यें अिन्स्पेक्टर जनरल ऑफ डिस्ट्रीक्ट पोलिस या नांवाचा स्वतंत्र अधिकारी नेमून त्याकडे या खात्याची व्यवस्था सोपवली होती. राज्याच्या रक्षणासाठीं स्वतंत्र फौज होती. या फौजेचे चार विभाग होते. १ रेग्युलर ट्रूप्स, २ अिंपीरीयल सर्व्हिस ट्रूप्स, ३ गोवळकोंडा ब्रिगेड, ४ अिरेग्युलर ट्रुप्स, असे भाग असत.

## टांकसाळ :–

हैद्राबाद राज्यामध्यें सर सालारजंग यांनीं टांकसाळ सुरू केली. त्यावेळीं जुन्या पद्धतीप्रमाणें हातांनींच नाणीं पाडलीं जात असत. पूर्वीं व्यापारी व अमीर-अुमराव चांदी आणून देत व कांहीं थोडी फी देऊन नाणीं पाडून नेत. नाण्यावर चार मिनार या अिमारतीचा शिक्का व निजामाचें नांव असे; त्याला अुस्मानिया शिक्का किंवा हाली शिक्का म्हणत; अर्धा आणा, दोन पै, अेक पै, अशीं तांब्यांचीं नाणीं

असत. अेक आण्याचें निकलचेंहि नाणें असे. चांदीची अधेली, पावली, चवली अशींहि नाणीं असत. कागदी नोटांचें चलन १९१८ पासून चालू झालें.

## धर्मखातें :–

या खात्याचा अधिकार हिंदूंची देवालयें, धार्मिक संस्था, त्यांना देणग्या, मुसलमानांच्या मशिदी आदींवर चालत असे. अर्थातच या खात्याचा अधिकारी मुसलमानाखेरीज दुसरा कोण असूं शकणार आहे ? या खात्यांत बहुतेक सर्व मुसलमान अधिकारी असत. शेंकडा ९० टक्के प्रजा हिंदुधर्मीय असूनहि त्याच्या धर्मासंबंधीं अेक मुख्य अधिकारी हिंदु नसल्यामुळें त्यांची बाजू सरकारांत मांडणारे व योग्य सल्ला देणारे असे कोणीच नव्हते. त्यामुळें हिंदूंवर धार्मिक बाबतींत अन्याय होत असे व अनेक भानगडी व तंटे अुपस्थित होत.

सर उस्मान अलीखान (आजचे निजाम) यांनीं १९३९ सालीं नवीन सुधारणा जाहीर केल्या. त्यांत कायदे मंडळाचा विस्तार, ग्रामपंचायतींची स्थापना, जिल्हा परिषद, हिंदु मुसलमानांना समान प्रतिनिधित्व आदि गोष्टी महत्वाच्या होत्या. मुसलमानांची संख्या केवळ १० टक्के असतांहि समान प्रतिनिधित्व देणें ही मुस्लीम धर्मांधर्मतेची खूण नव्हे कां ? दुसऱ्या महायु[illegible] नजामांनीं आपले मुंबई व दिल्ली येथील राजवाडे ब्रिटिश सरकारला दिले. शिवाय खासगींतून १६ लाख, संस्थानचे ५२ लाख देणगी म्हणून, तसेच ५०।। कोटि रुपये बाँडच्या खरेदीरूपानें दिले. यांचा युद्धकालीन युद्धखर्च ५।। कोटीपर्यंत चढला. शिवाय निजामाचे सैन्याचे दोन युनिटस् युद्धाच्या आघाडीवर लढले. युद्धकालांत त्यानें आपले कारखाने रात्रंदिवस चालवून मालाचा पुरवठा केला व आपली "फेथफुल अलाय ऑफदि ब्रिटिश गव्हर्मेंट" ही पदवी सार्थ केली. १९३९ च्या नवीन सुधारणेनुसार या निजामांनीं ९ जणांचे नवें कार्यकारी मंडळ बनविलें. या मंडळाकडे पुढील खातीं होतीं. १) राजकारण, राज्यघटना, रेल्वे. २) कायदा व सुधारणा. ३) पी. डब्ल्यू. डी., व्यापार व कारखाने. ४) पोस्ट व मजूर. ५) अर्थ. ६) शिक्षण. ७) महसूल व पोलिस. ८) वैद्यक व आरोग्य हीं प्रमुख खातीं होतीं. आजचे निजाम राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालीत व सरकारी आवश्यक कागदपत्रांवर उर्दुंत स्वतः हस्ताक्षरांत हुकूम देत.

**मराठवाड्याची प्रतिक्रिया :–** सारांश लोकांच्या भावना, भाषा, संख्या वगैरेकडे लक्ष न देतां कारभार हांकला जात असे. नोकरवर्गांत मुसलमानांची प्रमाणाबाहेर भरती करण्यांत येत असे. त्यांतहि बाहेरच्या मुसलमानांचें प्रमाण अधिक असे. भाषा व धर्म याबाबतहि अन्याय होई. आजच्या निजामाचा वडिलांकडून पहिला खलिफा व महंमद पैगंबर यांच्याबरोबर संबंध पोहचत असल्याचा

उल्लेख मापूर्वीच आला आहे मधल्या काळांतहि अनेक धार्मिक व शूर पुरुष यांच्या घराण्यांत झाले आहेत. त्यामुळें निजामांच्या घराण्याला आंतरराष्ट्रीय धार्मिक महत्व आहे. हें महत्व तुर्कस्थानांतील खलीफाच्या मुलीशीं आपल्या युवराजाचें लग्न करून घेऊन निजामांनीं पुन्हा वाढविलें आहे. आजच्या निजामांना उर्दू भाषेंत कविता करण्याचा नाद असून त्या कवितांचा एक संग्रह प्रसिद्ध झाला आहे. यांना अनेक महत्वाच्या पदव्या असल्या तरी "सुलतानुन्शुरा" (कवींद्र) ही वाङ्मयात्मक कार्याबद्दल मिळालेली पदवी त्यांना विशेष प्रिय आहे. निजाम हे जगांतील पहिल्या प्रतीचे श्रीमान् गृहस्थ होत. यांच्या संग्रहीं असणाऱ्या जड-जवाहिरांची किंमत अंदाजें ३० कोटि पौंड आहे. त्याखेरीज यांच्याजवळ सोन्याचा फार मोठा संग्रहहि आहे. दीडशें माणसांची भोजनाची व्यवस्था हे एकावेळीं सुवर्णपात्रांतून करूं शकतात असा या निजामांचा लौकीक आहे.

या कारभारामुळें मराठवाड्याच्या समाजजीवनावर आणि शासन-यंत्रणेवर भिन्न परिणाम झाले. पहिली गोष्ट अशी कीं, मराठवाड्याची जनता ही मुसलमानी राजकर्त्यांशीं कधींहि समरस होऊं शकली नाहीं. कारण मराठवाड्यांतील जनतेनें अधूमधून कां होईना स्वातंत्र्याची गोडी चाखली होती आणि दुसरें असें कीं, मराठी सिंहासन बुडविणाऱ्या अिंग्रज राजसत्तेनें आपली सत्ता निरंकुश रहावी म्हणून जबरदस्तीनें आपल्यावर निजामी राजवट लादली, ही चीड मराठवाड्यांतील जनतेच्या अंतःकरणांत धुमसत होती. त्यामुळें प्रथम निजामी राजवट व नंतर ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्याचे कट मराठवाड्यांमध्यें प्रत्यहि शिजत होते. निरनिराळ्या आंदोलनांच्या वावटळी नेहमीं उठत. त्या वावटळी निजामी सैतानी दंडुकेशाहीमुळे विरून जात असल्या तरी मराठवाड्याचें समाजजीवन असंतोषानें खदखदत होतें. याचा स्वाभाविक परिणाम शासकांवर असा झाला कीं, त्यांनीं मराठवाड्यांतील जनतेची स्वातंत्र्याकांक्षा चिरडून टाकण्यासाठीं दडपशाहीचे उग्र मार्ग अवलंबिले आणि हैद्राबाद राज्याच्या अितर भागांना ज्या सवलती विनासायासानें मिळत होत्या, त्या देखील मराठवाड्याला मिळू न देण्याचा चंग त्यांनीं बांधला. हा भाग निजामद्रोही-राजद्रोही आहे याची पक्की रेशमी गांठ निजामी शासकांनीं आपल्या मनांशीं बांधून ठेवली होती. संधी मिळतांच मराठवाड्यावरीलच काय पण सबंध हैद्राबाद राज्यावरील निजामी राजवट उखडून टाकण्यास मराठवाड्यांतील जनता कमी करणार नाहीं, हें देखील शासकांनीं पुरेपूर ओळखलें होतें. त्यामुळें जास्तींत जास्त जाचाखालीं, अन्यायाखालीं, दडपशाहीखालीं मराठवाड्यांतील जनतेला भरडून काढण्यांत आले. तिच्या सुखसोयींचीच नव्हे तर गरजेच्या गोष्टींची, दैनंदिन सवलतींची देखील निजामी राजवटीनें उपेक्षा केली. शक्य होईल तेव्हां दंडुकेशाहीचा प्रयोग करून मराठवाड्यांतील जन-आंदोलनाचा कणाच मोडून टाकण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

# स्वातंत्र्य-संग्राम

## रझाकार राजवट

ब्रिटिशांच्या गुलामगिरींतून १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. पाकिस्तानचा नवा प्रदेश भारताच्या नकाशावर दिसूं लागला. एक अिस्लामी राष्ट्र नव्यानें निर्माण झालें याचा निजामी राजवटीला अत्यानंद झाला व आपणहि स्वतंत्र आहोंत आम्हालाहि स्वतंत्र राष्ट्राचे हक्क प्राप्त झालेले आहेत, अशा वल्गना निजामी राजवटीमध्यें सुरू झाल्या व भारत सरकारशी निजामी सरकार बेपर्वाअीनें वागूं लागलें. भारत सरकार आमच्या राज्यावर दडपण आणते असा खोटा प्रचार निजामानें जगभर चालविला. "युनोमध्यें आम्ही आमच्या स्वतंत्र राज्याची बाजू मांडूं व भारतानें केलेला अन्याय जगाच्या वेशीवर टांगूं," असा प्रचार मोठमोठ्यानें होऊं लागला. ब्रिटिश राजसत्ता हिंदी संस्थानिकांचा प्रश्न अर्धवट टांगता ठेवून निघून गेली होती. संस्थानिकांना आपलें "सार्वभौमत्वाचे" चाळे करण्यास हीच वेळ अनुकूल होती. स्वतंत्र भारताच्या घराला हिंदी संस्थानांचीं खिडारें पडलीं होतीं. हीं खिडारें नाहींशीं करून देशांतील प्रतिगामी शक्तींशीं मुकाबला करण्याचें महत्वाचें काम स्वतंत्र भारताच्या सरकारपुढे होते. अशावेळीं संस्थानिकांनीं उठाव करावा यांत विशेष नाहीं. यामुळें हैद्राबादच्या निजामानें 'दक्षिणेंतील पाकिस्तान' म्हणून स्वतंत्र राष्ट्र असल्याची हाकाटी याक्षणीं सुरू करावी यांत नवल तें काय?

मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांना फक्त प्राथमिक शिक्षणच मातृभाषेंतून मिळत असे. ५ व्या वर्गापासून विद्यापीठापर्यंत उर्दू ही माध्यम भाषा होती. नागरिक स्वातंत्र्याचे साधे हक्कहि निजामी राजवटीनें नाकारले होते. त्यामुळें मराठवाड्यांतील लोकानेत्यांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सभा-संमेलनेंमुद्धां हैद्राबाद राज्याच्या बाहेर जाऊन भरवावीं लागत. बऱ्याच वेळां धार्मिक कार्यक्रमाच्या नांवाखालीं राजकीय कार्यक्रम पार पाडावे लागत.

## स्टेट कॉंग्रेसचें युद्धपर्व

देशांतील अितर संस्थानांमध्यें ज्याप्रमाणें राजकीय जागृति होऊन संस्थानी प्रजा, परिषदा, संस्थानी कॉंग्रेस आदि राजकीय संस्था जनजागृतीचें काम अ. भा. कॉंग्रेसच्या मार्गदर्शनावरून करीत होत्या. याच धोरणानें स्टेट कॉंग्रेसची स्थापना हैद्राबाद संस्थांनामध्यें करण्यांत आली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा

पहिला मान परभणी जिल्ह्यांतील राष्ट्रीय विचारसरणीचे एक वकील श्री. गोविंदराव नानल यांना लाभला. (अ. भा. काँग्रेसचें हैद्राबाद अधिवेशन १९५२–५३ मध्यें नानल नगरामध्यें झालें.) पण निजामी सत्तेनें स्टेट काँग्रेसवर लगेच बंदी घातली. स्टेट काँग्रेसनें १९३८ मध्यें सत्याग्रह पुकारला होता. स्टेट काँग्रेसवर बंदी असल्या-मुळें मराठवाड्यांत महाराष्ट्र परिषद या संस्थेमध्यें काम करून मराठवाड्यांतील राजकीय पुढारी जनजागृति करीत होते. महाराष्ट्र परिषदेचे शेवटचें अधिवेशन परभणी जिल्ह्यांतील परतूड या गांवीं झालें. या अधिवेशनामध्येंच स्टेट काँग्रेस-वरील बंदी उठविण्याचा निर्वाणीचा खलिता महाराष्ट्र परिषदेनें निजामी राजवटीला दिला. यानंतर लौकरच स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविली गेली.

## ‘स्वतंत्र हैद्राबाद’ कल्पनेस तडा

१९४६ सालीं क्रिप्स कमिशन भारतांत आलें होतें. त्यावेळेपासून निजा-मास ‘स्वतंत्र हैद्राबाद’ चीं स्वप्नें पडूं लागलीं. मराठवाड्यातील महाराष्ट्र परिषदेनें क्रिप्स कमिशनकडे एक निवेदन पाठविलें व त्या निवेदनांत “हिंदुस्थान स्वतंत्र होतांना हैद्राबाद संस्थानचे तीन तुकडे करून ते लगतच्या भाषिक प्रदेशांत सामील करावेत,” अशी स्पष्ट मागणी केली व निजामाच्या शेख महंमदी स्वप्नांस मराठवाड्यानें तडा दिला. आणि यावेळेपासून मराठवाडा महाराष्ट्रास जोडावा अशी निकडीची मागणी होऊं लागली.

## स्टेट काँग्रेसचा लढा

१५ ऑगस्ट ४७ ला भारत–पाकिस्तानची निर्मिती होणार असल्याची घोषणा झाली. संस्थानें वाटल्यास स्वतंत्र राहूं शकतात किंवा भौगोलिक सलगतेच्या दृष्टीनें भारत किंवा पाकिस्तान यामध्यें सामील होऊं शकतात, असेंहि सांगण्यांत आलें. बऱ्याच संस्थानिकांनीं संघराज्याच्या सामीलनाम्यावर सही करून भारतीय संघराज्यावरील निष्ठा व्यक्त केली. पण निजामानें सामीलनाम्यावर सही नाकारली. यावेळीं स्टेट काँग्रेसनें निजामास धोक्याचा एक अिषारा देऊन ठेवला होता. ‘अितर संस्थानिकांप्रमाणें आपण सामीलनाम्यावर सही करावी व जनतेस जबाबदार राज्यपद्धतीचे हक्क देण्याचें घोषित करावें. ही घोषणा १५ ऑगस्ट ४७ पूर्वीच करावी. तसें न झाल्यास ७ ऑगस्ट ४७ पासून निजामी सत्तेविरुद्ध लढा पुकारला जाईल, असें स्टेट काँग्रेसनें एका ठरावाद्वारें निजामास कळविलें. त्या-उलट निजामानें एका फर्मानाद्वारें जाहीर केलें होतें कीं, १५ ऑगस्ट ४७ पासून जर कोणी हैद्राबाद राज्यांत दुसऱ्या राष्ट्राचा ध्वज फडकावील (असफजाही–ध्वजाशिवाय) तर त्याला सक्त मजुरी व दंडाची शिक्षा फर्माविण्यांत येईल. निजाम

# स्वातंत्र्य-संग्राम

## रझाकार राजवट

ब्रिटिशांच्या गुलामगिरींतून १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. पाकिस्तानचा नवा प्रदेश भारताच्या नकाशावर दिसूं लागला. एक अिस्लामी राष्ट्र नव्यानें निर्माण झालें याचा निजामी राजवटीला अत्यानंद झाला व आपणहि स्वतंत्र आहोंत आम्हालाहि स्वतंत्र राष्ट्राचे हक्क प्राप्त झालेले आहेत, अशा वल्गना निजामी राजवटीमध्यें सुरू झाल्या व भारत सरकारशी निजामी सरकार बेपर्वाअीनें वागूं लागलें. भारत सरकार आमच्या राज्यावर दडपण आणते असा खोटा प्रचार निजामानें जगभर चालविला. "युनोमध्यें आम्ही आमच्या स्वतंत्र राज्याची बाजू मांडूं व भारतानें केलेला अन्याय जगाच्या वेशीवर टांगूं," असा प्रचार मोठमोठ्यानें होऊं लागला. ब्रिटिश राजसत्ता हिंदी संस्थानिकांचा प्रश्न अर्धवट टांगता ठेवून निघून गेली होती. संस्थानिकांना आपलें "सार्वभौमत्वाचे" चाळे करण्यास हीच वेळ अनुकूल होती. स्वतंत्र भारताच्या घराला हिंदी संस्थानांचीं खिंडारें पडलीं होतीं. हीं खिंडारें नाहींशीं करून देशांतील प्रतिगामी शक्तींशीं मुकाबला करण्याचें महत्वाचें काम स्वतंत्र भारताच्या सरकारपुढे होते. अशावेळीं संस्थानिकांनीं उठाव करावा यांत विशेष नाहीं. यामुळें हैद्राबादच्या निजामानें 'दक्षिणेंतील पाकिस्तान' म्हणून स्वतंत्र राष्ट्र असल्याची हाकाटी याक्षणीं सुरू करावी यांत नवल तें काय ?

मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांना फक्त प्राथमिक शिक्षणच मातृभाषेंतून मिळत असे. ५ व्या वर्गापासून विद्यापीठापर्यंत उर्दू ही माध्यम भाषा होती. नागरिक स्वातंत्र्याचे साधे हक्कहि निजामी राजवटीनें नाकारले होते. त्यामुळें मराठवाड्यांतील लोकानेत्यांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सभा-संमेलनेंमुद्धां हैद्राबाद राज्याच्या बाहेर जाऊन भरवावीं लागत. बऱ्याच वेळां धार्मिक कार्यक्रमाच्या नांवाखालीं राजकीय कार्यक्रम पार पाडावे लागत.

## स्टेट कॉंग्रेसचें युद्धपर्व

देशांतील अितर संस्थानांमध्यें ज्याप्रमाणें राजकीय जागृति होऊन संस्थानी प्रजा, परिषदा, संस्थानी कॉंग्रेस आदि राजकीय संस्था जनजागृतीचें काम अ. भा. कॉंग्रेसच्या मार्गदर्शनावरून करीत होत्या. याच धोरणानें स्टेट कॉंग्रेसची स्थापना हैद्राबाद संस्थानामध्यें करण्यांत आली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा

पहिला मान परभणी जिल्ह्यांतील राष्ट्रीय विचारसरणीचे एक वकील श्री. गोविंदराव नानल यांना लाभला. (अ. भा. कॉंग्रेसनें हैद्राबाद अधिवेशन १९५२–५३ मध्यें नानल नगरामध्यें झालें.) पण निजामी सत्तेनें स्टेट कॉंग्रेसवर लगेच बंदी घातली. स्टेट कॉंग्रेसनें १९३८ मध्यें सत्याग्रह पुकारला होता. स्टेट कॉंग्रेसवर बंदी असल्यामुळें मराठवाड्यांत महाराष्ट्र परिषद या संस्थेमध्यें काम करून मराठवाड्यांतील राजकीय पुढारी जनजागृति करीत होते. महाराष्ट्र परिषदेचे शेवटचें अधिवेशन परभणी जिल्ह्यातील परतूड या गांवीं झालें. या अधिवेशनामध्येंच स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्याचा निर्वाणीचा खलिता महाराष्ट्र परिषदेनें निजामी राजवटीला दिला. यानंतर लौकरच स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविली गेली.

## ‘स्वतंत्र हैद्राबाद’ कल्पनेस तडा

१९४६ सालीं क्रिप्स कमिशन भारतांत आलें होतें. त्यावेळेपासून निजामास ‘स्वतंत्र हैद्राबाद’ चीं स्वप्नें पडूं लागलीं. मराठवाड्यांतील महाराष्ट्र परिषदेनें क्रिप्स कमिशनकडे एक निवेदन पाठविलें व त्या निवेदनांत “हिंदुस्थान स्वतंत्र होतांना हैद्राबाद संस्थानचे तीन तुकडे करून ते लगतच्या भाषिक प्रदेशांत सामील करावेत,” अशी स्पष्ट मागणी केली व निजामाच्या शेख महंमदी स्वप्नांस मराठवाड्यानें तडा दिला. आणि यावेळेपासून मराठवाडा महाराष्ट्रास जोडावा अशी निकडीची मागणी होऊं लागली.

## स्टेट कॉंग्रेसचा लढा

१५ ऑगस्ट ४७ ला भारत–पाकिस्तानची निर्मिती होणार असल्याची घोषणा झाली. संस्थानें वाटल्यास स्वतंत्र राहूं शकतात किंवा भौगोलिक सलगतेच्या दृष्टीनें भारत किंवा पाकिस्तान यामध्यें सामील होऊं शकतात, असेंहि सांगण्यांत आलें. बऱ्याच संस्थानिकांनीं संघराज्याच्या सामीलनाम्यावर सही करून भारतीय संघराज्यावरील निष्ठा व्यक्त केली. पण निजामानें सामीलनाम्यावर सही नाकारली. यावेळीं स्टेट कॉंग्रेसनें निजामास धोक्याचा एक अिषारा देऊन ठेवला होता. ‘अितर संस्थानिकांप्रमाणें आपण सामीलनाम्यावर सही करावी व जनतेस जबाबदार राज्यपद्धतीचे हक्क देण्याचें घोषित करावें. ही घोषणा १५ ऑगस्ट ४७ पूर्वींच करावी. तसें न झाल्यास ७ ऑगस्ट ४७ पासून निजामी सत्तेविरुद्ध लढा पुकारला जाईल, असें स्टेट कॉंग्रेसनें एका ठरावाद्वारें निजामास कळविलें. त्याउलट निजामानें एका फर्मानाद्वारें जाहीर केलें होतें कीं, १५ ऑगस्ट ४७ पासून जर कोणी हैद्राबाद राज्यांत दुसऱ्या राष्ट्राचा ध्वज फडकावील (असफजाही–ध्वजाशिवाय) तर त्याला सक्त मजुरी व दंडाची शिक्षा फर्माविण्यांत येईल. निजाम

वठणीवर येत नाहीं हें पाहून स्टेट कांग्रेसने ७ ऑगस्ट ४७ पासून लढा सुरू केला. १५ ऑगस्ट ४७ पासून लढ्यास विशेष जोर चढला. निजामी सत्तेनें जुलूम व अत्याचार यांचा कळस केला. या आंदोलनामध्यें १२ हजार लोकांना निजामानें तुरुंगांत डांबले. १५ हजार विद्यार्थ्यांनीं शाळा, कॉलेजें सोडलीं. ६०० वकीलांनीं कोर्ट–कचेऱ्यांवर बहिष्कार घातला. २ हजार स्त्रियांनीं व व्यापाऱ्यांनीं हरताळ केला. ३ हजार खेड्यांतील पाटील–पटवाऱ्यांनीं राजीनामे दिले. २३ लक्ष शिंदीचीं झाडें तोडलीं. २ हजार रझाकार मारले गेले. स्टेट कांग्रेसच्या ६० कार्यकर्त्यांनीं हौतात्म्य पत्करलें. पैकीं २२ हुतात्मे मराठवाड्यांतीलच होते. हैद्राबादच्या लढ्यामध्यें मराठवाड्याचा फार मोठ्या प्रमाणांत भाग होता.

यावेळीं भारत सरकारशीं निजामी राजवटीनें चढाईखोरीचें धोरण स्वीकारलें. हैद्राबादमध्यें कासीम रझवी यांच्या नेतृत्वाखालीं मुसलमानांची संघटना निर्माण झाली. ही संघटना 'रझाकार' संघटना म्हणून प्रसिद्ध आहे. या संघटनेनें हिंदुप्रजेवर जुलूम, अत्याचार करण्यास सुरवात केली. हिंदूंच्या मालमत्तेची लुटालूट, जाळपोळ, कत्तल, खून, स्त्रियांची विटंबना आदि प्रकार या संघटनेनें सुरू केले. सरकारदरबारीं या कृत्याबद्दल दाद लागेनाशी झाली. तथाकथित स्वातंत्र्य–प्राप्तीसाठीं सरकार व मुसलमानी संस्था यांची सुक्तासुक्त कारस्थानें सुरू झालीं. हैद्राबाद राज्यांतील हिंदु प्रजेचें जीवित व मालमत्ता धोक्यांत आली. भारत सरकारनें याबाबत अनेक वेळां इशारे दिले. यावेळीं भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल हे होते. भारत सरकारच्या इशाऱ्यांचा निजामावर कांहींच परिणाम झाला नाहीं. शेवटीं नाइलाजानें सप्टेंबर १९४८ मध्यें चोहोंकडून हैद्राबाद संस्थान लष्करानें वेढून भारत सरकारनें निजामास शरण आणले; राज्यकारभार आपल्या ताब्यांत घेतला; सुव्यवस्था व शांतता स्थापन केली. यावेळीं लष्करी प्रशासक म्हणून श्री. जे. एन्. चौधरी यांनीं धडाडीनें काम केलें. नंतर २ वर्षांनीं लोकनियुक्त प्रतिनिधीच्या सल्ल्यानें कारभार करावा व पुढील धोरण ठरवावें, या अटींवर भारत सरकारनें आपला लष्करी अंमल हैद्राबादवरून काढून घेतला. मराठवाड्यास पुन्हा स्वातंत्र्याची हवा मिळू लागली. पण अद्याप लोकशाहीची गोडी मराठवाड्यास चाखावयास मिळाली नव्हती. निजामी राजवटीची गुर्मी अखेर भारत सरकारनें उतरविली. जुन्या सरंजामदारीचा अरा शेवट झाला.

पोलिस कारवाई नंतर हैद्राबाद स्टेट कांग्रेसचें निजामबाद येथें झालेलें अधिवेशन फार गाजलें. कारण त्या अधिवेशनामध्यें हैद्राबाद राज्य–विभागणीचा ठराव पास करण्यांत आला. या ठरावाचे द्वारें मराठवाड्याचें मराठी भाषिक प्रदेशामध्यें विलीनकरण होण्याची नेटाची मागणी केली होती. पोलिस कारवाई नंतर लष्करी

राजवट आणि नंतर मुलकी राजवट आणि हैद्राबाद विभाजन अशीं राजकीय स्थित्यंतरें घडून आलीं.

आंध्र राज्य निर्मितीनंतर भाषावार प्रांतरचनेच्या मागणीस जोर चढला. १९५३-सालीं राज्य पुनर्रचना मंडळानें देशव्यापी दौरा काढला. मराठवाड्यांतहि तो दौरा झाला. पक्षोपक्षांचे तात्त्विक मतभेद असूनहि मराठवाडा मुंबई राज्यांतील भाषिक प्रदेशांशीं जोडावा अशी एकमुखी मागणी करण्यांत आली. रा. पु. मंडळानेंहि या एकमुखी मागणीची प्रशंसा केली व तसा निर्णय दिला. अहवालाच्या ४२९ कलमामध्यें म्हटलें आहे, "हैद्राबादच्या बाबतींत आमच्या सूचनेनुसार मराठवाड्याचे मुंबई राज्यांत विलीनीकरण करणें आवश्यक आहे. आम्ही या भागाचा उत्तरेचा कांहीं भाग विदर्भाला जोडण्याच्या इष्टानिष्टतेचा शक्यतों विचार केला. पण लोकमत मुंबई राज्याशीं संलग्न होणाच्या बाजूवें प्रभावी आहे. आणि शिवाय अशा विलीनीकरणास अतिरेकी शासनविषयक अथवा आर्थिक असा कोणताहि विरोध नाहीं. या बाबतींत लोकांच्या इच्छेला मान देण्यांत येऊं नये, असें कोणतेंहि कारण दिसूं शकत नाहीं."

अशाप्रकारें मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यांतील महाराष्ट्रांत आला व मराठ्यांचा १७६५ मध्यें हुकलेला योग १ नोव्हेंबर १९५६ रोजीं द्विभाषिक राज्यांत कां होईना पण जुळून आला.

द्विभाषिकाविरुद्ध महाराष्ट्रानें प्रचंड आंदोलन उभारलें व भाषिक तत्त्वावर महाराष्ट्र राज्याची स्थापना व्हावी अशी मागणी केली. प्रचंड आंदोलनानंतर १ मे १९६० रोजीं मराठवाडा–विदर्भ– पश्चिम महाराष्ट्र यांचे एक घटक राज्य अस्तित्वांत आलें.

श्रीशिवरायांनीं मराठी राज्याची स्थापना केली. थोरल्या बाजीरावांनीं मराठेशाहीवर कळस चढविला. राघोबानीं भीमथडीच्या तटांना सिंधूचें पाणी पाजलें, दिल्लीपतीचा कारभार काहीं काल आपल्या हातीं ठेवला. परंतु यापूर्वी सर्व मराठी भाषिक एका स्वतंत्र राज्यांत एकवटलें नव्हतें, तो ऐतिहासिक प्रसंग १ मे ६० ला झाला, नि मराठी राज्य निर्माण झालें.

मराठवाड्यांत सर्वाधिक खप असलेलें
एकमेव मराठी साप्ताहिक

रचना

औरंगाबाद
(फोन नं. १८०)

– मराठवाड्यांतील ठिकठिकाणचीं अधिकृत वृत्तें व घडामोडी.
– मुंबई सरकारनें जाहिरातीसाठीं मान्यता दिलेलें
– जाहिरातीचें उत्कृष्ट माध्यम.

संपादक :– पां. रा. गणोरकर

जाहिरातीचे दर, वर्गणी, नोटीस प्रसिद्ध करणें, एजन्सी अित्यादिसाठीं लिहा –
व्यवस्थापक, 'रचना साप्ताहिक'
गुलमंडी, औरंगाबाद.

AJANTA & ELLORA VIEWS

Now available in actual photographs
of 2 brownie size best selected
over 200 varieties. Loose
in albums & in packets
always in stock !

PARIKH PHOTO STUDIO
Photo goods dealers
191, Aurangpura, AURANGABAD.
Enquire at all hotels when you reside at
AURANGABAD

२५ वर्षांचे अनुभविक, मराठवाड्यांतील
रबरी शिक्क्यांचे सर्वांत मोठे कारखानदार.

आर. के. पारीख अँड कंपनी
औरंगपुरा, औरंगाबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ............ वि. ............
क्रमांक ............ नों. दि. ............

# मराठवाड्याचा

# भूगोल

# मराठवाड्याचा भूगोल

मराठवाडा असा ज्याचा निर्देश केला जातो, तो भू–भाग आंध्र राज्याच्या वायव्येस व मुख्य महाराष्ट्राच्या नैर्ऋत्येस आहे. उत्तर अक्षांश १५°×४०′ ते २०°×४०′ आणि पूर्व रेखांश ७०°×४०′ ते ८१°×१५′ मराठवाडा विस्तारलेला आहे. मराठवाड्याचें क्षेत्रफळ २४,८२९,८ चौरस मैल आहे. एकूण लोकसंख्या ५१,७६,१९४ आहे. या लोकसंख्येचें प्रत्येक चौरस मैलास २०८ असें प्रमाण आहे. मराठवाडा विभागांत औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, हे पांच संपूर्ण जिल्हे व बिदर जिल्ह्यांतील अहमदपूर, उदगीर, मिलंगा या तहसिलांचा समावेश होतो.

भू–प्रकृति :– भूस्तरशास्त्राच्या दृष्टीनें हा भाग तृतीय युगापासून बनलेला एकजिनसी कृष्णप्रस्तर (ट्रॅप) आहे. या डेक्कन ट्रॅपची जाडी कांहीं ठिकाणीं ४ हजार फुट आहे. कांहीं भाग गोदावरी आणि अितर नद्यांच्या पुलिनमय थरांनीं बनलेला आहे. या भागांना उत्क्रांत तृतीय युगीन (पोस्ट टर्शिअरी,) असें म्हणतात. बिदरकडील भाग सोडल्यास हा सारा भाग काथ व कालवधरी या कृष्ण पापाणांनीं बनलेला आहे.

डोंगर :– मराठवाड्याचें दक्षिण पठार समुद्र सपाटीपासून सरासरीनें १२५० फूट उंच आहे. क्वचित ही उंची ३५०० फुटांपर्यंतहि आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे असा या पठाराचा उतार आहे. पर्वतांच्या रांगा मुख्यत: सह्याद्रीशीं संबद्ध आहेत. मराठवाडा व तेलंगण यांना विभागणारा बालाघाटचा डोंगर आहे. बालाघाटची रांग नांदेड जिल्ह्याच्या पूर्वेकडून पश्चिमेस, परभणी जिल्ह्यांतून वायव्येस बीड जिल्ह्यांत जाते. बालाघाटची लांबी सुमारें २०० मैल आणि रुंदी ४।। मैल आहे. निर्मळकडून परभणी जिल्ह्यांतून वऱ्हाडकडे वळून पुन्हा अजिंठ्याकडे येणारी एक रांग पश्चिम घाटाला मिळते.

नद्या :– गोदावरी, मांजरा व पूर्णा या मराठवाड्यांतील प्रमुख नद्या. गोदावरी हिचा अुत्तरेंतील गंगेशीं संबंध आहे, असें मानून हिला गंगा असेंच संबोधण्यांत येतें. गोदा नदीचा मराठवाड्यांत प्रवेश पुणतांब्यापाशीं होतो. एका टोकास टोकें, आणि दुसऱ्या टोकांवर मराठवाड्यांतील कायगांव आहे. दंडकारण्यांत श्रीरामप्रभू राहात होते, म्हणून या नदीला पावित्र्य आलें आहे. नांदेडपाशीं नदीची नाभी मानून सिंहस्थांत दक्षिणेंतील लोक गंगा–प्रदक्षिणा घालतात. नांदेडवरून नदीच्या एका भागानें निघून त्र्यंबकेश्वरावरून दुसऱ्या भागावरून पुन्हा नांदेडला येतात. पूर्णा नदी औरंगाबाद जिल्ह्यांतील कन्नड तालुक्यांत उगम पावते व दुधना नदीशीं संगम पावून

१४५ मैलांच्या प्रवासानंतर गोदेला मिळते. मांजरा नदी बीड जिल्ह्यांतील पाटोदे गांवीं उगम पावून वळणावळणानें ३८७ मैलांच्या प्रवासानें गोदेला मिळते. मराठवाड्याचें सारें सांस्कृतिक जीवन गोदावरीच्या खोऱ्यांतून विकास पावलेलें आहे.

हवामान :— खनिज पदार्थांच्या दृष्टीनें मराठवाड्याला विशेष असें महत्व नाहीं. मराठवाड्यांतील पावसाचें वार्षिक सरासरी मान ३४–९९ इंच आहे. तीन चतुर्थांश पाऊस जून ते सप्टेंबरपर्यंत पडतो. हवामान किंचित् उष्ण व कोरडें असतें.

## अितर माहिती

मराठवाड्यांतील तालुक्यांची संख्या ४६ असून महसूल विभागांची आणि महसूल खेड्यांची आणि शहरांची संख्या ७,५०० आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेली पहिल्या दर्जाचीं शहरें मराठवाड्यांत नाहींत. ५० हजारांहून अधिक लोकसंख्येचीं दुसऱ्या दर्जाचीं ३ शहरें मराठवाड्यांत आहेत.

मराठी भाषिकांची संख्या ७८·९ टक्के, तेलगू भाषिक ३·४ टक्के, कन्नड भाषिक १·७ टक्के आणि अन्य भाषिक ४·५ टक्के अशी लोकसंख्येची टक्केवारी आहे.

शेतीवर जवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ७७·९ टक्के आहे. व बिगर-शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांची संख्या १२·२ टक्के आहे.

मराठवाड्यांतील जमिनीच्या ३·६ टक्के भाग जंगलाखाली आहे व प्रत्यक्ष पेरणीखालीं ७२·६ टक्के जमीन आहे. ओसाड व बिनलागवडीची जमीन १·३ टक्के आहे, बिगर शेतीसाठीं उपयोगांत आणलेली जमीन २७ टक्के आहे. लागवडी-योग्य पडीत जमीन १·३ टक्के आहे. बाकीची जमीन ओसाड व पडीत आहे. व ती अवांतर झाडांनीं, पिकांनीं, वा उद्यानांनीं आच्छादलेली आहे.

# औरंगाबाद जिल्हा

या जिल्ह्याच्या उत्तरेस खानदेश, पूर्वेस विदर्भ व व परभणी जिल्हा, दक्षिणेस बीड जिल्हा व पश्चिमेस नाशिक जिल्हा आहे. या जिल्ह्याचा उत्तर भाग डोंगराळ आहे. पण दक्षिण भागांत डोंगर क्वचित असल्यामुळें तो सपाट आहे. उत्तर भागांत सह्याद्रीचे डोंगर पसरलेले आहेत. येथें याला अजिंठ्याचे डोंगर, चौक्याचे डोंगर, जालन्याचे डोंगर हीं नांवें दिलीं आहेत. जिल्ह्याची मुख्य नदी गोदावरी ही आहे. ही नदी या जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवरून वाहते. पूर्णा व दुधना या नद्या अजिंठ्याच्या डोंगरांत उगम पावून या जिल्ह्यांतून वाहात जातात. त्या पुढें गोदावरीस मिळतात. केळणा, गिरजा, शिवना, वीरभद्रा ह्या नद्याहि गोदावरीस मिळतात. दक्षिण भाग सुपीक असल्यानें शेतीचें उत्पन्न चांगलें आहे. या जिल्ह्यामध्यें

बहुतेक सर्व प्रकारचें पीक घेतलें जातें. परंतु कन्नड व खुलताबाद हे तालुके गव्हाच्या पिकांसाठीं प्रसिद्ध आहेत.

या जिल्ह्याच्या मध्यभागांतून मनमाड ते हैद्राबाद जाणारी अरुंद रेल्वे लाईन आहे. तीवर जालना, औरंगाबाद, दौलताबाद, वेरूळ, रोटेगांव, हीं मोठीं स्टेशनें आहेत. औरंगाबादेहून निरनिराळ्या दिशांकडे सडका गेलेल्या आहेत. येथून जालना, बीड, अजिंठ्याकडे सडका जातात, त्याचप्रमाणें खुलताबाद व कन्नडहून धुळ्याकडे व अहमदनगरकडे मोठ्या सडका गेलेल्या आहेत. याशिवाय जिल्ह्यांतील बरींच ठिकाणें जोडलेलीं आहेत. उदा. पैठण, गंगापूर, वैजापूर आदि. या जिल्ह्यामध्यें औरंगाबाद, अजिंठा, वेरूळ, दौलताबाद, जालना, पैठण, खुलताबाद, बदनापूर हीं प्रमुख गांवें आहेत.

जिल्ह्याचें मुख्य ठाणें :-- औरंगाबाद, जिल्ह्याचें क्षेत्रफळ ६,३१८, जिल्ह्याची लोक संख्या :– ११,७१,४०४

| तालुका | लोकसंख्या | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ औरंगाबाद | १,५,०८० | ७ सिल्लोड | १,०६,७५८ |
| २ पैठण | ९६,९२१ | ८ भोकरदन | ८६,३३३ |
| ३ गंगापूर | ८५,७८४ | ९ जाफराबाद | ४५,६५८ |
| ४ वैजापूर | १,०४,८२५ | १० जालना | १,८१,३१६ |
| ५ कन्नड | ९५,५९८ | ११ अंबड | १,५४,२१६ |
| ६ खुलताबाद | ३३,२४७ | १२ सोयगांव (महाल) | २२,६४१ |

# परभणी जिल्हा

या जिल्ह्याच्या पूर्वेस नांदेड जिल्हा, पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा, उत्तरेस विदर्भ, दक्षिणेस बीड जिल्हा अशी या जिल्ह्याची चतुःसीमा आहे. या जिल्ह्याचा उत्तर भाग डोंगराळ असून तेथें अजिंठा डोंगराचे फाटे आलेले आहेत. दक्षिण भाग मात्र सपाट मैदानाचा आहे. गोदावरी नदी या जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यांतून वाहते. पूर्णा व दुधना या गोदावरीच्या मोठ्या उपनद्या असून परभणी तालुक्यांत या दोन्हींचा संगम होऊन करेश्वराजवळ गोदावरीस मिळतात. याशिवाय कसुरा, कपुरा, पिंपळगड, कायधु, हुसना, या लहान लहान नद्या आहेत. मराठवाड्यांतील सर्वसाधारण सगळींच पिकें येथें उत्तम येतात. पण ज्वारी व कापूस अधिक पिकतो.

म्हणून या जिल्ह्यामध्यें कापूस वठण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या आहेत. परभणी, परतूड, सेलू, मानवत, हिंगोली जिंतूर, औंढे, गंगाखेड, पूर्णा, चाटगणे, कुरुंदा, जांब हीं या जिल्ह्यांतील प्रमुख गांवें होत.

मनमाड ते हैद्राबाद ही अरुंद रेल्वे या जिल्ह्याच्या मध्य भागांतून गेलेली आहे. पूर्णा, परभणी, सेलू, मानवत हीं मोठीं स्टेशनें होत. पूर्णेपासून या रेल्वेचा अेक फाटा हिंगोलीपर्यंत गेला आहे. त्यावर वसमत व चौंडी हीं मोठीं स्टेशनें आहेत. परभणी ते परळी असा अेक रेल्वे फाटा असून त्यावर गंगाखेड हें मोठें स्टेशन आहे. याप्रमाणें पूर्णा व परभणी हीं दोन रेल्वे जंक्शनें असल्यासारखीं आहेत. बहुतेक तालुके व महत्त्वाचीं ठिकाणें सडकांनीं जोडलीं आहेत.

**जिल्ह्याचें मुख्य ठाणें :—परभणी, क्षेत्रफळ ४८५५, लोकसंख्या १०,१७,८६४.**

| तालुका | लोकसंख्या | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ परभणी | १,५०,०२३ | ५ जिंतूर | १,०८,४९७ |
| २ गंगखेड | १,४५,६८४ | ६ कळमवर्सा | १,०८,८३९ |
| ३ पार्थी | १,४२,२७२ | ७ हिंगोली | १,२७,२७९ |
| ४ परतूड | १,०७,३८७ | ८ बसमत | १,२०,८८३ |

# नांदेड जिल्हा

नांदेड हा कापसाचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर पेनगंगा वहात असून विदर्भ पसरलेला आहे. पूर्वेस अदिलाबाद व निजामाबाद आहेत, दक्षिणेस बीड जिल्हा असून पश्चिमेस परभणी जिल्हा आहे. या जिल्ह्याचा उत्तर भाग डोंगराळ असून हदगांव, भोकर हे तालुके डोंगराळ भागांत मोडतात. पश्चिम भागांत विशेषतः कंधार तालुक्यामध्यें बाळाघाटचे कांहीं फाटे पसरलेले आहेत. गोदावरी नदी या जिल्ह्याच्या मध्य भागांतून वाहते हिच्या कांठची जमीन फारच सुपीक आहे. या जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरून मांजरा नदी वहात जाऊन गोदावरीस मिळते. मन्याड व लेंडी या दक्षिण भागांतील महत्त्वाच्या

नद्या असून त्या मांजरा नदीस मिळतात. मन्याड नदीवर कंधार व लेंडी नदीवर देगलूर हीं ठिकाणें आहेत. उत्तर भागांतील सिद्धा नदी महत्त्वाची आहे.

मराठवाड्यांतील सर्व जिल्ह्यांपेक्षां नांदेडला जास्त उष्णता भासते. मराठवाड्यांतील बहुतेक सर्व प्रकारचीं पिकें येथें येतात. परंतु कापसाच्या पिकासाठीं हा जिल्हा विशेष प्रसिद्ध आहे. जिल्ह्यामध्यें बऱ्याच ठिकाणीं कापसाच्या गिरण्या व त्यांच्या व्यापारी पेठा आहेत.

या जिल्ह्याच्या मध्य भागांतून मनमाड–हैद्राबाद अरुंद रेल्वे गेली असून, बांसर, उमरी, मुदखेड, नांदेड हीं मोठीं स्टेशनें आहेत. मुदखेड स्टेशनपासून या रेल्वेचा अेक फाटा आदिलाबादपर्यंत गेलेला आहे. नांदेडपासून हिंगोली व हदगांवकडे व देगपूरहून हैद्राबादकडे मोठ्या सडका गेलेल्या आहेत. याशिवाय म्हैसा, कंधार, बिलोली आदि प्रमुख शहरांवरून सडका गेलेल्या आहेत.

**जिल्ह्याचें मुख्य ठाणें :– नांदेड. क्षेत्रफळ ४७२६, लोकसंख्या ९,५८,८८८.**

| तालुके | लोकसंख्या | तालुके | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ नांदेड | १,६३,१८८ | ६ भोकर | ७२,७८० |
| २ बिलोली | १,१६,८९१ | ७ धर्माबाद | ३४,३९८ |
| ३ मुखेड | ८२,०८६ | ८ देगलूर– | |
| ४ कंधार | १,४५,०७८ | आणि मुखेड | ७२,२४७ |
| ५ हदगांव | १,०८,६४३ | ९ किनवट | ७३,११८ |

# बीड जिल्हा

बीड जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व परभणी हे जिल्हे असून, सरहद्दीवरून गोदावरी नदी वहात जाते. पूर्वेस परभणी जिल्ह्याचा कांहीं भाग व बीदर जिल्हा पसरलेला आहे. दक्षिणेस उस्मानाबाद जिल्हा असून सरहद्दीवरून मांजरा नदी वहात गेलेली आहे. या जिल्ह्याच्या मध्यभागांतून बालाघाटच्या पूर्व–पश्चिम रांगा पसरलेल्या आहेत. त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं स्थानिक नांवें आहेत. बालाघाटच्या उत्तरेस सिंदफणा नदी मुख्य आहे. ही नदी पाटोदा तालुक्यांतील बालाघाट डोंगरांतून निघून जिल्ह्याच्या उत्तर भागांतून पूर्वेकडे वहात जाऊन

मंजरथ क्षेत्राजवळ गोदावरीस मिळते. हिच्या उपनद्यांपैकीं, डोंगरी, बेडसुटा, कुंडका या नद्या मुख्या आहेत. सिंधफणा नदीशिवाय वाण व अिद्रापा या नद्या गोदावरीस मिळतात. बालाघाटच्या दक्षिणेस मांजरा नदी फार महत्त्वाची आहे. या नदीस बोर खेड, गणेश–लुवाण, कुडा, हेकण, हेणा आदि नद्या मिळतात.

या दृष्टीनें या जिल्ह्याचे तीन नैसर्गिक विभाग पडले आहेत. १) मध्य डोंगराळ प्रदेश. २) उत्तरेकडील सिंधफणा नदीचें खोरें. ३) दक्षिण भाग. हा मांजरा नदीच्या खोऱ्यांत मोडतो.

बालाघाटचा डोंगर पूर्व–पश्चिम पसरलेला असल्यानें मांजरा नदीच्या खोऱ्यांत पाऊस जास्त पडतो. म्हणून तेथें बरीच सुबत्ता आढळून येते व सर्व तऱ्हेचीं धान्यें उत्तम पिकतात. विशेषतः गहूं मुबलक पिकतो. त्यामुळें लोकांची एकंदर परिस्थिति बरी आहे. सिंधफणा नदीच्या खोऱ्यांत मात्र पाऊस कमी पडतो. म्हणून तेथें मधून-मधून दुष्काळी वातावरण आढळून येतें. मध्यडोंगराळ प्रदेशांत कांहीं ठिकाणीं जंगलें असून उपयुक्त लांकूड मिळतें.

या जिल्ह्यांत रेल्वे मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. परळीहून परभणीपर्यंत अरुंद रेल्वेचा फाटा व हैद्राबादहून परळीपर्यंत आलेला रुंद रेल्वेचा फाटा हींच काय तीं या जिल्ह्यांतील मुख्य रेल्वे ! दळणवळणाचें प्रमुख साधन म्हणजे बस सर्व्हिस व मोटारी हीं होत. परळीहून सोलापूरकडे जाणारा रस्ता, मोमिनाबादेहून गेलेला आहे. बीडहून–औरंगाबाद–जालन्याकडे आणि उस्मानाबादहून–नळदुर्गहून–हैद्राबादकडे मोठी सडक गेलेली आहे. याशिवाय मुख्य मुख्य ठिकाणांहून रस्ते गेलेले आहेत.

बीड, मोमिनाबाद, परळी, घाऊर, लिंबा गणेश, गेवराअी आदि महत्त्वाचीं ठिकाणें आहेत.

जिल्ह्याचें मुख्य ठाणें :– बीड. क्षेत्रफळ ४२७८, लोकसंख्या ८,२६,०४६

| तालुके | लोकसंख्या | तालुके | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ बीड | १,३०,३८० | ५ माजलगांव | १,१७,०२० |
| २ पाटोदा | ८३,५३६ | ६ मोमिनाबाद | १,६५,१७४ |
| ३ अष्टी | ८६,२२२ | ७ केड | १,२९,९२० |
| ४ गेवराअी | १,१३,७९४ | | |

## जिल्हा

हा भूईमुगाच्या शेंगांचा जिल्हा होय. या जिल्ह्याच्या उत्तरेस बीड जि
पूर्वेस बिदर जिल्हा, दक्षिणेस गुलबर्गा आणि पश्चिमेस सोलापूर जिल्हा आहे
जिल्ह्याच्या पश्चिम भागांत दक्षिणेकडे बालाघाटचे फाटे आलेले आहेत. त्या
पश्चिम भाग बराच उंच असून या भागास घाटमाथा म्हणतात. पूर्व भाग मैद
प्रदेशांत मोडतो. याप्रमाणें या जिल्ह्याचे दोन नैसर्गिक विभाग पडतात. १) पश्चि
घाटमाथा. २) पूर्व मैदानी प्रदेश.

या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर मांजरा नदी वहात असून तिच्या कांठावर कळं
ढोली, पिंपळगांव हीं गांवें आहेत. हा भाग बराच सुपीक आहे. या जिल्ह्यांतील महत्त्वाच
नदी म्हणजे तेरणा नदी होय. ही उत्तर भागांत तेरवडजवळ उगम पावून सुरवातीस
दक्षिणेकडे वाहते व नंतर पूर्ववाहिनी बनून मांजरा नदीस मिळते. ही नदी म्हणजे
जिल्ह्याचा प्राण आहे, असें म्हटलें तरी चालेल. हिच्या दोन्ही बाजूंची जमीन अतिशय
सुपीक बनलेली आहे. जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरून सीमा नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे
वाहते. हिला या जिल्ह्यांतून खैर, निळी, भोगावती, घोडनदी या नद्या मिळतात.
जमीन बरीच सुपीक असून मराठवाड्यांतील बहुतेक सर्व पिकें येथें उत्तम येतात. तरी
पण भुईमुगाच्या पिकासाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. कापसाचा दुसरा नंबर लागेल.

या जिल्ह्यांत अगदीं अरुंद बार्शी लाईट रेल्वेचा फक्त एक फांटा कुर्डुवाडीहून
लातूरपर्यंत आलेला आहे. हाच काय तो रेल्वेमार्ग! मोटार वाहतुकीसाठीं सडका बऱ्याच
आहेत. हैद्राबादहून–सोलापूरकडे जाणाऱ्या सडकेवर उमरगे व नळदुर्ग हीं गांवें आहेत.
सोलापूरहून बीडकडे जाणाऱ्या रस्त्यांवर तुळजापूर, उस्मानाबाद, येरमाळा वगैरे
गांवें आहेत. रेल्वेमार्ग कमी असल्यानें बस सर्व्हिसची व्यवस्था चोहोंकडे उत्तम आहे.

जिल्ह्याचें मुख्य ठाणें :– उस्मानाबाद. क्षेत्रफळ ५४७७,
लोकसंख्या :– १२,१०,०४१.

| तालुका | लोकसंख्या | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ उस्मानाबाद | १,१५,६५४ | ७ औसा | ९८,०८७ |
| २ तुळजापूर | १,०३,३९० | ८ उमरगा | १,३४,२८३ |
| ३ परंडा | ७१,५२९ | ९ अहमदपूर | १,३३,८४६ |
| ४ भूम | ५९,६१९ | १० निलंगा | १,३२,८३५ |
| ५ कळंब | १,०५,८६१ | ११ उदगीर | १,३५,९०८ |
| ६ लातूर | १,१९,९२१ | | |

# मराठवाड्यांतील

# प्रेक्षणीय

# स्थळें !

# उस्मानाबाद जिल्हा

हा भूओमुगाच्या शेंगांचा जिल्हा होय. या जिल्ह्याच्या उत्तरेस बीड जिल्हा, पूर्वेस बिदर जिल्हा, दक्षिणेस गुलबर्गा आणि पश्चिमेस सोलापूर जिल्हा आहेत. या जिल्ह्याच्या पश्चिम भागांत दक्षिणेकडे वालाघाटचे फाटे आलेले आहेत. त्यामुळें पश्चिम भाग बराच उंच असून या भागास घाटमाथा म्हणतात. पूर्व भाग मैदानी प्रदेशांत मोडतो. याप्रमाणें या जिल्ह्याचे दोन नैसर्गिक विभाग पडतात. १) पश्चिम घाटमाथा. २) पूर्व मैदानी प्रदेश.

या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर मांजरा नदी वहात असून तिच्या कांठावर कळंब, ढोली, पिंपळगांव हीं गांवें आहेत. हा भाग बराच सुपीक आहे. या जिल्ह्यांतील महत्त्वाची नदी म्हणजे तेरणा नदी होय. ही उत्तर भागांत तेरवडजवळ उगम पावून सुरवातीस दक्षिणेकडे वाहते व नंतर पूर्ववाहिनी बनून मांजरा नदीस मिळते. ही नदी म्हणजे जिल्ह्याचा प्राण आहे, असें म्हटलें तरी चालेल. हिच्या दोन्ही बाजूंची जमीन अतिशय सुपीक बनलेली आहे. जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरून सीमा नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. हिला या जिल्ह्यांतून खैर, निळी, भोगावती, घोडनदी या नद्या मिळतात. जमीन बरीच सुपीक असून मराठवाड्यांतील बहुतेक सर्व पिकें येथें उत्तम येतात. तरी पण भुईमुगाच्या पिकासाठीं हा जिल्हा प्रसिद्ध आहे. कापसाचा दुसरा नंबर लागेल.

या जिल्ह्यांत अगदीं अरुंद बार्शी लाईट रेल्वेचा फक्त एक फांटा कुर्डुवाडीहून लातूरपर्यंत आलेला आहे. हाच कायतो रेल्वेमार्ग ! मोटार वाहतुकीसाठीं सडका बऱ्याच आहेत. हैद्राबादहून–सोलापूरकडे जाणाऱ्या सडकेवर उमरगे व नळदुर्ग हीं गांवें आहेत. सोलापूरहून बीडकडे जाणाऱ्या रस्त्यांवर तुळजापूर, उस्मानाबाद, येरमाळा वगैरे गांवें आहेत. रेल्वेमार्ग कमी असल्यानें बस सर्व्हिसची व्यवस्था चोहोंकडे उत्तम आहे.

जिल्ह्याचें मुख्य ठाणें :– उस्मानाबाद. क्षेत्रफळ ५४७७,

लोकसंख्या :– १२,१०,०४१.

| तालुका | लोकसंख्या | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ उस्मानाबाद | १,१५,६५४ | ७ औसा | ९८,०८७ |
| २ तुळजापूर | १,०३,३९० | ८ उमरगा | १,३४,२८३ |
| ३ परंडा | ७१,५२९ | ९ अहमदपूर | १,३३,८४६ |
| ४ भूम | ५९,६१९ | १० निलंगा | १,३२,८३५ |
| ५ कळंब | १,०५,८६९ | ११ उदगीर | १,३५,९०८ |
| ६ लातूर | १,१९,९२१ | | |

# मराठवाड्यांतील

# प्रेक्षणीय

# स्थळें !

# दिव्यत्वाची अिथें प्रचीति...!!

मराठवाडा म्हणजे मराठीचें माहेरघर! मराठी सह्याद्रीच्या नि बालाघाटाच्या कुशींत जन्मली, अिथें वाढली! ज्ञानेशांनीं एकनाथांनीं मराठीवर अलंकार चढविले ते याच भूमींत. निसर्गानें सौंदर्याची पखरण केली आहे या मराठवाड्यांत. अितिहासानें याच भूमीवर लढलेल्या अनेक लढाया पाहिल्या आहेत. छीन्नीनें आणि हातोड्यानें मराठवाड्याच्याच पाषाणांवर आपलें शिल्प–कौशल्य साकार केलें आहे. साऱ्या जगांत झालें नाहीं; पाहिलें नाहीं तें अजिंठ्याच्या डोंगर कपारींत आणि वेरूळच्या पाषाणांत आहे. मराठवाड्याचा हा सांस्कृतिक ठेवा अमोल आहे. महाराष्ट्राला अभिमान वाटतो याचा! कारण याच मराठवाड्याची भूमि महाराष्ट्राची संस्कृति वर्षानुवर्षे जोपाशित आहे. हें सारें पाहून मन नाचूं लागतें. मनावर भव्यतेची छाप पडते आणि मराठवाड्याच्या कणाकणामध्यें दिव्यत्वाची प्रचीति येते– मराठी मन ज्या स्थळाभोंवतीं गुंजारव करीत असतें त्यापैकीं कांहीं स्थळें –

## निपटनिरंजन (औरंगाबाद)

बीबीच्या मुकबऱ्याजवळच पश्चिमेकडे डोंगरांत बौद्ध लेणीं आहेत. प्रचंड डोंगराच्या कंठीं ९ लेण्यांचा हा कलाहार शोभून दिसतो. या लेण्यास जाण्यासाठीं बरीच चढण चढावी लागत असली तरी लेण्याच्या पार्श्वभूमीला जे निसर्गानें सौंदर्य उधळलें आहे तें अप्रतिम आहे. या बौद्ध विहाराशेजारींच श्री निपट निरंजनांच्या पवित्र समाधीची वास्तु आहे. निपट निरंजन हे नाथपंथातील एक सिद्धयोगी होते. ते मूळचे उत्तर हिंदुस्थानांतील पण औरंगाबादेस आले. आणि ज्या पंचक्रोशींत जनार्दन-एकनाथांचीं पावन पाऊलें फिरलीं, त्याच पंचक्रोशींत त्यांनीं आपला योग रंगविला. नाथपंथी अति निस्पृह असत. त्याच परंपरेंतील हे निपट निरंजन. त्यांच्या कांहीं कविता उपलब्ध आहेत. औरंगजेबाला उद्देशून लिहिलेलें "सुनो आलमगीर" हें काव्य निपटनिरंजनांच्या निस्पृहतेची साक्ष देतें. तडफ आणि सडेतोडपणा हें काव्याचें वैशिष्ठ्य. परमेश्वराची दृढभक्ति व प्रखर वैराग्य यांनीं निपट निरंजन प्रख्यात झाले. या बौद्ध गुंफेच्या रमणीय जागीं त्यांनीं निर्वाणपद प्राप्त करून घेतलें.

## बिबीचा मुकबरा (औरंगाबाद)

शहाजहाननें आपल्या आवडत्या मुमताजच्या स्मृतीसाठीं आग्र्याला जगप्रसिद्ध विख्यात वास्तु निर्माण केली. उत्तर हिंदुस्थानची ही कलाकृति दक्षिणेंत बिबीच्या मुकबऱ्याच्या रूपानें अवतीर्ण झाली आहे. औरंगजेबाची आवडती राणी राबिया दुराणी हिचा मृत्यु औरंगाबाद येथें झाला. कुराणाच्या स्वहस्तलिखित प्रती विकून आलेल्या पैशांत स्वतःची कबर बांधूं इच्छिणारा औरंगजेब आवडत्या राणीसाठीं प्रति ताजमहाल कसा निर्माण करील? त्यानें साधीच कबर बांधली. पण त्याच्या पुत्रानें आपल्या मातेच्या स्मरणार्थ हा दक्षिणेंतील ताजमहाल उभारला. सह्याद्रिच्या खडकावर आग्र्याच्या ताजमहालाची प्रतिकृति बनविण्यांत मराठी कलावन्तांनीं अपूर्व यश मिळविलें आहे. कलाकुसर, सजावट, गगनचुम्बी मिनार, सरूंच्या रांगा ताजमहालच्याच धर्तीवर आहेत. औरंगाबादच्या सुन्दर आणि ऐतिहासिक स्थळांत या बिबीच्या मुकबऱ्याची गणना होते. औरंगाबादला आलेले प्रवासी हा बिबीचा मुकबरा पाहिल्याखेरीज राहात नाहीत.

## पानचक्की (औरंगाबाद)

मलिकम्बरानें आपल्या राजधानीस पाण्याचा अखंड पुरवठा व्हावा, म्हणून ठिकठिकाणीं बांध उभे केले आणि जिवंत पाण्याचे कायमचे प्रवाह गांवांत निर्माण

# दिव्यत्वाची येथें प्रचीति...!!

मराठवाडा म्हणजे मराठीचें माहेरघर! मराठी सह्याद्रीच्या निळावाटाच्या कुशींत जन्मली, येथें वाढली! ज्ञानेशांनीं एकनाथांनीं मराठीवर अलंकार चढविले ते याच भूमींत. निसर्गानें सौंदर्याची पखरण केली आहे या मराठवाड्यांत. इतिहासानें याच भूमीवर लढलेल्या अनेक लढाया पाहिल्या आहेत. छीन्नीनें आणि हातोड्यानें मराठवाड्याच्याच पाषाणांवर आपलें शिल्प–कौशल्य साकार केलें आहे. साऱ्या जगांत झालें नाहीं; पाहिलें नाहीं तें अजिंठ्याच्या डोंगर कपारींत आणि वेरूळच्या पाषाणांत आहे. मराठवाड्याचा हा सांस्कृतिक ठेवा अमोल आहे. महाराष्ट्राला अभिमान वाटतो याचा! कारण याच मराठवाड्याची भूमि महाराष्ट्राची संस्कृति वर्षानुवर्षे जोपाशित आहे. हें सारें पाहून मन नाचूं लागतें. मनावर भव्यतेची छाप पडते आणि मराठवाड्याच्या कणाकणामध्यें दिव्यत्वाची प्रचीति येते– मराठी मन ज्या स्थळाभोंवतीं गुंजारव करीत असतें त्यापैकीं कांहीं स्थळें –

## निपटनिरंजन (औरंगाबाद)

बीबीच्या मुकबऱ्याजवळच पश्चिमेकडे डोंगरांत बौद्ध लेणीं आहेत. प्रचंड डोंगराच्या कंठीं ९ लेण्यांचा हा कलाहार शोभून दिसतो. या लेण्यास जाण्यासाठीं बरीच चढण चढावी लागत असली तरी लेण्याच्या पार्श्वभूमीला जे निसर्गानं सौंदर्य उधळलें आहे तें अप्रतिम आहे. या बौद्ध विहाराशेजारींच श्री निपट निरंजनांच्या पवित्र समाधीची वास्तु आहे. निपट निरंजन हे नाथपंथांतील एक सिद्धयोगी होते. ते मूळचे उत्तर हिंदुस्थानांतील पण औरंगाबादेस आले. आणि ज्या पंचक्रोशींत जनार्दन-एकनाथांचीं पावन पाऊले फिरलीं, त्याच पंचक्रोशींत त्यांनीं आपला योग रगविला. नाथपंथीं अति निस्पृह असत. त्याच परंपरेंतील हे निपट निरंजन. त्यांच्या कांहीं कविता उपलब्ध आहेत. औरंगजेबाला उद्देशून लिहि-लेले "सुनो आलमगीर" हे काव्य निपटनिरंजनांच्या निस्पृहतेची साक्ष देतें. तडफ आणि सडेतोडपणा हें काव्याचें वैशिष्ठ्य. परमेश्वराची दृढभक्ति व प्रखर वैराग्य यांनीं निपट निरंजन प्रख्यात झाले. या बौद्ध गुंफेच्या रमणीय जागीं त्यांनीं निर्वाणपद प्राप्त करून घेतलें.

## बिबीचा मुकबरा (औरंगाबाद)

शहाजहाननें आपल्या आवडत्या मुमताजच्या स्मृतीसाठीं आग्र्याला पैठणी विख्यात वास्तु निर्माण केली. उत्तर हिंदुस्थानची ही कलाकृति दक्षिणेंत बिंडमय मुकबऱ्याच्या रूपानें अवतीर्ण झाली आहे. औरंगजेबाची आवडती राणी राबिया दुराणी हिचा मृत्यु औरंगाबाद येथें झाला. कुराणाच्या स्वहस्तलिखित प्रती विकून आलेल्या पैशांत स्वतःची कबर बांधू इच्छिणारा औरंगजेब आवडत्या राणीसाठीं प्रति ताजमहाल कसा निर्माण करील? त्यानें साधीच कबर बांधली. पण त्याच्या पुत्रानें आपल्या मातेच्या स्मरणार्थ हा दक्षिणेंतील ताजमहाल उभा-रला. सह्याद्रिच्या खडकावर आग्र्याच्या ताजमहालाची प्रतिकृति बनविण्यांत मराठी कलावन्तांनीं अपूर्व यश मिळविलें आहे. कलाकुसर, सजावट, गगनचुम्बी मिनार, सरूंच्या रांगा ताजमहालच्याच धर्तीवर आहेत. औरंगाबादच्या सुन्दर आणि ऐतिहासिक स्थळांत या बिबीच्या मुकबऱ्याची गणना होते. औरंगाबादला आलेले प्रवासी हा बिबीचा मुकबरा पाहिल्याखेरीज राहात नाहीत.

## पानचक्की (औरंगाबाद)

मलिकम्बरानें आपल्या राजधानीस पाण्याचा अखंड पुरवठा व्हावा, म्हणून ठिकठिकाणीं खांब उभे केले आणि जिवंत पाण्याचे कायमचे प्रवाह गांवांत निर्माण

करून दिलें. अशा जिवंत पाण्याचे कांहीं हौद हल्ली कायमचे बुजविले गेले आहेत. कांहीं राहिले आहेत. यापैकीच ही पवनचक्की होय. या चक्कीमध्यें पाणी कोठून येतें, कसें येतें याचा थांग-पत्ता लागत नाहीं. पण १२ महिने पाण्याचा अखंड प्रवाह मात्र चालूच असतो. सैन्याच्या भाकरी तयार करण्यासाठीं गहूं-ज्वारीच्या दळणाची अडचण पडूं लागतांच मलिकंबरनें पाण्याचा प्रपात तयार केला. आणि त्याच्या शक्तीवर चालणारें एक जातें तयार केलें. व धान्य दळणाचा प्रश्न कायमचा सोडविला. आजच्या यंत्रयुगांत मध्ययुगीन स्थापत्यशास्त्राचा नमुना म्हणूनच त्याचें मूल्य ठरलें आहे. मुसलमान साधूच्या वास्तव्यानें या पानचक्कीला ऐतिहासिक स्वरूपाबरोबरच धार्मिक स्वरूपहि प्राप्त झालें.

## औरंगाबादचीं लेणीं (औरंगाबाद)

बिबाच्या मुकबऱ्यापासून १ मैलावर असलेल्या डोंगरामध्यें हीं लेणीं खोदलीं गेलीं आहेत. हीं एकूण ९ लेणीं आहेत. पैकीं ३ व ७ क्रमांकाचीं लेणीं विशेष उल्लेखनीय आहेत. गळयांत टपोऱ्या मण्यांच्या माळा, हातीं कडीं-तोडे, कानीं [illegible]रेस मेखला हे अलंकार बारकाईनें खोदलेले आहेत. यथार्थदर्शन व [illegible]संगानुकुल आहेत. क्रमांक ७ च्या लेण्यांतील उग्रतारा व भृकुटि-एकनाथ्या मूर्ति अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. याच लेण्यांत नृत्याचें प्रेक्षणीय सौंदर्य हे दक्षिणी नृत्याला विशिष्ट असा अंगन्यास नर्तिकेनें धारण केला आहे भूमीवसलेल्या स्त्रिया बांसरी, मृदंग, ताल वाजवीत आहेत. असें हें दृश्य आहे. हातांत आलें आहे, नर्तिका आणि तिच्या साथकारिणी एकचित्त झाल्या. [illegible]हत, हें दिग्दर्शित करतांना या पटांच्या कारागिरानीं शिल्प कौशल्याची कमाल केली आहे.

## घृष्णेश्वराचें मंदिर (वेरूळ औरंगाबाद)

येलू राजा आणि घृष्णा या भक्तांचा उद्धारकर्ता श्री घृष्णेश्वर. त्याचें हें वास्तव्यस्थान. 'भोसला कुळामध्यें शककर्ता होईल' असा आशिर्वाद देणारा हा घृष्णेश्वर. वेरूळ म्हणजे शककर्ता शिवाजी महाराज यांच्या पाटीलकीचें वतन असलेलें गांव. त्या गांवाचें कुलदैवत घृष्णेश्वर. मराठी साम्राज्याची भाव गंगोत्री या घृष्णेश्वराच्या चरणापासूनच वाहते. मराठी साम्राज्याचा मानाचा नन्दादीप येथेंच उजळला गेला. सारा महाराष्ट्र या घृष्णेश्वराला मानाचा मुजरा करतो.

## औरंगाबाद

या शहराचें मूळचें नांव खडकी ! पण औरंगजेबानें 'खडकी' चें 'औरंगाबाद' बनविलें. औरंगजेबाचा दक्षिणेमध्यें प्रवेश या शहरांतून झाला.

मराठी साम्राज्याचा नाश करण्यासाठीं त्यानें येथें तंबू टाकले. पण दुर्दैवानें अथेंच त्याचें थडगें बांधलें गेलें. औरंगाबादचें आणखी एक वैशिष्ठ्य आहे. महंमद तवलखाबरोबर हिमरू आणि किनखाब या वैशिष्ट्यपूर्ण कापडाचे निर्माते कलावन्तहि येथें आले. जुन्या राजवटींत या कलेला प्रोत्साहन मिळालें. आणि ही कला वाढीस लागली. अकबराच्या दरबारीं या कापडास खास मागणी होती. अनेक राजवटींनीं या कलेची पाठ राखली आहे. २००० कलावन्त या धंद्यावर आपला निर्वाह चालवीत असत. काळ बदलला, जनता गरीब झाली. पोटासाठीं वणवण भटकणाऱ्या नागरिकांनीं या कलेची बूज कशी राखावी ? ही कला आणि कलावन्त हळूहळू कमी होत गेले. शेवटीं अखिल भारतांत अप्रतिम असलेली ही कला अजिबात नामशेष होते कीं काय ही भीति निर्माण झाली आहे!

## पैठण (औरंगाबाद)

गोदामाईच्या तीरावर वसलेली ही पैठण नगरी. भागवत धर्माचा कलना कळस सांवरून मानवतेचें दर्शन घडविणाऱ्या एकनाथांची ही जन्मभूमि आणि कर्मभूमि; अमृतराय, कृष्णदयार्णव या मराठी शारदेच्या मंदिरांतील मानकऱ्यांची वाणी येथेंच घुमली. चक्रधरस्वामींचीं पाऊलें पैठणच्याच मातींत उमटलीं.

महाराष्ट्रांतील घरांघरांमध्यें गृहस्वामिनीनें अभिमानानें पेहेरलेली पैठणी पैठणचीच ! पूर्वी पैठण ही मोठी बाजारपेठ होती. व्यापार, संस्कृति, वाङमय यांची मोठी बाजारपेठ म्हणजे पैठण होय ! ज्ञानेशांच्या रेडयानें वेद येथें म्हटला, आणि येथल्याच पंडितांनीं ज्ञानेश्वरांना शुद्धिपत्र दिलें. येथल्या संस्कृत पंडितांनीं आपल्या विद्वत्तेनें सारी काशी जिंकली. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकाचा अधिकार देणारे गागाभट्ट मूळचे पैठणचेच ! महाराष्ट्रांची एकेकाळची सांस्कृतिक राजधानी पैठण ! मराठी राज्य, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृति यांच्या दृष्टीनें अग्रपूजेचा मान या नगरीचा आहे !

## रुद्रेश्वर (औरंगाबाद)

अजिंठा पर्वताच्या कुशींत -- जगापासून थोडें दूर -- असलेलें हें रमणीय स्थान ! स्थानाच्या नांवावरूनच तेथें वास्तव्य करणाऱ्या देवतेची कल्पना यावी! वैराग्यमूर्ति शंकराशिवाय अितर कोणाला उंच डोंगर आणि पाताळांत घुसणाऱ्या कपारी यांचा आश्रय घ्यावासा वाटेल ? एकीकडे उंच पर्वत तर दुसरीकडे खोल दरी, मोठमोठे कडे, घनगर्द झाडी, हें सारें पाहून निसर्गाच्या भीषणतेची कल्पना येते. दीडशें फुटांच्या उंचीवरून सोननदीचा प्रवाह खालच्या डोहामध्यें

उडी घेतो. या जागीं पहाड कोरून ७—८ फुट उंचीची विघ्नहर्त्या गजाननाची भव्य मूर्ति व जवळच वैराग्यदेव श्री शंकराची पिंड आहे. येथील सारेंच दृश्य भीषण आहे. पण पुन्हां पुन्हां पहावेसें वाटतें. भीषणामधील सौंदर्य डोळे भरून पाहिल्याखेरीज राहवत नाहीं. सोननदीच्या अवखळ प्रवाहांत मनसोक्त विहार करावा, आणि गणराय, पार्वतीवराचें दर्शन घ्यावें. भव्य, सुन्दर पण भीषण देखाव्यांनीं मन हर्षोत्फुल्ल करावें, असें हे रमणीय स्थान आहे. येथून जवळच एक मैलावर वाडीचा प्रसिद्ध लढावू किल्ला आहे. कालाचे निर्घृण आघात झेलत हा किल्ला अद्याप खडा आहे.

## दौलताबाद (औरंगाबाद)

रामदेवराव यादवापासून तो तहत निजामशहापर्यंत अनेक राजांचें कर्तृत्व पाहिलेला, १५०० वर्षांचा दीर्घ कालावधींत उभारल्या गेलेल्या वास्तूंनी विभूषित झालेला, शेंकडों गतस्मृतींनीं सुखद आणि दुःखद संवेदना निर्माण करणारा हा महाराष्ट्राचा महत्वाचा दुर्ग दौलताबाद. यांचें मूळचें नांव 'देवगिरी'. पार्वती व शंकर सारीपाट खेळत होते. त्यांत शंकर हरले. शंकर रागावून वेरूळच्या अरण्यांत गेल्यावर पार्वती भिल्लीणीच्या वेषांत म्हैसमाळच्या डोंगरावर राहूं लागली. या भिल्लीणीवर शंकर अनुरक्त झाले. व देवांना वेरूळच्या परिसरांत येण्याची शंकरानीं मनाई केली बिचारे देव ज्या डोंगरावर राहूं लागले तो देवगिरीचा डोंगर. याच डोंगरावर बांधलेल्या किल्ल्याचें नांव देवगिरी. राष्ट्रकुट राज्यांतील श्रीवल्लभ यानें ७५६ तें ७७२ या काळांत हा किल्ला उभारला. भारतांतील अितर कोणत्याहि राज्यांत – प्रांतांत – दिसणार नाहीं, असा हा भुईकोट किल्ला. १५०० वर्षे काळाच्या लिला निर्भयतेनें पाहात उभा आहे. १४४५ मध्यें बादशहा अहमदशहा वलीनें आपल्या ऐश्वर्याचें प्रतीक म्हणून उभा केलेला चांदमीनार हा दक्षिणेंतील प्रतिकुतुबमिनार मानला जात आहे. राजा रामदेव धान्य, दारूगोळा ठेवत असलेला काळा कोट पाहण्यासारखा आहे. याच धान्य-गोदामामध्यें फितुरी झाली, धान्याच्या ऐवजीं मिठाची पोतीं रचलीं गेलीं. आणि भुकेच्या पायीं मराठी फौजेचा पराभव झाला. आणि अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिणेंतील पहिला पाय दौलताबादच्या किल्ल्यावर रोविला. मेंढा तोफ, धुळधाण तोफ, तेंलदरी, लोखंडी तवा, कडेलोट दरी आदि गोष्टी पाहिल्या कीं, किल्ला लढविण्यासाठीं–संरक्षणासाठीं–पूर्वीच्या योजना ध्यानीं येऊं लागतात पूर्वीचें रण-कौशल्य समजूं लागतें. १३१८ मध्यें हरपाळदेवाला ठार मारले व हा किल्ला अल्लाउद्दीनानें ताब्यांत घेतला. या किल्ल्यानें १५२६ पर्यंत बहामनी राज्याचें

स्वामित्व स्वीकारलें. नंतर औरंगजेब, हैद्राबादचा निझाम यांच्या हातीं या किल्ल्याचें सत्तांतर झालें. आणि आतां अपमानाचें जिणें सोशीत असलेला महाराष्ट्राचा हा दुर्ग स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेंत श्वासोच्छ्‌वास करीत आहे. हा किल्ला म्हणजे १५०० वर्षांच्या अितिहासाचें चालतें-बोलतें स्मारक होय. जवळच जनार्दन स्वामींची समाधि आहे. एकनाथांचे गुरू जनार्दन स्वामी ते हेच ! दौलताबादच्या किल्ल्याची किल्लेदारी त्यांचेकडे होती. किल्लेदार म्हणून चोख कामगिरी बजावली, आणि तेथेंच समाधि घेऊन चिरविश्रांति घेत आहेत.

## रोजा खुळदाबाद (औरंगाबाद)

औरंगाबादपासून १४ मैलांवर असलेलें मुसलमानांचें धार्मिक व ऐतिहासिक स्थळ होय. समुद्रसपाटीपासून २००० फुट उंचीवर असलेल्या या ठिकाणीं उन्हाळ्यांत बरेच लोक राहण्यासाठीं येतात. प्रसिद्ध मुसलमान व्यक्तींच्या कबरी येथें आहेत. औरंगजेब, त्याचा मुलगा आजमशहा याच ठिकाणीं चिरविश्रांति घेत आहेत. मलिकंदर, गोवळकोंड्याचा राजा तानाशाहा आणि अितर प्रमुख राजकारणी मुसलमान व्यक्तींच्या कबरी या ठिकाणीं आहेत. औरंगजेबाची कबर साधी आहे पण तिला संगमरवरी जाळी आहे. या कबरीमध्यें अतिलहान अशी एक खोली आहे. तीमध्यें महंमद पैगंबराचा पोशाख ठेवला आहे. ही खोली नेहमीं बंद असते. पण दरवर्षी १२ रविलावल ( मुसलमान तिथी ) या दिवशीं ही खोली उघडली जाते. व पैगंबरांच्या पोशाखाचें दर्शन घडविलें जातें.

## वेरूळचीं लेणीं (औरंगाबाद)

दंतकथा सांगतात अजिंठ्याची म्हणून, पण ती लागूं पडते वेरूळच्या लेण्याला ! आपण मृत्युलोकीं जाऊन एक रात्र चैनींत घालवावी अशी इच्छा देवादिकांना झाली. अिंद्राकडे परवानगी मागितली. रात्र संपण्यापूर्वी परत येण्याच्या अटीवर परवानगी मिळाली. देवांनीं ही अट कबूल केली. विंध्याद्रि पर्वतावरील रम्य वनश्री व त्यांतील गुंफा पाहून देवांचें मन तेथेंच रमलें. रात्रभर चैन केली. सारी रात्र संपली. कोंबडा आरवला. पण देवांना शुद्ध राहिली नाहीं. पण नंतर देव भानावर आले. आणि परतण्याच्या तयारीला लागले. पण आतां काय उपयोग ? देवांना परत फिरणें अशक्य होतें. कारण सूर्य किरणांच्या स्पर्शानें त्यांना प्रस्तर रूप प्राप्त झालें होतें. वेरूळच्या लेण्यांमध्यें ज्या मूर्ति आहेत त्या याच देव देवतांच्या !

उडी घेतो. या जागीं पहाड कोरून ७—८ फुट उंचीची विघ्नहर्त्या गजाननाची भव्य मूर्ति व जवळच वैराग्यदेव श्री शंकराचीं पिंड आहे. येथील सारेंच दृश्य भीषण आहे. पण पुन्हां पुन्हां पहावेसें वाटतें. भीषणामधील सौंदर्य डोळे भरून पाहिल्याखेरीज राहवत नाहीं. सोननदीच्या अवखळ प्रवाहांत मनसोक्त विहार करावा, आणि गणराय, पार्वतीवराचें दर्शन घ्यावें. भव्य, सुन्दर पण भीषण देखाव्यांनीं मन हर्षोत्फुल्ल करावें, असें हे रमणीय स्थान आहे. येथून जवळच एक मैलावर वाडीचा प्रसिद्ध लढावू किल्ला आहे. कालाचे निर्घृण आघात झेलत हा किल्ला अद्याप खडा आहे.

## दौलताबाद (औरंगाबाद)

रामदेवराव यादवापासून तो तहत निजामशहापर्यंत अनेक राजांचें कर्तृत्व पाहिलेला, १५०० वर्षांचा दीर्घ कालावधींत उभारल्या गेलेल्या वास्तूंनी विभूषित झालेला, शेंकडों गतस्मृतींनीं सुखद आणि दुःखद संवेदना निर्माण करणारा हा महाराष्ट्राचा महत्वाचा दुर्ग दौलतावाद. याचें मूळचें नांव 'देवगिरी'. पार्वती व शंकर सारीपाट खेळत होते. त्यांत शंकर हरले. शंकर रागावून वेरूळच्या अरण्यांत गेल्यावर पार्वती भिल्लीणीच्या वेषांत म्हैसमाळच्या डोंगरावर राहूं लागली. या भिल्लीणीवर शंकर अनुरक्त झाले. व देवांना वेरूळच्या परिसरांत येण्याची शंकरानीं मनाई केली बिचारे देव ज्या डोंगरावर राहूं लागले तो देवगिरीचा डोंगर. याच डोंगरावर बांधलेल्या किल्ल्याचें नांव देवगिरी. राष्ट्रकुट राज्यांतील श्रीवल्लभ यानें ७५६ तें ७७२ या काळांत हा किल्ला उभारला. भारतांतील अितर कोणत्याहि राज्यांत – प्रांतांत – दिसणार नाहीं, असा हा भुईकोट किल्ला. १५०० वर्षे काळाच्या लिला निर्भयतेनें पाहात उभा आहे. १४४५ मध्यें बादशहा अहमदशहा वलीनें आपल्या ऐश्वर्याचें प्रतीक म्हणून उभा केलेला चांदमीनार हा दक्षिणेंतील प्रतिकुतुबमिनार मानला जात आहे. राजा रामदेव धान्य, दारूगोळा ठेवत असलेला काळा कोट पाहण्यासारखा आहे. याच धान्य–गोदामामध्यें फितुरी झाली, धान्याच्या ऐवजीं मिठाची पोतीं रचलीं गेलीं. आणि भुकेच्या पायीं मराठी फौजेचा पराभव झाला. आणि अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिणेंतील पहिला पाय दौलतावादच्या किल्ल्यावर रोविला. मेंढा तोफ, धुळधाण तोफ, तेलदरी, लोखंडी तवा, कडेलोट दरी आदि गोष्टी पाहिल्या कीं, किल्ला लढविण्यासाठीं–संरक्षणासाठीं–पूर्वीच्या योजना ध्यानीं येऊं लागतात पूर्वीचें रण-कौशल्य समजूं लागतें. १३१८ मध्यें हरपाळदेवाला ठार मारले व हा किल्ला अल्लाउद्दीनानें ताब्यांत घेतला. या किल्ल्यानें १५२६ पर्यंत बहामनी राज्याचें

अजंठा, वेरूळच्या प्रवाशांना !!
सुंदर व सुखसोईनें परिपूर्ण असें . . .
—० उतरण्याचें एकमेव स्थान ०—

# सिटी हॉटेल

शहराचे मध्यभागीं व बसस्टँडजवळ
शाकाहारी व मांसाहारी
सिटी हॉटेल- शहागंज, औरंगाबाद.



पॅको, करमा, पॅरामाऊंट, शक्ति
वगैरे प्रसिद्ध ऑईल एंजिन्स व त्यास लागणारें
सामान मिळण्याचें
—: भरोसापात्र एकमेव ठिकाण :—

बछराज छगनलाल शेटी जैन
चाळीसगांव पू. खा. शहा गंज, गांधी चौक
फोन नं. ३ औरंगाबाद.

महाराष्ट्रांतील अितर लेणीं डोंगर कपारीच्या कुशीमध्यें निर्माण केलेली आहेत, पण वेरूळची हीं लेणीं पर्वत शिखराच्या उतारावर खोदलेलीं आहत. या नैसर्गिक परिस्थितीचा कलाकारांनीं फायदा घेतला, आणि शिल्प वास्तूसमोर बंदिस्त व विस्तीर्ण पटांगणें निर्माण केली. पृथ्वीच्या कना कोपऱ्यांतून रसिक येतो या वेरुळसारख्या खेडेगांवीं ! बालेघाटांत वसलेल्या या वेरुळमध्यें जी कला नगरी वसलेली आहे. तिच्या दर्शनासाठीं साऱ्या रसिकांचे डोळे आसुसलेले अनतात. काय आहे येथें ? धर्माच्या अभंग अधिष्ठानावर उभारलली ही अमर कलामंदिरें. कलावंतांनीं आपली कल्पकता, बुद्धि, परिश्रमशीलता येथे पणाला लावली आणि डोंगर फोडून कलानगरी निर्माण केली. मराठी संस्कृतीच्या कंठामध्यें या अज्ञात कलावंतांनीं ३३ लेण्यांची ही अमर मोहनमाळ घातली.

बुद्धि चालणार नाहीं, अक्कल काम करणार नाहीं. भव्य प्रासाद, रमणीय आकृति, कलाकौशल्याचा नुसता सडा पडला आहे तेथें ! मानवी मनांत वट-बीजाप्रमाणें किती भव्य आणि उदात्त कल्पना अंकुरतात त्याचें वेरुळची लेणीं म्हणजे साक्षात प्रतीक. सोन्या-चांदीवर कलाकुसर करणें अवघड नाहीं. पण साध्या छिन्नी-हातोड्यांनी बालाघाटाच्या पाषाणावर प्रमाणबद्ध आणि बारीक अशी कलेची छटा उमटविणें किती अवघड असते, हें कळावयाला येथें पाहिजे जातीचे ! १ ते १२ बौद्ध लेणीं, १३ ते ३२ ब्राम्हणी लेणीं आणि शेवटचा ३३ वा संच जैन लेण्यांचा. तिन्ही धर्मांची स्वयंसिद्ध व तुल्य-कौशल्य अशीं हीं लेणीं आहेत. या धर्माच्या अनुयायांनें महाराष्ट्रांत वेळोवेळीं झालेले राजकीय संघर्ष लक्षांत घेतले असतां प्रत्यक्ष धर्मकृत्याच्या बाबतींत या तिन्ही धर्मांनीं परस्परां-विषयी व्यक्त केलेल्या सहानुभूतीचे व सहिष्णुतेचे या लेण्याची निर्मिती व आस्तित्व हें प्रात्यक्षिक आहे. वेरुळच्या लेण्यांतील कैलासाचें वर्णन म्हणजे शब्दाअभावीं लेखणी थबकावी असें हें कलावैभव; वेरुळचा कैलास ! घृष्णेश्वराच्या स्वर्ग मंदिराचें कलात्मक प्रतीक ! कलादेवतेचा परमोच्च विलास आणि विकास ! ज्या अज्ञात कलावंतानें हे कलावैभव निर्मिलें, त्याला या शिल्पकलेचें दर्शन पाहून उन्माद चढला. आणि त्याच भावसमाधींत त्यानें वरच्या मजल्यावरून स्वत:स लोटून घेऊन कलादेवतेच्या चरणाशीं आपल्या पार्थिव शरिराचें अर्घ्य अर्पण केलें. अति उदात्त अशा कलासमाधीचें याहून वेगळें सार्थक कोणतें असूं शकेल ? याच उदात्त बलिदानाची कहाणी कैलासामधील अणूरेणू सांगत असतो. कैलासांत काय नाहीं ? सर्व कांहीं आहे. लीलेनें कैलास पर्वत खाली दडपत असलेले भगवान शंकर, आणि आपली सर्व शक्ति व भक्ति पणाला लावून कैलास पर्वत गदगदां हलविणारा लंकाधिपती रावण. पौराणिक आख्यानाचा हा भाव

एका चित्रांत मूर्तिमंत चितारलेला आपणांस दिसेल. कैलास म्हणजे महाराष्ट्राच्या मध्ययुगीन धर्मभावनेचें दृश्य स्वरूप! सुन्दर, सहिष्णु व समर्थ असा हा कैलास. मध्ययुगीन धर्म-भावनेचे महाकाव्य म्हणजे कैलास हाय. महाराष्ट्राच्या शिल्प-कौशल्याचा उत्कर्ष-बिंदु म्हणजे कैलास. अचल, उत्तुंग, सतेज. महाराष्ट्रांच्या कला वैभवाचें स्मारक, कण वर अंतरात्म्यावर झालेल्या संस्काराचें द्योतक. श्रमसात-त्याचें प्रतीक. संकल्पाची अपूर्वता व विशालता आणि सिद्धीची अतुल्यता व चारुता यांचें मूर्त स्वरूप. कैलासांत पहिला पदक्षेप केला कीं, मन उचंबळून येतें, मान नत होते, नाम मुखीं येतें. वाटतें कीं, जणूं आज जीवन सफल झालें. आणि हेच वेरुळच्या अज्ञात निर्मात्याचें सार्थक!

## अजिंठा (औरंगाबाद)

चिनी प्रवासी युआन च्वंग यानें आपल्या प्रवास वर्णनांत अजिंठा लेण्यांच्या निर्मितीची दंतकथा नमूद केली आहे. महाराष्ट्रांत आचार नांवाचा एक अर्हत होता. त्याची माता मरण पावली. तिला याच देशांत पुनर्जन्म घ्यावा लागला आहे, हें त्याला अंतर्ज्ञानानें समजलें. तेव्हां तो तिचा शोध करीत हिंडूं लागला. एका खेड्यांत भिक्षा मागत असतां एका घरातून एक बालिका त्याला अन्न वाढा-वयास आली. हीच आपली माता, असें त्यानें ओळखलें. अर्हताला पाहतांच तिला पान्हा फुटला. हा प्रकार झालेला पाहून तिच्या मैत्रिणींना आश्चर्य वाटलें. हें मोठें दुश्चिन्ह आहे अशी त्यांची समजूत झाली आणि सार्‍याजणी दुःखित झाल्या. तिचा पूर्वजन्मीचा वृत्तांत सांगून अर्हतानें त्यांचें समाधान केलें. त्या बालिकेला धर्मदीक्षा देऊन तिच्यासह तो अजिंठ्याला आला, कृतज्ञतेनें प्रेरित झालेल्या अर्हतानें येथें सोयीस्कर जागा पाहून संघाराम खोदविले, उभारविले आणि त्यांच्या भिंतीवर बुद्धाच्या जीवनांतील अनेक प्रसंगांचीं चित्रें कोरवून व रंगवून घेतलीं.

बोलून चालून ही दंतकथा आहे. ती खरी मानावी हा इरादा येथें नाहीं. सांगायचें एवढेच कीं, दंतकथेंतील या लेण्यांची निर्मिति करणारा अर्हत महा-राष्ट्रीय होता.

अजंठ्याच्या लेण्याची वाट चढतांना प्रवासी डोंगराच्या एका विशिष्ट उंच वटयावर आला कीं, अचानकपणें गर्तेच्या मध्ये लेणीं एकाएकीं दृष्टीपथांत येतात प्रवासी मंत्रमुग्ध होऊं लागतो. कोठें सुबक स्तंभांच्या रांगा दिसतात, तर कोठें चैत्याचीं आकर्षक गवाक्षें, कोठें आकाशांतून उड्डाण करतां करतां प्रस्तर रूप प्राप्त झालेले यक्ष-किन्नर दिसतात, तर कोठें मानवी जीवनाला आश्वासन व

आशिर्वाद देणाऱ्या बुद्धाच्या आजानबाहू प्रचंड मूर्ति दृष्टीस पडतात. स्तब्धतेच्या या क्षणात प्रवाशाला जाणीव होते कीं, जगाच्या बहुसंख्य लोकांच्या धर्मश्रद्धेचे मूर्त स्वरूप आपल्यापुढें साकारलें आहे. बौद्धधर्माच्या वैभवकाळीं निर्माण केलेलें हें कलेचें नंदनवन बौद्धधर्माचा ऱ्हास सुरू झाल्यावर ओसाड झालें. बदलत्या काळाबरोबर भोवतालच्या जंगली जमातींचा कल फिरला आणि भिक्षूंना या लेण्यांत राहणें कठीण झालें. यात्रेकरूंना तेथें फिरणें अशक्य झालें. पावसाबरोबर वाहून येणाऱ्या मातीनें कांहीं लेणीं भरून गेलीं. सभोवार जंगल वाढलें. अहिंसक अशा भिक्षूंच्या जागा हिंस्त्र श्वापदांनीं घेतल्या. वादळाच्या हेलकाव्यांत जंगलांतील वृक्ष डोलूं लागले म्हणजे कड्यांत कोरलेली एखादी मूर्ति अजिंठ्याच्या शिल्पाविषयीं अजाण असलेल्या कोणाला दिसलीच तर हा भूतचेष्टेचा प्रकार मानला जाऊं लागला. अशा परिस्थितींत १८१९ सालीं वाघाच्या शिकारीसाठीं मद्रास आर्मीमधला ब्रिटीश अधिकारी या घळींत दाखल झाला. त्यालाहि कांहीं मूर्ति दिसल्या. तो दचकला नाही, चमकला मात्र. त्यानें शेजारच्या खेड्यांतून माणसें जमविलीं. आणि झाडें झुडपें तोडविलीं. अनेक शतकांच्या अज्ञातवासानंतर अजिंठ्याची लेणीं पुन्हां प्रकाशात आलीं. अजिंठा हें आजहि खेडेंच आहे. परंतु येथील २० गुहांमध्यें मराठी कलावंतांनी जी अमर आणि महनीय लेणीं कोरलीं आहेत, त्याला जगांत कोठें तोड नाहीं. मराठी मन अति कणखर. त्यानें आपल्या हातातील छिनीनें–हातोड्यानें बालाघाटाचा पत्थर कोरून काढला. अडीचशें फुटांचा हा बालाघाट. पण छिनीनें–हातोडीनें त्याचा अंतर्भेद केला आणि त्यांतून काव्याचा स्रोत वाहविला. अचाट कल्पकता, प्रदीर्घ प्रयत्न, अथक परिश्रम यांचें मूर्तिमंत रूपक म्हणजे अजिंठा. शेंकडो वर्षे गेलीं, हजारांचा उलथा-पालथा झाला पण काळाच्या संहारक शक्तीला आव्हान देत हें कलावैभव अद्याप उभें आहे.

अजिंठ्याच्या कलाकृति शिल्पकलेच्या दृष्टीनेच नव्हे तर रंगाच्या बाबतींतहि तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राजापासून रंकापर्यंत, साधूपासून पातक्यापर्यंत सर्व प्रकारची प्रतिकें त्यांनीं बोलकीं बनविलीं आहेत. अजिंठ्याच्या कलापटांतील व्यक्ति स्वकीय, चित्रकारांना परिचित, भोंवतालच्या जगांत प्रत्यक्ष अशा वावरणाऱ्या असल्यामुळें त्या नैसर्गिक नव्हे सजीव असल्याचा भास होतो. वाटतें कीं, या असंख्य व्यक्तींपैकीं कोणाशीं तरी स्नेह जोडावा, तिला हात धरून बाहेर आणावें आणि तिच्याशीं शिळोप्याच्या गप्पा मारीत बसावें! जिवंत या कलाकृति कलाकारांनीं बोलक्या केल्या आहेत. पाषाणाला मात्र—मेघा आणि कलेचा पाझर फोडला आहे साधे रंग पण धन्य त्या कलावंतांच्या कुंचलीची! जिच्या एकेक फटकाऱ्यानें मानवी स्वभावाचा एकेक अमर चित्र

येथें साकार केलेला आहे. महाराष्ट्राच्या या अमर स्मारकाचें ह्यू अेन संगनें मुक्त कंठानें गौरव केलला आहे. सात मुखांनीं जलप्रपाताचा अभिषेक करणारी व घरी नदी, वाकणाच्या मध्यभागीं खोल डोह, प्रवाहाशेजारीं अडीचशें फुट उंचीचा खडा कडा. प्रवाहाच्या सपाटीपासून १००–१२५ फुटांच्या उंचीवर कड्याच्या कुशीवर विसावलेलें हें कलावैभव, भोंवतालीं उंच डोंगर, गर्द राईच्या दऱ्या ! एवढें निसर्गसौंदर्य दुसऱ्या कोणत्याहि लेण्यांच्या वाट्याला आलेलें नाहीं. हिरव्या नवतीची शाल परिधान केलेली रम्य सृष्टीसुंदरी आणि तिच्या मोहकतेला पैंज लावून बसलेली मराठी मनाची ही मोहक कला–नगरी ! वर्षा ऋतूंतील सृष्टीसौंदर्याचा तो मोहक कला विलास पाहिला म्हणजे त्या अज्ञात कलावंतांच्या महान रसिकतेची आणि अभिजात कलाप्रेमाची दुनियेला ग्वाही पटते. रसिकांचें हृदय घेऊन यावें आणि निसर्गाच्या सौंदर्यानें व कला–वैभवाच्या दर्शनानें सतृप्त व्हावें. राजे गेले, राजवटी संपल्या. त्यांची नोंद अितिहासानें ठेवली आहे. पण ज्या रक्त आणि घामांतून हीं अमर लेणीं निर्माण झालीं त्या कलावंतांचें नांव अज्ञातच आहे.

## आपेगांव (औरंगाबाद)

आळंदीस समाधिस्त झालेल्या ज्ञानेशांची हीं जन्मभूमि. संस्कृतच्या बंधनांत अडखळलेल्या ज्ञानाचा प्रवाह सामान्य जनतेपर्यंत नेणाऱ्या ज्ञानेशांची हीं जन्मभूमि. पैजेमध्यें अमृतालाहि जिंकूं शकेल अशा मराठीमध्यें ज्यांनीं ग्रंथरचना केली त्या ज्ञानेशांची ही जन्मभूमि. मराठी वाङमयाची गंगोत्री जेथून निर्माण झाली त्या ज्ञानयोगी ज्ञानेशांची जन्मभूमि आपेगांव ! धन्य तें गांव, आणि धन्य तो पुत्र ! ज्याच्या विचार आणि कल्पना–सौंदर्यानें साऱ्या जगानें मोहित व्हावें, असा हा पुत्र, आणि अशा पुत्रास जन्म देणारी भूमि आपेगांव !

## गोताळें (औरंगाबाद)

कन्नडपासून ६ मैलांवर असलेल्या डोंगरांत श्री गौतम ऋषींच्या अनुष्ठानाची जागा. ऋषीमुनीच्या तपश्चर्येनें पावन झालेली ही भूमि !

## जांब (औरंगाबाद)

स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांचे गुरु, राजगुरु, राष्ट्रगुरु, रामदास. मराठा तितुका मेळवून शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेस मदत केली त्या रामदासांची ही जन्मभूमि. साताऱ्याच्या सज्जनगडाच्या परिसरांत यांचें वास्तव्य असलें तरी रामदास जन्मभू विसरूं शकले नाहींत. रामदासांचें मूळनांव नारायण. ल्हानपणीं आईनें छोट्या नारायणास विचारलें " काय करतोस ? " छोट्या

नारायणानें " आई, चिंता करितों विश्वाची ! " असें उत्तर दिलें. मोठ्या आग्रहानें नारायण लग्नासाठीं उभा राहिला. आणि भटजींनें 'सावधान !' म्हणतांच नारायण सावध झाला. भारतयात्रा करून नारायण जांबला आला आणि 'आई' म्हणून हांक मारली. अंध मातेला दृष्टी प्राप्त झाली. लग्नाच्या अन्तरपाटामागून पळून गेलेला नारायण परत जांबला आला हें पाहून वियोगी वृद्ध मातेचें हृदय उचंबळून आलें. मातेला पुत्र कडकडून भेटला. या साऱ्या घटना जांबच्या भूमीमध्में घडल्या. आणि येथल्या भूमीनें या घटना जतन करून ठेवल्या. एकादा प्रवासी जांबला गेला तर हें सारे प्रसंग चित्रपटाप्रमाणें डोळ्यासमोरून जातात. परतूड स्टेशनपासुन १५ मैलांवर जांब आहे.

## *असई (औरंगाबाद)*

या भूमीवर २३ सप्टेंबर १८०३ मध्यें जी लढाई लढली गेली त्या लढाअीनें अिंग्रजांना भारताचे शासक बनविले. मराठे आणि अिंग्रज यांच्यामध्यें ही ऐतिहासिक आणि निर्णयात्मक अशी लढाई झाली. या लढाअींत अिंग्रज विजयी झाले. भारताचे शास्ते बनले. या लढाईनें भारताच्या अितिहासाचें पान उलटविलें. या ऐतिहासिक लढाईचा दुर्दैवी परिणाम असईच्या भूमीनें पाहिला आहे.

## *जालना (औरंगाबाद)*

एक अितिहास प्रसिद्ध शहर. हें रामराजाच्यावेळीं प्रसिद्धीस आल्याचें सांगतात. औरंगजेब येथें नेहमीं येत असे. १६७९ मध्यें शिवाजीनें व १७०० मध्यें राजारामानें हें शहर लुटलें होते. येथें पूर्वीं व नंतर अनेक लढाया होऊन गेल्या. येथील मशीद व सराअी प्रेक्षणीय आहेत. त्यावर लेख आहेत. आनंदस्वामींचें देऊळ मोठें आहे.

## *नांदगीरवाडी (औरंगाबाद)*

कन्नड तालुक्यामधील डोंगरावर शेख मारूफ म्हणून दर्गा आहे. पूर्वीं हें स्थळ नवनाथांच्या वास्तव्याचें स्थान म्हणून ओळखलें जात असें, पण मुस्लीम राजवटीमध्यें शेख मारूफाचा दर्गा झाला.

## *नळदुर्ग (उस्मानाबाद)*

बोरी नदीच्या १५० फुटांच्या खोल दरीमध्यें बांधलेला हा नळदुर्ग. १४ व्या शतकांत मोंगली स्वारीच्या आधीं चालुक्य राजघराण्याची मालकी असलेला हा किल्ला. बोरी नदीच्या अडविलेल्या पाण्यामधील या किल्ल्याचा पाणीमहाल पाहण्यारखा आहे.बहामनी राजवट या किल्ल्यानें पाहिली आहे. बहामनी राज्याचे

तुकडे उडाले, आणि नळदुर्ग किल्ल्याच्या स्वामित्वाबद्दल विजापूरच्या अदिलशहा आणि अहमदनगरचा सुलतान यांच्यांत भांडण लागले. बहामनी राज्याच्या सैन्यास पाणी पुरवठ्याची योजना बोरी नदीच्या धरणामधून केलेली होती. स्थापत्य–शास्त्राची प्राचीन पूर्णतेची येथें कल्पना येते. राक्षसासारखीं अजस्त्र कामें करणाऱ्या आजच्या यंत्रयुगांत याचें महत्त्व वाटणार नाहीं. पण इतिहासाची परंपरा या दृष्टीनंच अशा वास्तूंचें मूल्यमापन व्हावयास हवें !

### औसा (उस्मानाबाद)

हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचें आहे. निजामशहाचा प्रधानमंत्री मलिक अंबर यानें फितुरीच्या जोरावर येथील किल्ला हस्तगत केला आणि गांवाचें नाव बदलून अंबरपूर हे नांव ठेवलें. या किल्ल्याच्या सभोंवतीं दुहेरी प्रचंड तटबंदी आहे. या तटबंदीभोंवतीं खंदक आहे. या किल्ल्यावर १८ फूट लांबीची प्रचंड तोफ आहे. प्रचंड जुन्या इमारती अद्याप आहेत. त्यापैकीं ७२ फूट लांब व ५० फूट रुंदीची भुयारी इमारत पाहण्यासारखी आहे. औरंगजेबानें बांधलेली दक्षिणेतील पहिली मशीद या किल्ल्यावर आहे.




# पन्नालाल हिरालाल अग्रवाल

## पन्नालाल अग्रवाल यांचा वाडा

—०० पान दरीबा रोड, औरंगाबाद ००—

## सर्व प्रकारचे इमारती सामानाचे विक्रेते

### — आमचें वैशिष्ठ्य —

० सिमेंट पत्रे, रिजेस, पाईप; पाईप फिटींग सेप्टीक टँक, रुफ क्रॅक मिक्शर, सिमेंट प्लेन व मोझेक टाईल्स, मारबल व मोझेक टेबल टॉप्स.

० सॅनेटरी फिटींग ( वॉटर क्लोसेट, वॉश बेसीन, सिर्टन ) मेनहोल कव्हर, लेड पाईप.

० सागवान व सिंगापूर कट साईज लाकूड.

० आयर्न, हार्डवेअर साहित्य, बिडाचे व सिमेंटचे कठडे व जाळी.

० सर्व प्रकारचे ऑईल व वॉटर पेन्ट.

० स्टोन वेअर, कास्ट आयर्न व गॅल्व्हनाईज्ड पाईप व फिटींग.

० हार्ड बोर्ड, प्लायवुड वगैरे स्वस्त भावांत मिळेल.

स्टॉकिस्ट :- १) ॲसबेस्टॉस सिमेंट मुलुंड.
२) नोबल पेंट अँड वार्निश कंपनी.
३) इंपिरीयल कामेकल इंडस्ट्रीज. पेंट)

ओवासा तालुक्यांत असलेली जुम्मा मशीद ही विजापूरच्या मशिदीसारखी बांधली गेली आहे.

## दाबर लेणें-धमार लेणें आणि लचिंदर लेणें (उस्मानाबाद)

या तीन लेण्यांचा गट बालाघाटाच्या कुशींत विसावलेला आहे. जैन आणि वैष्णव धर्मीयांची हीं लेणीं. अि. स. पूर्वी ५०० ते ६५० या कालांत हीं लेणीं खोदलीं गेलीं असावीं, असा अंदाज आहे.

## परंडा (उस्मानाबाद)

बहामनी राज्याचा मुख्यप्रधान महंमद गवान यानें येथील किल्ला उभारला. किल्ल्याच्या उंच तटबंदीवरील तोफ पाहण्यासारखी आहे. सन १६०५ मध्यें अहमदनगरच्या निजामशहानें हा किल्ला जिकून घेतला. मोंगल बादशहा शहाजहानच्या सेनापतीनें हा किल्ला जिंकण्याचा १६३० मध्ये निष्फळ प्रयत्न केला. उस्मानाबाद ते परंडा एस. टी. सर्व्हीस आहे.

## तेर (उस्मानाबाद)

अति प्राचीनकालीं टॉलेमीनें या गांवाचा 'तगर' असा उल्लेख केलेला आहे. या 'तगर' तथा तेरची मलमल ही साऱ्या भरत खंडांत प्रसिद्ध पावली होती. प्रागैतिहासिक आर्ष साधनें येथें भरपूर आहेत. येथील उत्खननांत दक्षिण भारताच्या प्राचीन अितिहासावर प्रकाश पाडणारीं अनेक साधनें उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्राच्या अध्यात्मिक लोकशाहीच्या प्रभावळींत चमकणारे गोरोबा कुंभार याच गांवचे होत. गोरोबा हे हरिभक्त हरिभजनांत ते रंगून गेले म्हणजे देहाची शुद्धी रहावयाची नाहीं. त्यांचा व्यवसाय कुंभाराचा. मडक्यासाठीं एकदां ते चिखल तुडवित होते. त्याचें मूल खेळत खेळत तेथें आलें. आणि हरिभजनात दंग झालेल्या गोरोबांच्या पायाखालीं तुडविलें गेलें. पण गोरोबांना याची वार्ता नाहीं. देहभान विसरून गेले होते. याचवेळीं साक्षात पंढरीचा पांडुरंग (विठ्ठल) तेथें आला, नि तुडविल्या जाणाऱ्या मुलाला वांचविलें. ही सारी कथा या तेरचीच ! इथल्याच भूमीनें आपल्या जवळची माती गोरोबांना दिली आहे. आपली विदेहावस्था अभंग राखणाऱ्या संताची ही भूमि आपणास कशी विसरतां येईल ?

## तुळजापूर (उस्मानाबाद)

केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर साऱ्या भरत खंडाची ही आई जगदंबा ! नवरात्रांत-दसऱ्याला, आश्विनी पौर्णिमेला प्रचंड यात्रा भरते. 'गड तुळजापूर' असा उल्लेख या स्थानाचा केला जातो. 'तूं कां आई !' म्हणून भगवान श्री

रामचंद्रांनीं या जगदंबेला संबोधलें. अद्यापहि कोणी या देवीला 'तुकाई' या नांवानें ओळखतात. कोल्हापूर व सातारा येथील छत्रपतींनीं या देवीला नैवेद्य म्हणून भरघोस देणग्या दिल्या आहेत. अहिल्याबाई होळकरांनींही आपली सेवा या देवीच्या चरणीं अर्पण केली आहे. छत्रपति शिवरायाची व आख्या मराठमोळ्यांची कुळ-स्वामिनी देवी येथें राहात आहे. श्रीरामचंद्रांना या तुळजाभवानीनें वर दिला म्हणून समर्थ रामदास रामवरदायिनी म्हणून या देवीला आळवितात. या देवी-च्याच प्रसादानें मावळ्यांनीं मराठी स्वातंत्र्याचा पोत पाजळला, आणि अटकेपार भगवा झेंडा नेला. या भवानी देवीनेंच शिवरायास तलवार दिली. याच भवानी तलवारीनें हिंदुपदपातशाही निर्माण केली. सारा महाराष्ट्र दसऱ्याच्यावेळीं सोनें लुटून येतो तेव्हां कमरेला लटकाविलेली तलवार बाजूस सारत लुटलेलें सोनें याच देवीच्या चरणीं अर्पण करतों, नि मानाचा तीन वार लवून मुजरा करतो. सोला-पूर स्टेशनवरून तुळजापुरास मोटारीनें जातां येतें.

### वडवळ (उस्मानाबाद)

मध्य रेल्वेच्या परळी-बेदर फाट्यावरचें हें एक किरकोळ स्टेशन. रामजोशी होनाजी बाळा, अनंत फंदी या शाहिरांचा कुलस्वामी 'सिद्ध नागेश' या वडवळ-चाच ! मराठी शाहिरांच्या परंपरेची गंगोत्री सिद्ध नागेशनीं निर्माण केली. सिद्ध नागेश हा मराठींतील पहिला शाहीर. मराठीचें संत वाङ्मय मराठवाड्याच्याच भूमींतून अंकुरलें असलें तरी मराठी मनाला बेहोष करणाऱ्या शाहिरी काव्याचें आजोळ मराठवाडाच आहे, हें विसरून कसें चालेल ?

### मैलार

एका महान तपस्व्याच्या शापानें हें गांव ओस पडलें. आणि येथें भुतांचा नंगानाच चालू झाला. भूतांचें मैलार म्हणून हें गांव विशेष प्रसिद्ध आहे. या भूतांच्या गांवीं मल्हारीनें वसति केली. आणि भूतांचा सात कोट करून केलेला अभेद्य किल्ला जिंकला. या बहादूर मल्हारीचा 'येळकोट' मूळ येथेंच गाजला. अजूनहि मराठी जनता जेजुरीचा खंडोबा, खोचीचा बहिरोबा, जोतिबा, आणि मैलारचा मल्हारी यांचा येळकोट करून भंडारा भक्तिभावानें भाळीं लावते. महा-राष्ट्राच्या कपाळीं गुलाल-बुक्क्याअितकाच हा भंडारा विशेष खुलून दिसतो.

### उदगीर (उस्मानाबाद)

या शहराच्या भोंवताली मजबूत अशी तटबंदी व चारी बाजूस मोठे दरवाजे

आहेत. उदगीरचा किल्ला प्रसिद्ध आहे. मराठे व निजाम यांच्यामधील निर्णायक लढाई (१७६०) येथें झाली. मराठयांच्या ६०००० सैनिकांनीं हल्ला करून निजामास पराजित केलें. तेव्हां मराठे व निजाम यांचा तह झाला. या तहानुसार आपल्या प्रांताचा एक भाग व वार्षिक ६० लाख रुपयांची खंडणी देण्यास निजामास भाग पाडले. हा तह निजामास अपमानकारक व असमाधानकारक वाटला. त्यानें लवकरच आपला प्रांत जिंकून घेतला. मराठी व कन्नड या दोन्ही भाषा येथें चालतात. बेदरपासून ६० मैलांवर उदगीर आहे. नांदेडहून उदगीरला एस. टी सर्व्हिसनें जातां येते

## कुलपांक (परभणी)

जैन धर्मीयांचें प्रसिद्ध क्षेत्र. अखिल भारतीय जैनांचें हें यात्रास्थान होय. येथें जैनांचीं प्राचीन मंदिरें आहेत, त्याचबरोबर हिंदुंचींहि प्राचीन मंदिरें आहेत कन्नड आणि संस्कृतमध्यें खोदलेले अनेक शिलालेख येथें सांपडतात. या शिलालेखांवरून या स्थळाचें प्राचीन ऐश्वर्य व गौरव समजतो. आलेर रेल्वे स्टेशनपासून कुलपांक ४ मैल आहे. तेथपर्यंत वाहनासाठीं पक्की सडक केलेली आहे.

## औंढा (परभणी)

साऱ्या भारतांत प्रसिद्ध असलेल्या १२ ज्योतिर्लिंगापैकीं हें एक ज्योतिर्लिंग मानलें जातें. येथील नागनाथाचें मंदिर अतिप्राचीन व पौराणिक आहे. ७२०० चौरस फुटांवर हें मंदिर उभारलें आहे. मंदिराची एकूण उंची ६० फूट आहे. मंदिरावर हजारों मनुष्याकृति, घोडे, हत्ती, बैल याचें शिल्प प्रेक्षणीय आहे. हें मंदिर पांडवकालीन असून युधिष्ठिरानें नागनाथाची प्राणप्रतिष्ठा केली असल्याचा उल्लेख कावेरी खंड, पद्मपुराणांत आहे. आपल्या भक्तिभावानें पंढरीच्या विठ्ठलाला बोलके करणाऱ्या नामदेवाला सर्वाभूति परमेश्वर असल्याचा साक्षात्कार विसोबा खेचरांनीं याच स्थळीं पटविला. कर्मठ घटपटापेक्षां भावनेचा ओलावा श्रेष्ठ असतो, हें तत्त्व आपलें देऊळ फिरवून येथल्याच नागनाथानें दाखविलें. मराठी संस्कृतीच्या इतिहासांत आत्मानुभव आणि कटुसत्याचा आविष्कार या दृष्टीनें या नागनाथाचें स्थान मानाचें आहे.

पूर्णा–हिंगोली रेल्वे लाईनवरच्या चौंढी स्टेशनपासून औंढा १२ मैल आहे. जिंतूर–नांदेड या एस. टी. लाईनवर औंढा आहे.

## बामणी (परभणी)

सरस्वति व पूर्णा देवीचीं मंदिरें येथें आहेत. १००० वर्षापूर्वीचें हें देऊळ

असल्याचा अंदाज आहे. प्राचीन स्थापत्य-शास्त्राचा एक नमुना म्हणून या देवालयाचें महत्त्व आहे.

### खैरीं (परभणी)

हिंगोली तालुक्यांतील हें गांव. सभोंवतीं ३० फूट उंचीची, १२०० चौरस फुटांची मजबूत भिंत अद्याप आहे. हिंदु आणि मुसलमान यांचें हें यात्रास्थान आहे. हेमाडपंती देवळें मोठ्या प्रमाणांत या गांवीं आहेत.

### गंगाखेड (परभणी)

परभणी-परळी या रेल्वे फाट्यावरचें हें गांव. गोदावरी नदीच्या जलस्पर्शानें या गंगाखेडला धार्मिक महत्त्व प्राप्त झालें. हें एक धर्मक्षेत्र मानलें जातें. येथील वस्ती बरीच जुनी असल्याचा उल्लेख जुन्या कागदपत्रांत आढळतो. येथील राजमहाल जीर्णावस्थेंत असला तरी प्रेक्षणीय आहे. गोदावरीच्या कांठीं जहागिरदारांनीं विस्तीर्ण असे घाट बांधले आहेत. नांदेड-गंगाखेड एस. टी. सर्व्हीस आहे.

### नांदेड

मध्यरेल्वेच्या मनमाड-सिकंदराबाद फाट्यावरचें हें स्टेशन. गोदामाईच्या तीरावर हें गांव वसलें आहे. नांदेडचें मूळनांव ' नंदगिरी '. येथें शीखांची वस्ती मोठ्या प्रमाणांत आहे. शीख पंथाचे १० वे गुरु श्री गुरुगोविंदसाहेब यांची समाधि येथें आहे. त्यामुळें शीखांचें हें धर्मक्षेत्र बनलें आहे. शीखांचें गुरुद्वार प्रेक्षणीय आहे. गुरुद्वारचा घुमट सोन्याच्या पत्र्यानें मढविला आहे. आज जिल्ह्याचें ठिकाण म्हणून महत्त्व असलें तरी, नांदेडनें प्राचीन राजघराण्याचे अितिहास घडविले आहेत, पाहिले आहेत. येथली पंडित परंपरा अज्ञात असली तरी लुप्त नाहीं. ' सुश्लोक वामनाचा ' असा मराठी शारदेच्या दरबारांत मानाचा तुरा शिरीं खोवणाऱ्या वामन पंडितांची ही भूमि. चक्रधर स्वामींनीं आपल्या या यावेळी येथल्या मातीवर आपलीं पावलें उमटविलीं आहेत.

### मालेगांव (नांदेड)

नांदेड जिल्ह्यांतील अति जुन्या वस्तीचें गांव म्हणून मालेगांव उल्लेखिलें जातें. वर्षांतून १ महिनाभर येथील जत्रा भरत असते. यावेळीं जनावरांचा मोठा व्यापार होतो.

### उनकेश्वर (नांदेड)

श्रीरामचंद्र प्रभु पंचवटीस गेले, तेव्हां त्यांची पायवाट उनकेश्वरापासूनच

गेलेली आहे. हा गांव किनवट तालुक्यांत आहे. वाल्मिकी अरण्यकांडांत रामचंद्राच्या प्रवासाची जी पायवाट सांगितली त्यांत शरभंगाश्रम (उनकेश्वर) याचा उल्लेख केला आहे. या स्थानाला पूर्वीं शरभंग आश्रम म्हणत असत. या ठिकाणीं शरभंग ऋषि राहात असत. देवालयाजवळचीं कुंडें श्रीरामचंद्रांनीं शरभंगाच्या सेवेसाठीं निर्माण केलीं. शरभंगाचा आश्रम पैनगंगेच्या तीरावर वसलेला आहे. येथें उष्ण पाण्याचे झरे आहेत. या उष्णोदकाचें स्नान केल्यानें कुष्ठादि चर्मरोग नाहीसे होतात. या पाण्यांत गंधक असून तें औषधिदृष्टचा उपयुक्त असल्यानें नेहमी रोगी लोकांची ये जा चालू असते. त्रिसुदेव नाईक यांनीं येथील शिवालय शके १२०१ मध्यें बांधल्याचा उल्लेख येथील शिलालेखांत सांपडतो.

## *बासर (नांदेड)*

गोदावरीच्या कांठचें हें गांव. प्रत्येक वर्षीं यात्रा भरते. त्रिवेणी संगमावर हिंदु अंत्यसंस्कार ज्या भावनेनें करतात. त्याच भावनेनें या स्थानावर हिंदु मृत आत्म्यावर कर्म संस्कार करतात व अस्थिविसर्जन करतात.

## *बीड*

जिल्हयाचें प्रमुख ठिकाण. पूर्वीं या शहरास ' दुर्गावती ', ' चंपावती ' अशीं नांवें होतीं. कंकाळेश्वराचें मंदिर प्राचीन व ऐतिहासिक स्वरूपाचें असून प्रेक्षणीय आहे. येथील गुप्त्या प्रसिद्ध आहेत. हें शहर बेंडसूर नदीचें कांठीं आहे. शहराजवळ जी विहीर आहे तिचें पाणी कधींच कमी होत नाहीं, अशी तिची ख्याति आहे.

## *अंबेजोगाई (बीड)*

मराठवाडयांत देवीचीं म्हणून जीं स्थानें आहेत, त्यांत हें एक प्रमुख आहे. विवेकसिंधूचें मंथन करणारे श्री मुकुंदराज अंबेजोगाईचेच. घोडदरीच्या प्रचंड खोऱ्यांत मुकुंदराजांच्या समाधीपासूनच जयवंती नदीचा प्रवाह खळाळून निघतो. निसर्गाचें अमाप सौंदर्य तिथें विखुरलें आहे. श्री दासोपंतांनीं मराठी शारदेची महापूजा अंबेजोगाईसच आरंभिली होती. काश्मीरच्या शालीनें मान खालीं घालावी अशी मराठी शारदेची पासोडी येथेंच निर्माण झाली. दासोपंतांची पासोडी म्हणजे मराठी शारदेच्या अंगावरील महावस्त्र होय. विवेकसिंधूतून परमामृत काढणारे मुकुंदराज, आणि गीतार्णव व पदार्णवांचा महासागर निर्माण करणारे दासोपंत ! या दोघांच्या वास्तव्यानें अंबेजोगाई पावन झाली आहे.

## परळी वैजनाथ (बीड)

परळी वैजनाथला श्री वैजनाथाचें मंदिर आहे. घरीं आलेल्या अतिथीची अिच्छा प्रमाण मानून पोटच्या गोळ्याला बळी देणारा श्रियाळ राजा येथलाच, आणि त्याची कांतीपुरी म्हणजेच परळी वैजनाथ होय ! भारतीयांच्या आतिथ्यशीलतेची गंगा येथेंच दुथडी भरून वहात आहे. श्री जगमित्र नागा यांनीं आपल्या काव्याची राहुटी येथेंच टाकली आहे. वैजनाथांच्या देवळावर मल्हारराव होळकर यांचा दगडी पुतळा बसवून आपल्या श्रद्धेची महापूजा अहिल्याबाअींनीं येथेंच सादर केली आहे. शककर्ता छत्रपतींपासून पेशव्यापर्यंत साऱ्या मराठ्यांच्या धन्यांनीं आपली भाव अंजुलि अिथें वाहिलेली आहे. घोड्याची टाप पाण्यांत न भिजवतां पुण्याचा रस्ता शोधणारा माणिक या परळी वैजनाथचाच. हा रस्ता अद्यापहि " माणिक दंड " या नांवानें ओळखला जातो.



# मराठवाड्यांतील यात्रा, उरुस, मेळावे—

आपल्याला आदर वाटणाऱ्या व्यक्तींबद्दल—स्थळांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं, त्यांची आठवण ठेवण्यासाठीं यात्रा, उरुस, मेळावे वर्षानुवर्षे भरतात. बराच मोठा समाज अशा प्रसंगीं जमतो. व व्यापारी उलाढाल मोठ्या प्रमाणांत होते. पुढील माहिती व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो —

( पुढें दर्शविलेल्या तक्त्यांत यात्रा वा उरुसस्थळांपासून रेल्वे स्टेशन लांब असेल त्या रेल्वे स्टेशनाची नोंद केलेली नाहीं. )

| स्थान | नांव | तिथि | तालुका | स्टेशन |
|---|---|---|---|---|
| जिल्हा-औरंगाबाद | | | | |
| जांब | समर्थ रामदासांचें जन्मस्थान. | माघ वद्य ९. | अंबड. | |
| खुलदाबाद | ख्वा. मुंतखोबोद्दीन. | ७ रबिलावल. | खुलदाबाद. | दौलताबाद. |
| ,, | सै. जैनुद्दीन. | २५ रबिलावल. | ,, | ,, |
| ,, | जर्जरीबक्ष. | ४ रबिलावल. | ,, | ,, |
| कचनेर | पारसनाथ. | कार्तिक ५. | | चिकलठाणा |
| दौलताबाद | बहाउद्दीन. | १५ सफर. | दौलताबाद. | औरंगाबाद. |
| औरंगाबाद | निजामुद्दीन. | १३ जिलकाद. | औरंगाबाद. | ,, |
| औरंगाबाद | रोकडा हनुमान | श्रावण १० | ,, | ,, |
| चामरखार | खंडोबा नवमी | मार्गशीर्ष ७ | | ,, |
| दाहरगांव | देवी मानादेवी. | चैत्र १० | | ,, |
| वेरुळ | घृष्णेश्वर. | महाशिवरात्र. | खुलदाबाद. | वेरुळरोड. |
| म्हैसमाळ | देवी. | माघ शु. १५. | ,, | ,, |
| सातारा | श्रीखंडोबा. | मार्गशीर्ष शु. ६. | औरंगाबाद | |
| कन्नड | | २ शव्वाल. | | |
| चिखलठाणा | रामजन्म | चैत्र शु. ९. | कन्नड. | |
| चिंचोली लिंबाजी | देवी. | फाल्गुन. | ,, | |
| करंजखेडा | ,, | | | |
| वैजापूर | वैजनाथ. | चैत्र वद्य ३०. | वैजापूर | रोटेगांव. |
| ,, | रुकनुद्दीन. | २७ सफर. | ,, | ,, |
| लासूर | दुर्गादेवी. | चैत्र ५. | ,, | लासूर |
| वाकला | | पौष शु. १०. | ,, | |
| गाढे पिंपळगांव | बालाजी | | ,, | |
| सावखेड | | महाशिवरात्र. | | |
| रोना | सै. अल्लाउद्दीन | २५ बहमन | औरंगाबाद | औरंगाबाद |
| पेमागांव | रेणुकादेवी. | चैत्र व. १ | ,, | ,, |
| पैठण | एकनाथांचें जन्मस्थान. | फाल्गुन व. ६. | पैठण | ,, |
| जळगांव | देवी. | | ,, | |

| स्थान | नांव | तिथि | तालुका | स्टेशन |
|---|---|---|---|---|
| शेंदूरवाडा | वलिमिया. | | गंगापूर | |
| उंडनगाव | श्री बालाजी. | वैशाख. | शिल्लोड | |
| म्हसले | श्री भिकनशा वली. | वैशाख शु. १५. | ,, | |
| आनवा | श्रीविठ्ठल. | माघ | भोकरदन | |
| वडोद-तांगडा | देवी | | ,, | |
| बनोटी | श्रीशंकर | महाशिवरात्र | सोयगांव | |
| सोयगाव | श्रीराम | चैत्र शु. ९ | ,, | |

## जिल्हा—बीड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पातरुड शरीफ | दर्गा-वोलेरशाह | २३ रबिसानी | बीड | परळी |
| बीड | कोचकशाह | १ रबिलावल | ,, | जालना |
| मंजलेगांव | ख्वाजा बंदेनवाज | १७ दय | ,, | परळी |
| अंबेजोगाई | योगेश्वरी | मार्गशीर्ष शु, १५ | मोमिनाबाद | ,, |
| परळी | वैजनाथ | माघ व. १३ | ,, | ,, |
| पांडोले | नारायण | कार्तिक शु. १५ | | जहारें |
| दानगांव | मार्वंन देवी | माघ शु. १५ | | परळी |

## जिल्हा—नांदेड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बासर | सरस्वती देवी | माघ व. १३ | नांदेड | बासर |
| कोळंबी | दत्तात्रय | कार्तिक शु. ११ | | उमरी |
| हदगांव | ,, | मार्गशीर्ष शु. १५ | | वारदा |
| कंधार | सैदुद्दीन | १५ रज्जब | | नांदेड |
| मालेगांव | खंडराज | मार्गशीर्ष शु. १४ | | ,, |

## जिल्हा- परभणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| औंढा | नागनाथ | महाशिवरात्र | | चौंडी |
| गंगाखेड | बालाजी | | | गंगाखेड |
| कोलसा | खंडोबा | माघ शु. ७ | | हिंगोली |
| धैरी | ,, | फाल्गुन वद्य १० | | ,, |

जिल्हा--उस्मानाबाद

| स्थान | नांव | तिथि | तालुका | स्टेशन |
|---|---|---|---|---|
| यरमळा | महेश्वरी | चैत्र शुद्ध १४ | | येडसी |
| रामखंड | पारसनाथ | मार्गशीर्ष शु. ५ | | बार्शी |
| उस्मानाबाद | शमसुद्दीन शाह | १५ रज्जब | | येडसी |
| तेर | | चैत्र व. ९ | | औसारोड |
| तुळजापूर | तुळजा भवानी | नवरात्र | | सोलापूर |
| सोनगारी | जैनुद्दीन साहेब | १७ जिल्हेज | | बार्शी |
| कोहिनूर | जिंदाशाह मदारशाह | १८ जमादिलावल | | गुंजोटी |


# Kindly Visit-New Fashions

## Electric Dry-Cleaners

Machali Khadak; AURANGABAD-Dn.

Equipped with the latest American and Swedish Electric Machines to give you the best and prompt service. Real dry-Cleaning with Petrol-stain removing with steam.

**Delivery within 4 days.**

सुंदरता, सौंदर्यापेक्षांहि आपण अंगावर घातलेल्या
कपड्यावर अवलंबून आहे !!

## औरंगाबाद सिल्क मिल्सची

△ सुंदर व वेगवेगळ्या डिझाईनची

△ आपल्या त्वचेच्या रंगाला साजेसी विविध रंगाची

△ मुलायम, पक्क्या रंगाची व टिकाऊ

रेयॉन पातळें व ब्लाऊज शिटस्
खरेदी करा !!

## चादर, ब्लाऊज पिसेस, पातळें खरेदी करतांना

ट्रेड AURANGABAD SILK MILLS मार्क

## औरंगाबाद सिल्क मिल्सचें ट्रेडमार्क पाहून खरेदी करा

सोल एजंट- औरंगाबाद साडी डिस्ट्रीब्युटर्स
औरंगाबाद सिल्क मिल्स कंपाऊंड
पैठणरोड, औरंगाबाद.

मराठवाडा सब एजटस् :- हिरालाल ईश्वरदास, क्लॉथ मर्चंट,
चौक बाजार औरंगाबाद.

औरंगाबाद स्टॉकिस्ट:- १) औरंगाबाद सिल्क शोरूम, स्टेशनरोड.
२) औरंगाबाद सिल्क मिल्स फॅब्रीक, चौक बजार.
३) फॅशन सेंटर, चौक बाजार.

# मराठवाड्यांतील

# सन्त

# आणि

# कवि

# — येथें कर माझे जुळती !!

संतांच्या पदस्पर्शानें पावन झालेला हा मराठवाडा. संतवाणी-बरोबरच कवींचीं कवनेंही येथल्या वायुलहरींवर तरंगत आहेत. संत आणि कवि यांनीं आपल्या लेखणीनें स्वधर्म, स्वत्व व संस्कृति यांची जोपासना केली, त्यांनीं जे कष्ट सहन केले, त्यामुळेंच मानव समाज जगला आणि प्रगत झाला. या संतांचें, शारदा-भक्तांचें, कर्तृत्ववंतांचें उपकार जगाला विसरतां येणार नाहीं. समाजकंटकाबरोबर समाज-रक्षकही जगन्नियंता भूतलावर पाठवित असतो. या सज्जनांच्या अतूट परंपरेमुळें जीवनमूल्यें पुनः पुन्हां शिकविली जात आहेत. अधःपतित समाजाला दिलासा मिळत आहे. हे संत एकाच ठिकाणीं राहणारे, एकच कार्य करणारे असले तरी त्यांना स्थळाचें व काळाचें बंधन नाहीं. त्यांचें कार्य सार्वदेशिक व सार्वकालिक असतें. आपण त्यांच्या-मागें संकुचितता चिकटवितो. विशाल दृष्टीला लहान बनविण्याचा प्रयत्न आपण अहंकारी बनून करीत असतो, आपण त्यांना स्थळाचें बंधन घालतो आणि ठरादिक कालाची फूटपट्टी त्यांच्या कर्तृत्वाला लावण्याचा हास्यास्पद प्रयत्न करतो. श्री मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एक-नाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, समर्थ आदि संत व कवि मराठवाड्यांत जन्मले, पण त्यांचें अवघें जीवित कार्य महाराष्ट्राकरितां-भारताकरितां साऱ्या मानवतेकरितां घडलें. समाजानें या कर्तृत्ववंतांचा छळ केला पण त्यांनीं माऊलीच्या प्रेमानें सारें कांहीं सहन केलें. असे कर्तृत्वाचे गौरी-शंकर वारंवार उदयास येतात हेंच राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षण होय. ही परंपरा कशी टिकली याचेंच हें नम्र विवेचन आहे. अर्थात कार्यपरत्वें हें विवेचन मराठवाड्यापुरतें मर्यादित आहे. —

# मुकुंदराज (इ. स. ११२८-१३००)

मराठीचा आद्य ग्रंथकार म्हणून मुकुंदराजांना परंपरेनें मानण्यांत येतें. मुकुंदराजांच्या स्थळ-काल निश्चितीबद्दल संशोधकांत बरेच मतभेद आहेत. अंबेजोगाईचा राजा जयतपाळ यांच्यासाठीं 'विवेकसिंधु' लिहिल्याचा उल्लेख श्री. चित्राव यांनीं मध्ययुगीन चरित्र-कोशांत केला आहे. तर यक्षदेव वृद्धान्वय 'अन्वयसार' या महानुभाव ग्रंथांतून राजोरारोहणे झाडी मंडळाचा राजा शारंगधर याच्यासाठीं 'विवेकसिंधू' लिहिल्याचा आधार सांपडत आहे. मुकुंदराजाच्या समाधिबाबतहि असाच वाद निर्माण झाला आहे. वैतुलजवळच्या खेडले या गांवच्या पडक्या किल्ल्यामध्यें ही समाधि आहे. अंबेजोगाईस त्यांच्या पादुका असल्याचें विवेचन श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव करीत आहेत. (मध्य-युगीन चरित्रकोश) 'विवेकसिंधू'ची भाषा ज्ञानेश्वरीपेक्षां सोपी व बरीच अर्वाचिन वाटते. नाथपंथी मुकुंदराजांच्या या ग्रंथांत योगानुभवाचें व गुरुभक्तीचें गूढवादी परंपरेला शोभेल असें वर्णन आहे. संसारिकासाठीं त्यांनीं सगुणभक्तीचा राजयोगच प्रतिपादिला आहे. वेदांत व योग यांचा पुरस्कार करणाऱ्या मुकुंद-राजांचा संन्यासावर किंवा कर्मठपणावर भर नाहीं. बंदीस्त आणि तर्कबद्ध रचने-वरून विवेकसिंधूकर्त्यांवर पंडिती वळणाची छाप किती होती हे स्पष्ट दिसतें. आणि एवढा सुश्लिष्ट आणि एवढा कांटेकोर बांधणीचा ग्रंथ मराठी साहित्याच्या प्रारंभकाळीं कसा निर्माण झाला, याबद्दल अचंबा वाटतो.

◆ ◆ ◆

# ज्ञानेश्वर

(१२७१-१२९५) (जन्मकालाबद्दल संशोधकांत मतभेद आहेत.)

महाराष्ट्र शारदेचा हा कंठमणी. मराठीची वाङ्मय-सरिता ज्ञानेशांच्या ज्ञानेश्वरीपासूनच वाहूं लागली. ज्ञानेश्वरांनीं आपली ज्ञानेश्वरी वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी लिहिली-सांगितली. संस्कृतच्या बंधनांत अडकून राहिलेली गीता, साध्या मराठमोळ्या माणसाला कळावी म्हणून 'अमृतातेंही पैजा जिंके' अशा मराठीमध्यें लिहिली. पसरत जाणाऱ्या साधुसंतांच्या वर्तुलाकृति सभेमध्यें गुरु निवृत्तिनाथ हे अग्रस्थानीं बसले आहेत. व त्यांच्यासमोर बसून सभोंवार बसलेल्या श्रोत्यांच्यापुढें आपण गीतेचा अर्थ सांगत आहोंत, असें कळवून ज्ञानेश्वरांनीं

ज्ञानेश्वरीची उभारणी केली आहे. या ग्रंथाची भाषाशैली अति प्रेमळ आहे. प्रत्येक ओवीमध्यें प्रसाद खचून भरला आहे. शब्दसृष्टीनें निर्माण केलेलें बिनतोड चित्र पाहून वाचकाला एक प्रकारचा मोह पडतो. व तो या कल्पना तरंगांत डोलूं लागतो. ज्ञानेश्वरांची उपमा देण्याची धाटणी-अितकी उत्कृष्ट आणि सरस आहे कीं, वाचकांच्या मनांत कवींच्या कल्पना पूर्णपणें बिंबून जातात. व विषयाशीं तादात्म्य पावून वाचक देहभान हरपून जातो. एक उपमा देऊन जेथें अर्थाची उणीव राहते, तेथेंच दुसरी, तेवढ्यानें पूर्तता नीट न झाल्यास तिसरी, असा उपमांचा पाऊस पडत असतो. पण उगाच उपमांचा वर्षाव नसतो. अर्थ आणि उपमा यांचा जडाव नीट जडला कीं, ज्ञानेश्वरांची प्रतिभा पुढे सरकते. ब्रह्मदेवानें निर्मिलेल्या सृष्टीमध्यें जीर्णत्व आणि नाश हे आहेत. पण ज्ञानदेवांच्या शब्द-सृष्टींत जें निर्माण झालें, त्याला जीर्णत्वहि आणि नाशहि नाहीं. तें बाईटहि होत नाहीं, आणि लयहि पावत नाहीं. ज्ञानदेवांच्या कल्पनावृक्षांच्या बागेंतील पुष्पें कधीं कोमेजत नाहींत कीं, त्यांचा परिमल कमी होत नाहीं. अशा या वाग्वल्ल-रीच्या वाटिका आहेत. त्यांच्या फुलांचा बहर सदा सर्वकाळ बहरलेला असतो. अशी ही वाग्वैजयंतीमाला मराठी शारदेच्या कंठांत ज्ञानेशांनीं घातली आहे. ज्ञानेश्वर प्रारंभींच " मी हें सारस्वताचें गोड झाड लावत आहे. तरी तुम्ही याचीं फळें प्रेमानें खुडून घ्या. या मराठीचिया नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळ करीन. येथें संस्कृत आणि मराठी भाषांना एकाच सिंहासनावर बसवीन. " असें प्रति-पादन करतात. ज्ञानेश्वरांची भूमिका रेखीव व कांटेकोर ग्रंथरचना करणाऱ्या भाष्यकाराची नसून शुद्रातिशूद्रांना गीतार्थाची मेजवानी देणाऱ्या रससिद्ध कवी-श्वराची आहे. अमृतानुभव, योगवासिष्ठ, आत्मानुभव, नमन, उत्तर पत्रिका, पंचमुद्रा, चांगदेव पासष्टी आदि ग्रंथरचनाही प्रसिद्ध आहे. मराठवाड्याच्या आपेगांवच्या भूमीनें या सुपुत्रास जन्म दिला. याचा मराठवाड्यास-महाराष्ट्रास अभिमान वाटतो.

◆ ◆ ◆

# जनार्दन स्वामी

हे अगदी कडकडीत दत्तोपासक होते. यांचें मूळ घराणें चाळीसगांवचें. तेथील वतनदार देशपांडे. शके १४२६ मध्यें जन्म झाला. वयात आल्यावर ते पैठणास राहूं लागले. देवगिरीच्या किल्ल्याच्या कारभारीपणाचें काम यांचेकडे होतें. आपली सरकारी नोकरी सांभाळूनदेखील ओीश्वरोपासनेंत असत. यांना पर-

मेश्वराचा साक्षात्कार झाला आहे अशी त्यावेळच्या लोकांची दृढ समजूत होती. यांचे कांहीं अभंग व पदें आहेत. श्रीदत्तस्तुतिपर त्यांचा ग्रंथ असल्याचें सांगतात. पण तो आज उपलब्ध नाहीं. पंचीकरण किंवा आत्मानात्म विवेकसार हा ओवीबद्ध ग्रंथ अलिकडे उपलब्ध झाला असल्याचें प्रा. तुळपुळे सांगतात. देवगिरी-दौलताबादेस यांची समाधि आहे. या पुरुषाचें नांव ग्रंथरचनेपेक्षां त्यांच्या शिष्य समुदायामुळेंच महाराष्ट्रांत अजरामर झालें आहे.

◆ ◆ ◆

# एकनाथ [ इ. स. १५४८--१५९८ ]

ज्ञानेश्वरांच्या खालोखाल प्रसिद्ध असलेला हा सन्तकवि. वारकरी पंथांत ज्ञानेश्वरीच्या खालोखाल एकनाथांच्या भागवताला मान आहे. जन्मही पैठणचा आणि मृत्युहि पैठणचाच. देवगिरीचे जनार्दनस्वामी एकनाथांचे गुरु. प्रत्येक काव्याच्या शेवटीं 'एका जनार्दनी' असा उल्लेख करुन एकनाथांनीं आपली गुरुभक्ति व्यक्त केली आहे. चतुःश्लोकी भागवतावरची टीका एकादशस्कंध भागवत, रामायण, रुक्मिणी स्वयंवर, अनेक पौराणिक आख्यानें एकनाथांनी निर्मिलीं. एकनाथांचीं भारुडं आणि गारुड हीं तर प्रसिद्धच आहेत. पण यापेक्षां महत्वाची कामगिरी म्हणजे एकनाथांनीं शुद्ध केलेली ज्ञानेश्वरी. " ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परि पाठांतरे शुद्धाबद्ध । तो शोधूनि एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ " असा स्पष्ट उल्लेख ज्ञानेश्वरीच्या नव्या प्रतीमध्यें आहे. आणि हीच आवृत्ति आज लोकांपुढें आहे. मराठी भाषेचा एकनाथांना फार अभिमान होता. मराठीची योग्यता वाढावी म्हणून त्यांनीं मुद्दाम मराठींतच ग्रंथरचना केली. फाल्गुन वद्य ६ ही एकनाथ षष्ठी म्हणून महाराष्ट्र आदरानें पाळतो.

◆ ◆ ◆

# मुक्तेश्वर [इ. स. १५७४–१६४५ सुमार.]

एकनाथांचा हा नातू. एकनाथांच्या गोदा नावाच्या मुलीचा हा मुलगा. भक्ति संप्रदायांतून स्फूर्ति घेऊन केवळ काव्यानंदाच्या हेतूनें कलाविलासांत रंगून गेल्यामुळें मुक्तेश्वर हा महाराष्ट्र कवि-मालिकेमध्यें अजरामर झाला आहे. संतपणाची वा महंतपणाची कसलीच उपाधि मुक्तेश्वरांच्या पाठीं नाहीं लहानपणापासून वास्तव्य पैठणलाच आजोळीं होतें. त्यामुळें प्रत्यक्ष नाथाच्या

तालमीतच मुक्तेश्वरांचें शिक्षण झालें. मुक्तेश्वरांचें भारत म्हणजे महाराष्ट्र साहित्यांतील कोहिनूर होय. ओवीबद्ध भारताची पांच पर्वें, श्लोकबद्ध संक्षेप रामायण, हरिश्चंद्र, शतमुख रावण वध, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्र भोजन, आदि अनेक ओवीबद्ध ग्रंथरचना मुक्तेश्वरांनीं केली आहे. कलात्मक रितीनें कथानिरुपण हे मुक्तेश्वरांच्या काव्याचें प्रधान वैशिष्ठ्य. सुन्दर कल्पना, गोंडस शब्द, हृदयंगम अलंकार जेथें जेथें आढळले तेथून वेचून मुक्तेश्वरांनीं आपल्या काव्यांत गुंफले आहेत. निरनिराळ्या फुलांतून मधमाशीनें मधाचा एक एक थेंब आणून मधाचें उत्तम मोहोळ बनवावें, आणि मग कोणता थेंब कोणत्या फुलांतला हें ब्रह्मदेवालाहि ओळखूं येणार नाहीं. तीच अवस्था मुक्तेश्वरांनीं वेचून आणलेल्या शब्दांची आणि कल्पनांची, त्यांच्या या काव्य मोहोळांत झाली आहे. मुक्तेश्वरांची वाग्वल्लरी विश्वेश्वराच्या कृपा-सलिलानें ओलावून तिला स्फूर्तीचे कोंब फुटले, व शब्द-सुमनांचे फुलोरे आले म्हणजे त्यांतील परागांनीं वाचक आणि श्रोते ' शब्द मोतियाचा चारा चरत ' तेथें धुंदून राहतात. आणि मग मुक्तेश्वरांची कल्पनाहि तेथेंच नादावून जाते. व मन मानेल तशी बागडूं लागते. मुक्तेश्वरांच्या ग्रंथरचनेचीं पारायणें महाराष्ट्र मोठ्या भक्तिभावानें करतो. मुक्तेश्वरांसारखा अस्सल कलावन्त पैठणच्या मातीमध्यें लहानपणीं खेळला आहे, गोदामाईचें पाणी प्याला आहे म्हणून मराठवाड्याची मान अधिकच ताठ होते. ◆ ◆ ◆




सूचिपत्र आजच मागवा.

# दासोपंत (इ. स. १५५१-१६१५)

महाराष्ट्रास दासोपंतांची प्रथम ओळख कै. राजवाडे यांनीं करून दिली. तात्कालीन परिस्थितींत दासोपंत मशहूर असले तरी लोकांच्या उदासीनतेमुळें त्यांची ग्रंथरचना प्रकाशांत येऊं शकली नाहीं. सर्व साधारण दासोपंतांची एकदशांश ग्रंथरचना आज उपलब्ध झाली आहे. आणि उरलेली नऊदशांश ग्रंथरचना झपाट्यानें काळाच्या मुखीं पडत आहे. वास्तविक सरकार आणि जनता यांचें या प्रकरणीं लक्ष जरूर वेधविलें पाहिजे. असो.

दासोपंत हे मूळचे बेदरच्या बहामनी राज्यांतील नारायणपेठ येथें राहणारे गालवगोत्री देशस्थ ब्राम्हण. यांचे वडील दिगंबरपंत हे नारायणपेठचे देशपांडे होते. दुष्काळाच्या वर्षीं बादशहाला वार्षिक रसद पोंचविली गेली नाहीं म्हणून बादशहानें दासोपंतास ओलीस म्हणून ठेवले. व १ महिन्याच्या आंत रसद न आल्यास दासोपंतांना बाटवून मुसलमान करूं अशीहि धमकी दिली. आधींच दासोपंतांचें चित्त ईश्वरचरणीं, तशांत हें सुलतानी संकट आलें. यावेळीं दासोपंतांनीं संकट निवारावें म्हणून जी आराधना आरंभिली त्यांतून जें वैराग्य आलें तें कायमचेंच ! हे नेहमीं अंबेजोगाई (मोमिनाबाद) येथें राहात. दासोपंतांची ग्रंथसाधना अक्षरशः अपरिमित आहे. गीतार्णव आणि पदार्णव या दोन साहित्य अर्णवांचा हा निर्माता. गीतार्णव ही फार मोठी आणि विस्तृत अशी गीतेवरची टीका आहे. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व मराठी टीकेमध्यें हिच्याएवढी मोठी दुसरी टीका नाहीं. दासोपंतानीं दूर डोंगरांत बसून केवळ कडूलिंबाचीं पानें व फळें खाऊन हा गीतार्णव निर्माण केला. याच्या रचनेस २० वर्षं लागलीं, अशी समजूत आहे. पंचीकरण ही ग्रंथरचना असलेली पासोडी तर आज अति जीर्ण झालेली आहे. श्री. रामभाऊ कुळकर्णी यांनीं मात्र या पासोडीची प्रतिकृति तयार करून ठेवली आहे. ही त्यांची मराठीची महान् सेवाच मानावी लागेल. मराठी भाषेची ताकद, तसेंच ती भाषा वापरण्याची पंतांची हातोटी, त्यांची गोड वर्णनशैली, भाषाप्रभुत्व यांची त्यांच्या ग्रंथरचनेंत चांगलीच ओळख पटते. दासोपंतांचीं वर्णनें अितकीं यथातथ्य आहेत कीं, त्यांचें तें चित्र वाचकापुढें उभेंच ठाकतें. बारीक सारीक छटा नुसत्या शब्दानें दाखवून देणारें दासोपंतांचें शब्दचित्र कुशल चित्रकाराच्या कुंचलीशीं स्पर्धा करीत आहे, कीं काय असें वाटतें. मराठवाड्याचा हा शब्दप्रभु. याचा साऱ्या महाराष्ट्राला अभिमान.

# रामदास ( अि. स. १६०८–१६८२ )

रामदासांची जन्मभूमि जांब; तपोभूमि टाकळी; कर्मभूमि परळी–सज्जन–गड. वास्तविक सबंध भारत हीच त्यांची कर्मभूमि, पण एकाच ठिकाणीं राहून त्यांनीं सारीं सूत्रें हालविलीं म्हणून कर्मभूमि परळी–सज्जनगड म्हटलें, एवढेंच. महाराष्ट्राच्या श्रद्धावान भूमिमध्यें अनेक संतांनीं निवृत्तीचे मळे लावले, आणि निवृत्तीवादाचें अमाप पीक काढलें निवृत्तीच्या प्रवृत्तीचीं फळें कशीं येणार ? ज्या–प्रमाणें तुळस कितीहि पवित्र असली तरी ती आंब्याचें किंवा बांबूचें कार्य करणार नाहीं. त्याप्रमाणें जनजागृतीसाठीं प्रवृत्तीवादाचाच प्रचार आणि प्रसार केला पाहिजे, हें समर्थांना ओळखलें. शिवकालीन प्रवृत्तीशीं आणि आकांक्षासाठीं पूर्णतया समरस झालेले समर्थ रामदास हेच एक संत–कवि होते. तत्कालीन राजकीय परि–स्थितीविषयीं अितर संतापेक्षां रामदास अधिक जागरूक असत. राजकीय बाबतीं–तला समर्थांचा वाटा वैचारिक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचाच होता. धर्म–रक्षणार्थ स्वातंत्र्य–संपादन हें ध्येय जनतेपुढें ठेवून स्वतःच्या प्रभावी नेतृत्वानें तें ध्येय साकार करविलें. समर्थांच्या वेळची तात्कालीन परिस्थिति ध्यानीं घेतां समर्थांचें हें कार्य अजोड ठरतें. साऱ्या राजकारणाला स्वतःच्या वैचारिक पण सुस्पष्ट नेतृत्वानें एक वेगळें वळण दिलें. आणि अितिहासाचीं पानें उलटविलीं. असा महापुरुष मराठवाड्यानें दिला आहे, हें नाकारून चालणार नाहीं. मराठवाड्याचें हें ऋण महाराष्ट्र कसा विसरेल ?

◆ ◆ ◆

# श्रीधर ( अि. स. १६५८–१७२९ )

लहानापासून थोरापर्यंत, अठरा पगड जातींमध्यें सर्व स्त्री–पुरुषांचा आवडता असा श्रीधरखेरीज दुसरा ग्रंथकार नाहीं. यांचें मूळ घराणें खडकी–औरंगाबादेचें. नोकरीपरत्वें स्थलांतर करावें लागलें. खडकी सोडली पण खडकीचा अभिमान काहीं श्रीधर विसरले नाहींत. “ आम्ही ‘ खडके ’ आमुची किर्तन–गंगा पुरातन हो ! ” असें श्रीधर अभिमानानें सांगतात. रामायण, महाभारत, अितर पौरा–णिक आख्यानें, संक्षिप्त, सुबोध, रसाळ अशा स्वरूपांत कथाप्रिय वाचकांपुढें ठेवलीं. श्रीधरांना कर्तत्वशाली वंशपरंपरा आणि गुरुपरंपरा लाभली होती. नामदेव तुकोबाचे अभंग पसरले खरे पण ते फक्त पुरुषांच्या तोंडीं राहिले, पण श्रीधरांची

ग्रंथरचना बायका—मुलेंदेखील ऐकूं लागलीं, आणि त्या आनंदांत डोलूं लागलीं. जें कथानक सांगावयाचें ते परिस्थितीच्या आणि वयाच्या श्रोत्याला अनुरुप होईल, व त्याच्या मनोविकाराला बरोबर पटेल, असें करून सांगण्याची हातोटी श्रीधर बरोबर जाणत असत. हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप यांचीं पारायणें चातुर्मासामध्यें घरोघरीं होत असतात.

◆ ◆ ◆

## कृष्णदयार्णव [ इ. स. १६७४–१७४० ]

यांचें मूळचें नांव नरहरी. कऱ्हाडनजीकच्या कोपरड गावचे हे रहिवासी औरंगजेबाच्या स्वारीमुळें साऱ्या महाराष्ट्रभर धुमाकूळ माजला होता. या परचक्राच्या फेऱ्यांत नरहरीनें कोपरड सोडलें. आणि फिरत फिरत अंबेजोगाईस त्यांनीं आश्रय घेतला. गोविंद गुरुंचा उपदेश घेतला. व त्यांना कृष्णदयार्णव असें नाव मिळालें. पुढें त्यांना रक्तपितीचा महारोग जडला. व्याधीनें शरीर जर्जर झालें. अशा स्थितींत त्यांनीं दशम स्कंधावरील टीका लिहिण्यास सुरुवात केली. संसारतापानें व शरीर व्याधीमुळें या कवीच्या ग्रंथरचनेवर खिन्नतेची छाया पडली आहे. तन्मयानंदबोध या ग्रंथापेक्षां हरिवरदा या ग्रंथानेंच कृष्णदयार्णव विशेष प्रसिद्ध आहेत. स्वतः व्याधींनीं पोळत असतां वाङमय मोहिनीच्या गोड आलापांनीं श्रोत्यांना संसारतापाच्या दुःखाचा विसर कृष्णदयार्णवांनीं पाडला आहे. वयाच्या ५४ व्या वर्षी हरिवरदा ग्रंथरचनेस सुरुवात केली. ज्या वयांत मनाचे आणि शरिराचे सर्व व्यापार शिथिल व्हावे, त्या वयात अर्धा लक्ष ओवी संख्या असलेला ग्रंथराज निर्मावा, हें केवढें कर्तृत्व ! अंबेजोगाईस राहून त्यांनीं ही ग्रंथसाधना केली आहे. त्यांची ही ग्रंथसाधना अपुरीच राहिली होती. पण शरीरव्याधीनें जोर केला. देवाघरचें बोलाविणें आलें. आणि . . . . . कृष्णदयार्णवाची समाधि पैठण येथें आहे.

◆ ◆ ◆

## भास्कराचार्य [ जन्म इ. स. १११४ ]

प्रख्यात ज्योतिषशास्त्रज्ञ. मूळगांव "विडडालविड" म्हणजे बेदर किंवा बीड असावें. बेदर किंवा बीड हें भास्कराचार्यांचें गांव नसावें असें रानकोशकारांचें मत आहे. पूर्व खानदेशांतील चाळीसगांवच्या नऋत्येस १० मैलांवर असलेल्या पाटणें या गांवीं भवानीच्या मंदिरावर एक शिलालेख आहे त्यावरून कळतें

कीं, भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा देवगिरीच्या सिंघण यादवांचा ज्योतिषि होता. भास्कराचार्यांचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे सिद्धांत शिरोमणी. लीलावती, बीज-गणित, ग्रहगणित आणि गोळ असे चार भाग असून प्रत्यक भाग म्हणजे गणिताच्या एकेक शाखेवरचा स्वतंत्र ग्रंथच होय.

◆ ◆ ◆

# चक्रधरस्वामी (अि. स. ११९४-१२७४)

चक्रधरांनीं १२ वर्षें सातपुड्यांत काढल्यावर ३५ वर्षें महाराष्ट्रांतील तत्कालीन परिस्थितीचें अवलोकन करण्यासाठीं पायीं परिभ्रमण केलें. अर्थातच मराठवाड्याची ही भूमि त्यांच्या पदस्पर्शानें पावन झाली. धर्माचें स्थान कर्मकांडानें घेतलें असून लोकांची दिशाभूल होत आहे हें त्यांच्या नजरेस आलें. श्रद्धावान जनतेस मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविण्यासाठीं चक्रधरांच्या मनानें ओढ घेतली. व पैठणला संन्यास दीक्षा घेऊन त्यांनीं महानुभाव पंथाची स्थापना केली. महानुभाव पंथाची ध्वजा पैठणपासून अफगाणीस्तानपर्यंत गेली होती. महाराष्ट्रांतील महानुभाव पंथ आणि वाङ्मय यांचें महत्त्व मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकाला सांगण्याची गरज नाहीं. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांतील एक मोठा कालखंड या महानुभाव पंथानें व्यापला आहे. हा पंथ पैठणास जन्मास आला म्हणून मराठवाड्याचा उल्लेख मोठ्या गौरवानें अितिहास करीत असतो.

◆ ◆ ◆

# कृष्णदास मुद्गल

हे बहुतेक मुक्तेश्वरांच्या अगोदर होऊन गेले असावेत. कृष्णदास मुद्गल हे पैठणचे राहणारे होत. मुक्तेश्वरांप्रमाणेंच अध्यात्म निवेदनापेक्षां कथानिवेदनावर व साहित्य निर्मितीवर यांचा विशेष भर होता. त्यांची 'रामायण—युद्ध—कांड' ही ग्रंथरचना तत्कालीन परिस्थितींत अति लोकप्रिय होती. कृष्णदासांच्या या युद्ध-कांडांचीं पारायणें मराठेशाहींत किल्ल्या किल्ल्यावर होत असत. या ग्रंथाच्या पारायणानें युद्धसामर्थ्य अंगीं येऊन यश प्राप्त होतें अशी त्या काळची समजूत होती. मराठ्यांच्या स्वाभाविक युयुत्सु वृत्तीला प्रोत्साहन देणारें हें वीररसप्रधान काव्य आहे. रामायणांतल्या फक्त एका कांडावर एवढ्या विस्तारानें लिहिलेला मराठींत दुसरा ग्रंथ नाहीं.

◆ ◆ ◆

# विसोबा खेचर

हे पैठणजवळच्या मुंगीचें राहणारे असें 'सारस्वत'कार म्हणतात, तर परभणी जिल्ह्यांतील औंढ्याचे राहणारे आहेत असे प्रा. तुळपुळे म्हणतात. विसोबा कोठलेही असले तरी ते मराठवाड्याचेच आहेत हे निश्चित. विसोबा हे पेशानें व्यापारी असल्यानें त्यांच्या अभंगामध्यें व्यावसायिक शब्द नेहमीं आढळतात. ज्ञानेश्वरानीं विसोबाला उपहासानें 'खेचर' म्हटलें होतें, पण विसोबा योग मार्गांत अितके प्रगत झाले कीं, हीच पदवी त्यांना शोभून दिसूं लागली. याच विसोबांनीं औंढ्याच्या नागनाथाच्या देवळांत नामदेवाला शिवपिंडीचा विश्वव्यापक असा अनुभव दिला. त्याकाळीं व्यापाऱ्यामध्यें चालूं असलेल्या नंदभाषेमध्यें त्यांनीं कांहीं अभंग केले आहेत. ◆ ◆ ◆



मुंबई डेपो :— दत्तमंदिर, विद्यारामभाई वाडी,
ठाकूरद्वार रोड, मुंबई २

# जगमित्र नागा

' जगमित्र राहे प्रतिष्ठानीं । द्रव्याचा व्यवसाय करूनि । अतर्केच नव्हे तर तो ' लक्षापति धनि ' । असें जगमित्र नागाचे चरित्रकारांनीं म्हटलें आहे. एका-एकीं विपरीत काल आला. जवळ होतें तें सर्व गेलें. द्रव्य गेल्यावर पत तरी कशी राहणार ? तीही गेली. शेवटीं ईश्वरास शरण जावून ईश्वरोपासना आरंभिली. जगमित्र नागाचे कांहीं अभंग व पदें उपलब्ध आहेत.

◆ ◆ ◆

# नागेश

हा बालेघाटाकडील राहाणारा साधुपुरुष. सदासर्वकाळ अयाचित वृत्तीनें जगांत राही. सर्व प्राणीमात्रांत, सर्व वस्तूंचे ठायीं परमेश्वर भरला असून त्यांत कोणताहि भेदाभेद नाहीं, असें तो मानी. जें मिळेल तें खावें. चांगलें किंवा घाण हा विकल्प मनांत न आणतां मिळेल तें पाणी प्यावें. मोरीतलें घाण पाणीहि गंगा-जलाप्रमाणें शुद्ध व पवित्र समजून घटाघट पीत असे. कोणी रेड्याचें ओलें कातडें दिलें तर तेंही तो पांघरी. सर्व वस्तु मंगल आहेत. सर्वव्यापी परमेश्वराखेरीज कांहीं रितें नाहीं, अशी या साधुपुरुषाची भावना होती. तसा तो प्रचारहि करी.

◆ ◆ ◆

# शिवदिननाथ (१६९८–१७७४)

शिवदिननाथ त्यांचा मठ व शिष्यपरंपरा पैठण येथें आहे. पैठण येथें गोदा-कांठीं शिवदिननाथांचा भव्य मठ अद्यापहि आहे. शिवदिननाथ हे यजुर्वेदी कौशिक गोत्री ब्राम्हण. शिवदिननाथ लहानपणीं अति खोडकर आणि छांदिष्ट. त्यांच्या वडिलांनीं शिवदिननाथांना केसरीनाथांच्या स्वाधीन केलें. केसरीनाथांच्या कडक शिस्तीमुळें या खोडकर मुलाच्या जीवनास नवें वळण लागलें. शिवदिननाथांनी मराठेशाहीची भरभराट पाहिली त्याचप्रमाणें पानिपतच्या संग्रामानें मराठेशाहीला बसलेला धक्काहि पाहिला होता. त्यांनीं आपल्या मठाची नीट व्यवस्था लावून त्यास चांगला व्यवस्थितपणा आणला. शिवदिननाथांची पद्यरचना मोठी ठसकेबाज आहे. ' विवेकदर्पण ' आणि ' ज्ञानप्रदीप ' हे दोन सांप्रदायिक ग्रंथ शिवदिननाथांनीं

रचले. अस्पृश्याच्या हातून सरकारी पोतें भरणा झाला म्हणून कांहीं तें द्रव्य विटाळत नाहीं. त्याचप्रमाणें यावनी भाषेमध्येंदेखील ज्ञान विटाळत नाहीं. ' असा मार्मिक युक्तिवाद शिवदिननाथांनीं एके ठिकाणीं केला आहे.

◆ ◆ ◆

## अमृतराय– ( इ. स. १६९८– १७५३ )

या कवीचा मराठवाड्याशीं फारच थोडा संबंध येत आहे. अमृतराय हे औरंगाबादच्या विसोमोरो या श्रीमंतांच्या पदरीं कारकून म्हणून काम करीत होते. परन्तु यांच्यासारख्या रंगेलांचे तेथें कसें काय जमणार ? " विसोमोरोला सांगा, पुरे तुझी नोकरी " असें म्हणून नोकरी सोडली, व भिक्षावृत्ति स्विकारली. एव- ढाच मराठवा... संबंध. पण एवढाच संबंध मराठवाड्याचें मन सुखविण- आहे. ... नांवाप्रमाणेंच गोड होती. त्याची बरीच- प्र... ...ाव विशेष प्रसिद्ध. अमृतरायांचे कट- ... मान डोलविली. अमृतरायनंतर अनेकांनी 'मुकुंद- ... अनुकरण केलें आहे. ...धम धारण ... मराठी ... भाषे-

## गोपाळनाथ [ मृत्यु शके १६८८ ]

औरंगाबादेनजीक सलाबतपूर येथें गोपाळनाथ राहात असत. गोत्र कौंडिण्य. वडिलांचें नांव गोविंद आणि आईचें नांव आनंदीबाई. गोपाळनाथांचा ' सिरोमणी ' नांवाचा नऊ हजार ओव्यांचा एक ग्रंथ आहे. ' समाधिबोध ' ही लहान ग्रंथरचना आहे. गोपाळनाथांच्या धाकट्या भावानें गोपाळनाथांचें पद्यमय चरित्र लिहिलें आहे. गोपाळनाथांनीं त्रिपुटी येथें जिवंत समाधि घेतली.

◆ ◆ ◆

## गोरा कुंभार [ जन्म शके ११८९ ]

ज्ञानोबा–तुकोबांनीं महाराष्ट्रामध्यें जी अध्यात्मिक लोकशाही निर्माण केली, त्या लोकशाहीच्या मानकऱ्यांत गोरोबांचें स्थान बरेंच वरचें आहे. तत्कालीन संत–वर्तुळांत गोरोबा वयानें सर्वांत वडील होते. म्हणून सर्वजण त्यांना गोरोबा काका म्हणत. जसे वयानें श्रेष्ठ तसे वैराग्यांतहि श्रेष्ठ होते. मडकीं घड-

विण्यासाठीं माती आणावी, ती मऊ होण्यासाठीं पायानें तुडवावी, माती तुडवितांना पंढरीनाथाचें नांव घ्यावें, आणि प्रेमाच्या आनंदांत तासन्‌तास डोलत रहावें, असा गोरोबा काकांचा नित्यक्रम असे. गोरोबांची कांहीं अभंगरचना प्रसिद्ध आहे. गोरोबा नामदेवाचा उल्लेख वारंवार प्रेमानें करतात. म्हणे गोरा कुंभार, अनुभवाचा ठेवा । प्रत्यक्ष नामदेवा भेटलासी ॥ गोरोबांचा ज्ञानेश्वरांच्या संत मंडळामध्यें एवढा अधिकार असे कीं, नामदेव परमार्थात कच्चा कीं पक्का ठरवितांना गोरोबा काकांचा शब्द प्रमाण मानला गेला. ' परब्रह्म म्हातारा निवाला अन्तरी ' हे मुक्ताबाईंचे उद्‌गार सार्थ वाटतात. गोरोबा हे —राठवाड्याच्या तेरचे राहणारे. मराठवाड्याची माती गोरोबा काकांनीं आपल्या ‌ानीं तुडवली आहे. संतांच्या पावन धुळीमध्येंच मराठवाड्याचें मन ‌सतें.

हा व

जगांत राही

कोणताहि

हा विक

जलाप्र

◆ ◆ ◆

# रेणुकानंदनाचा विठा

या कवीचा काळ कै. राजवाडे शके १५०० च्या सुमारास असावा, असें म्हणतात, हा कवि म्हणून जसा प्रसिद्ध होता तसा साधू म्हणूनहि प्रसिद्ध असे. रेणुकानंदन हे गुरुचें नांव. पण आदरानें कवीनें तें नांव आपल्या नांवापुढे जोडलें, आणि रेणुकानंदनाचा विठा प्रसिद्ध झाला. विठा रेणुकानंदन देवी उपासक असला तरी राम चरित्रावर त्याची फार भक्ति होती. याचीं कांहीं पदें सरदार मिरीकर यांच्या वाड्यांत असल्याचें प्रा. तुळपुळे सांगतात.

◆ ◆ ◆

# गिरिधरस्वामी– ( मृत्यू शके १६५१ )

हे मूळचे राहणारे मिरजेजवळील. समर्थशिष्या वायजाबाई हिचे हे शिष्य. गिरीधर स्वामींनीं समर्थ रामदासांना प्रत्यक्ष पाहिलें होतें व त्यांचा सहवासहि कांहीं काळ त्यांना घडला होता. ' समर्थ प्रताप ' ही त्यांची प्रमुख ग्रंथरचना होय. या ग्रंथासह ४० ग्रंथ, श्लोक हजार पंचराशें पद्यें इतकी यांची रचना आज उपलब्ध आहे. रामदासी परंपरेमध्यें गिरीधरस्वामी इतकी ग्रंथरचना अन्य कोणाची नाहीं. बीड येथील सीताराम मठामध्यें गिरीधरांच्या ग्रंथांचा संग्रह आहे. गिरीधरांना सारा दासबोध मुखोद्‌गत असावा, असें दर्शविणारी

टिपणवही त्याच मठामध्यें उपलब्ध झाली आहे. बीड जिल्ह्यांत अिट येथें त्यांची समाधी आहे.

◆ ◆ ◆

## नरसोबा

हलयाळी गांवच्या पाटलांचे हे चिरंजीव. आमरण ब्रह्मचारी राहून भालकी येथील रामदासी मठाचे अधिपति झाले. नरसोबांच्या जन्ममृत्यूचे सन उपलब्ध नाहींत. त्यांनीं पेशवाअीची अखेर आणि अिंग्रजांचा प्रारंभ पाहिला होता. भालकीच्या मठामध्यें नरसोबांच्या अभंगांची वही उपलब्ध झाली आहे. या वहींत चौचरणी ५७ व दोचरणी ७९ मिळून १३६ अभंग आहेत.

◆ ◆ ◆

## मुकुंदसुत ( शके १७१३–१७७३)

यांचें मूळचें नांव गोविंद श्रीनिवास देशपांडे हें संत कवि असून 'मुकुंद–सुत' या नांवानें ते पद्यरचना करीत. त्यांनीं वृद्धापकाळीं संन्यासाश्रम धारण केला व "नित्यानंद स्वामी" हें नांव घेतलें. मुकुंदसुतांचा संस्कृत, मराठी, प्रमाणें पर्शियन भाषेचाहि अभ्यास होता. त्यांची मराठीप्रमाणें पर्शियन भाषे–मध्येंहि थोडी पद्यरचना आहे. त्यांनीं स्वत:च्या वंशावर एक बखर लिहिली आहे. हे नांदेड येथें रहात असत. त्यांचें सारें आयुष्य दारिद्र्यांत गेलें.

◆ ◆ ◆

## श्री. शुकानंद वसमतकर (मृत्यू शके १७४९)

हे वसमतचे राहणारे. हे संतकवि असून त्यांच्या कविता संग्रहरूपानें 'काव्यसंग्रह' मध्यें प्रसिद्ध झाल्या आहेत. या कवीविषयीं अधिक माहिती उपलब्ध नाहीं.

◆ ◆ ◆

## हंसराज [ शके १७२० ते १७७७ ]

हे परभणीच्या गंगाधर पंतांचे चिरंजीव. मूळचें नांव नारायण. अैन संसा–राच्या अर्ध्या डावावरून कन्या आणि कांता उठून देवाघरीं गेली. नारायणास

वैराग्य प्राप्त झालें आणि 'नारायण बोवा' बनले. पंढरीस येऊन संन्यासाश्रम घेतला. 'हंसप्रद्धति' या ग्रंथामध्यें हंसराजाचें विस्तृत चरित्र आलें आहे. त्यांची १० पद्यमय ग्रंथरचना आणि २ गद्यमय ग्रंथरचना आहे. सर्व ग्रंथांची ओवी संख्या ३५,००० चे घरांत जाते. हंसराज हे रामदासी पंथांतील होते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथरचनेवर दासबोधाची छाया पडली आहे. हंसराजांचे ग्रंथ म्हणजे कवीच्या अध्यात्म पारंगतेचा, दिर्घोद्योगी, विद्वत्तेचा पुरावाच होय. वृद्धापकाळीं शरीर दुर्बल झालें तेव्हां हंसराजांनीं परंडा येथें देह ठेवला.

◆ ◆ ◆

# जनीजनार्दन [ मृत्यु शके १५२३ ]

या कवीचें मुळचें नांव जनार्दन. जनाबाई हें आईचें नांव. जनार्दन मातृभक्त असल्यानें आईचें नांव आपल्या मागें जोडून 'जनी जनार्दन' झाले. यांचें उपनाव 'गोसावी असल्याचें सारस्वतकार म्हणतात. तर उपनांव 'देशमुख' असल्याचें श्री. अनंतदास रामदासी म्हणतात. जनी जनार्दन विजापूरच्या बादशहाकडे नोकरीस होता. त्यावेळीं दुष्काळ पडला. सरकारी कोठारांतील धान्य भुकेल्या प्रजेला वांटून टाकलें. बादशहानें देहांताची शिक्षा सुनावली. पण परमेश्वर कृपेनें आणि गोर गरिबांच्या आशिर्वादानें हें संकट टळलें. जनी जनार्दनानें बादशहाची नोकरी सोडली. जनी जनार्दनांनीं अनेक पद्य रचना केली आहे. . कांहीं वेदांतपर, कांहीं रामचरित्रावर, कांहीं कृष्ण चरित्रपर ही रचना आहे. 'निर्विकल्प' ग्रंथ अध्यात्मपर आहे. तो उद्धव कृष्ण संवादरूपानें सांगितला आहे. जनी जनार्दन गाणपत्य होते. त्यांचे वंशज हल्लीं बीड येथें आहेत. जनी जनार्दनांच्या २ समाधि आहेत. सरदारांचे भूत या गांवीं जनी जनार्दनांनीं देह ठेवला. म्हणून समाधि व दुसरी त्यांच्या अस्थि घेऊन त्यांच्या शिष्यांनीं बीड येथें समाधि बांधली.

◆ ◆ ◆

# गागाभट्ट

गागाभट्टाचें मूळ घराणें पैठणचें. दुर्गादेवीच्या दुष्काळामध्यें हे घराणें उत्तरेस काशीस जावून स्थायिक झालें असावें. या घराण्यांतील अनेक पुरुषांनीं ग्रंथ रचना केली आहे. धर्म, न्याय, मीमांसा, तत्वज्ञान आदीवरचे गागाभट्ट घराण्याचे ग्रंथ हें प्रमाण मानले जातात. गागाभट्ट हा दिनकर भट्टाचा मुलगा होय. गागा हें वडिलांनीं लाडकें नांव ठेवलें, आणि तेंच नांव प्रसिद्ध झालें. गागाभट्टानें

उत्कृष्ट विद्या संपादून वराण्याचा लौकिक वाढविला. शिवदिननाथांचे गुरु केसरी नाथ हे गागाचे मामा होत. मीमांसा, न्याय, अलंकार, वेदांत या विषयावर गागाचें विशेष प्रभुत्व होतें. गागाभट्टाच्या विद्वत्तेसंबंधानें दक्षिणेंत मोठा लौकिक होता. मराठी राज्याचा व शिवाजी राजाचा मोठा अभिमान गागास होता. पैठण वगैरे ठिकाणच्या पंडितांचें मत शिवाजीच्या राज्याभिषेकास अनुकूल करून घेतलें व राज्याभिषेक नेटानें पार पाडला. ' गागाभट्टाचें घराणें म्हणजे जनतेची सेवा करणारे घराणें ' असें कै. मंडलीक म्हणतात. पर प्रांतांत जाऊन आपल्या विद्वत्तेची छाप पाडणाऱ्या मराठवाड्यांतील पैठणच्या गागाभट्टाचे घराण्यानें पैठणच्या परिसरामध्यें गोदामाईच्या जळानें संस्कृति, साहित्य, ज्ञान, यांचे मळे फुलविले आहेत.

◆ ◆ ◆

## श्री सदानन्द उर्फ बाबा महाराज उमरीकर
### [ इ. स. १८३८ ते १९२४ ]

मराठवाडा संतांची व कवींची जन्मभूमि. अशान्वपैकीं उद्धव चिद्घनांच्या वंशांत सत्पुरुषांची परंपरा निर्माण झाली. त्याच वंशांत सदानन्द उर्फ बाबा महाराज जन्मले. हे लहानपणापासूनच विरक्त, धर्मप्रवण व बुद्धिमान होते. जन्मतःच त्यांच्यावर एका नागानें फणा धरल्यानें त्यांना ' शेष ' म्हणत. आजोबांच्या आज्ञेवरून त्यानीं गृहस्थाश्रम स्वीकारला. पण ते नित्य उदास, विरक्त व विदेह स्थितींत असत. मात्र देहावर आले कीं, पानेच्या पानें सुवाच्या अक्षरांत कविता लिहीत. त्यांनीं " सुन्दरविलास दीपिका " (हिंदी अनुवाद) ' देशिक लीलामृत ' वगैरे ५०।६० बाडें कविता लिहिली. या हिंदी अनुवादावरून असें दिसतें कीं, चांगल्या ग्रंथांची देववेव भारतीय भाषांत पुष्कळ काळ चालू आहे. व्यापारी व्यवहारी लोकांना जसें जात, पात, गोत, भाषा, धर्म यांचें बंधन नसतें, तसें तें ज्ञान्यांना आणि ग्रंथांनाहि नसतें. महाराजांच्या शिष्यांत सर्व जातीचे लोक आणि मुसलमानहि होते. ते म्हणतात– " प्रीतीचा प्रकार काय सांगावा ? । नाहीं जात, पात, कुळ, गांवा ॥

◆ ◆ ◆

## श्रीमत् स्वामी सदानंद ( इ. स. १८४२ ते १९३१ )

श्री सदाशिव जयराम वैद्य हे मानवत जिल्हा परभणीचे राहाणारे. यांनीं

ऋग्वेद–यजुर्वेदांचें अध्ययन केलें. ते पिंगळीस राहात व व्यापार करीत. खूप पैसा त्यांनीं त्यात मिळविला. त्यांनीं तेथें श्री गोकुळनाथांचें मंदिर बांधलें. वेदपाठ–शाळा स्थापिली, व गरीबांस साह्य केलें, असा त्या पैशांचा सद्व्यय केला.

कुटुंबाच्या निधनानंतर त्यांनीं संन्यास स्वीकारून ते श्री सदानन्द स्वामी झाले. त्यांनीं 'ईशोपनिषत्, गीता' यांवर टीका लिहिल्या व 'सहजामृत' रचलें.

स्वधर्म महती व रक्षण यावर स्वामींनीं गीता द्वितीयाध्यायांतखूप जोर दिल। आहे. यावरून त्यांना व्यवहार न सोडतां परमार्थ कसा साधतां येतो हे सांगण्यांत त्यांची समाजाची कळकळ दिसून येते. 'प्रसंगाप्रमाणें लीन किंवा कठोर व्हावें; ईश्वरी अिच्छेनें घडेल तें अंगिकारावें' अशी त्यांची शिकवण आहे.

"स्वशरीर आणि स्वधन। बलांत कोणी करील हरण ॥
त्यासीं करावें शासन। त्याचें दूषण नाहीं कदा ॥ १ ॥

◆ ◆ ◆

## श्री ब्रम्हानंदाश्रम स्वामी [स. १८४३ ते १९१६]

तेळवाडीच्या गोविंद भट साठयांचे हे चिरंजीव. एका पांयस्थाच्या सागण्यावरून यांच्या मातुश्रीनें औदुंबरास एक लक्ष प्रदक्षिणा घातल्यावर हें नववें मूल जगलें. मातुःश्रीस स्वप्नांत नागोबांनीं दर्शन दिलें म्हणून यांचें नांव नागोराव ठेवलें. त्यांनीं बिदर येथे वकीली यशस्वी रीतीनें केली. उत्तर वयांत संन्यास केला. त्यांचे 'ज्ञानचक्षु' देहवर्णन प्रकाश व लघुभक्त विजय' प्रकाशित आहेत. तिसऱ्या ग्रंथांत अनेक जातींच्या भक्तांचीं चरित्रें आहेत, तसेंच अनेक देवता भक्तांचीं चरित्रें आहेत, त्यामुळें यांत विविधता व बहुरंगीपणा आला. त्यांचा कटाक्ष देव आणि जाती यांवर नाहीं, तो साधुत्वाकडे, सद्गुणांकडे आहे.

या सत्पुरुषाच्या दर्शनानें आर्त लोकांच्या शारीरिक व मानसिक व्याधी दूर होत असत, असें त्यांचे चरित्रकार म्हणतात.

◆ ◆ ◆

## विष्णुदास माहूरकर (स. १८४४ ते १९१७)

बालपणापासूनच यांची विरागी वृत्ती होती, तीर्थयात्रेस जाण्याची अनुज्ञा यांनीं आपल्या अल्पवयी पत्नीजवळ मागितली. तेव्हां सीतेप्रमाणें तीहि तीर्थयात्रेस निघाली. त्यानें सोडून जावूं नये म्हणून ७ दिवस रात्र ती जागत बसली. पण

# शेतीची आवड असणारे !!!
# व हुशार शेतकरी !!!

*किर्लोस्करचीच क्रशर्स, शेंगा मशीन, सेंट्रीफ्युगल पंप, नांगर इत्यादि अवजारें —*

## रॅलीज इंडिया लि. चीं भरघोस पिकासाठीं

## — ० *मिश्रखतें* ० —

## शेल कंपनीची एन्ड्रेक्स; डिल्ड्रेक्स व ॲल्ड्रेक्स

## *कीटकनाशक द्रव्यें*

व तगाईस मंजूर असलेलीं

## जेम्स इंजिनिअरींग कं. ची क्लेज व इंपिरीयल केली एंजिन्स वापरतात

*आमचेकडे सर्व प्रकारचे एंजिन्स व त्यास लागणारे सुटे भाग, पाईप फिटींग्ज इत्यादि किफायतशीर भावानें मिळतील*

० समक्ष भेटा अगर लिहा ०—

## मेसर्स :— एम. एम. दरक ॲंड सन्स
## सराफा, औरंगाबाद

**ब्रँच :- हिरालाल चौक, बीड.**

*डिस्ट्रीब्युटर्स —*

(१) किर्लोस्कर ब्रदर्स लि. (२) रॅलीज इंडिया लि. (फर्टिलायझर्स) (३) बर्मा शेल (केमिकल्स) (४) जेम्स इंजिनिअरींग कं. (क्लेज व इंपिरीयल केली एंजिन्स)

आठव्या दिवशीं देहधर्मानें मात केली. तिला झोंप लागली. आणि पती निघून गेला. १८ वर्षाच्या विष्णुदासांचा १६ वर्षांनीं माहुरास पत्ता लागला व पुढें १४ वर्षे दोघांनीं संसार केला. राधाबाई निवर्तल्या तेव्हां हा विरागी विष्णुदास म्हणतोः–
" रंगपटावरी स्त्रीव-पुरुषांची फुटली रे जोडी ! आतां काय खेळण्याची गोडी ;"
वाटे सुख सिंधूच्या बुडाली अर्धे मधें होडी ।।

सामाजिक विषयांत आर्य गृहीणीचें व पतीपत्नीचें शब्दचित्र त्यांनीं फार हळुवार कुंचल्यानें रंगविलें. चालू परिस्थितीकडेहि त्यांचें लक्ष होतें. कलियुगाबद्दल ते काय म्हणतात पहाः–

" राज्य कठिण हें आलें कलीचें, वर्तमान भलें नव्हे, परमत्रृत्ति धन हरण कराया, निघती कायदे नवे नवे ।। घरोघरीं अंधार परंतु । रस्तोरस्तीं दिवे दिवे !

◆ ◆ ◆

# भानुदास [ शके १३०० ]

एकनाथांचे हे पणजोबा. सूर्याच्या महाप्रसादानें हें पुत्ररत्न प्राप्त झालें. या भावनेनें मातापित्यांनीं 'भानुदास' हें नांव ठेवलें. अध्ययन करतांना वडील रागावले, म्हणून तळघरांत ७ दिवस भानुदास लपून राहिले होते. तेथें सूर्यानें त्यांना दर्शन दिलें, अशी एक आख्यायिका आहे. वडिलाच्या मृत्यूनंतर कापड विक्रीचा धंदा चालू केला. पण तो धंदा सोडून दिला व अिश्वर भजनांत काळ घालविण्यांस सुरवात केली. अनागोंदीच्या किरीटी रामराजानें पंढरीहून पंढरीनाथाची मूर्ती आपल्या शहरीं आणली, ती भक्तीच्या प्रभावानें यांनीं परत पंढरपुरी आणली, त्यामुळें भानुदासांची प्रख्याति झाली. भानुदासांनीं पुष्कळ अभंग रचले, पण ते सर्व प्रकाशित नाहींत.

◆ ◆ ◆

# बहिणाबाई [ शके १५५० तें १६२२ ]

या संत कवियत्रीचे माहेर वेरूळ नजीकचें दवगांव. वडिलांचें नांव आऊदेव व आईचें नांव जानकी. बहिणाबाईचें वयाच्या ३ र्‍या वर्षी शिवपूरच्या ३० वर्षाच्या बिजवराशीं लग्न झालें. लग्नानंतर बारच वर्षांनें हें कुटुंब देशोधडीस लागलें, प्रवासांत जयराम गोसावी यांच्या किर्तनातून तुकोबारायांची अभंगवाणी अैकली. त्यामुळें बहिणाबाई तुकोबांच्या दर्शनासाठीं उत्सुक झाल्या. त्यांनीं तुको–

यांचे दर्शन घेतलें व त्या त्यांच्या शिष्या बनल्या. बहिणाबाईंनीं आपला मुलगा विठोबा याला आपल्या पूर्वजांच्या १२ जन्मांची हकीगत अभंग रूपानें सांगितली आहे. बहिणाबाईंनीं कांहीं आरत्या, पदें, अभंग, संतनामावली रचली आहे. वर दिलेला समाधिशक विठोबा ( मुलगा ) यानें केलेल्या बहिणाबाईच्या आरतींत सांपडतो.

◆ ◆ ◆

# महिपती ( मृत्यू शके १७४४ )

हे मूळचे पैठणचे राहणारे. प्रसिद्ध संत जनार्दन स्वामी यांचे हे वंशज. यशवंतराव होळकरांनीं महिपतीचा अनुग्रह घेतला होता. ग्वाल्हेरला महिपतींचा मठ व गादी अद्याप आहे त्यांची हिंदी- मराठी पद्यरचना उपलब्ध आहे.

◆ ◆ ◆

# बळवंत रावजी पाटील

कांहीं लोक बाह्यतः संत दिसत नाहींत. ते आपल्या कार्यक्षेत्रांत वावरतात त्यांना सुख, संतती, व संपत्तीही असते. पण ईश्वरी प्रेरणेनें ते आपल्या ध्येय सिद्धीकरितां, लोक कार्याकरितां झिजत असतात. अशाच पैकीं सदर गृहस्थ होत. यांनीं खूप व्यवसाय केले व अस्थिर जीवन जगले. पण मराठींत पुस्तकें लिहिण्याकरितां यांनीं जन्मभर धडपड केली.

श्री. बळवंतरावांनीं वाल्मीकी रामायण, महाभारत, भागवत, व गीता सोप्या भाषेंत पद्यांत लिहिले. त्यांचे " मधूर वृत्तांतील " " गीता माधुरी " हें गेय रूपांतर प्रसिद्ध. हें वृत्त अगदीं नवें आहे. पुष्कळसे ग्रंथ यांना पैशांच्या अभावी छापतां आले नाहींत.

◆ ◆ ◆

# श्री. माधवराव व व्यंकटराव दातार

गेल्या शतकांत भाग्य नगरांत ( हैदराबादेंत ) हे दोन पितापुत्र मोठे भाग्यशाली व कर्तृत्व संपन्न होऊन गेले. निजामी नोकरींत मोठे कर्तबगार अधिकारी म्हणून प्रसिद्ध असूनहि यांनीं सद्ग्रंथांचें वाचन, मनन व लेखन केलें, माधवरा-

वांनीं तर ' विष्णु. सहस्त्रनाम टीका " " श्रुतिगीत " वगैरे ग्रंथ छापून फुकट वाटले.

" जरी अतुल तेज आले, कदापि होऊं नयेच उन्मत्त ।।
थोरांची रीत अशी, सुतेज पावक अम्ही असूं शांत

त्यांचे चिरंजीव व्यंकटरावही असेच सदाचरणी व सद्विचारी होते. त्यांनीं उमर खय्याम-या रूबायांचें रूपांतर अध्यात्मपर केलें आहे. " सत्संग सरितेंत " श्रीकृष्ण चरित्र असून तेंहि मोठें रसाळ काव्य आहे.

◆ ◆ ◆

# श्री. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे तथा श्री. दासगणु महाराज

हे पंढरपूरकडील करकंबचे राहाणारे. पण आतां त्यांनीं नांदेड येथें मुक्काम करण्याचें ठरविल्यानें "हा संत कवि आमचा नाहीं, असें मराठवाडा म्हणणार नाहीं. सात पावलें बरोबर चालल्यानें सज्जनांशीं मैत्री होते ! हें प्रथम पोलिस खात्यांत नोकर होते. पण साई बाबांच्या दर्शनानें त्यांनीं कीर्तनवीणा उचलली, आणि हीं हरिभक्ति त्यांनीं निरपेक्ष ठेवली. द्रव्याकरितां ते कीर्तन करीत नाहीत. ज्यांत अहिल्याबाई व टिळक असे राष्ट्रीय संत आहेत. अशी ४०-५० आख्यानें रचलीं. संत लीलामृत, भक्तिसारामृत, स्तोत्रें, अमृतानुभव श्रीपासष्टी, भावार्थ दीपिका, वगैरे खूपच मोठी ग्रंथरचना त्यांनीं केली. विसगाळ समाजाला पुन्हां पुन्हां ' तूं क्षुद्र नव्हेस, तूं महान् आहेस, शिव आहेस असें स्मरण द्यावें लागतें. तेंच कार्य संत, कवि, लेखक आजपर्यंत करीत आले. राष्ट्राला तारक असे संत सर्व जातींत निर्माण झाले व त्यांचा परामर्ष भेदभावरहितपणें कवींनीं घेतला. आणि लोक जागृती करून राष्ट्रैक्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भक्तलीलामृतांत परमार्थ आहे पण तो कशाकरितां ते पहा. "स्वराज्य प्राण राष्ट्राचा । स्वराज्य हाचि मोक्ष साचा । स्वराज्य पाया धर्माचा । त्यावीण अवघे वोखटे ।।१।।

◆ ◆ ◆

# श्री. यशवंतराव कोरेकल

हे अनेक कलानिपुण गृहस्थ प्रथम चांगल्या उर्दू कविता करीत. पण पुढे मोरोपंती मराठी कवींचा अभ्यास करून त्यांनीं मातृभाषेंत कवितेस प्रारंभ

केला. गायन, वादन सूक्ष्म लेखन, कातरकाम आदि ललित कलाकडे ओढा असतां त्यांनीं वेदांताचा अहोरात्र अभ्यास केला. ८–८ दिवस अन्नहि घेतलें नाहीं. त्याचा त्यांच्या आचरणावर व लेखनावरहि परिणाम झाला. मराठींत सुमारें ३ सहस्रांवर पानें मजकूर लिहून आपली वाङमयसेवा श्री शारदाचरणीं अर्पिली. ◆ ◆ ◆

## भगवंतराव तोंडेवाले [स. १८७३ ते १९१८]

यांनीं पैठणास " ग्रहविहार भुवन व फल ज्योतिषादर्शन ही संस्था स्थापन केली. तेथें अध्ययन करण्यास सर्वांस मोकळीक असे. फलज्योतिष, चेहेऱ्यावरून कुंडली मांडणें या त्यांच्या अद्भुत ज्ञानानें त्यांनीं लोकांना थक्क केलें होतें. पण त्यांचें स्मरण त्यांच्या " अज्ञान कंसवध " व " रावण–मंदोदरी संवाद " या काव्यांवरून होतें. त्यांची गणना चांगल्या कवींत होते. पहिल्यांत हिंदु–मुस्लीम धर्मांचें ऐक्य दाखविण्याच्या प्रयत्नानें त्यांनीं समंजस मुसलमानांकडूनहि वाहवा मिळविली व दुसऱ्यांतील श्लेषयुक्त शब्द रचनेनें व काव्यबंधांनीं त्यांनीं रसिकांकडून वाहवा मिळविली. चारी धामांच्या आचार्य पीठांकडून त्यांचा सन्मान झाला होता. ◆ ◆ ◆

## श्री. देवीदास लक्ष्मण महाजन (इ. स. १८९५)

हे नांदेडचे सुप्रसिद्ध कवी. त्यांनीं ४–५ भाषांचे चांगलें ज्ञान संपादन केलें आहे. श्रीदास गणू महाराजांच्या परिचयानें त्यांची धार्मिक विषयांकडे प्रवृत्ती झाली. त्यांनीं अनेक लेख निरनिराळ्या मासिकांतून लिहिले. मधून मधून ते कीर्तनेंहि करीत असल्यानें त्यांनीं बरींच आख्यानें लिहिलीं. त्यांचें प्रकाशित आणि अप्रकाशित लेखन पुष्कळच आहे. धार्मिक विषयांकडे ओढा असला तरी सामाजिक व प्रासंगिक विषयहि त्यांनीं हाताळले आहेत.

" ना स्वाभिमान अंगीं, ऐसें जिणें कशाला ?॥
प्रेतापरी जळो हे, प्राणाविणें कशाला ? ॥ धृ ॥

असले जळजळीत उद्गार धर्म– सत्ता– मत्ता हीन राष्ट्राच्या बाबतींत सर्वकालीं सत्य आहेत.

महा भागवत श्री तुलसीदासांच्या रामायणाचा अनुवाद महाजनांशिवाय कोणी करावा ? त्यांच्या या " मानसविहारा " नें मराठीला अमोल लेणें दिलें आहे. ◆ ◆ ◆

# श्री. माणिकप्रभु महाराज (स. १८१७ ते १८७५)

"श्रुतिधर्म रक्षुनि सकल मतातें वंदा । सर्वांतरिं आत्मा नको कुणाची निंदा ।।" हें ज्यांच्या उपदेशाचें सार आहे व "प्रवृत्ति निवृत्तींत विरोध नसून दोन्ही पूर्णपणें साधतां येतात" असें आतांपर्यंत, वर्णिलेल्या संतांनीं व कवींनीं सांगितलें, त्यांवर मान्यतेची मुद्रा ठोकणारे सिद्ध पुरुष म्हणजे श्री. माणिक महाराज होत. त्यांनीं हुमनाबादेजवळ माणिक नगराची स्थापना केली. सर्व धर्मांच्या लोकांचा त्यांच्या त्यांच्या सणावारीं पुरस्कार करीत. त्यांच्या अलौकिक सामर्थ्यानें ते मुसलमानांनाहि सन्माननीय झाले. उर्दू, हिंदी मराठी, कानडी भाषांत त्यांचीं पदें आहेत. त्यांच्या "सकलमत" संप्रदायांत उपासनांचे अवडंबर नाहीं, सर्वांतर्यामी भगवंताचें अधिष्ठान कसेंहि पटलें म्हणजे झालें. भिन्न धर्मीयात सलोखा घडवून आणण्याच्या कामीं यांचा फार उपयोग झाला. त्यांच्या शिष्य शाखेंत हिंदू, शीख, लिंगायत व मुसलमानहि आहेत व ते लक्षावधि आहेत.

या संप्रदायांत मूळ संस्थापकाच्या हेतूला अनुसरून कार्य चालू ठेवणारे व तें कार्य ग्रंथरूपानें चिरस्थायी करणारे सत्पुरुष उत्पन्न झाले आहेत, त्यामुळें तें कार्य चालू आहे.

◆ ◆ ◆

# जैनमत संप्रदाय श्री. गोपाळराव बिडकर

या भागांत श्री. कुंथलगिरी हें जैनांचें महाक्षेत्र आहे. जैन लोकांत भक्ति हेंच भुक्तिमुक्तीचें साधन गणलें जातें. गोपाळरावांनीं श्री. कुंथलगिरीवरील श्री. कुलभूषण व देशभूषण या दोन मुनिव्रतधारी बंधूंवर "कुलभूषण काव्य सुमन" हें पद्यमय पुस्तक रचलें. या पदांचा ठसा गायनप्रेमी मनावर चांगला उमटतो अलीकडे श्री. शांतिसागरजी महाराज यांनीं आपल्या तपस्येनें व त्यागमय जीवनानें लक्षावधी भक्तांना आपलेसें केलें. त्यांच्या जीवनाप्रमाणें निर्वाण कालहि अलौकिक होता. २-३ वर्षांपूर्वी यांनीं कुंथलगिरी येथेंच देह विसर्जन केला.

◆ ◆ ◆

# बी. रघुनाथ (मृत्यू १९५३)

मराठवाड्यांतील एक साहित्यिक, सबंध नांव भगवान रघुनाथ कुलकर्णी परभणी हें राहण्याचें ठिकाण. पी. डब्ल्यू. डी, मध्यें नोकर, उपेक्षित दलिताची

वास्तवपूर्ण शब्दचित्रें रेखाटणे हा त्यांचा वाङ्मय विशेष. मराठवाड्याच्या साहित्याला त्यांनीं नांव मिळवून दिलें.

◆ ◆ ◆

# डॉ. नारायणराव नांदापूरकर

' माझी मराठी, मराठाची मी ही " अखंड महाराष्ट्राला हें ध्येयवाक्य देणारे नारायणराव नांदापूरकर मराठवाड्यांत जन्मले, खेळले, बागडले, शिकले आणि मराठवाड्यानें ताठ मानेनें वागावें म्हणून जन्मभर झिजले. त्यांनीं मधूर कविता लिहिल्या, मायबोलीची कहाणी सांगून कहाणी भाषा पद्धतीला प्रकाशांत आणली, लेख लिहिले, पण त्यांची चिरस्थायी मराठीनें आणि मराठवाड्यानें अभिमान धरण्यासारखी कामगिरी म्हणजे त्यांचा " मुक्तमयूर " हा ७५० पानीं प्रबंध व सुमारें लाखावर जमविलेल्या व विषयानुरूप पृथक्करण केलेल्या स्त्रियांच्या ओव्या. त्यांनीं समाजाच्या सर्व थरांतील लोकांकडे जाऊन फार परिश्रमपूर्वक हें कांहीं कालानें कदाचित नष्ट होणारें अमोलिक धन गोळा केलें, त्याची वर्गवारी केली, त्याची टीका टिपणी करून त्याची रसपूर्ण चव पुढील पिढ्यांना चाखायला शिकवली, हें त्यांचें फार मोठें कार्य झालें, असें मराठी भाषाभिमानी कोणताहि भाषाभिमानी मानील. कारण या ओव्यांवरून महाराष्ट्र मनाची ठेवण, सामाजिक स्थिती- कौटुंबिक चालीरीती यांचाहि अभ्यास समाजशास्त्राभ्यासकाला करतां येईल. सामान्य लोकांना त्यांचा रसास्वाद घेऊन आनंद होईल.

" मुक्त मयूर भारत " हें नारायणरावांच्या अखंड परिश्रमाचें फळ आहे. तें भारत- संस्कृत- मराठी जाणणाराला खूप आनंद देईल. विद्वानांना व अभ्यासकांना व्यास, मोरोपंत मुक्तेश्वर यांच्या गुणदोष दर्शनानें विचार करावयास लावील. ज्ञानेश्वर, एकनाथांचा मराठवाडा मागासलेला आहे असे अजाण लोक म्हणत होते. येथील लोकांना त्याची मोठी खंत वाटत होती. प्रथम नारायणरावांनीं नंतर श्रीधरराव कुळकर्णींनीं ती मनाला लावून घेतली व परिश्रमपूर्वक प्रबंध लिहून विद्वानांकडून " भले, भले, नांदापूरकर " असें म्हणवून घेतलें. त्यांची परंपरा चालविणारे अभ्यासक, कवि, ग्रंथकार येथें आहेत. लोकांकरितां झिजणारे व जीवित सार्थकी लावणारे हे लोक संतच आहेत. नारायणराव ९ जून १९५९ रोजीं हैदराबाद येथें स्वर्गवासी झाले.

◆ ◆ ◆

भारतांत वैद्यकीय धंद्यांत प्रशंसित व स्वीकृत

**' नगरसन ' बेबी टीथिंग सायरप**

यांत कॅलशियम वं व्हिटॅमिन्स आहेत

**' नगरसन ' बेबी ग्राईप वॉटर**

**ग्राईप वंडर**

**बेबी बालामृत मुलांना नेहमीं द्या.**

लहान मुलांचे दांत व दाढा सुलभतेनें निघतात

रोगी व अशक्त मुलें सशक्त व सुदृढ होऊन वाढीस लागतात

❀ सर्वत्र मिळते ❀

भारतांत न नेमलेल्या ठिकाणीं

एजंट व डेपो मॅनेजर नेमणें आहे.

**नगरसन**

मेडिकेटेड

**काळी टूथ पावडर**

दांताचे सर्व प्रकारचे रोग बरे होऊन दांत मजबुत व मोत्यासारखे चकचकीत पांढरे शुभ्र होतात.

**पायोरियाचा**

कर्दनकाळ आहे

**इंडिया केमिकल वर्क्स (रजिस्टर्ड) जळगांव पू. खा.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम २८३०३ वि. ...
क्रमांक २८६ नों. दि. २५...

# मराठवाड्यांतील शिक्षण

# मराठवाड्यांतील शिक्षण

राजकीय दृष्टचा 'मराठवाडा' हा 'महाराष्ट्रापासून' कांहीं शतकें दूर होता. हैद्रावाद संस्थान हें मुस्लीम संस्थान असल्यानें व उर्दू ही राजभाषा असल्यानें मराठवाडचाच्या शैक्षणिक प्रगतीकडे व मराठी भाषेच्या विकासाकडे हेतुपुरःस्सर दुर्लक्ष केलें गेलें व मराठवाडा हा अविकसित भाग राहिला. मराठवाडचांत साक्षरतेचें प्रमाण ९·३ टक्के आहे.

मराठवाडचांत मराठीच्या दैन्यावस्थेला सीमा नव्हती. दुय्यम आणि उच्च शालेय शिक्षणांत मराठीला माध्यम म्हणून जुन्या राजवटींत स्थान मिळालेंच नाहीं. सरकार दरबारीं तर मराठीला कांहींच प्रतिष्ठा नव्हती. फक्त खेडचांतील पाटील, कुलकर्णी यांच्या दप्तरांत तिचा वापर होता. मामलेदार कचेरीपासून वरपर्यंत मराठीला अक्षरशः मज्जाव होता. अशा परिस्थितींत मराठीची आस्थापूर्वक जोपासना करण्याकडे कोण कसें लक्ष देणार?

शिक्षणक्रमांत मराठीचें स्थान निर्माल्यवत् होतें. जनतेचें लक्ष मराठीपासून जितकें दूर जाईल तितकें बरें, अशी त्याकाळची वृत्ति होती. प्राथमिक शिक्षण मराठींतून देत. पण ५ वीपासून मराठी हें माध्यम नव्हतें, आणि मराठी माध्यमांतून विद्यार्थी ४ थी पास झाला तरी ५ वींतील उर्दू माध्यम त्याला झेपावयाचें नाहीं या सबबीखालीं विद्यार्थ्याला उर्दू ४ थी मध्यें पुन्हां १ वर्ष बसण्यास भाग पाडीत. केवळ मराठींतून प्राथमिक शिक्षण घेतल्यानें आपल्या मुलाचें १ वर्ष वाया जातें, हें पाहून शेकडों पालकांनीं आपल्या मुलांना प्राथमिक शिक्षण मराठीऐवजीं, दुसऱ्या भाषेंतून द्यावयास सुरवात केली. इष्ट बदल तर घडून यावा, पण आपल्यावर बोल तर राहूं नये म्हणून शाळाखातें, अशा पालकांकडून खालीलप्रमाणें मजकूर लिहून घेत असे. 'जरी माझ्या मुलाची मातृभाषा मराठी असली तरी मी स्वखुशीनें त्याला उर्दूतून शिक्षण देऊं इच्छितों. त्याला उर्दू प्राथमिक शाळेमध्यें प्रवेश देण्यांत यावा.' त्या काळीं शाळाखात्याचीं दप्तरें अशा प्रकारच्या शेकडों अर्जांनीं भरलेलीं आढळून येतील. मराठी प्राथमिक शाळेमध्यें उर्दू हा आवश्यक विषय म्हणून तिसरीपासून शिकविला जात असे. हें ज्ञान ५ वीपासूनच्या मराठी माध्यमाला अपुरें पडतें, या सबबीवर मराठी विद्यार्थ्यांना पुन्हां उर्दू ४ थीमध्यें बसविले जात असे. असें करण्यांत येऊं नये, विद्यार्थ्याला ५ वीमध्यें बसवावें, आणि त्याचें उर्दू कच्चें असल्यास त्याच्याकडे विशेष लक्ष देण्यांत यावें, हें ठरवून घेण्यासाठीं मराठवाड्यांतील जनतेस अक्षरशः रक्ताचें पाणी करावें लागलें. तेव्हां १९३७ मध्यें अनुकूल निर्णय मिळाला. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या निर्णयाची अंमलबजावणी पूर्णपणें कधींच झाली नाहीं.

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच दुय्यम शिक्षणाचीहि परिस्थिति तितकीच असमाधानकारक होती. ५ वी पासून ७ पर्यंत मराठी हा आवश्यक विषय असे. पण ८ वी मध्यें मात्र मराठी, गणित आदि विषय ऐच्छिक असत. त्यांत जो गणित घेत नसेल त्याला कॉलेजमध्यें सायन्स घेऊन मेडिकल अगर इंजिनियर कोर्स घेणें अशक्य होई. यामुळें डॉक्टर, इंजिनियर किंवा सायन्सचे पदवीधर होऊं इच्छिणारे विद्यार्थी ८ वीपासूनच मराठीचा निरोप घेऊन, ऐच्छिक गणिताकडे वळत. या एका लहानशा निर्णयामुळें हजारों विद्यार्थ्यांना मराठी सोडावें लागलें.

मुलींना ७ वीपर्यंत मराठी माध्यमांतून शिक्षण घेण्याची सोय असे. पण ५ वी पासूनच उर्दू हा आवश्यक विषय त्यांच्यावर लादण्यांत येई. ८ वीपासून माध्यम उर्दू आहे याकरितां मुलींनीं ५ वीपासून उर्दू शिकलेलें बरें असें सोयिस्कर तत्वज्ञान सांगण्यांत येई. आणि आम्हांला आमच्या मुलींना उर्दू शिकवावयाचें नाहीं, म्हणून कोणी म्हटलें तर त्या पालकाला, 'मी आपल्या मुलीला ७ वीच्या पुढें शिक्षण देणार नाहीं,' असें लिहून द्यावें लागे.

अशा कठीण परिस्थितींतहि कांहीं शिक्षणसंस्थांनीं बहुमोल कामगिरी बजावली. प्रसंगीं शासनसंस्थेचा रोष पत्करूनहि आपलें शैक्षणिक कार्य पार पाडलें. महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें कै. विजापूरकरांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला तसाच पाया या शिक्षणसंस्थांनीं मराठवाड्यांत घातला.

निजामी राजवटीमध्यें उर्दूला प्राधान्य असतांना हैद्राबादमधील मराठी घराण्यांनीं मराठी भाषेला राजकीय स्थान नसलें तरी सामाजिक स्थान प्राप्त व्हावें या दृष्टीनें कांहीं प्रयत्न सुरू केले होते. श्री. केशवराव कोल्हटकर, श्री. वामनराव नाईक, श्री. वासुदेवराव हर्डीकर यांच्या प्रयत्नानें १९०८ सालीं हैद्राबाद येथें विवेकवर्धिनी नांवाची शिक्षणसंस्था स्थापन करण्यांत आली. संस्थेचें कार्य वरील जबाबदार व्यक्तीनें हातीं घेतल्यानें हैद्राबादच्या सधन व मान्यवर महाराष्ट्रीय घराण्यांनीं या शिक्षणसंस्थेस भरपूर द्रव्यसाहाय्य केलें. श्री. वासुदेवराव हर्डीकर यांनीं प्राथमिक शिक्षणाचे २–४ वर्ग सुरू केले व २–४ वर्षांच्या प्रयत्नानें या शिक्षणसंस्थेनें मराठी ७ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या ४ शाळा हैद्राबाद येथें स्थापन केल्या. मराठी शिक्षणाची होत असलेली प्रगति व महाराष्ट्रीय वजनदार पुढाऱ्यांचें दडपण यांमुळें निजामला फायनल परीक्षा बोर्ड स्थापन करणें भाग पडलें. अशा तऱ्हेनें हैद्राबाद येथें मराठी भाषेच्या शिक्षणाला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर विवेकवर्धिनी या संस्थेनें उस्मानाबाद वगैरे भागांत आपल्या शाखा चालू केल्या. या विवेकवर्धिनी संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी हे थोर कार्यकर्ते, समाज–सुधारक व विद्वान म्हणून नांवाजलेले होते. त्यावेळच्या विद्यार्थीवर्गांतून

श्री. र. मु. जोशी, श्री. वाघमारे, श्री. हणमंतराव वैष्णव, श्री. धुंडीराज बहादूर ही पहिली पिढी शिक्षण घेऊन बाहेर पडली. त्या पिढींतून विजापूरकरांनीं तुळजापूरपासून ५ मैलांवर असलेल्या हिपरगा या गांवीं एक शिक्षणसंस्था सुरू केली. या संस्थेंतून स्वामी रामानंद तीर्थ, श्री. गाढे, श्री. पोहनेरकर आदी मंडळींनी शिक्षण घेतलें व याच शाळेच्या भरभराटीसाठीं शिक्षक म्हणून कामें केलीं. हिपरगा येथील संस्थेचा पसारा वाढू लागला व त्यांतीलच कांहीं कार्यकर्त्यांनीं श्री. देशमुख यांच्या संमतीनें अंबेजोगाईस योगेश्वरी या नांवानें एक शिक्षणसंस्था सुरू केली. आर्यसमाज या धार्मिक कार्य करणाऱ्या संस्थेनेंहि आपापल्या प्रार्थनामंदिरांतून शैक्षणिक कार्य चालविलें होतें.

निजामी राजवट संपली आणि मराठीच्या मागची साडेसाती संपली. द्वैभाषिक मुंबई राज्यामध्यें मराठी राजभाषा झाली नसली तरी मराठीची गळचेपी होत नव्हती. आतां मराठवाड्यासह नवमहाराष्ट्र आकारला आहे. मराठी ही राजभाषा बनली आहे नि मराठवाड्यामध्यें मराठीच्या माध्यमांतून शिक्षण मिळूं लागलें आहे.

## सद्यस्थिति

१३ लाख लोकवस्तीच्या व २६९४८ चौरस मैलांच्या मराठवाड्यांत ५ जिल्ह्यांतील ५३ तालुक्यांचा व सुमारें ७००० खेड्यांचा समावेश होतो. याच मराठवाड्यामध्यें १९५७–५८ सालीं ३६८६ प्राथमिक शाळा, २३१ मिड्‌लस्कूल, ९५ हायस्कूल, १४ अप्पर ग्रेड हायस्कूल असा शैक्षणिक प्रपंच होता. २ खेड्यांमध्यें १ प्राथमिक शाळा, प्रत्येक तालुक्यामध्यें ४ मिडल् स्कूल आणि प्रत्येक जिल्ह्यामध्यें १९ हायस्कूल होतीं.

मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें ३६ विविध योजना संमत केल्या गेल्या. या विकास योजनांचें स्थूल वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल–(१) प्राथमिक शिक्षणाच्या विकास योजना. (२) माध्यमिक शिक्षणाच्या विकास योजना. (३) प्रशासकीय पुनर्रचनेच्या योजना. (४) संकीर्ण शैक्षणिक विकास योजना.

व्हॉलंटरी शाळांचें एकशिक्षकी शाळांत रूपांतर करणें, प्राथमिक शाळांना वाढत्या गरजेच्या प्रमाणांत योग्य व पुरेशा शिक्षकांचा पुरवठा करणें, ३०० किंवा अधिक वस्तीच्या गांवीं प्राथमिक शाळा उघडणें या विविध हेतूनें सरकारनें प्रयत्न चालविले आहेत. तसेंच नवीन शाळांना व ज्यांत जादा शिक्षक नेमले गेले अशा सर्व प्राथमिक शाळांना पुरेसें लांकडी व शैक्षणिक साहित्य सरकारनें उपलब्ध करून

दिलें आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीनें शिक्षणतंत्राचें ज्ञान व शैक्षणिक अनुभव शिक्षकांना प्राप्त करून देणें आवश्यक आहे; त्यादृष्टीनेंहि सरकारनें आपलीं पावलें उचललीं आहेत. मराठवाड्यांमध्यें ३१–३–५८ (१९५७–५८) ला ३९२० प्राथमिक शाळा, ८७२६ प्राथमिक शिक्षक व २,४१,४३१ विद्यार्थी होते. त्याचप्रमाणें ३१–३–५९ ( १९५८–५९ ) ला ५७१० प्राथमिक शाळा, ९४७४ प्राथमिक शिक्षक व २,९६,४२० विद्यार्थी होते.

मराठवाड्यांतील ५ मूलोद्योग शिक्षण–प्रशिक्षण केंद्रांच्या इमारती व त्यांना संलग्न असलेल्या ५ वसतिगृहाचें बांधकाम या योजनाकालांत पुरें केलें जाणार आहे. प्राथमिक शाळांतील वर्गाच्या खोल्यांचें बांधकाम :– वाढत्या गरजेच्या प्रमाणांत प्राथमिक शाळांतून जे नवे वर्ग उघडले जाणार आहेत, त्यांच्यासाठीं योजनाकालांत १६४५ खोल्या बांधण्याचा संकल्प आहे. योजनेच्या ३ वर्षांमध्यें ३४१ खोल्यांच्या बांधकामाला मान्यता मिळाली असून त्यापैकीं कांहीं खोल्या बांधून झाल्या आहेत. कांहींचें बांधकाम चालू आहे.

प्रा. शाळांचे मूलोद्योगी शाळांत रूपांतर करण्याप्रीत्यर्थ ६५००० रु. चा खर्च योजनाकालांत संकल्पिला आहे.

## माध्यमिक शिक्षण

मराठवाड्याच्या माध्यमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठीं १७ योजना आंखल्या गेल्या आहेत. माध्यमिक शिक्षणाच्या वाढत्या गरजेनुसार कांहीं माध्यमिक शाळांतून पुढील उच्च वर्ग उघडणें आवश्यक आहे. ही आवश्यकता दृष्टीपुढें ठेवून मार्च १९५९ अखेर ५ ते ७ पर्यंतचे ६८ वर्ग व ८ ते १० पर्यंतचे २८ वर्ग अधिक उघडले आहेत. या वर्गांच्या शिक्षणासाठीं २१८ जादा शिक्षक नेमले गेले.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या हेतूनें ५ प्रशालांचें बहुद्योगी प्रशालांत रूपांतर करण्याचें लक्ष्य निश्चित केलें गेलें आहे. जालना येथील सरकारी प्रशालेचें बहूद्देशीय प्रशालेंत रूपांतर करण्यांत आलें आहे. मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद व जनता विद्यालय, भुरुड या दोन प्रशालांचें बहूद्देशीय प्रशालांत आर्थिक साहाय्य देऊन रूपांतर करण्यांत आलें आहे.

मराठवाड्यांतील माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था सरकारी बी. अेड्. कॉलेजमधून होते. माध्यमिक शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळें या कॉलेजची पुनर्रचना केली. आतां कॉलेजमध्यें ८० शिक्षक-विद्यार्थी शिक्षण घेऊं शकतात. माध्यमिक शाळांतून हस्तव्यवसायाच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे.

# मराठवाडा विद्यापीठ

अितिहास :— हैद्राबाद संस्थानामध्यें १९१७ सालीं उस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापन झाली; या युनिव्हर्सिटीचें भारतीय भाषांतून उच्च विश्वविद्यालयीन शिक्षण द्यावें, हें ध्येय होतें; उर्दू ही संस्थानची राजभाषा असल्यानें या युनिव्हर्सिटीचें कामकाज उर्दू भाषेमधूनच चालत असे. १९३७ मध्यें राजकीय क्रांति झाली. दुय्यम शिक्षणाच्या पायरीवर प्रादेशिक भाषेचें माध्यम मान्य करण्यांत आलें. १९४७-नंतर मराठवाड्यांतील जनतेनें जें आंदोलन उभारलें त्यामध्यें स्वतंत्र विद्यापीठाची मागणी प्रामुख्यानें केली गेली होती. उस्मानिया विद्यापीठाच्या उपकुलगुरूंकडे याबाबतींत औरंगाबादमधील प्रतिष्ठित नागरिकांनीं एक लेखी निवेदन दिलें होतें. मराठवाडा शिक्षण संकलन समितीची सभा मोमिनाबाद येथें १२ डिसेंबर १९५४ रोजीं झाली. या सभेनें एकमतानें मंजूर झालेल्या ठरावानें सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीनें स्वतंत्र मराठवाडा विद्यापीठाची मागणी केली. आणि त्याच वेळीं हैद्राबाद मराठा शिक्षण प्रसारक मंडळानें आपल्या जून १९५५ च्या जालना येथील परिषदेंत याच अर्थाचा ठराव पसार केला.

हैद्राबाद येथें ९ व १० एप्रिल १९५५ मध्यें लोकसभेचे व विधानसभेचे मराठवाड्यांतील सभासद व प्रतिष्ठित नागरीक यांची एक परिषद झाली. त्यावेळीं परिषदेनें सादर केलेल्या निवेदनांत म्हटलें आहे, " मराठवाडा विद्यापीठाच्या उभारणीचें काम द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें पार पाडलें जावें. " १०–११ मार्च १९५६ रोजीहि मराठवाड्याच्या स्वतंत्र विद्यापीठाच्या मागणीवर परत जोर देण्यांत आला. आणि ९ ऑक्टोबर १९५६ रोजीं याबद्दलचें निवेदन राष्ट्रीय नियोजन मंडळाला सादर करण्यात आलें. मराठवाडा विद्यापीठाच्या मागणीला अनेक शिक्षणशास्त्रज्ञांनीं व विद्वानांनीं आपला पाठिंबा दिला होता; म. म. द. वा पोतदार, लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. बॅ. जयकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. आंबेडकर, न्या. मंगलमूर्ती, आदींनीहि आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला होता.

लोकसभा व विधानसभा यांचे मराठवाड्यांतील प्रतिनिधी, कांहीं शिक्षणतज्ञ, महाविद्यालयाचे प्राचार्य यांचें एक शिष्टमंडळ २९ जुलै १९५२ रोजी हैद्राबाद संस्थानच्या प्रधानमंत्र्यांना भेटलें व त्यांनीं त्यांना एक निवेदन सादर केलें. त्यावेळीं प्रधानमंत्र्यांनी मराठवाडा विद्यापीठाची मागणी मान्य केली व शक्य तितक्या सहकार्याचें आश्वासन दिलें. यावेळीं शिक्षणमंत्री व अन्य मंत्री यानींहि सदर कल्पनेला आपला पाठिंबा व्यक्त केला. हैद्राबाद विधानसभेमध्यें राज्यपुनर्रचना बिलाचे वेळीं विरोधी पक्षानें मराठवाडा विद्यापीठाचे प्रश्नावरून बहिर्गमन केलें, त्यावेळीं सरकारला सरकारी पातळीवरून. मराठवाडा विद्यापीठाचा प्रश्न हाताळणें भाग

पडलें. आणि या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक समिती नेमण्यात आली. प्रा. एम्. अेस्. दौरास्वामी, डॉ. एन्. व्ही. सुब्बाराव, डॉ. टोपी आणि सेतु माधवराव यांचा या समितीमध्यें समावेश होता. मराठवाडा विद्यापीठाचा तपशील तयार करण्याचें काम या समितीवर सोंपविलें होतें. या समितीनें २४ बैठकींत आपलें काम संपवून २७ ऑक्टोबर १९५६ रोजीं आपला अहवाल सादर केला. या अहवालामध्यें सदर समितीनें स्वतंत्र मराठवाडा विद्यापीठास आपला जोरदार पाठिंबा व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सनें १५ व १६ डिसेंबर १९५६ च्या ठरावानें मराठवाडा विद्यापीठाची मागणी केली होती. मुंबई राज्याचे मुख्य मंत्री नाम. य. ब. चव्हाण यांनीं जानेवारी ५७ मध्यें मराठवाड्यामध्यें दौरा काढला. त्यावेळीं प्रत्येक ठिकाणाहून नागरिकांनीं, स्थानिक संस्थांनीं, विद्यार्थी–प्रतिनिधींनीं मराठवाडा विद्यापीठाची मागणी केली.

मुंबअी मंत्रीमंडळानें या प्रश्नाचा निकाल लावण्याचे दृष्टीनें हा प्रश्न हाताळण्याचें ठरविलें, २१ जानेवारी १९५७ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकींत या प्रश्नाचा निकाल लावण्याचें ठरविलें, व यासाठीं २४–४–१९५७ रोजीं प्रेसनोट काढून एक समिति जाहीर केली. या समितीवर पुढील सदस्य होते. १) श्री. पळनीटकर (चेअरमन) २) श्री. एम. बी. चिटणीस ३) डॉ. डी. डी. शेंदरकर ४) श्री. एस्. आर. डोंगरकेरी ५) डॉ. व्ही. बी. कोलते ६) श्री. एस. के. वैशंपायन ७) श्री. तय्यबजी ८) श्री. शामराव कदम ९) श्री. पी. सेतू माधवराव (सेक्रेटरी.) या समितीनें १ डिसेंबर १९५७ रोजीं आपला अहवाल मुंबअी सरकारला सादर केला. या समितीच्या शिफारशींनुसार सरकारनें लगेच मराठवाडा युनिव्हर्सिटी अॅक्ट तयार करवून तो विधान सभेंत पास करून घेतला व त्यानंतर ५ मे १९५८ रोजीं त्यावर राज्यपालांची सही झाली. मराठवाडा विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरु म्हणून श्री. एस्. आर. डोंगरकेरी यांची नेमणूक २ जून १९५८ रोजीं मुंबअी सरकारनें केली व श्री डोंगरकेरी यांनीं आपल्या कामाचा चार्ज १९ जून १९५८ रोजीं घेतला. त्याचप्रमाणें श्री. चिटणीस यांची पहिले रजिस्ट्रार म्हणून सरकारनें नेमणूक केली व त्यांनीं १८ जून १९५८ रोजीं आपल्या कामाचा चार्ज घेतला.

केवळ मराठवाडा विद्यापीठाच्याच नव्हे तर साऱ्या मराठवाड्याच्या इतिहासांत ३ ऑगस्ट १९५८ हा दिवस सोनेरी अक्षरांनीं नोंदविला जाअील. मराठवाड्याचें कित्येक वर्षांचें स्वतंत्र विद्यापीठाचें स्वप्न या दिवशीं साकार झालें. मराठवाडा विद्यापीठाचें उद्घाटन पं. नेहरू यांनीं या दिवशीं केलें.

मराठवाडा विद्यापीठाचें कार्यक्षेत्र औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांपुरतें आहे. या विद्यापीठाशीं संलग्न असलेल्या महाविद्यालयांचीं नांवें पुढीलप्रमाणें—

१) गव्हर्मेंट कॉलेज. आर्टस्, सायन्स, औरंगाबाद. ह्युमॅनिटीज् अँड सायन्स, बॉयालॉजिकल् अँड फिजिकल् सायन्स, बी.ए., बी. एस्सी.

२) मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद. ह्युमॅनिटीज् अँड सायन्स, बॉयालॉजिकल् सायन्स, बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम्.

३) पीपल्स कॉलेज, नांदेड, ह्युमॅनिटीज् अँड सायन्स, बॉयालॉजिकल्-सायन्स, बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम्.

४) योगेश्वरी सायन्स कॉलेज, मोमिनाबाद. बॉयालॉजिकल् सायन्स, बी. एस्सी.

५) गव्हर्मेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद. बी. ओडी. डिग्री एक्झॅमिनेशन.

६) माणिकचंद पाध्ये लॉ कॉलेज, औरंगाबाद. प्रिव्हीयस अँड फायनल एल्एल्. बी.

७) मराठवाडा अॅग्रिकल्चरल कॉलेज, परभणी. बी. एस्सी. (अॅग्रिकल्चर)

८) गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज, औरंगाबाद. फर्स्ट एम्. एम्. बी. एस्.

९) आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, जालना. प्री युनिव्हर्सिटी कोर्स, ह्युमॅनिटीज् अँड सायन्स.

१०) श्री छत्रपति शिवाजी, उमरगा. प्री युनिव्हर्सिटी कोर्स, ह्युमॅनिटीज् अँड सायन्स.

११) स्वामी विवेकानंद संस्थेचें आर्टस्-सायन्स कॉलेज, उस्मानाबाद. प्री युनिव्हर्सिटी कोर्स ह्युमॅनिटीज्, बी. ए.

१२) गव्हर्मेंट इंजिनियरिंग कॉलेज, औरंगाबाद.

# संस्था परिचय —

## श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वत्र भारतांत जें वैचारिक आंदोलन झालें त्यांतून सार्वजनिक राष्ट्रीय संस्था-विशेषतः शिक्षण संस्थांचा जन्म झाला. त्याचवेळीं अत्यंत प्रतिगामी व अप्रगत अशा देशी संस्थानांतही त्यांचे पडसाद उठले. तेथेही अशा संस्था थोड्या संख्येनें सुरु झाल्या. श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था ही अशीच १९१५ मध्यें मातृभाषेंतून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून सुरू झाली. ही मराठवाड्यांतील सर्वांत जुनीं शिक्षण संस्था आहे, अनेक अडचणींना तोंड देत व उद्दिष्टाचा ध्यास व तोही टिकविण्यासाठी अविश्रांत श्रम करीत ही संस्था आजवर चालली आहे. उस्मानिया विद्यापीठाची स्थापना व उर्दू भाषेचें वर्चस्व यामुळें संस्थेस कांहीं उर्दू माध्यमाचे वर्गहि चालवावे लागले. परंतु संस्थेनें मराठी माध्यमासाठीं पाठपुरावा चालूच ठेविला. संस्थेच्या मुलींच्या विभागांत शारदामंदीर हायस्कूलमध्यें मात्र उर्दूचा मुळीच प्रवेश होऊं दिला नाहीं. यासाठीं सरकारी रोष पत्करला ग्रँट बंद झालेली सहन केली. संस्थेच्या विद्यार्थिनींना कधीं नागपूर मॅट्रीक तर कधी ठाकरसी विद्यापीठाच्या मॅट्रीक परीक्षांना पाठविले. १९४९ मध्यें हैद्राबादेतील निजामी राजवट संपल्यानंतर मराठी माध्यमाच्या प्रतिष्ठापनेची घोषणा झाली. या संस्थेनें सर्वप्रथम मराठींतून विद्यार्थी मॅट्रीक परीक्षेस पाठविले.

१९४८ ते १९५२ या वर्षांत संस्थेची परिस्थिती फारच इकबाईस आली होती. आर्थिक ताण, कार्यकर्त्यांचा अभाव, सरकारी मदतीची अनिश्चितता, यामुळें संस्था बंद पडते कीं काय अशी दशा झाली होती. परंतु १९५३ मध्यें, संस्थेचे माजी विद्यार्थी, यांच्या हार्दिक सहकार्यानें व श्री. कर्वे गुरुजी व श्री. वैशंपायन यांच्या मार्गदर्शनानें संस्थेस नवीन जीवन मिळालें. संस्थेचे माजी विद्यार्थी व त्यावेळचे हैद्राबाद राज्याचे शिक्षण मंत्री श्री. गोपाळराव एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी संमेलन व संस्थेचा रौप्य महोत्सव मोठ्या थाटांत पार पडला. ८० पेक्षां अधिक माजी विद्यार्थी आजीव सभासद बनले. उदार आश्रयदात्यांच्या साह्यानें मध्यवर्ती सभागृहाचें १२ वर्षे अपूर्ण राहिलेलें काम पूर्ण झालें.

सन १९५५ मध्ये संस्थेनें बहुविध शिक्षण योजना स्विकारली' तिच्या दोन्हीं हायस्कूलांचें बहुविध शिक्षण प्रशालांत रूपांतर झाले. सरस्वति भुवन बहुविध प्रशाला (मुलांसाठी) व यांत वाणिज्य, विज्ञान व मानवता हे विषय व श्री शारदा मंदीर हायस्कूल बहुविध प्रशाला (मुलींसांठीं) यांत मानवता, विज्ञान व गृहशास्त्र हे विषय ऐच्छिक म्हणून निवडतां येतात. ही योजना पूर्ण होण्यासाठीं अेक लक्ष तेरा हजार रुपये लागले. या रकमेचा तिसरा हिस्सा ३८००० रुपये जनतेच्या सहकार्यानें उभे केले. व ७६००० रुपये केंद्र सरकारनें दिले. आज संस्थेजवळ विज्ञान व गृहविज्ञान या विषयासाठीं सुसज्ज विज्ञानगृह व गृहविज्ञान प्रयोगशाळा आहे. मराठवाड्यांत बहुविध शिक्षणक्रमाचा प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून सर्वतोपरी प्रयत्नाची परिसीमा करणारी ही पहिली संस्था आहे.

याच वर्षी गेली ४० वर्षे औरंगाबाद शहरापूरते मर्यादित असलेले आपले कार्यक्षेत्र संस्थेनें वाढविण्याचा निश्चय केला. व औरंगाबाद जिल्ह्यांत आठ ठिकांणी आपल्या शाखा–माध्यमिक शाळा– सुरूं केल्या. तेव्हांपासून आजपर्यंत या शाखांची वाढ व विस्तारच होत आहे. यंदा संस्थेनें सहा ठिकाणी हायस्कूलचे वर्ग काढून मुंबई राज्याच्या "दुय्यम शिक्षण वाढ व प्रसाराच्या" धोरणास सक्रीय पाठिंबा दिला आहे. आज संस्थेच्या शाखा व विस्तार पुढीलप्रमाणें आहे.

१) श्री. सरस्वती भुवन बहुविध शिक्षण प्रशाला, २) श्री. शारदा मंदीर एस. टी. सी. प्रशाला. ३) शिवण वर्ग, ४) संगीत वर्ग, ५) सायंतन विनयन वर्ग, माध्यमिक शाळा–पिंपरी, रांजणी, वडोदबाजार, भराडी, गोंदेगांव, कुंभार पिंपळगांव.

हायस्कूचे वर्ग– फुलंबरी, पिंपरी, गोंदेगांव, भराडी, जामखेड, जालना, सिल्लोड, विडकीन.

संस्थेच्या शाखांचें संचलन करण्यासाठीं स्थानिक समित्या आहेत. शाळांवर योग्य नियंत्रण ठेविण्यासाठीं व त्याना शैक्षणिक व /इतर मार्गदर्शन करण्यासाठीं केंद्रीय शाखा विभाग काढण्यांत आला आहे. शाखांपैकीं जालन्याचें हायस्कूल पूर्ण झालें आहे. १९५९ मध्यें या हायस्कूलांतुन मॅट्रीक परिक्षेसाठीं पहिली तुकडी पाठविली गेली. शेंकडा निकाल ७८ लागला. विडकीन येथें यंदा नववीचा वर्ग सुरूं झाला आहे. शाखेपैकीं स्वतःची इमारत बांधण्यांत बिडकीन शाखेनें पुढाकार घेतला आहे. आज बिडकीन येथें

मराठवाड्यांतील प्रमुख शिक्षण संस्था —



सरस्वती भुवन, औरंगाबाद.

शाळेसाठीं रु. १७०००ची इमारत तयार झाली आहे. रांजणी व पिंपरी शाखाहि लवकर इमारतीचें काम सुरूं करतील. पिंपरी शाळेस १४ एकरची जमीन मिळाली आहे व पिंपरी शाखेस ७२ एकरची जमीन मिळाली आहे. येथें शेतीविषयक शाळा सुरूं करण्याचा संस्थेचा मानस आहे.

खऱ्या अर्थानें व योग्य शिक्षण देण्यासाठीं विनित शिक्षक असणें आवश्यक आहे. म्हणूनच संस्थेनें गेलीं ६ वर्षे सतत ट्रेनिंगचे वर्ग चालविण्याचें धोरण ठेविलें. १९५५ ते ५७ मॅट्रिक बेसिक ट्रेनिंग, सायंतन वर्ग; १९५७ सालीं हिंदी शिक्षक सनद वर्ग व १९५८ व १९५९ या वर्षी एस. टी. सी. वर्ग संस्थेनें चालविले आहेत.

नाट्य कलेची सेवा, जोपासना व त्याचबरोबर संस्थेस मदत या हेतूनें संस्थेनें कला विभाग चालूं केला. या कला विभागानें आजपर्यंत नाटकाद्वारे संस्थेस १०,००० रुपये व इतर सामाजिक, शैक्षणिक कार्यास रु. ६००० मिळवून दिलें आहेत. अशारितीनें सातत्यानें कलेची सेवा करुन शिवाय भरपूर आर्थिक साह्य कला मंडळ करूं शकते, ही गौरवाची गोष्ट आहे. अशा प्रकारचे उदाहरण इतरत्र सांपडणें कठिण.

दैनंदिन शिक्षणाबरोबरच विविध शैक्षणिक प्रयोग करण्यासाठीं गतवर्षी संस्थेनें आपल्या शाखा व विभागांचे एक संमेलन शिक्षणमंत्री ना. हितेन्द्र देसाई यांचे अध्यक्षतेखालीं डिसेंबर १९५८ मध्यें भरविले होते. त्यापूर्वी शाखावरील शिक्षकासाठीं १५ दिवसांचे एक शिबीर घेतले होते. मे १९५९ मध्यें बहुविध शिक्षण प्रशालांच्या अध्यापकाचे एक सेमिनारही संस्थेनें घेतला होता.

अशा प्रकारच्या विविध योजना आंखून शिक्षण प्रसाराच्या कार्य करणाऱ्या संस्थेस दैनंदिन आर्थिक अडचण भासावी ही दुःखाची गोष्ट आहे. सरकारच्या ग्रँट देण्याच्या धोरणानुसार संस्थेस शेंकडा ६६ टक्के ग्रँट मिळते. परंतु आजहि ती १९५५-५६ च्या खर्चावर, त्यानंतरच्या काळांत मल्टीपरपज अभ्यासक्रमामुळें संस्थेचा व्याप वाढला, खर्च वाढला परंतु ग्रँट मात्र वाढली नाहीं. या संबंधी शिक्षण खात्यानें उदार धोरण घ्यावयास हवें होते. परंतु तसें आज होत नाहीं. मराठवाड्यास विकासास योग्य वाव मिळावा म्हणून जर खात्यानें उदार धोरण स्विकारले तर संस्था अधिक जोमानें पुढें चालूं शकेल. आज दैनंदिन खर्चाची तोंडमिळवणी करण्यांत खर्ची पडणारी तिची शक्ति अधिक विकासक्षम व उपयुक्त कामांत लागेल.

१९५८ मध्यें संस्थेची नवीन घटना संमत झाली व त्यानुसार नवीन कार्यकारी मंडळ अधिकारारुढ झालें आहे. या घटनेद्वारे संस्थेचा अंतर्गत व्यवस्था पहाणारे एक अंतर्गत व्यवस्था मंडळ तयार करण्यात आले आहे. कायम व हंगामी शिक्षकांच्या प्रतिनिधींचे हें मंडळ सर्व विभागाच्या अंतर्गत व्यवस्थेस जबाबदार आहे.

संस्थेनें सायंकॉलेज सुरू करण्यासाठीं मराठवाडा युनिव्हर्सिटींकडे अर्ज दिला होता. आर्थिक अडवणीमुळें तो योजना तूर्त मागे पडली आहे. परंतु लवकरच ती पूर्ण करूं असा चालकांना विश्वास वाटतो.

१९५३ मध्यें १२०० ते १५०० पर्यंत असलेली संस्थेच्या शाखा व विभागांचो विद्यार्थी संख्या आज ३५०० पेक्षां अधिक आहे. शिक्षकवर्ग १२५ पेक्षां अधिक आहे व आर्थिक आय-याचें वार्षिक प्रमाण अेक लाखावरून अडीच लाखावर गेलें आहे.

◆◆◆◆

# महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे

## *मराठवाडा शाखा, औरंगाबाद.*

"आमच्या देशांत आमच्या भाषला जेव्हां प्रतिष्ठेचें व वैभवाचें स्थान प्राप्त होईल त्यावेळीं ब्रिटीश राज्याच्या उच्चाटनाचें काम पूर्ण होणार आहे. सर्वांना समजेल व सर्व जनता बोलूं शकेल अशी एकमात्र भाषा हिंदीच आहे. हिंदी भारताची राष्ट्रभाषा आहे"– म. गांधी

पू. गांधीजींचे मतानुसार व पू. शंकररावजी देव; म. म. दत्तो वामन पोतदार यांचा नेतृत्वाखालीं महाराष्ट्र राष्ट्रभाषा पुणें या संस्थेची १९३७ साली स्थापना झाली.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणेची भूमिका पुढीलप्रमाणें आहे.–

१) भारतासारख्या बहुभाषी देशात एक राष्ट्रभाषा असावी.
२) प्रादेशिक भाषांचे स्थान व प्रतिष्ठा कायम राहून राष्ट्रभाषेचा प्रचार व्हावा.
३) प्रत्येक नागरिकाला हिन्दीचे कामचलाऊ ज्ञान असावे.
४) राष्ट्रभाषा हिंदी सर्व संग्राहक असावी, खऱ्या अर्थीनें सार्वदेशिक भाषा असावी व भारतातील सर्व भाषांच्या सहकार्यानें तिचा विकास व्हावा

५) महाराष्ट्र राष्ट्रभाषा पुणें ही संस्था दिल्लीच्या अखिल भारतीय हिंदी परिषदेशी संलग्न आहे. परिषदेचे संस्थापक व अध्यक्ष राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद आहेत.

## मुख्य कचेरी पुणें. पदाधिकारी :—

१) श्री. म. म. द. वा. पोतदार, अध्यक्ष
२) श्री. देवकीनंदन नारायण उपाध्यक्ष
३ श्री. बापुमहेव गुप्ते कोषाध्यक्ष
४) श्री. माधवराव मेमाणे कार्याध्यक्ष
५) श्री. गो. प. नेने मंत्री

पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांचें मार्गदर्शनाखालीं मराठवाड्यांत सभेचें काम जोरात सुरू आहे. मराठवाडा समितीचे नियमानुसार राज्य पुनर्रचनेनंतर सेलू येथील कार्यालय औरंगाबाद येथें नेण्यांत आलें.

श्री. कडेपूरकर. अेस. आर. गुरुजी श्री. चारठाणकर यांच्या प्रयत्नानें १९५५ साली सेलू येथें श्री. म.म पोतदार यांचे हस्ते मराठवाडा शाखेचें उद्घाटन दि. २८ फेब्रुवारी रोजी झालें.

## मराठवाडा शाखेचे पदाधिकारी :—

अध्यक्ष- पूज्य स्वामी रामानंद तीर्थ, उपाध्यक्ष- अेस. आर. गुरुजी, चिटणीस- श्री. वि. भ. चारठाणकर, श्री. स. कृ. वैशंपायन.

## मराठवाडा शाखेची उल्लेखनीय प्रगति :—

| | सन्- १९५७- | १९५८- | १९५९ |
|---|---|---|---|
| १) परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या- | ३५३८, | ४६२०, | ६८०७. |

ह्या वरून त्याचे कार्य वाढत आहे हें दिसून येते.

२) प्रचार कार्य करणारे कार्यकर्ते व हितचिंतक तसेच शिक्षक तयार करण्याच्या हेतूनें आतापावेतों नासिक, पुणें, औरंगाबाद व बार्शी या ठिकाणीं शिबिरे घेण्यांत आली.

३) सम्मेलने घेऊन त्यांतून जनसंपर्क साधून कामाचा व्याप वाढविला.

४) कार्यकर्त्यांचे दौरे सभेच्या प्रचार कार्यासाठीं मराठवाडा विभाग संघटक;

कार्यकर्ते, सभेचें संचालक श्री. आनोरकर आदिचे दौरे मराठवाड्यातून होत असतात. ठिकठिकाणी सभेच्या शाखा स्थापन करणें, कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या शंकांचे व अडचणीचे निरसन करणें हा या दौऱ्यातील मुख्य हेतू असतो

संस्थेच्या प्रचाराच्या दृष्टीनें दरवर्षी सभेच्या त्रोटक माहितीचे एक कॅलेंडर प्रसिद्ध करण्यांत येत असते. त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

संस्थेचें काम व्यवस्थित व संघटितरित्या चालावे म्हणून निरनिराळ्या ठिकाणी कार्यकर्ते नियुक्त केलेले आहेत.

विद्यार्थ्यांमध्यें बहुश्रुतता यावी म्हणून राष्ट्रीय दिन साहित्यिकांचें पुण्य-स्मरण, उत्सव तसेंच निबंध स्पर्धा व वाक्स्पर्धा वगैरे कार्यक्रम ठेवण्यात येऊन प्रोत्साहनास्पद बक्षिसें देण्यांत येतात.

मराठवाड्यांत कार्याला स्थैर्य येण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या ठिकाणीं हिंदी प्रेमी मंडळ स्थापून त्याच्या द्वारें हिंदीचे वर्ग चालविणें, उत्सव साजरे करणें, व्याख्यानमाला चालविणें यासारखीं हिंदी प्रचाराचीं कामें होवूं शकतात.

**महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा - मराठवाडा, औरंगाबाद.**



**या संस्थेचें कार्यालय हल्लीं वरील जागेंत आहे.**

पुणें येथील सभेला ज्याप्रमाणें भव्य इमारत व स्वतंत्र प्रेस आहे, त्याप्रमाणें मराठवाडा शाखा औरंगाबाद या ठिकाणीं शहरास अनुसरून योग्य अशी इमारत बांधण्याचा निर्णय घेतला असून जागाहि पण खरेदी केली आहे. हे राष्ट्रभाषेच्या व येथील कार्यकर्त्यांच्या श्रेष्ठ व जेष्ठतेचें द्योतक होय. ह्या संस्थेला जनतेनें सक्रिय सहकार्य द्यावे अशी विनंती संस्थेचे चिटणीस करीत आहेत.

◆◆◆◆

# राजाभाऊ इन्स्टीटयूट ऑफ रेडिओ अंड इलेक्ट्रॉनिक्स औरंगाबाद.

मराठवाडा मुंबईराज्यामध्यें सामील झाल्यापासून मराठवाड्याची अनेक दृष्टिनें प्रगति होत आहे. याच प्रगतिपथावरील उल्लेखनीय टप्पा म्हणजेच औरंगबाद येथें सुरू झालेली **राजाभाऊ इन्स्टीटयूट ऑफ रेडिओ अॅन्ड इलेक्ट्रानिक्स** ही संस्था होय. या संस्थेस सरकारी मान्यता असून, दरवर्षी मॅट्रिक. इंटर व बी. एम्. सी. झालेले विद्यार्थी या संस्थेचा फायदा घेऊन रेडिओ सर्व्हिसिंग शिकत आहेत. हा एक वर्षाचा कोर्स असून परीक्षा गव्हर्नमेंटतर्फे घेतली जाऊन पास झालेल्याना गव्हर्नमेंट सर्टिफिकेटस् दिली जातात. वायरमन अप्रेन्टीस हा सहा महिन्याचा कोर्स चौथी पास झालेल्यांना या संस्थेत घेता येतो. तसेच इलेक्ट्रीकल सुपरवायझरच्या पी. डब्लू. डी. च्या परिक्षेकरितां विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देण्यात येते. सीटी अॅन्ड गील्डस् व बी. आय्. इ. टी च्या परीक्षांना बसणाऱ्या इलेक्ट्रीक व रेडिओ एंजिनियरींगच्या कुठल्याही परीक्षेच्या अभ्यासासाठी टयूशन्स दिल्या जातात. या संस्थेनी रेडिओ प्रॅक्टीकल लॅबॉरेटरी सर्व साधनांनी परिपूर्ण आहे. या संस्थेत स्त्रियांनाही प्रवेश दिला जातो. क्लासेसच्या वेळा अशा ठेवण्यात आल्या आहेत की शाळा—कॉलेजला जाणाऱ्यांना तसेंच सर्व्हिसमध्यें असलेल्याना फावल्या वेळात या संस्थेचा फायदा घेता येतो.

या संस्थेचे चालक श्री. राजाभाऊ तिडके हे स्वतः क्वॉलिफाईड रेडिओ-इलेक्ट्रीकल एंजिनियर असून त्यांना अत्यंत परिश्रमानें व अनेक अडचणींना तोंड देऊन ही संस्था चालविली आहे. त्यांच शिकविण्याचा व प्रॅक्टी—

कलचा चौदा वर्षाचा अनुभव आहे. रेडिओ क्षेत्रांतील एखादी किचकट समस्या, एखादें उदाहरण अगर दाखला घेऊन विद्यार्थ्यांना समजावून देण्यांत त्यांचा हातखंडा आहे.



**राजाभाऊ इन्स्टिटयूट वरील बिल्डींगमध्यें आहे.**

पंचवार्षिक योजनेंत मराठवाड्यांत अनेक वीज नसलेल्या गांवांना विजेचा पुरवठा करण्यांत येणार आहे. आणि वीज आल्यानंतर कितीतरी नवीन रेडिओची विक्री होऊं शकेल. अनेक रेडिओ मेकॅनिक्स व वायरमेनकरितां मोठें क्षेत्र खुलें आहे. देशांत बेकारीची ओरड नेहमीच ऐकूं येते पण या क्षेत्रांत पडल्यावर अनेकांना धंदा; व्यवसाय करतां येतो. किंवा पोलीस वायरलेस, मिलिटरी वायर_

लेस, रूरल, ब्रॉडकॉस्टींग, ट्रान्समिटींग स्टेशन्स अशा ठिकाणीं नोकरी मिळू शकते. शिवाय आपल्या देशांत टेलिव्हिजनचा प्रसार व्हावयाचा आहे. अर्थात अगोदर रेडिओचे शिक्षण घेतलेल्यांनाच त्यांत प्रगति करितां येईल, हे अगदीं उघड आहे. रेडिओ–टेलिव्हिजन टेक्निशियन्सची शेंकडोंनीं गरज भासणार आहे. बेकारीपासून अलिप्त राहण्यासाठीं हें शिक्षण हा एक खास मार्ग आहे. वरील संस्थेत रेडिओ दुरुस्तीहि केली जाते व अर्थात या ठिकाणीं उत्कृष्ट प्रकारें रेडिओ दुरुस्त केला जातो, हे वेगळे सांगण्याची जरुरी नाहीं.



काहीं विद्यार्थी रेडिओ लेबॉरेटरींत काम करतांना दिसत आहेत

सबंध मराठवाड्यांत वर उल्लेखिलेली कोर्सेस् शिकविणारी ही एकमेव संस्था आहे, अशा या संस्थेला उत्तरोत्तर भरभराट लाभो अशीच कुणाचीही इच्छा असणार !

# मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद

मराठवाडा हे मराठी संस्कृतीचें माहेरघर आहे, मराठवाड्याचा सांस्कृतिक वारसा संपन्न आहे. एकेकाळीं हा प्रदेश जुन्या विद्यांचे माहेरघर म्हणून ओळखला जाई. पण निजामी राजवटींत येथील जनतेच्या जीवनांत सर्वत्र क्षेत्रांत एक प्रकारची मरगळ आली त्यामुळें ब्रिटीश अंमलाखालील भारतीय प्रदेशापेक्षां हा भाग मागासलेला शैक्षणिक सोईच्या दृष्टीनें अविकसित असा राहिला. मागासलेल्यांना समाजांत अग्रेसरत्व प्राप्त करून दिलें पाहिजे. या प्रिय तत्वानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं या भागाचीच निवड करण्यांत औचित्य साधले. डॉ. आंबेडकरांनीं पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना १९४६ त करून मुंबई येथें सिद्धार्थ महाविद्यालय सुरूं केलें. आतां मुंबई येथें संस्थेनें कला, विज्ञान, वाणिज्य व कायदा या ज्ञानशाखांचे शिक्षण देणारी कॉलेजेस् अत्यंत कार्यक्षमतेनें चालविली आहेत. या सव महाविद्यालयांचा लौकिक सुपरिचित आहे.

महात्मा गौतम बुद्धाच्या विचारानें पावन झालेल्या भूमींत एक आदर्श महाविद्यालय चालवावे असा डॉ. बाबासाहेबांचा मानस होता. आणि म्हणून निजामी राजवट संपुष्टांत आल्यानंतर १९५० च्या जून-मध्यें मराठवाड्याचे केंद्र म्हणून समजल्या जाणाऱ्या औरंगाबादेंत डॉ. बाबासाहेबानीं कॉलेज सुरूं करण्याचा निर्णय घेतला. या कॉलेजला सुसज्ज करणें हा मोठा प्रश्न होता. त्यासाठीं आर्थिक बळ हवे होते. शेड्यूल्ड कास्ट ट्रस्ट फंडानें दिलेल्या १२ लाखांच्या बिनव्याजी कर्जाची रक्कम मिळतांच संस्थेला नवें सामर्थ्य प्राप्त झाले.

कॉलेज सुरूं झाले त्यावेळी पटावर फक्त १४० विद्यार्थी कला, विज्ञान व वाणिज्य या तीन ज्ञानशाखांत शिक्षण घेत होते. यापैकीं फक्त २६ च विद्यार्थी वर्गीकृत व अनुसूचित जातींतील होते. पण १९५९ मध्यें एकूण १३५२ विद्यार्थ्यांत ४७५ इतके विद्यार्थी वर्गीकृत जाती व अनुसूचित जमातींतील आहेत. आजवर उच्च शिक्षणाला पारखा झालेल्या या जमातींत ज्ञानाची शक्ति निर्माण झाली तर ही जमात प्रज्ञावंत होऊन सर्वांगीण प्रगति करूं शकेल अशी डॉ. बाबासाहेबांची खात्री होती. डॉ. बाबासाहेबांच्या या आवडत्या कॉलेजांत शिक्षण

घेण्यासाठीं देशाच्या कोनाकोंपऱ्यांतून मागासलेल्या जमातींतील विद्यार्थी धांव घेत असतात. शिवाय मराठवाड्याच्या ग्रामीण विभागांतील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षणासाठीं येथें येतात. या सर्वांची सोय व्हावी म्हणून सर्व आधुनिक सोयींनीं सुसज्ज अशी दोन वसतीगृहें बांधली. यांत सुमारें ३०० विद्यार्थ्यांची सोय होऊं शकते. पण वसतीगृहांत राहूं अिच्छिणारांची संख्या सतत वाढती आहे व शिवाय विद्यार्थिनींसाठीं स्वतंत्र वसतीगृह आवश्यक आहे. या उणीवा दूर करण्याच्या प्रयत्नांत संस्था आहेच. कॉलेज आपल्या मालकीच्या अिमारतींत आणावे यासाठीं जवळजवळ ११० एकर जागा अत्यंत निसर्गरम्य ठिकाणीं खरेदी करण्यांत आली व १९५१ त राष्ट्रपति डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या शुभहस्ते इमारतीची कोनशिला बसविण्यांत आली. आणि अल्पावधींतच अिमारत पूर्ण होऊन ग्रंथालय, प्रयोगशाळा, सुसज्ज झाल्या. या कॉलेजला बुद्धकालांत गाजलेल्या 'मिलिंद' राजाचे नांव मुद्दामच देण्यांत आले. विद्या, विनय, व शील या त्रिगुणांनीं युक्त असे विद्यार्थी या कॉलेजांतून तयार व्हावेत यासाठीं मिलिन्द या आदर्श राजाचे नाव योजण्यांत डॉ. बाबासाहेबांनीं अपूर्व रसिकता व मार्मिकपणा प्रकट केला. 'बहुजन हिताय' 'बहुजय सुखाय' या बुद्धानें उद्घोषिलेल्या घोषवाक्यानुसार येथले विद्यार्थी प्रज्ञावंत, करुणायुक्त होतील, असा विश्वास त्यांनीं बाळगलेला होता.

या कॉलेजला सुसज्ज प्रयोगशाळा आहे व त्यांतील विविध उपकरणें अद्यावत व सुमारे २ लाख रुपये किमतीची आहेत. जीवशास्त्र, रसायन, विज्ञान व प्राणिशास्त्र यांच्या स्वतंत्र प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळेंत एकाच वेळीं ३५० विद्यार्थी काम करूं शकतात. आज ग्रंथालयांत विविध विषयांवरची निवडक अशी सुमारें दहा हजार पुस्तकें आहेत शिवाय वाचनालय विभागांत एकूण ७० दैनिकें, मासिकें आणि नियतकालिकें येतात. विद्यार्थ्यांना ग्रंथालयांत बसूनहि अभ्यास करण्याची सोय उपलब्ध आहे. खेळाचे सर्व आधुनिक साहित्य उपलब्ध असून क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल व देशी मैदानी खेळ यांची स्वतंत्र क्रीडांगणें आहेत. आतां सुसज्ज अशी व्यायामशाळा बांधली जाईल. या कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीस वाव मिळावा म्हणून इंग्रजी, हिंदी,

उर्दू, मराठी; या भाषांची वाङमयाभ्यास मंडळें, कला व सांस्कृतिक मंडळ, विज्ञान मंडळ, वाणिज्य मंडळ, समाजशास्त्राभ्यास मंडळ कार्य करीत असतात. याशिवाय भारतीय पंचवार्षिक योजनांचा अभ्यास करणारे आर्थिक नियोजन अभ्यास मंडळ कार्य करते. या सर्व मंडळाचे दैनंदिन कार्य तज्ञ- प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखालीं विद्यार्थ्यांचे प्रतिनिधि उत्साहानें पार पाडतात. व्याख्यानें, परिसंवाद, स्पर्धा, करमणुकीचे कार्यक्रम इ. भरगच्च कार्यक्रम ही मडळें आखतात. या कार्यक्रमासाठीं एक भव्य सभागृहाची आवश्यकता होती. केंद्र सरकारची देणगी व विद्यार्थ्यांचे श्रमदान यामुळें संस्थेनें सुमारे दीड हजार प्रेक्षक बसू शकतील असें अद्यावत् पद्धतीचे प्रेक्षागृह बांधण्याचे काम पुरे करीत आणले आहे. या प्रेक्षागृहाची कोनशिला बसविण्यासाठीं भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु मुद्दाम आले होते. डॉ. बाबासाहेबांचे पं. नेहरू एक जुने मित्र! आपल्या मित्राचे स्वप्न साकार झालेले पाहून व संस्था प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे, हे पाहून त्याना खूप आनंद वाटला.

कॉलेजांत तज्ञ व अनुभवी प्राध्यापकाची नेमणूक करण्यांत आली आहे एकूण प्राध्यापकांची संख्या ५० असून इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, अितिहास, अर्थशास्त्र, वाणिज्य, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायन, विज्ञान, गणित, राज्य शास्त्र, तत्वज्ञान अि. विषयांचे खास शिक्षण दिले जाते. १९५० पासून १९५८ जूनपर्यंत या कॉलेजच्या प्राचार्यपदाची सूत्रें प्रा. म. भी. चिटणीस यांच्या हातीं होती. त्यांची नव्यानेंच स्थापन झालेल्या मराठवाडा विद्यापीठांत रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाल्यानें या कॉलेजचे प्राचार्य म्हणून जुलै १९५८ पासून प्रा. म. ना. वानखडे यांची नियुक्ती करण्यांत आली त्यांच्या नेतृत्वाखालीं संस्था सतत प्रगतीपथावर पाऊल टाकीत आहे.

आजवर या संस्थेचा येथील कारभार पाहण्यासाठीं रजिस्ट्रार म्हणून श्री. मेश्राम, श्री. वराळे यांनीं काम केले. आज या पदाची सूत्रें श्री. एम्. बी. सावंत यांच्याकडे आहेत,

या कॉलेजला आजवर राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद, पं. नेहरू, श्री. चिंतामणराव देशमुख, कै. अनंतशयनम् अय्यंगार, कै. सरदार पटेल, श्री. यशवंतराव चव्हाण, मुंबईचे शिक्षणमंत्री हितेंद्र देसाई, वनमंत्री श्री. गाडे श्री. वेलोदी, सुविख्यात लेखक आर्थर कोएस्लर अि. श्रेष्ठ व मान्यवर, विचारवंतांनीं भेटी दिल्या व त्यांनीं संस्थेचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले.

## महेश महाविद्यालय सिरुर ताजबंद या संस्थेचा परिचय

उस्मानाबाद जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यांतील सिरूर ताजबंद हें गांव वहातुकीच्या सोईच्या दृष्टीनें अतिशय मोक्याचें आहे, अशा गांवीं आदरणीय पंडितजींच्या जन्मदिनीं या शिक्षण संस्थेचा जन्म झाला. या निमित्तानें या भागांतील खेडूत जनतेंत सुप्त असलेली शैक्षणिक भूक गेल्या १०-१२ वर्षांत जागृत झालेली स्पष्टपणें दिसून आली. सहाजिकच महेश विद्यालयाला पुरेसे विद्यार्थी व आर्थिक सहाय्य प्राप्त झालें. पण पुढें चालून कांहीं कारणामुळें संस्थेच्या वाढीला खीळ बसून तिची इमारत देखील पूर्ण होऊं शकली नाहीं. गेल्या दोन अडीच वर्षापासून मात्र संस्थेच्या परिस्थितींत ः पोषक बदल होत चालला असून संस्थेची व्यवस्थापक समिति व शिक्षक वर्ग आपापलीं कामें कर्तव्य तत्परतेनें व उत्साहानें करीत आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्री. शंकरलालजी जाजू, चिटणीस श्री. महालिंगप्पा वकील आणि मुख्याध्यापक श्री. डी. डी. शास्त्री यांच्या अविरत व पद्धतशीर प्रयत्नामुळें संस्थेच्या कार्याचा गाडा सुरळीत चालूं झाला असून संस्थेला गांवकरी आणि भोंवतालची खेडूत जनता आपापल्या परीनें सहाय्य करण्यासाठीं तयार झाली आहे. सिरूर ताजबंद येथील श्री. महेश विद्यालय ही संस्था या भागांतील एक अदरणीय शक्षणिक संस्था म्हणून पुढें येईल अशी बळकट आशा बाळगण्यास हरकत नाहीं


मराठवाड्यांत

आकर्षक व टिकाऊ

पेन्टींगच्या कामाकरितां

—० प्रसिद्ध ०—

रवि फाईन आर्टस्

सराफा रोड, औरंगाबाद.

९७३८७

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचें

# आर्टस् कॉलेज, उस्मानाबाद

कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेनें हे कॉलेज उस्मानाबाद या जिल्ह्याच्या ठिकाणीं जून १९५९ पासून सुरूं केलेले आहे. चालूं सालीं P. U C. व B. A. 1st year हे वर्ग सुरूं केले असून त्यात अिंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय शिकविण्याची सोय असून जून १९६० पासून कॉमर्स व अितिहास हेहि विषय शिकविण्यांत येणार आहेत.

या संस्थेस उस्मानाबाद म्युनिसिपालिटीनें अिमारत व क्रिडांगणासाठीं ६ एकर जागा तारंगी विभागांत जुजबी भाडे घेऊन दिली असून वार्षिक ५००० रुपयांची देणगीही दिलेली आहे. जिल्हा लोकल बोर्डानेंही रु. १०००० देणगी दिलेली असून जून १९६० पासून कॉलेज नवीन अिमारतीत कार्य करूं लागेल.

कॉलेजला जोडूनच वसतिगृहाची सोय कमींत कमी खर्चात द. म. १५ रुपयांत केलेली आहे.

निरक्षर जनतेला साक्षर तर बनवायचेंच पण त्याशिवाय "ज्ञान, विज्ञान, आणि सुसंस्कार यासाठीं शिक्षण देऊन समाजांत चारित्र्य, प्रामाणिकपणा, सत्य व पिळवणूक प्रवृत्तीला आळा घालणारी वृत्ति याचे वर्धन करणें या ध्येय धोरणानें संस्थेचे कार्य सुरूं असते." मराठवाड्यांत अशा रीतीनें कार्य करणारी ही एकमेव संस्था आहे.

कॉलेजचे प्रमुख म्हणून प्रिन्सिपॉल रा. कृ. कणबरकर एम. ए. हे काम पहातात.

◆ ◆ ◆ ◆



# प्लेटो ६६ पेन आजच खरेदी करा



प्लेटो ६६ पेन बस
आप ही के
लिए है
सब प्रसङ्गों पर
उपयोगी है
वजह है
उसका दिलकश
रूप मजबूत
नीब दिलचस्प
रंग केवल
रु. ४ में
प्राप्य

प्लेटो
पेन की
कीमतों का
दायरा
रु. ४ से
रु. २७.५०
तक है

PLATO REGD.

**plato 66**

**म्हात्रे प्रॉडक्ट**

एक मात्र वितरक:
बेस्ट फौंटन पेन डेपो
पो. बॉक्स नं. २४२१ बम्बई २

Shilpi M.P. 508 HIN.

# *औरंगाबाद जिल्हा*

## तालुका औरंगाबाद

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १) | औरंगाबाद | मल्टी पर्पज हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | आहे |
| २) | औरंगाबाद | हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ३) | औरंगाबाद | मॉडेल मिडल् स्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ४) | औरंगाबाद | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी आणि हिंदूस्थानी | सरकार | नाहीं |
| ५) | औरंगाबाद | न्यू मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६) | औरंगाबाद | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७) | औरंगाबाद | सिनियर बेसिक सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ८) | गोलठाण | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका पैठण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९) | पैठण | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कू | मराठी | सरकार | नाहीं |
| १०) | पहिदा माव्हा | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका वैजापूर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११) | वैजापूर | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १२) | शिवार | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १३) | लासूर | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका गंगापूर

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १४) | गंगापूर | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका कन्नड

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १५) | कन्नड | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १६) | चिपनेर | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १७) | दुगांव | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १८) | शफिपूर | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| १९) | नगद | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २०) | हातनूर | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका खुलदाबाद

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २१) | तालकी | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २२) | शिवनी बाजार | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका सिल्लोड

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २३) | सिल्लोड | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २४) | अजिंठा | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २५) | सोयगांव (महाल) | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २६) | शिवना | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २७) | जरांडा | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका भोकरदन** | | | |
| २८) | भोकरदन | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २९) | अनावा | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका जाफराबाद** | | | |
| ३०) | जाफराबाद | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका जालना** | | | |
| ३१) | जालना | गव्हर्मेंट मल्टि पर्पज हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | आहे |
| ३२) | जालना | गव्हर्मेंट मिडल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३३) | शेवाली | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३४) | दाभाडी | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका अंबड** | | | |
| ३५) | अंबड | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३६) | तीर्थपूरी | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३७) | जामखेड | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३८) | गोंडी | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३९) | वडगांव वेडरी | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका औरंगाबाद (खाजगी शिक्षण संस्था)** | | | |
| ४०) | औरंगाबाद | श्री सरस्वती भुवन मल्टीपर्पज हायस्कूल | मराठी | सरस्वति भुवन अेज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| ४१) | औरंगाबाद | मराठा हायस्कूल | मराठी | मराठा विद्यालय सोसायटी औरंगाबाद | आहे |
| ४२) | औरंगाबाद | मिलिंद महा-विद्यालय | इंग्रजी आणि मराठी | पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई | आहे |
| ४३) | औरंगाबाद | C-M.S.मिशन मिडल् स्कूल | मराठी | चर्च मिशनरी सोससाटी इंग्लंड | नाहीं<br>नाहीं |
| ४४) | औरंगाबाद | रेजिमेंटल चिल्ड्रन मिड्ल स्कूल आर मिलिटरी मिडल् स्कूल | हिंदी | मिलिट्री कँटोन्मेंट बोर्ड औरंगाबाद | नाहीं |
| ४५) | औरंगाबाद | लिटल् फ्लॉवर स्कूल | मराठी | चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन इंग्लंड | नाहीं |
| ४६) | औरंगाबाद | जुनत उल् उर्दू स्कूल | उर्दू | लोकल एज्युकेशन कमेटी | नाहीं |
| ४७) | औरंगाबाद | श्री गुजराथी पा. शाळा | मराठी | गुजराथी समाज विकास मंडळ औरंगाबाद | नाहीं |
| ४८) | पिंपरी | S. B. ब्रँच मिड्ल् स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| | | **तालुका पैठण** | | | |
| ४९) | बिडकीन | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| | | **तालुका गंगापूर** | | | |
| ५०) | वालजी | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|

## तालुका सिल्लोड

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५१) | वडाड बाजार | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| ५२) | गोंदेगांव | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| ५३) | वऱ्हाडी | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| ५४) | अंधेरी | S. B. ब्रँच M. S. स्कूल | मराठी | S. B. एज्युकेशन सोसा. औरंगाबाद | नाहीं |

## तालुका भोकरदन

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५५) | पराडा | जनता मिडल् स्कूल | मराठी | अजंठा एज्यु. सो. पराडा | नाहीं |

## तालुका जाफराबाद

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५६) | टेंभुर्णी | नवभारत मिडल् स्कूल | मराठी | जनता शिक्षण समिती | नाहीं |

## तालुका जालना

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५७) | जालना | राष्ट्रीय हिंदी विद्यालय | हिंदी आणि मराठी | राष्ट्रीय हिंदी विद्यालय समिती जालना | नाहीं |
| ५८) | जालना | जनता इंग्लिश स्कूल | मराठी | जनता शिक्षण प्रसारक मंडळ जालना | आहे |
| ५९) | जालना | चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन स्कूल | मराठी | चर्च ऑफ स्कॉटलंड मिडल् स्कूल सो. | आहे |
| ६०) | जालना | C. T. M. K. गुजराती मिडल् स्कूल | गुजराती | गुजराती एज्यु. सोसायटी | नाहीं |
| ६१) | जालना | महावीर स्थानक जैन विद्यालय | हिंदी | लोकल एज्यु. सोसायटी | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|

## गर्ल्स स्कूल-- सरकारी

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ६२) | औरंगाबाद | गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ६३) | औरंगाबाद | गव्हर्मेंट गर्ल्स मिडल् स्कूल | मराठी आणि हिंदुस्थानी | सरकार | नाहीं |
| ६४) | जालना | गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६५) | वैजापूर | गव्हर्मेंट मिडल् स्कूल फॉर गर्ल्स | मराठी | सरकार | नाहीं |

## खाजगी संस्था

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ६६) | औरंगाबाद | शारदा मंदिर गर्ल्स मल्टिपरपज हायस्कूल | मराठी | सरस्वती भुवन एज्यु. सोसा. औरंगाबाद | नाहीं |
| ६७) | जालना | मिशन गर्ल्स हायस्कूल | मराठी | चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन इंग्लंड | नाहीं |
| ६८) | जालना | शारदा मंदिर गर्ल्स मिडल् स्कूल | मराठी | सरस्वती भुवन एज्यु. सोसा. औरंगाबाद | नाहीं |

## *बीड जिल्हा*

## तालुका बीड

## मुलांच्या शाळा (सरकारी)

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १) | बीड | गव्हर्मेंट मल्टि-परपज हायस्कूल | मराठी आणि हिंदुस्थानी | सरकार | आहे |
| २) | धोंडीपूर | गव्हर्मेंट C. P. S. | मराठी | सरकार | नाहीं |
| ३) | बीड पेठ | गव्ह. प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४) | मारगांव | गव्हर्मेंट C.P.S. | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५) | चोसळा | गव्ह. प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६) | यलाम | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७) | वेकनोर | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ८) | लिंबगणेश | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ९) | राजुरी | गव्ह. प्रायमरी स्कूल. | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका पाटोदा** | | | |
| १०) | पाटोदा | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ११) | धोमटी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १२) | डोंगरखेडा | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १३) | अंमळनेर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १४) | पिंपळवाडी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १५) | आर्वी | गव्ह. प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १६) | शिरूर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १७) | कुसलाम | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १८) | खोकरपूर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका अष्टी** | | | |
| १९) | अष्टी | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २०) | खेड | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २१) | ब्रम्हगांव | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २२) | कुंटीपदन | गव्ह. प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका गेवराई

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २३) | गेवराई | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २४) | चौकलंब | गव्ह. प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका माजलगांव

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २५) | माजलगांव | गव्हर्नमेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २६) | पथरुड | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २७) | कुप्पा | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २८) | गंगामासळ | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २९) | तालखेड | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका मोमिनाबाद

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ३०) | मोमिनाबाद | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | आहे |
| ३१) | परळी वैजनाथ | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३२) | पानगांव | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३३) | रेवापूर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका केज** | | | |
| ३४) | केज | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३५) | धारुर फत्तेबाद | गव्ह. मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३६) | अदास | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३७) | नांदूर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३८) | वाडवणी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **मुलांच्या शाळा (खाजगी शिक्षण संस्था)** | | | |
| ३९) | बीड | चंपावती विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |
| | | **तालुका अष्टी** | | | |
| ४०) | काडा | अमोलिक विद्यालय | मराठी | श्री अमोलिक विद्या प्रसारक मंडळ, काडा | नाहीं |
| | | **तालुका मोमिनाबाद** | | | |
| ४१) | मोमिनाबाद | श्री योगेश्वरी नूतन विद्यालय | मराठी | योगेश्वरी एज्यु. सो. मोमिनाबाद | आहे |
| ४२) | मोमिनाबाद | श्री खोसवाल विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |
| ४३) | परळी वैजनाथ | वैजनाथ विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |
| ४४) | घाटनांदूर | सोमेश्वर विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |
| ४५) | परळी वैजनाथ | सरस्वती विद्यालय | मराठी | श्री सरस्वती विद्यालय परळी | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ४६) | खरोला | केशव विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |
| ४७) | बद्रापूर | शंकर विद्यालय | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |

## मुलींच्या शाळा (सरकारी)

### तालुका बीड

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ४८) | बीड | गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |

### तालुका मोमिनाबाद

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ४९) | मोमिनाबाद | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल फॉर गर्ल्स | मराठी | सरकार | नाहीं |
| ५०) | परळी वैजनाथ | गव्ह. प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## *परभणी जिल्हा*

## मुलांच्या शाळा (सरकारी)

### तालुका परभणी

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १) | परभणी | गव्हर्मेंट मल्टि-पर्पज हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | आहे |
| २) | परभणी | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३) | पूर्णा | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४) | भोगांव | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५) | ताकी कुंभकरण | गव्ह. सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका गंगाखेड** | | | |
| ६) | गंगाखेड | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७) | सोनपत | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ८) | रावराजुरा | गव्ह. प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ९) | पालम | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०) | राणी सारगांव | गव्ह. प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ११) | बनवास | गव्ह. प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका पाथरी** | | | |
| १२) | पाथरी | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १३) | मानवत | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १४) | सेलू | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका परतूर** | | | |
| १५) | परतूर | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १६) | पाटोदा | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १७) | अष्टी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका जितूर** | | | |
| १८) | जितूर | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सहकार | नाहीं |
| १९) | बारी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका हिंगोली** | | | |
| २०) | हिंगोली | गव्ह. हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २१) | नारसी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २२) | औंढा नागनाथ | गव्ह. सेंट्रल प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २३) | गोरेगांव | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी कम् मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका कळमनुरी** | | | |
| २४) | कळमनुरी | गव्हर्मेंट मिड्ल कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २५) | सिल्हासा | गव्हर्मेंट प्रायमरी कम् मिड्ल स्कूल | मराठी | सरकार | नाही |
| २६) | अखेडा | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २७) | नंदापूर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका वसमतनगर** | | | |
| २८) | वसमतनगर | गव्हर्मेंट मिड्ल कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २९) | अेरंडेश्वर | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार<br>सरकार | नाहीं<br>नाहीं |
| ३०) | शिरुड शहापूर | गव्हर्मेंट प्राय- मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३१) | कुरुंद | गव्हर्मेंट प्राय- मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३२) | पौढा | गव्हर्मेंट प्राय- मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ३३) | पुरजाळ | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## मुलांच्या शाळा (खाजगी शिक्षण संस्था)

### तालुका परभणी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४) | परभणी | नूतन प्राथमिक शिक्षणालय | मराठी | नूतन प्राथमिक शिक्षणालय परभणी | नाहीं |
| ३५) | परभणी | फुली विद्यामंदिर | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |

### तालुका पाथरी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६) | सेलू | नूतन मल्टिपरपज् स्कूल | मराठी | लोकल एज्यु. बोर्ड | नाहीं |

### तालुका हिंगोली

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७) | हिंगोली | माणिकस्मारक आर्य विद्यालय | मराठी | आर्यन एज्यु. सोसायटी हैद्राबाद | नाहीं |
| ३८) | हिंगोली | भारत विद्यामंदिर | मराठी | लोकल एज्यु. कमेटी | नाहीं |

### तालुका बसनगर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३९) | वाप्ती | बहिर्जी माध्यमिक विद्यालय | मराठी | लोकल एज्युकेशन कमेटी | नाहीं |

## मुलींच्या शाळा (सरकारी)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४०) | परभणी | गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ४१) | हिंगोली | गव्हर्मेंट गर्ल्स मिड्ल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

# *नांदेड जिल्हा*

## मुलांची शाळा (सरकारी)

### तालुका नांदेड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | नांदेड | गव्हर्मेंट मल्टिपरपज हायस्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | आहे |

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २) | अितवारा | गव्हर्मेंट मिड्ल स्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ३) | मुदखेड | गव्हर्मेंट मिड्ल स्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |
| ४) | बराड | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी आणि उर्दू | सरकार | नाहीं |

## तालुका बिलोली

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ५) | बिलोली | गव्हर्मेंट मिड्ल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६) | कुंडलवाडी | गव्हर्मेंट मिड्ल स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७) | कसर हाली | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ८) | वडवडा | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका मुखेड

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ९) | मुखेड | गव्हर्मेंट मिड्ल कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०) | मुकरामाबाद | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ११) | बटमोगरा | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १२) | जोहार | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका कंधार

| अ.नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १३) | कंधार | गव्हर्मेंट मिड्ल कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १४) | कवठा | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १५) | उस्माननगर | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १६) | कलमवीर. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १७) | अंमलणा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १८) | लोहा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका हदगांव** | | | |
| १९) | हदगांव. | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २०) | पलसा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाही |
| २१) | भटगांव. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २२) | निवगा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका देगलूर** | | | |
| २३) | देगलूर. | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी आणि अुर्दू | सरकार | नाहीं |
| | | **तालुका किनवर** | | | |
| २४) | किनवर. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २५) | लखमापूर. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २६) | मानभुवी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका राजूर** | | | |
| २७) | राजूर. | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २८) | अंतरगांव. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका नांदेड** | | | |
| २९) | नांदेड. | प्रतिभा निकेतन हायस्कूल | मराठी | प्रतिभा निकेतन एज्युकेशन सोसायटी | नाहीं |
| ३०) | नांदेड (नवीन शहर). | पीपल्स हायस्कूल | मराठी | नांदेड एज्युकेशन सोसायटी | नाहीं |
| ३१) | नांदेड गादी (पुरा) | गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय | हिंदी | लोकल एज्युकेशन कमेटी | नाहीं |
| ३२) | नांदेड (मजीद) | मक्का शारदा-भुवन स्कूल | मराठी | लोकल एज्युकेशन कमेटी | नाहीं |
| ३३) | नांदेड (नवीन शहर) | नूतन माध्यमिक शाळा | मराठी | नांदेड एज्युकेशन सोसायटी | नाहीं |
| ३४) | नांदेड वझीरा-बाद. | आंध्र समिति तेलगु शाळा | तेलगु | आंध्र समिति नांदेड | नाहीं |
| ३५) | नांदेड. | गव्हर्मेंट गर्ल हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका मुखेड** | | | |
| ३६) | जाम (बुद्रुक) | नीतिनिकेतन हायस्कूल | मराठी | लोकल एज्युकेशन | नाहीं |
| | | **तालुका कंदहार** | | | |
| ३७) | कंदहार. | शिवाजी मोफत विद्यालय. | मराठी | ,, | नाहीं |
| | | **तालुका भोकर** | | | |
| ३८) | उमरी. | नूतन विद्यालय | मराठी | आर्य एज्युकेशन सोसायटी हैद्राबाद. | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | **तालुका धरमाबाद** | | | | |
| ३९) | धरमाबाद. | पानसरे स्कूल | मराठी | पानसरे स्कूल कमेटी | नाहीं |
| | **तालुका देगळुर** | | | | |
| ४०) | देगळुर. | मानव विकास विद्यालय | मराठी | पानसरे स्कूल कमेटी | नाहीं |
| ४१) | देगळुर. | मंडेश्वर विद्यालय | मराठी | पानसरे स्कूल कमेटी | नाहीं |


# शालेय साहित्य मंदिर
## बुकसेलर्स, स्टेशनर्स व पब्लिशर्स
*** शाळा कॉलेजचीं पुस्तकें * बाल-वाङ्मय**
*** कथा–कादंबऱ्या**

तसेंच

● देशी-विदेशी खेळांचें साहित्य ● सर्व प्रकारची स्टेशनरी

–० योग्य दरानें मिळण्याचें ०–

*** मराठवाड्यांतील एकमेव ठिकाण ***

## शालेय साहित्य मंदिर
**औरंगपुरा, पैठणरोड, औरंगाबाद.**

# उस्मानाबाद जिल्हा

## तालुका उस्मानाबाद.

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १) | उस्मानाबाद. | गव्हर्मेंट मल्टीपरपज हायस्कूल (शेतकी) | मराठी, अुर्दू | सरकार | नाहीं |
| २) | उस्मानाबाद. (पेठ). | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३) | वडगांव. | " | " | " | " |
| ४) | थेर. | " | " | " | " |
| ५) | वाघोळी. | " | " | " | " |
| ६) | बेमळी | " | " | " | " |
| ७) | कोंडा. | " | " | " | " |

## तालुका लातुर.

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ८) | लातुर. | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी, अुर्दू | सरकार | नाहीं |
| ९) | पेठ. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०) | चिकोळी. | " | " | " | " |
| ११) | बाभुळगांव. | " | " | " | " |
| १२) | मुरुड. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | " | " | " |
| १३) | बोरी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | " | " | " |
| १४) | शिराळे. | " | " | " | " |

## तालुका उमरगा

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १५) | उमरगा. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १६) | कासर(जावळगा) | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १७) | अलुर. | " | " | " | " |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| १८) | माकणी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १९) | मुरुम. | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २०) | नारंगवाडी | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २१) | लोहारा. | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २२) | मुरुम. | " | " | " | " |
| २३) | नरगावाडी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २४) | लोहारा. | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २५) | मुरुम. | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका निलंगा

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| २६) | निलंगा. | गव्हर्मेंट मिडल् कम हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २७) | शिरूर. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २८) | तांदूर. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| २९) | मदनसुरी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३०) | साकोली | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३१) | काकार शिरसी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३२) | नितूर. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३३) | अरूड शहाजवी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी आणि कन्नड | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ३४) | अंमुलगा बुरजी | गव्हर्नंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३५) | तांबोळा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका तुळजापूर.

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ३६) | तुळजापूर. | गव्हर्मेंट हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३७) | नलदुर्ग | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३८) | नलदुर्ग. | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ३९) | काठी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४०) | अंदूर. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४१) | मंगरुळ. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका औसा

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ४२) | औसा. | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४३) | लोडगा. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४४) | अरवी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४५) | अुजवी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४६) | लामजाना. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४७) | जिवाला निझामुद्दीन. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४८) | किलारी. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ४९) | मतोला. | गव्हर्मेंट प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका कळम** | | | |
| ५०) | कळम. | गव्हर्मेंट मिडल् कम्. हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५१) | शिरढोण. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका अहमदपूर** | | | |
| ५२) | अहमदपूर. | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५३) | चाकूर. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५४) | नीलगांव. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५५) | अष्टा. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५६) | हदोलटी. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५७) | वडवाळ नाग-नाथ | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५८) | जानवल. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ५९) | अंधेरी. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६०) | शिऊर ताज़-बंद | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| | | **तालुका उद्गीर** | | | |
| ६१) | अुद्गीर. | गव्हर्मेंट हाय-स्कूल | मराठी आणि अुर्दू | सरकार | नाहीं |
| ६२) | जीवलगा. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६३) | दिवाणी | गव्हर्मेंट सेंट्रल प्रायमरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ६४) | हीर. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६५) | वालवानडी. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६६) | शीलगांव. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६७) | वधाना. | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६८) | नलगीर. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ६९) | गुडसूर. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७०) | बरोल. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७१) | जलकोट. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका भूम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७२) | भूम. | गव्हर्मेंट मिडल् कम् हायस्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७३) | वाशी. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| ७४) | अीट. | गव्हर्मेंट प्राय-मरी स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका परांडा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७५) | परांडा. | गव्हर्मेंट मिडल् कम्. हायकूस्ल | मराठी | सरकार | नाहीं |

## तालुका उस्मानाबाद

## मुलांचया शाळा–खाजगी शिक्षणसंस्था

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७६) | अुस्मानाबाद | भारत विद्या-लय | मराठी | अेज्यु-केशन कमेटी बार्शी | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ७७) | अुपाला. | अेच्. जी. हाय-स्कूल | मराठी | लोकल अेज्युकशन कमेटी | नाहीं |

## तालुका लातूर

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ७८) | लातूर. | श्री मारवाडी राजस्थान विद्यालय | मराठी | मारवाडी राजस्थान अेज्युकेशन सोसायटी लातूर | नाहीं |
| ७९) | लातूर. | गुजराती प्रायव्हेट अेम्. अेस्. | गुजराती | गुजराती स्कूल कमेटी. | नाहीं |
| ८०) | मुरुड. | जनता विद्या-मंदिर मल्टीपर्पज स्कूल | मराठी | रूरल रिकन्स्ट्रक्शन अँड सोशल सर्व्हिस को-ऑपरेटिव्ह सोसायटी | आहे |

## तालुका उमरगा

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ८१) | अुमरगा. | भारत विद्यालय | मराठी | भारत शिक्षण संस्था अुमरगा | आहे |
| ८२) | गुंजोटी. | श्रीकृष्ण विद्यालय | मराठी | श्रीकृष्ण अेज्युकेशन सोसायटी गुंजोटी. | नाहीं |
| ८३) | सास्टूर. | शांतिश्वर विद्यालय | मराठी | श्री शांतिश्वर शिक्षण समिति. सास्टूर | आहे |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ८४) | जिवाळी. | एस्. बी. मिडल् स्कूल | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी | नाहीं |
| ८५) | यंगूर. | नवजीवन विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| ८६) | कासणी. | नूतन मिडल् स्कूल | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| ८७) | अंचलीर. | विद्याविकास विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| ८८) | अष्टा. | प्रायव्हेट मिडल् स्कूल | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

## तालुका निलंगा

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ८९) | निलंगा. | शिवाजी विद्यालय | मराठी | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक संस्था. | नाहीं |
| ९०) | कोकलगांव. | अशोक विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| ९१) | मुडगळी. | रामलिंग विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

## तालुका तुळजापूर

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ९२) | अपशिंगा. | नरेंद्र आर्य विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| ९३) | नांदगांव. | अेडेड् मिडल् स्कूल | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

## तालुका औसा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९४) | मतोल. | माधवराव भोसले हायस्कूल | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

## तालुका कळम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९५) | मोहा. | दयानंद पराशर विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| ९६) | येरमाळा. | दयानंद विद्यालय | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

## तालुका अहमदपूर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९७) | सोनखेड मनखेड. | नूतन जनता विद्यामंदिर | मराठी | अेज्युकेशन कमेटी. जनता विद्यालय | नाहीं |
| ९८) | शिरूर ताजबंद | महेश विद्यालय | मराठी | महेश-विद्यालय अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |

जोशी ब्रदर्स पुस्तक-विक्रेते व प्रकाशक
औरंगपुरा औरंगाबाद द.
शाळा व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व ग्रंथालयांना लागणारीं
* पुस्तकें मिळण्याचें स्थान *

| अ. नं. | गांवाचें नांव | शाळेचें नांव | माध्यम | संचालक | वसतिगृह |
|---|---|---|---|---|---|
| | | **तालुका उदगीर** | | | |
| ९९) | अुदगीर. | शामलाल मेमोरियल हायस्कूल | मराठी | आर्यन् अेज्युकेशन सोसायटी, आर्य प्रतिनिधि सभा, मध्य अँड दक्षिण अिन्. हैद्राबाद. | नाहीं |
| | | **तालुका भूमा** | | | |
| १००) | कुंतलगिरी. | देशबंधु ब्रम्हचारी आश्रम | मराठी | लोकल अेज्युकेशन कमेटी. | नाहीं |
| | | *मुलींच्या शाळा.* | *(सरकारी)* | | |
| १०१) | अुस्मानाबाद. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी आणि अुर्दू | सरकार | नाहीं |
| १०२) | तुळजापूर. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०३) | लातूर. | गव्हर्मेंट मिडल् स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०४) | अुद्गीर. | गव्हर्मेंट मिडल्. स्कूल | मराठी | सरकार | नाहीं |
| १०५) | लातूर | गोदावरी देवी लाहोटी कन्या पाठशाळा | मराठी | लाहोटी अेज्युकेशन फंड कमेटी. | नाहीं |

वरील तक्त्यावरून मराठवाड्यांतील सरकारी मुला–मुलींच्या शाळा, व खाजगी शिक्षण–संस्थांच्या मुला–मुलींच्या शाळा किती आहेत, यांची पूर्ण कल्पना येऊं शकेल.

# म रा ठ वा ड्यां ती ल

# शे ती

# मराठवाड्यांतील शेती

औद्योगिक दृष्टया मराठवाडा अविकसित असला तरी मराठवाड्यांत शेतीचें प्रमाण फार मोठें आहे. मराठवाड्यांतील कांहीं प्रदेश चांगले सुपीक असून शेतीच्या धंद्याला आणखी भरपूर वाव आहे. मराठवाडा भागांतील शेतीविषयक अितर योजना व कार्य यांची जिल्हावार माहिती खाली दिली आहे.

## *औरंगाबाद*

हा जिल्हा मुख्यतः शेतीप्रधान आहे. एकूण लोकसंख्येचा बराच मोठा भाग म्हणजे शेंकडा ७५ टक्के शेतीवर अवलंबून आहे.

जिल्ह्यामध्यें दोन शेतकी संशोधन केंद्रें आहेत. पैकीं औरंगाबाद येथील केंद्रांत फळांचा विकास करण्यासंबंधींचें संशोधन चालतें. वडनापूर येथील केंद्रांत ज्वारी, गहूं, कपाशी यासंबंधीचें संशोधन चालतें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ४३ प्रात्यक्षिक केंद्रें उघडलीं व सुधारलेलें बियाणें १९५७–५८ अखेर ४४८७२० एकर जमिनींत पेरण्यांत आलें. शेती उत्पादन वाढीसाठीं पहिल्या योजनेच्या काळांत ६२४ टन अमोनियम सल्फेट, १०८१ टन सुपरफॉस्फेट, २७,१३१ टन ग्राम खत व १६,९३७ टन ग्रामीण कंपोस्ट खत सरकारनें शेतकऱ्यांना पुरवलें.

या जिल्ह्यांतील दुसरें महत्त्वाचें पीक तेलबियांचें आहे. साधारणतः १,८५,४५० एकर जमीन तेलबियांच्या पिकाच्या लागवडीखाली आहे.

## *बीड*

शेती हा बीड जिल्ह्यांतील प्रमुख धंदा होय. येथें ज्वारी, बाजरी, गहूं, कापूस, भुअीमूग, अितर अन्नधान्यें व कडधान्यें प्रामुख्यानें पिकतात. सुधारलेल्या शेतीच्या उत्पादनासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत गव्हाचें २१२१ मण व ४७१४ वाढ मण सुधारलेलें बियाणें सरकारनें पुरविलें. सुधारलेल्या बियाणांची वाढ करण्यासाठीं या जिल्ह्यामध्यें बीड, गेवराअी, खांडवी, अष्टी, पारोवा, मोमिनाबाद, केज या ठिकाणीं बियाण्यांचे फार्मस सुरू करण्यांत आले.

शेतीचें भरघोस पीक यावें म्हणून पहिल्या योजनेच्या काळांत १७,७५२ पौंड सल्फेट व ६१२६ पौंड गॅमेक्झिन शेतकऱ्यांना सरकारतर्फे वाटण्यांत आलें.

कापूस हें या जिल्ह्यांतील महत्त्वाचें पीक आहे. येथील कपाशीच्या क्षेत्रांत १९५५–५६.साल अखेर २२·२० लाख एकरांपर्यंत वाढ झाली. कपाशीचें सुधारलेलें बी पुरविण्यांत आलें.

बागायत विकासाच्या दृष्टीनें १९५६–५७ सालीं ११,२३२ रोपें शेतकऱ्यांना वाटलीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालामध्यें १९५६–५७ सालांत २४३०

एकरांवर जमिनींना बांध घालण्यांत आले. शेतीच्या उपयोगासाठीं विहिरी खोदण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन देण्याची योजना सरकारनें चालू ठेवली आहे. १९५६–५७ सालीं ३४ नवीन विहिरी खोदण्यासाठीं आणि ३८ जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठी तगाई मदत देण्यांत आली.

## उस्मानाबाद

ज्वारी, कापूस, हरभरा, भुईमूग, डाळ हीं या जिल्ह्याचीं मुख्य पिकें होत. मराठवाड्यांतील सर्व सामान्य शेतकरी शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. त्याला सुधारलेल्या शेतीची माहिती नव्हती. तसेंच खतें व रासायनिक खतें यांचा सढळ वापर करतां येत नव्हता. पण आतां सरकारमार्फत खत वाटलें गेल्यानें व शेती खात्याच्या प्रचारांमुळें शेतकरी आतां सढळ हातानें जमिनींत खत टाकूं लागला आहे.

प्रात्यक्षिकें आणि प्रचारांतून पिकांवरील रोगप्रतिबंधक व विशेषतः टोळप्रतिबंधक उपायांची माहिती देण्यांत येतें. १९५६–५७ सालीं ३·३५ लक्ष एकर जमीन पीकसंरक्षक कार्यक्रमाखालीं आणण्यांत आली.

फळझाडें व भाजीपाला यांच्या लागवडीस उत्तेजन देण्यासाठीं १९५७–५८ सालीं शेतकऱ्यांना ६०० झाडें पुरविलीं व शेतीविषयक शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठीं परभणीला शेती कॉलेज उघडण्यांत आलें. ३८९० एकर जमीन भूसंरक्षण कार्यक्रमाखालीं आणून या उपक्रमाचा अवलंब करण्यांस १९५६–५७ सालींच उस्मानाबाद जिल्ह्यांत सुरुवात करण्यांत आली. हातीं घेण्यांत आलेल्या ३० हजार एकर जमिनीस बांध घालण्याचा कार्यक्रम पार पाडण्यांत येणार आहे.

छोट्या पाणीपुरवठ्याच्या योजनेंत १९५६–५७ मध्यें १२४ नव्या विहिरीसाठीं व १५५ जुन्या विहिरी दुरुस्त करण्यासाठीं तगाईच्या रूपानें साहाय्य देण्यांत आलें.

१९५६–५७ सालीं या जिल्ह्यांत २०० एकर जमिनींत झीजनिवारण व वनविकासाचीं कामें घेऊन पुरीं करण्यांत आलीं.

## नांदेड

नांदेड जिल्ह्यांतील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. एकूण जमिनीपैकीं १,७८,९७० एकर जमिनींत जंगल असून २२,९८,६०० एकर जमीन पीकाखालीं आहे. या जमिनींतून रब्बी व खरीप अशीं दोन्हीं पिकें काढलीं जातात. गहूं, मका, वार्ली यांचीदेखील कांहीं ठिकाणीं पिकें काढलीं जातात.

शेतीच्या उत्पादनांत सुधारणा होण्यासाठीं सुधारलेलें बी–बियाणें, अवजारें, खतें शेतकऱ्यांना पुरविलें. १९५६–५७ मध्यें सुपरफॉस्फेट १०७ टन, मिश्रखत १६१·९ टन, अमोनियम् सल्फेट ४२०·१ टन वांटण्यांत आलें. शिवाय ७,५०५ टन ग्रामीण कंपोस्ट खत शेतकऱ्यांना पुरविलें. शिवाय १०८९३ पौण्ड सल्फेट शेतकऱ्यांना वांटण्यांत आलें. सुमारें ३,९७,००० एकर जमिनींत या सल्फेटचा वापर केला गेला. १९५५–५६ च्या अखेरीस नांदेड जिल्ह्यांत ४ ५५ लाख एकर जमिनींत कपाशीची लागवड केली गेली.

जमीन संरक्षण योजना १९५६–५७ मध्यें या जिल्ह्याला लागू करण्यांत आली. त्यावेळीं सुमारें २६० एकर क्षेत्रफळांत बांध घालण्याचें काम पूर्ण करण्यांत आलें.

पाणीपुरवठा योजनेनुसार १९५६–५७ मध्यें ८९ नव्या विहिरी खोदण्यासाठीं व ६४ जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठीं तगाई कर्जें दिलीं. शेतकऱ्यांना विहिरींसाठीं पंप व ऑईल अिंजिनें बसविण्यास आर्थिक सहाय्य सरकार देत आहे.

कपाशीच्या विकासाच्या दृष्टीनें दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीला मराठवाड्यांतील १९ लाख एकर जमीन लागवडीखालीं होती. त्या जमिनींतून अंदाज २·६३ लाख कापसांच्या गांठींचें उत्पादन होत असे. 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेबरोबरच मराठवाड्याच्या पांचहि जिल्ह्यांतून कापूस लागवडीच्या वाढीला चालना देण्यांत आली. याचा परिणाम म्हणजे १९५५–५६ च्या अखेरीला २२·२० लक्ष एकर जमीन कपाशीच्या उत्पादनाखालीं आली.

मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांतील पीकवार जमिनीचा आलेख पुढें दिला आहे.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध व जुने
"**लांकडी खेळणीं**"चे कारखानदार

# पी. जी. हेरेकर

**लांकडी खेळणींचे कारखानदार,**
५०१, बुधवार, पुणें २.

## मराठवाड्यांतील पीकवार जमीन

( आंकडे एकरांमध्यें )

| अ. नं. | पिकाचा प्रकार | औरंगाबाद | परभणी | नांदेड | बीड | उस्मानाबाद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्वारी | ८६३६५५ | ८०८०५१ | ७४१२५९ | ७३८७४६ | ९७०६४२ |
| २ | गहूं | २०४८५७ | ११५४९९ | ७४४७२ | १०७१४६ | १४३३०५ |
| ३ | बाजरी | ४२२०८७ | ६०४६ | २८३५ | २५८०४६ | ५५०२१ |
| ४ | डाळी | ६४२४५४ | ४६५१५१ | ३४८०७२ | ३४९८३६ | ५५६४७७ |
| ५ | गळिताचीं धान्यें | ४३४२६० | २३९६७१ | १४७६२५ | ३६०२३८ | ५३९३२९ |
| ६ | कापूस | ५२८६३३ | ५३०३३४ | ५१९९६४ | १८१२८३ | १७३२८१ |
| ७ | ऊंस | १२९७१ | ५४४३ | ४१४७ | ३५०४ | ९५१७ |
| ८ | फळफळावळ व भाजी | १११०७ | ९४१० | ५३९४ | ५९३८ | ८८३४ |
| ९ | भात | १२२०१ | २५५५६ | ४६१८३ | १६७१८ | ६५१८७ |
| १० | अितर | ७८०६० | ४६३४२ | ६६१०६ | ६९३९६ | ८३७२३ |
| | एकूण | ३२१०२८५ | २२५४६०३ | १९५६०६७ | २०९०८५१ | २५९०३१६ |
| ११ | पाण्याखालीं भिजणारी जमीन | १२०१८३ | ४३०६१ | १६८२९ | ५०६९९ | ९९७३१ |
| १२ | सदर जमिनीचें एकूण पीकांखालील जमिनीशीं दरशेंकडा एकरीं प्रमाण | ३·८ | १·९ | ०·८ | २·२ | ३·८ |

## मराठवाड्यांतील शेती संशोधन केंद्रें

१) शेतीविषयक प्रायोगिक केंद्र, परभणी :— पीक उत्पादन, कीटक, रोग, आदिबाबत. हवामानाची पहाणी केली जाते.

२) सरकारी प्रायोगिक फार्म, परभणी :— खरीप व रब्बीच्या पिकांसाठीं

ज्वारीच्या निरनिराळ्या जाती शोधून काढण्यात आल्या व इतर शेतीच्या पिकाबावतचें संशोधन चालू आहे.

३) पीक संशोधन केंद्र, बदनापूर :– निरनिराळ्या गव्हाच्या लागवडीच्या पट्टीसाठीं मुऊम आणि बुलगार प्रकारच्या गव्हाच्या जास्त उत्पादन मिळणाऱ्या, तांबेरा प्रतिबंधक, अवर्षण प्रतिकारक, जाती शोधून काढणें, बीड, औरंगाबाद जिल्ह्यांतील मैदानाना योग्य असलेल्या कपाशीच्या जास्त जिनिंगच्या जातींचें संशोधन करणें.

४) फळें संशोधन केंद्र, औरंगाबाद :– लिंबाच्या फळाबावत संशोधन, उच्च दर्जाची, जास्त उत्पादनाची, रोगांचा प्रतिकार करणाऱ्या निरनिराळ्या द्राक्षांची पैदास.

५) रोप पैदास केंद्र, लातूर :– गांवरानी जातीच्या कपाशीच्या लागवडीसाठीं राखून ठेवण्यात आलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्यें लागवड करण्यासाठीं जास्त उत्पादन होणाऱ्या, जास्त जिनिंग असलेल्या, अकाली पिकणाऱ्या, गांवरानी कपाशीच्या जाती शोधून त्यांची पैदास करण्याचें काम या केंद्रांत केलें जातें. याशिवाय कपाशीच्या पीकांवर शेती विषयक प्रयोग करण्यांत येतात.

## पाणी पुरवठ्याचीं साधनें

| जिल्हा | सरकारी कालवे | खाजगी कालवे | तलाव | ट्यूब विहिरी | अतर विहिरी | एकूण जमिनीपैकीं पाण्याखालीं आलेली जमीन एकर |
|---|---|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | ६०७ | – | – | ३० | ७९५३३ | २८७७७ |
| बीड | – | – | ४११८ | – | ५४९२५ | १८१५६ |
| उस्मानाबाद | – | ८५ | – | १०१ | ५१७७० | ९४१९ |
| परभणी | – | – | ६ | १६ | २४२३८ | ५८० |
| नांदेड | ८३ | ६८ | ८४९८ | १०२ | १०२७३ | २०६९ |

मराठवाड्याचे शेती विकासाचे प्रश्न हे महाराष्ट्राप्रमाणेंच सर्वसाधारणतः आहेत. त्यांत फक्त फरक येवढाच की, महाराष्ट्रांतील कांहीं भागामध्यें पाट-

स्थळाच्या योजनेमुळें भरभराट दिसते, तशी भरभराट येथें दिसत नाहीं. विहिरी आणि पाटबंधाऱ्याखालीं महाराष्ट्रांत हें क्षेत्र उपजाऊ जमिनीच्या ४–४।। टक्के आहे. मराठवाड्यांत हेंच प्रमाण २·७ टक्के आहे. १९५२ पूर्वी मराठवाड्यामध्यें १०० एकरसुद्धां जमीन पाटाच्या पाण्याखालीं भिजत नव्हती. आजहि फक्त वेंडसुरा धरणाखालीं साधारणतः १ हजार एकर जमीन भिजते. निजामी राजवटीमध्यें या विभागाकडे अत्यंत दुर्लक्ष झालें. अन्नधान्याच्या बाबतींत हा विभाग स्वयंपूर्ण असल्यामुळें तेवढी निकड त्या सरकारला भासली नाहीं. मराठवाड्याची सर्व जमीन साधारणतः सुपीक आहे. जुन्या हैद्राबाद राज्यामध्यें नांदेड व परभणी जिल्ह्यांना "हैद्राबाद राज्याचीं धान्यकोठारें" असें म्हटलें जात असे. आजहि नांदेड–परभणी जिल्ह्यांमध्यें कापूस, ज्वारी, मूग, गहूं, मोठ्या प्रमाणांत पिकत आहेत. गोदावरी, मांजरा, पूर्णा, पेणगंगा, या नद्यांकाठची जमीन अत्यंत सुपीक आहे. दुष्काळी विभाग जवळजवळ नाहींच. बीड जिल्ह्यांतील अष्टी आणि पाटोदें हे दोन तालुके सोडले तर सर्व ठिकाणीं २४ ते ३२ इंच पाऊस पडतो. जवळजवळ सर्व विभागांतून खरीप व रब्बीचीं दोन्हीं पिकें येत असल्यामुळें शेतीचा व्यवसाय वर्षभर चालू असतो. पोटासाठी शहरांकडे धांव घेणाऱ्यांची संख्या कमी. सुगीच्या दिवसांत, विदर्भातून, खानदेशांतून मजूर कामधंदा करण्यासाठीं येतात. तसेंच अहमदनगर–सोलापूर जिल्ह्यांतूनहि मजूर येत असतात. बागायतीकडे लोकांचें लक्ष कमी आहे. बीड जिल्ह्यांत हें प्रमाण सर्वांत जास्त ७ टक्के आणि सर्वांत कमी नांदेड जिल्ह्यांत १ टक्का आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें अंतर्भूत असलेल्या योजना पार पडल्यानंतरदेखील हीं क्षेत्रें ३·५ टक्क्यांवर जाणार नाहींत. १९५५ मध्यें भारतांत पाणभरू जमिनीचें क्षेत्र एकंदर लागवडीच्या क्षेत्राच्या १४·६ टक्के होतें. आतां तर तें बरेंच वाढलें आहे. वर्षातून २ पिकें काढतां आल्याखेरीज उत्पादन वाढणार नाहीं. निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतीमुळें उत्पादनाची शाश्वति मिळत नाहीं.

## पाटबंधारे आणि विद्युत् पंप

केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचें प्रमाण हें मराठवाड्यांत सर्वांत जास्त आहे. जवळजवळ ८० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. अन्य उद्योगधंदे, खाणी, कारखाने मराठवाड्यांत नसल्यानें ही संख्या इतर राज्याच्या मानानें व भारताच्या मानानें अधिक आहे. त्यामुळें मराठवाड्याचा विकास म्हणजें प्रामुख्यानें शेतीचा विकास हें समीकरण मान्य करावें लागतें. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें मराठवाड्याच्या विकासासाठीं ११।। कोटी रुपये मिळाले. पण प्रत्यक्ष शेतीसाठी फारच कमी रक्कम उपयोगांत आणली गेली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळें शेती विकासाला गति मिळाली पण ती अपुरी मिळाली. मराठवाड्याच्या

विकासासाठीं खासदार, आमदार व इतर समाजधुरीणांनीं एक योजनाबद्ध निवेदन नियोजन मंडळाला दिलें होतें. त्यांत त्यांनीं पाटबंधारें व धरणासाठीं ४२ कोटी रुपयांची योजना मांडली होती. त्या योजनेमुळें ७॥ लक्ष एकर जमिनीला पाणी मिळणें शक्य होतें. ही योजना प्रत्यक्षांत आली असती तरीदेखील पाण्याखालच्या लागवडीचें क्षेत्र ५·७ टक्के झालें असतें. त्यामुळें अखिल भारतीय पातळीवर येण्यास मराठवाड्याला ७ पंचवार्षिक योजना राबवाव्या लागतील.

नांदेड व मोठ्या नद्यांच्या कांठचा भाग सोडला तर मराठवाड्यांत पाणी वरच लागतें. पाण्याची ही पातळी दरवर्षी ३/४ इंचांनीं खालीं जात आहे असें तज्ञांचें मत आहे. त्यामुळें या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे. इंधन–तेल आदि दिवसेंदिवस महागत असल्यानें शेतीसाठीं इंजिन्स परवडणार नाहींत. अशा परिस्थितींत पूर्णा–पेणगंगा या विद्युत् योजनांना प्राधान्य दिलें पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनांमध्यें फक्त पूर्णा योजनेचाच समावेश आहे.

**समपातळी बांध :–** जमिनीची बांधबंदिस्ती शास्त्रीय पद्धतीनें केली नसल्यानें बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनींतील परिश्रमानें तयार केलेलें 'फुल' पावसाळ्यांत वाहून जातें. शेताच्या बांधावर वळणं टाकण्याच्या जुन्या प्रथेनें या दुष्परिणामांचा नीट बंदोबस्त होत नाहीं. याबाबत सरकारनें एक योजना आंखली आहे. सध्यां चालू असलेल्या गतीनें ही योजना सफल होण्यास १०० वर्षें लागतील ! या योजनेमुळें जमिनीची धूप तर थांबेलच पण ओल साठविण्याचें सामर्थ्य वाढेल. विहिरीच्या पाण्याचीहि पातळी या योजनेमुळें वाढूं शकेल. आज उस्मानाबाद जिल्हा या कामी आघाडीवर आहे. नंतर बीड, औरंगाबाद, असे क्रम लागतात. नांदेड, परभणीमध्यें विशेष काम झालें नाहीं.

मराठवाड्यांत जंगलाचें क्षेत्र अत्यंत कमी आहे. २·३ हें प्रमाण प्रयत्नपूर्वक वाढवावयास पाहिजे. सबंध भारतांत हें प्रमाण १५ टक्के आहे. पावसाळ्यांत वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी करण्यासाठीं, वाऱ्याची गति कमी करण्यासाठीं, उंचवट्यांच्या जागीं व डोंगरांच्या पायथ्यांशीं संरक्षक जंगलांचे पट्टे निर्माण केले पाहिजेत. त्याशिवाय जमिनीची धूप थांबणार नाहीं.

**बागायतीच्या क्षेत्रांत वाढ :–** मराठवाड्याच्या औरंगाबाद व बीड (कांहीं भाग) या भागांतील कांहीं जमीन बागायतीसाठीं उत्कृष्ट समजली जाते. आजहि औरंगाबादला असलेल्या संशोधन केंद्रामध्यें द्राक्षांच्या जेवढ्या जाति वाढविल्या जाऊं शकतात, तितक्या दुसऱ्या कोणत्याहि केंद्रांत वाढत नाहींत असें शेतीतज्ञांचें म्हणणें आहे. आंबे, द्राक्षें, अंजीर, यांची निपज या भागांत चांगली होऊं शकते. कापसाच्या जातींविषयींसुद्धां कोणत्या ठिकाणीं कोणत्या जातीच्या कापूस चांगला

येतो, याविषयीं सारखें धोरण नसल्यानें दिवसेंदिवस मराठवाड्यांत कापसाचें पीक कमी येत असून क्षेत्रहि घटत आहे.

शेतीस मदत करणारे जोडधंदे :— मराठवाड्याच्या कांहीं विभागांत भुई-मूग, तूर, हीं प्रामुख्यानें कडधान्यें पिकतात. करडी तूर चोहोंकडे चांगली येते. तूर व डाळ यांचे कारखाने शहर विभागांत निर्माण होत आहेत. जालना, लातूर या शहरीं हे कारखाने दिसून येतात. शहरांऐवजीं ग्रामीण विभागांतून सहकारी पायांवर अशा प्रकारचे उभारलेले कारखाने किफायतशीर ठरतील. कापूस मोठ्या प्रमाणावर निर्माण होत असूनहि सरकीच्या तेलाचा एकहि कारखाना या विभागांत नाहीं.

## गुरांची निपज

मराठवाड्यामध्यें कंधारी जातीचे बैल व गायी प्रसिद्ध आहेत. मराठवाड्यांतील विशेषतः देवनी जातीचे वळू हें साऱ्या भारतांत प्रसिद्ध आहेत. देवनी वळूंची जात ही गीर व कंधार यांच्या संकरांतून निर्माण झाली आहे. नांदेड जिल्ह्यांत प्रयत्न झाल्यास मराठवाड्यांसाठीं लागणाऱ्या आवश्यक बैलांची निपज येथें होऊं शकेल.

मराठवाड्यासाठीं जादा सवलती व विकासांवर भर दिल्यास मराठवाडा हा महाराष्ट्राचें धान्य कोठार होऊं शकेल.

# मार्केट कमेट्या

शेतकऱ्यांचा माल योग्य, किफायतशीर, नियंत्रित दरानें विकला जावा व व्यापाऱ्यांकडून शेतकरी फसविला जाऊ नये यासाठीं मार्केट कमेटीकडून धान्य खरेदीविक्रीची व्यवस्था केली जाते. मराठवाड्यामध्यें खालील ठिकाणीं मार्केट कमेट्या आहेत :—

बीड जिल्हा :— १ बीड, २ गेवराई, ३ माजलेगांव, ४ परळी, ५ मोमिनाबाद,

औरंगाबाद जिल्हा : — १ औरंगाबाद, २ जालना, ३ लासूर, ४ वैजापूर.

परभणी जिल्हा :— १ परभणी, २ हिंगोली, ३ सेलू ४ पूर्णा, ५ मानवत, ६ परतूड, ७ गंगाखेड, ८ वसमत.

नांदेड जिल्हा :— १ नांदेड, २ धर्माबाद, ३ उमटी, ४ देवलूर, ५ करखेली, ६ मुदखेड, ७ कुंडलवाडी ८ किनवट.

उस्मानाबाद जिल्हा :— १ उस्मानाबाद, २ लातूर, ३ उद्गीर, ४ कळम.

# मार्केट कमेट्यांच्या उत्पन्नाचे आंकडे

( आंकडे रुपयामध्यें- )

| मार्केट कमेटी | १९५६–५७ | १९५७–५८ |
|---|---|---|
| १ परभणी | २४९८० रु. | ३८७६७ रु. |
| २ हिंगोली | – | ४५०१० |
| ३ सेलू | ४६२४० | ४३५२३ |
| ४ पूर्णा | ८९१४ | ९९५५ |
| ५ मानवत | १८७१४ | २००२६ |
| ६ परतूड | – | ११८१७ |
| ७ गंगाखेड | ९००० | ९७८३ |
| ८ वसमत | ७३३८ | २०१५२ |
| ९ नांदेड | ६७१२४ | १३९१४६ |
| १० धर्माबाद | २०२६९ | ३१३२४ |
| ११ उमरी | १४०६५ | १५४१५ |
| १२ देगलूर | – | २२०५७ |
| १३ करखेली | २८८२ | १६९८ |
| १४ कुंदलवाडी | ५८८४ | ४५४८ |
| १५ किनवट | ३२३६ | ४४३९ |
| १६ अुस्मानाबाद | नवीन मार्केट | |
| १७ लातूर | – | ९९६३६ |
| १८ अुद्‌गीर | २७५११ | २३६५४ |
| १९ कळम | ८००१ | ७७०५ |
| २० औरंगाबाद | ४६५२५ | ६४६७५ |
| २१ जालना | ११८४४६ | १७९७७८ |
| २२ लासूर | ९९०० | १४०९३ |
| २३ वैजापूर | १२८९६ | १७६६२ |
| २४ बीड | – | २१८३५ |
| २५ परळी | ३६३७३ | ३८८२५ |
| २६ मोमीनाबाद | ७७१० | ८२३७ |
| २७ माजलगांव | ५९१९ | ६८८६ |
| २८ गेवराअी | नवीन मार्केट ( सप्टेंबर १९५९ पासून सुरू झालें ) | |

मार्केट कमेटीच्या अुत्पन्नांमध्यें मार्केट फी, लायसेन्स फी, व इतर उत्पन्न यांचा समावेश होतो. वरील आंकडेवारीवरून मराठवाड्यांतील मार्केट कमेट्यांच्या आर्थिक व्यवहाराची कल्पना येऊं शकेल.

# मराठवाड्यांतील सहकारी चळवळ

# मराठवाड्यांतील सहकारी चळवळ

मराठवाड्यांमध्यें सहकारी चळवळ जवळ जवळ ४० वर्षापूर्वीपासून चालू आहे. ही चळवळ अितकी जुनी असूनहि मराठवाड्यांत जसें मूळ धरावयास हवें होतें तसें मूळ या चळवळीनें अद्याप धरलेलें नाहीं. १९५० पासून ( निजामी राजवटीनंतर ) मात्र या चळवळींत जिवंतपणा येऊं लागला. आणि मराठवाडा मुंबई राज्यांत सामील झाल्यापासून तर या सहकारी चळवळीस चांगला वेग आला आहे. निजामी राजवटींत सहकारी चळवळींमध्यें फक्त 'सहकार' हा शब्द होता. खऱ्याखुऱ्या अर्थानें ही सहकारी चळवळ नव्हती. या चळवळींचें सर्व नियंत्रण निजामी राजवट करीत असें.

निजामी सरकारनें प्रथम १९१३ मध्यें सहकारी खातें सुरू केलें व तें शेती खात्याकडे सुपूर्त केलें. १९१४ मध्यें को-ऑपरेटिव्ह ॲक्ट नं. २ हा संबंध राज्याला लागू केला व १९१५ मध्यें हें सहकारी खातें संपूर्ण वेगळें केलें. १९१७ पासून जवळ जवळ प्रत्येक जिल्ह्यांत सहकारी बँका स्थापन झाल्या होत्या व त्या बँकेमार्फत खेड्यांतील शेतकी पतपेढ्यांना, त्यांच्या सभासदांना कर्जें दिलीं जात असत. सहकारी चळवळ हीं कर्जें देणें व वसूल करणें या मर्यादेपर्यंतच चालली होती.

या चळवळीचा अुगम सरकारी नेतृत्वाखालीं होऊन तिचें कार्य संपूर्णतया सरकारी नियंत्रणाखालीं व मार्गदर्शनाखालीं चालत असे. शेतकी पतपेढ्यांतून स्वतंत्र सेक्रेटरी नेमलेला नसे. संस्थेचे हिशेब लिहिण्याचें काम तालुकानिहाय सहकारी खात्याचे सुपरवायझरच करीत असे. प्रत्येक सुपरवायझरकडे ३०-४० सोसायटचा दिलेल्या असत. शेतकी पतपेढ्यांचीं कर्जपत्रकें तयार करणें, कर्जाची छाननी करणें, शिफारस करणें, प्रत्येक पेढीची व व्यक्तीची कर्जमर्यादा ठरविणें, वसुली करणें, हीं कामें सर्वस्वी जिल्ह्याचे असिस्टंट रजिस्ट्रार, त्यांचे अिन्स्पेक्टर्स, सुपरवायझर्स यांच्याकडेच असत. बँकांचा त्यांत संबंध येत नसे. मिळणारें कर्ज हें सभासदांच्या शेतीव्यवसायाच्या गरजेवर न आधारतां तें फक्त त्यांच्या शेतसाऱ्याच्या कांहीं अल्पशः प्रमाणांत दिलें जात असें. त्यामुळें जें कांहीं थोडेंबहुत कर्ज मिळें तें फक्त जमीनदार सभासदासच मिळें. त्यांच्या मिळकतीच्या गहाण तारणांवर कर्ज मिळण्याची सोय होती. जमीन मालकांशिवाय इतर शेतकऱ्यांना ग्रामीण पतपेढ्यांचे सभासद होण्यास मुभा नव्हती. या कर्जाचा शेती अुत्पादनवाढीकडेच व शेती गरजेच्या दृष्टीनें फारसा उपयोग होत नसे. एवढेंच नव्हे तर कर्ज देण्याची पद्धत ही शेतीच्या हंगामावर आधारलेली नसे. वर्षातील बाराहि महिने कर्ज मिळत असें व कर्जाच्या परतफेडीची तारीख ही पिकांच्या हंगामांवर

न ठेवतां कर्ज दिलेल्या तारखेपासून १२ महिन्यांनीं कर्जफेडीची तारीख ठरवलेली असें. त्यामुळें बिगर हंगामांत कर्जाची वसुली न होता शेतीउत्पादनाखेरीज अन्य मार्गानें ही कर्ज वसुली होत असे. सोसायटींची सरकारी ऑडिट तपासणी दरवर्षी नियमितपणें होत नसे. वसुलीची वा कर्ज देण्याची कोणतीहि जबाबदारी पतपेढीवर नसल्यानें व सर्व जबाबदारी सरकारी खात्यानें घेतल्यामुळें पतपेढ्यांचे चालक व सभासद पतपेढ्यांच्या कामांत फारशा आस्थेनें लक्ष घालीत नसत. त्यामुळें सहकारी चळवळ योग्य तऱ्हेनें व लोकशाही पद्धतीनें चालविण्यांकरतां लागणारे अनुभवी कार्यकर्ते खेड्यांपाड्यांतून निर्माण न झाल्यामुळें चळवळीचें नेतृत्व व मार्गदर्शन सहकारी खात्याचे अधिकारी व शहरांतील कार्यकर्ते यापुरतेंच मर्यादित राहिलें. त्यामुळें गेल्या ४० वर्षांत सहकारी चळवळींची जशी वाढ व्हावयास हवी होती, जें व्यापक व संघटीत स्वरूप या चळवळीस यावयास हवें होतें, तें येऊं शकलें नाहीं. असो.

प्रत्येक तालुक्याला १९४५ मध्यें तालुका डेव्हलपमेंट युनियन्स स्थापन केल्या व त्या युनियनकडे धान्य खरेदी, धान्य वांटप व लेव्ही वसुली आदि कामें सोपविलीं. या सर्व तालुका युनियन्स हैद्राबाद को-ऑपरेटिव्ह कमर्शियल कॉर्पोरेशन या संस्थेस जोडण्यांत आल्या.

## " टाका " आणि " हाका "

तालुका डेव्हलपमेंट युनियन्सचें १९४९ मध्यें तालुका ॲग्रिकल्चरल असोसिएशन ( TACA – टाका ) मध्यें रूपांतर केलें व त्याचवेळीं हैद्राबाद ॲग्रिकल्चरल को-ऑपरेटिव्ह असोसिअेशन ( हाका ) संघटीत करण्यांत आली. अधिक धान्य पिकविण्याची मोहीम या दोन संस्थांमार्फतच चालविली आहे. ग्रामीण विभागामध्यें लोखंड, पोलाद, सिमेंट आदि वस्तु पुरविण्याचें काम हाका ही संस्था करीत असें. टाका या संस्थेनें जें थोडेंफार काम केलें त्याची थोडी फार रूपरेषा खालील तक्त्यांवरून येईल.

॥ ॐ ॥

● नासिकवाला ●

मा ध व जी का ब ढि या चि व डा

रविवार पेठ, आग्रारोड, नासिक.

सिर्फ टेस्ट मॅच के लिये

— ब्रेबॉर्न स्टेडियम, बंबई. —

## औरंगाबाद जिल्हा

### "टाका" चा जिल्हावार व वर्षवार माहितीचा तक्ता

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल रुपये लाखामध्यें | रिझर्व फंड इतर फंड ( लाख ) | ओन्ड कॅपिटल ( लाख ) | डिपॉझिट ( लाख ) | वर्कींग कॅपिटल ( लाख ) | खरेदी ( लाख ) | विक्री ( लाख ) | निव्वळ नफा रुपये | निव्वळ तोटा रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १२ | ३४४९१६ | २०० | ३१३ | ५१३ | १९३ | – | – | – | ११२७० | |
| १९५३ | ११ | ६९६२ | १७८ | ३६१ | ५३९ | – | ९९० | ६४४ | ६८५ | ३४२ | |
| १९५४ | ११ | ७२१५ | – | २६३ | – | ८६ | ७४७ | २४८ | २८६ | ६४५ | |
| १९५५ | ११ | ७२२६ | १७६ | २९८ | ४७४ | – | ७६० | ५४ | ६६ | – | |

## नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल रुपये लाखामध्यें | रिझर्व फंड इतर फंड ( लाख ) | ओन्ड कॅपिटल ( लाख ) | डिपॉझिट ( लाख ) | वर्कींग कॅपिटल ( लाख ) | खरेदी ( लाख ) | विक्री ( लाख ) | निव्वळ नफा रुपये | निव्वळ तोटा रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ६ | २६०७ | १६४ | २७३ | ४३७ | २३६ | – | – | – | – | – |
| १९५३ | ६ | २४२६ | ११७ | २१५ | ३३२ | – | ६८० | १०१ | ११५ | – | – |
| १९५४ | ६ | १७३० | – | १७२ | – | १५० | ६९० | ३२ | १८ | – | २५११२ |
| १९५५ | ६ | १४८५ | ११० | १७१ | २८१ | – | ६९० | २० | ११ | – | ७४९ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **परभणी जिल्हा** | | | | | | | | | | | |
| १९५० | ८ | ३९६१ | २२१ | ३४५ | ५६६ | ९१ | – | – | – | – | – |
| १९५३ | ८ | ३९७१ | १९० | ४१८ | ५०८ | – | ७०२ | ४५९ | ४६७ | – | ८५१३ |
| १९५४ | ८ | ३९७१ | – | २१८ | – | ५२ | ६६७ | १४५ | १३५ | – | ८९१८ |
| १९५५ | ८ | ३८१९ | १९१ | ३१० | ५०१ | – | ६६१ | १२३ | १४३ | – | ४३१६ |
| **बीड जिल्हा** | | | | | | | | | | | |
| १९५० | ६ | २०८६ | १३९ | १७० | ३०९ | २५० | – | – | – | – | – |
| १९५३ | ६ | २८०३ | १०८ | २०० | ३०८ | – | ५०१ | ५९४ | ६२७ | – | – |
| १९५४ | ६ | २६६८ | – | २३१ | – | ४७ | ६०८ | – | – | – | – |
| १९५५ | ६ | २६१९ | ११३ | २४० | ३५३ | – | ५८४ | ७० | ३८९ | – | ४७६५ |
| **उस्मानाबाद जिल्हा** | | | | | | | | | | | |
| १९५० | ५ | २४५८ | १०० | १३१ | २३१ | २७५ | – | – | – | – | – |
| १९५३ | ५ | २३५८ | ९२ | १५६ | २४८ | – | ५०३ | ५५१ | ५९५ | – | १५१० |
| १९५४ | ५ | २३६४ | – | १३३ | – | २७ | ४२१ | १४१ | १४३ | – | ८८५७ |
| १९५५ | ५ | २३३८ | ९३ | ११५ | २०८ | – | ४०६ | ८९ | ९२ | २४५३ | – |

वरील तक्त्यावरून " टाका " ची मराठवाड्यांमध्यें कोणती अवस्था होती हें लक्षांत येतें.

टाका या संस्था तालुकानिहाय स्थापन झाल्या होत्या. शेती सहकार पतपेढ्यांच्या सभासदांच्या मालाची सहकारी पद्धतीवर विक्री करणें, शेती सुधारणेस आवश्यक अशीं साधनें पुरविणें या उद्देशानें टाका स्थापन झाली असली तरी तिनें हैद्राबादेच्या हाकामार्फत अन्नधान्य, कापड व इतर जीवनोपयोगी वस्तूंच्या वांटपाचें काम हातीं घेतलें. टाका आणि हाका या दोन संस्थांमधील बऱ्याच देण्याघेण्याचे आर्थिक व्यवहार अनिर्णित राहिले आहेत. मध्यंतरींच्या काळांत टाकाचा व्यवहार स्थगित झाल्यामुळें त्या संस्थेच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचा अनिष्ट परिणाम तालुका असोसिएशनच्या व्यवहारांवर व आर्थिक परिस्थितीवर झाला. टाकाचीं बरींच येणीं हाकाकडे गुंतून पडल्यामुळें जवळजवळ बऱ्याच ठिकाणीं टाकाचे व्यवहार स्थगित झाले आहेत. शेती मालाच्या खरेदी विक्रीसाठीं टाका असमर्थ झाल्या आहेत. त्यामुळें या संस्थांची पुनर्रचना करून त्याचें सहकारी खरेदी-विक्री संघांत रूपांतर करणें इष्ट होईल किंवा टाका विसर्जीत नवीनच जिल्हानिहाय व तालुकानिहाय खरेदी–विक्री संघाची स्थापना करणें अधिक परिणाम कारक होईल हा प्रश्न सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांपुढें आज उभा आहे. अर्थात हा महत्वाचा प्रश्न ज्या त्या संस्थांची प्रचलित आर्थिक परिस्थिति, कार्यक्षमता व लोकमत यांचा विचार करूनच सोडवावा लागेल. हल्लींचे पोटनियम बदलून इतर जिल्ह्यांतील खरेदी–विक्री संघाचे पोटनियम लागू करून घेऊन त्यांच्या कार्यकारी मंडळांवर सहकारी संस्थांचे प्रतिनिधि, मध्यवर्ति बँकेचे प्रतिनिधि, सहकारी खात्याचे प्रतिनिधि घेऊन त्यांच्या सल्ल्यानें कारभार चालेल अशी व्यवस्था करावयाची आहे. कांहीं कांहीं टाकांचें खरेदी-विक्री संघामध्यें रूपांतर यशस्वीपणें केलें गेलें आहे.

## ग्रेन बँका

मराठवाड्यांतील सहकारी चळवळीचें ग्रेन बँका हें एक वैशिष्टय आहे. बऱ्याच खेड्यांत जेथें प्राथमिक पतपेढ्या आहेत, तेथें ग्रेन बँका आहेत, बऱ्याच ग्रेन बँका सक्तीच्या लेव्ही वसुलीच्या काळांत जन्माला आल्या, पण ग्रेन बँकांच्या स्थापनेमध्यें जनतेचा उत्साह दिसून आला नाहीं. त्यावेळीं मालक शेतकऱ्यांसाठींच सभासदत्व खुलें होतें. वसूल झालेल्या एकूण लेव्हीपैकीं $\frac{1}{2}$ धान्य सरकार या बँकेला देत असे. ग्रेन बँकेचे सभासद धान्याच्या स्वरूपांत शेअर खरेदी करीत. ग्रेन बँकेच्या कोणत्याहि सभासदाला त्यानें भरलेल्या भागाइतकें धान्य कर्ज म्हणून मिळतें. दोन वर्षांतून एकदां निवडणूक होऊन निवडलें गेलेलें कार्यकारी मंडळ ग्रेन बँकेच्या व्यवहारांस जबाबदार असतें. ग्रेन बँका या पूर्णतया स्थानिक स्वरूपाच्या संस्था आहेत. कुठल्याहि बाह्य व्यक्ती वा संस्था यांजकडून धान्य कर्ज वा रोख कर्ज घेतलें जात नाहीं. खेड्यांतील कोणतेहि १० शेतकरी एकत्र येऊन ग्रेन बँक स्थापन करूं शकतात

मराठवाड्यांडील ग्रेन बँकांच्या कामकाजाची पहाणी प्रा. रणभिसे यांनीं केली आहे. १०० ग्रेन बँका व उत्कृष्ट ठरलेल्या २० ग्रेन बँकाची १९५२ ते ५५ या काळांतील पाहणी त्यांनीं केली. ते म्हणतात, "१९४८ नंतर फारच थोड्या ग्रेन बँका स्थापन झाल्या. कुळें, कामगार, नोकरवर्ग हे मोठ्या प्रमाणांत सभासद नव्हते. पाहणीच्या काळांत सभासद संस्थेमध्यें फारच थोडी वाढ झाली. भाग भांडवला-मध्येंहि वाढ झाली नाहीं. धान्याच्या ठेवी सभासदांकडून अगर बिगर सभासदां-कडून घेण्याचे प्रयत्नच झाले नाहींत. कितीतरी बँका थकबाकीमुळें मोडकळीला आल्या होत्या. कर्जव्यवहारांत नियमितपणा नव्हता. कर्ज देण्याच्या व्यवहारांमध्यें कमालीची वशिलेबाजी आणि भेदभाव आढळून आला."

" अनियमित पावसाच्या प्रदेशांत बहुधा धान्याची चणचण असते. त्यांतून संपूर्ण दुष्काळ पडला किंवा अवर्षण झालें तर पिकांची स्थिति एकदम वाईट होते. धान्याच्या किंमती कमालीच्या वाढतात. या वेळीं ग्रेन बँका हाच एकमेव तोडगा होय. " पण या तोडग्याच्या उपायाचा मराठवाड्यानें योग्य उपयोग करून घेतला नाहीं असें म्हणावें लागतें. मराठवाड्यांतील ग्रेन बँकांची वाढ जलद होती पण पद्धतशीर नव्हती. कित्येक ग्रेन बँका कागदावर रजिस्टर झाल्या खऱ्या, पण प्रत्यक्षांत धान्य जमा केलें गेलें नव्हतें. धान्यसांठ्या साठीं गोदामांची सोय नव्हती. धान्य वसुलीचें काम पोलिसपाटील, पटवारी यांना देण्यांत आलें होतें. यांपैकीं बऱ्याच जणांनीं ग्रेन बँका घशांत घालून सरकार दरबारीं त्या रजिस्टर करून ठेवल्या होत्या.

पुढील तक्त्यांवरून ग्रेन बँकांची जिल्हावार व वर्षवार परिस्थिति कशी होती हें दिसून येईल.

## ग्रेन बँकेची जिल्हावार व वर्षवार परिस्थिति दर्शविणारा तक्ता

### औरंगाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद संख्या | शेअर कॅपिटल (आंकडे लाख रुपयांचे) | रिझर्व फंड इतर फंड (आंकडे लाख रुपयांचे) | दिलेलें कर्ज (आंकडे लाख रुपयांचें) | कर्ज वसुली (आंकडे लाख रुपयांचे) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ८५८ | २६,८१३ | १६९ | १२० | २९१ | – |
| १९५३ | ४२३ | २२,३६९ | १७३ | २४८ | १४० | ९४ |
| १९५४ | ४२६ | २२,७६३ | १८४ | ३०४ | १२० | १०० |
| १९५५ | ४३० | २३,१७३ | १९२ | ३७१ | १४५ | १०० |

## नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद संख्या | शअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड (लाख) | दिलेलें कर्ज (लाख) | कर्ज वसुली (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १०५० | ५२,१७० | ४८७ | ४२१ | ४७ | – |
| १९५३ | ५०७ | ३६,५८८ | ३५१ | ४२९ | ११८ | २७ |
| १९५४ | ५६१ | ४४,३३६ | ३६१ | ५८७ | ८७ | ५० |
| १९५५ | ५६२ | ४६,७२२ | ३६५ | ५६८ | ७७ | १२८ |

## परभणी जिल्हा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १२१४ | ३७,९६८ | ३५३ | २१४ | ४५ | – |
| १९५३ | ३६२ | १८,१७३ | २१७ | २५३ | ११४ | ९७ |
| १९५४ | ३६२ | १७,९२८ | २१६ | ३०० | ११९ | ६५ |
| १९५५ | ३६२ | १८,८४४ | २२० | ३५२ | ७७ | ७१ |

## बीड जिल्हा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ८२४ | ३५,६६९ | ३५४ | ६०२ | ११० | – |
| १९५३ | ५८० | ३०,२७३ | ३९३ | २५६ | ६५ | २७ |
| १९५४ | ५८० | ३२,६९२ | ३४६ | ४१७ | ६९ | ५० |
| १९५५ | ५८१ | ३२,७२४ | २५१ | ५२५ | ६३ | १२८ |

## उस्मानाबाद जिल्हा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ४६८ | ५९,६३० | ४९४ | ३२२ | ११३ | – |
| १९५३ | २१४ | २२,४०३ | ३३१ | ४८६ | ६४ | १३५ |
| १९५४ | २१७ | २३,४९४ | ३३५ | ५६६ | ६४ | १७ |
| १९५५ | २१८ | २५,०८३ | ३३६ | ६६४ | १९ | ३७ |

मराठवाड्यांत १९५० सालीं असलेल्या ४४१४ ग्रेन बँकांची सख्या १९५५ सालीं २१५३ वर आली. १९५० सालची सभासद संख्या २,१२,५५० वरून १,४४,५५१ वर आली. रिझर्व फंड व इतर फंड मात्र १९५० ते ५५ मध्यें १२७२ लाखांवरून २५८० लाखांच्या आंकड्यांत गेला. ही वाढ जवळजवळ १०० टक्के होती. याचें कारण व्याजाचा दर द. शें. २० होता व व्याज पूर्णपणें वसूल न

करतांहि हिशेबांत जमा केलें जात असे. म्हणून ग्रेन बँकांनीं दिलेलीं कर्जे, वसुली, थकबाकी यांविषयीं निश्चित माहिती देतां येणें कठीण आहे.

## प्राथमिक पतपुरवठा–संस्था

प्राथमिक पतपुरवठा करणाऱ्या संस्था या सहकारी चळवळीचा कणा आहेत, असें म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाहीं १९५०–५५ या काळामध्यें त्यांची संख्या ११०४ वरून १७४६ वर गेली होती. नव्या पतपेढ्या स्थापन करण्याचें वारें १९५४–५५ मध्यें मोठ्या जोरानें वहात होतें. खालील तक्त्यावरून जिल्हावार व वर्षवार प्राथमिक पतपुरवठा संस्थांची माहिती मिळेल.

## *प्राथमिक पतपुरवठा संस्थांची जिल्हावर व वर्षवार परिस्थिति दर्शविणारा नक्शा.*

### औरंगाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड इतर फंड (लाख) | बँकचें कर्ज (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २३५ | ५४३० | २६१ | ४२३ | २५२ | ९३५ |
| १९५३ | २७० | ६९९६ | २४४ | ४३७ | ४०५ | ११३८ |
| १९५४ | ३११ | ८९७९ | २७३ | ४६८ | ५०९ | १३२० |
| १९५५ | ४९८ | १२,७३० | ३४४ | ५१३ | ९८२ | १९१५ |

### नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड इतर फंड (लाख) | बँकचें कर्ज (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १९९ | ४०९७ | ९३ | ६१ | १६० | ३१४ |
| १९५३ | १८८ | ४४३५ | १०५ | ७७ | २६२ | ४५२ |
| १९५४ | २१९ | ५१२६ | ११३ | ८९ | ३६७ | ५७६ |
| १९५५ | २८१ | ६७२५ | १३२ | ९७ | ५०३ | ७४२ |

### परभणी जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड इतर फंड (लाख) | बँकचें कर्ज (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ३११ | ६३३८ | २२० | ४१५ | २०३ | ८३६ |
| १९५१ | ३१३ | ६८०८ | २१२ | ४३४ | २१४ | ९०७ |
| १९५३ | ३१७ | ७०६१ | २२५ | ४६४ | २६६ | १००६ |
| १९५४ | ४३४ | ९७०८ | २६७ | ४९७ | ४०१ | १२१७ |

## बीड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड इतर फंड (लाख) | बँकेचें कर्ज (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २०९ | ४४३५ | १६२ | २३१ | १८२ | ५७५ |
| १९५१ | २३६ | ५९६० | १६८ | २६६ | २८८ | ७३७ |
| १९५३ | २४५ | ६४६० | १८४ | २८८ | ३५४ | ८४८ |
| १९५४ | २८६ | ७५२५ | १९८ | ३१४ | ३४३ | ८८९ |

## उस्मानाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व फंड इतर फंड (लाख) | बँकेचें कर्ज (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १५० | ३४९९ | ६० | ३४ | १४९ | २४६ |
| १९५१ | १४२ | ३६७८ | ७४ | ५२ | १६६ | २९१ |
| १९५३ | १५५ | ३९२९ | ८ | ५७ | २२६ | ३७२ |
| १९५४ | २४७ | ६९१७ | ११९ | ६६ | ४३७ | ५२५ |

१९५३–५४ मध्यें मराठवाड्यांतील प्राथमिक पतपुरवठा संस्थांची संख्या १२१७ वरून १७४६ वर गेल्याचें दिसून येतें. भाग भांडवलामध्येंहि वाढ झाली. मध्यवर्ति बँकेकडून घेतलेल्या कर्जावरून असा निष्कर्ष निघतो कीं, वाढत्या सभासदांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठीं संस्थांचें स्वतःचें भांडवल अपुरें पडलें.

## ग्रामीण बँका

ग्रामीण बँकेचें कार्यक्षेत्र ५ ते १० मैलांच्या कक्षेंतील ९ ते १० खेड्यांपुरतेंच मर्यादित होतें. अधिकार व भांडवल अधिक देऊन, कार्यक्षेत्र ३०–४० खेड्यांइतकें वाढवून रिझर्व बँकेच्या शिफारशीप्रमाणें कांहीं ग्रामीण बँका काढण्याचा प्रयत्न झाला. पण तो अयशस्वी झाला. इतक्या मोठ्या क्षेत्रांतील सभासदांचा वसूल योग्य वेळीं करण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते व सेक्रेटरी यांचा अभाव होता. वसुलीची यंत्रणा अगर बँकिंग–व्यवहाराच्या पूर्ण माहितीचा अभाव यामुळें अशा स्थापण्यांत आलेल्या सर्व बँका आज अतिशय हलाखींत दिसत आहेत.

या ग्रामीण बँकांकडे मध्यवर्ति बँकांच्या फार मोठ्या बाक्या थकलेल्या आहेत. पुढील तक्त्यांत जिल्हावार व वर्षवार ग्रामीण बँकाची कमाहिती दिली आहे.

## ग्रामीण बँकाची जिल्हावार व वर्षवार परिस्थिति दर्शविणारा तक्ता.

### औरंगाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल | रिझर्व फंड अितर फंड | ओन्ड कॅपिटल् | बाहेरचें कर्ज | थकबाकी | डिपॉझिट | वर्किंग कॅपिटल् (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ७ | १३१६ | २०९६३ | २४११६ | ४५१०९ | ५४३३९ | -- | १५००३ | ११५ |
| १९५३ | ७ | १६०२ | २०३७५ | २६९४२ | ४७३१७ | ४१७९४ | -- | -- | १०९ |
| १९५४ | ७ | १६६३ | २०९९९ | २८८१३ | ५११११२ | ४०७६७ | -- | २४२२९ | ११९ |
| १९५५ | ७ | १६३२ | २४२७४ | ३२११८ | ५६३९२ | ३४९६३ | ३१३६८ | -- | १२० |

### नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल | रिझर्व फंड अितर फंड | ओन्ड कॅपिटल् | बाहेरचें कर्ज | थकबाकी | डिपॉझिट | वर्किंग कॅपिटल् (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ८ | १९२४ | २५५४२ | ८८२४ | ३४३६६ | ८६८४६ | -- | १६७६ | १३२ |
| १९५३ | ९ | २६०७ | ३२११० | ८४०४ | ४०५१४ | १८५०४५ | -- | -- | २२९ |
| १९५४ | – | २७२३ | ३४५५३ | १०९७१ | ४५५२४ | २००५६३ | -- | ३११८ | २५० |
| १९५५ | ९ | २९६५ | ३८६२९ | ११२९५ | ४९९२४ | १९८४०१ | १४१४०० | -- | २४६ |

## परभणी जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल | रिझर्व फंड व इतर फंड | ओन्ड कॅपिटल | बाहेरचें कर्ज | थकबाकी | डिपॉझिट | वर्किंग कॅपिटल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ६ | ११२५ | १३४८९ | ११५२८ | २५०१७ | ३४६४७ | — | ३८१ | ६२ |
| १९५३ | ६ | ११०८ | १४३०६ | १५१६९ | ३०४७५ | २०३९० | — | — | ६० |
| १९५४ | ७ | ११०५ | १४७३३ | १७२७२ | ३२००५ | २०१८७ | — | २११८ | ६१ |
| १९५५ | ६ | ११०७ | १५०६१ | १८१७४ | ३३२३५ | १७२७० | १७२७० | — | ५९ |

## बीड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल | रिझर्व फंड व इतर फंड | ओन्ड कॅपिटल | बाहेरचें कर्ज | थकबाकी | डिपॉझिट | वर्किंग कॅपिटल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ६ | १०५० | १९०९५ | ३१५०३ | ५०५९८ | ३१५० | — | ३८४५४ | ९२ |
| १९५३ | ६ | १५१५ | २११३८ | ३८७७८ | ५९९२५ | १४०८७ | — | — | १३० |
| १९५४ | ७ | १६२७ | २३७७३ | ३९६३१ | ६३४०४ | ७५५७ | — | ६८५११ | १४२ |
| १९५५ | ८ | १७७१ | २८१८८ | ४२३८५ | ७०५७३ | २६८६१ | ३९९४ | — | १७९ |

## उस्मानाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल | रिझर्व फंड व इतर फंड | ओन्ड कॅपिटल | बाहेरचें कर्ज | थकबाकी | डिपॉझिट | वर्किंग कॅपिटल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ११ | २२३२ | ४३०८१ | ३९२९६ | ८२३७७ | १९२६९ | — | ११३३९ | ११३ |
| १९५३ | १२ | २७७९ | ४३०२२ | ३७८७० | ८०८९२ | २८३०२ | — | — | १२६ |
| १९५४ | — | २८४७ | ५४४३२ | ५१५२६ | १०५९६१ | ३०७९९ | — | ४१४२ | १५२ |
| १९५५ | १४ | ३०६९ | ४८७२८ | ५५९७३ | १०४७०१ | ३५८५३ | २५३३२ | — | १७४ |

बाहेरून आलेलीं कर्जे पाहिलीं असतां त्या मानानें थकबाकी फार मोठी आहे, असें वरील तक्त्यावरून दिसून येतें. जवळजवळ ७५ टक्के थकबाकी तुंबलेली दिसून येते. रिझर्व बँकेकडून घेतलेल्या कर्जाची फेड त्वरेनें होऊं शकतें. पण स्वतःच्या भांडवलांतून दिलेलीं कर्जें संपूर्णपणें दुर्लक्षिलीं जातात. त्यांच्या वसुलीकडे लक्ष नसतें आणि मग पर्यायानें संस्थेची कार्यक्षमता क्रमाक्रमानें कमी होत जाते.

## मध्यवर्ति सहकारी बँका

मध्यवर्ति सहकारी बँका जिल्हा पातळीवर प्राथमिक पतपेढ्यांना व ग्रामीण बँकांना भांडवल पुरविणाऱ्या संस्था आहेत. या मध्यवर्ति बँकांचे सभासद मिश्र स्वरुपाचे असतात. सोसायटी सभासदांची संख्या व्यक्ती सभासदांपेक्षां जास्त आहे. या सोसायटी सभासदांनाच विशेष कर्जपुरवठा केला जातो. मध्यवर्ति बँकेची कचेरी सबंध जिल्ह्यामध्यें एकच असल्यामुळें दूरदूरच्या सहकारी संस्थांना कर्ज घेण्यासाठीं मुख्य कचेरीकडे यावे लागे. कर्जाची ने–आण करणें फारच त्रासाचें व खर्चाचें असे. अितकेंच नव्हे तर मध्यवर्ति बँक व सहकारी संस्थांचे संचालक अगर सभासद यांचा संबंध फारच विरळ व कर्जाची ने-आण करण्यापुरताच येत असे. पतपेढ्यांच्या व्यवहारांवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठीं मध्यवर्ति बँकेकडे अिन्स्पेक्टर्स व अितर नोकरवर्ग नव्हता. त्यामुळें सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार वाढविणें, बेशिस्त संस्थांचा कारभार सुधारणें यांपैकीं कोणतीहि कामगिरी बँकांना स्वतंत्रपणें करतां आली नाहीं. या मध्यवर्ति बँकेची अन्य संस्थांकडे १५–२० वर्षांची थकबाकी थकलेली अद्याप दिसून येते. ज्या पतपेढ्यांचा व्यवहार स्थगित झाला अशा संस्थाकडे या मध्यवर्ति बँकेची येणी कित्येक वर्षे थकलीं आहेत. या बँकेचे मासिक ताळेबंद काढण्याची पद्धत नव्हती. फक्त सालअखेर पत्रक व ताळेबंद सरकारी ऑडिटचे वेळीं काढले जात. एका जिल्ह्यांत एक मध्यवर्ति बँक हें धोरण बदललें. एका जिल्ह्यांत २ किंवा ३ सरकारी मध्यवर्ति बँका स्थापन करण्यांत आल्या. खालील तक्त्यावरून मराठवाड्यांतील सहकारी मध्यवर्ति बँकांची परिस्थिति दिसून येईल.

ग्रामपंचायतीसाठीं गांव कंदील
आपले गांवीं येऊन
चालू गावकंदील
रिपेअर व रंग करून
देण्याची खास व्यवस्था


एम. एम. याह्याभाई,
विचारविनिमय पत्रद्वारें करा बोहोरपट्टी, नासिक सिटी.

## मध्यवर्ती सहकारी बँकांची परिस्थिति दर्शविणारा तक्ता

### औरंगाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल लाख | शेअर कॅपिटल व्यक्ति | शेअर कॅपिल सोसायटी | रिझर्व व इतर फंड (लाख) | ओन्ड कॅपिटल (लाख) | डिपॉझिट (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ३ | ३७३ | १४९ | — | — | २९९ | ४९७ | ६३ | — |
| १९५३ | २ | ४१८ | १७५ | — | — | ३०४ | ४७८ | — | ८६१ |
| १९५४ | २ | ४३५ | २०१ | — | — | — | — | ४९१ | ८३७ |
| १९५५ | २ | ५९० | २६३ | ११९ | १४ | ३०६ | ५६९ | — | १५६९ |

### नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल लाख | शेअर कॅपिटल व्यक्ति | शेअर कॅपिल सोसायटी | रिझर्व व इतर फंड (लाख) | ओन्ड कॅपिटल (लाख) | डिपॉझिट (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २ | २७९ | ६१ | — | — | १०३ | १६४ | ७१ | — |
| १९५३ | २ | ३३६ | ९५ | — | — | १०८ | २०७ | — | ६१४ |
| १९५४ | २ | ३४३ | १०४ | — | — | — | — | १२० | ७२२ |
| १९५५ | १ | ४२७ | १२३ | १४ | १०९ | ११२ | २३२ | — | १०६९ |

### परभणी जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल लाख | शेअर कॅपिटल व्यक्ति | शेअर कॅपिल सोसायटी | रिझर्व व इतर फंड (लाख) | ओन्ड कॅपिटल (लाख) | डिपॉझिट (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ३ | ३२८ | ७७ | — | — | २२० | २९७ | २१२ | — |
| १९५३ | ३ | ३३८ | ६८ | — | — | १८१ | २४९ | — | ७१६ |
| १९५४ | ३ | ३४१ | १०५ | — | — | — | — | २४९ | ८७६ |
| १९५५ | २ | ४३९ | १०५ | १० | ९६ | २३७ | ३४२ | — | १०८२ |

**बीड जिल्हा**

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व व इतर फंड (लाख) | शेअर कॅपिटल व्यक्ति (लाख) | शेअर कॅपिटल सोसा. (लाख) | ओन्ड कॅपिटल (लाख) | डिपॉझिट (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २ | २५६ | ४९ | ६६ | – | – | ११५ | ९८ | – |
| १९५३ | २ | २८५ | ५४ | ७३ | – | – | १२७ | – | ४०० |
| १९५४ | २ | २८६ | ८२ | – | – | – | – | ३०० | १०१७ |
| १९५५ | २ | ३२७ | ८२ | ७७ | ५ | ७७ | १५५ | – | ६४३ |

**उस्मानाबाद जिल्हा**

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | रिझर्व व इतर फंड (लाख) | शेअर कॅपिटल व्यक्ति (लाख) | शेअर कॅपिटल सोसा. (लाख) | ओन्ड कॅपिटल (लाख) | डिपॉझिट (लाख) | वर्किंग कॅपिटल (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २ | २७२ | ५२ | १९ | – | – | ७१ | ३२७ | – |
| १९५३ | २ | २८० | ६० | २३ | – | – | ८३ | – | ४७५ |
| १९५४ | २ | २९६ | ११६ | – | – | – | – | १४९ | ५६९ |
| १९५५ | २ | ३७० | ९५ | २५ | १९ | ७६ | १२० | – | ७१३ |

मराठवाड्यांतील मध्यवर्ती बँकेला १९५३ सालीं येणें असलेल्या १९५६ लक्ष रुपये कर्जापैकीं ८३२ लक्ष थकबाकी होती. १९५५ सालीं १४६ लक्ष बाकी होती. स्वतःच्या भांडवलांतून दिलेल्या कर्जापैकीं–१५१२ लक्ष रुपयांपैकीं–९५३ लक्ष रुपयांची थकबाकी होती. यावरून प्राथमिक पतपेढ्यांच्या व ग्रामीण बँकांच्या स्वतःच्या भांडवलांतून दिलेल्या कर्जाच्या वसूलीकडे दुर्लक्ष होते हा निष्कर्ष या मध्यवर्ति बँकांनाही लागू पडतो.

वर उल्लेख केलेला खरा दोष मध्यवर्गी बँका, त्यांचे चालक यांजकड नसून तो दोष त्या वेळच्या प्रचलित कार्यपद्धतीलाच आहे. मराठवाड्यांतील त्यावेळच्या विशिष्ठ सामाजिक व राजकीय परिस्थितींतहि सहकारी चळवळ टिकवून धरली, तिची वाढ करण्याचा शक्यतों प्रयत्न तेथील सहकारी कार्यकर्त्यांनीं केला आहे. म्हणूनच आज व याच ग्रामीण व अितर सहकारी संस्था लहान प्रमाणावर कां होईना पण काम करतांना दिसत आहेत. याचें श्रेय कार्यकर्त्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नालाच द्यावें लागेल.

या कार्यकर्त्यांच्याच सहकार्यानें व त्यांच्याच मार्गदर्शनानें निरनिराळ्या क्षेत्रांतील सहकारी संस्थांची पुनर्घटना करून, आर्थिक साहाय्य देऊन, त्यांना स्वावलंबी व कार्यक्षम करून महाराष्ट्रांतील अितर सहकारी संस्थांप्रमाणेंच त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं राज्य सरकार, सहकारी खातें, राज्य सहकारी बँक यांच्या विचारानें अेकूण कार्यपद्धतीसंबंधानें नवीन धोरण ठरविण्यांत आलें व त्या धोरणास अनुसरून मराठवाड्यांतील सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतींत सुधारणा घडवून आणण्याचें ठरलें आहे.

## प्रांत पुनर्रचनेनंतर

प्रांत पुनर्रचनेमुळें मराठवाडा-मुंबई राज्यामध्यें आला. आणि मराठवाड्यांतील सहकारी चळवळीस वेग प्राप्त झाला. सहकारी चळवळ अेका विशिष्ट गतीनें नियोजनपूर्वक वाढूं लागली. प्रतिवर्षीं शेअर भांडवल वाढविण्याचा नियोजनपूर्वक कार्यक्रम आंखला गेला. ग्रामीण सहकारी पतपेढ्यांचा आर्थिक पाया सुदृढ व मजबूत करण्याकडे लक्ष दिलें गेलें. मध्यवर्ती बँकांनीं तालुका–निहाय–बँका उघडल्या. अेका जिल्ह्यास अेक मध्यवर्ति बँक हें धोरण निश्चित ठरविलें गेलें. जमीन–मालकांबरोबर संरक्षित कुळांनाहि कर्ज देण्याचें धोरण मान्य झालें आहे. यामुळें ग्रामीण भागाचा आर्थिक विकास सहकारी चळवळीमार्फत घडवून आणण्यास निःसंशय मदत झाली आहे.

# ग्रामीण पतपेढ्यांचा-विकास दर्शविणारा जिल्हावार तक्ता

## औरंगाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | सभासदांना दिलेलें कर्ज (लाख) | प्रत्येक सभासदांस दिलेलें सरासरी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ३०-६-५६ | ५४९ | १६१०६ | ४४६ | १५८४ | – |
| ३०-६-५८ | ६७२ | १६९८२ | ६३५ | २०१६ | रु. १२० |
| १९६० मधील संकलित अंदाज | ६९७ | ३४००० | २० | १०० | रु. ३०० |

## नांदेड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | सभासदांना दिलेलें कर्ज (लाख) | प्रत्येक सभासदांस दिलेलें सरासरी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ३०-६-५६ | ३२४ | ११३०३ | २·१० | १०·५४ | – |
| ३०-६-५८ | ४४१ | २०२७६ | ५·२० | २१·१३ | १०४ |
| १९६० मधील अंदाज | ५९५ | ३५८०० | २० | १०० | ३०० |

## परभणी जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | सभासदांना दिलेलें कर्ज (लाख) | प्रत्येक सभासदांस दिलेलें सरासरी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ३०-६-५६ | ४९० | १२५५६ | ३१९ | ८·३६ | – |
| ३०-६-५८ | ५५१ | १६९९९ | ४५२ | १५·६० | ९० |
| १९६० मधील अंदाज | ६४८ | ३४००० | १२ | ६५ | २०.० |

## बीड जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | सभासदांना दिलेलें कर्ज (लाख) | प्रत्येक सभासदांस दिलेलें सरासरी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ३०-६-५६ | ३०२ | १०५६९ | २·११ | ७·६३ | – |
| ३०-६-५८ | ३६७ | १३८३१ | ३·६४ | ११·३६ | ८२ |
| १९६० मधील अंदाज | ४५६ | २७००० | १२ | ६५ | २०० |

## उस्मानाबाद जिल्हा

| वर्ष | संख्या | सभासद | शेअर कॅपिटल (लाख) | सभासदांना दिलेलें कर्ज (लाख) | प्रत्येक सभासदांस दिलेलें सरासरी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ३०-६-५६ | ४६७ | १६२२६ | २·९५ | ५·१६ | – |
| ३०-६-५८ | ६२७ | २७१२७ | ६·७० | २२·३२ | ८२ |
| १९६० मधील अंदाज | ६४७ | ४८००० | २० | १०० | २५० |

## मराठवाड्यांतील सहकारी चळवळीसंबंधीं
## १९५८ अखेरचा सर्वसामान्य माहितीचा तक्ता

| तपशील | औरंगाबाद | नादेड | परभणी | बीड | उस्मानाबाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| खेड्यांची संख्या | १८५५ | १६७८ | १५०० | १०२९ | १४४२ | ७४८४ |
| शेतकी सहकारी पतपेढ्या | ६७२ | ४४१ | ५५१ | ३६७ | ६२७ | २६५८ |
| शेतकी सहकारी पतपेढ्यांच्या क्षेत्रांतील गांवें | ७४३ | ७५३ | ९५५ | ३९३ | ८२२ | ३६६६ |
| नोंदणी झालेल्या शेतकी सहकारी पतपेढ्या १९५७–५८ | ६४ | ६३ | ३३ | ३९ | १०१ | ३०० |
| सभासदांची संख्या १९५८ अखेर | १६९८२ | २०२७६ | १६९९९ | १३८७१ | २७१२७ | ९५२१५ |
| सभासदांचें भाग भांडवल लक्ष रुपये | ६·१५ | ५·२० | ४·५२ | ३·६४ | ६·७० | २६·४१ |
| गंगाजळी व इतर निधि. लक्ष रुपये | २·९७ | १·५२ | ५·९४ | १·७१ | २·३४ | १४·४८ |
| सभासद व बिनसभासदांच्या ठेवी. लक्ष रुपये | ·५३ | १६ | ·५६ | ·८२ | २५ | २·३२ |
| मध्यवर्ति बँकेचें कर्ज. लक्ष रुपये. | १७·८४ | २०·४३ | १०·९३ | ९·५२ | २१·१५ | ७९·८७ |
| सभासदाकडील येणें कर्ज. लक्ष रुपये. | २०·४७ | २१·१३ | ५०·६० | ११·३७ | २२·३२ | ९०.८९ |
| सभासदांकडील थकबाकी. लक्ष रुपये. | ८·०४ | ६·८३ | ५·५० | ४·५० | ७·४० | ३२·३२ |
| थकबाकीचें एकूण येणें कर्जाशी प्रमाण. रुपये. | ३९ | ३२ | ३५ | ३९ | ३५ | ३५ |
| दर सभासदांस कर्जाचें सरासरी प्रमाण. रुपये. | १२० | १०४ | ९० | ८२ | ८२ | ९५ |
| दर सोसायटीस बँक कर्जाचें सरासरी प्रमाण. रुपये | ३५३९ | ६०९८ | २६५२ | ३२८१ | ४११४ | ३८८४ |
| मध्यवर्ति बँकेच्या शेअर्समध्यें सोसायट्यांनीं गुंतविलेली रक्कम लक्ष रु. | २·९५ | ३·२२ | १·९९ | १·६७ | ४·४७ | १४·३० |
| सोसायट्यांचें सरासरी भाग भांडवल. रुपये. | ९४५ | ११७९ | ८२० | ९९१ | १०६८ | ९९३ |
| सोसायट्यांचें एकूण खेळतें भांडवल. लक्ष रुपये. | २७·६१ | २०.३९ | २२·३६ | १५·७३ | १३०·११ | १२३·१६ |

सहकारी चळवळ केवळ शेती उत्पादनापुरतींच मर्यादित राहिलेली नाहीं. सहकारी चळवळ ही जनतेच्या दैनंदिन जीवनांत मुरली असल्याचे दृष्टोत्पत्तीस अनेक उदाहरणें येत आहेत. समाजाच्या प्रत्येक थरांमध्यें सहकार तत्त्वानें प्रवेश केला आहे. मराठवाड्यांतील सहकारी चळवळीचें सम्यक दर्शन या संदर्भ ग्रंथामध्यें घडवितां येणार नाहीं.

तेली, चर्मकार, विविध कार्यकारी, खादी ग्रामोद्योग, आदि अनेक क्षेत्रांमध्यें सहकारी संस्था उभ्या आहेत.

## सहकार– समाचार

'सहकार समाचार' हें मराठवाड्यांतील सहकारी चळवळींस वाहिलेलें एकमेव मासिक होय. मुंबई राज्य सहकारी संघ व मराठवाडा विभागीय सहकारी संघ या संस्था या मासिकाचें प्रकाशन करीत असतात.

मराठवाड्यांतील सहकारी चळवळीच्या प्रचाराच्या दृष्टीनें हैद्राबाद येथें हें मासिक निघत होतें. जुलै १९५६ पासून मराठवाडा विभागातर्फे या मासिकाचें प्रकाशन सुरूं झालें. मराठवाड्यांतून "सहकार समाचार" प्रसिद्ध होऊं लागल्यापासून त्याची नुसती विक्रीच वाढली असें नव्हें तर त्याच्या अंतर्बाह्य स्वरूपामध्येंहि वदल घडत आला.

## सहकारी विद्यालय

मुंबई राज्य सहकारीसंघ व मराठवाडा विभागीयसंघ यांच्यामार्फत "मराठवाडा सहकारी संघ विद्यालय" औरंगाबाद येथें चालतें. या विद्यालयाची स्थापना १–४–५८ रोजीं झाली. विद्यालयाच्या शिक्षणक्रमाची मुदत ६ महिन्यांची आहे. अभ्यास ४ महिने व प्रात्यक्षिकें २ महिने येथें दाखविलीं जातात. असिस्टंट डिस्ट्रिक्ट को. ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब ऑडिटर, सुपरवायझर, मोठ्या विविध कार्यकारी संस्थांचे सेक्रेटरी, खरेदी–विक्री संघाचे मॅनेजर आदिसाठीं ८० जागा, मॅट्रिक पास झालेल्या खासगी विद्यार्थ्यांसाठीं २० जागा असतात. फी ४० रुपये, असते. अभ्यासक्रमामध्यें सहा विषय असतात. (१) ग्रामीण अर्थशास्त्र. (२) सहकार. (३) सहकारी कायदा व इतर कायदे. (४) जमाखर्च. (५) अंत र्व्यवस्था. (६) शेतीविषयक ज्ञान. याशिवाय बँकिंग, खरेदीविक्री, औद्योगिक सहकार, ग्राहक सहकार, लँडमार्गेज बँक असे पांच ऐच्छिक विषय असून त्यांतील कोणताहि अेक विषय घ्यावा लागतो. शिक्षणाचें माध्यम मराठी असतें. उमेदवारांना 'डिप्लोमा अिन को–ऑपरेशन' मिळतो. हा डिप्लोमा मिळालेल्या विद्यार्थ्यांना सहकारी खात्यांतील नोकरीमध्यें अधिक पसंत म्हणून उपयोगी पडतो. या विद्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणें आहे.

"मराठवाडा सहकारी विद्यालय" भडकल दरवाजा, औरंगाबाद.

# We Manufacture & Specialise in All Kinds of Disinfectants & Insecticides

"KLINWELL" White Perfumed Essence of Phenyle.

"BULL" Brand Concentrated Essence of Phenyle.

"NOXATHYNE" Powerful Bug-Killer.

*Distilled Water & Battery Charging Solution.*

# Paul Chemical Works

(GOVT. SUPPLIERS)

**Office**

1766, *Laxmi Road,*
Poona 2.

**Workshop**

207, *Wellesley Road,*
Poona 2.

**Branch**

*Rly. Goods Shed Road,*
Belgaum.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि. ............
क्रमांक ............ नों. दि. ............

# मराठवाड्यांतील प्रकाशनें

# मराठवाड्यांतील प्रकाशनें

**अजिंठा :–**

हें मराठवाड्यांतील प्रमुख दैनिक होय. हें १९५९ सालीं श्री. द. शं. पोतनीस यांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें. अेका प्रतीची किंमत ७ नवे पैसे आहे. सरकारी व बिनसरकारी, बँक आदींच्या जाहिरातींचा दर चार रुपये अिंच असा आहे. व्यापारी जाहिराती तीन रु. अिंच याप्रमाणें स्वीकारल्या जातात. १०० अिंच जाहिरातीचा करार केल्यास २॥ रुपये अिंच असा या दैनिकाच्या जाहिरातीचा भाव आहे.

**पत्ता** :–अजिंठा कार्यालय, पैठण दरवाजा, औरंगाबाद.

**मराठवाडा :–**

मराठवाड्यांतील राजकीय, सामाजिक जीवनावर प्रकाश पाडणारें राष्ट्रीय बाण्याचें प्रमुख अर्धसाप्ताहिक म्हणून याचा अुल्लेख केला जातो. संस्थापक श्री. आ. कृ. वाघमारे हे असून श्री अनंत भालेराव हे संपादक आहेत. हें वृत्तपत्र १९४७ सालीं सुरू झालें. दर रविवारी व गुरुवारी हें पत्र प्रसिद्ध होतें. अेका प्रतीची किंमत १० नवे पैसे आहे. जाहिरातीचा दर-कॉलम अिंचास ३ रु. असा आहे. १०० अिंच जाहिरातीच्या कराराचा दर २॥ रु. अिंच असा आहे. या पत्राच्या ४२०० प्रती काढल्या जातात.

**पत्ता** :–मराठवाडा कार्यालय, सराफा, औरंगाबाद. फोन नं. ४५. पो. बॉ. नं २२.

**रचना :–**

ग्रामपंचायत आणि विकास गट या विभागांत लोकप्रिय व अधिक खप असलेलें वृत्तपत्र म्हणून 'रचने' चा अुल्लेख केला जातो. हें पत्र १९५७ सालीं सुरू झालें. संचालक श्री. विजेंद्र कावरा हे असून श्री. पां. रा. गणोरकर हे संपादक आहेत. "सर्वांगीण लोकशाही जीवनपद्धतीच्या रचनेसाठीं" प्रयत्न करावयाचा व त्याचा प्रचार करावयाचा हें या वृत्तपत्राचें ध्येय शिरोभागीं आहे. दर गुरुवारीं प्रसिद्धीकरण होतें.

**पत्ता** :–"रचना" साप्ताहिक, गुलमंडी, औरंगाबाद.

**पंचशील :–**

मराठवाड्यांतील अेक प्रमुख साप्ताहिक. पंचशील हें साप्ताहिकाचें नांव शोधण्यांत संयोजकांनीं कल्पकता व्यक्त केली आहे. भारतीय राजकारणामध्यें मान्यता पावलेलें पंचशील हा राजकीय अर्थ या साप्ताहिकाच्या नांवामध्यें अभिप्रेत

नव्या महाराष्ट्राचें नवें मासिक !

अल्पावधींत लोकप्रिय झालेलें,

मराठींतील आद्य डायजेस्टकार आणि

सुप्रसिद्ध साहित्यिक

**डॉ. अ. वा. वर्टी**

ह्यांचया संपादकत्वाखालील

एकमेव मासिक

# श्री यु त

## ज्ञान आणि विनोद

विविध भाषांतील साहित्यभांडारांतून संकलित केलेले धर्म, विज्ञान, चरित्र, वैद्यक, इतिहास, साहित्य इत्यादि तीस विषयांवरील माहितीपूर्ण आणि मनोरंजक लेख.

चटकदार आणि विनोदी लघुकथा, वाचकांकरितां विविध मनोरंजक सदरें, माहितीपूर्ण आणि विनोदी पानपूरकें, विनोदाची पखरण आणि ' **आमचे मित्र** ' **गंगूनाना** ह्यांचें सडेतोड, खोचक, विनोदी सदर—**मल्लीनाथी.**

अंक प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध होतो.

**वार्षिक वर्गणी रु. १०  एका अंकास रु. १**

चंद्रहास प्रकाशन, वर्टी कॉलनी, नासिक.

नाहीं. विद्या, ज्ञान, विनय, तप आणि सत्य या ज्या पांच शीलांनीं मानवाचें जीवन समृद्ध होतें, तीं पंचशीलें असा अर्थ संयोजकांनीं लावला आहे. हा अर्थ साप्ताहिकाच्या ब्लॉकवरूनच लक्षांत येतो. हें पत्र १९५९ सालीं सुरू झालें. संपादक श्री. ज. प. मुळे हे आहेत. कायद्याच्या नोटीसा, सहकारी कंपन्यांचे प्रॉस्पेक्टस्, टेंडर नोटीसा, वगैरेंच्या जाहिरातींचा दर सिंगल कॉलम तीन रु. अिंच हा आहे. व्यापारी जाहिराती दोन रु. अिंच याप्रमाणें प्रसिद्ध केल्या जातात. दर शनिवारीं प्रसिद्धीकरण होतें.

**पत्ता :–**पंचशील साप्ताहिक, शहागंज, औरंगाबाद.

## प्रगति :–

मराठवाड्यांतील व्यापाऱ्यांचें मुख्य पत्र हें होय. हें साप्ताहिक हिंदी असून दर शुक्रवारीं प्रकाशित होत असतें. या साप्ताहिकाचें संचालन दि जालना मर्चंटस् असोसिअेशन लि. जालना, ही व्यापारी संघटना करीत असते. संपादक श्री. श्री. ना. हुद्दार हे आहेत. हें साप्ताहिक १९५४ सालीं सुरू झालें. अेका प्रतीची किंमत १० नवे पैसे आहे. जाहिरातीचा दर ७५ नवे पैसे कॉलम अिंच असा आहे. या साप्ताहिकांतील "जालना–मार्केट" हें सदर व्यापाऱ्यांमध्यें अुत्सुकतेनें वाचलें जातें. तसेच दैनिक प्रगतींतून बाजारभाव रिपोर्ट प्रसिद्ध करण्यांत येतात.

**पत्ता :–**प्रगति कार्यालय, राजेंद्रप्रसाद रोड, जालना. (औरंगाबाद)

## परभणी समाचार :–

हें हिंदी साप्ताहिक परभणी येथें दर शनिवारीं प्रकाशित होत असतें. हें साप्ताहिक १९५७ सालीं सुरू झालें. अेका प्रतीची किंमत ४ नवे पैसे आहे. संपादक श्री. हेमराज जैन हे आहेत. जाहिरातीचे दर व्यापाऱ्यांसाठीं १।। रु. कॉलम अिंच असून सरकारी जाहिरातींचे दर २।। रु. कॉलम अिंच आहेत.

**पत्ता :–**"परभणी समाचार" कार्यालय, परभणी.

## प्रतिभा :–

नांदेड व परभणी येथून अेकाच वेळीं प्रकाशित होणारें मराठवाड्यांतील हें प्रमुख साप्ताहिक होय. हें साप्ताहिक १९५७ सालीं सुरू झालें. शुक्रवार हा प्रसिद्धीचा दिवस. संस्थापक व संपादक श्री. दे. गं. रसाळ, बी. अे. (ऑनर्स), अेल्‌अेल्. बी. वकील हे आहेत. अेका प्रतीची किंमत ८ नवे पैसे आहे. वार्षिक वर्गणी ४ रु. आहे. जाहिरातींचा दर कॉलम अिंचास २ रु. असा आहे. ५१ अिंचांच्या करारास १।।। रु. अिंच असा दर आहे. मराठवाडा, हैद्राबाद शहर, निझामाबाद, अदिलाबाद, बिदर आदी जिल्ह्यांमध्यें या साप्ताहिकाचा खप आहे. अेकूण २००० प्रती काढल्या जातात.

**पत्ता :–**प्रतिभा कार्यालय, वजिराबाद रोड, नांदेड.

साप्ताहिक

# गांवकरी

**किरकोळ अंक– १३ न. पैसे**
**वार्षिक वर्गणी– ७ रुपये**

- देशविदेशच्या निवडक संकलित बातम्या.
- राजकीय व अितर माहितीपूर्ण लेख.
- नवी दृष्टि देणारा निर्भीड अग्रलेख.
- आरोग्यविषयक माहितीपूर्ण लेख.
- लघुकथा, कविता, पड्यावरील व पड्यामागील हालचाली, महिलांसाठीं माजघर, छोट्यांसाठीं आमचे छोटे दोस्त वगैरे सर्व कांहीं असलेलें.

**कार्यालय : साप्ताहिक गांवकरी, माणके कॉंपौंड, मनमाड.**

---

सर्व कुटुंबियांनीं एकत्र बसून वाचण्याजोगें मराठी भाषिकांत लोकप्रिय एकमेव मराठी डायजेस्ट.
ज्ञान आणि मनोरंजन एकाच वेळीं देणारे अनेक विषयांवरील लेख, खुसखुशीत कथा, चटकदार सदरें.
प्रत्येक अंक वाचनीय.

# अमृत

**ज्ञान आणि मनोरंजन**
**पहिल्या तारखेस प्रसिद्ध होतें.**
**किरकोळ अंक १ रुपया**
**वार्षिक वर्गणी १० रुपये**

**कार्यालय : अमृत, ७९७ आग्रारोड, नासिक.**

---

# रसरंग

**(कला आणि क्रीडा)**

**दर शनिवारीं प्रसिद्ध होतें.**
**किरकोळ २५ नये पैसे**
**वार्षिक वर्गणी रु. १२**

- चित्रपट • रंगभूमि • संगीत • नृत्य आदि ललित कला आणि देशीविदेशी क्रीडाप्रकार ह्यांना वाहिलेलें अभिजात साप्ताहिक.
- अद्ययावत् वृत्त, कलावंतांच्या मनोरंजक आठवणी, चित्रपटांचीं सडेतोड परीक्षणें, कार्यक्रमांचीं मार्मिक रसग्रहणें, लोकप्रिय स्पर्धा अशीं सदरें.
- कलावंतांचीं भरपूर छायाचित्रें
- मनोहारि मुखपृष्ठ व आकर्षक सजावट.

**कार्यालय : रसरंग, ७९७ आग्रारोड, नासिक.**

**विवेक :–**

हिंदुत्ववादाचा प्रखर प्रचार करणारें हें मराठी साप्ताहिक. मुख्य कचेरी मुंबअीस असली तरी या साप्ताहिकाची मराठवाडा आवृत्ति औरंगाबादेस मुद्रित केली जाते. मराठवाडा आवृत्तीचीं चार पानें तेथेंच प्रकाशित केलीं जातात. प्रकाशन दिवस रविवार हा आहे. हें १९४८ सालीं सुरू झालें. कॉलम अिचास ३ रु. हा जाहिरात दर आहे. ५१ अिचांच्या कराराच्या जाहिरातींचा दर २॥ रु. व १५० अिचांच्या करारांस २९ रु. हा दर आहे.

**प्रतिष्ठान :–**

मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र. दर महिन्यास औरंगाबाद येथून प्रसिद्ध होतें.

याव्यतिरिक्त शिवसंदेश (साप्ताहिक), औरंगाबाद; जागृति (साप्ताहिक), परभणी; नवप्रभा (हिंदी पाक्षिक), नांदेड; बालाघाट (मासिक), उस्मानाबाद हीं प्रकाशनें चालू आहेत.

---

* औटडोअर व इन्‌डोअर फोटोग्राफी
* ऑइलपेंट व वॉटरकलर एन्लार्जमेंटस्
* ग्रुप फोटो व लहान मुलांच्या उत्कृष्ट पोजेस्

कलात्मक व मनपसंत फोटो काढण्याचें एकच ठिकाण

**सोनवणे फोटो आर्ट स्टुडिओ**

चांदवडकर लेन, नासिक शहर.

# मराठवाड्यांतील

# ग्रंथालयें

# मराठवाड्यांतील ग्रंथालयें

## ग्रंथालय कायदा व मराठवाडा ग्रंथालय संघ

**लेखक :– रा. य. सराफ,** एम्. ए., डिप्. लिब्.

**कार्यवाह,**

**मराठवाडा ग्रंथालय संघ.**

"Whereas it is expedient to provide for the establishment and maintenance of public libraries and the organization and development of a comprehensive rural and urban library service in the state of Hydrabad,

Be it enacted in the sixth year of our Republic as follows"

–The Hydrabad Public Libraries Act, 1955

नवीं ग्रंथालयें स्थापन करणें, तीं चालू रहावीत म्हणून आर्थिक तरतूद करणें, शहरांत व ग्रामीण भागांत ग्रंथालयांची वाढ पद्धतशीरपणें करणें असा हेतु हा कायदा पास करतांना होता हें कायद्याच्या वर दिलेल्या प्रास्ताविकावरून दिसून येईल.

सदरहू हेतु कितपत साध्य झाला ? साध्य झाला नसल्यास कां झाला नाहीं ? त्याचप्रमाणें मराठवाड्यांतील ग्रंथालयांची सद्यस्थिती कशी आहे ? या सर्व बाबींचा विचार प्रस्तुतच्या लेखांत थोडक्यांत पण साधार करावयाचा आहे.

मराठवाड्यांतील ग्रंथालयांची मागील तीन वर्षांतील स्थिती पुढील तक्त्यांवरून पूर्णपणें लक्षांत येईल.

**(१) सरकारी ग्रॅन्ट मिळणाऱ्या ग्रंथालयांची वर्षवार व जिल्हावार [illegible].–**

| वर्ष | औरंगाबाद | बीड | नांदेड | उस्मानाबाद | परभणी. |
|---|---|---|---|---|---|
| १९५७–५८ | ३ | ४ | ८ | ७ | ८ |
| १९५८–५९ | ३ | ६ | ११ | १४ | ८ |
| १९५९–६० | ३ | ९ | ११ | १८ | ७ |

**(२) मदत न मिळणारीं ग्रंथालयें**

| औरंगाबाद | बीड | नांदेड. | उस्मानाबाद | परभणी |
|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | – | ३ |

## वर्षवार ग्रँट

| वर्ष | ग्रंथालयांची संख्या | ग्रँट रु. | सर्वांत जास्त ग्रँट रु. | सर्वांत कमी ग्रँट रु. | सरासरी ग्रँट रु. |
|---|---|---|---|---|---|
| १९५७–५८ | ३० | ४६९९ | ५१४ बलवंत मोफत वाचनालय, औरंगाबाद | २४ १) महिला वाचनालय, बीड २) पुरोगामी वाचनालय, बीड ३) Peoples Library बीड | १५६–३३ |
| १९५८–५९ | ४२ | ६७१० | ५६५ बळवंत मोफत वाचनालय, औरंगाबाद | २४ महिला वाचनालय, बीड | १५९–७५ |
| १९५९–६० | ४८ | ६९८५ | ,, | १२ महिला वाचनालय, बीड | १४५–७२ |

मराठवाड्यांत १९५७–५८ सालीं एकूण ३० ग्रंथालयें होतीं, त्यांस एकुण ४६९९ रु. रक्कम वाटण्यांत आली; तर १९५९–६० सालीं एकूण ४८ ... Public असून त्यांस ६९८५ रु. ग्रँट वाटण्यांत आली. म्हणजेच १९५७–५८ला सर ग्रंथालयाच्या वांट्यास १५६–३३ रु. आले तर १४५–७२ रु. १९५९–फायदा करणा- आले. याचा अर्थ १९५९–६० सालीं प्रत्येकाच्या वाट्यास १०–६ रु. क..वर्षें लोटलीं ही प्रगति नसून पुच्छगतिच आहे. मराठवाड्यांत जास्तीत जास्त ग्रँट बळवंत आहे कीं, वाचनालय, औरंगाबाद यास मिळत असून ती रक्कम रु. ५६५ आहे. उलट ...त, परंतु कमी ग्रँट मिळणारें ग्रंथालय महिला वाचनालय, बीड हें असून त्यास १२ रुपये म. कुजतें मिळते.

पूर्वीच्या मुंबई राज्यांतील जिल्हा वाचनालयांना मिळणाऱ्या ग्रँटशीं सदरहू ग्रँटची तुलना केल्यास ती फारच उद्बोधक ठरेल. मुंबई राज्यांतील जिल्हा वाचनालयास ६००० रुपये ग्रँट म्हणून प्रत्येक वर्षीं मिळते. याचा अर्थ असा कीं, मराठवाड्यांतील सर्व म्हणजे ४८ ग्रंथालयांना जी मदत एका वर्षांत मिळते, जवळजवळ तेवढीच मदत एकट्या जिल्हा वाचनालयास मुंबई राज्यांत मिळते. ही स्थिती किती शोचनीय आहे याचें जास्त वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं.

मराठवाड्यांत आज एकूण ७१ ग्रंथालयें आहेत. (यादी परिशिष्टांत आहे.) यांपैकीं ४८ ग्रंथालयांस आज सरकारी मदत मिळते, तर २३ ग्रंथालयें हीं मदत न मिळणारीं आहेत. यांपैकीं जवळजवळ ३२ ग्रंथालयें हीं १९५७–५८ नंतर स्थापन झालेलीं आहेत. याचा अर्थ शेंकडा ५१. ६ टक्के ग्रंथालयें हीं नुकतीच स्थापन झालेलीं असून त्यांतील ग्रंथाची संख्या २०० च्या वर नाहीं.

लोकसंख्येचा विचार केला तर औरंगाबाद जिल्ह्यांत ३९३,१३४ लोकांस एक ग्रंथालय पडतें. बीड जिल्ह्यांत हेंच प्रमाण ९१,७८२ लोकांस एक आहे. नांदेड जिल्ह्यांत ८६,३५७ लोकांस एक आहे. उस्मानाबाद जिल्ह्यांत ४४,८५९ लोकांस एक आहे. तर परभणी जिल्ह्यांत १४४,४०९ लोकांस एक वाचनालय आहे. सर्वांत पुढारलेला समजला जाणारा औरंगाबाद जिल्हा तर या बाबतींत अत्यंत मागासलेला आहे.

मराठवाड्यांतील ग्रंथालयांची परिस्थिती समजून घेण्यासाठीं मराठवाडा ग्रंथालय संघानें एक प्रश्नपत्रिका तयार केली होती. सदरहू पत्रिकेचीं उत्तरें कांहीं ग्रंथालयांकडून आलीं आहेत. त्यांची माहिती खालील तक्त्यांत दिली आहे.

| नांव | स्थापना | ग्रंथालयाचें आकारमान | उत्पन्न ग्रॅन्ट, वर्गणी, देणगी वगैरे रु. न. पै. | पुस्तक-संख्या | पुस्तिका | नियत-कालिकें |
|---|---|---|---|---|---|---|
| माहित्य निके- नगाई वर्ष | १-८-१९४५ | ४०′×२०′ | ४५०-०० | १८८५ | १२५ | २५ |
| १९५७–८र, | १९४५ | ३०′×१२′ | ६४९-१० | २५३६ | १०० | ३१ |
| १९५८– १९५९ कत लय, गांव | १९५९ | २४′×९′ | ३५०-०० | ४५० | – | १५ |
| ाव वाच- ालय, पाटोदा | ४-३-१९५० | २०′×१५′ | १२३-०० | ६१४ | – | ५ |

| नांव | स्थापना | ग्रंथालयाचें आकारमानदे | उत्पन्न ग्रॅन्ट, वर्गणी, णगी वगैरे रु. नये पैसे | पुस्तक संख्या | सभासद | नियत कालिकें |
|---|---|---|---|---|---|---|
| महिला वाचनालय, बीड | १९५७ | – | २४-०० | १२५ | – | १-६ |
| सार्वजनिक वाचनालय, समरोळी. | १-४-१९५५ | ३३′ × ३५′ | ६२०-०० | १०९० | ५१० | ४३ |
| विश्वनाथ वाचनालय, नदीहतरगा. | २८-११-५७ | ७½′ × ८½′ | २७६-५० | ११९ | – | ५ |
| श्रीराम जनता वाचनालय, गोवर्धन | २१-१०-५८ | १५′ × १०′ | ९५१-०० | २४७ | – | ३ |
| शालेय फिरतें वाचनालय, कळंब | १९-८-५६ | – | १००-०० | १०५० | – | – |
| विवेक वाचनालय, शेपाची वाडी, ता. मोमीनाबाद, जि. बीड. | २५-४-५८ | – | १०-०० | १३२ | – | – |

वरील सर्व ग्रंथालयें हीं वर्गणी–ग्रंथालयें आहेत. यांना सार्वजनिक ग्रंथालयें Public Libraries म्हणतां येणार नाहीं. कोणाहि नागरिकास ज्या ग्रंथालयांतून वर्गणी न भरतां ग्रंथ घरी अभ्यासासाठीं न्यावयाची मुभा असते त्यास Public Library म्हणतात.

अशा प्रकारचीं सार्वजनिक वाचनालयें स्थापन व्हावींत असा कायदा करणारांचा हेतु होता. परंतु असें एकहि ग्रंथालय कायदा पास होऊन पांच वर्षें लोटलीं असतील तरीहि अद्याप नाहीं. त्याचप्रमाणें विशेष आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, सदरहू कायद्याखालीं आजपर्यंत एकूण ५०,००० रुपये जमा झालेले आहेत, परंतु त्यांतील एक नवा पैसादेखील ग्रंथालयावर खर्च झाला नसून सर्व रक्कम कुजतें आहे.

## मराठवाड्यांतील ग्रंथालय-संघाची स्थापना

वरील सर्व परिस्थिती नाहींशी होऊन खेडोपाडीं ग्रंथालयांचें जाळें निर्माण व्हावें व ग्रंथालयें खऱ्याखुऱ्या अर्थानें मुक्तद्वार व्हावींत यासाठीं प्रयत्न करावयाच्या प्रमुख हेतुनें मराठवाडा ग्रंथालय संघाची स्थापना १९५९ सालीं करण्यांत आली. सदरहू संघ रजिस्टर झालेला असून त्यास सरकारी मान्यता मिळविण्यांत यश आलें आहे. यॆवढेंच नव्हें तर स्थापना झाल्यापासून एक वर्षांचे आंतच सदरहू संघातर्फें औरंगाबाद येथें ग्रंथपालन वर्ग चालविण्यांत आला.

ग्रंथालय कायद्याची अंमलबजावणी व्हावी व मराठवाड्यांतील परिस्थिती सरकारला कळावी म्हणून एक निवेदन सरकारकडे संघानें पाठविलें आहे. लवकरच एक ग्रंथालय परिषद बोलविण्याचा संघाचा विचार आहे.

नव्या महाराष्ट्र राज्यांत सिन्हा कमिटीनें सुचविल्याप्रमाणें ग्रंथालय कायदा करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. कमीतकमी मराठवाड्यांत आधीच लागू असलेल्या कायद्याची तरी अंमलबजावणी नीट व ताबडतोब करण्याकडे महाराष्ट्र सरकार लक्ष देईल अशी आशा आहे व तसा संघाचा प्रयत्नहि आहे. ग्रंथालयें हें शिक्षणाचें एक महत्त्वाचें साधन आहे व त्यांकडे दुर्लक्ष होणार नाहीं अशी महाराष्ट्र सरकारकडून अपेक्षा केल्यास ती गैरवाजवी होणार नाहीं.

## मराठवाड्यांतील ग्रंथालयें

१ : बलवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा, औरंगाबाद.
२ : दिगंबर वाचनालय, औरंगाबाद.
३ : हिंदी प्रचार सभा वाचनालय, किराणा चावडी, औरंगाबाद.
४ : सर्वोदय स्वाध्याय मंडळ, खाराकुआ, औरंगाबाद.
५ : नगरपालिका वाचनालय, औरंगाबाद.
६ : एस्. व्ही. शेलगांवकर, वाचनालय, रंगार खिडकी, जालना, जिल्हा औरंगाबाद.
७ : चिटणीस, आदर्श मोफत वाचनालय, गोलटगांव. जिल्हा औरंगाबाद.

## इतर कांही ग्रंथालयें

८ : सरस्वती भुवन ग्रंथालय, औरंगाबाद.
९ : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, औरंगाबाद.
१० : मिलिंद महाविद्यालय, वाचनालय, औरंगाबाद.

११ : मिलिंद विद्यालय वाचनालय, छावणी, औरंगाबाद.
१२ : ज्ञानविज्ञानकुल ग्रंथालय, औरंगाबाद.
१३ : पुराणवस्तु संशोधन खात्याचें ग्रंथालय, नं. ९, कॅन्टोनमेंट, औरंगाबाद.
१४ : मेडिकल कॉलेज ग्रंथालय, औरंगाबाद.
१५ : लॉ कॉलेज ग्रंथालय, औरंगाबाद.
१६ : मराठवाडा विद्यापीठ ग्रंथालय, औरंगाबाद.
१७ : विचार विकास मंदिर, सराफा, नांदेड, जि. नांदेड.
१८ : आर्यकुमार वाचनालय, हदगांव, जिल्हा नांदेड.
१९ : अंजुमान–ओ–तरक्की, उर्दू वाचनालय, देगलूर, जिल्हा नांदेड.
२० : सार्वजनिक वाचनालय, देगलूर, जिल्हा नांदेड.
२१ : विचार विकास मंदिर, कंधार, जिल्हा नांदेड.
२२ : विठ्ठलेश्वर वाचनालय, लोहा, जिल्हा नांदेड.
२३ : ज्ञानविकास मंदिर, कार्ला, जिल्हा, नांदेड.
२४ : प्रज्ञाविकास वाचनालय, मुखेड, जिल्हा नांदेड.
२५ : विवेक वाजनालय, उमरी , तालुका भोकर, जिल्हा नांदेड.
२६ : सार्वजनिक वाचनालय, सागरोळी, तालुका बिलोली, जि. नांदेड.
२७ : पानसरे वाचनालय, धर्माबाद, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.
२८ : हनुमान वाचनालय, वरद, जिल्हा नांदेड.
२९ : माधव वाचनालय, मुखेड, जिल्हा नांदेड.
३० : एस्. आर. गाडगीळ, सर्वोदय स्वाध्याय मंडळ, पीपल्स कॉलेज, नांदेड, जिल्हा नांदेड.
३१ : गणेश वाचनालय, परभणी.
३२ : वासुदेवानंद वाचनालय, कळमनुरी, जिल्हा परभणी.
३३ : साहित्य मंदिर वाचनालय, हिंगोली, जिल्हा परभणी.
३४ : सार्वजनिक वाचनालय, वसमत, जिल्हा परभणी.
३५ : गांधी वाचनालय, गंगाखेड, जि. परभणी.
३६ : फ्रेंडस् लायब्ररी, जिल्हा परभणी.
३७ : पीपल्स् लायब्ररी, परभणी.
३८ : गोकुळेश्वर वाचनालय, चारठाणा, ता. जितूर, जिल्हा परभणी.
३९ : चंबीकर, सर्वोदय स्वाध्याय मंडळ, नानलनगर, वाचनालय, ता. जितूर, जि. परभणी
४० : श्री. पी. वाय्. तरफदार, सर्वोदय स्वाध्याय मंडळ, नूतन विद्यालय हायस्कूल, सेलू, जि. परभणी

४१ : सुभाष वाचनालय, जेंबाली, उमरगा, जि. उस्मानाबाद.
४२ : लोक वाचनालय, लोहारा, जि. उस्मानाबाद.
अेकूण लोकसंख्या ३,२०,०३,०८६ आहे. लोकसंख्येची घनता दर चौरस मैलास २७१ आहे. शेतकरी वर्ग हा अेकूण लोकसंख्येचा बराच मोठा भाग म्हणजे ६४·०६ टक्के आहे. अुपजीविकेनुसार लोकसंख्येची वांटणी पुढीलप्रमाणें आहे :– संपूर्णपणें अथवा अंशत: जमिनीचे मालक असणारे शेतकरी व त्यांच्यावर अवलंबून असणारे (३९·५८ टक्के), संपूर्ण अथवा अंशत: जमिनीचे मालक नसलेले शेतकरी व त्यांच्यावर अवलंबून असलेले (७·६७ टक्के), शेतमजूर व त्यांच्यावर अवलंबून असलेले (१४·७० टक्के), स्वत: शेती न करणारे जमीन मालक (२२·८ टक्के), अुत्पादन (शेतीशिवाय अन्य करणारे) (१३·०७ टक्के), व्यापार (६·९७ टक्के), वाहतूक (२·२४ टक्के) आणि इतर उद्योगधंदे (१३·६६ टक्के).

**लोकसंख्येची वर्गवारी :–** लोकसंख्येच्या वर्गवारीवरून असें दिसून येतें कीं, महाराष्ट्रांत निरनिराळ्या धर्मांचे व पंथांचे लोक राहतात. त्यांमध्यें हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी, जैन, बौद्ध, शीख, लिंगायत आदी धर्मपंथांच्या लोकांचा समावेश होतो. संख्यामानानें पाहतां हिंदू व मुस्लीम या महाराष्ट्रांतील दोन प्रमुख जमाती असून अितर जमाती कांहीं विशिष्ट भागांत केंद्रित झालेल्या आहेत.

## महाराष्ट्र–जिल्हा व तालुकावार लोकसंख्या

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| **१ बृहन्मुंबई आणि मुंबई, उपनगरें.** | १ अंधेरी. | ५,१०,२५० |
| क्षेत्र.– १८९ चौ. मै. | २ बोरिवली | १,५६,९९७ |
| लोकसंख्या :– २९,९६,२६७. | | |
| मुख्य ठाणें–मुंबअी. | | |
| **२ ठाणें** | १ ठाणें. | १,१७,०७८ |
| क्षेत्र.–३,८१७ चौ. मैल. | २ कल्याण | २,७३,२६१ |
| लोकसंख्या– | ३ मुरबाड. | ६९,५६३ |
| १३,६१,०५३ | ४ भिवंडी. | १,१३,६३२ |
| मुख्य ठाणें–ठाणें. | ५ वसअी. | १,३३,५२३ |
| | ६ वाडा. | ५५,१८४ |
| | ७ शहापूर. | ९९,०१९ |
| | ८ डहाणू. | १,३१,२८७ |
| | ९ पालघर. | १,४८,५०४ |
| | १० अुंबरघर. | १,१३,४६२ |
| | ११ जव्हार. | ६७,४०० |
| | १२ मोरवाडा. | ३९,१४० |
| **३ अहमदनगर** | १ नगर | २,०६,१५३ |
| क्षेत्र.–६,६०२ चौ. मैल | २ पारनेर. | १,०६,०७८ |
| लोकसंख्या– | ३ श्रीगोंदे. | ९५,००० |
| १४,१०,८७३. | ४ कर्जत. | ७४,६५३ |
| मुख्य ठाणें–अहमदनगर | ५ जामखेड. | ५९,३९७ |
| | ६ शेवगांव. | ८८,०९६ |
| | ७ पाथर्डी | ९७,५७५ |
| | ८ नेवासा. | ९२,०३७ |
| | ९ राहुरी | ८,८३,६०० |
| | १० संगमनेर. | १,२९,३३१ |
| | ११ अकोला. | ९६,०७४ |
| | १२ कोपरगांव. | १,४२,८५८ |
| | १३ श्रीरामपूर. | १,३५,२५४ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| **४ पूर्व खानदेश** | १ जळगांव. | १,६४,५३२ |
| क्षेत्र.–४,५३५ चौ. मैल. | २ भुसावळ. | १,४९,०५५ |
| लोकसंख्या– | ३ यावल. | १,५५,१९१ |
| १४,७१,३५१. | ४ रावेर. | १,१७,६७४ |
| मुख्य ठाणें–जळगांव. | ५ अेदलाबाद. | ४५,७६६ |
| | ६ अंमळनेर. | १,४४,६७२ |
| | ७ चोपडा. | १,०८,२९१ |
| | ८ अेरंडोल. | १,२७,२६२ |
| | ९ पाटोळे. | ६८,०७७ |
| | १० चाळीसगांव. | १,४६,४४४ |
| | ११ जामनेर. | १,२२,९९९ |
| | १२ पाचोरे. | १,०५,५१८ |
| | १३ माडगांव. | ५६,२३० |
| **५ पश्चिम खानदेश** | १ धुळें. | २,३०,६०९ |
| क्षेत्र.–५,३९१ चौ. मैल. | २ साक्री. | १,३१,५१० |
| लोकसंख्या– | ३ सिंदखेडा. | १,४४,४६९ |
| ११,४६,०२४. | ४ शिरपूर. | १,००,३४७ |
| मुख्य ठाणें–धुळें | ५ शहादा. | १,३४,५५२ |
| | ६ नंदूरबार | १,४६,४१३ |
| | ७ नवापूर. | ९९,३६० |
| | ८ तळोदे. | ७९,६८६ |
| | ९ अक्कलकुवा. | ५८,५६१ |
| | १० अक्राणी (महाल) | २२,५१७ |
| **६ नासिक** | १ नाशिक. | २,५४,०७६ |
| क्षेत्र.–६,०३५ चौ. मैल. | २ निफाड. | १,२४,७२७ |
| लोकसंख्या– | ३ सिन्नर. | १,०७,२६७ |
| १४,२९,९१६ | ४ येवलें. | ८८,३७९ |
| मुख्य ठाणें–नाशिक. | ५ चांदोर. | ७५,७९८ |
| | ६ नांदगांव. | ९५,१३३ |
| | ७ मालेगांव. | २,१०,३४७ |
| | ८ बागलाण. | १,१९,९७९ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| | ९ अिगतपुरी. | ९६,१६२ |
| | १० दिंडोरी. | ८७,४०५ |
| | ११ सुरगणा. | ४३,८१५ |
| | १२ पेठ (महाल). | ५१,८१५ |
| | १३ कळवण. | ७५,००५ |
| **७ पुणें** | १ पुणें शहर. | ५,९४,०८३ |
| क्षेत्र.–६,०२८ चौ. मैल. | २ हवेली. | १,८०,६५३ |
| लोकसंख्या– | ३ मुळशी. | ६८,८८४ |
| १९,५०,९७६ | ४ भोर. | ७३,७११ |
| मुख्य ठाणें–पुणें शहर | ५ मावळ. | ९८,३०६ |
| | ६ बेल्हे (महाल). | २७,३९१ |
| | ७ जुन्नर. | १,४०,२८७ |
| | ८ खेड. | १,२६,४५७ |
| | ९ आंबेगांव. | ९८,८८० |
| | १० शिरूर. | १,०३,१०८ |
| | ११ बारामती. | १,३४,२७१ |
| | १२ अिंदापूर. | १,१२,३०४ |
| | १३ दोंड. | ८९,१६२ |
| | १४ पुरंदर. | १,०३,३९९ |
| **८ अुत्तर सातारा** | १ सातारा. | १,६२,५२९ |
| क्षेत्र.–४,०३४ चौ. मैल. | २ जावळी. | ७१,०८६ |
| लोकसंख्या– | ३ पाटण | १,४६,६९१ |
| ११,७५,३०९ | ४ कऱ्हाड. | २,०७,९१३ |
| मुख्य ठाणें–सातारा. | ५ कोरेगांव. | १,१५,६८९ |
| | ६ खटाव. | १,३१,३६० |
| | ७ माण. | ८३,४७८ |
| | ८ फलटण. | ९९,७८१ |
| | ९ खंडाळा. | ४८,०९५ |
| | १० वाअी. | ८८,२३९ |
| | ११ महाबळेश्वर. (महाल) | २०,४४८ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| **९ सोलापूर** | १ उत्तर सोलापूर | ३,२५,६३२ |
| क्षेत्र–६,५८२ चौ. मैल. | २ दक्षिण सोलापूर | ९३,५०३ |
| लोकसंख्या– | ३ बार्शी. | १,८६,७७७ |
| १५,०५,३१६ | ४ अक्कलकोट. | १,४९,६४७ |
| मुख्य ठाणें–सोलापूर. | ५ मोहोळ. | १,०२,११४ |
| | ६ मोढें. | १,२२,१७४ |
| | ७ करमाळें. | १,००,०८९ |
| | ८ पंढरपूर. | १,२८,५५२ |
| | ९ सांगोला. | १,०३,९९० |
| | १० माळशिरस. | १,२२,८३० |
| | ११ मंगळवेढा. | ७०,००८ |
| **१० कुलाबा** | १ अलीबाग. | १,०५,४५५ |
| क्षेत्र.–७,२१५. | २ पनवेल. | ९१,३८६ |
| लोकसंख्या– | ३ कर्जत | ७०,१७२ |
| ९,०९,०८३ | ४ माथेरान. | २८,०८ |
| मुख्य ठाणें–अलीबाग. | (कर्जत तालुक्यांत समाविष्ट करण्यांत आलें.) | |
| | ५ खालापूर. | ४१,६०१ |
| | ६ उरण. | ४७,३२२ |
| | ७ सुधागड | ३३,०६६ |
| | ८ पेण | ६९,६६५ |
| | ९ महाड. | ९२,४३९ |
| | १० माणगांव. | १,०७,६३३ |
| | ११ रोहा. | ७०,५०२ |
| | १२ पोलादपूर. | ५१,७४२ |
| | १३ मुरुड | ३९,९६८ |
| | १४ श्रीवर्धन | ५०,५८५ |
| | १५ म्हसाळा. | ३७,२४७ |
| **११ रत्नागिरी** | १ मंडणगड. | ४८,९५६ |
| क्षेत्र.–५०२१. | २ दापोली. | १,२९,१०५ |
| लोकसंख्या– | ३ खेड. | १,२४,८६१ |
| १७,११,९६४ | ४ चिपळूण | १,५३,१०२ |
| मुख्य ठाणें–रत्नागिरी. | | |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| | ९ अिगतपुरी. | ९६,१६२ |
| | १० दिंडोरी. | ८७,४०५ |
| | ११ सुरगणा. | ४३,८१५ |
| | १२ पेठ (महाल). | ५१,८१५ |
| | १३ कळवण. | ७५,००५ |
| **७ पुणें** | १ पुणें शहर. | ५,९४,०८३ |
| क्षेत्र.–६,०२८ चौ. मैल. | २ हवेली. | १,८०,६५३ |
| लोकसंख्या– | ३ मुळशी. | ६८,८८४ |
| १९,५०,९७६ | ४ भोर. | ७३,७११ |
| मुख्य ठाणें–पुणें शहर | ५ मावळ. | ९८,३०६ |
| | ६ बेल्हे (महाल) | २७,३९१ |
| | ७ जुन्नर. | १,४०,२८७ |
| | ८ खेड. | १,२६,४५७ |
| | ९ आंबेगांव. | ९८,८८० |
| | १० शिरूर. | १,०३,१०८ |
| | ११ बारामती. | १,३४,२७१ |
| | १२ अिंदापूर. | १,१२,३०४ |
| | १३ दौंड. | ८९,१६२ |
| | १४ पुरंदर. | १,०३,३९९ |
| **८ अुत्तर सातारा** | १ सातारा. | १,६२,५२९ |
| क्षेत्र.–४,०३४ चौ. मैल. | २ जावळी. | ७१,०८६ |
| लोकसंख्या– | ३ पाटण | १,४६,६९१ |
| ११,७५,३०९ | ४ कऱ्हाड. | २,०७,९१३ |
| मुख्य ठाणें–सातारा. | ५ कोरेगांव. | १,१५,६८९ |
| | ६ खटाव. | १,३१,३६० |
| | ७ माण. | ८३,४७८ |
| | ८ फलटण. | ९९,७८१ |
| | ९ खंडाळा. | ४८,०९५ |
| | १० वाअी. | ८८,२३९ |
| | ११ महाबळेश्वर. (महाल) | २०,४४८ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| | ५ गुहागर. | ८७,८८६ |
| | ६ संगमेश्वर. | १,४८,३३१ |
| | ७ रत्नागिरी. | १,५९,३७७ |
| | ८ राजापूर. | १,४६,५४१ |
| | ९ देवगड. | ९७,९१८ |
| | १० लांजा. | ७७,९२१ |
| | ११ मालवण | १,२९,८१४ |
| | १२ सावंतवाडी | १,२४,२९१ |
| | १३ वेंगुर्ले. | ७९,२१५ |
| | १४ कुडाळ. | १,०१,५४५ |
| | १५ कणकवली. | १,०३,१०१ |
| **१२ दक्षिण सातारा** | १ मिरज. | २,८५,६१६ |
| क्षेत्र.–३४,३४ चौ. मैल. | २ जत. | १,०८,२७० |
| लोकसंख्या– | ३ खानापूर. | १,८३,४४१ |
| १०,००,१०१. | ४ वाळवें. | १,७४,०७३ |
| मुख्य ठाणें–सांगली. | ५ तासगांव. | १,६९,३२५ |
| | ६ शिराळा (महाल) | ७९,४१६ |
| **१३ कोल्हापूर** | १ करवीर. | २,६६,२९९ |
| क्षेत्र.–३१,५० चौ. मैल | २ हातकणंगलें. | १,६९,७०० |
| लोकसंख्या | ३ शिरोळ. | १,२१,१९२ |
| १३,०८,०६०. | ४ शाहुवाडी. | ८६,७६५ |
| मुख्य ठाणें–कोल्हापूर. | ५ पन्हाळा. (महाल). | ९६,३७९ |
| | ६ बावडा (महाल) | ५२,९२२ |
| | ७ कागल. | १,१०,७३४ |
| | ८ गडहिंग्लज. | १,११,३९७ |
| | ९ भुदरगड. | ६५,९२९ |
| | १० राधानगरी. | ८७,२०५ |
| | ११ आजरा (महाल) | ५९,०२५ |
| | १२ चंदगड. | ८०,५१३ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| **१४ चांदा** | १ चांदा. | २,४७,०४२ |
| क्षेत्र.–९२,२३ चौ. मैल | २ वरोरा. | २,१०,१२८ |
| लोकसंख्या– | ३ गढचिरोली. | २,३१,२३६ |
| ९,७०,६१८. | ४ ब्रम्हपुरी. | १,९५,४८६ |
| मुख्य ठाणें–चांदा. | ५ सिरोंचा. | ९३,७२६ |
| **१५ भंडारा** | १ भंडारा. | ३,४१,३१३ |
| क्षेत्र.–३५,८० चौ. मैल. | २ गोंदिया. | ४,३१,९७० |
| लोकसंख्या– | ३ साकोली. | २,९८,३६९ |
| १०,७,१६५७. | | |
| मुख्य ठाणें–भंडारा. | | |
| **१६ नागपूर** | १ नागपूर. | ६,४६,०९० |
| क्षेत्र.–३८,४२ चौ. मैल. | २ रामटेक. | १,४३,९५८ |
| लोकसंख्या– | ३ कोटाल. | १,४८,३१५ |
| १२,३४,५५६. | ४ सावनेर. | १,३४,९२२ |
| मुख्य ठाणें–नागपूर. | ५ अुमरेड. | १,५८,२७१ |
| **१७ अकोला** | १ वाशिम. | २,०३,७८६. |
| क्षेत्र.–४०,९३ चौ. मैल. | २ अकोट. | १,४७,००४ |
| लोकसंख्या– | ३ बाळापूर. | १,१९,०७९ |
| ९,५०,९९४. | ४ अकोला. | २,९८,८५६ |
| मुख्य ठाणें–अकोला. | ५ मंगरूळपीर. | १,१०,०३६ |
| | ६ मूर्तिजापूर. | १,४४,२३३ |
| **१८ बुलढाणा** | १ जळगांव. | ९१,५४७ |
| क्षेत्र.–३७,६० चौ. मैल. | २ चिखली. | २,०४,५७२ |
| लोकसंख्या– | ३ मेहकर. | १,९४,१६४ |
| ८,७०,१६८. | ४ खामगांव. | १,७३,७३२ |
| मुख्य ठाणें–बुलढाणा. | ५ मलकापूर. | २,०६,१५३ |
| **१९ यवतमाळ** | १ यवतमाळ. | १,७७,४५७ |
| क्षेत्र.–५२,३८ चौ. मैल. | २ दारव्हा | २,११,१५१ |
| लोकसंख्या– | ३ पुसद. | २,२१,५७७ |
| ९,३१,९८२. | ४ वणी. | १,५४,९६९ |
| मुख्य ठाणें–यवतमाळ. | ५ केळापूर. | १,६६,७२० |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
| --- | --- | --- |
| **२० अमरावती** | १ मेळघाट. | ५२,३५६ |
| क्षेत्र.–४१,७५ चौ. मैल. | २ अमरावती. | ३,१५,४१० |
| लोकसंख्या– | ३ चांदूर. | १,७८,३२९ |
| १०,३१,१६०. | ४ मोर्शी. | १,६०,८६३ |
| मुख्य ठाणें–अमरावती. | ५ दर्यापूर. | १,४५,८९० |
| | ६ अचलपूर. | १,७८,१३२ |
| **२१ वर्धा** | १ आर्वी. | १,४४,३९० |
| क्षेत्र.–२४,२९ चौ. मैल. | २ वर्धा. | २,५०,८५५ |
| लोकसंख्या– | ३ हिंगणघाट. | १,४३,६५८ |
| ५३,८०९. | | |
| मुख्य ठाणें–वर्धा. | | |
| **२२ औरंगाबाद** | १ औरंगाबाद. | १,६५,०८० |
| क्षेत्र.–६३,१८ चौ. मैल. | २ पैठण. | ९६,९२१ |
| लोकसंख्या– | ३ गंगापूर. | ८५,७८४ |
| ११,७९,४०४. | ४ वैजापूर. | १,०४,८२५ |
| मुख्य ठाणें–औरंगाबाद. | ५ कन्नड. | ९५,५९८ |
| | ६ खुलदाबाद. | ३३,२४७ |
| | ७ सिल्लोड. | १,०६,७५८ |
| | ८ भोकरदन. | ८६,३३३ |
| | ९ जाफराबाद. | ४५,६५८ |
| | १० जालना. | १,८१,३१६ |
| | ११ अंबड. | १,५४,२१६ |
| | १२ सोयेगांव (महाल). | २२,६४१ |
| **२३ परभणी** | १ परभणी. | १,५०,०२३ |
| क्षेत्र.–४८,५५ चौ. मैल. | २ गंगाखेड. | १,४५,६८४ |
| लोकसंख्या– | ३ पार्थी. | १,४२,२७२ |
| १०,१०,८६४. | ४ परतूड. | १,०७,३८७ |
| मुख्य ठाणें–परभणी. | ५ जिंतूर. | १,०८,४९७ |
| | ६ कळमवसी. | १,०८,८३९ |
| | ७ हिंगोली. | १,२७,२७९ |
| | ८ वसमत. | १,२०,८८३ |

| जिल्हा | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| **२४ नांदेड** | १ नांदेड. | १,६३,१९८ |
| क्षेत्र.–४७,२६ चौ. मैल. | २ बिलोली. | १,१६,८९१ |
| लोकसंख्या– ९,५८,८८८. | ३ मुखेड. | ८२,०८६ |
| मुख्य ठाणें–नांदेड. | ४ कंधार. | १,४५,०७८ |
| | ५ हदगांव. | १,०८,६४३ |
| | ६ भोकर. | ७२,७८० |
| | ७ धर्माबाद (मुधोड तालुक्याचें सर्कल). | ३४,३९८ |
| | ८ देगलूर आणि मुखेड. | ७२,२४७ |
| | ९ किनवट. | ७३,११८ |
| | १० राजूरा. | ७५,३५७ |
| | ११ अिस्लापूर. | १५,०९२ |
| **२५ बीड** | १ बीड. | १,३०,३८० |
| क्षेत्र.–४२,७८ चौ. मैल. | २ पाटोदा. | ८३,५२६ |
| लोकसंख्या– ८,२६,०४६. | ३ अष्टी. | ८६,२२२ |
| | ४ गेवराअी. | १,१३,७९४ |
| मुख्य ठाणें–बीड. | ५ माजलगांव. | १,१७,०२० |
| | ६ मोमिनाबाद. | १,६५,१७४ |
| | ७ केज. | १,२९,९२० |
| **२६ अुस्मानाबाद** | १ अुस्मानाबाद. | १,१५,६५४ |
| क्षेत्र.–५४,७७ चौ. मैल. | २ तुळजापूर. | १,०३,३९० |
| लोकसंख्या– १२,१०,०४१. | ३ परंडा. | ७१,५२९ |
| | ४ भूम. | ५९,६१९ |
| मुख्य ठाणें–अुस्मानाबाद. | ५ कळंब. | १,०५,८६९ |
| | ६ लातूर. | १,१९,९२१ |
| | ७ औसा. | ९८,०८७ |
| | ८ अुपगी. | १,३४,२८३ |
| | ९ अहमदपूर. | १,३३,८४६ |
| | १० निलंगा. | १,२२,८३५ |
| | ११ अुदगीर. | १,३५,९०८ |

वर नमूद केलेली लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीनुसार आहे. साक्षरतेचें प्रमाण २१ टक्के पडतें.

## महाराष्ट्रांतील डोंगर

महाराष्ट्रांत सातपुडा आणि सह्याद्रि हे दोन प्रधान पर्वत आहेत.

**सातपुडा पर्वत :–** महाराष्ट्राच्या माथ्यावर असून सातपुड्याशीं समांतर अशा नाशिक जिल्ह्यांत सातमाळा व पूर्व खानदेशच्या दक्षिणेस अजिंठा डोंगर यांच्या रांगा आहेत. सातपुड्याची अुंची सर्व साधारण २५०० फूट आहे. कांहीं फाटे ४५०० फुटां-पर्यंत अुंच आहेत (अुदा. पंचमढी). खानदेश आणि विदर्भ यांतून सातपुड्याचे फाटे आढळतील. अजिंठा फाटा परिचित आहेच. अितर फाटे खालील जिल्ह्यांमध्यें पस-रलेले आहेत. १ अकोला–गाविलगड. २ अमरावती–जिवगड, गाविलगड, पोहरा, चिरोडी, चंद्राजीबाबा, जामण. ३ नागपूर–रामटेकडी, रामडोंगरी, कोथुळ, पिलका-पार, गरमसूर, महादागड, पीपरडोल, जामगड, चोपगडी, सीताबर्डी. ४ वर्धा–नाचनगांव, बहिराम बोवा, तिगांव, गरमपूर, रावणदेव, नांदगांव, मालेगांव, ब्राह्मण-वाडा, पिंपळखुडा, हरणखुरी, गिरड, ५ भंडारा–गायमुख, अंबागड, चांदपूर, भीमसेन, कोको, गंगाझिरी, दरेकसा, गायखुरी, नवेगांव, प्रतापगड, चिचगड. ६ चांदा–मूळ, चिमूरगड, पेरजागड, सातनाला, टिपरागड, सूरजागड, भामरागड, चिकीयाला, सिरकोंडा.

**सह्याद्रि पर्वत :–** सह्याद्री हा महाराष्ट्राचा कणा होय. हा पर्वत व याचें प्रसिद्ध पठार ज्वालामुखीच्या अुद्रेकांपासून तयार झाले आहेत. याच्यामुळें महाराष्ट्राची देश आणि आणि कोंकण अशी विभागणी झाली. सह्याद्रींतून फक्त महाराष्ट्रालाच नव्हे तर दक्षिण भारताला पोषक अशा नद्या अुगम पावल्या आहेत. कळसूबाअी हें महाराष्ट्रां-तील अत्युच्च (५४२७ फूट) शिखर आहे. सह्याद्रींतील असंख्य किल्ले आणि लेणीं महाराष्ट्राचा अितिहास सांगत असतात. महाराष्ट्राचें हवामान सह्याद्रीवर अवलंबून आहे. सातपुडा म्हणजे सह्याद्रीची अुत्तर शाखा आहे असें कांहींजण मानतात. या अुत्तर शाखेखेरीज, सातमाळ, बालाघाट, महादेव या मुख्य शाखा आहेत. जिल्ह्यांतून पसरलेले सह्याद्रीचे फाटे पुढील यादीवरून दिसून येतील.

**खानदेश** :– सातपुडा, सातमाळ, हत्ती, चांदोर, अजंण, आटव, गाळणा. **नाशिक** :– डांग, सातमाळ, चांदोर, सेलबारी, दोलबारी. **ठाणें** :– महालक्ष्मी, गंभीरगड, कंवाड, असेरी, काळदुर्ग, तुंगार, कामनदुर्ग, माहारी, दावजा, माहुली. **पुणें** :– जीवधन, धाक, अहुप, जांभुळणी, कोअीरी, माजगांव, सालतार, ताम्हणी, भीमाशंकर, हडमर, कांडेश्वर, शिवनेरी. **सातारा** :– म्हस्कोबा, शंभू महादेव, वर्धनगड, भूषणगड, महिमानगड, मेरूलिंग, यवतेश्वर, परळी, मेडोशी. **कुलाबा** :– बोर, कमोळा, पारसिक. **रत्नागिरी** :– या जिल्ह्यामध्यें सह्याद्रीचे बरेच फाटे आहेत. सह्याद्रीचा मुख्य डोंगराळ भाग या जिल्ह्यामध्यें आहे. या जिल्ह्यामध्यें

बरेच किल्ले आहेत. **कोल्हापूर** :– जोतिबा, वागजाओी, तुमजाओी, साळपण, मावळगिरी. **अहमदनगर** :– कात्राबाओी, शिरकुंजा, वाळेश्वर, धुम्या, ब्राह्मणवाडा, नांदुर, स्वंदरमाळ, पारनेर, डोंगरगण, मांजरसुभा, गोरखनाथ, बालेघाटी वगैरे नांवें असलेले अनेक फाटे या जिल्ह्यामध्यें आहेत. **सोलापूर** :– सोळकी तुकाओीचा डोंगर सर्वात अुंच आहे. बालघाट व रामलिंग डोंगर बार्शी तालुक्यांत आहेत. **मराठवाडा** :– यांत सह्याद्रीचे फाटे आहेत. ते बालाघाट, अजंठा, वेरूळ, कन्नड, या नांवानें ओळखले जातात.

देश आणि कोंकण यांप्रमाणेंच घाटमाथा, मावळें, नेरें अशी सह्याद्रीमुळें महाराष्ट्राची नैसर्गिक विभागणी झाली आहे. कळसूबाओीच्या दक्षिणेकडील हरिश्चंद्र गडापासून फोंडा घाटापर्यंतचा पठाराचा प्रदेश तो घाटमाथा. याची लांबी सुमारें २०० मैल, रुंदी ५० मैल आहे. घाटमाथ्यालगत पूर्वेकडील अुतारावरील कांहीं नद्यांच्या खोऱ्यांना मावळें व नेरें अशी संज्ञा आहे.

बारा मावळें :– १ अंदर, २ नाणें, ३ पवन, ४ घोटण, ५ पौंड, ६ मोसे, ७ मुळे, ८ गुंजण, ९ वेळवंड, १० भोर, ११ शिवतर, १२ हिरडस.

बारा नेरें :– १ जुन्नेर, २ शिवनेर, ३ मोन्नेर, ४ घोडनेर, ५ भीमनेर, ६ भामनेर, ७ पारनेर, ८ संगमनेर, ९ जामनेर, १० पिंपळनेर, ११ अकोळनेर, १२ सिन्नेर.

सह्याद्रींतील घाट :– डोंगर ओलांडून जावयाच्या वाटेला घाट म्हणतात. देशावरून कोकणांत जावयाचें म्हणजे मध्यंतरी सह्याद्री लागतो. कुलाबा व ठाणें जिल्ह्यांची अेक सरहद्द सह्यपर्वतानेंच आंखली आहे. महाराष्ट्र हा तर दगडाधोंडयांचा देश असें गोविंदाग्रज म्हणतात. येथें तर अनेक घाट आहेत. पैकीं प्रमुख घाट पुढीलप्रमाणें :– १) पारघाट २) फिट्झजेरल्ड घाट ३) ढवळा आणि कामण घाट ४) वरंधा घाट ५) गोप्या घाट ६) आंबेतोळ घाट ७) मढचा घाट ८) शेवत्या घाट ९) कावळ्या घाट १०) कुंभ घाट ११) लिंग घाट १२) तिसणी घाट १३) ताम्हणे देवस्थळी व शिव घाट १४) पिंपरी घाट १५) आंबोली घाट १६) गोंदे घाट १७) शीर घाट १८) तळ घाट १९) चोंढे-मेढेघाट २०) साद्रे घाट २१) तिसणी घाट २२) माळसेज घाट २३) भोरांडें घाट २४) पलु घाट २५) कुटे घाट २६) गोवेली घाट २७) अवापे घाट २८) शिदगड घाट २९) भीमाशंकर घाट ३०) कसूर घाट ३१) राजमाची घाट ३२) नाणें घाट ३३) दिवे घाट ३४) बोर घाट ३५) साल्पे घाट ३६) म्हासी घाट ३७) कन्हेळ घाट. यांखेरीज अनेक डोंगरी रस्ते आहेत.

## महाराष्ट्रांतील नद्या

महाराष्ट्रांतील तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा या नद्या प्रमुख होत. या नद्यांची लांबी व त्यांना मिळणाऱ्या नद्या—अुपनद्या खालीलप्रमाणें :—

**तापी :—** नदीची लांबी सुमारें ३०० मैल आहे. तापीस मिळणाऱ्या नद्या :— गिरणा, बारी, पांझण, पूर्णा, सुकी, भाकर, मोर, हड्कांअी, गुळी, रत्नावती, अवेर, वाघूर, या व यांना मिळणाऱ्या अनेक अुपनद्या.

**गोदावरी :—** नदीची लांबी सुमारें १५० मैल आहे या नदीला मिळणाऱ्या नद्या:— प्रवरा, कादवा, दारणा, मुळा, शिव, दुधना, मांजरा व अन्य अुपनद्या.

**कृष्णा :—** नदीची लांबी सुमारें ३०० मैल आहे. या नदीस मिळणाऱ्या मोठ्या नद्या :— वेणा, कोयना, वेळा, वारणा, पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा, डोण, दुधगंगा व अन्य अुपनद्या.

**भीमा :—** नदीची लांबी सुमारे ३५० मैल आहे. या नदीस मिळणाऱ्या अन्य नद्या :— पुष्पा, कुकडी, मीना, घोड, वेळ, भामा, अिंद्रायणी, पवना, मुळामुठा, कऱ्हा, नीरा, माण, सीना व अन्य अुपनद्या.

यांखेरीज वैनगंगा, पांगोली, वाघ, गाढवी, चुलवा, वर्धा, वगा, खडकपूर्णा आदि नद्या प्रमुख आहेत.

## महाराष्ट्राचें हवामान

हवामानांत प्रामुख्यानें चार गोष्टींचा समावेश होतो. पर्जन्यमान, तपमान, थंडी आणि वारे यांच्यावरून हवामान ठरत असतें. महाराष्ट्राच्या हवामानास उष्ण कटिबंधांतील हवामानाच्या मर्यादा पडतात. तपमान हें सूर्यकिरणांवर अवलंबून असतें. महाराष्ट्रभर सूर्याचे किरण सरळपणानें पडत असल्यानें येथील हवामानास रेखीव स्वरूप आलें आहे. येथें नित्यक्रमानें पावसाळा, हिवाळा व उन्हाळा असे वर्षाचे तीन रेखीव भाग पडतात. तपमानाच्या कमाल व किमान मर्यादा याहि फार नाहींत. महाराष्ट्रांतील हवामानावर आणखी एक परिणामकारी घटक म्हणजे अरबी समुद्र होय. महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेस हा पसरला आहे आणि त्यामुळें या भागाच्या हवामानावर त्याचा फारच हितकारी परिणाम झाला आहे. समुद्राप्रमाणेंच दुसरा हितकारी घटक म्हणजे सह्याद्री हा होय. सातपुडा पर्वत, तापी व नर्मदा नदी यांच्यामुळें वाऱ्यांना वाहण्यास झालेला पश्चिम—पूर्व मोकळा भाग यांनींहि महाराष्ट्राच्या हवामानावर परिणाम केलेला आहे. सुरतेपासून नागपूरपर्यंत हा मार्ग सरळ आहे. या सरळ पट्ट्यास महाराष्ट्राच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीनें फारच महत्त्व आहे.

अरबी समुद्राच्या सान्निध्यामुळें तपमान फार वर जात नाहीं. जमिनीप्रमाणें समुद्र जलद तापत नसल्यानें जमीन तापून तेथील हवा थोडी गरम झाली कीं, त्या जागीं लगेच समुद्रांवरील गार हवा येते व हवेचें तपमान फिरून कमी होतें. अशाप्रकारें दिवस-भर चालतें. रात्रीं जमीन गार होते. समुद्र तितक्या लवकर गार होत नाहीं. त्यामुळें तेथील हवा सामान्यतः उबदार राहते. अशा प्रकारें समुद्राच्या सान्निध्यानें तपमानांत फारसा फरक पडत नाहीं. तपमान फार वरहि जात नाहीं, फार कमीहि होत नाहीं.

किनाऱ्यापासून जों जों जमिनीच्या आंतील बाजूस जावें तों तों तपमानामध्यें फरक पडत असल्याचें आपणांस दिसून येईल. दिवसा तपमान वाढत असतें, रात्रीं कमी होत असतें. त्याप्रमाणें समुद्रसपाटीपासून जों जों उंच जावें तों तों तपमान कमी कमी होत जातें.

महाराष्ट्रांतील हवामानावर अशा प्रकारें निरनिराळ्या परिस्थितीचा परि-णाम होऊन येथील हवामान समशीतोष्ण बनलें आहे. वाऱ्यांची दिशा ही समुद्र व जमीन यांच्यावरील तपमानानें ठरते व त्याबरोबरच पाऊस येतो. पावसाचा विचार करतांना वाऱ्याच्या दिशेचा विचार करणें अपरिहार्य आहे. महाराष्ट्रांतील पाऊस हा मुख्यतः ज्येष्ठ ते भाद्रपद (जून ते सप्टेंबर) या चार महिन्यांतच पडतो व तोहि मुख्यतः समुद्रावरून पूर्वेकडे जाणाऱ्या वाऱ्यामुळें पडतो. समुद्रावरील वाफेचे ढग वाऱ्याबरोबर वाहून येतात व तें सह्य पर्वतावर अडून पाऊस पडतो. सह्याद्री नसता तर हे ढग तसेच जोरांत पुढें गेले असते व महाराष्ट्र हा कदाचित् अरबस्तानसारखा प्रदेश बनला असता. महाराष्ट्रास केवळ सह्याद्रीच्या अस्तित्वामुळेंच एवढा विपुल पाऊस एवढ्या थोड्या (ज्येष्ठ–भाद्रपद) काळांत मिळतो. कांहीं भागांत आश्विनांतहि पाऊस पडतो. परंतु तो थोडा असतो. महाराष्ट्रांत पडणारा पाऊस हा मुख्यतः मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त या नक्षत्रांचाच असतो. चित्रा, स्वाति यांचा पाऊस क्वचित् असतो. मृग नक्षत्राच्या आधीं कधीं कधीं रोहिणी नक्ष-त्राचा पाऊस पडतो. त्याला 'वळवाचा पाऊस' म्हणतात. रोहिणीचा पाऊस पडून त्यावर पेरण्या झाल्या तर खरीपाचें पीक सहसा बुडत नाहीं. खरीपाच्या पिकाच्या दृष्टीनें रोहिणीच्या पेऱ्यास फारच महत्व आहे. हा पाऊस आकस्मिक रीतीनें येतो. याचा थेंब मोठा असून जोरानें व थोड्या वेळांत पडतो. याच्या उलट मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा या नक्षत्रांचें आहे. हा पाऊस जोरानें न येतां झिम् झिम् पडतो. याचा थेंब बारीक असतो. पावसाळी वातावरणामध्यें साहजिकच उष्णतामान फार नसतें. वारंवार पाऊस पडत असतो व हवेंतील उष्णतामान कमी कमी होत असतें. तसेच वारेहि गार वाहूं लागतात. हस्त व चित्रा नक्षत्राचे वेळीं हवेंत उष्णतामान थोड्या प्रमाणांत वाढतें. कमी तपमानाचा काळ महाशिवरात्रीपर्यंत असतो. हवेंत असलेला गारठा २–२॥ महिने असतो. वातावरणांतील आर्द्रतेमुळें महाराष्ट्रांत

रबीच्या पिकांना बरीच मदत होते. हवेंतील गारव्यामुळें दिवसा हवेंत असणाऱ्या वाफेचें रात्रीं पाणी होतें व तें जमिनीवर – पीकांवर पडतें. याचा कांहीं वेळां पिकांच्या वाढीस फारच उपयोग होतो. रबीच्या ज्वारीस व अितर पीकांना याचा विशेष उपयोग होतो. यासच आपण दहिंवर म्हणतो.

महाराष्ट्रभर वारे दोन दिशांनीं येतात. वैशाख ते भाद्रपदापर्यंत नैॠत्येकडून इशान्येकडे वाहणारे वारे येतात. या वाऱ्यांच्या अनुरोधानें पावसाळी ढग येऊन सह्याद्रीवर अडतात व त्यांचा पाऊस पडतो. यानंतर चार महिन्यांनीं वाऱ्यांची दिशा बदलते. जवळजवळ उलटी होते. पावसाळ्याच्या प्रारंभीं पश्चिमेकडून येणारे वारे पूर्वेकडून वाहूं लागतात. हे वारेहि थोडा फार पाऊस देशभागावर पाडतात. मोठमोठ्या वावटळी महाराष्ट्रांत नाहींत; देश भागांत कधी कधी जोराचे पावसाळी वारे वाहतात. परंतु एकंदर महाराष्ट्राचा विचार केल्यास वाऱ्यापासून महाराष्ट्रास फारसा उपद्रव होत नाहीं.

## महाराष्ट्रांतील शिक्षण

महाराष्ट्रांत शिक्षण संस्था या प्रत्यक्ष सरकारनें चालविलेल्या व खासगी संस्थांनीं सरकारी मदतीनें चालविलेल्या अशा दोन प्रकारच्या आहेत. माध्यमिक शिक्षण प्रामुख्यानें खासगी संस्थाच देत आहेत. प्राथमिक शिक्षण नगरपालिका व जिल्हा ' लोकल बोर्डच्या ' हातीं आहे. सरकार या संस्थांना कांहीं ठराविक प्रमाणांत आर्थिक साहाय्य देत असते. नुसती साक्षरता वाढविण्याखेरीज, मुलांत उत्साह आणि सेवावृत्ति निर्माण व्हावी, या दृष्टीनें सरकारनें एक शिक्षणक्रम आंखला. हा शिक्षणक्रम अंमलांत आणण्यासाठीं व तो शिक्षणक्रम शिकवतां येईल असे शिक्षक तयार करण्यासाठीं सरकारनें २७ केंद्रशाळा राज्यामध्यें उघडल्या. या शाळांमध्यें बहिःशाल कार्यं, सफाअी, सामुहिक जोवन, गटचर्चा आदि गोष्टींकडे लक्ष देण्यांत येत असतें. शाळा वाढत चालल्यानें त्यांना अिमारती अपुऱ्या पडूं लागणें साहजिकच आहे. पुरेशा अिमारती बांधण्यास सरकारजवळ व संस्थांजवळ पैसे नाहींत. म्हणून सकाळ-दुपार शाळा भरविण्याच्या सवलती सरकारला द्याव्या लागतात. दुय्यम शाळांतून सरकारी नियमांप्रमाणें घालून दिलेल्या श्रेणीप्रमाणें शिक्षकांना पगार मिळत असल्यानें पूर्वीपेक्षां शिक्षकांची आर्थिक परिस्थिति सुधारली. तथापि आजच्या महागाअीमुळें ही परिस्थिति पुरेशी सुधारली असें वाटत नाहीं. पगारवाढीमुळें खासगी शिक्षणसंस्थांना फार खर्च येतो व तो दरसाल वाढत असतो. त्यामानानें फीचें उत्पन्न वाढत नाहीं व सरकारचीहि मदत जास्त मिळत नाहीं. तेव्हां या संस्थांची ओढाताण फार होत असते. बहुतेक दुय्यम शाळेंतून मराठी माध्यम आहे. अिंग्रजीप्रमाणें आतां हिंदी भाषा सक्तीची झाली आहे. हिंदी आणि प्रादेशिक भाषा यांचा परस्पर संबंध कसा असावा हें अद्याप ठरलें नाहीं. महाराष्ट्रामध्यें पुढील विद्यापीठें शिक्षणाचें काम करीत आहेत

**मुंबई विद्यापीठ :–** स्थापना १८५७. या विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांची संख्या– ४२. १९५६–५७ सालांतील विद्यार्थी संख्या- ३९४५६.

**पुणें विद्यापीठ :–** स्थापना– १९४९. या विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांची संख्या– ३९. १९५६–५७ सालांतील विद्यार्थी संख्या– १९४८६.

**नागपूर विद्यापीठ :–** स्थापना– १९२३. या विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांची संख्या–२८. १९५६–५७ सालांतील विद्यार्थी संख्या–१३४७८.

**सर नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई :–** स्थापना– १९५१. या विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांची संख्या– ६. विद्यार्थ्यांची १९५६–५७ मधील संख्या– १९९४.

**मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :–** स्थापना– १९५८. या विद्यापीठास जोडलेल्या कॉलेजांची संख्या –११.

**संशोधन :–** वरील कॉलेजांखेरीज वाङ्मयीन, शास्त्रीय, व्यावसायिक उच्च शिक्षण देणाऱ्या व संशोधन करणाऱ्या कांहीं संस्था महाराष्ट्रांत काम करीत आहेत. गोखले अिन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स् अँड अिकॉनॉमिक्स, पुणें, डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युअेट अँड रिसर्च अिन्स्टिटयूट, पुणें, भारत अितिहास संशोधन मंडळ, पुणें, भांडारकर ओरिअेंटल रिसर्च अिन्स्टिटयूट, पुणें, वैदिक संशोधन मंडळ, पुणें, आदि संस्था आप-आपल्या क्षेत्रांत परिश्रमपूर्वक आणि उल्लेखनीय काम करीत आहेत.

**विविध शिक्षण :–** वाङ्मयीन शिक्षणाखेरीज शारीरिक आणि कलाविषयक शिक्षण देण्यासाठीं सरकारी व खासगी संस्था आहेत. कांदिवली येथें सरकारनें शाळेंतून शारीरिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना शिकविण्याचें एक मोठें केंद्र उघडलें आहे. रेखात्मक कला व चित्रकला यांचें सामान्य व उच्च शिक्षण देण्याचें कार्य जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई, ही संस्था करते. आंधळे, मुके, मानसिक दौर्बल्य अस-णारे वगैरेंचीं व्यंगें दूर करण्यासाठीं ११ शाळा आहेत.

**अिंजिनियरींग अँड टेक्नॉजिकल् कॉलेजें :–** १) कॉलेज ऑफ अिंजिनि-यरींग, शिवाजी नगर, पुणें. २) डिपार्टमेन्ट ऑफ केमिकल् अिंजिनियरींग., मुंबई विद्यापीठ, मुंबई. ३) गव्हर्मेन्ट अिंजिनियरींग कॉलेज, नागपूर. ४) जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई. ५) लक्ष्मीनारायण अिन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर विद्यापीठ, नागपूर. ६) व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल् अिन्स्टिटयूट, मुंबई. ७) वालचंद कॉलेज ऑफ अिंजिनियरींग सांगली, ८) अिंडीयन अिन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई.

## भारतीय साहित्य अकादमीनें मान्य केलेल्या संस्था

१) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें. २) विदर्भ साहित्य संघ, नागपूर. ३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद. ४) महाराष्ट्र साहित्य सभा, अिंदूर. ५) गीर्वाण वाग्वर्धिनी, पुणें. ६) संस्कृत भाषा प्रचार सभा, नागपूर. ७) भांडारकर रिसर्च अिन्स्टिटयूट, पुणें.

## भारतीय–संगीत–नाटक अकादमीनें मान्य केलेल्या संस्था

१) अखिल महाराष्ट्र नाटय विद्यामंदिर समिती, सांगली. २) बॅलेट युनिट, सांताक्रुझ, मुंबई. ३) भारत नाटय संशोधन मंदिर, पुणें. ४) भारतीय संगीत शिक्षापंथ, भारतीय विद्याभवन, मुंबई, ५) बॉम्बे नाटय संघ, मुंबई, ६) संगीत महाविद्यालय, नागपूर ७) फ्रेंड सर्कल, कल्याण. ८) गांधर्व महाविद्यालय, पुणें. ९) गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई. १०) देवल क्लब, कोल्हापूर. ११) गुजराथी नाटक मंडळ, मुंबई. १२) इंडियन नॅशनल थिएटर, मुंबई. १३) गायन समाज, कल्याण. १४) महाराष्ट्रीय कलोपासक मंडळ, पुणें १५) नांदेड कला मंडळ, नांदेड. १६) संगीत विद्यालय, रत्नागिरी. १७) सरस्वती गायन समाज, पंढरपूर. १८) विष्णु संगीत विद्यालय, नासिक. १९) व्यास अॅकडमी ऑफ म्युझिक, दादर, मुंबई.

## भारतीय ललित कला अकादमीनें मान्य केलेल्या संस्था

१) आर्ट सोसायटी ऑफ अिंडीया, सँढर्स्ट रोड, मुंबई. २) भारतीय कला प्रसारिणी सभा, लक्ष्मीरोड, पुणें. ३) बॉम्बे आर्ट सोसायटी, जहांगीर आर्ट गॅलरी, फोर्ट, मुंबई. ४) कला निकेतन, महाद्वार रोड, कोल्हापूर.

मेडिकल कॉलेजें :– १) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई. २) शेट जी. एस् मेडिकल कॉलेज, मुंबई. ३) टी. एन् मेडिकल कॉलेज, मुंबई. ४) बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणें. ५) मेडिकल कॉलेज, औरंगाबाद. ६) मेडिकल कॉलेज, नागपूर.

डेंटल कॉलेजें :– १) नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेज, मुंबई. २) सी. ई. एम् डेंटल कॉलेज, मुंबई.

आयुर्वेदिक कॉलेजें : १) पोद्दार आयुर्वेदिक कॉलेज, मुंबई. २) आयुर्वेदक महाविद्यालय, अहमदनगर. ३) आयंग्ल वैदिक महाविद्यालय, सातारा. ४) जे. एस्. एम्. जी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, नांदेड. ५) आयुर्वेद महाविद्यालय, पुणें, ६) आयुर्वेदिक कॉलेज, मुंबई. ७) आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर. ८) राधाकृष्णन् तोसवाल आयुर्वेद महाविद्यालय, अकोला. ९) विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय,

अमरावती. १०) शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक. ११) अष्टांग शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय, पुणें.

ज्यांच्या पालकांचें वार्षिक उत्पन्न १२०० रु. हून कमी असेल अशा विद्यार्थ्यांना सर्व टप्प्यातील शिक्षण मोफत मिळण्याची व्यवस्था सरकारनें केली आहे. महाराष्ट्रांत समाविष्ट झालेल्या निरनिराळ्या प्रदेशांच्या शिक्षणपद्धतीमधील चांगला भाग स्वीकृत करण्यात येऊन वेगवेगळ्या शिक्षणपद्धतीचा समन्वय घालतांना शिक्षणकार्याला बळकटी येईल, अशारीतीनें हें काम चालेल. महाराष्ट्र राज्य हें शिक्षणक्षेत्रामध्यें आघाडीवर आहे.

| वर्ष | शाळांची संख्या | विद्यार्थी | खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १९४६–४७ | २३७०४ | २०९११४५ | ९६०१०९३६ |
| १९५९–६० | ५४६५० | ६८९१४१७ | ३४३७३४३९२ |

ही प्रगति केवळ संख्येपुरतीच मर्यादित नाही. शाळा, विद्यार्थी व त्यांवरील खर्च यांच्या वाढीबरोबरच अभ्यासक्रम, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांच्या अिमारतींचें बांधकाम यांतहि बऱ्याच सुधारणा घडून आल्या आहेत.

## *विकासाचा विविध कार्यक्रम*

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमांत– १) प्राथमिक शिक्षणाचा विकास २) माध्यमिक शिक्षणामध्यें विविधता आणणें ३) औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाच्या वाढत्या सवलती उपलब्ध करून देणें ४) उच्च पातळीवरील शिक्षणक्रमात समन्वय घडवून आणणें ह्यांचा समावेश होतो.

**प्राथमिक शिक्षण:–** आज (१९६०) महाराष्ट्रामध्यें ३०१५३ प्राथमिक शाळा आहेत व त्यामध्यें ३४६७१४५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दुसऱ्या योजनेच्या अखेरीस २०० किंवा त्यांहून जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यांत शिक्षणाची सोय उपलब्ध होईल अशी आशा वाटते.

**माध्यमिक शिक्षण :–** युवावस्थेंतील तरुणांना अंशत: शैक्षणिक व अंशत: धंदेवाईक अशाप्रकारचें शिक्षण माध्यमिक शाळांमध्यें देण्यांत येतें. शिक्षणाच्या या क्षेत्रांत पुस्तकी सोयी वाढविण्याव्यतिरिक्त प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी अशाप्रकारचें उत्कृष्ट शिक्षण देण्यांत यावें असा सरकारचा मानस आहे. सध्यांच्या माध्यमिक शाळांचें विविधलक्षी व विविध शाखाविषयक शाळांमध्यें रूपांतर करणें ही एक महत्वाची योजना असून यांमध्यें शेतीं, व्यापार, विज्ञान, गृहशास्त्र व तांत्रिक विषय यांचा समावेश होतो. निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासक्रमांच्या गरजा

निश्चित करण्यासाठीं राज्यव्यापी पाहणी केली जात आहे. माध्यमिक शिक्षण-संस्था (हायस्कूलें) १६,००० व शिक्षण घेणारे विद्यार्थी ६ लाख आहेत.

तांत्रिक शिक्षण :— महाराष्ट्रामध्यें ७ पॉलिटेक्निक् स्कूल्स् आहेत. राज्यांतील तांत्रिक शिक्षणाचें निरीक्षण व मार्गदर्शन करण्यासाठीं जादा नोकरवर्गाची तरतूद करण्यांत आली आहे. तांत्रिक विषयांमधील अर्ध—वेळ शिक्षणक्रमाची पुरेशी सवलत सध्यां अस्तित्वांत नाहीं.

कलेला उत्तेजन :— सर्वसाधारण शिक्षणपद्धतीमध्यें कलेच्या शिक्षणालाहि योग्य तें स्थान देण्यांत आलें आहे. एस्. एस्. सी. परिक्षेसाठीं कला हा ऐच्छिक विषय ठेवला आहे. कलाविषयक उच्च शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई, येथें दिलें जाते. नाटयकलेस उत्तेजन देण्यासंबंधींची एक योजना कार्यवाहींत आली आहे. प्रादेशिक भाषेमध्ये मुलांसाठीं व प्रौढांसाठीं लिहिलेल्या व प्रसिद्ध सर्वोत्कृष्ट नाटकांस बक्षिसें दिलीं जातात. नगरपालिकांना खुलीं नाटयगृहें बांधण्यासाठीं आर्थिक मदत दिली जाते.

मागासलेल्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठीं खास सवलतींची तरतूद केली आहे. त्यांत शिष्यवृत्त्या, मोफत पाटचा व पुस्तकें आदींचा समावेश होतो. त्याचप्रमाणें या विद्यार्थ्यांना खोलीभाडें आणि वसतिगृहांतील भोजन—भत्ता देण्यासंबंधी सवलती देण्यांत येतात. ज्यांच्या पालकांचें वार्षिक उत्पन्न १२०० रु. हून कमी असेल अशा विद्यार्थ्यांना- मग ते कोणत्याहि धर्माचे वा जातीचे असोत- सर्व टप्यांतील शिक्षण मोफत देण्यांत येते. शिक्षणसंस्थांस आर्थिक साहाय्य देण्यासंबंधींच्या पद्धतींत रूपांतर करण्यांत आलें आहे. सरकार आणि शिक्षणसंस्था यांच्यामध्यें भागिदारी प्रस्थापित करून संयुक्तरीत्या आर्थिक साहाय्याची तरतूद करण्यांत येते.

महाराष्ट्रांतील साक्षरतेचें प्रमाण २०·९६ टक्के आहे.

महाराष्ट्रांतील ग्रंथालयें :— ग्रंथालय हें समाजाच्या बौद्धिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकच काय परंतु आर्थिकादी सर्व प्रकारच्या विकासाचें प्रतीक आहे. याबाबत पाश्चात्य राष्ट्रांच्या पासंगालाहि भारत पुरणार नाहीं. मग महाराष्ट्राची काय गोष्ट ! 'तुरळक झुडपें असणारें भयाण वाळवंट' हेंच स्वातंत्र्यपूर्व ग्रंथालय-विषयक परिस्थितीचें यथार्थ वर्णन होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र मुंबई सरकारनें ग्रंथालयाच्या प्रश्नांकडे अनुकरणीय तत्परतेनें लक्ष दिलें. साक्षरता प्रसार, लोक-शिक्षण आणि लोकशाहीच्या विकासासाठीं ग्रंथालय विकास अशा तिन्ही आघाड्या मुंबई सरकारनें उघडल्या. ग्रंथालय विकासासाठीं मुंबई सरकारनें केलेला महत्वाचा प्रयत्न म्हणून "ग्रंथालय संवर्धन समिति" चा उल्लेख करावा लागेल. या समितीचे अध्यक्ष श्री. फैजी हे होते. या समितीच्या सूचनेनुसार सरकारनें ग्रंथालय विकासाचा

कार्यक्रम हातीं घेतला. नवी ग्रंथालयें स्थापन न करतां अस्तित्वांत असलेल्या स्थानिक ग्रंथालयांना कांहीं प्रमाणांत मदत देऊन त्या मदतीच्या मोबदल्यांत वर्गणीदार नसलेल्या वाचकांना देखील ग्रंथालयांत मुक्तद्वार ठेवण्यांत यावें, अशी अट घालण्यांत येते. सरकारी प्रतिनिधी कार्यकारिणीमध्यें घेण्याचीहि अट असते. या समितीनें ग्रंथालय विकासाच्या ६ पायऱ्या सुचविल्या आहेत. प्रादेशिक, जिल्हा, तालुका व पुढें आणखी ३ पायऱ्यांनीं ग्रंथालय विकास योजना पूर्ण होते. ही योजना पूर्ण झाली तर शहरांपासून अगदीं खेड्यांपर्यंत सरकारमान्य ग्रंथालयाचें जाळें पसरेल आणि या योजनेच्या अखेरीस सरकारला १३ लाख रु. वार्षिक खर्च येईल. ही योजना किती वर्षांत पुरी करावी यावर बंधन नाहीं. सुचविलेल्या ६ पायऱ्यांपैकीं शेवटच्या ३ पायऱ्यांनीं खेड्यांत ग्रंथालय प्रसार व्हावयाचा आहे. हल्लीं १ प्रादेशिक, २२ जिल्हा, २२७ तालुका ग्रंथालयें आहेत. यावर सरकार हल्लीं २॥ लाख रुपये खर्च करीत आहे. या महाराष्ट्र ग्रंथालय विभागावर 'क्युरेटर ऑफ लायब्ररीज्' नांवाचा स्वतंत्र अधिकारी आहे. त्यांचें कार्यालय पुणें येथें असते.

स्वातंत्र्यपूर्व कालामध्यें ग्रंथालय संघटनेच्या आवश्यक घटकांविषयीं योग्य ती जाणीव असूनहि कांहीं करता आलें नाहीं. स्थगित झालेल्या बऱ्याच गोष्टी योग्य वाटचाल आतां करूं लागल्या आहेत. १९४९ मध्यें पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेमध्यें 'महाराष्ट्र ग्रंथालय संघ' स्थापन झाला. १९५०–५१ पासून हा संघ काम करीत आहे. संघातर्फे 'साहित्य सहकार' हें मुखपत्र (मासिक) चालविलें जातें, ग्रंथालयाचा अल्प मुदतीचा वर्ग पुणें येथें भरविला जातो आणि दरवर्षी ग्रंथालय परिषद भरविली जाते. ग्रंथालय क्षेत्रांतील अडचणी व सूचना सरकार व जनतेपुढें मांडण्याचें महत्वाचें कार्य महाराष्ट्र ग्रंथालय संघ करीत आहे.

## महाराष्ट्रांतील वाहतुक मार्ग

रस्त्यांवरून लोकांची संस्कृति कळून येते असें म्हणावयास हरकत नाहीं. जितकें राष्ट्र जुनें तितके त्याचे रस्ते अधिक चांगले, असें सांगण्यांत येतें. पण हें विधान भारताच्या बाबतींत सत्य वाटणार नाहीं. महाराष्ट्रांत तरी पूर्वी रस्त्यांचे बाबतींत दुर्लक्षच केलेलें आढळेल. आजच्यासारखे सरकारी खर्चानें तयार झालेले व व्यवस्थित ठेवलेले रस्ते पूर्वीं नव्हतेच. मोठ्या शहरांतूनहि अरुंद रस्ते असत. कांहीं रस्ते फरसबंद असत. पण ते रस्ते वाहनांना मुळींच उपयोगी नसत. त्याकाळीं जनावरांकडून ओढलीं जाणारीं वाहनें गांवांतून जात नसत. पालख्या, मेणे, घोडे यांचा उपयोग श्रीमंत माणसें करीत असत. गांवांबाहेरचे बैलगाड्यांचे रस्ते तयार करण्याची वेळ कधीं येतच नसे. बरेचसे रस्ते शेतांतून जात.तेव्हां ते पिकाच्या वेळीं बंद असत. रस्त्यांचा मोठा व महत्वाचा उपयोग व्यापारी मालाची वाहतूक करण्यासाठीं असतो, तेव्हा रस्ते अधिक व

चांगले करण्याकडे सरकारचें लक्ष हवें ही जाणीव जुन्या राजवटींत सरकारला अमल्याचें आडळत नाहीं.

हिंदुस्थानांत पूर्वीच्या काळापासून पुढील चार मोठे रस्ते चालू आहेत. १) उत्तरेकडील जुना मोठा लष्करी दळणवळणाचा रस्ता खैबर ते कलकत्ता. २) कलकत्ता ते मद्रास. ३) मद्रास ते मुंबई. ४) मुंबई ते दिल्ली. या चार रस्त्यांची लांबी सुमारें ५००० मैल आहे. महाराष्ट्राचा परप्रांतांशी संबंध आज पांच मोठ्या रस्त्यांनीं जोडला जातो. १) मुंबई ते आग्रा रस्ता, नासिक, खानदेशांतून जाऊन उत्तर प्रदेशापर्यंत पोहोंचतो. २) पुणें–बेंगलोर रस्ता, म्हैसूर– मद्रासला जातो. ३) पुणें– नागपूर रस्ता. ४) पुणें–हैद्राबाद रस्ता. ५) नागपूर–हैद्राबाद रस्ता.

रेल्वे :– भारतांत किंबहुना आशिया खंडामध्यें प्रथम जी रेल्वे सुरू झाली, ती महाराष्ट्रांतच होय. या रेल्वे कंपनीचे पहिले संचालक (डायरेक्टर) महाराष्ट्रीयन होते. मुंबईचे नगरशेठ श्री. जगन्नाथ नाना शंकरशेठ व जमशेठजी जीजीभाई यांनीं १८४३ पासून चालविलेल्या प्रयत्नांमुळें १८५३ मध्यें मुंबई–ठाणें रेल्वे सुरू झाली. जगांत सार्वजनिक रीत्या पहिली रेल्वे २७ सप्टेंबर १८२५ रोजीं अिग्लंडमध्यें सुरू झाली. नंतर २५ वर्षांनीं मुंबईनजीक कामास सुरवात झाली. अिग्लंड–अमेरिकेच्या अनुभवानें रुळांमधील अंतर ४', ८॥" असें ठेवतां ५', ६" असें ठेवलें. हवा चांगली नसल्यामुळें मुंबई–ठाणें हा रस्ता बांधण्यास फार त्रास झाला. १६ एप्रिल १८५३ शनिवार या दिवशीं मुंबई–ठाणें मार्गावरची रेल्वे वाहतूक समारंभानें सुरू करण्यांत आली. तीन अिंजिनें व चौदा डबे बोरीबंदरावरून ५५ मिनिटांत ठाण्यास पोहोंचले. मध्यंतरी १० मिनिटें शीवला गाडी थांबली होती. ही गाडी परत बोरीबंदरला ४० मिनिटांत गेली. म्हणजे वेग सरासरी ताशीं ३६ मैल पडला. यानंतर हळूहळू रेल्वेचे मार्ग वाढत चालले. १ मे १८५४ ला ठाणें ते कल्याण, १२ मे १८५६ ला कल्याण ते पळसदरी, ६ फेब्रुवारी १८६० ला कल्याण ते आसनगांव हे फाटे सुरू करण्यांत आले. या रेल्वेची पहिली कचेरी ठाकूरद्वारमधील नानांच्या वाड्यांत होती. रेल्वे कंपनीच्या गाड्यांतून पहिल्या वर्गानें केव्हांहि जाण्यारा नाना शंकर शेठ यांना एक सोन्याचा पास देण्यांत आला होता. पूर्वीं डब्यांतून रॉकेलचे दिवे असत. नंतर गॅसचे व आतां विजेचे दिवे असतात. डबे सागवानी लांकडाचे बांधलेले असत. चार चाकांवर बसविलेल्या या डब्यांतून ४० ते ६० उतारू जात. संडास व मुतार्‍या यांची सोय नसे. १८६३ सालीं बी. बी. सी. आय्. रेल्वेचे डबे दुमजली असत. वरच्या मजल्यावर बाकें नसत. उतारू जमिनीवरच बसत असत. प्रत्येक डब्याला ब्रेक नसल्यानें गाडी थांबली कीं उतारूंचा तोल जात असे. पुष्कळदा गाडी रुळांवरून घसरत असे. पूर्वीं वेगवेगळ्या रेल्वे कंपन्या असत. आतां मात्र सर्व रेल्वे ही भारत सरकारची मालमत्ता बनली आहे. तेव्हा त्यांना नवीन नांवें भूभागांवरून ठेवलीं आहेत. मध्य,

पश्चिम, दक्षिण रेल्वेचे फाटे महाराष्ट्रांतून गेलेले आहेत ते पुढीलप्रमाणें– १) मुंबई ते बऱ्हाणपूरच्या थोडे पुढे उत्तरेकडे, मुंबई–डहाणूच्या थोडे पुढे उत्तरेस, मुंबई सोलापूरच्या पुढे आग्नेयेस. २) पुण्यापासून सांगली कोल्हापूरकडे जाणारा फांटा, पुण्यापासून दौंडवरून मनमाडकडे जाणारा फाटा.

**मोटार :–** मुंबई राज्यांतील–पर्यायानें महाराष्ट्रांतील–प्रवासी मोटार वाहतुक बॉंबे स्टेट रोड ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशन या संस्थेकडे सोपविली आहे. प्रवासी वाहतुकीचें अशाप्रकारें राष्ट्रीयीकरण केल्यानें प्रवासामध्यें सुरक्षितता निर्माण झाली आहे.

## महाराष्ट्रांतील नगरपालिका

महाराष्ट्रांतील जिल्हावार नगरपालिका पुढीलप्रमाणें आहेत.

**ठाणें :–** कल्याण, जव्हार, ठाणें, भिवंडी, निझामपूर, वसई.

**पश्चिम खानदेश :–** धुळें, नंदुरबार, तळोदे, शहादा, शिरपूर, वरवाडी.

**नाशिक :–** नाशिक, अिगतपुरी, नांदगांव, मनमाड, सिन्नर, येवला, त्रिंबक, मालेगांव, भगूर, नाशिक रोड, देवळाली, सटाणें.

**कुलाबा :–** अलिबाग, महाड, माथेरान, पनवेल, पेण, रोहाअष्टमी, उरण, मुरुड, श्रीवर्धन.

**रत्नागिरी :–** रत्नागिरी, चिपळूण, मालवण, वेंगुर्लें, खेड, राजापूर, सावंतवाडी.

**अहमदनगर :–** अहमदनगर, संगमनेर, कोपरगांव, श्रीरामपूर.

**पुणें :–** लोणावळा, सासवड, जेजुरी, बारामती, अिंदापूर, शिरुर, तळेगांव-दाभाडे, आळंदी, जुन्नर, दौंड, भोर.

**उत्तर सातारा :–** महाबळेश्वर, रहिमतपूर, कराड, म्हसवड, सातारा शहर, वाई, सातारा उपनगर, पांचगणी, फलटण.

**सोलापूर :–** सोलापूर, बार्शी, पंढरपूर, करमाळा, सांगोला, अक्कलकोट, मंगळवेढा, मैंदर्गी, दुधनी, कुर्डुवाडी.

**दक्षिण सातारा :–** सांगली, मिरज, अष्टें, तासगांव, अिस्लामपूर, विटे.

**कोल्हापूर :–** कोल्हापूर, इचलकरंजी, जयसिंगपूर, मलकापूर, मुरगुड, वडगांव, गडहिंग्लज, कांगल, कुरुंदवाड, पन्हाळा.

**पूर्व खानदेश :–** जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळिसगांव, फैजपूर, यावल, रावेर, सावदा, पारोळा, चोपडे, धरणगांव, एरंडोल, पाचोरा.

**उस्मानाबाद :–** उस्मानाबाद, उदगीर, लातूर, तुळजापूर, उमरगा, औसा, अहमदपूर, परिंडा, भोम, मुरुम, नळदुर्ग, कळम, निलंगा.

**औरंगाबाद :–** औरंगाबाद, जालना, कन्नड, अंबड, खुलदाबाद, पैठण, वैजापूर, भोकरधन, गंगापूर.

**नांदेड :–** नांदेड, बिलोली, उमरी, मुदखेड, कंधार, हदगांव, धर्माबाद, देगलूर, कुंडलवाडी, मुखेड, राजुरा, किनवत.

**परभणी :–** परभणी, मानवत, हिंगोली, वसमतनगर, सोनपेठ, परतुड, पूर्णा, कलमनुरी, गंगाखेड, देऊ, जिंतूर, पार्थी.

**बीड :–** बीड, परळी, मोमिनाबाद, अष्टी, मांजलेगांव, गेवराई.

**नागपूर :–** कामटी, रामटेक, खापा, कळमेश्वर, उमरेड, मोवर, सावनेर, फटोल, नारखेड, मोहपा.

**चांदा :–** चांदा, वरोरा, बल्लारपूर.

**वर्धा :–** वर्धा, आर्वी, देवळी, हिंगणघाट, पुळगांव, सिंदी.

**भंडारा :–** भंडारा, तुमसर, पवनी, गोंदिया, तिरोदा.

**अकोला :–** अकोला, अकोट, करंजा, वाशिम, मूर्तिजापूर, बाळापूर, तेलहारा, पातुर.

**बुलढाणा :–** बुलढाणा, खामगांव, शेगांव, मलकापूर, जळगांव, मेहेकर, नांदुरा, चिखली, देऊळगांव राजा.

**यवतमाळ :–** यवतमाळ, वणी, दिग्रस, दारव्हा, पांढरकवडा, पुसद, उमरखेड धाटंजी.

**अमरावती :–** अमरावती, अचलपूर शहर, अचलपूर सिव्हिल स्टेशन, अंजनगांव, सुरजी, मोरसी, वरुड, बडनेरा, दर्यापूर, धामणगांव, चांदूर रेल्वे, चांदूर बझार, शेंदूरजना, चिखलदरा.

**महानगरपालिका :–** १) मुंबई, २) पुणे, ३) नागपूर.

## जिल्हा लोकल बोर्ड

सध्यांचा लोकल बोर्ड कायदा १९२३ सालीं पास झाला. १९३८ सालीं या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन लोकलबोर्डाचे सर्व सभासद लोकनियुक्त असावेत अशी तरतूद करण्यांत आली. शिवाय स्त्रिया, हरिजन, मागासलेले वर्ग यांच्यासाठीं राखीव जागा ठेवल्या. त्यानंतर या कायद्यांत अनेकवेळा दुरुस्त्या करण्यांत आल्या. त्यांपैकीं महत्वाची म्हणजे प्रौढ मतदान पद्धतीनें लोकल बोर्डाची निवडणूक करणें ही होय. पूर्वीच्या मुंबई राज्यामध्यें व कच्छ विभागांत मिळून २३ जिल्हा लोकल बोर्ड आहेत. मराठवाडा विभागांत ५ लोकल बोर्ड व विदर्भ विभागांत ३८ जनपद सभा आहेत. प्रत्येक जनपद सभा ही एका तालुक्याची असते.

## ग्रामपंचायत

ग्रामपंचायत हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया आहे. म्हणून १००० किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गांवांत तेथील लोकांकडून मागणी आल्यास ग्रामपंचायतीची स्थापना करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. १००० पेक्षां कमी लोकसंख्येच्या ठिकाणी गट ग्रामपंचायतींची स्थापना करण्याचें सरकारचें धोरण आहे. ३० सप्टेंबर १९५८ अखेर २०९७८ ग्रामपंचायती झाल्या. एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या ७७ टक्के लोकसंख्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रांखालीं आली. १९५४–५५ पासून सरकारमार्फत ग्रामपंचायतींना पुढीलप्रमाणें आर्थिक मदत देण्यांत येत आहे. १) सामान्य जमीन महसूलाच्या १५ टक्के किंवा लोकल फंड सेसच्या २५ टक्के यापैकीं जी रक्कम अधिक असेल ती. २) ग्रामपंचायत सेक्रेटरीना देण्यांत येणाऱ्या पगाराच्या व भत्त्याच्या ¾ रक्कम. ३) नोकरांना महागाई भत्ता देण्याकरतां येणाऱ्या खर्चाची निम्मी रक्कम, याप्रमाणें सरकार आर्थिक मदत देत असते.

ग्रामपंचायत कायद्यामध्यें अधिक फेरफार सरकारनें केले. १ जून १९५९ पासून नवा कायदा अंमलांत आला. या कायद्याची वैशिष्ठ्यें खालीलप्रमाणें :—
१) कोणत्याहि महसूल गांवांत किंवा अितर कोणत्याहि प्रशासनीय घटकांत किंवा त्याच्या भागांत ग्रामपंचायत स्थापन करणें. २) प्रत्येक ग्रामपंचायतींत स्त्रियांकरतां दोन जागा राखून ठेवणें. ३) गांवाच्या कोणत्याहि विभागांतील मतदारास गांवच्या त्याच किंवा अितर कोणत्याहि विभागांत निवडणूकीस उभे राहण्याचा अधिकार देणें. ४) गांवांत राहणाऱ्या ज्या लोकांना मतदानाचा हक्क असेल अशा सर्व लोकांच्या ग्रामसभेची स्थापना करणें. ५) प्रत्येक जिल्ह्यासाठीं एक ग्रामपंचायत मंडळ स्थापन करणें.६) ग्रामपंचायतीचा चिटणीस हा सरकारी नोकर असेल व सरकार त्यास पगार देईल. सरकार ग्रामपंचायतींच्या चिटणीसांना विशिष्ट शिक्षण देण्याची व्यवस्था करील. ७) जमीन महसूल वसूल करणें व जमीन महसूलाचें दप्तर ठेवण्याचें काम ग्रामपंचायतींकडे राहील. ८) सर्व ग्रामपंचायतींना एकाच धर्तीवर

सर्वसाधारण जमीन महसूलाच्या २५–३० टक्के जमीन महसूल अनुदान (ग्रँट) म्हणून देणें. ९) पांच किंवा पांचपेक्षां अधिक गांवाच्या गटासाठीं गट न्याय–पंचायतींची स्थापना करणें व त्यांची रचना करण्यांत आल्याबरोबर सर्व ग्रामपंचायतींना न्यायदानविषयक अधिकार देणें. १०) ग्रामपंचायतींच्या हिशेब तपासणीची व्यवस्था करणें, अित्यादि बऱ्याच महत्वाच्या गोष्टी या कायद्यामध्यें आहेत. एकदां सभासदांस निवडून दिलें कीं, जनतेचा त्या संस्थेशीं प्रत्यक्ष संबंध राहत नाहीं, सभासद लोकमताची कधींच पर्वा करीत नाहींत, असा अितर स्थानिक स्वराज्य संस्थांचा अनुभव जमेस धरून ग्रामसभेची स्थापना करून जनतेचें सभासदांवर सतत नियमन किंवा अंकुश ठेवण्याचा चांगला प्रयोग करण्यांत येत आहे व अशा ग्रामसभेमुळें, निवडून आलेल्या सभासदांवर व ग्रामपंचायत कारभारावर योग्य नियंत्रण राहूं शकेल, अशी अपेक्षा आहे.

## महाराष्ट्रांतील शेती

महाराष्ट्रांतील लागवडीखालील जमीन, लागवडीयोग्य पडित जमीन, लागवडीअयोग्य पडित जमीन, यांचे जिल्हावार आंकडे दर्शविणारा तक्ता :–

| जिल्हा | लागवडीखालील जमीन एकर – गुंठे | लागवडीयोग्य पडित जमीन एकर – गुंठे | लागवडीअयोग्य पडित जमीन एकर – गुंठे | एकूण जमीन एकर – गुंठे |
|---|---|---|---|---|
| दक्षिण सातारा | १७४४०५६–[illegible] | ७४३४–३२ | ९७३३४–३२ | १८४८२६–९ |
| उत्तर सातारा | १८६४२३६–० | ८५७५४–० | ६६३७८७–० | २६१३७७–० |
| पुणें | २१८७२०४–३ | ४४५३–२७ | ३३९६–२६ | २१९५०५५–३ |
| सोलापूर | २९१४९५८–० | ६९५७८–० | ११३८६७–० | ३१७८४०३–० |
| कोल्हापूर | १०१५३६५–० | ३३६२५९–० | ११६१६६–० | १४६७७९–० |
| अहमदनगर | ३१०५२१८–० | ८३०३६–० | १०१६६७९–० | ४२०४९३३–० |
| नागपूर | १३००५५४–० | १२५२७७–० | ४१५९४–० | १४६७४२५–० |
| वर्धा | १०१७४४७–० | ७०७१४–० | ४६५५२३–० | १५५३६८०–० |
| चांदा | १३१५००७–० | २२१४२–० | १७६२९१७–० | ३१००९६६–० |
| भंडारा | ९२१३८६–० | ५३११८–० | ८०८४२–० | १०५५३४६–० |
| अमरावती | १५७९३२९–० | ६१२३८–० | ३९२८७८–० | २०३३४४५–० |
| अकोला | १८८७३००–० | १७८५०–० | ९६८४८–० | २००१९९८–० |
| बुलढाणा | १६६३८१९–० | ६५०७१–० | ६८५६०३–० | २४१४४९३–० |
| यवतमाळ | १८०३७४२–० | ३२००४१–० | १२१६९४५–० | ३३४०७२८–० |
| कुलाबा | ५११२८१–० | २७२५५६–० | ३०१८२०–० | १०८५६५०–७ |

| जिल्हा | लागवडी-खालील जमीन एकर – गुंठे | लागवडीयोग्य पडीत जमीन एकर – गुंठ | लागवडीअयोग्य पडीत जमीन एकर – गुंठे | अेकूण जमीन एकर – गुंठे |
|---|---|---|---|---|
| नासिक | २४९३१२६–० | ६७७३०–० | २५२०४६–० | २८१२९०२–० |
| रत्नागिरी | – | १४४७४–० | १९२२६–० | – |
| ठाणें | ७६०२१६–० | ३३८७१–० | १८७६५५–० | ९८१७४२–० |
| पश्चिम खानदेश | १६४४७०२–० | १११४४१–० | १३७२३००–० | ३१२८४४३–० |
| मुंबई उपनगर | २१४४०–० | ९७६८–० | ३६२०३–० | ६७४४१–० |
| डांग | ७३८८७–० | ४१०४६–० | ७५६४८–० | १९०५८१–० |

मुंबई राज्याचें (द्वैभाषिक ) एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १२,००.४०,००० एकर आहे. पैकीं पिकाखालीं एकूण ६,९०,८२,००० एकर क्षेत्र आहे. यापैकीं ४,५६,९२,००० एकर अथवा लागवडी खालील एकूण क्षेत्राच्या ६८·२ टक्के अितकें क्षेत्र अन्नपिकांखालीं आहे.

## शेतकी विषयक शिक्षण

महाराष्ट्रांत शेतकीविषयक चार महाविद्यालयें आहेत. तेथें विद्यार्थ्यांना पदवी-परीक्षेपर्यंतचें शिक्षण दिलें जातें. पुणें, नागपूर, अकोले, परभणी येथें हीं महाविद्यालयें असून त्याचा खर्च सरकार करीत असते. पुणें येथील महाविद्यालयांतून शिक्षणाचें तसेंच संशोधनाचेंहि कार्य चालते व अशा तऱ्हेनें मध्यवर्ति संशोधन संस्था म्हणूनहि या महाविद्यालयाचें काम चालतें.

वरील महाविद्यालयांत किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो व ही महाविद्यालयें कोणत्या विद्यापीठाशीं संलग्न आहेत, हें पुढील कोष्टकावरून कळून येईल.

| महाविद्यालयाचें नांव | प्रवेश संख्या | चार वर्गांतील एकूण विद्यार्थी संख्या | कोणत्या विद्यापीठाशी संलग्न |
|---|---|---|---|
| १) अग्रिकल्चर कॉलेज, पुणें. | १५० | ६०० | पुणें विद्यापीठ |
| २) ॲग्रिकल्चर कॉलेज, नागपूर | ६४ | २५६ | नागपूर विद्यापीठ |
| ३) ॲग्रिकल्चर कॉलेज, अकोले. | ६४ | | नागपूर विद्यापीठ |
| ४) अग्रिकल्चर कॉलेज, परभणी. | १०० | ४०० | मराठवाडा विद्यापीठ |

शेतकऱ्यांच्या मुलांना ट्रेनिंग देण्यासाठीं महाराष्ट्रांत पुढील ठिकाणीं शेतकी शाळा स्थापन केल्या आहेत. १) मांजरी (पुणें जिल्हा). २) बोरगांव (उत्तर सातारा जिल्हा). ३) पुणतांबे (अहमदनगर जिल्हा). ४) धुळे (पश्चिम खानदेश जिल्हा.) ५) सोलापूर (सोलापूर जिल्हा). ६) मिरजोळे (रत्नागिरी जिल्हा) ७) कोल्हापूर (कोल्हापूर जिल्हा) ८) मालेगांव (नाशिक जिल्हा). ९) कोसबाड (ठाणें जिल्हा). १०) परभणी (परभणी जिल्हा.) ११) दिग्रस (द. सातारा). १२) कोलड (कुलाबा).

मालेगांव, कोसबाड या ठिकाणांखेरीज अितर सर्व शाळा सरकारी खर्चानें चालविल्या जात आहेत. शेतकी शाळेंतील अभ्यासक्रम २ वर्षांचा असतो व विद्यार्थ्यांना दरमहा २०।- रु. प्रमाणें विद्यावेतन देण्यांत येते.

## पीक संशोधन

पीक संशोधन बाबींचे पुढील दोन प्रकार पडतात :--

१) निरनिराळ्या आधुनिक पद्धतींचा उपयोग करून स्थानिक पिकामध्यें सुधारणा करण्यासाठीं उत्पन्नाच्या व दर्जाच्या दृष्टीनें उत्कृष्ट अशा जाती शोधून काढणें. याखेरीज अवर्षणाचा प्रतिकार, धान्य गळणें, अगर रोपें जमिनीवर लवणें याविरुद्ध प्रतिबंधक अिलाज, क्षार द्रव्यांचा प्रतिबंध, तांबेरा यांसारख्या रोगांचा प्रतिकार, धान्य आणि अन्न पीकांची वैरण यांमधील पोषण मूल्यें, पिकांतील प्रोटीन्सचा अंश वगैरे, तेलबीयातील तेलाचा अंश, हायर ओयोडीन, अिन्डेक्स, वगैरे प्रश्नहि आवश्यक तेव्हां हाताळण्यांत येतात. २) पिकांना खतें व पाणी किती लागतें, रोपामध्यें अंतर किती असावें, बियाणें पेरण्याची वेळ कोणती असावी, पेरांचें प्रमाण, प्राथमिक मशागत, अितर शेतीचीं कामें यासंबंधीं पिकांच्या गरजा शोधून काढण्यासाठीं प्रयोग करणें. हल्लीं पुढील पिकांच्या बाबतींत संशोधन चालू आहे. १) ज्वारी, बाजरी, तांदूळ, नागली, यांसारखीं अन्नपिकें; वरी, कोद्रा यासारखी भरड धान्यें, २) हरबरा, तूर, उडीद, मूग, मटकी यांसारखीं कडधान्यें, ३) कांदे ४) भुईमूग, तीळ आदि तेलबीया. १९५७ पासून तेलबीयांसंबंधींच्या कामांवर तेलबीया तज्ज्ञ हे तंत्रविषयक दृष्टीनें देखरेख ठेवीत आहेत.

## अधिकारी

प्रत्येक जिल्ह्यासाठीं पुढीलप्रमाणें नोकरवर्ग ठरवून देण्यांत आला आहे. १) जिल्हा शेतकी अधिकारी. २) एक सहाय्यक जिल्हा शेतकी अधिकारी. ३) प्रत्येक रेव्हिन्यू-सब् डिव्हीजनसाठीं एक शेतकी अधिकारी. ४) २५-३० गांवांच्या प्रत्येक शेतकी सर्कलसाठीं एक एक शेतकी मदतनीस. याप्रमाणें ही सरकारी यंत्रणा आहे.

## शेती संशोधन केंद्रें

१) शेती संशोधन केंद्र, धुळें :– चिनी मूग, काळा हरबरा, सोयाबीन, कापूस, मका, ज्वारी, भुईमूग, गहूं यांचेसंबंधीं संशोधन करणें.

२) शेतकी संशोधन केंद्र, इगतपुरी :– भात, कडधान्यें वगैरेच्या वाढीसंबंधीं व शेतीविषयक संशोधन करणें.

३) शेतकी संशोधन केंद्र, जळगांव :– ज्वारी, भुईमूग, कडधान्यें– (उडीद व मूग) यांविषयीं संशोधन करणें.

४) शेतकी संशोधन केंद्र, जेऊर :– गहूं, ज्वारी, बाजरी, हरबरा, भुईमूग, यासंबंधीं शेतीविषयक संशोधन करणें.

५) शेतकी संशोधन केंद्र, कराड :– ज्वारी, बाजरी, गहूं, हरबरा, भुईमूग, मेथी यांच्या वाढीसंबंधीं व शेतीविषयक संशोधन करणें.

६) शेतकी संशोधन केंद्र, कर्जत :– भाताच्या वाढीसंबंधीं व शेतीविषयक संशोधन करणें.

७) शेतकी संशोधन केंद्र, खोपोली :– भात, वांगीं, टोमॅटो, मिरच्या यांसारख्या भाजीपाल्यांच्या बाबतींत शेतीविषयक संशोधन करणें.

८) शेतकी संशोधन केंद्र, कोल्हापूर :– भाताच्या जातींची संपूर्ण पाहणी करणें, अितर केंद्रांतील सुधारलेल्या जातींच्या उत्पादनासंबंधीं प्रयोग करून स्थानिक हवामान त्यांना कितपत मानवतें हें ठरविणें, भाताच्या स्थानिक जातींमध्यें उत्पादनाच्या पद्धतीद्वारें सुधारणा करणें, खताचे हप्ते आणि शेतीविषयक कामें यांविषयीं उपयुक्त अशी माहिती मिळावी म्हणून शेतीबाबतचे प्रयोग करणें.

९) शेतकी संशोधन केंद्र, कोपरगांव :– भात, ज्वारी, हरबरा, गहूं, बाजरी, भुईमूग यांबाबत उत्पादन व शेतकीविषयक संशोधन करणें.

१०) शेतकी संशोधन केंद्र, कोसबाड :– भाताबाबत उत्पादन व शेती विषयक संशोधन करणें.

११) शेतकी संशोधन केंद्र, मोहोळ :– ज्वारी, कडधान्य, तेलबीया यांच्या जातींमध्यें उत्पादनाच्या दृष्टीनें सुधारणा करणें, अधिक उत्पादन देणाऱ्या जातीं-बाबत पैदास कार्य करणें.

१२) शेतकी संशोधन केंद्र, नवा गांव :– भाताबाबत उत्पादन आणि शेती-विषयक संशोधन करणें.

**१३) शेतकी संशोधन केंद्र, निफाड :–** गहूं, बाजरी, तूर, हरबरा, तीळ, करडअी, कडधान्यें, तेलबीया, रताळीं, कांदे आदि बाबतींत उत्पादन आणि शेती-विषयक संशोधन करणें.

**१४) शेतकी संशोधन केंद्र, पनवेल :–** निवड, पैदास, संकर कार्य. मध्य प्रमाणाच्या खार जमिनींतील खतविषयक चांचण्या, बियाणांच्या प्रमाणाबाबतच्या चांचण्या, रोपाच्या बनावटीबाबतचे प्रयोग, खात्रीच्या जातींवर जिल्हा पातळी-वरील प्रयोग, फार्मवर पैदास केलेल्या सुधारलेल्या जातींच्या उत्पादनाबाबत लहान व मोठ्या प्रमाणावरील चांचण्या, तण, कीड, यांचा प्रतिबंध, यांसारखे कांहीं महत्वाचे विषय सध्यांच्या संशोधनविषयक कार्यक्रमांत आहेत.

**१५) शेतकी संशोधन केंद्र, पाडेगांव :–** ऊंस, गूळ उत्पादन, शेतीला पाणी देण्याची पद्धत, जमीन, बाराक्षार (बॉयोकेमिस्ट्री), कीटक शास्त्र, अळवेशास्त्र (सूक्ष्म वनस्पती शास्त्रासह) याबाबत संशोधन करणें.

**१६) शेतकी संशोध केंद्र, फोंडाघाट :–** भाताचें शेतीविषयक कार्य व उत्पादन.

**१७) शेतकी संशोधन केंद्र, रत्नागिरी :–** भाताचें शेतीविषयक संशोधन आणि उत्पादन.

**१८) शेतकी संशोधन केंद्र, सोलापूर :–** ज्वारी, भुईमूग, हरबरा, बाजरी आदिबाबत संशोधन करणें.

**१९) शेतकी संशोधन केंद्र, वडगांव :–** ज्वारी, नागली, ताम, गवत, कडधान्यें, भात यांविषयीं उत्पादन व शेतीविषयक संशोधन करणें.

**२०) शेतकी कॉलेज फार्म, पुणें :–** कापूस, मका, भात, बाजरी, ऊंस, कड-धान्यें, तेलबीया, भाजीपाला, आदींचें उत्पादन व शेतीविषयक संशोधन करणें.

**२१) गणेशखिंड येथील फळांचें प्रायोगिक केंद्र, खडकी :–** आंबा, लिंबू, चिक्कू, द्राक्षें, पेरु, केळीं, डाळिंब यांसारखीं फळें व पालेभाज्यांचे बाबतींत शेतकी-संशोधन करणें.

**२२) सरकारी शेतीविषयक फार्म, जळगांव :–** कपाशी व भुईमूगाच्या पैदाशीबाबतींत संशोधन करणें.

**२३) शेतीविषयक फार्म, यवतमाळ :–** कपाशी, ज्वारी, बाजरीच्या दाशीबाबत संशोधन करणें.

**२४) शेती संशोधन संस्था, नागपूर :–** कडधान्य, बारीक धान्य, तेलबीया, मका, ज्वारी, बारली यांसारखीं धान्य पिकें, गुरांचें खाद्य, गवत, द्विदल धान्यें, काथ्याचें पीक, तंबाखूविषयक पाहणी व संशोधन, बुरशी, बॅक्टीरिया, व्हिरस यांसारख्या पीकांवरील रोगांबाबत संशोधन करणें.

**२५) कपाशीच्या पैदाशीचें उपकेंद्र, बुलढाणा :–** शेतकऱ्यांच्या शेतामधील किंवा सरकारी फार्ममध्यें एकाच जातीच्या रोपांची निवड करणें, सुधारलेल्या जातींची चांचणी करणें, खात्रीच्या जातींची प्राथमिक चांचणी, अधिक खात्रीच्या जातींची चांचणी, सुधारलेल्या जातींची पैदास करणें.

**२६) कपाशी पैदास योजना, नागपूर :–** कपाशी, ज्वारी, भुईमूगाच्या पैदाशीबाबत संशोधन करणें.

**२७) सरकारी प्रायोगिक फार्म, अकोला :–** कपाशी, ज्वारी, बाजरी व भुईमुगाची पैदास, शेतकीविषयक संशोधन.

**२८) सरकारी प्रायोगिक फार्म, नागपूर :–** हरबरा, गहूं, भुईमूग, कपाशी, ज्वारी, भात आणि शेतीविषयक संशोधन.

**२९) न्यूक्लिअस स्कीम, नागपूर :–** भूईमूग, कपाशी, ज्वारी, बाजरीच्या पैदाशीबावत संशोधन.

**३०) बियाणें आणि प्रात्यक्षिक फार्म, बुलढाणा :–** भुईमूग, द्विदल धान्यें, कपाशी, ज्वारीचीं पैदास करणें.

**३१) बियाणें प्रात्यक्षिक फार्म, वाशिम :–** ज्वारी, गहूं, भुईमूग, कपाशी, संकीर्ण पिकांची पैदास.

**३२) बियाणें प्रात्यक्षिक फार्म, अचलपूर :–** ज्वारी, कपाशी, तूर, भुईमूग, सोयाबिन, संकीर्ण द्विदल धान्यांच्या जाती, खतें व शेतीविषयक चांचणी.

मराठवाडा विभागांतील शेती संशोधन केंद्रें याच ग्रंथाच्या मराठवाडा या भागांत दिली आहेत.

सध्यां पुढील पिकांच्या सुधारलेल्या जातीचें बियाणें अुपलब्ध आहे, त्यांपैकीं बहुतेक जातींच्या बियाणांचें वाटप करण्यांत येत आहे. १) तांदूळ–३०, २) गहूं–४, ३) बाजरी–३, ४) ज्वारी–४, ५) मका–१, ६) नागली–३, ७) राळ–१, ८) हरबरा–३, ९) मूग–१, १०) अुडीद–१, ११) तूर–२, १२) वाल २, १३) मसूर–१, १४) भुईमूग–५, १५) आळशी–२, १६) करडअी–१, १७) तीळ–१, १८) अेरंडी–१.

## विहिरींसाठीं तगाई

ज्या शेतकऱ्यांना, स्वतःच्या खर्चानें शेतीच्या पाण्यासाठीं विहिरी बांधतां येणें शक्य नसेल अशा शेतकऱ्यांना विहिरी बांधण्यासाठीं किंवा दुरुस्त करण्यासाठीं तगाई कर्ज देण्याची अेक योजना सरकारनें मंजूर केली आहे. या योजनेनुसार नवीन विहिरी बांधण्याकरितां २५०० रु पर्यंत आणि जुनी विहीर दुरुस्त करण्याकरितां १००० रु. पर्यंत तगाई देण्यांत येते. ही तगाई कामास सुरूवात करतांना आणि अर्धे काम-झाल्यानंतर अशी दोन हप्त्यांनीं देण्यांत येते. मात्र त्यासाठीं तगाईच्या रकमेच्या दुप्पट जामीन द्यावा लागतो आणि ती दहा सारख्या वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाची असते. ४ टक्के दरानें त्या तगाईवर व्याज आकारलें जाते.

## सरकारीं जागेवर अतिक्रमण

सरकारी जमिनीवर जर अतिक्रमण करण्यात आलें तर मुंबई लँड रेव्हिन्यू कोडाच्या ६१ व्या कलमाप्रमाणें अतिक्रमण केलेल्या त्या सबंध सर्व्हे नंबरचा जो शेतसारा असेल तो, जोपर्यंत अतिक्रमण चालू राहील तोपर्यंत भरावा लागेल. सर्व्हे नंबरच्या कांहीं भागांतच अतिक्रमण केलें तरीहि तोच नियम आहे. शिवाय अतिक्रमण करणाऱ्यास ५। रु.पर्यंत दंड किंवा जमीन महसुलाच्या १० पट यांपैकीं जी रक्कम अधिक असेल, तितका दंड करण्यांत येतो. अतिक्रमण करणाऱ्यास तावडतोब हुसकावून दिलें जातें व तेथील पीकें, घरें, वगैरे जर ठराविक मुदतींत त्यानें हलविली नाहींत तर तीं जप्त करण्यांत येतात.

## बियाण्यांचीं शुद्धता कशी राखावीं

अधिक पीक हातीं येण्याच्या दृष्टीनें बियाण्यांची शुद्धता राखणें अत्यंत महत्त्वाचें असतें. जेव्हां पीक फुलावर येतें तेव्हां अन्य पीकांचीं रोपें अुपटून टाकावीं. तसेंच मळणीच्या वेळीं मळजागा स्वच्छ ठेवावी आणि अन्य जातीचें बियाणें तेथें ठेऊं नये.

## कंपोस्ट खत कसें तयार करावें

कृत्रिम खतांचा वापर करीत असतांनाहि शेणखत व कंपोस्ट यांचा वापर करणें आवश्यक असतें. कारण त्यामुळें जमिनीचा कस वाढतो आणि रासायनिक खतांचें अनिष्ट परिणाम टाळतां येतात.

**ग्रामीण कंपोस्ट :–** यासाठीं १० × ६ × ३ फूट अशा आकाराचा अेक खड्डा खोदण्यांत येतो आणि त्यांत शेतावरील केरकचरा व शेण टाकून तो पद्धतशीपणें भरण्यांत येतो. प्रथम अेक फूट जाडीचा कचऱ्याचा थर लावण्यांत येतो व त्यावर शेण आणि राख पसरण्यांत येते. अशा रीतीनें अेकूण पांच थर देण्यांत येतात व

त्यामुळें जमिनीच्या पातळीच्या वर दोन ते तीन फूट अेवढे थर चढविले जातात. त्यानंतर त्यावर चोहोंबाजूंनीं माती घालण्यांत येते. खड्डा फक्त २–३ दिवसांत भरावयाचा असतो. हें सर्व साहित्य कुजल्यावर ४–६ महिन्यांत चांगलें खत तयार होतें. सामान्यत: अेका खड्ड्यांतून पांच गाड्या खत मिळतें.

**शेणखत :–** या प्रकारचें खत तयार करण्यासाठीं कंपोस्ट खतासाठीं ज्या आकाराचा खड्डा खणावा लागतो, त्याच आकाराचा खड्डा खोदण्यांत येतो. हा खड्डा गोठ्यांतील गुरांच्या पायांखालील केरकचरा, शेण, मूत, वगैरेंनीं कप्याकप्यांनीं भरण्यांत येतो. गोठ्यांतील दिवसभराचा कचरा या खड्ड्यांत भरून झाल्यावर त्यांवर शेण व राख टाकण्यांत येते व पातळसा अेक मातीचा थरहि देण्यांत येतो. अशा रीतीनें हा खड्डा भरण्यांत येतो. खड्डा संपूर्ण भरून झाल्यावर मातीनें तो झांकण्यांत येतो. हें खतहि कंपोस्ट खताप्रमाणें ४-६ महिन्यांत चांगलें तयार होतें. अेका खड्ड्यांतून पांच गाड्या खत मिळतें.

**शहरी कंपोस्ट :–** शहर भागांत केरकचरा आणि मानवी मलमूत्र यांपासून कंपोस्ट तयार करण्याच्या बाबतींत नगरपालिकांना अुत्तेजन देण्यांत येतें. या खतासाठींहि वर अुल्लेखलेल्या आकाराचाच खड्डा खोदतात. ज्याप्रमाणें खतासाठीं साहित्य अुपलब्ध असेल त्या मानानें खड्ड्याची लांबी वाढवितां येते. हें खतहि ४–६ महिन्यांत तयार होतें. पुष्कळ शेतकऱ्यांकडून या खताला मागणी असल्यामुळें बहुतेक नगरपालिकांनीं हें काम हातीं घेतलें आहे.

महाराष्ट्राला लांबच लांब समुद्रकिनारा लाभला असून त्यामुळें माशांचें खत भरपूर प्रमाणांत मिळू शकतें. मच्छीखतांत आणि हाडांच्या भुकटीमध्यें अनुक्रमें २–३ टक्के आणि १६–१८ टक्के फॉस्फेट असतें. हें खत मुख्यत: फळफळावळीच्या पीकांसाठीं वापरतात. स्थानिक विक्रेत्यांकडे हें मच्छिखत व हाडांची भुकटी मिळू शकतें.

**चराचे आणि गोपुरी संडास :–** खेडेगांवांत चराच्या आणि गोपुरी संडासांची शिफारस केली आहे. खत तयार करण्याचें काम ग्राम–पंचायत करते. ग्रामपंचायतींना अशा प्रकारचे संडास बांधण्याकरितां ५ हजार रुपयांपर्यंत कर्ज दिलें जातें. त्यांपैकी २ हजार रुपये आर्थिक मदत मानण्यांत येते. या संडासांमुळें गांवें स्वच्छ राहण्यास आणि खताची थोडीफार तूट भरून काढण्यास मदत होते. ग्रामपंचायतींना हें खत मुक्तपणें विकतां येते.

## पीकांचीं आणेवारी कशी ठरवितात

आणेवारी ठरविण्याकरीतां प्रत्येक गांवाची सर्कल अिन्स्पेक्टरच्या

[illegible] स्थळप्रत.

अध्यक्षतेखालीं कुलकर्णी, पाटील व शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी यांची एक समिती स्थापन करण्यांत येते. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी ग्रामपंचायतीमार्फत निवडले जातात. कांहीं तालुक्यांमध्यें सर्कल अिन्स्पेक्टरऐवजीं रेव्हिन्यू अिन्स्पेक्टर हा या समितीचा अध्यक्ष असतो. मामलेदाराच्या सल्ल्यानें सर्कल अिन्स्पेक्टर किंवा रेव्हिन्यू अिन्स्पेक्टर खेड्यांना भेटी देतो. मुख्य पीकाच्या कापणीच्या हंगामापूर्वीच्या लगतच्या महिन्यांत या समितीची बैठक भरून आणेवारी काय असावी हें ठरविलें जातें. समितीचें मत सर्कल अिन्स्पेक्टर मार्फत मामलेदाराला कळविलें जातें. मामलेदार नंतर आपला निर्णय संबंधित गांवच्या पाटलाला कळवितो व पाटील दवंडी पिटून तो गांवांत जाहीर करतो. मामलेदाराच्या निर्णयास जर कोणाची हरकत असेल तर ती मामलेदाराचा निर्णय जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत सादर केली जावी. हरकतीमध्यें आपल्या निर्णयामध्यें दुरुस्ती करण्यासारखें मामलेदारांस काहीं आढळलें नाहीं तर आधींचा निर्णय कायम समजण्यांत येतो. मामलेदाराच्या निर्णयांत फेरफार करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार आहे.

## *कोणत्या महिन्यांत कोणतीं कामें करावीं*

**चैत्र**– जमिनीची नांगरणी आणि वखरणी करा. बांध दुरुस्त करा. खतें शेतांत न्या. भाजीपाल्यांच्या व ऊंसाच्या पीकांस पाणी द्या. **वैशाख**– नांगरटीचीं व वखरणीचीं कामें पूर्ण करा. जमीन समतळ करा. शेतें तयार करा. उभ्या पीकांना पाणी द्या. **ज्येष्ट**– पेरणीकरतां जमीन तयार करा. खतें घाला. ज्वारी, बाजरी, कापूस, भुईमूग, मूग, उडीद आदींची पेरणी करा. भाताचीं रोपे तयार करा. **आषाढ**– खरीप पिकांची पेरणी पूर्ण करा. रासायनिक खतें द्या. वेणणी करा. ऊंसाच्या पीकाला मातीची भर द्या. **श्रावण**– आंतर मशागत करा. तण काढा. रबीची जमीन नांगरा. रासायनिक खतें द्या. **भाद्रपद**– खरीपाच्या पीकांची आंतर मशागत करा. आवश्यक असल्यास ऊंस व अितर पीकांना पाणी द्या. उडीद व भुईमूग तयार झाला असेल तर कापणी करा. **आश्विन**– भुईमुगाच्या शेंगा काढा. लवकर येणाऱ्या भाताची, उडीद, मूग, पालेभाजी यांची कापणी करा. ऊंसाला पाणी द्या. रब्बीची जमीन नांगरा. हरबरा, गहूं व रब्बी ज्वारी यांची पेरणी करा. **कार्तिक**– कापूसवेंचणी सुरू करा. रब्बी पीकांची पेरणी, बाजरी, ज्वारी आदि खरीप पीकांची कापणी पूर्ण करा. **मार्गशीर्ष**– रब्बी पिकांना पाणी द्या. त्यांची आंतर मशागत करा. कापूस वेंचा. ऊंसाची कापणी करा. खरीप पिकांची कापणी झाल्यानंतर जमिनीची नांगरणी करा. **पौष**– गव्हाच्या पीकास पाणी द्या. त्याची आंतर मशागत करा. ऊंसाची कापणी करा. ऊंसाची नवीन पेरणी करा. **माघ**– हरबरा व कोरडा गहूं यांच्या कापणीला सुरवात करा. गव्हाला व ऊंसाला पाणी द्या. ऊंसाची कापणी पूर्ण करा. जमिनीची नांगरणी चालू ठेवा. **फाल्गुन**– गहूं,

ज्वारी, हरबरा यांची कापणी, पेरणी करा. जमिनीची नांगरणी चालू ठेवा. ऊस, भाजीपाला वगैरे पिकांना पाणी द्या.

## भात उत्पादनाच्या जपानी पद्धतींतील कांहीं महत्त्वाचे मुद्दे

१) जमिनीवर राब करूं नका. गादी वाफ्यांवर रोपें वाढवा. २) सुधारलेलें बियाणें वापरा. ३) बियाणें वापरण्यापूर्वी त्यांवर जंतुविनाशक व बुरशीनाशक द्रव्यें टाका. ४) बियाण्यांचें प्रमाण कमी ठेवा. ५) सेंद्रिय खताखेरीज कृत्रिम खतांचा उपयोग करा. ६) शक्य असेल तर हिरवें खत वापरा. ७) सरळ ओळींत रोपें लावा. ८) पिकांना योग्यवेळीं खतें द्या. ९) एकेका जागीं ३–४ रोपें लावा. १०) भाताच्या पीकाची ३–४ वेळां तरी आंतर मशागत करा. ११) रोग व किडी यांचा प्रतिबंध करण्यासाठीं उपाययोजना करा. १२) भाताचीं रोपें जमिनीवर लोळूं देऊं नका.

## सहकारी चळवळ

सहकारी चळवळ ही मूलतःच लोकशाहीप्रधान आहे. सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद हा या सहकारी चळवळीचा आधारस्तंभ आहे. साहजिकच यांतील प्रत्येक घटकाला जोवर आपलें ध्येय–धोरण आणि साध्य–साधन यांचा पूर्ण उलगडा होत नाहीं तोंवर या चळवळीचा उभारलेला डोलारा स्थिरावणार नाहीं. याचसाठीं प्रत्येक सहकारी संस्थेच्या सभासदाला सहकारी तत्त्वप्रणालीची ओळख व्हावयास हवी, आणि त्यासाठीं त्याला शिक्षण देण्याची सोय व्हावयास हवी.

१९४६ मध्यें सहकारी शिक्षणाची एक योजना श्री. मदन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीनें आंखली. सहकारी शिक्षण आणि सहकारवादाचा प्रसार करणाऱ्या मुंबईंतील मुंबई सहकारी संस्था (बाँबे को. ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट) या संस्थेकडे या समितीनें शिक्षणाचें काम सोपविलें. या नवीन योजनेप्रमाणें सहकारी शिक्षणाचे ३ भाग पडतात. १) जिल्हानिहाय. २) विभागनिहाय. ३) राज्यनिहाय.

१) सहकारी संस्थांना, चिटणीसांना व कार्यकारी समितीच्या सभासदांना शिक्षण देण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्याला मुंबई सहकारी संस्था एक सुपरवायझर नेमते. तोच सहकारी चळवळीचा प्रचारक व सहकारी शिक्षणाचा आधारस्तंभ असतो. २) महाराष्ट्र विभागासाठीं पुणें येथें सहकारी शिक्षण देणारी संस्था आहे. या संस्थेमधून सरकारी खात्यांमधील खालचा नोकर वर्ग, सुपरवायझर, बँक अिन्स्पेक्टर, दुय्यम सहकारी संस्थांचे अधिकारी, मोठ्या विविध कार्यकारी संस्थांचे चिटणीस, यांना शिक्षण दिलें जातें. येथें ४ महिने तात्त्विक

व २ महिने प्रात्यक्षिक शिक्षण देण्याची सोय आहे. ३) राज्यनिहाय सहकारी संस्थांच्या उच्च पदाधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठीं पुणें येथें एक सहकारी महाविद्यालय आहे. सहकारवादाचें उच्च शिक्षण देणारें हें भारतांतील पहिलेंच महाविद्यालय आहे.

सहकारी शिक्षणाचा उपयोग, दैनंदिन हिशेब ठेवणें वगैरे, एवढाच नसून प्रत्येक कार्यकर्त्याला सहकारी तत्त्वप्रणालीची तात्त्विक बैठक कळली पाहिजे व तद्नुसार कार्य करण्याची इच्छा निर्माण झाली पाहिजे, हा आहे. तो तसा होत नसेल तर त्याआड कोणत्या गोष्टी येतात यांसाठीं संशोधन व्हावयास हवें. अशा तऱ्हेच्या संशोधनाची फार गरज आहे.

**सहकार : प्रसार आणि प्रचार :–** शाळा, महाविद्यालयें, व्याख्यानें हीं अधिकारी वर्गासाठीं ठीक आहेत, पण सहकारी चळवळीचा अधिक प्रसार आणि प्रचार प्रत्येक सहकारी संस्थाच आपल्या प्रत्यक्ष कार्यानें करूं शकेल. प्रत्येक सहकारी संस्था ही प्रचार–प्रसाराचें केंद्र बनली पाहिजे. सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळानें किंवा तिच्या समितीनें नवीन नवीन प्रसिद्ध होणारें सहकारविषयक लिखाण अभ्यासलें पाहिजे व त्याप्रमाणें या चळवळीचें ज्ञान सर्व सभासदांना करून द्यावयास हवें. किंबहुना आपल्या संस्थेच्या बिगर सभासदांना देखील सहकारी तत्वप्रणाली समजावून सांगितली पाहिजे व त्यांना या चळवळींत ओढलें पाहिजे. सहकारी चळवळीची प्रगति सर्वसामान्य नागरिक शिक्षणांत जसा पुढें जाईल, त्यामानानें होईल.

**सहकार– चळवळ आणि सरकार :–** सहकार चळवळ ही वास्तविक लोकांनीं आपणहून सुरू केलेली चळवळ होय, स्वतःच्याच उन्नतिसाठीं आपणच चालविलेली चळवळ होय. तिचें यशापयश हें सभासदांच्या ऐहिक व नैतिक पातळीवर अवलंबून असतें. भारतामध्यें विखुरलेली शेती हा प्रधान व्यवसाय असल्यामुळें लोकांच्याकडून ही चळवळ सुरू होणें कठीणच होतें आणि म्हणूनच सरकारलाच सहकार चळवळीविषयीं खेडुतांमध्यें आत्मीयता निर्माण करून तिची सुरवात करावी लागली. तिच्या दैनंदिन व्यवहारांतहि सरकारलाच मदत करावी लागत आहे. आज चार तपांहून जास्त काळ लोटला आहे तरी ही चळवळ भारतामध्यें स्वसामर्थ्यावर उभी राहावी, तशी राहिली नाहीं. सरकारच्या स्वतःच्या हितासाठीं सहकारी चळवळ हें नवीन खातें सरकारनें उघडलें आहे, अशीच अजून जनतेची कल्पना दिसत आहे.

आज चार तपांनंतर भारतांतील सहकारी चळवळीचें मूल्यमापन केलें तर ही चळवळ महाराष्ट्रांत चांगली रुजली आहे, असेंच म्हणावें लागेल. अितर प्रांताप्रमाणें, मुंबई शहर वगळल्यास, महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर विषमता नाहीं. तशी विषमतेची मोठी भिंत उभी राहण्यापूर्वीच जर महाराष्ट्रामध्यें सहकारी

तत्वज्ञान समाजाच्या खालच्या थरामध्यें नेऊन भिडवलें तर या प्रयत्नाला विशेष यश येईल, याबद्दल संदेह वाटत नाहीं.

आजवर ही चळवळ कर्जवांटपावरच केंद्रित झालेली होती. ती परिस्थिति हळूहळू बदलत आहे. खरेदी–विक्री संघ, जिल्हा मध्यवर्ति बँका, घरें बांधणाऱ्या संस्था, यांचीहि वाढ होत आहे. औद्योगिक क्षेत्रामध्येंहि सहकार विचारांचें लोण पोहचलें आहे. मुंबईच्या सचिवालयांतील वरिष्ठाधिकाऱ्यापासून जंगलांमधील कामगारांपर्यंत सहकारी चळवळीचें क्षेत्र वाढलें आहे. सामुदायिक साखर कारखाने काढण्यापर्यंत सहकारी तत्वज्ञानानें महाराष्ट्रांत मजल गांठली आहे. लहान लहान प्रमाणावर, थोडया भांडवलाच्या जोरावर, कंपनी कायद्याप्रमाणें मर्यादित भांडवल पद्धतीवर संस्था स्थापणें फार जिकीरीचें व व्यवहारांत उतरविणें कठीण म्हणून सहकारी संस्था लोकप्रिय होत आहेत.

मुंबई राज्यांतील (द्वैभाषिक) ८५ टक्के गांवें व ग्रामीण भागांतील ३५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आतांपर्यंत सहकारी चळवळीमध्यें आली आहे. राज्याच्या ५४ हजार गांवांपैकीं ४८ हजार गांवांतून २५ हजारांहून अधिक ग्रामीण सहकारी संस्था कार्य करीत आहेत. या सर्व संस्थांनीं शेतमालाच्या उत्पादनासाठीं अल्प मुदतींचीं ५० कोटी रुपयांचीं व दीर्घ मुदतींचीं ७५ कोटी रुपयांची कर्जे दिलीं आहेत. लहान लहान सहकारी संस्थांना एकत्र आणण्यासाठीं तसेंच त्यांनी आपापसांत विचार विनिमय करून स्वतःचा कारभार सुधारावा यासाठीं व त्यांच्यावर सतत देखरेख राहावी म्हणून सहकारी देखरेख संघ स्थापन करण्याच्या दृष्टीनें सहकारी खात्यानें पावलें टाकली आहेत. तसेंच छोटयामोठया ग्रामसंस्थांत काम करण्यासाठीं प्रशिक्षित सेक्रेटरी तयार ठेवण्याच्या दृष्टीनेंहि उपाययोजना करण्यांत आल्या आहेत. याचा परिणाम म्हणजे तालुक्याला अथवा गटाला सर्वांगांनीं युक्त असा सहकारी देखरेख संघ मिळाला. अशा प्रकारच्या संस्था पूर्वी अस्तित्वांत नसलेल्या विदर्भ, मराठवाडा या विभागांतहि अशा प्रकारचे संघ स्थापन झाले आहेत. मुंबई राज्य सहकारी संघाच्याहि प्रादेशिक संस्था असून मुंबई राज्यांत सर्वत्र जिल्हा सहकारी मंडळें आहेत आणि तीं सहकाराची तत्वें आणि संघटना यांचा प्रचार करीत आहेत.

**जिल्हा सहकारी बँक :–** मुंबई राज्याच्या (द्वैभाषिक) ४२ जिल्ह्यांपैकीं २ जिल्हे वगळून बाकी सर्व जिल्ह्यांना जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक आहे. कांहीं जिल्ह्यांतून तर एकाहून अधिक सहकारी बँका आहेत. विदर्भांतहि हीच परिस्थिति आहे. या भागांतील कांहीं जिल्ह्यांमध्यें असलेल्या अनेक संस्थांचें विलीनीकरण करण्याचा सरकारचा विचार आहे. या संस्थांवरील खर्च कमी व्हावा व त्यांच्या कार्यक्षमतेंत सुधारणा व्हावी, म्हणून ही उपाययोजना करण्यांत येत आहे.

सहकारी प्रक्रियेंत विशेषत: कापूस व ऊंस यासारख्या पैसे देणाऱ्या पिकांच्या प्रक्रियेबाबत मुंबई राज्यानें वैशिष्ठ्यपूर्ण कामगिरी केली आहे. पूर्व खानदेशसारख्या कापसाच्या जिल्ह्यांतून कापसाचें जिनींग, प्रेसिंग, विक्री हें सर्व सहकाराच्या मार्गानें करण्यांत येतें यामुळें या क्षेत्रांतील खासगीरीत्या चढाओढ करणाऱ्यांची संख्या झपाट्यानें कमी होत आहे. आपल्याकडे यापूर्वींच सुमारें ८० जिनींग व प्रेसिंग सहकारी कारखाने असून असे अधिकाधिक कारखाने स्थापन होत आहेत. अमरावती, यवतमाळ व अितर जिल्ह्यांतून अशा प्रकारचे कारखाने रजिस्टर होत आहेत. त्याचप्रमाणें मिरची, काजू, केळीं वगैरे पदार्थांवर प्रक्रिया करण्याचें कामहि जेथें शक्य होईल तेथें सहकारी तत्त्वावर हातीं घेतलें जात आहे. यापुढे सहकारी संस्थांचें फळें–भाजीपाला डब्यांत भरण्यासंबंधींच्या व्यवसायाकडे अधिकाधिक लक्ष जाईल, अशी अपेक्षा आहे.

**साखर उत्पादनाची सोनेरी किल्ली :–** शेतमालांपैकीं प्रक्रिया करण्यासारखें पीक म्हणजे ऊंस हें होय. यापूर्वींच १६ सहकारी साखर कारखाने स्थापन झाले असून २१७८५०० पोतीं साखर तयार करण्याची त्यांची शक्ति आहे. अर्धविकसित भागांतील हा प्रत्येक सहकारी साखर कारखाना म्हणजे सामाजिक व आर्थिक विकासाचें केंद्र बनला आहे. त्यांतील उत्पादक सभासदांना व कामगारांना ऊंसापासून गूळ बनविण्याच्या धंद्यांत त्यांना पूर्वीं मिळणाऱ्या प्राप्तीपेक्षां ३० ते ५० लाख रुपये अधिक मिळत आहेत. यामुळें महाराष्ट्रांतील ऊंस उत्पादकांना आपल्या सर्वांगीण विकासासाठीं सहकारी साखर कारखाना ही एक प्रकारची सोनेरी किल्लीच आहे असें वाटूं लागलें आहे. म्हणून सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याची मागणी जोरदार होऊं लागली आहे. सुदैवानें भारत सरकारनें महाराष्ट्रांत साखर कारखाने उभारण्यास मान्यता दिली आहे. पंजाब व उत्तर प्रदेशांतील ऊंसामध्यें ९ ते १० टक्के शर्करांश असतो, तर महाराष्ट्रांतील ऊंसामध्यें तो सुमारे १२ टक्के असतो, या वस्तुस्थितीचाहि भारत सरकारनें विचार केला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मराठवाडा, विदर्भ, महाराष्ट्र विभागांत आणखी साखर कारखाने काढण्यासंबंधीं परवानगी मागण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

**नियंत्रित बाजार पेटा :–** बाजारपेठांचें नियंत्रण व उत्पादनाचें वर्गीकरण करणें या बाबतींत मुंबई राज्य नेहमींच आघाडीवर राहिलें आहे. भारतांतील अंदाजें ६०० नियंत्रित बाजारपेठांपैकीं मुंबई राज्यांत ३०० नियंत्रित बाजार पेठा आहेत. सहकारी खात्याचे रजिस्ट्रार व डायरेक्टर ऑफ अॅग्रिकल्चरल मार्केटींग यांच्या हाताखालीं नियंत्रित बाजारपेठांचें खास खातें आहे. चीफ मार्केटींग ऑफीसर हे त्यांना सहाय्यक म्हणून काम करतात. खुले लिलांव करून त्यावर योग्य देखरेख ठेवण्यांत

येते व या नियंत्रित बाजारांत शेतकऱ्यांच्या मालाची सुरळीतपणें विक्री होते. तेथें विक्रीसाठीं सोयी करण्यांत येतात व त्यामुळें या बाजारपेठांत विक्री केल्यानें शेतकऱ्यांनाहि फायदा होतो. सहकारी विक्री संस्था खासगी कमिशन एजंटांच्या बरोबरच लिलांवाच्या वेळीं बोली बोलत असल्यामुळें शेतकऱ्यांना बराच फायदा होत आहे. नियंत्रित बाजारपेठा नसल्या तर मध्यस्थी व दलाल हे शेतकऱ्याला कमी पैसे देतात आणि शहरांतील व्यापाऱ्यांपासून जास्त पैसे घेऊन मालाची विक्री करतात. अशा संस्थांमुळें या लोकांवर नियंत्रण राहील.

सहकारी चळवळीचें लोण खेड्यापाड्यांतून पोहचविण्यासाठीं सरकारनें अनेक दिशांनीं प्रयत्न चालविले आहेत. कारभाराच्या सोयींसाठीं पुढीलप्रमाणें सहकारी विभाग पाडण्यांत आले असून प्रत्येक विभागासाठीं एक डेप्युटी रजिस्ट्रार आणि प्रत्येक जिल्ह्यासाठीं एक असिस्टंट रजिस्ट्रार नेमण्यांत आला आहे. १) पुणें विभाग :– पुणें, सोलापूर, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, कोल्हापूर हे जिल्हे. २) मुंबई विभाग :– मुंबई (शहर व उपनगर), रत्नागिरी, कुलाबा, ठाणें हे जिल्हे. ३) नाशिक विभाग :– नाशिक, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, अहमदनगर हे जिल्हे. ४) नागपूर विभाग :– नागपूर, वर्धा, चांदा, भंडारा हे जिल्हे. ५) अमरावती विभाग :– अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला हे जिल्हे. ६) औरंगाबाद विभाग :– औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानावाद हे जिल्हे.

## महाराष्ट्रांतील खनिज व निसर्ग संपत्ति

जगांतील अितर राष्ट्रांचा विचार करतां भारतांत खनिज संपत्ति भरपूर आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं व हिंदुस्थानांतील अितर प्रांतांशीं तुलना करतां महाराष्ट्र खनिज संपत्तीच्या दृष्टीनें साधारणत: दरिद्रीच आहे, असें म्हणावें लागेल. खनिज संपत्ति ही केवळ अिश्वरी देणगी होय. मानवी प्रयत्नाला याबाबतींत फारच थोडा अवसर आहे. लाखों वर्षांपूर्वीं पृथ्वीवर भूकंप, ज्वालामुखी किंवा अितर नैसर्गिक क्रिया–प्रक्रिया यांच्यामुळें कांहीं गोष्टी घडून आल्या, स्थिर झाल्या, मानवी ज्ञानाच्या वाढीबरोबर या गोष्टींचा निरनिराळ्या कारणांसाठीं वापर होऊं लागला. मनुष्याच्या गरजे प्रमाणें व ज्ञानाप्रमाणें अस्तित्वांत असलेल्या खनिजांचा वापर करण्यास त्यानें सुरवात केली. खनिजें शोधून काढण्याचीं साधनें व त्यांचा उपयोग यांमध्यें वाढ होत आहे. त्यामुळें खनिजांची पाहणी पूर्ण झाली आहे असें केव्हांच म्हणतां यावयाचें नाहीं. भारतांतील खनिजांची पाहणी अिंग्रजांनीं गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत केली. त्या पाहणींत साधारणत: भारतांतील ब्रिटिश सत्तेचा अंमल असलेल्या भागाचाच समावेश झाला. संस्थांनी प्रदेशांतील खनिजांची व्यवस्थित अशी पाहणी

झालीच नाहीं. गेल्या पाऊण शतकांत कित्येक नवीन खनिजांची माहिती व स्वरूप नवीन साधनांच्या साहाय्यानें माहित झालें आहे. त्याची ओळख अजून आपणांस व्हावयाची आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या तीन भागांपैकीं विदर्भ हा खनिज संपत्तीच्या दृष्टीनें आघाडीवर आहे. मराठवाड्याची खनिज संपत्तीच्या दृष्टीनें पाहणी झालीच नाहीं. महाराष्ट्रांत नांव घेण्यासारखी खनिज संपत्ति बॉक्साईटचीच तेवढी आहे. आजपर्यंत झालेल्या भूगर्भ पाहणीवरून हें विधान केलें आहे. नवीन उपकरणें उपयोगांत आणून व तज्ज्ञांनीं विशेष करून पाहणी केल्यास आणखी कांहीं खनिज संपत्तीचा शोध लागेल असा संभव आहेच.

मॅंगेनीज :– महाराष्ट्रांतील सर्वांत महत्वाचा खनिज पदार्थ मँगेनीज हा होय. विदर्भांतील मँगेनीजचा सांठा हा जगांतील उत्तम मँगेनीजचा एक साठा समजण्यास हरकत नाहीं, अितका तो उत्तम दर्जाचा व विपुल आहे. या धातूला परदेशांत अतिशय मागणी असल्यानें ज्यूट व चहा यांप्रमाणेंच तें एक हुकमी व प्रभावी निर्यातिसाधन आहे. देशांत निर्माण होणारें बहुतेक सर्व मँगेनीज मूळ स्वरुपांतच परदेशीं रवाना होतें. भंडारा व नागपूर या जिल्ह्यांमध्यें उत्तम जातीचें मँगेनीज सांपडतें. सातारा, रत्नागिरी, कोल्हापूर या जिल्ह्यांतहि कांहीं प्रमाणांत मँगेनीज सांपडतें.

अल्युमिनियम् :– महाराष्ट्रांतील दुसरा महत्वाचा खनिज पदार्थ म्हणजे अल्यु-मिनियम् हा होय. ठाणें व कोल्हापूर या जिल्ह्यांमध्यें अॅल्युमिनियम्चे फार मोठे सांठे आहेत. त्या सांठ्यांचा उपयोग व्यापाराच्या व कारखानदारी वाढविण्याच्या दृष्टीनें जरी अद्याप झाला नाहीं तरी यापुढे होण्याची शक्यता आहे. शुद्ध अल्यु-मिनियम् तयार करण्यासाठीं वीज फार मोठ्या प्रमाणांत वापरावी लागते. कोल्हापूर जिल्ह्यांतील राधानगरी विद्युत्केंद्राचा उपयोग करून अल्युमिनियम्च्या उत्पादनाचे कारखाने उभारतां येतील. कुलाबा जिल्ह्यांतील वीजकेंद्राची वाढ केल्यास ठाणें जिल्ह्यांतहि अॅल्युमिनियम्चे कारखाने उभारतां येतील.

अॅल्युमिनियम्चा उपयोग :– "आजच्या मानवी व्यवहारास आवश्यक असणाऱ्या धातूंमध्यें लोह, तांबे, अॅल्युमिनियम् हे धातू प्रमुख होत. मानवी सुधारणा लोहामुळें झाली असली तरी अॅल्युमिनियम् लवकरच तांब्यालाहि मागें टाकील. पृथ्वीच्या खडकांतील घटकांत विपुलतेच्या दृष्टीनें अॅल्युमिनियम्चा क्रम तिसरा लागतो. खडकांतील लोहाचें प्रमाण अॅल्युमिनियम्पेक्षां कमी आहे. हलके-पणा व चिवटपणा हे या धातूचे गुण आहेत. पोलादाअितकाच कार्यक्षम पण वजनानें त्याच्या $\frac{1}{3}$ वजनाचा हा धातू आहे. अॅल्युमिनियम् व त्याचे मिश्र धातू यांचा उपयोग मुख्यत: रेल्वेचे डबे, मोटारी, विमानें आदि वाहनांच्या बांधणींत केला

जातो. एकूण वजनभार कमी असल्यानें वाहनांच्या विशेषत: विमानांच्या गतींत व एकूण कार्यक्षमतेंत आश्चर्यकारक प्रगति झालेली आहे. वीज दूर नेण्यासाठीं व शेकडो यंत्रांच्या उपकरणांसाठीं ॲल्युमिनियम्चा उपयोग हीत असल्यानें त्याची मागणी वाढतीच आहे. ॲल्युमिनियम्च्या लवणांचाहि अितर शेकडों रासायनिक क्रियांमध्यें उपयोग होत असतो." – प्रा. केळकर.

ॲल्युमिनियम् उपयुक्ततेच्या दृष्टीनें महत्वाचें असूनहि त्याचें उत्पादन करणें अतिशय कठीण व गुंतागुंतीचें असल्यानें उत्पादनाचे कारखाने निघूं शकले नाहींत. याशिवाय तंत्रज्ञांचा व भांडवलाचा तुटवडा हीं कारणें आहेतच. युद्ध व उद्योग-धंदे या दोन्ही बाबतींत अत्यंत उपयुक्त असा हा पदार्थ देशांतच संवर्धित झाला पाहिजे.

दगडी कोळसा :– उद्योगधंद्याच्या वाढीला अत्यंत आवश्यक असा दगडी कोळसा महाराष्ट्रांत भरपूर प्रमाणांत मिळत नाहीं. यवतमाळ, चांदा या जिल्ह्यांत दगडी कोळशाच्या खाणी आहेत. या खाणीमधील कोळसा स्थानिक उद्योगधंद्याच्या गरजेला पुरेसा आहे. अजून सर्व खाणी तपासून त्यांचा उपयोग केला जात नसला तरी महाराष्ट्राला पुरेल असा कोळसा या खाणींतून निघेल, असें वाटत नाहीं.

लोखंड :– महाराष्ट्रांतील दक्षिणेच्या टापूंत ज्वालामुखीच्या लाव्हा रसामुळें दगडांचा एक मोठा थर बसला आहे. पूर्वी या ठिकाणीं असणारे प्रदेश, दऱ्या, जंगलें यांची या नवीन थरामुळें उलथापालथ होऊन ते सर्व आंत दडपले गेले. महाराष्ट्रांतील कठीण दगडांच्याखालीं कदाचित् लोखंड किंवा दगडी कोळसा असेलहि. परंतु तो शोधणें, बाहेर काढणें हें काम खर्चाचें, जिकीरीचें व जवळ जवळ अशक्यच आहे. सह्याद्रीच्या कांहीं भागांतील मातीमध्यें लोखंड असावें असें दिसतें. पूर्वी लोहार या मातीपासून तवे तयार करून लोकांना पुरवीत असत. त्याचप्रमाणें चांदा जिल्ह्याच्या लोहारा टेकडींतहि लोखंडाची माती असावी. कारण आगरी लोक फार पूर्वीपासून या मातींतून जीवनोपयोगी वस्तू बनवीत असत. या टेकडी-मध्यें २० लक्ष टनांच्या आसपास लोखंडाचा सांठा असावा, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. अजून या मातीचा वापर करून लोखंड बनविण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहींत. झालेले प्रयत्न लहान लहान प्रमाणावर व जुन्या भट्ट्यांमधून झाले. सांपडणाऱ्या लोखंडाचा दर्जा मात्र वरचा आहे. नागपूर व यवतमाळ या जिल्ह्यांमध्येंहि लोखंडाच्या खाणी आढळतात.

मँगेनीज्, ॲल्युमिनियम्, लोखंड, दगडी कोळसा या धातूंशिवाय आणखीहि कांहीं धातू महाराष्ट्रांत सांपडतात. बुलढाणा जिल्ह्यांतील रामटेक तालुक्यांत कांहीं

ठिकाणीं तांबें व अभ्रकहि सांपडतें. बेळगांवजवळ सांपडणाऱ्या चिकणमातीपासून चिनी मातीच्या भांड्यांपेक्षांहि सरस अशीं भांडीं बनवितां येतात.

" सडकांसाठीं खडी आणि अिमारती व अितर बांधकामास लागणारा दगड मात्र महाराष्ट्रांत भरपूर आहे. कोंकण किनाऱ्यावर गणपति पुळ्याजवळ व अितर कांहीं जागीं काळी वाळू सांठलेली आढळते. या वाळूंत अिल्मेनाईट नांवाच्या खनिजाचें प्रमाण बरेंच असतें व त्यामुळेंच वाळुंस रंग आलेला असतो. समुद्राच्या लाटांमुळें दगडाचें चूर्ण होतें. दगडाचा भाग हलका असल्यामुळें त्याचे कण पाण्यांत जातात. व अिल्मेनाईटचे कण पाण्यांत राहतात. यांच्याच पुढें राशी बनतात. अिल्मेनाईट रंगानें काळें असतें. परंतु त्याच्यापासून बनविलेलें प्राणिद (ऑक्साईड) रंगानें पांढरें शुभ्र असतें व तें वापरून तयार केलेले रंग शुभ्रपणांत, किंमतीच्या बाबतींत, व टिकाऊपणांत प्रचारांतील अितर पांढऱ्या रंगांना मागे टाकणारें आहेत. त्यामुळें त्याचा खप अलिकडे वाढला आहे. निर्विष असणें हा त्या रंगाचा प्रमुख गुण आहे. . . . . . नद्यांच्या पात्रांत किंवा किनाऱ्यावर मधून मधून निरनिराळ्या रंगांचे गारीचे गोटे व थोडेफार झिजलेले स्फटिक गोटे सांपडतात. कला–कुसरीचे पदार्थ, मणी, अल्पमोलीं रत्नें करण्यासाठीं हे पदार्थ वापरतात. "

– प्रा केळकर.

विद्युत् शक्ति :– औद्योगिक वाढीला कोळसा पुरेसा नसल्यामुळें ती एक अडचण ठरली होती. सुदैवानें कोळशाच्या शक्तीवर निर्माण होणाऱ्या शक्तिपेक्षांहि अधिक उपयुक्त आणि स्वस्त अशी विद्युत् शक्ति, महाराष्ट्रांत हवी तेवढी उपलब्ध होण्यासारखी परिस्थिति आहे. सह्याद्री, विंध्याद्री, सातपुड्याचे डोंगर यांतून उगम पावणाऱ्या नद्या जर आडवल्या तर महाराष्ट्रांत औद्योगिक व अितर कामासाठीं आवश्यक अशा शक्तीपेक्षां कितीतरी पट अधिक शक्ति निर्माण होण्यासारखी निसर्गरचना आहे.

सह्याद्रींत उगम पावलेल्या नद्या अडवण्यासाठीं अत्यंत सोईस्कर अशा कितीतरी जागा महाराष्ट्रांत आहेत. सह्याद्रींतून उगम पावणाऱ्या नद्यांना दोन्ही बाजूंनीं उंच अशा डोंगराच्या भिंतींमुळें आपोआपच बंधारे निर्माण झाले आहेत. या पर्वतश्रेणी जेथें निमुळत्या व जवळ जवळ आलेल्या आहेत, अशा जागा पाहून पुढें बंधारा घालून नद्या अडवितां येतील. शेकडों फूट उंच व कित्येक मैल लांब अशा या निसर्गनिर्मित भिंती कोट्यावधि रुपये खर्चूनहि बांधतां यावयाच्या नाहींत. याशिवाय उंचावरून खोल दरींत पाणी जात असल्यामुळें वीज निर्माण करणें सोईचें जातें. पाण्याच्या मदतीवांचून यंत्राच्या शक्तीनें निर्माण केलेल्या विजेपेक्षां ही जलविद्युत् कितीतरी स्वस्त पडेल व वीजेचें उत्पादनहि अफाट होईल. याशिवाय या पाण्याचा पुढें शेतीसाठीं उपयोग करून घेतला तर तो दुष्काळी महाराष्ट्राला हवाच आहे.

## महाराष्ट्रांतील व्यापार

संपत्तीची निर्मिती आणि वांटप होण्यासाठीं व्यापाराची फार मोठी गरज असते. औद्योगिक युगामध्यें उत्पादनाअितकेंच व्यापारालाहि महत्व असतें. मालाच्या उत्पादनाखेरीज व्यापार होऊं शकत नाहीं, ही गोष्ट जितकी खरी तितकीच व्यापाराची वाढ झाल्याखेरीज उत्पादनवाढ होऊं शकणार नाहीं, हीहि गोष्ट खरी आहे.

व्यापारासारख्या विषयावर लिहावयाचें म्हणजे प्रामुख्यानें आंकड्यांवर अवलंबून राहावें लागतें. परंतु दुर्दैवानें आपल्याकडे अजून याचें महत्व ध्यानीं घेतलें जात नाहीं. किरकोळ व्यापाराचें क्षेत्र मर्यादित, त्यामुळें त्याचे आंकडे मिळणें अशक्य आहे. साधारण मोठ्या व्यापाराचे आंकडे पाहावें तर ते आंकडे एकत्रित मिळण्याची सोय नाहीं. विक्रीकराच्या आधारानें व्यापाराचे आंकडे तयार करावे तर विक्रीकरांतून कांहीं वस्तू वगळलेल्या असतात तर कांहीं वस्तूंवर अधिक कर बसविलेला असतो. असा फरक असल्यानें व्यापारी प्रगतीचे आंकडे तयार करणें धोक्याचें ठरतें. नगरपालिकांच्या हद्दींतील करांवरून हे आंकडे थोडेफार मिळतील. पण तसे आंकडे प्रसिद्ध करण्याची त्यांची पद्धत नाहीं. त्यामुळें आंकडे देणें आवश्यक असूनहि हे आंकडे देतां येत नाहींत. फक्त परदेशी आयात निर्यातीचें आंकडे मात्र व्यवस्थित मिळतात. परंतु हे आंकडे अखिल भारतीय स्वरुपाचे असल्यामुळें महाराष्ट्राच्या दृष्टीनें या आंकड्यांचा कांहींच उपयोग नाहीं. मुंबई शहराच्या आयात निर्यातीचे आंकडे म्हणजे महाराष्ट्राचें आंकडे असे मानल्यास ती एक मोठी चूक ठरेल. मुंबई शहर महाराष्ट्रांतील असलें, तरी या शहरांत येणारा--जाणारा माल फक्त महाराष्ट्रांतच येतो आणि महाराष्ट्रांतूनच जातो असें नाहीं. मुंबई हें उत्कृष्ट बंदर असल्यानें मालाची आवक--जावक मोठ्या प्रमाणांत होतें, एवढाच याचा अर्थ आहे. महाराष्ट्राच्या व्यापारी आंकड्यांत मुंबईचे आंकडे मिसळणें उपयोगाचें नाहीं.

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांचा व्यापाराच्या दृष्टीनें विचार करतां मुंबई शहर हें व्यापारी दृष्टीनें प्रगत असें शहर आहे असें आपणास दिसून येईल. भारतांतील फार मोठा व्यापार या शहरांत सामावलेला आहे. मात्र हा व्यापार सर्वस्वी महाराष्ट्रीयेतरांच्या हातीं आहे. कराची बंदर पाकिस्तानांत गेल्यानें मुंबई बंदराचें महत्व साहजिकच आणखी वाढलें. मुंबई ही उत्पादन आणि व्यापार या दोन्हीं दृष्टीनीं महाराष्ट्राची कामधेनु आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

पण नजीकच्या भविष्यकाळामध्यें मुंबई शहरासंबंधीचा एक धोका निर्माण होऊं पहात आहे. प्रस्तुत प्रकरणांतील विषयापासून अगदी वेगळा पण महत्वाचा मुद्दा आम्हीं वाचकांपुढे ठेवीत आहोत.

ह्या मजकूर लिहित असतांनाच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचें विधेयक चर्चेला आलेलें आहे. ठराविक वर्षांपर्यंत कांहीं कोटींची रक्कम गुजराथ राज्याला महाराष्ट्रानें द्यावी, असें ठरविलें जात आहे. अशावेळीं मुंबई शहरांतील गुजराथी उद्योगपती आपला धंदा–व्यवसाय मुंबईबाहेर नेण्याचा विचार करीत आहेत. असें झालें तर ज्यासाठीं मुंबई हवी आहे, तीच गोष्ट बाहेर घालविल्यासारखें होईल. व्यापाराचा राष्ट्राला किती उपयोग होतो, किती समृद्धी वाढते, याचें सुंदर विवेचन रामचंद्रपंत अमात्य या महाराष्ट्रीय राजनीतीतत्वज्ञानें २५० वर्षांपूर्वी केलें आहे. या विवेचनाचा खोल अर्थ ध्यानीं घेऊन मुंबईंतील व्यवसाय मुंबईबाहेर जाणार नाहींत, याबद्दल आपण जागरूक राहिलें पाहिजे. एक वेळ मुंबईच्या गिरण्या महाराष्ट्राच्या अंगावर पडल्या तर त्या गिरण्या महाराष्ट्र चालवू शकेल. परंतु व्यापारांत अनुभव, पत, भांडवल, पूर्वऋणानुबंध या गोष्टी महत्वाच्या असल्यानें, नुसतें मुंबई शहर महाराष्ट्रांत राहिल्यानें मुंबईचा व्यापार महाराष्ट्राच्या हातीं आला असें मानणें ही एक भ्रामक कल्पना ठरेल.

मुंबई शहराचें व्यापारी व औद्योगिक महत्व लक्षांत घेऊनच व त्या ठिकाणचा भाषिक वाद ध्यानीं घेऊनच पूर्वींपासूनच गुजराथी उद्योगपतींनीं आपलीं पावलें टाकलेलीं आहेत. सर्वच दृष्टींनीं कापडाच्या धंद्याला अधिक अनकुलता असणाऱ्या मुंबई शहरापेक्षां अहमदाबाद शहरांत अधिक कापडाच्या गिरण्या आहेत. औद्योगिक वाढ शक्यतों मुंबई बाहेर करावयाची ही कृति बराच काळ न बोलतां उद्योगपतींनीं चालविलेली आहे. महा–गुजराथच्या हद्दींत एक उत्कृष्ट बंदर तयार करण्याची खटपट कै. वल्लभभाई पटेलांनीं करून ठेवली होती. आतां हें कांडला बंदर तयार झालें आहे. या बंदराला जोडणारे रस्ते व रेल्वे बांधली गेली आहे. दुसरें बंदर व अितर मार्ग फार दिवसांपासून गुजराथी लोकांनीं हेरले आहेत. महाराष्ट्र मात्र फक्त भाषिक राज्याची मागणीच करीत राहिला. " अितर ठिकाणचे व्यापारी प्रलोभनें दाखवून आणावेत व त्यांचा सन्मान करून त्यांना ठेवून घ्यावे ", हा रामचंद्रपंत अमात्यांचा पोक्त सल्ला विसरणें महाराष्ट्राला महाग पडणार आहे, एवढेंच आम्ही आज सांगत आहोंत.

<u>महाराष्ट्रांतील व्यापारी जाती–जमाती :–</u> मध्ययुगीन काळांत किंवा औद्योगिक युगाच्या अलिकडील काळांत महाराष्ट्रानें व्यापाराकडे फारसें लक्ष दिलें नाही, असें म्हणावयास हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांचा पिंड देवाण घेवाण करून नफा–तोटा पाहण्याकडे कधींच नव्हता व नाहीं. एक घाव दोन तुकडे असा स्वभाव असल्यामुळें महाराष्ट्रानें राजकारणांत कांहीं काळ सबंध भारतांत स्वामित्व प्रस्थापित केलें असलें तरी व्यापाराच्या बाबतींत त्याला आघाडीच काय पण आपलें घरसुद्धां सांभाळतां आलें नाहीं महाराष्ट्रांतील व्यापारी जमातीचा

यादृष्टीनें बारकाईनें अभ्यास करण्याजोगा आहे. गांवोगांव पसरलेल्या, छोटया व मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रांत व्यापार करणाऱ्या जमातींत महाराष्ट्रीय कोणीच नव्हते. लिंगायत वाणी कर्नाटकांतून आले. गुजराथी व मारवाडी गुजराथेंतून व मारवाडमधून आले. त्याचप्रमाणें अितरहि जमाती येथें आल्या व महाराष्ट्रांतील व्यापारांत कांहीं स्थान मिळवून त्या जमाती येथेंच स्थायिक झाल्या. अगदी अलीकडे कांहीं महाराष्ट्रीयांनीं व्यापारांत शिरण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु उल्लेखनीय यश अद्याप त्यांना आलेलें नाहीं. त्यामुळें महाराष्ट्रांतील व्यापार याचा अर्थ महाराष्ट्र प्रदेशांत होत असलेला व झालेला व्यापार अितकाच करणें भाग आहे.

**प्राचीन कालचा व्यापार :–** अतिप्राचीन कालीं भारताचा अितर जगाशीं व्यापारी संबंध होता हें उत्खननानें व इतर पुराव्यानें सिद्ध झालें आहे. भारतांतील या व्यापारांत महाराष्ट्राचें स्थान वरचें होतें. हा बराचसा पश्चिम किनाऱ्यानें होत असे. समुद्रमार्गानें माल प्रथम सोपारे बंदरांत येई. तेथून कल्याण, नाणेघाट, जुन्नर, अहमदनगर, पैठण या मार्गानें सर्व देशांत पसरला जात असे. बैलांचे तांडे माल भरून घेऊन निघत असत. अनेक सौदागर एकमेकांना साथ करीत निघत. त्यांचीं थांबण्याचीं ठिकाणें ठरलेलीं असत. बैल आणि माणसें यांची खाण्यापिण्याची तरतूद त्या ठिकाणीं आगाऊ केलेली असे. निरनिराळ्या रस्त्यांनी राज्यांच्या सरहद्दीच्या आंत जाण्यासाठीं लागणारीं कागदपत्रें, सरकारी परवाने या सौदागरांचेजवळ असत. यांपैकीं बऱ्याच गोष्टीवर आतां संशोधनानें प्रकाश पडूं लागला आहे. मात्र या व्यापार करणाऱ्या जाती, व्यापारांतील जिनसा, व्यापाराचें माध्यम, विस्तार यांवर अद्याप बरीच माहिती उपलब्ध व्हावयाची आहे.

व्यापाराशिवाय ज्याप्रमाणें समाजाला समृद्धी येत नाहीं, त्याप्रमाणें सोयीस्कर वाहतुकीचीं साधनें उपलब्ध झाल्याखेरीज व्यापाराला भरभराट येत नाहीं. प्राचीन कालीं किंवा मराठेशाहीमध्यें व्यापार मोठ्या प्रमाणावर होत नसे, याचें मुख्य कारण म्हणजे वाहतुकीची असलेली गैरसोय हें होय. त्यावेळीं बैल, उंट, घोडीं, खेचरें यांचे तांडे सौदागरांना अिकडे तिकडून न्यावे लागत. या जनावरांच्या खाण्यापिण्याची सोय व दरोडेखोरांच्या हल्ल्यांपासून बचावाची तरतूद या गोष्टींमुळें फार कष्ट पडत असत. त्यामुळें उत्पादन वाढविण्याची शक्यता असूनहि व्यापार मोठ्या प्रमाणावर होणें शक्य नसे.

१८५३ मध्यें सरकारनें रेल्वेची उभारणी करून या देशांत औद्योगिक प्रगतीचा पाया घातला. हिंदुस्तानांत रेल्वेची उभारणी करतांना ब्रिटिश सत्तेपुढें ३ उद्देश होते. १) जिंकलेल्या मुलखांवर स्वामित्व ठेवण्यासाठीं लष्कराची हाल-

चाल सुलभपणें करतां यावी. २) कच्चा माल बंदराकडे पाठवून परदेशीं पोहचविण्यास व परदेशाचा पक्का माल भारतांत आणून त्याचा प्रसार करण्यास सुलभ जावें. ३) भारतांत वेळोवेळीं होणारे दुष्काळ, प्राणहानी, वित्तहानी टाळून धान्य, चारा आदींची वाहतुक सुलभ व्हावी हे ते उद्देश होते. रेल्वेपेक्षां रस्ते उभारण्याची कारणपरंपरा वेगळी आहे. अिंग्रज अधिकाऱ्यांना चोहोंकडे हिंडतां येऊन देशांतील माहिती घेतां यावी हें एक कारण रस्तेविस्ताराच्या मागें होतें. त्यांनीं रस्त्यांची उभारणी केली म्हणण्यापेक्षां रस्त्यांची उभारणी झाली असें म्हणणें योग्य ठरेल. १८७६, १८९६, १९३६, १९५२–५३ यासालीं जे दुष्काळ महाराष्ट्रांत पडले त्यावेळीं लोकांना नुसतें खाण्यापिण्याला देण्याऐवजी दुष्काळग्रस्तांकडून खडी फोडणें, रस्ते खोदणें, हीं कामें करून घ्यावीं हा हेतू रस्ते-उभारणीमागे होता. सरकारचा हेतू कोणताहि असो, त्याचें पर्यवसान व्यापाराच्या सोयी वाढविण्यांत झाला, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. मात्र नवीन वाहतुकीच्या सोयी करतांना जुन्या मार्गाचा उपयोग करण्याचा फारसा विचार सरकारकडून झाला नाहीं. त्यामुळें पूर्वीं व्यापारासाठीं व क्षेत्रें वा राजधान्या म्हणून प्रसिद्ध असलेलीं शहरें व गांवें वाहतुकीच्या टप्प्यांतून वगळल्यामुळें ती शहरें व गांवें आतां मागें पडलीं. उलट पूर्वी ज्या ठिकाणांना महत्व नव्हतें अशीं ठिकाणें प्रसिद्धीला येऊन त्यांचीं मोठीं शहरें बनलीं. १७ व्या शतकामध्यें कोळयांची वाडी असलेली मुंबई जलमार्गाच्या वाहतुकीचें केंद्र व आजचें भारतांतील पहिल्या क्रमांकाचें व्यापारी केंद्र बनली आहे. सोलापूर, सांगली, वार्शी, लातूर, नांदेड हीं ठिकाणें रेल्वेला जोडलीं गेल्यानें व्यापारी दृष्टचा पुढे आलेलीं आहेत. या उलट रेल्वे फांटयापासून दूर राहिल्यानें जुन्नर, पैठण हीं गांवें मागें पडलीं आहेत. तसेच अहमदनगर, नाशिक, नागपूर, पंढरपूर हीं ठिकाणें वाहतुकीच्या सोयी उपलब्ध झाल्यानें आपलें पूर्वीचें वैभव व प्रगति टिकवून आहेत. पूर्वींच्या सरकारचा वाहतूक–सोयींसंबंधींचा असलेला उद्देश आज निरुपयोगी ठरला आहे. देशाचें संरक्षण, औद्योगिक प्रगति, मागासलेल्या प्रदेशांची सुधारणा या दृष्टीकोनांतून वाहतुकीच्या विकासाचा व वापराचा विचार आजचें सरकार करीत आहे.

वाहतुकीच्या या दृष्टीनें पाहतां महाराष्ट्राचा कोंकण विभाग मागास भाग आहे. कोंकणांत सह्याद्रीच्या अडथळयामुळें रेल्वे नेणें हें काम फार खर्चाचें व प्रदेश दरिद्री असल्यानें रेल्वेला उत्पन्न येणें कठीण हें जरी खरें असलें तरी रेल्वेला नुसता नफा–तोटा पाहून चालणार नाहीं. कोंकणांत रेल्वे नेल्यास दोन गोष्टी साधतां येतील. उरण, वेंगुर्लें, रत्नागिरी, मालवण आदि बंदरें वाहतुकीच्या दृष्टीनें वाढवितां येतील.या बंदरांना रेल्वेनें जोडल्यास मुंबईवरील भार बराच कमी होईल. त्याचप्रमाणें कोंकणांतील फळें, आंबे, काजू, नारळ, जंगली वनस्पती, लांकूड, कोळसा यांची वाहतुक फार मोठ्या प्रमाणांत करतां येईल. घाटांतून सडका असल्या

तरी त्यांवरून मोटार वाहतुक फार कमी प्रमाणांत होते. कोंकण रेल्वेची कोकणी जनतेची मागणी यामुळेंच फार जुनी आहे.

**व्यापारी पिकें :–** महाराष्ट्रांतील शेतकरी पूर्वी स्वतःच्या गरजेला आवश्यक त्या धान्याचें उत्पादन करीत असे. स्वतःची गरज भागवून शिल्लक राहिलेल्या धान्यांतून तो जीवनावश्यक अितर वस्तू बहुधा देवाण–घेवाणीच्या स्वरुपांत खरेदी करीत असे. अिंग्रजी अमदानीमध्यें या पद्धतींत बदल झाला. येथून कच्चा माल नेऊन त्यावर इंग्रजांना उद्योगधंदे काढावयाचे असल्यामुळें त्यांनीं रोख किंमत देऊन हा कच्च माल नेण्यास सुरवात केली. त्यामुळें या पीकांना व्यापारी पीकें असें नांव पडलें. ऊंस, कापूस, भुईमूग, तंबाखू, करडई आदि पीकें या सदरांत मोडतात. महाराष्ट्रांत व्यापारी पिकें मोठ्या प्रमाणावर पिकवलीं जातात. मात्र या पीकांचें एक वैशिष्ठ्य आहे. जीवनावश्यक अशा पिकांचें उत्पन्न हें स्थानिक बाजारांवर अवलंबून असल्यामुळें त्यांत फारसा बदल होत नाहीं. बदल झालाच तर दुष्काळ किंवा अमाप पीक आल्यानें किंमती कमीजास्त होण्याचा जो बदल होईल तेवढाच. परंतु व्यापारी पीकांची मागणी परदेशांतील असल्यानें त्यांच्या किंमती सहसा स्थिर असत नाहींत. जागतिक तेजी–मंदी, सट्टे या सर्वांचा त्यांच्या किंमतीवर परिणाम होणें अपरिहार्य आहे. यामुळें व्यापारी पीकांचें उत्पादन जितकें फायद्याचें तितकेंच तोटयाचें व धोक्याचें ठरत गेलें आहे. मालाच्या उत्पादनापेक्षांहि बाह्य गोष्टींवर विसंबून रहावें लागत असल्यानें शेतकऱ्यांना कित्येक वेळां या व्यापारी पीकांनीं दगा दिलेला आहे.

महाराष्ट्रांतील व्यापारी पीकें प्रामुख्यानें ४ आहेत. कापूस, भुईमूग, ऊंस व तंबाखू हीं तीं पीकें होत. यांपैकीं ऊंसाचा वापर स्थानिक असल्यानें त्याची निर्यात होत नाहीं. साखर आणि गूळ यांच्या उत्पादन क्षेत्रांत महाराष्ट्र अग्रेसर आहे. ऊंसाचा व्यापार छोटया–मोठ्या दोन्ही तऱ्हेच्या उद्योगधंद्यांत करून त्यापासून गूळ आणि साखर बनविली जाते. कापसाच्या बाबतींत पूर्वी कमी प्रतीचा कापूस निर्यात करून चांगला कापूस आयात करीत असत. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर कापसाचा तुटवडा पडल्यानें देशांतील कापूस आतां निर्यात करीत नाहींत. उलट लांब धाग्याच्या कापसाची लागवड करून देशांतील या प्रमुख व्यापारी पीकाचा दर्जा वाढविण्यांत आला आहे. कापूस प्रामुख्यानें विदर्भ, खानदेश, औरंगाबाद या टापूंत पिकतो. कापडाचा धंदा महाराष्ट्रांत असल्यानें सध्यां कापसाला मागणी भरपूर आहे.

**धान्य व्यापार :–** गेल्या १०–१२ वर्षांत शेतकऱ्यांचा बराचसा माल सरकारच खरेदी करीत असे व मालाच्या टंचाईमुळें धान्य खरेदी स्थानिक स्वरुपाचीच अधिक असे. शेतकरी दोन प्रकारचीं धान्यें पिकवीत असतो. गहूं, बाजरी, ज्वारी,

तांदूळ आदि अन्नधान्यें आणि जवस, भुईमूग, करडी आदि धान्य. पहिल्या प्रकारचें धान्य स्थानिक खपतें व दुसऱ्या प्रकारचें धान्य आडत्यांमार्फत विकलें जातें.

आतां मात्र हळूहळू आडत्यांमार्फत होणारी विक्री कमी कमी होत चालली आहे. मार्केट यार्डमध्यें मालविक्री होत असल्यानें शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता उरली नाहीं. सहकारी खरेदी विक्री संघामार्फत शेतकरी मालाची खरेदी-विक्री करूं शकतो.

हिंदुस्थानांतील कापडाच्या धंद्यांत महाराष्ट्र आघाडीवर आहे. पण येथील गिरण्यांना लागणारा बराच कापूस पाकिस्तानव्याप्त प्रदेशांतून येत असे. आतां अवमूल्यनाच्या वादामुळें पाकिस्तानी कापसाची आयात बंद झाली व त्याचा थोडा-फार परिणाम महाराष्ट्रांतील कापड धंद्यावर झाला.

भारतांतील सर्व राज्यांमध्यें महाराष्ट्राचें अग्रेसरत्व असणारा दुसरा धंदा चित्रपटांचा होय. मुंबअींत असणाऱ्या स्टुडिओंमध्यें हिंदुस्थानांतील जवळ जवळ सर्व भाषांमधील चित्रपट तयार होतात. पाकिस्तानमध्यें चित्रपट व्यवसाय रुजला नसल्यामुळें मुंबईच्या चित्रपटांनाच तेथें अधिक मागणी असे. लाहोरच्या स्टुडिओं मधील हिंदु तंत्रज्ञ निघून गेल्यानें तेथील व्यवसाय जवळ जवळ बंदच पडला. आतां तर पाक सरकारनें भारतीय चित्रपटांना बंदी घातली आहे. पाकसारख्या मोठ्या गिऱ्हाईकाला मुकल्यानें हिंदुस्थानच्या चित्रपटांना झीज सोसावी लागत आहे.

वसईचीं केळीं, विड्याचीं पानें, तंबाखूची विडी यावर बंधनें व बंदी घालून पाकनें महाराष्ट्रांतील या उद्योगधंद्यांच्या उत्पादनाला चांगलाच चिमटा घेतला आहे. पश्चिम पाकिस्तानमध्यें गेलेल्या प्रदेशांशीं व्यापार कराची बंदरांतून चालत असे. मुंबई– कराची जल–मार्गाची वाहतूक सोईची व स्वस्त असल्यानें हा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. परंतु आतां या व्यापाराचें आंतरप्रांतीय स्वरूप जाऊन त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप आल्यानें व व्यापारांत अितर आर्थिक व राजकीय प्रश्नांनीं हस्तक्षेप केला असल्यानें या व्यापारावर फारच प्रतिकूल परिणाम झाला आहे. महाराष्ट्रांतील उत्पादनाचें, सोईचें, खात्रीचें, गिऱ्हाईक गेल्यानें महाराष्ट्राचें व येथील धंद्याचें आर्थिक नुकसान झालें.

महाराष्ट्रांतील बहुतेक शहरांमध्यें निर्वासित व्यापाऱ्यांनीं बस्तान बसविलें आहे. महाराष्ट्रीयांनीं यांत विषाद मानण्यासारखें कांहीं नाहीं. या निर्वासितांची धंदा करण्याची एक हातोटी आहे. थोड्या भांडवलांत थोडा नफा घेऊन मालाचा भरपूर उठाव करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. तोंडानें गोड बोलणें व मनमिळाऊ स्वभाव या गुणांनीं महाराष्ट्रांतील व्यापार ते हस्तगत करीत आहेत.

महाराष्ट्र व्यापारामध्यें किती मागे पडला आहे याच्या विवेचनाची आतां

गरज वाटत नाहीं. व्यापाराशिवाय कोणतीहि व्यक्ति, समाज वा राष्ट्र संपन्न होऊंच शकत नाहीं. उत्पादन आणि व्यापार या दोन्ही आघाड्या महाराष्ट्रानें उपेक्षिल्या आहेत. महाराष्ट्रांत भांडवल नाहीं हें जितकें खरें तितकेंच भांडवल चांगला विश्वास संपादून वापरलें जात नाहीं हेंहि खरें आहे. एका व्यक्तीला जें साधणें शक्य आहे तें सहकार तत्वाचा आश्रय करून महाराष्ट्राला साधणें सहज शक्य आहे. सचोटी, संघटन-कौशल्य, गोडवा, आदि स्वभाववैशिष्ठ्यांची मात्र गरज आहे. राजकारण किंवा प्रतिष्ठा यांवर भर न देतां, उत्पादन व व्यापार यांवर आतां महाराष्ट्रानें भर द्यावयास हवा. महाराष्ट्राची जमीन फारशी पिकाऊ नाहीं. शेती सुधारणेनें आपले सर्व प्रश्न सुटणार नाहींत. या सर्व गोष्टी ध्यानीं घेऊन सहकार्यानें पण नियोजनपूर्वक महाराष्ट्रानें पावलें टाकलीं तरच आपले प्रश्न आपण सोडवूं शकूं, एरवी नाहीं.

## महाराष्ट्राचा औद्योगिक विकास

आजच्या जगांत औद्योगिक विकास हा साधारणतः देश अथवा प्रदेश यांच्या प्रगतीचा मानदंड मानण्यांत येतो. महाराष्ट्रांत अस्तित्वांत असलेल्या उद्योग–धंद्यांपैकीं प्रमुख उद्योगधंदे म्हणजे सुती कापड, अिलेक्ट्रीकल् अिंजिनियरींग, रसायनें, साखर, वनस्पतियुक्त पदार्थ, कागद व कागदाचे पुठ्ठे, साबण हे होत. यांपैकीं सुती कापडाचा उद्योग हा प्रमुख व मोठा उद्योगधंदा असून महाराष्ट्रांत ९७ कापड गिरण्या आहेत. त्यांमध्यें ३ लक्ष कामगार काम करीत आहेत. या गिरण्यांमध्यें ४१,२५,४२० चात्या व ८२,८२९ माग आहेत. या कापड गिरण्यांमध्यें ९७·१ कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें गेलें आहे.

**अिंजिनियरींग संबंधींचे उद्योग धंदे :–** अिंजिनियरींग संबंधीच्या उद्योग-धंद्यांच्या क्षेत्रांमध्यें अलिकडे महाराष्ट्रामध्यें विशेषत मुंबई विभागांत उल्लेखनीय अशी प्रगति घडून आली आहे. लेथ, शेपिंग मशीन, पील ड्रिलस्, वीजेचा हातोडा, धार कापण्याची करवत, पोलाद व बीड ओतण्याचें यंत्र, वेल्डीग, अिलेक्ट्रोडस्, अिलेक्ट्रिकल् स्टँपिंग, लिंक चेस्, स्टील फर्निचर व तिजोऱ्यांसारखीं यांत्रिक उपकरणें तयार होऊं लागलीं आहेत. तसेंच टाअीपरायटर्स, रेफ्रिजरेटर्स, रिसीव्हर्स, वायरलेस, आदि आधुनिक सामान तयार करण्यांत येऊं लागलें आहे. ही औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें स्वागतार्ह अशी गोष्ट आहे. डिझेल अिंजिनें, ऑईल अिंजिनें, साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री, जीप ट्रेलर्स, ट्रॅक्टर्स, शेतकी उपकरणें, विद्युत्माग आदींचें उत्पादन करणारे २७ उद्योगधंदे पुणें विभागांत आहेत.

**साखरेचे कारखाने :–** महाराष्ट्र राज्य हें देशांतील साखर उत्पादन करणाऱ्या प्रमुख राज्यांपैकीं एक राज्य आहे. महाराष्ट्रांत २६ साखर कारखाने असून त्यांची

तांदूळ आदि अन्नधान्यें आणि जवस, भुईमूग, करडी आदि धान्य. पहिल्या प्रकारचें धान्य स्थानिक खपतें व दुसऱ्या प्रकारचें धान्य आडत्यांमार्फत विकलें जातें.

आतां मात्र हळूहळू आडत्यांमार्फत होणारी विक्री कमी कमी होत चालली आहे. मार्केट यार्डमध्यें मालविक्री होत असल्यानें शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता उरली नाहीं. सहकारी खरेदी विक्री संघामार्फत शेतकरी मालाची खरेदी-विक्री करूं शकतो.

हिंदुस्थानांतील कापडाच्या धंद्यांत महाराष्ट्र आघाडीवर आहे. पण येथील गिरण्यांना लागणारा बराच कापूस पाकिस्तानव्याप्त प्रदेशांतून येत असे. आतां अवमूल्यनाच्या वादामुळें पाकिस्तानी कापसाची आयात बंद झाली व त्याचा थोडा-फार परिणाम महाराष्ट्रांतील कापड धंद्यावर झाला.

भारतांतील सर्व राज्यांमध्यें महाराष्ट्राचें अग्रेसरत्व असणारा दुसरा धंदा चित्रपटांचा होय. मुंबईंत असणाऱ्या स्टुडिओंमध्यें हिंदुस्थानांतील जवळ जवळ सर्व भाषांमधील चित्रपट तयार होतात. पाकिस्तानमध्यें चित्रपट व्यवसाय रुजला नसल्यामुळें मुंबईच्या चित्रपटांनाच तेथें अधिक मागणी असे. लाहोरच्या स्टुडिओं मधील हिंदु तंत्रज्ञ निघून गेल्यानें तेथील व्यवसाय जवळ जवळ बंदच पडला. आतां तर पाक सरकारनें भारतीय चित्रपटांना बंदी घातली आहे. पाकसारख्या मोठ्या गिऱ्हाईकाला मुकल्यानें हिंदुस्थानच्या चित्रपटांना झीज सोसावी लागत आहे.

वसईचीं केळीं, विड्याचीं पानें, तंबाखूची विडी यावर बंधनें व बंदी घालून पाकनें महाराष्ट्रांतील या उद्योगधंद्यांच्या उत्पादनाला चांगलाच चिमटा घेतला आहे. पश्चिम पाकिस्तानमध्यें गेलेल्या प्रदेशांशीं व्यापार कराची बंदरांतून चालत असे. मुंबई– कराची जल–मार्गाची वाहतूक सोईची व स्वस्त असल्यानें हा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. परंतु आतां या व्यापाराचें आंतरप्रांतीय स्वरूप जाऊन त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप आल्यानें व व्यापारांत अितर आर्थिक व राजकीय प्रश्नांनीं हस्तक्षेप केला असल्यानें या व्यापारावर फारच प्रतिकूल परिणाम झाला आहे. महाराष्ट्रांतील उत्पादनाचें, सोईचें, खात्रीचें, गिऱ्हाईक गेल्यानें महाराष्ट्राचें व येथील धंद्याचें आर्थिक नुकसान झालें.

महाराष्ट्रांतील बहुतेक शहरांमध्यें निर्वासित व्यापाऱ्यांनीं बस्तान बसविलें आहे. महाराष्ट्रीयांनीं यांत विषाद मानण्यासारखें कांहीं नाहीं. या निर्वासितांची धंदा करण्याची एक हातोटी आहे. थोड्या भांडवलांत थोडा नफा घेऊन मालाचा भरपूर उठाव करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. तोंडानें गोड बोलणें व मनमिळाऊ स्वभाव या गुणांनीं महाराष्ट्रांतील व्यापार ते हस्तगत करीत आहेत.

महाराष्ट्र व्यापारामध्यें किती मागे पडला आहे याच्या विवेचनाची आतां

गरज वाटत नाहीं. व्यापाराशिवाय कोणतीहि व्यक्ति, समाज वा राष्ट्र संपन्न होऊंच शकत नाहीं. उत्पादन आणि व्यापार या दोन्ही आघाड्या महाराष्ट्रानें उपेक्षिल्या आहेत. महाराष्ट्रांत भांडवल नाहीं हें जितकें खरें तितकेंच भांडवल चांगला विश्वास संपादून वापरलें जात नाहीं हेंहि खरें आहे. एका व्यक्तीला जें साधणें शक्य आहे तें सहकार तत्वाचा आश्रय करून महाराष्ट्राला साधणें सहज शक्य आहे. सचोटी, संघटन-कौशल्य, गोडवा,आदि स्वभाववैशिष्ठ्यांची मात्र गरज आहे. राजकारण किंवा प्रतिष्ठा यांवर भर न देतां, उत्पादन व व्यापार यांवर आतां महाराष्ट्रानें भर द्यावयास हवा. महाराष्ट्राची जमीन फारशी पिकाऊ नाहीं. शेती सुधारणेनें आपले सर्व प्रश्न सुटणार नाहींत. या सर्व गोष्ट्री ध्यानीं घेऊन सहकार्यानें पण नियोजनपूर्वक महाराष्ट्रानें पावलें टाकलीं तरच आपले प्रश्न आपण सोडवूं शकूं, एरवी नाहीं.

## *महाराष्ट्राचा औद्योगिक विकास*

आजच्या जगांत औद्योगिक विकास हा साधारणतः देश अथवा प्रदेश यांच्या प्रगतीचा मानदंड मानण्यांत येतो. महाराष्ट्रांत अस्तित्वांत असलेल्या उद्योग-धंद्यांपैकीं प्रमुख उद्योगधंदे म्हणजे सुती कापड, अिलेक्ट्रीकल् अिंजिनियरींग, रसायनें, साखर, वनस्पतियुक्त पदार्थ, कागद व कागदाचे पुठ्ठे, साबण हे होत. यांपैकीं सुती कापडाचा उद्योग हा प्रमुख व मोठा उद्योगधंदा असून महाराष्ट्रांत ९७ कापड गिरण्या आहेत. त्यांमध्यें ३ लक्ष कामगार काम करीत आहेत. या गिरण्यांमध्यें ४१,२५,४२० चात्या व ८२,८२९ माग आहेत. या कापड गिरण्यांमध्यें ९७·१ कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें गेलें आहे.

**अिंजिनियरींग संबंधींचे उद्योग धंदे :–** अिंजिनियरींग संबंधींच्या उद्योग-धंद्यांच्या क्षेत्रांमध्यें अलिकडे महाराष्ट्रामध्यें विशेषतः मुंबई विभागांत उल्लेखनीय अशी प्रगति घडून आली आहे. लेथ, शेपिंग मशीन, पील ड्रिलस्, वीजेचा हातोडा, धार कापण्याची करवत, पोलाद व बीड ओतण्याचें यंत्र, वेल्डींग, अिलेक्ट्रोडस्, अिलेक्ट्रिकल् स्टँपिंग, लिंक चेस्, स्टील फर्निचर व तिजोर्‍यांसारखीं यांत्रिक उपकरणें तयार होऊं लागलीं आहेत. तसेंच टाअीपरायटर्स, रेफ्रिजरेटर्स, रिसीव्हर्स, वायरलेस, आदि आधुनिक सामान तयार करण्यांत येऊं लागलें आहे. ही औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें स्वागतार्ह अशी गोष्ट आहे. डिझेल अिंजिनें, ऑईल अिंजिनें, साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री, जीप ट्रेलर्स, ट्रॅक्टर्स, शेतकी उपकरणें, विद्युत्माग आदींचें उत्पादन करणारे २७ उद्योगधंदे पुणें विभागांत आहेत.

**साखरेचे कारखाने :–** महाराष्ट्र राज्य हें देशांतील साखर उत्पादन करणार्‍या प्रमुख राज्यांपैकीं एक राज्य आहे. महाराष्ट्रांत २६ साखर कारखाने असून त्यांची

दर दिवसाची रस गाळण्याची शक्ति २४,८०० टन आहे. साखर धंद्याचें एक खास वैशिष्ठ्य म्हणजे सहकारी तत्वावर हा व्यवसाय उभारलेला आहे.

अल्कोहोल :– साखरेच्या उद्योगधंद्याप्रमाणेंच अिंडस्ट्रियल अल्कोहोलचा धंदा असून, साखर कारखान्यापासून मिळणाऱ्या काकवीमुळें या धंद्याचा विकास करतां येईल. येथील अल्कोहोल जरी सध्यां पॉवर अल्कोहोलच्या स्वरुपांत व कांहीं मर्यादित प्रमाणांतच उद्योगधंद्यासाठीं वापरण्यांत येत असला तरी तो अनेक धंद्यांस लागणारा पदार्थ आहे. औद्योगीकरणासाठीं पॉवर अल्कोहोलची मागणी वाढत असल्यानें अहमदनगर जिल्ह्यांतील चितळी येथें ७१ लाख रुपये खर्चून एक मोठा कारखाना बांधण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. या नवीन कारखान्याची दर दिवसाची उत्पादन–शक्ति ९ हजार गॅलन राहील.

महाराष्ट्रांतील रासायनिक उद्योगधंद्याची वेगानें प्रगति होत असून या धंद्यांत अनेक प्रकारचे पदार्थ तयार होत आहेत. उदाहरणार्थ हेवी केमिकल्स्मध्यें ॲसिड, सॉल्ट, सुफरफॉस्फेट, कॉस्टिक सोडा यांचा समावेश होतो, तर फाईन केमिकल्समध्यें हायड्रोजन, पेरावसॉईड, फोटोग्राफीचीं रसायनें यांचा समावेश होतो.

मुंबई, ठाणें, पारनेर हीं रंग तयार करणारीं प्रमुख केंद्रें आहेत. मोटारींचें उत्पादन व सायकली, आणि स्कुटर आदींचें उत्पादन ३ मोठे कारखाने करीत आहेत. सायकल उत्पादन धंद्याची प्रगति असून दरवर्षी २,३०,००० सायकली तयार करण्याची या धंद्याची क्षमता आहे.

महाराष्ट्रामध्यें कागदाच्या तीन गिरण्या आहेत.

महसूल खाते


PHONE : 50
TELEGRAM : STANDARD
Standard
SILK FACTORY
PAITHAN ROAD
AURANGABAD
DEPOTS:-
AURANGABAD
STANDARD SILK FACTORY
JAMES STREET, SECUNDERABAD (A. P.)
AURANGABAD
STANDARD SILK FACTORY
PATHARGATTI, HYDERABAD. (A. P.)
SHOW ROOM
Standard
Silk Factory
AURANGABAD
RAILWAY STATION ROAD
AGENTS THROUGHOUT IN INDIA

ओगले

# प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह




**नवी वैशिष्टे**

१) अखंड बेस प्लेट. २) प्रत्येक भाग एनॅमल्ड केलेला.
३) आकर्षक रंग. ४) उत्कृष्ट रचना व कार्यक्षमता.
५) तेल टाकीचें संरक्षणात्मक आच्छादन.
६) नित्योपयोगी करड्या रंगात व अन्य आकर्षक रंगात.

मिळण्याचें ठिकाण
कुठल्याही मोठ्या दुकानीं
अगर लिहा

तयार करणार :
ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी, (जि. उत्तर सातारा)

OSM 2/59


PHONE : 50
TELEGRAM : STANDARD
Standard
SILK FACTORY
PAITHAN ROAD
AURANGABAD
STANDARD SILK FACTORY
DEPOTS:-
AURANGABAD
STANDARD SILK FACTORY
JAMES STREET, SECUNDERABAD (A. P.)
AURANGABAD
STANDARD SILK FACTORY
PATHARGATTI, HYDERABAD. (A. P.)
SHOW ROOM
Standard
Silk Factory
AURANGABAD
RAILWAY STATION ROAD
AGENTS THROUGHOUT IN INDIA



बालकोंकी

तन्दुरुस्ती और ताकत बढ़ाता है.

हरेक केमिस्ट और स्टोरसे मीलता है.

GUJARAT

बी. ए. ऐन्ड ब्रदर्स : बम्बई-२

कलकत्ता, पटना और गौहाटी

# भारत

# भारत आणि भारतीय

## भारताचा भूभाग

भारत हा पर्वत व समुद्र यांच्यायोगें आशिया खंडांतील अन्य देशापेक्षां भौगोलिक दृष्टचा अलग असलेला अेक स्वतंत्र देश आहे. या देशाच्या उत्तरेस हिमालय, दक्षिणेस हिंदी महासागर, पूर्वेस बंगालचा उप-सागर व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. हा सारा देश विषुववृत्ताच्या उत्तरेस ८° पासून ३७° च्या अक्षांशावर व ६८° पासून ९८° च्या रेखांशावर वसलेला आहे. देशाची दक्षिणोत्तर लांबी २००० मैल असून पूर्व पश्चिम रुंदी १७०० मैल आहे. साऱ्या देशाचें क्षेत्रफळ १२,५९,७९७ चौरस मैल आहे. उत्तरेस हिमालयाजवळ सिकीयांग, तिबेट, नेपाळ हे देश आहेत. या प्रदेशांमध्येंच सिक्कीम व भूतान हीं राज्यें आहेत. हीं राज्यें विशेष करारानें भारताशीं संबंधित आहेत. पूर्वेच्या कांहीं पर्वतश्रेणीमुळें भारत व ब्रह्मदेश हे दोन्ही देश अलग झाले आहेत. पश्चिम बंगाल व आसाम या प्रांताच्या खालीं उत्तर-पूर्व दिशेला पूर्व पाकिस्थान असून भारताच्या पश्चिम-उत्तर सीमेवर पश्चिम पाकिस्थान आहे. बंगालच्या उपसागरांत असलेले अंदमान, निकोबार हे द्वीपसमूह व अरबी समुद्रामध्यें असलेले लखदीव, मालदीव हे द्वीपसमूह भारताचें अंग म्हणून मानले जातात.

## हवामानाचे कालखंड

भारत हा उष्णताप्रधान देश आहे. सर्वसाधारणपणें खालील कालखंडांत हवामान बदलतें. :–

१) ऑक्टोबर पासून फेब्रुवारी अखेर – थंडीचें हवामान.

२) मार्च पासून जूनचा प्रारंभ अगर मध्य अखेर – उष्ण हवामान

३) जूनचा प्रारंभ वा मध्यापासून सप्टेंबर अखेर – पावसाळी हवामान.

## पर्जन्यमानानुसार भूखंड

भारतांत पर्जन्यमानानुसार खालील भूखंड निर्माण होतात.

क) ८० इंच वा अधिक पर्जन्यमान असलेला प्रदेश – कोंकणपट्टी, बंगाल, आसाम आदि.

ख) ४० इंच वा अधिक पर्जन्यमान असलेला प्रदेश – सिंधू-गंगा-नदीच्या पठाराचा मध्यभाग, उत्तरेकडील पूर्वभागाचें पठार.

ग) २० इंच वा अधिक पर्जन्यमान असलेला प्रदेश – मद्रास, दक्षिणेचें पठार, दक्षिण पठाराचा दक्षिण-उत्तर-पश्चिम भाग.

## जनसंख्या

भारताची लोकसंख्या १९५१ च्या शीरगणतीनुसार ३६,११,५१,६६९ होती. सन १९५६ मध्यें एक हजार लोकसंख्येमागें २७·४ हें जन्मप्रमाण व ११·६ मृत्युप्रमाण होतें. खेड्यामध्यें शेंकडा ८२·७ व शहरामध्यें १७·३ लोकसंख्येचें प्रमाण आहे.

## सामाजिक रूप

भारतांत भिन्न भिन्न धर्मीय लोकसंख्या आहे. यामध्यें ८४·९९ हिंदु, ९·९३ मुसलमान, २·३० पारशी, १·७४ शीख, असें प्रमाण आहे. अितर लोकसंख्या ही अन्य धर्म मानणारी आहे.

## निर्वाहाच्या साधनांचें स्वरूप

भारतांत निर्वाहाचे साधन असलेल्या लोकसंख्येचें प्रमाण खालीलप्रमाणें:– प्रत्येक १०० भारतीयांत ४७ शेतकरी – (स्वतःची अल्प जमीन), ९ शेतमजूर, १३ भूमिहीन मजूर, १ जमीनदार, १० वेगवेगळ्या धंद्यांत काम करणारे मजूर, ६ व्यापारी, २ हमाली काम करणारे मजूर, १२ वेगवेगळ्या व्यवसायामध्यें असलेल्या व्यक्ति. असें सर्वसामान्य प्रमाण आहे.

## घटनामान्य भाषा

भारताच्या राज्यघटनेमध्ये खालील भाषांना मान्यता दिली आहे :– त्यांचा उल्लेख राज्यघटनेमध्यें केलेला आहे. १ हिंदी, २ पंजाबी, ३ गुजराथी ४ तामीळ, ५ उडीया, ६ आसामी, ७ काश्मिरी, ८ संस्कृत, ९ उर्दू, १० मराठी ११ तेलगू, १२ कानडी, १३ बंगाली, १४ मल्याळी.

शेंकडा ९१ टक्के जनता वर उल्लेखिलेली कोणती ना कोणती भाषा– पोटभाषा बोलते बाकीची जनता अन्य भाषा बोलते.

## भारताचें मानचिन्ह

चक्रवर्ति राजा अशोक यानें सारनाथ येथें उभारलेल्या सिंहस्तंभाची प्रति-कृति भारतानें मानचिन्ह म्हणून स्विकारली आहे. भगवान बुद्धानें आपल्या अष्टांग-मार्गाची दीक्षा आपल्या अनुयायांना प्रथम या ठिकाणीं दिली. त्याच्या स्मरणार्थ राजा अशोकानें हा स्तंभ उभा केला.

स्तंभाच्या सर्वांत वरच्या चौथऱ्यावर चार सिंह चारी दिशेस तोंड करून उभे आहेत. या चौथऱ्याच्या खालच्या पट्टीवर अेक हत्ती, अेक वेगानें धांवणारा

घोडा, अेक बैल आणि अेक सिंह यांची प्रतिकृति आहे, आणि यांच्यामध्यें 'धर्मचक्र' आहे.

२६ जानेवारी १९५० मध्यें भारत सरकारनें 'राष्ट्रीय मानचिन्ह' म्हणून केवळ तीन सिंह, चौरस पट्टीच्या मध्यांवर अेक धर्मचक्र, उजव्या बाजूस अेक बैल, डाव्या बाजूस धांवता घोडा, त्या खालीं असलेलें 'सत्यमेव जयते' हें वाक्य, अशी प्रतिकृति मान्य केली. 'सत्यमेव जयते' हें वाक्य मुंडकोपनिपद्-मधील असून 'सत्याचाच विजय होतो' असा त्याचा अर्थ होतो.

## राष्ट्रध्वज

२२ जुलै १९४७ रोजीं भारताच्या घटना परिषदेनें हा राष्ट्रध्वज मान्य केला. हा ध्वज बरोबर ३ आयताकार पट्टीचा बनलेला आहे. सर्वांत वरची पट्टी (प्रथम) केशरी रंगाची, मधली पट्टी पांढऱ्या शुभ्र रंगाची, सर्वांत खालची (तिसरी पट्टी) गर्द हिरव्या रंगाची असते. या ध्वजाची लांबी रुंदी ३ व २ या प्रमाणांत असते. पांढऱ्या पट्टीच्या मध्यभागीं गर्द निळया रंगाचें चक्र असतें. पांढऱ्या पट्टीच्या रुंदीइतका या चक्राचा व्यास असतो. या चक्रास २४ आरे असतात.

राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक फडकविला जावा, यासाठीं भारत सरकारनें नियम केले आहेत.

१) राष्ट्रध्वजापेक्षां किंवा त्याच्या उजव्याभागीं अन्य कोणताही ध्वज किंवा बोधचिन्ह लावतां कामा नये.

२) अितर सर्व ध्वज राष्ट्रध्वजाच्या डाव्या बाजूला लावले पाहिजेत.

३) राष्ट्रध्वज जेव्हां अितर ध्वजाबरोबर उभारण्यांत येईल, त्यावेळीं तो सर्वांच्या आधीं वर गेला पाहिजे व सर्वांत शेवटीं उतरविला पाहिजे.

४) राष्ट्रध्वज केव्हांही आडवा अथवा जमिनीशीं समांतर धरून नेतां-कामा नये, तर तो नेहमींच उभा व मोकळा असला पाहिजे.

५) राष्ट्रध्वज ज्यावेळीं मिरवणुकींतून न्यावयाचा असेल त्यावेळीं ध्वज-धारकानें तो आपल्या उजव्या खांद्यावर उंच धरला पाहिजे, आणि तो मिरवणुकीच्या अग्रभागीं असला पाहिजे.

६) खिडकीच्या चौकटींतून किंवा बाल्कनींतून वा इमारतीच्या पुढील भागांतून राष्ट्रध्वज लावावयाचा असेल त्यावेळीं त्याचा केशरी रंग सर्वांत वर येअील, अशा रितीनें तो लावला पाहिजे.

७) वर केशरी, खालीं हिरवा रंग येईल अशा पद्धतीनें राष्ट्रध्वज फडकवावा. राष्ट्रध्वजांवर फुलांचे हार आदि घालूं नयेत.

## कोणत्या इमारतींवर राष्ट्रध्वज लावावा ?

सर्वसामान्यपणें मध्यवर्ति सरकारच्या व राज्य सरकारांच्या अिमारतींवर राष्ट्रध्वज लावण्यांत येतो. हायकोर्टस्, सचिवालयें, जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेऱ्या, तुरुंग, जिल्हा लोकलबोर्ड, नगरपालिका या अिमारतींवर राष्ट्रध्वज लावण्यांत येतो. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, म. गांधी जयंति, राष्ट्रीय सप्ताह आणि यासारख्या राष्ट्रीय उत्सवाच्या अन्य प्रसंगीं राष्ट्रध्वजाचा उपयोग मुक्तपणें करतां येअील.

राष्ट्रध्वज हा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत लावावयाचा असतो.

## राष्ट्रगीत

विश्वकवि डॉ. रविंद्रनाथ टागोरकृत " जन गण मन " हें काव्य घटना परिषदेनें २४ जानेवारी १९५० रोजीं राष्ट्रगीत म्हणून मान्य केलें. हें काव्य राष्ट्रसभेच्या कलकत्ता अधिवेशनांत २७ डिसेंबर १९११ रोजीं प्रथम म्हटलें गेलें होतें. जानेवारी १९१२ मध्यें रविंद्रनाथ टागोरांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या मासिकांत प्रथम प्रसिद्ध झालें. हें राष्ट्रगीत सरकारी समारंभाच्या वेळीं प्रामुख्यानें म्हटलें जातें.

जन–गण–मन अधिनायक जय हे
भारत–भाग्य–विधाता !

पंजाब–सिंधु–गुजरात–मराठा
द्राविड–अुत्कल–बंग

विंध्य–हिमाचल–यमुना–गंगा
अुच्छल–जलधि तरंग

तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मांगे
गाहे तव जय–गाथा ।

जन–गण–मंगलदायक, जय हे
भारत–भाग्य–विधाता

जय हे, जय हे, जय, हे,
जय जय जय जय हे ।

## वन्दे मातरम्

'जन-गण-मन' या गीताला 'राष्ट्रगीत' म्हणून जेव्हां मान्यता दिली, त्याचवेळीं 'वन्दे मातरम्' या गीतालाही 'राष्ट्रगीत' म्हणून मान्यता मिळाली. कै. बंकीमचंद्र चटर्जी यांच्या 'आनंद मठ' कादंबरीमध्यें हें काव्य आहे. ही कादंबरी १८८२ मध्यें प्रसिद्ध झाली. आणि 'वन्दे मातरम्' हें गीत १८९६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत म्हणण्यांत आलें. तेव्हांपासून या गीतानें भारतीयांच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा दिली आहे. हें राष्ट्रगीत जनतेच्या कार्यक्रमाच्या वेळीं प्रामुख्यानें म्हटलें जातें.

वन्दे मातरम्,
सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम्
शस्य शामलाम् मातरम् ।
शुभ्र जोत्स्नाम् पुलकित यामिनीम्
फुल्ल कुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम्, सुमधुर भाषिणीम्,
सुखदां, वरदां मातरम् ।
वन्दे मातरम ।

## राष्ट्रीय पंचांग

भारतांत अि. स. १२०० च्या सुमारास मुसलमानी राजवट आली. त्यांनीं राज्य कारभारांत "हिजरी" कालदर्शिका सुरूं केली. साधारणपणें १७५७ पर्यंत ही कालदर्शिका चालू होती. त्यापूर्वी 'शालिवाहन शक' ही कालगणना चालू होती. अकबरानें १५५४ मध्यें 'तारखी अिलाही' नांवाचें सौर इराणी कालगणना चालू केली. महाराष्ट्रांत छत्रपति श्रीशिवाजी महाराजांनीं राज्या--भिषेकदिनीं स्वतःच्या नांवाची कालगणना चालू केली.

१७५७ मध्ये ब्रिटीशांनीं ग्रेगेरियन पद्धतीची कालदर्शिका राज्य-व्यवहारांत रूढ केली. ब्रिटीश साम्राज्य भारतांत स्थिर झाल्यानें स्वाभाविकच समाजाच्या सर्व व्यवहारांत तिचेंच महत्व वाढलें. या काळांत भारतीय पंचांगेंही ठिकठिकाणी चालू होती. भारतांत अनेक धर्मपंथ असल्यानें त्याचीं पंचांगेही वेगवेगळीं आहेत. या सर्व पंचांगांचीं संख्या सुमारें ३० आहे. या सर्व पंचांगांत एकवाक्यता नाहीं. गणेश चतुर्थी, सरस्वतिपूजा, मकर संक्रांत, ह्यासारखे समान धार्मिक सण विविध प्रांतांत अनेकवेळां वेगवेगळ्या दिवशी साजरे होतात. पंचांग पद्धतींत निर्माण झालेली विसंगति नाहींशी करून अखिल भारतीय कालगणना निश्चित करावी,

या हेतूनें भारत सरकारनें नोव्हेंबर १९५२ मध्यें कै. डॉ. मेघनाद सहा यांच्या अध्यक्षतेखालीं ' पंचांग सुधारणा समिति ' नेमली. भारतीय सर्व पंचांगांचा अभ्यास करून या समितीने १९५४ मध्यें अहवाल सादर केला. या अहवालांतील शिफारशीचा विचार करून या राष्ट्रीय पंचांगाचा स्विकार करण्याचें ठरविलें. कांहीं दिवस ग्रेगेरियन कालदर्शिकेबरोबरच नवें राष्ट्रीय पंचांग वापरावें, असा निर्णय घेतला. २२ मार्च १९५७ पासून नव्या पचांगाला सुरवात झाली. हा दिवस १ चैत्र शके १८७९ म्हणून मानला गेला. ( या पंचांगांत शालिवाहन शक स्विकारण्यांत आला आहे. )

| | |
|---|---|
| १ चैत्र – २२ माच. | १ अश्विन – २३ सप्टेंबर |
| १ वैशाख – २१ एप्रिल. | १ कार्तिक – २३ ऑक्टोबर |
| १ जेष्ठ – २२ मे. | १ मार्गशीर्ष – २२ नोव्हेंबर- |
| १ आषाढ – २२ जून. | १ पौष – २२ डिसेंबर. |
| १ श्रावण – २३ जुलै. | १ माघ – २१ जानेवारी. |
| १ भाद्रपद – २३ ऑगस्ट. | १ फाल्गुन – २० फेब्रुवारी. |

भारत सरकारच्या गॅझेटमध्यें ग्रेगेरियन पंचांगाबरोबर मान्य केलेल्या नव्या पंचांगाची तिथी देण्यांत येतें. नभोवाणीवरून बातम्या प्रसृत करण्यापूर्वी नव्या पंचांगाचा दिनांक सांगितला जातो. सरकारतर्फे प्रकाशित होणाऱ्या कालदर्शिकेंत राष्ट्रीय पंचागाच्या तारखा दिल्या जातात. राज्य सरकारांनींही राष्ट्रीय पंचांगाचा अधिक वापर करावा, अशी सूचना भारत सरकारनें केली आहे.

राष्ट्रीय पंचांग ही एक क्षुल्लक वाटणारी परंतु महत्वाची गरज आहे. पंचांग व कालदर्शिका यांचा प्रश्न राज्यकारभाराच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. कारण केंद्र व राज्य सरकारांना विविध धार्मिक, राष्ट्रीय, व सामाजिक महत्वाच्या सणांची निश्चिती करून सुट्टया आगावू जाहीर कराव्या लागतात. या बाबतींत एकसूत्रता आणण्यासाठीं राष्ट्रीय पंचांगाचा उपयोग होतो. राष्ट्रीय पंचांग हें सर्व पंचांगांची शास्त्रीय तपासणी करून तयार केलें असल्यानें सामाजिक, आर्थिक आदि दृष्टया उपयुक्त ठरणार आहे.

## भारत सरकारच्या सुट्टया

### राष्ट्रीय दिन

1) प्रजासत्ताक दिन – २६ जानेवारी.
२) स्वातंत्र्य दिन – १५ ऑगस्ट.
३) म. गांधी जयंति – २ ऑक्टोबर.

## वन्दे मातरम्

'जन-गण-मन' या गीताला 'राष्ट्रगीत' म्हणून जेव्हां मान्यता दिली, त्याचवेळीं 'वन्दे मातरम्' या गीतालाही 'राष्ट्रगीत' म्हणून मान्यता मिळाली. कै. बंकीमचंद्र चटर्जी यांच्या 'आनंद मठ' कादंबरीमध्यें हें काव्य आहे. ही कादंबरी १८८२ मध्यें प्रसिद्ध झाली. आणि 'वन्दे मातरम्' हें गीत १८९६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत म्हणण्यांत आलें. तेव्हांपासून या गीतानें भारतीयांच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा दिली आहे. हें राष्ट्रगीत जनतेच्या कार्यक्रमाच्या वेळीं प्रामुख्यानें म्हटलें जातें.

वन्दे मातरम्,
सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम्
शस्य शामलाम् मातरम् ।
शुभ्र जोत्स्नाम् पुलकित यामिनीम्
फुल्ल कुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम्, सुमधुर भाषिणीम्,
सुखदां, वरदां मातरम् ।
वन्दे मातरम ।

## राष्ट्रीय पंचांग

भारतांत इ. स. १२०० च्या सुमारास मुसलमानी राजवट आली. त्यांनीं राज्य कारभारांत "हिजरी" कालदर्शिका सुरू केली. साधारणपणें १७५७ पर्यंत ही कालदर्शिका चालू होती. त्यापूर्वी 'शालिवाहन शक' ही कालगणना चालू होती. अकबरानें १५५४ मध्यें 'तारखी अिलाही' नांवाचें सौर इराणी कालगणना चालू केली. महाराष्ट्रांत छत्रपति श्रीशिवाजी महाराजांनीं राज्याभिषेकदिनीं स्वतःच्या नांवाची कालगणना चालू केली.

१७५७ मध्ये ब्रिटीशांनीं ग्रेगेरियन पद्धतीची कालदर्शिका राज्य-व्यवहारांत रुढ केली. ब्रिटीश साम्राज्य भारतांत स्थिर झाल्यानें स्वाभाविकच समाजाच्या सर्व व्यवहारांत तिचेंच महत्व वाढलें. या काळांत भारतीय पंचांगेंही ठिकठिकाणीं चालू होती. भारतांत अनेक धर्मपंथ असल्यानें त्यांचीं पंचांगेही वेगवेगळीं आहेत. या सर्व पंचांगांचीं संख्या सुमारें ३० आहे. या सर्व पंचांगांत एकवाक्यता नाही. गणेश चतुर्थी, सरस्वतिपूजा, मकर संक्रांत, ह्यासारखे समान धार्मिक सण विविध प्रांतांत अनेकवेळां वेगवेगळ्या दिवशीं साजरे होतात. पंचांग पद्धतींत निर्माण झालेली विसंगति नाहीशी करुन अखिल भारतीय कालगणना निश्चित करावी,

या हेतूनें भारत सरकारनें नोव्हेंबर १९५२ मध्यें कै. डॉ. मेघनाद सहा यांच्या अध्यक्षतेखालीं ' पंचांग सुधारणा समिति ' नेमली. भारतीय सर्व पंचांगांचा अभ्यास करून या समितीनें १९५४ मध्यें अहवाल सादर केला. या अहवालांतील शिफारशीचा विचार करून या राष्ट्रीय पंचांगाचा स्विकार करण्याचें ठरविलें. कांहीं दिवस ग्रेगेरियन कालदर्शिकेबरोबरच नवें राष्ट्रीय पंचांग वापरावें, असा निर्णय घेतला. २२ मार्च १९५७ पासून नव्या पंचांगाला सुरवात झाली. हा दिवस १ चैत्र शके १८७९ म्हणून मानला गेला. ( या पंचांगांत शालिवाहन शक स्विकारण्यांत आला आहे. )

| | |
|---|---|
| १ चैत्र – २२ मार्च. | १ अश्विन – २३ सप्टेंबर |
| १ वैशाख – २१ एप्रिल. | १ कार्तिक – २३ ऑक्टोबर |
| १ जेष्ठ – २२ मे. | १ मार्गशीर्ष – २२ नोव्हेंबर- |
| १ आषाढ – २२ जून. | १ पौष – २२ डिसेंबर. |
| १ श्रावण – २३ जुलै. | १ माघ – २१ जानेवारी. |
| १ भाद्रपद – २३ ऑगस्ट. | १ फाल्गुन – २० फेब्रुवारी. |

भारत सरकारच्या गॅझेटमध्यें ग्रेगेरियन पंचांगाबरोबर मान्य केलेल्या नव्या पंचांगाची तिथी देण्यांत येते. नभोवाणीवरून बातम्या प्रसृत करण्यापूर्वी नव्या पंचांगाचा दिनांक सांगितला जातो. सरकारतर्फे प्रकाशित होणाऱ्या काल-दर्शिकेंत राष्ट्रीय पंचांगाच्या तारखा दिल्या जातात. राज्य सरकारांनींही राष्ट्रीय पंचांगाचा अधिक वापर करावा, अशी सूचना भारत सरकारनें केली आहे.

राष्ट्रीय पंचांग ही एक क्षुल्लक वाटणारी परंतु महत्वाची गरज आहे. पंचांग व कालदर्शिका यांचा प्रश्न राज्यकारभाराच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे कारण केंद्र व राज्य सरकारांना विविध धार्मिक, राष्ट्रीय, व सामाजिक महत्वाच्या सणांची निश्चिती करून सुट्टया आगावू जाहीर कराव्या लागतात. या बाबतींत एकसूत्रता आणण्यासाठीं, राष्ट्रीय पंचांगाचा उपयोग होतो. राष्ट्रीय पंचांग हें सर्व पंचागांची शास्त्रीय तपासणी करून तयार केलें असल्यानें सामाजिक, आर्थिक आदि दृष्टया उपयुक्त ठरणार आहे.

## भारत सरकारच्या सुट्या

### राष्ट्रीय दिन

१) प्रजासत्ताक दिन – २६ जानेवारी.
२) स्वातंत्र्य दिन – १५ ऑगस्ट.
३) म. गांधी जयंति – २ ऑक्टोबर.

### सर्वसामान्य

१) वर्ष प्रतिपदा. २) वैशाखी. ३) इंग्रजी वर्षारंभ. ४) जमशेटजी नौरोजी. ५) रामनवमी. ६) बौद्ध - पौर्णिमा. ७) जन्माष्टमी. ८) दसरा. ९) दिवाळी. १०) गुरू नानक दिन. ११) महाशिवरात्र. १२) होळी. १३) गुड् फ्रायडे. १४) ख्रिसमस डे. १५) ईद्-उल् फित्र. १६) ईद्-उझ्-झुहा. १७) मोहरम. १८) ईद्-ए-मिलाद.

# भारताची राज्यघटना

घटना परिषदेची पहिली बैठक ६ डिसेंबर १९४६ रोजीं झाली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं घटना तयार झाली. व २६ जानेवारी १९५० पासून ही भारतास लागूं झाली.

या घटनेन्वयें भारत हें सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र बनलें असून तीमध्यें सर्व नागरिकांना १) सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय. २) विचार, भाषण, निष्ठा, प्रार्थना यांचें स्वातंत्र्य आणि ३) समान दर्जा व समान संधी मिळेल व त्यांच्यामध्यें बंधुभाव निर्माण होऊन त्यायोगें वैयक्तिक प्रतिष्ठा आणि राष्ट्राचें ऐक्य साधलें जाईल, अशी हमी दिलेली आहे.

जो भारतांत जन्मला असेल, ज्याचे आईबाप भारतीय नागरिक असतील, किंवा भारतीय राज्यघटना अंमलांत येण्यापूर्वी ५ वर्षे जो भारतांत राहिला असेल त्यास भारताचें नागरिकत्व प्राप्त होतें. ज्या नागरिकाला २१ वर्षे पूर्ण होत असतील व मन:स्थिति चांगली नसणें, गुन्हा, लांचलुचपत अगर बेकायदेशीर व्यवहार वगैरे कारणास्तव जर तो अपात्र ठरत नसेल तर त्यांस मतदानाचा अधिकार प्राप्त होतो.

### शासन व्यवस्था

भारतांत केंद्रीय सरकार व राज्य सरकार यांच्याद्वारें राज्य कारभार केला जातो.

**केंद्रीय सरकार**:- या सरकारचें १) राष्ट्रपति, २) मंत्रिमंडळ. ३) मध्यवर्ति कायदे मंडळ असे ३ प्रमुख घटक आहेत.

**राष्ट्रपति** :- भारतीय शासन पद्धतींतील सर्वोच्च व थोर अधिकारी, ३५ वर्षे वयावरील आणि लोकसभेनें व राज्यसभेनें निवडून दिलेल्या भारतीयाला राष्ट्रपति

होतां येतें. सुप्रीम व हायकोर्टाच्या न्यायाधिशांची नेमणूक, फांशीची शिक्षा रद्द करणें, लोकसभेची बैठक बोलावणें, तहकूब करणें, कायद्यांना मंजुरी--नामंजुरी देणें, देशामध्यें 'आणीबाणीची परिस्थिति' जाहीर करणें आदि महत्वाचे अधि-कार राष्ट्रपतींना घटनेनें दिलेले आहेत. लष्कर, वायुदल, नौदल प्रमुखांना राष्ट्रपति हे जबाबदार असतात. राष्ट्रपतींचा मासिक तनखा १० हजार रुपये असतो.

राष्ट्रपतींच्या विरुद्ध घटनाभंगाबद्दल जेव्हां कांहीं काम चालवावयाचें असेल तेव्हां सभागृहाच्या एकूण संख्येच्या $\frac{1}{4}$ पेक्षां कमी नसलेल्या सभासदांनीं कमीत कमी १४ दिवसांची लेखी सूचना देऊन सदर ठराव आणण्याचा उद्देश स्पष्ट करून आरोप असलेला ठराव कायदे-मंडळाच्या कोणत्याहि एका सभागृहापुढें सादर केला पाहिजे.

जेव्हां एकादें सभागृह असें आरोपपत्र सादर करील तेव्हां दुसरें सभागृह आरोपांची चौकशी करील. ज्या सभागृहानें अशी चौकशी केली अगर करविली असेल. त्या सभागृहानें आपल्या एकंदर सभासद संख्येपैकीं दोन तृतीयांश पेक्षां कमी नसलेल्या बहुमतानें दिलेला निर्णय त्याच दिवसांपासून राष्ट्रपतींना बंधन-कारक राहील.

उपराष्ट्रपति :– हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापति होत. राष्ट्रपतींच्या आजार-पणांत, गैरहजेरींत वा अन्य कोणत्याहि कारणांमुळें काम करूं शकत नसल्यास उपराष्ट्रपति हे "राष्ट्रपति" म्हणून काम पाहतात.

मंत्रिमंडळ :— राज्यकारभाराच्या सोयीसाठीं लोकसभेच्या सभासदांतून मंत्रि-मंडळ बनविलें जातें. वेगवेगळ्या खात्यांचीं कामें विभागलीं जातात. यातील मुख्य मंत्र्यास पंतप्रधान म्हणतात. पंतप्रधान हे राष्ट्रपतींच्या सल्ल्यानें भारताचा प्रत्यक्ष राज्यकारभार पाहतात.

मध्यवर्ति कायदेमंडळ :— या मंडळाचे १) राज्यसभा, २) लोकसभा असे २ भाग आहेत.

राज्यसभा :— या सभेमध्यें २५० सभासद असतात. ही सभा कायम स्वरूपाची असते. $\frac{1}{3}$ सभासद दर दोन वर्षांनीं सेवानिवृत्त होतात. कला, साहित्य, विज्ञान व सामाजिक कार्य केलेल्या नामवन्त १२ भारतीय नागरिकांची नेमणूक राष्ट्रपति या मंडळांत करतात.

सेवानिवृत्त झालेल्या सभासदांची निवड, राज्यांतील निवडून आलेल्या

विधान सभेंतील सभामदांकडून आपल्या राज्यासाठीं राखून ठेवलेल्या प्रतिनिधींच्या संख्येइतके सभासद निवडून द्यावयाचे असतात.

लोकसभा :— या सभेमध्यें ५०० सभासद प्रत्यक्ष निवडणुकीनें निवडून आलेले असतात. लोकसभेसाठीं ५ लाख ते ७॥ लाख लोकसंख्येस १ या प्रमाणांत सभासद निवडले जातात. या सभेची मुदत ५ वर्षांची असते. या सभेच्या कामाचें स्वरूप खालीलप्रमाणें :—

१) भारत सरकारच्या अधिकारांतील विषयासंबंधीं वेळोवेळीं लागणारे कायदे करणें. २) जरूरीपुरते जुने कायदे दुरुस्त करणें वा रद्द करणें. ३) राष्ट्रपतीनें काढलेले वटहुकूम, आणीबाणीचे प्रसंगीं काढलेले जाहीरनामे मान्य अथवा अमान्य करणें. ४) भारत सरकारचें अंदाजपत्रक--करवाढ--मंजूर करणें. ५) राज्य कारभारांतील महत्वाच्या प्रश्नांवर लोकमत जागृत करणें. ६) प्रश्न--उपप्रश्न विचारून सरकारी कामकाजाबद्दल चौकशी करणें. ७) युद्ध, राष्ट्रीय कर्ज याबाबत धोरण ठरविणें. ८) भारतीय घटनेंत जरूर तो बदल घडवून आणणें.

## केंद्र सरकारचीं महत्वाचीं खातीं

१) परराष्ट्र संबंध. २) संरक्षण. ३) गृह. ४) अर्थ. ५) शिक्षण. ६) आरोग्य. ७) रेल्वे. ८) दळणवळण. ९) उद्योगधंदे. १०) व्यापार. ११) खाणी. १२) वीज. १३) अन्न. १४) शेती. १५) कायदा. १६) अल्पसंख्यांक. १७) कामगार. १८) माहिती. १९) आकाशवाणी. २०) पुनर्वसाहत आदि.

## केंद्र व राज्य सरकार यांचीं सामायिक खातीं

१) फौजदारी कायदा. २) घटस्फोट व विवाह- ३) दिवाणी कायदा ४) मजूर संघ. ५) किंमतीवर नियंत्रण. ६) वृत्तपत्र-छापखाने आदि.

## भारतीय संघराज्यांतील १४ घटक राज्यें

१) आंध्र. २) आसाम. ३) बिहार. ४) मुंबई [ महाराष्ट्र व गुजराथ] ५) केरळ. ६) मध्यप्रदेश. ७) मद्रास. ८) म्हैसूर. ९) ओरिसा. १०) पंजाब ११) राजस्थान. १२) उत्तर प्रदेश. १३) प. बंगाल. १४) जम्मू आणि काश्मिर.

## केंद्रशासित प्रदेश

१] दिल्ली. २] मणीपूर. ३] अन्दमान-निकोबार. ४] त्रिपुरा.

५] हिमाचल प्रदेश. ६] लखदीव-मालदीव.

## *विभाग ( झोन )*

राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें घटक राज्यांचे विभाग [ झोन ] केले आहेत.

१) उत्तर विभाग – पंजाब, राजस्थान, जम्मू-काश्मिर, दिल्ली, हिमाचल प्रदेश.
२) मध्य विभाग – उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश.
३) पूर्व विभाग – बिहार, बंगाल, ओरिसा, आसाम, मणीपूर, त्रिपुरा.
४) दक्षिण विभाग– आंध्र, मद्रास, केरळ.
५) पश्चिम विभाग- मुम्बई, मद्रास.

## *भारताचे कांहीं प्रमुख अधिकारीं*

१) महान्यायवादी (अॅटर्नी जनरल) :- यांची नेमणूक राष्ट्रपति करतात. भारत सरकारचे हे कायदेविषयक सल्लागार होत.

२) महालेखा परीक्षक (ऑडीटर जनरल) :- राष्ट्रपतींनीं नियुक्त केलेले केंद्र व राज्य सरकारचे हिशेब तपासणारे अधिकारी यांचे अहवाल लोक-सभा-विधानसभा यांचेपुढें विचारासाठीं ठेवले जातात.

३) निर्वाचन आयुक्त ( चीफ इलेक्शन कमिशनर ) :- राष्ट्रपतींच्या आदेशानुसार व घटनेनुसार निवडणुका घडवून आणणारे सर्वोच्च अधिकारी होत.

४) अल्पसंख्यांकांचे हितसंबंध पाहणारे अधिकारी :- शीख, यहुदी, ख्रिस्ती, पारशी, यांच्या हितसंबंधासाठीं हे अधिकारी नेमले आहेत.

५) ' रिझर्व बँक ऑफ इंडीया ' :- ही भारताची राष्ट्रीय पेढी आहे. भारतांतील सर्व लहान-मोठया बँकांना ही बँक कर्ज देतें. या बँकेचें कामकाज पाहण्यासाठीं ' गव्हर्नर ' या खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येते.

## *भारताची न्याय व्यवस्था*

**सर्वोच्च न्यायालय:-** भारताच्या मुख्य न्यायालयास 'सुप्रीम कोर्ट' असें म्हणतात. या न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपति करतात. सरन्यायाधीशांच्या मदतीस १० न्यायाधिश असतात. अपील ऐकणें, नवे दावे चालविणें हीं दोन्ही कामें या न्यायालयाच्या अधिकारांत येतात. त्याचप्रमाणें केंद्र व अितर प्रांत यांच्या मधील भांडण, दोन प्रांतांचें परस्परांतील भांडण हें या न्यायालयापुढें सोडविण्यांत

येतें. घटनेंतील कलमांचा व कायद्यांतील कलमांचा या न्यायालयान लावलेला अर्थ प्रमाण मानण्यांत येतो.

उच्च न्यायालय - राज्याच्या मुख्य न्यायालयास 'हायकोर्ट' असें म्हणतात. या न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक भारताचे सरन्यायाधीश करतात. प्रत्येक राज्यांत एक उच्च न्यायालय आहे. देशांत १४ उच्च न्यायालयें आहेत.

जिल्हा न्यायालय:- हें न्यायालय जिल्ह्यांतील न्यायदानाचें कार्य करतें. जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक राज्यपालामार्फत उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या संमतीनें केली जाते.

न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था:- न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था ही एक-मेकांपासून विभक्त करण्याच्या घटनेंतील निर्देशक तत्वानुसार आसाम, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, या राज्यांमधील व्यवस्था अलग करण्यांत आली आहे. आंध्र, उत्तर प्रदेश, केरळ, पंजाब, बिहार, राजस्थान या राज्यांत अलग करण्याचें काम अंशत: झालें आहे.

## संरक्षण

भारताच्या सशस्त्र सेनेचे सर्वोच्च सेनापति राष्ट्रपति होत. संरक्षण खात्याचे ३ प्रमुख विभाग आहेत.

| | विभाग | | प्रमुख |
|---|---|---|---|
| १) | स्थलसेना | – | चीफ ऑफ द आर्मी स्टाफ. |
| २) | नौसेना | – | चीफ ऑफ द नेव्ही स्टाफ. |
| ३) | वायु सेना | – | चीफ ऑफ द ॲअर स्टाफ. |

स्थल सेना:- या सेनेचे ३ प्रमुख भाग आहेत. १) दक्षिण. २) पूर्व. ३) पश्चिम. या प्रत्येक विभागाचा "जनरल ऑफिसर कमांडींग अिन् चीफ" हा असतो. या विभागाचे अनेक उपविभाग असून 'जनरल ऑफिसर कमांडींग' हा उप-विभागाधिकारी असतो. स्थल सेनेचे ६ शाखांमधून 'मेजर जनरल' च्या नियंत्रणाखालीं काम चालतें.

नौसेना:- या सेनेचे मुख्य कार्यालय दिल्ली येथें आहे. १) फ्लॅग ऑफिसर कमांडींग. २) फ्लॅग ऑफिसर मुंबई. ३) कमांडर अिन् चार्ज, कोचीन. ४) नेव्हल ऑफिसर अिन् चार्ज, विशाखापट्टण. या चार प्रमुख अधिकाऱ्यांच्या नियंत्रणा-खालीं नौसेनेचें काम चालतें.

वायु सेना:- मुख्य कार्यालय दिल्ली येथें आहे. वायुसेनेच्या ३ प्रमुख शाखा असून प्रत्येक शाखेवर प्रमुख अधिकारी असतो.

लष्करी शिक्षण:- १) नॅशनल डिफेन्स ॲकेडमी, खडकवासला (मुंबई राज्य) येथें १० जानेवारी १९५५ पासून लष्करी शिक्षणाचें महाविद्यालय सुरू झालें. १५०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली आहे. प्रवेश देण्यासाठीं लेखी व तोंडी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा वर्षांतून २ वेळां होतात. १५ ते १७॥ वर्षें वयाच्या मॅट्रिक पास विद्यार्थ्यांना या परीक्षेस बसतां येते. विद्यार्थी अविवाहित असला पाहिजे. शिक्षणक्रमाच्या अवधींतहि विवाह करतां येणार नाहीं. शिक्षणक्रम ३ वर्षांचा आहे.

२) डिफेन्स सर्व्हीस--स्टॉफ कॉलेज, वेलिंग्टन ( दक्षिण भारत ) संरक्षण खात्यांतील अधिकाऱ्यांना खास शिक्षण दिलें जातें. दरवर्षी १०० अधिकारी या कॉलेजमधून बाहेर पडतात. शिक्षणक्रम १० महिन्यांचा आहे.

३) कोचीन, मुंबई, विशाखापट्टण जामनगर येथें जलसेनेचें शिक्षण दिलें जातें.

४) वायुसेनेचा जोधपूर येथें १ वर्षाचा शिक्षणक्रम आहे. त्यापुढील शिक्षण हैद्राबाद येथें दिलें जातें. तांबरम्, कोईमतूर, बंगलोर येथेंहि शिक्षणा--साठीं कॉलेजची व्यवस्था केली आहे..

## *शिक्षण*

देशांतील शिक्षणाची प्रमुख जबाबदारी राज्य सरकारवर आहे. वेगवेगळ्या प्रांतांतील शिक्षणांत समन्वय साधणें, वैज्ञानिक शिक्षणाची वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करणें, शिक्षण संस्थांना मदत करणें हीं कामें केंद्र सरकार करतें.

भारतांत उच्च शिक्षण देणाऱ्या १९५६--५७ मध्यें विश्वविद्यालय -- ३४, संशोधन -- ४१, आर्टस् आणि सायन्स -- ७७१, व्यावसायिक -- ४०४, खास शिक्षण -- १२७ संस्था होत्या. माध्यमिक शिक्षण देणाऱ्या १९५६--५७ मध्यें ३५८२८ शिक्षणसंस्था होत्या. ९३,३० हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते प्राथमिक शिक्षण देणाऱ्या १९५६--५७ मध्यें २,८८,०९१ संस्था होत्या. २,३९,६७ हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते.

युनिव्हर्सिटी ग्रँट कमीशन:- हें कमीशन १९५६ सालीं अस्तित्वांत आलें. विश्वविद्यालयीन कारभार व शिक्षणावर देखरेख ठेवणें, विश्वविद्यालयांना ग्रँट देणें हीं कामें हें कमीशन करतें.

<u>ललितकला अकाडमी</u> – स्थापना – ऑक्टोबर १९५४. देशांतील चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्यशास्त्र यांच्या अध्ययनासाठीं व वृद्धीसाठीं ही संस्था स्थापन करण्यांत आली.

<u>संगीत नाटक अकाडमी:</u>– स्थापना – जानेवारी १९५३ देशाच्या वेगवेगळ्या भागांत असलेलें संगीत, नृत्य, नाटय यांच्या अध्ययनासाठीं व वृद्धीसाठीं ही संस्था स्थापन करण्यांत आली.

<u>साहित्य अकाडमी :</u>– स्थापना – मार्च १९५४ भारतांतील वेगवेगळया भाषेतील थोर वाङ्मयाचा अन्य भारतीय भाषेंत अनुवाद करणें, राष्ट्रीय ग्रंथसूची तयार करणें, भारतीय भाषेंतील साहित्याचा अितिहास लिहिणें, उत्कृष्ट वाङ्मय निर्मात्यांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन देणें, आदि वाङ्मयीन कार्य ही संस्था करतें.

## <u>आकाशवाणी</u>

भारतांत १९४७ मध्यें फक्त ६ आकाशवाणी केंद्रें होतीं. १९५९ मध्यें २८ केंद्रें आहेत.

उत्तर – १) दिल्ली. २) लखनौ. ३) अलाहाबाद. ४) पाटणा.
५) जालंदर. ६) जयपूर–अजमेर. ७) सिमला.
८) भोपाळ. ९) अिंदोर. १०) रांची.

पश्चिम–११) मुंबई. १२) नागपूर. १३) अहमदाबाद – बडोदा.
१४) पुणें. १५) राजकोट. १६) धारवाड.

दक्षिण–१७) मद्रास. १८) तिरुचिरापल्ली. १९) विजयवाडा.
२०) त्रिवेंद्रम. २१) कालीकोड. २२) हैद्राबाद. २३) बंगलोर.

पूर्व – २४) कलकत्ता. २५) कटक. २६) गोहत्ती.

श्रीनगर व जम्मू येथेंही केंद्रें आहेत.

या आकाशवाणीवरील कार्यक्रम सर्व महत्त्वाच्या भाषांमधून प्रसारित केले जातात. आकाशवाणीवरील कार्यक्रम केवळ जनतेची अभिरुचि लक्षांत घेऊन तयार केला जात नाहीं. अितरहि उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रम आंखला जातो. व्यापारी जाहिरातीसारख्या कार्यक्रमाला आकाशवाणीमध्यें स्थान नाहीं. बातम्या, परिसंवाद, कला, विज्ञान, साहित्य यांतील नवीन माहिती, शिक्षण व करमणूक या दृष्टीनेंहि आकाशवाणीवरील कार्यक्रम आंखले जातात. प्रत्येक केंद्रावर महिलांसाठीं, लहान मुलांसाठीं व शेतकऱ्यांसाठीं खास कार्यक्रम आंखले जातात. आकाशवाणीच्या वेगवेगळया केंद्रावर होणाऱ्या कार्यक्रमाची पूर्व आंखणी खालील पत्रिकांतून प्रसिद्ध केली जाते.

१) आकाशवाणी–(इंग्रजी). २) सारंग–(हिंदी). ३) नभोवाणी–(गुजराती). ४) वाणी–(तेलगू). ५) वानोळी–(तामीळ). ६) बेतार जगत–(बंगाली). ७) आवाज–(उर्दू).

आकाशवाणीवरून दिवसांतून ३ वेळां बातम्या प्रसारित केल्या जातात.

सप्टेंबर १९५७ मध्यें १,३८,७८६ रेडिओ सेट तयार केले गेले.

दूरदर्शन:– [ टेलिव्हिजन ] दूरदर्शनाच्या कार्यक्रमाची प्रायोगिक स्वरूपांत सुरवात झाली. सप्टेंबर १९५९ मध्यें दूरदर्शनाचा पहिला प्रयोग झाला.

## वृत्तपत्रें

भारतांत १९५७ सालीं ५९३२ वृत्तपत्रें प्रकाशित होत होतीं. पैकीं दैनिके ४४६, साप्ताहिकें १५८२, पाक्षिकें ५१७, आणि मासिकें २३५१ प्रसिद्ध होत असतात. आठवड्यांतून २ वेळां, ३ वेळां प्रसिद्ध होणारीं वृत्तपत्रें, त्रैमासिक, वार्षिक प्रसिद्ध होणारीं वृत्तपत्रें यांचे आंकडे वेगळे आहेत. मुंबई राज्यामध्यें सर्वांत जास्त म्हणजे ११९७ वृत्तपत्रें प्रसिद्ध होतात. पश्चिम बंगाल ८२९, उत्तर प्रदेश ७३२, दिल्ली ६१७ आणि मद्रास ५७७. अशा क्रमानें वृत्तपत्रें प्रसिद्ध होत असतात. अिंग्लिश भाषेंत ११८८, हिंदीमध्यें ११२७, उर्दूमध्यें ५१३, गुजराती–मध्यें ३७४, व मराठी भाषेमध्यें ३२१ वृत्तपत्रें प्रसिद्ध होतात. अितर भाषां–मध्यें प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचे आंकडे वेगळे आहेत. भारतीय वृत्तपत्रांच्या खपांचे आंकडे १९५७ सालीं दैनिकें, ३१ ४९ हजार, साप्ताहिकें ३०,५२ हजार, पाक्षिकें १४,४९ हजार, मासिकें ३१,६२ हजार या प्रमाणें होते. यावरून भारतां-तील वृत्तपत्र व्यवसायाचें स्वरूप लक्षांत येईल. १९५७ सालीं मराठी वृत्तपत्रांचा खप ६ ५५ हजार होता. एकूण वृत्तपत्रांच्या खपांच्या मानानें मराठी वृत्तपत्रांच्या खपाचें प्रमाण ५·९ टक्के आहे.

## वृत्तसंस्था

भारतांत २ प्रमुख वृत्तसंस्था आहेत. १) प्रेस ट्रस्ट ऑफ अिंडीया. २) हिंदुस्थान समाचार समिति. भारतांत परदेशी वृत्तसंस्थाच्या ६ शाखा आहेत १) रायटर ऑफ युनायटेड किंगडम. २) अेंजल्स फ्रांस प्रेस. ३) असोसिएटेड ऑफ अमेरिका ४) युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका ५) अिंटर नॅशनल न्यूज सर्व्हिस. ६) तास ऑफ सोव्हिएट युनियन.

## मुद्रणविषयक कायदे

१) दि प्रेस अॅन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट १८६७ – या कायद्यानुसार

भारतांत छापलेलें वा प्रसिद्ध झालेलें पुस्तक, वृत्तपत्र सरकारकडे पाठवून रजिस्टर करावे लागतें. वृत्तपत्राच्या प्रकाशकानें वृत्तपत्रासंबंधीं संपूर्ण माहिती सरकारला कळविली पाहिजे.

२) दि वर्कींग जर्नालिस्टस् (कंडिशन्स ऑफ सर्व्हिस) अँड मिसिलिनियस प्रोव्हिजन्स अॅक्ट, १९५५ – ज्या वृत्तपत्रांत २० किंवा अधिक श्रमजीवी पत्रकार काम करीत आहेत, त्यांना हा कायदा लागू आहे. या कायद्यानुसार १ पत्रकार १ महिन्यांत १४४ तासापेक्षां अधिक काम करूं शकत नाहीं.

३) दि न्यूजपेपर ( प्राईस अँड पेज ) अॅक्ट १९५६ – या कायद्यानुसार वृत्तपत्रांच्या पानांच्या प्रमाणांत वृत्तपत्राची किंमत निश्चित केली आहे.

४) दि डिलिव्हरी ऑफ बुक्स अँड न्यूज पेपर्स ( पब्लिक लायब्ररीज् ) अॅक्ट १९५४ – या कायद्यानुसार भारतांत प्रसिद्ध झालेलें प्रत्येक पुस्तक, वृत्तपत्र याची १ प्रत प्रकाशकानें कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाला पाठविली

जगप्रसिद्ध अजंठा व वेरुळची लेणीं पाहण्यास येणाऱ्या
कलाप्रेमी प्रवाशांचें
सात्विक व रुचीपूर्ण भोजन
– ० त सें च ० –
आरामप्रद निवासस्थानाची भरपूर सोय असलेलें
पूर्णिमा लॉज
दिवांण देवडी, औरंगाबाद
: संचालक :–
स्वागत करीत आहे! जगमोहनदास सी. देसाई
नडीयादवाला.

पाहिजे. याशिवाय प्रकाशन दिवसानंतर ३० दिवसांच्या आंत अेक अेक प्रत खालील ग्रंथालयांस दिली पाहिजे.

सेंट्रल लायब्ररी, दिल्ली. रॉयल अेशियाटिक सोसायटी, टाअून हॉल, मुंबई. कानमेरा लायब्ररी, मद्रास. प्रेस रजिस्टार, दिल्ली. महाराष्ट्र ग्रंथालय, लक्ष्मीरोड, पुणें. जिल्हाधिकारी. पब्लिसिटी ऑफिसर, ओल्ड सेक्रेटरीअेट, मुंबई.

## चलचित्र (बोलपट)

भारत सरकारनें जानेवारी १९५१ मध्यें 'सेंट्रल सेन्सॉर बोर्ड' स्थापन केलें. या बोर्डामध्यें अध्यक्षासह ७ सभासद असतात. प्रधान कार्यालय मुंबई येथें आहे. हें बोर्ड भारतामध्यें निर्माण झालेलें प्रत्येक चलचित्र तपासून प्रशस्तिपत्र देतें. प्रशस्तिपत्राखेरीज चलचित्र (बोलपट) प्रकाशित करतां येत नाहीं. सर्वसामान्य जनतेला–लहानथोरांना–पाहण्यालायक बोलपटांना 'युनिव्हर्सल' म्हणजे "यू" हें सर्टीफिकेट व १८ वर्षाखालील मुलांना पाहण्यास अयोग्य बोलपटांना 'अॅडल्ट' म्हणजे 'अे' हें सर्टीफिकेट दिलें जातें. बालचित्रपट तयार करण्याच्या दृष्टीनें 'बाल-चलचित्र' समिति मे १९५५ मध्यें स्थापन करण्यांत आली. मुलांच्या साठीं विशेष प्रकारचे चित्रपट निर्माण करणें हा या समितीचा प्रधान हेतु आहे. अुच्च दर्जाच्या सांस्कृतिक व बोधपट चित्रास भारत सरकार १९५४ पासून खास पुरस्कार देत असते.

(१) राष्ट्रपती सुवर्णपदक मिळणाऱ्या सर्वोत्तम चित्रपटास २५००० रु.
(२) सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाच्या चित्रपटास–१२,५०० रु.
(३) पंतप्रधान सुवर्णपदक मिळणाऱ्या सर्वोत्तम बालचित्रपटास–२५,००० रु.
(४) सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाच्या बालचित्रपटास–१२,५०० रु.
(५) राष्ट्रपती सुवर्णपदक मिळणाऱ्या वृत्तपटास ५००० रु.
(६) सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाच्या वृत्तपटास २,५०० रु.

**वार्ता चित्रपट :–** वार्ता चित्रपट प्रामुख्यानें भारत सरकारच्या माहिती खात्या-तर्फे निर्माण केले जातात व प्रकाशित केले जातात. चित्रपटगृहांना परवाना देतेवेळीं घातलेल्या अटींमध्यें अेकावेळीं २०००० फूटांहून अधिक लांबीची फिल्म दाखवूं नये अशी अट आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक चित्रपटगृहाला आठवड्यांतून अेक वार्तापट प्रकाशित करण्यासाठी दिला जातो. परदेशीं असलेल्या भारतीय वकीलातींनाहि प्रचारासाठीं वार्तापट पाठविले जातात.

## वैज्ञानिक शोध

लोकसभा व राज्यसभा यांपुढें भारत सरकारनें १३ मार्च १९५८ रोजीं मांड-लेल्या प्रस्तावामध्यें विज्ञानासंबंधींचा भारत सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे.

विज्ञान किंवा वैज्ञानिक शोध (सर्व प्रकारचे) यांना योग्य तऱ्हेनें प्रोत्साहन देणें, त्यांचा विकास करणें व त्यासंबंधींची योजना आंखून ती कार्यान्वित करणें, हा भारत सरकारचा विज्ञानासंबंधींचा दृष्टिकोन आहे. भारतामध्यें भारत सरकारच्या दृष्टिकोनानुसार वैज्ञानिक शोधाचें काम प्रामुख्यानें "वैज्ञानिक तथा औद्योगिक शोध परिषद" (कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड अिंडस्ट्रीयल रिसर्व) ही व तिच्या नियंत्रणाखालीं स्थापन झालेल्या वेगवेगळ्या प्रयोगशाळा करीत असतात. ही परिषद वैज्ञानिकांना साहाय्य, छात्रवृत्ति देऊन संशोधन कार्यास मदत करीत असते. भारतांतील सर्व वैज्ञानिकांची पूर्ण माहिती या परिषदेजवळ असते. या परिषदेच्या सर्व आर्थिक व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी भारत सरकारनें घेतली आहे. या परिषदेचा कारभार चालविणारी अेक समिति असून भारताचे प्रधान मंत्री हे अध्यक्ष असतात व केंद्र-सरकारचे या खात्याचे मंत्री हे अुपाध्यक्ष असतात. हल्लीं या परिषदेच्या नियंत्रणाखाली पुढील ठिकाणीं प्रयोगशाळा संशोधनाचें काम करीत आहेत. १) केंद्रीय अिंधन शोध संस्था, जीलगोडा. (बिहार). २) केंद्रीय कांच तथा कुम्हारी काम शोध संस्था. जाधवपूर. ३) केंद्रीय खाद्य-औद्योगिक शोध संस्था, म्हैसूर. ४) केंद्रीय खनन शोध केंद्र, धनवाद ५) केंद्रीय चर्म शोध संस्था, मद्रास. ६) केंद्रीय नमक शोध संस्था, भावनगर. ७) केंद्रीय भवन शोध संस्था, खडकी. ८) केंद्रीय भेषज शोध संस्था, लखनौ. ९) केंद्रीय विद्युत अिंजिनिअरिंग शोध संस्था, पिलानी (राजस्थान). १०) विद्युत रसायन शोध संस्था, कराअीकुडी. (मद्रास) ११) केंद्रीय सडक शोध संस्था, नवी दिल्ली. १२) प्रादेशिक शोध प्रयोग शाला, हैद्राबाद. १३) प्रादेशिक शोध प्रयोग शाला. जम्मू-जावी (काश्मीर). १४) बिर्ला औद्योगिक तथा औद्योगिक संग्राहालय. कलकत्ता. १५) भारतीय जीवन रसायन तथा परिक्षणात्मक औषधी संस्था, कलकत्ता. १६) राष्ट्रीय धातुकर्म प्रयोग शाला, जमशेटपूर. १७) राष्ट्रीय भौतिक प्रयोग शाला, नवी दल्ली. १८) राष्ट्रीय रसायन प्रयोग शाला, पुणें. १९) राष्ट्रीय-वनस्पति-विज्ञान अुद्यान, लखनौ. २०) सेंट्रल मॅकॅनिकल अिंजिनिअरींग-रिचर्स अिन्सिटयूट, दूर्गापूर (प. बंगाल). २१) सेंट्रल पब्लीक हेल्थ अिंजिनिअरींग रिचर्स अिन्स्टीटयूट. नागपूर.

भारतांतील पहिली अणुभट्टी 'अप्सरा' ही होय. ही ट्रॉम्बे (मुंबई) येथें ४ ऑगस्ट १८५६ रोजीं सुरू झाली. 'केंद्रीय सिंचाअी तथा विद्युत् मंडल' च्या नियंत्रणाखालीं भारतांत ११ हैड्रॉलिक (जलगति) शोधकेंद्रें आहेत. खडकवासला (पुणे) येथील 'केंद्रीय जलविद्युत् तथा सिंचाअी शोध केंद्र' हें प्रमुख केंद्र आहे. डेहराडून येथील 'वन अनुसंधान संस्था' ही घरबांधणीच्या लांकडासंबंधीच्चें संशोधन करीत असते. भारतीय कृषि शोध संस्था, भारतीय पशु चिकित्सा शोध संस्था, भारतीय दुग्धशाला शोध संस्था, केंद्रीय गहूं शोध संस्था, भारत केंद्रीय

कपास समिति, लाख शोध संस्था, केंद्रीय तटवर्ति मत्स्य शोध केंद्र, आदि संस्था आपापल्या क्षेत्रामध्यें संशोधन करीत असतात.

## उद्योग

भारत सरकारनें स्वतंत्र भारताच्या औद्योगिक नीतिसंबंधींची पहिली घोषणा १९४८ मध्यें केली. औद्योगिक विकास व राष्ट्रहित यांवर नियमन करण्याचें अुत्तर-दायित्व सरकारनें स्वीकारलें होतें. भारत सरकारनें समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा आपला अुद्देश जाहीर केला. या अुद्दशाच्या परिपूर्ततेंसाठीं औद्योगिक विकाससंबंधींची दुसरी घोषणा ३० अेप्रिल १९५६ रोजीं केली. या घोषणेमुळें भावी औद्योगिक विकासाची पहिल्यापेक्षां अधिक जबावदारी भारत सरकारवर आली. समाजवादी समाजरचनेच्या पूर्ततेसाठीं केलेल्या औद्योगिक घोषणेमुळें औद्योगिक क्षेत्राचा विकास व नियंत्रण करण्याचा अधिकार व या क्षेत्रामध्यें संतोषजनक प्रगति न झाल्यास हस्तक्षेप करण्याचा अधिकार भारत सरकारनें आपणांकडे घेतला. अुत्पादन प्रतिनिधी मंडळाच्या शिफारशीनुसार सरकार, मालक, कामगार यांचे प्रतिनिधि असलेली 'राष्ट्रीय अुत्पादन' परिषद स्थापन केली. देशामध्यें अुत्पादन वाढविण्याची प्रवृत्ति निर्माण करणें हा या परिषदेचा प्रमुख अुद्देश आहे. देशांतील अुद्योगधंद्यांचा विकास द्रुतगतीनें साधतां यावा म्हणून भारत सरकारनें परदेशी भांड-वल देशांमध्यें गुंतविण्यास अुत्तेजन देण्याचें धोरण आखलें. प्रथम पंचवार्षिक योजनेमध्यें लोखंड, सूत, सिमेंट, कागद, तेल, कोळसा, अन्य खनिज पदार्थ आदि वस्तूंचें अुत्पादन वाढलें आहे. खाजगी अुद्योगधंद्याला आर्थिक साहाय्य भारत सरकार करीत असते. भारत सरकारनेंहि कांहीं कारखाने चालविले आहेत.

**सिंद्री खत कारखाना :**— या कारखान्याची व्यवस्था अेका संस्थेकडे सोपविली आहे. या कारखान्यांत खताचें अुत्पादन १९५१ मध्यें सुरू झालें. ज्वलनापासून निर्माण होणाऱ्या गॅसचा अुपयोग करून ६० टक्क्यांनीं अुत्पादन वाढविण्याचा सर-कारचा विचार आहे. हा कारखाना सिंद्री येथें आहे.

**नैट्रोजनयुक्त खत कारखाना :**— नैट्रोजनयुक्त खताची मागणी पूर्ण करण्याच्या अुद्देशानें नंगल, नअीबेली, रुरकेला येथें ३ कारखाने स्थापन केले आहेत. या कार-खान्यांची अुत्पादनक्षमता अनुक्रमें वार्षिक ७० हजार टन, ७० हजार टन व १ लक्ष २० हजार टन आहे.

**हिंदुस्थान केबल्स :**— हिंदुस्थान केबल्स पोस्ट खात्याची टेलिफोन तारांसंबंधींची गरज भागविण्यासाठीं रूपनारायणपूर (प. बंगाल) येथें कारखाना आहे. कार-खान्याचें उत्पादन १९५४ पासून सुरू झालें.

हिंदुस्थान–मशीन्स–औजारें :– या कारखान्यामध्यें पहिलें भारतीय लेथ मशीन मे १९५६ मध्यें तयार झालें. या कारखान्यांत प्रत्येक महिन्यांत २५ लेथ मशीन तयार होतात. ही अुत्पादनक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें भारत सरकारचे प्रयत्न चालू आहेत. अन्य प्रकारचीहि मशीन्स निर्माण करण्याचा या कारखान्याचा विचार आहे. दरवर्षीं ८६५ लेथ मशीन्स तयार व्हावी असा अुद्देश या कारखान्याचा आहे.

हिंदुस्थान–जहाज–निर्माण–घाट :– मार्च १९५२ मध्यें भारत सरकारनें सिंधीया स्टीमशिप नेव्हीगेशन कंपनीचा विशाखापट्टण येथील जहाज निर्माण घाट खरेदी केला. आतापर्यंत (१९५८) वेगवेगळ्या प्रकारचीं वेगवेगळ्या आकाराचीं १६ जहाजें बांधलीं गेली. ७५ ते ९० हजार टनांचीं जहाजें बांधण्याची योजना सरकारपुढें आहे.

डी. डी. टी. कारखाना :– भारत सरकारनें युनोच्या विश्वस्वास्थ संघटनेच्या साहाय्यानें दिल्ली येथें डी. डी. टी चा कारखाना स्थापन केला आहे. या कारखान्याचें पहिलें अुत्पादन अेप्रिल १९५५ पासून सुरू झालें. अलवा (केरळ) येथें दुसरा डी. डी. टी. चा कारखाना स्थापन केला आहे.

हिंदुस्थान रोगाणुनाशक औषधि निर्माण कारखाना :– देशाची पेनिसिलीनसंबंधींची वाढती गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें (पुणें) अेका कारखाना स्थापन केला आहे. या कारखान्याचें अुत्पादन ऑगस्ट १९५५ मध्यें सुरूं झालें. आशियांतील पेनिसिलीनचा सर्वांत मोठा असा हा कारखाना आहे.

राष्ट्रीय औजारें (अिंस्ट्रयुमेंटस्) कारखाना :– हा कारखाना १९३० मध्यें खाजगी कंपनीनें काढला होता. या कारखान्यामध्यें २५० प्रकारचीं वैज्ञानिक व त्यासाठीं लागणारीं सूक्ष्म साधनें तयार केलीं जातात. जून १९५७ मध्यें खाजगी कंपनीमध्यें वदल केला गेला.

हिंदुस्थान विमान कारखाना :– बेंगलोर येथें डिसेंबर १९४० मध्यें हा कारखाना स्थापन केला. भारतीय विमान दलाची सारी मदार या कारखान्यावर आहे. जेट विमान तयार करणें वा दुरुस्ती करणें ही कामें या कारखान्यांत होतात. अेच. टी. २ हें विमान याच कारखान्यांत बांधलें गेलें.

रेल अिंजिन कारखाना :– हा कारखाना चित्तरंजन येथें आहे. रेल्वे अिंजिनांच्या बाबतींत स्वावलंबी बनण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें हा कारखाना अुभारला. हा कारखाना केंद्र सरकारच्या रेल्वे खात्याच्या नियंत्रणाखालीं चालतो. या कारखान्यांतून दरवर्षीं १६८ रेल्वे इंजिनें तयार होतात. या अिंजिन्सचा दर्जा २०० अिंजीन-

अेवढा असतो. दरवर्षी ३०० रेल्वे अिंजिन्स तयार करण्याचा या कारखान्याचा संकल्प आहे.

**प्रवासी डबा कारखाना :–** पेरांबूर येथें असलेल्या या कारखान्याचें अुत्पादन ऑक्टोबर १९५५ पासून सुरू झालें. दरवर्षी ३५० प्रवासी रेल्वे डबे तयार करण्याचा उद्देश या कारखान्याचा आहे.

**नादन फौंड्री :–** ही ऑक्टोबर १९५२ मध्यें स्थापन झाली. या फौंड्रीमधून शेतीचीं औजारें तयार केली जातात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनच्या कालामध्यें रूरकेला (ओरिसा), दुर्गापूर (प. बंगाल), भिलाअी (म. प्रदेश) येथें पोलादाचे कारखाने स्थापन करण्यांत आले व ते सुरू करण्यात आले. १० लाख टनी पोलादाची अुत्पादनक्षमता या कारखान्याची आहे.

## अर्थसंकल्प

प्रतिवर्षी एका विशिष्ट तारखेस त्यानंतरच्या पुढील आर्थिक वर्षांतील सरकारचा अपेक्षित खर्च आणि प्रचलित कायद्यान्वयें त्याच मुदतींत मिळणारें उत्पन्न, तसेंच कांहीं नव्या करयोजना असल्यास त्यांपासून होणारी प्राप्ती दर्शविणारी जीं कागदपत्रें वा निवेदनें सरकार लोकसभेस सादर करते, त्यास अर्थसंकल्प असें म्हटलें जातें. सद आर्थिक वर्षालाच अर्थसंकल्पीय वर्ष असें म्हणतात. कल्याणकारी राज्याच्या आर्थिक व्यवहारांत या अर्थसंकलपास आलेल्या महत्वामुळें या अर्थसंकलपावरून सरकार काय कार्य करीत आहे व त्यापायीं किती खर्च होतो, हें समजत असल्यामुळें संसद सभासद तसेच नागरिक या अर्थसंकलपाविषयीं विशेष अुत्सुक असतात. अर्थसंकलपाची रचना सर्व देशांत सारखीच नसते. परंपरा, देशाची गरज, आणि सरकारचें स्वरूप यांवरून त्या त्या देशाच्या अर्थसंकलपाची मांडणी होत असते.

**भारतीय अर्थसंकलपाचा इतिहास :–** गव्हर्मेंट ऑफ अिंडीया ॲक्ट १८५८ अन्वयें ब्रिटिश पार्लमेंटनें भारतीय प्रदेशांची सत्ता स्वीकारल्यानंतर येथील आर्थिक व्यवहार सुव्यवस्थित करण्याची कामगिरी प्रथम हातीं घेतली. त्याकरतां बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष जेम्स विल्सन यांना १८५९ मध्ये भारतांत पाठविण्यांत आले. त्यांनीं १८ फेब्रुवारी १८६० रोजीं आपला पहिला अर्थसंकल्प कायदेमंडळास सादर केला. हिंदुस्थानांत यावेळेपर्यंत अनेक राजसत्ता होऊन गेल्या होत्या. पण या राज-सत्तांनीं आपलें अर्थसंकल्प कधीच केले नव्हते. वसूल होअील ती जमा आणि होअील तो खर्च, राहील ती शिल्लक, असा प्रकार चालत असे. श्री. विल्सन यांचा अर्थसंकल्प हा हिंदुस्थानचा पहिला अर्थसंकल्प होय. अर्थसंकल्प पद्धतीची प्रस्थापना ही विल्सन यांची भारतांतील फार मोठी कामगिरी होय. त्यावरून प्रतिवर्षी आर्थिक अंदाज

बांधण्यांत येतात आणि वर्ष सुरू होण्यापूर्वी कायदेमंडळ त्यावर विचार करून त्या अर्थसंकल्पास मान्यता देते. ७ अेप्रिल १८६० च्या आर्थिक ठरावांत या योजनेपासून प्रांतिक स्वरुपाचा राज्यकारभार असलेल्या भारतासारख्या मोठ्या देशांस कोणते फायदे आहेत तें स्पष्ट करून सांगितले आहेत. १८७२ पर्यंत अर्थखात्याचा अध्यक्ष कायदेमंडळापुढें आर्थिक स्थिति दर्शविणारें भाषण करून अर्थसंकल्प केवळ सादर करीत असे. परंतु अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा अधिकार कायदेमंडळांस १८९२ च्या अिंडीयन कौन्सिल अॅक्टान्वयें मिळाला. भारतीय अर्थसंकल्पाची पद्धतशीर रचना करण्याचें श्रेय सर डेव्हिड वार्बोर यांना द्यावें लागेल. त्यांनीं १८८० मध्यें सर्वसाधारण धोरणाचा परामर्श घेणारा अेक भाग आणि आर्थिक निश्चिति दर्शविणारा अेक भाग याप्रमाणें अर्थसंकल्पाची दोन भागांत विभागणी केली. १९०० पासून अर्थसंकल्पाच्या पहिल्या भागावर अर्थमंत्र्यांची व दुसऱ्या भागावर अर्थखात्याच्या चिटणिसांची सही होऊं लागली. अर्थसंकल्प विषयक आणखी सुधारणा १९०९ मध्यें अिंडीयन कौन्सिल अॅक्टान्वयें आणि पुढें १९१९ व १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ अिंडीया अॅक्टान्वयें करण्यांत आल्या.

स्वातंत्र्योत्तर काळांत :— स्वातंत्र्य-संपादनानंतर आर्थिक पद्धतींत निरनिराळ्या तपशीलांबाबत सुधारणा करण्यांत आल्या. स्वातंत्र्योत्तर कालांतील अंदाज समितीनें २१ नोव्हेंबर १९५० रोजीं सादर केलेल्या आपल्या पहिल्याच अहवालांत त्यावेळीं प्रचलित असलेली अर्थसंकल्प पद्धती मागील कालांत यथायोग्य होती तरी आतां तीमध्यें तांतडीनें फेरफार करण्याची गरज असल्याचें स्पष्टपणें म्हटलें होतें. या समितीनें केलेल्या शिफारशीनुसार अेक समिति नेमण्यांत आली. या समितीनें केलेल्या शिफारशीनुसार मुलकी अर्थसंकल्पीय अंदाजांत अनेक बदल करण्यांत आले.

बॅंकॉक येथें सप्टेंबर १९५७ मध्यें वर्कशॉप ऑन बजेट रिक्लासिफिकेशन अॅंड मॅनेजमेंट या यंत्रणेच्या भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनांत आर्थिक आणि कार्यकारी गटांतील सरकारी खर्चाचें वर्गीकरण आर्थिक आणि सामाजिक धोरण ठरविण्यांत उपयुक्त होअील, अशी शिफारस करण्यांत आली होती. त्या शिफारशीनुसार १९५७–५८ च्या भारत सरकारच्या अर्थसंकल्पाचें आर्थिक दृष्टया वर्गीकरण करण्यांत आलें.

हल्लीं आर्थिक वर्ष १ अेप्रिलला सुरू होऊन ३१ मार्च रोजीं संपतें. आज भारतांत सर्वसाधारण अर्थसंकल्प आणि रेल्वे अर्थसंकल्प अशा दोन भागांत मध्यवर्ति अर्थसंकल्प लोकसभेला सादर करण्यांत येतो. या पैकीं सर्वसाधारण अर्थसंकल्प अर्थमंत्री फेब्रुवारी महिन्याच्या कामकाजाच्या शेवटल्या दिवशीं सायंकाळीं ५ वाजतां सादर करतात. तर रेल्वे मंत्री रेल्वे अर्थसंकल्प कांहीं वेळां फेब्रुवारीच्या ३ ऱ्या आठवड्यांत सादर करतात. लोकसभेला अर्थसंकल्प सादर केल्याबरोबर राज्यसभेपुढेंहि त्या अर्थसंकल्पाची प्रत ठेवण्यांत येते. अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर केल्याबरोबर आपलें

अर्थसंकल्पीय भाषण करतात. त्या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्यें करवाढ वा करमाफीची योजना असेल तर त्या करवाढीचा वा करमाफीचा हुकूम त्याच दिवशीं काढला जातो. त्यामुळें देशांतील काळाबाजार, साठेबाजी आदि अपप्रवृत्तींना आळा बसण्यास मदत होते. सध्यांच्या पद्धतीप्रमाणें सर्वसाधारण अर्थसंकल्प लोकसभेला सादर केल्यानंतर सुमारें १५ दिवसांनीं त्यावर चर्चा सुरू होते. रेल्वे अर्थसंकल्प लोकसभेला सादर केल्यानंतर सुमारें १० दिवसांनी त्यावर चर्चा सुरू होते. लोकसभेच्या नियम आणि पद्धतींत अर्थसंकल्पावरील चर्चेची पद्धति ठरवून दिली आहे.

आर्थिक निवेदनाबरोबरच अर्थसंकल्पांत अंतर्भूत असलेल्या विविध कार्यक्रमांचें स्पष्टीकरण व्हावें, म्हणून लोकसभेला पुढील निरनिराळे कागदपत्र सादर केले जातात. १) मध्यवर्ति सरकारचा अर्थसंकल्प. २) मुलकी खर्चाच्या मागण्या पुऱ्या करण्यासाठीं द्यावयाच्या आर्थिक मदतीबाबतचे तीन खंड. ४) टपाल व तारखात्याच्या मागण्या पुऱ्या करण्यासाठीं द्यावयाचें आर्थिक साहाय्य. ५) अर्थविषयक बिल व स्पष्टीकरण करणारीं पत्रकें. ६) अर्थसंकल्प मांडतांना अर्थमंत्र्यांनीं केलेलें भाषण. ७) मागील वर्षाचा आर्थिक आढावा. ८) अर्थसंकल्पाचें स्पष्टीकरण करणारीं निवेदनें. ९) अर्थसंकल्पाचें आर्थिक दृष्टया वर्गीकरण. (हें सुमारें १ आठवडयानंतर सादर करावयाचें असते. १०) अर्थसंकल्पाचा गोषवारा. (सुमारें दोन महिन्यानीं सादर करावयाचा असतो.) वरीलपैकीं १, २, ५, आणि ७ बाबींचा अंतर्भाव असलेला स्वतंत्र रेल्वेअर्थसंकल्प सादर करण्यांत येतो. त्याखेरीज, निरनिराळया खात्यांच्या मागण्यावर चर्चा चालू असतांना व त्यांना मंजूरी देण्याचे सुमारास संबंधित खात्याचे कारभारविषयक अहवाल लोकसभेला सादर केले जात असतात.

## *धरण–पाटबंधारे–वीज*

भारताची जलसंपत्ति अनिश्चित स्वरुपाची आहे. नदींतून, महापुरांतून वाहून जाणारी अलोट जलसंपत्ति सांठवून ठेवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. धरणांमध्यें ही जलसंपत्ति सांठवून ठेवतां येते. पाऊस न पडल्यामुळे निर्माण होणाऱ्या दुष्काळांत ही सांठवून ठेवलेली जलसंपत्ति हमखास उपयोगीं आणतां येते. योग्य ठिकाणीं धरणें बांधतां येतात, अन्य ठिकाणीं नलकुप, खुल्या विहिरी यांच्या साह्यानें पाणी पुरवठा करतां येतो. देशांतील पाणी पुरवठयाचा प्रश्न सोडविण्यासाठीं 'केंद्रीय जल विद्युत् अेवं आयोग' या संस्थेची स्थापना– केली. पूर नियंत्रण, पाणी पुरवठा, जलविद्युत्साठीं नियंत्रण, उपयोग, संरक्षण आदि गोष्टी या संस्थेकडे सोपविल्या आहेत. ही संस्था राज्य सरकाराच्या सहकार्यानें काम करीत असते. या संस्थेचे ३ प्रमुख भाग आहेत. १) जलविभाग, २) विद्युत्– विभाग, ३) पूर नियंत्रण विभाग.

जल विभाग :– भारताची अन्नधान्य परिस्थिति आणि आर्थिक विकास हा शेती सुधारणा आणि अनेक उद्देश साधणारी योजना ही त्वरेनें पूर्ण करण्यावर अवलंबून आहे. धान्य आणि व्यापार वाढ यांच्यासाठीं पाणी पुरवठा करतांना म्हणजे धरण योजना पूर्ण करतांना दोन फायदे होतात. १) पूर नियंत्रण आपोआप केलें जातें, व २) जल–विद्युत् निर्माण करून औद्योगिक विकास साधतां येतो. यावरून धरण योजनेला देशाच्या आर्थिक विकासामध्यें कोणतें स्थान आहे, हें स्पष्टपणें दिसून येतें. देशामध्यें खालील धरण–योजना महत्त्वाच्या व देशाचा कायापालट घडवून आणणाऱ्या आहेत. १) भाक्रा नान्गल, २) हिराकुड, ३) दामोदर ४) तुंगभद्रा ५) कोसी ६) चंबळा ७) नागार्जुन ८) कोयना ९) रिहंद १०) भद्रा ११) काक्रापाडा १२) मयुराक्षी. पाणीपुरवठा व वीज पुरवठा हे दोन्ही फायदे या धरण योजनेपासून मिळतात.

विद्युत् विभाग :– भारताचें एकूण क्षेत्रफळ व लोकसंख्या या दृष्टीनें विचार करतां विद्युत् उत्पादनाच्या क्षेत्रांत भारतानें अजून बरेंच काम करावयास हवें असें म्हणावें लागेल. आज भारतांतील प्रत्येक व्यक्तीसाठीं वार्षिक विद्युत्–उत्पादन फक्त ३० किलोवॅट होत आहे. वर म्हटल्याप्रमाणें प्रचंड धरण योजनांद्वारें विपुल प्रमाणांत विद्युत् निर्मिती होईलच. पण आज खालील विद्युत् केंद्रांतून विद्युत् उत्पादन केलें जात आहे. या केंद्रांची क्षमता वाढविण्यासाठीं प्रयत्न चालू आहेच.

१) नान्गल– (पंजाब) ४८,००० किलोवॅट. २) बोकोरा– (बिहार) १,५०,००० किलोवॅट. ३) चोल– (कलवाण–मुंबई) ५४,००० किलोवॅट. ४) खापरखेडा– (मध्यप्रदेश) ३०,००० किलोवॅट. ५) मोयार– (मद्रास) ३६,००० किलोवॅट. ६) मद्रास शहर– ३०,००० किलोवॅट. ७) मचकुंड– (आंध्र) ३४,००० किलोवॅट. ८) पथरी– (उत्तर प्रदेश) २०,००० किलोवॅट. ९) शारदा– उत्तर प्रदेश) ४१,००० किलोवॅट. १०) सेरगुलम– (केरळ) ४८,००० किलोवॅट. ११) जोग– (म्हैसूर) ७२,००० किलोवॅट.

पूर नियंत्रण विभाग :– भारतांमधें १९५४ सालीं जी अतिवृष्टी झाली तीमुळें देशांतील अनेक नद्यांना प्रचंड पूर आले व अतोनात हानी झाली व पूर नियंत्रणाचा नवा प्रश्न भारत सरकारपुढें उभा राहिला. सप्टेंबर १९५४ मध्यें भारत सरकारनें पूर नियंत्रणाच्या दृष्टीनें एक तपशीलवार कार्यक्रम तयार केला. हा कार्यक्रम प्रामुख्यानें ३ विभागांमध्यें विभागला गेलेला आहे. १) तात्कालिन २) अल्पकालीन ३) दीर्घकालीन असें या कार्यक्रमाचे भाग पडतात. मार्च १९५८ मध्यें केंद्र सरकारनें एक वरच्या पातळीची पूर नियंत्रण समिती पूर नियंत्रणाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं नेमली. या समितीच्या नियंत्रणाखालीं १२ प्रांतांमध्यें पूर नियंत्रण मंडळ काम

करीत आहे. देशांतील पूर नियंत्रण करण्याच्या दृष्टीनें ५४ योजना मान्य केल्या असून प्रत्येक योजनेचा १० लाख रुपये खर्चाचा अंदाज आहे.

## वाहतुक : रेल्वे

भारतीय रेल्वे ही सर्व आशियांतील मोठी व जगांतील ४थ्या क्रमांकाची वाहतूक संघटना होय. भारतांतील सर्वांत पहिल्या रेल्वे मार्गाचें उद्घाटन १६ एप्रिल १८५३ मध्यें झालें. कारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें भारतीय रेल्वे ८ भागांत विभागली आहे. १) दक्षिण भाग– मद्रास अँड मराठा रेल्वे, दक्षिण रेल्वे, म्हैसूर रेल्वे. मुख्य कार्यालय– मद्रास. २) मध्य भाग– ग्रेट अिंडिया पेनिन्शुला रेल्वे, निजाम स्टेट, सिंधीया अँड धोलपूर रेल्वे. मुख्य कार्यालय– मुंबई. ३) पश्चिम भाग– मुंबई बडोदा मध्य रेल्वे, सौराष्ट्र कच्छ, राजस्थान, जयपूर रेल्वे. मुख्य कार्यालय– मुंबई. ४) उत्तर विभाग– पूर्व पंजाब, जोधपूर–बिकानेर रेल्वे. मुख्य कार्यालय–दिल्ली. ५–६) उत्तर–पूर्व विभाग– उत्तर– पूर्व सीमा विभाग– तिरकूत, अवध, आसाम रेल्वे, फत्तेगढ जिल्हा. मुख्य कार्यालय–गोरखपूर पांडु. ७) पूर्व विभाग ईस्ट अिंडियन रेल्वे. (वरील ३ डिव्हीजन सोडून.) मुख्य कार्यालय कलकत्ता. ८) दक्षिण पूर्व विभाग– बंगाल नागपूर रेल्वे. मुख्य कार्यालय– कलकत्ता.

दरवर्षी नव्या रेल्वे लाअीन्स निर्माण करून सर्व देशभर रेल्वेचें जाळें निर्माण करण्याचा प्रयत्न ' केंद्रीय बोर्ड ' करीत असते.

सडका :– भारतांमधील रस्त्याचें प्रमाण हें आवश्यकतेपेक्षां– गरजेपेक्षां बरेंच कमी आहे. रस्त्यांच्या दर्जावर राष्ट्राची औद्योगिक भरभराट अवलंबून असते. यासाठीं नागपूर येथें योजना तयार करण्यांत आली. या योजनेमध्यें २०,७५० मैल राष्ट्रीय राजपथ निर्माण करण्याचा उद्देश व्यक्त केला आहे. राष्ट्रीय स्वरूपाच्या राजरस्त्यांची जबाबदारी केंद्र सरकारवर व जिल्हा, तालुका, गांव यांमधील रस्त्यांची जबाबदारी राज्य सरकारवर असते. प्रथम व द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार कांहीं नवे राष्ट्रीय राजरस्ते केंद्र सरकारनें बांधले आहेत. बनिहाल बोगदा तयार करून त्यामधून जाणारा रस्ता ७,३०० फूट उंचीच्या पीर पंजालच्या (काश्मीरच्या) पर्वतापर्यंत जातो. बनिहाल बोगदा हा जगांतील सर्वांत मोठा बोगदा होय. या रस्त्यामुळें काश्मिर, आणि भारत यांमधील दळण–वळण बारा महिने चालू राहील. केंद्र सरकार राज्य सरकारांस रस्ते विकासासाठीं दरवर्षी आर्थिक साहाय्य देत असते.

बंदरें :– भारताच्या ३,५०० मैल लांबीच्या समुद्रकिनाऱ्यावर ६ मोठीं बंदरें १) कांडला २) कलकत्ता ३) कोचीन ४) मुंबई ५) मद्रास ६) विशाखा-पट्टण अशीं आहेत. पैकीं कलकत्ता, मुंबई, मद्रास या बंदरांची व्यवस्था पाहण्यासाठीं

स्वतंत्र मंडळें आहेत. त्यावर केंद्र सरकारचें नियंत्रण असतें. कांडला, कोचीन, विशाखापट्टण या बंदरांची व्यवस्था केंद्र सरकार पाहते. भारताच्या निर्यात–आयात वाढीस वा व्यापारास सुलभ जावें या दृष्टीनें मोठ्या बंदरामध्यें सुधारणा घडवून आणल्या जात आहेत. भारताच्या समुद्रकिनाऱ्यावर इतर अन्य जीं छोटीं बंदरें आहेत त्या बंदरांमधून वर्षाला ५० लाख टन मालाची आयात निर्यात होत असते. या छोट्या बंदरांच्या व्यवस्थेची जबाबदारी राज्य सरकारावर आहे. बंदर सुधारणेबाबत केंद्र व राज्य सरकारला सल्ला देण्यासाठीं १९५० मध्यें " राष्ट्रीय बंदर मंडळ" निर्माण केलें आहे.

हवाई वाहतूक :– देशाच्या वाहतूक व्यवस्थेमध्यें हवाई वाहतुकीला महत्वाचें स्थान आहे. १९५३ मध्यें भारत सरकारनें हवाई वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण केलें व "इंडीयन एअर लाईन्स कॉर्पोरेशन" व " एअर इंडिया इंटर नॅशनल" या दोन संस्था स्थापन केल्या. इंडीयन एअर लाईन्स कॉर्पोरेशनचीं विमानें अंतर्गत प्रवासी व माल वाहतूक करतात व एअर इंडीयन इंटर नॅशनलचीं विमानें आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक करतात. इंडीयन एअर लाईन्स कॉर्पोरेशनजवळ १९५८ मध्यें ९७ विमानें होतीं. एअर इंडीया इंटरनॅशनलजवळ १२ विमानें आहेत. विमानोड्डाणाच्या शिक्षणासाठीं भारतांत १३ केंद्रें आहेत. शिवाय पुणें, अलाहाबाद, बेंगलोर येथें सरकारी ग्लाइडींग केंद्र व नवी दिल्ली येथें ग्लाइडींग दिल्ली क्लब आहे. विमानोड्डाणाचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकार छात्रवृत्ती देत असते. भारतामध्यें ८५ विमानतळ आहेत. कलकत्ता (डमडम), दिल्ली (पालम), मुंबई (सांताक्रुझ), येथें आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. भारतांतील सर्व राज्यांच्या राजधानीस विमानतळ बांधण्याचा उद्देश भारत सरकारनें व्यक्त केला आहे.

## जमीन सुधारणा

भारतांमधील जमिनीसंबंधींची जी समस्या आज निर्माण झालेली दिसते त्या समस्येचें मूळ स्वरूप १८ व्या शतकांच्या उत्तरार्धामध्ये दिसून येतें. त्यावेळीं ईस्ट इंडिया कंपनीनें बंगालमधील जमीनदारांबरोबर एक करार केला. या करारानुसार फार मोठ्या जमिनीचें स्वामित्व जमिनदारांना मिळालें. क्रमाक्रमानें पण हळूहळू ही जमीनदारी प्रथा बनारस, बिहार, मद्रासच्या कांही भागांत ईस्ट इंडिया कंपनीनें चालू केली. आग्रा आदि प्रदेशांमध्यें महालवारी प्रथा निर्माण झाली. या प्रथेनुसार संयुक्त किंवा जातीय स्वामित्व फार मोठ्या जमीनीवर प्रस्थापित झालें. ही प्रथा पंजाब, मध्यप्रांत आदि प्रांतांत पसरली. मध्यप्रांतांमध्ये सरपंचांना स्वामित्वाचे अधिकार दिले. याचा परिणाम असा झाला कीं, मध्यप्रांतांमध्यें जी भूमीव्यवस्था निर्माण झाली तिचा तोंडावळा जमीनदारीसारखाच होता. या पद्ध-

तीनें उत्तर भारतांत व मध्यभारतांत कायद्याच्या आधारानें जमीनदार वर्ग विकसीत झाला. जमिनीची विषम पद्धतीची वांटणी कायद्यानें झाली.एक विषम समाजरचना निर्माण करण्यांत ईस्ट अिंडिया कंपनीनें यश मिळविलें. अशा विषम समाजरचने-मुळेंच ब्रिटिशांची सत्ता स्थिर होणार होती.

याचबरोबर ग्रामोद्योगांचा भारतांमध्यें ऱ्हास होत होता. अिंग्लंडहून येणाऱ्या वस्तूंपुढें ग्रामोद्योगी वस्तु टिकत नसत. यामुळेंच दिवसेंदिवस भारतीय किसान व कामगार दरिद्री होऊं लागला. तत्कालीन कायद्यानुसार पित्याच्या मरणोत्तर जमीन वाटली जाअी.आर्थिक दृष्टचा जमिनीचे पडणारे तुकडे अधिकच लहान होत गेले व त्यामानानें त्या लहान तुकडयांच्या शेतीवर लोकसंख्येचा भार अधिक पडत चालला. सुमारें ५० वर्षांनंतर ईस्ट अिंडिया कंपनीनें सुरू केलेल्या नव्या जमीनव्यवस्थेचे दुष्परिणाम दिसूं लागले. तेव्हां त्यावेळच्या ब्रिटिश सरकारनें वेगवेगळचा कायद्यांच्या द्वारां ही जमीन परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला. या कायद्यांमुळें शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्यें थोडीबहुत सुधारणा झाली खरी पण प्रारंभीं जशी जमीनव्यवस्था होती तशी व्यवस्था कांहीं निर्माण होऊं शकली नाहीं. बंगाल सरकारनें याबावतींत तांतडीनें लक्ष घालण्याचें ठरविलें व १८५६ च्या आपल्या कायद्यामध्यें दुरुस्ती केली. त्यानंतर उत्तर प्रदेश, मुंबई, बिहार, मद्रास, मध्यप्रदेश या प्रांतांच्या सरकारांनीं जमीनीच्या बाबतींत दलालीचें उच्चाटन करणारे कायदे केले.

प्रथम पंचवार्षिक योजनेमध्यें जी राष्ट्रीय भूमि–नीति मान्य करण्यांत आली तींत राष्ट्रीय विकासामध्यें भू–स्वामित्व व शेती सुधारणा यांना अधिक महत्व आहे हें मान्य केलें आहे. एक अशी भू– व्यवस्था निर्माण व्हावी कीं, ज्या व्यवस्थेंत किसानाचें शोषण होऊं नये, ही व्यवस्था किसानांस अधिकाधिक लाभप्रद व्हावी. प्रथम योजने-मध्यें पुढील तत्त्वें मान्य केली होतीं :– १) सरकार आणि किसान यांमध्यें असलेल्या दलालीचें उच्चाटन. २) भू–संपत्तिची सीमा निश्चित करणें. ३) अतिरिक्त भूमीचें वितरण करणें. ४) किसानांच्या स्थितीमध्यें सुधारणा करणें ५) सहकारी तत्त्वाच्या आधारें शेती संघटित करणें.

द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें जमीन सुधारणेचे दोन उद्देश ठेवले होते. १) हल्लीच्या भू–व्यवस्थेमुळें अधिक धान्य–उत्पादनाच्या मार्गामध्यें येणाऱ्या अड-चणी दूर करणें, २) देशांमध्यें लवकरांत लवकर अशी ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण करावयाची कीं, जीमुळें कार्यक्षमता आणि उत्पादन यांमध्यें वाढ होईल. वर सुच-विलेल्या तत्त्वानुसार राज्य सरकारांनी आपलीं पावलें उचललीं आहेत. नागपूर कॉंग्रेसनें सहकारी शेतीवर भर दिल्यावर शेती सुधारणेला जोराची चालना मिळाली. सहकार तत्त्व जनतेच्या दैनंदिन जीवनांत मुरल्याखेरीज भारतीय जीवनाचा काया-पालट होणार नाहीं.

जमिनीच्या मूळ प्रश्नाला हात घालून निर्धारानें भू-समस्या सोडवूं पहाणाऱ्या आंदोलनांची माहिती करून घेणें आवश्यक आहे. आचार्य विनोबाजी भावे यांनीं ही भू–समस्या सोडविण्याचा व ही समस्या सोडविल्याखेरीज परंधामच्या आश्रमांत परत न येण्याचा निर्धार केला आहे. "न्याय आणि समानता यांच्या आधारावर टिकणाऱ्या समाजामध्यें जमिनीवर सर्वांचा अधिकार प्रस्थापित व्हावयास हवा. यासाठीं मी भूमीचें दान मागत आहे. भिक्षा मागत नाहीं. विमानांतून मी दौरा काढला असतां तर मला मानपत्रें मिळाली असतीं. पण मला भूमीचीं दानपत्रें हवींत म्हणून, मी पायीं फिरतों आहे. गरिबांचा जमिनीचा वांटा गरिबांस मिळाला पाहिजे. सूर्यप्रकाश हवा, पाणी, वारा, पाऊस यांवर कोणाचीच मालकी नसते, त्याप्रमाणें जमीनीवरहि कोणाचीच मालकी असूं शकत नाहीं. कारण जमीन परमेश्वरानें निर्माण केली आहे" असें थोडक्यांत भूदान-आंदोलनाचें सूत्र आहे. आतां तर विनोबांनीं भूदानावरून ग्रामदान, जीवनदान अशा व्यापक पायरीवर दानाची चळवळ नेली आहे. १८ एप्रिल १९५१ रोजीं पोचमपल्ली (आंध्र) येथें हरिजनांच्या मेळाव्यांत विनोबांना भूदानाची कल्पना सुचली. मानवतेला आवाहन करून आपण भारतांतील भू–समस्या सोडवूं असा विनोबांना विश्वास वाटतो. सामुदायिक विकास कार्यक्रम व ग्रामदान आंदोलन यांच्यामध्यें जवळचे संबंध आणावे, असे येळवाळ परिषदेमध्यें ठरलें होतें. त्याप्रमाणें प्रयत्न चालू आहेत.

## भारत आणि आंतरराष्ट्रीय संघटना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्यें घटनेंतील निर्देशक तत्त्वांप्रमाणें वागून वाटचाल करीत आहे. आंतरराष्ट्रीय शान्ति आणि सुरक्षा यांच्या स्थापनेस भारत सक्रीय साहाय्य देत आहे. इतर राष्ट्रांशीं न्यायोचित आणि सन्माननीय संबंध भारतानें निर्माण केले आहेत. आंतरराष्ट्रीय कायदा आणि करार यांच्याबद्दल भारतानें नेहमींच आदर बाळगला आहे. आंतरराष्ट्रीय तंटे सलोख्यानें व शांततेनें मिटविण्यावर भारताचा कटाक्ष आहे. संयुक्त ( यूनो ) घोषणापत्रांमध्यें ग्रथित केलेल्या सिद्धांताचा भारत प्रबल समर्थक आहे. राष्ट्र-संघाच्या संबंधीं घडलेल्या कांहीं महत्वपूर्ण घटनांचा उल्लेख अवश्य करावयास हवा. १९४८ सालीं या विश्वव्यापी संघटनेनें म. गांधीना श्रद्धांजली अर्पण करतेवेळीं आपल्या कार्यालयावरचा ध्वज अधोमुख केला. एकाअर्थी साऱ्या जगानें म. गांधींना ही श्रद्धांजलीच अर्पण केली. १९५०-५२ पर्यंत भारत सुरक्षा समितीचा सदस्य होता. कोरिया प्रकरणीं युद्धबंद्यांचा निर्माण झालेला प्रश्न भारतानें ज्या पद्धतीनें सोडविला त्यामुळें भारताचा आंतरराष्ट्रीय राजकारणामध्यें दर्जा वाढला. १९५३–५४ मध्यें कोरिया–युद्धकैदी परत करणाऱ्या समितीच्या अध्यक्षपदीं भारताची निवड झाली. यावेळीं जनरल थोरातांनीं बजावलेली कामगिरी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर

साऱ्या भारताला अभिमानास्पद ठरली आहे. १९५३ मध्यें श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या ( यूनो ) आमसभेनें ८ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडले. १९५५ मध्यें जिनेव्हा येथें अणुशक्तीचा शांतिसाठीं उपयोग कसा करतां येईल या संबंधीं यूनोद्वारां एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. या परिषदेचें अध्यक्षपद भारताकडे होते. या अध्यक्षपदावरून भारतानें केलेली कामगिरी ही इतिहासांत खास नोंदली जाईल. परराष्ट्रीय नीतिबाबत भारताचें धोरण निश्चित स्वरुपाचें आहे. पंचशील या तत्त्वामध्यें भारताच्या निर्देशित तत्त्वांचें सार सामावलें आहे. जगाच्या कोणत्याहि भागांमध्यें परकीय सैन्यानें प्रवेश करावा, किंवा परकीय सैन्य ठेवावें याला भारतानें कसून विरोध केला आहे. याबाबत हंगेरीचे उदाहरण पुरेसें आहे. "स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भूतपूर्व शासक व भूतशासित यांच्यामध्यें समानता व परस्पराबद्दलचा आदर यांच्या आधारें सहकार्य होऊं शकतें पण हें तेव्हांच होऊं शकतें कीं, जेव्हां, दोन्ही पक्षांची स्वेच्छेनें सहकार्य करण्याची इच्छा असेल. हें सहकार्य इच्छेविरुद्ध लादलें जाऊं नये" असा स्पष्ट इषारा भारतीय प्रतिनिधीनें अल्जेरिया प्रकरणीं यूनोमध्यें बोलतांना दिला. निःशस्त्रीकरणाचा ठराव जेव्हां यूनोच्या बैठकीपुढें चर्चेसाठीं आला तेव्हां भारतानें बिनाशर्त त्यास पाठिंबा दिला. आमसभेच्या १२ व्या अधिवेशनापुढें इतर देशांच्या सहकार्यानें निःशस्त्रीकरण समितीवरील सदस्यांची संख्यावाढ सुचविणारा ठराव भारतानें मांडला. या ठरावानुसार या समितीची पुनर्रचना केली गेली व भारतास त्या समितीमध्यें स्थान मिळालें. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यावेळीं नवी घटना बनवून त्या घटनेनुसार सार्वभौम प्रजासत्ताक भारत असें या देशाचें स्वरूप बनलें. साहजिकच इंग्लंडशीं भारताचे संबंध प्रेमाचे व सहकार्याचे होते. ब्रिटननें नवयुगाची चाहूल घेऊन भारताप्रमाणें अन्य कांहीं देशांनाहि स्वातंत्र्य दिलें होतें. या सर्व राष्ट्रांचें एक राष्ट्रकुल बनलें. भारत या राष्ट्रकुलाचा सदस्य बनला. राष्ट्रकुल या नांवामागें 'ब्रिटिश' असा शब्द लावला जात असे, पण तो शब्दहि काढून टाकण्यांत आला. राष्ट्रकुलामध्यें पुढील सभासद राष्ट्रें आहेत :— ऑस्ट्रेलिया, कॅनडा, घाना, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, पाकिस्तान, ब्रिटन, भारत, मलाया, लंका. राष्ट्रकुलांतील पंतप्रधानांची बैठक वारंवार होत असते. त्याचप्रमाणें ह्या राष्ट्रांच्या अर्थमंत्र्यांच्या व सरसेनापतींच्या बैठकी होत असतात. आपल्या देशांचे समान हितसंबंध असणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर या बैठकींमध्यें विचारविनिमय केला जातो. भारतानें इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्रम्हदेश, लंका, यांच्या प्रधानमंत्र्यांच्या वारंवार बैठका भरविण्यांत प्रामुख्यानें पुढाकार घेतला आहे. वरील राष्ट्रांची प्रथम बैठक १९५४ मध्यें कोलंबो येथें झाली. शेजारी मित्रराष्ट्रांशीं स्नेहाचे संबंध ठेऊन समान हितसंबंधीं प्रश्नांवर चर्चा करण्याचा नवा प्रघात भारतानें पाडला.

भारत, ब्रम्हदेश, पाकिस्तान, लंका, इंडोनेशिया या देशांच्या पंतप्रधानांनीं

आशिया व आफ्रिका खंडांतील स्वतंत्र राष्ट्रांची परिषद बोलावली. ही परिषद एप्रिल १९५५ मध्यें बांडुंग (अिंडोनेशिया) येथें झाली. या परिषदेमध्ये आशिया-आफ्रिका खंडांतील २९ देशांनीं भाग घेतला होता. ही परिषद म्हणजे अशी अभूतपूर्व घटना घडली कीं, साऱ्या जगाचें लक्ष परिषदेच्या कामकाजाकडे वेधलें गेलें. आशिया, आफ्रिकेमधील स्वतंत्र राष्ट्रांना एकत्र येऊन विचार विनिमय करण्याची इतिहासांत प्रथम संधी मिळाली. या परिषदेमुळें दोन्ही खंडांतील देशांमध्यें सद्भावना आणि स्नेह यांना उत्तेजन मिळालें.

वरील विवेचनावरून भारत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्यें कोणत्या तत्वाला अनुसरून काम करीत आहे, याची कल्पना वाचकांना आली असेल. भारताचें परराष्ट्रीय संबंधांबाबत एक विशिष्ट धोरण आहे. कोणत्याहि सत्तागटांत सामील न होता जगामध्ये शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्याचा प्रयत्न करावयाचा असें भारताचें धोरण आहे. प्रारंभीं या धोरणाचा इतर देशांवर फारसा प्रभाव पडला नाहीं. पण हळूहळू भारतीय धोरणाचें आंतरराष्ट्रीय महत्व अन्य देशांना समजत आहे, व ते देशहि या धोरणाचा पाठपुरावा करीत आहेत.

## प्रजासत्ताक दिनांचीं सन्मान पदकें

भारत प्रजासत्ताक झाल्यावर त्या वाढदिवशीं लष्करी व मुलकी विभागांतील व्यक्तींना मानचिन्हें देण्याची पद्धत राष्ट्रपतींनीं सुरू केली. हीं मानचिन्हें पुढीलप्रमाणें:– १) भारतरत्न, २) परमवीरचक्र, ३) अशोकचक्र, वर्ग १ ला, ४) पद्मविभूषण, ५) पद्मभूषण, ६) महावीर चक्र. ७) अशोक चक्र, वर्ग २ रा. ८) पद्मश्री, ९) वीर चक्र, १०) अशोक चक्र, वर्ग ३ रा, ११) राष्ट्रपतींचें पोलिस व फायर सर्व्हिसेस् पदक (शौर्यासाठीं), १२) पोलिस पदक (शौर्यासाठीं). १३) जनरल सर्व्हिसेस् पदक, १४) राष्ट्रपतींचें पोलिस व फायर सर्व्हिसेस् पदक (विशेष कामगिरीबद्दल), १५) नोकरींतील गुणवत्तेबद्दल पदक, १६) दीर्घकाळ सेवा व सद्वर्तन यासाठीं पदक, १७) पोलिस पदक. (विशेष कामगिरीबद्दल) १८) प्रादेशिक सेवा मानचिन्ह, १९) प्रादेशिक सेवा पदक, २०) भारतीय स्वातंत्र्य पदक, १९४७, २१) स्वातंत्र्य पदक, १९५०, २२) इतर पदकें.

## कांहीं महत्त्वाच्या मानचिन्हांचीं माहिती पुढीलप्रमाणें :–

भारतरत्न :– कला, साहित्य, विज्ञान यांच्या उन्नतिसाठीं केलेल्या असाधारण कार्यासाठीं आणि सर्वोत्कृष्ट देशसेवा केल्याबद्दल हें मानचिन्ह दिलें जातें. हें मानचिन्ह पिंपळाच्या पानाच्या आकाराचें असतें; २५ अिंच लांब, १७ अिंच रुंद, १ अिंच उंच असें हें चिन्ह असतें. पुढील बाजूस सूर्याकृति व त्याच्याखालीं हिंदीमध्यें 'भारतरत्न'

हीं अक्षरें असतात. मागील बाजूस राज्यचिन्ह व उद्देशवाक्य हिंदीमध्यें असतें. या चिन्हाच्या चारी बाजू प्लॅटीनम्च्या असतात.

पद्मविभूषण :— विशिष्ट पण असामान्य सेवाकार्य करणाऱ्या व्यक्तीस हें मानचिन्ह दिलें जातें. सरकारी अधिकाऱ्यांनाहि हा मान मिळतो. हें मानचिन्ह उभट गोलाकृति असतें. व्यास १३ अिंच असतो. उंची १ अिंच असतें. पुढील बाजूस उभें कमलपुष्प असतें. कमलपुष्पाच्या वरील बाजूस पद्म आणि खालील बाजूस विभूषण असे हिंदी शब्द असतात. मागील बाजूस राज्यचिन्ह व हिंदीमध्यें उद्देशवाक्य असतें.

पद्मभूषण :— कोणत्याहि क्षेत्रामध्यें केलेल्या विशिष्ट सेवेबद्दल हें मानचिन्ह दिलें जातें. सरकारी अधिकाऱ्यांनाहि हा मान मिळतो. पद्मविभूषण या मानचिन्हासारखें हें मानचिन्ह असतें. फक्त कमलपुष्पावर पद्म व कमलपुष्पाखालीं भूषण ही हिंदीमध्यें अक्षरें असतात.

पद्मश्री :— कोणत्याहि क्षेत्रांत असामान्य सेवा करणाऱ्या व्यक्तीस हें पदक दिलें जातें. सरकारी नोकरांसहि हा मान मिळतो. या पदकाच्या वरील भागांत कमल-पुष्पावरील बाजूस पद्म व पद्मश्री हीं अक्षरें हिंदीमध्यें असतात. या पदकाच्या दोन्ही उभ्या बाजू स्टेनलेस स्टीलच्या असतात.

## परदेशांतील भारतीय वकिलाती

१) अफगणिस्तान. २) अर्जेंटिना. ३) ऑस्ट्रेलिया. ४) बेल्जम. ५) ब्राझील. ६) ब्रम्हदेश. ७) कंबोडिया. ८) चीन. ९) झेकोस्लोव्हाकिया. १०) डेन्मार्क. ११) अिथिओपिया. १२) फ्रान्स. १३) जर्मनी (फेडरल रिपब्लिक.) १४) ग्रीस. १५) अिंडोनेशिया. १६) इराण. १७) इराक. १८) आयर्लंड. १९) अिटाली. २०) जपान. २१) लाओस. २२) मेक्सिको. २३) नेपाळ. २४) नेदरलँड्स्. २५) नॉर्वे. २६) फिलीपाओन्स. २७) पोलंड. २८) रुमानिया. २९) सौदी अरेबिया. ३०) स्पेन. ३१) सुदान. ३२) स्वीडन. ३३) स्वीत्झर्लंड. ३४) थायलंड. ३५) टर्की. ३६) युनायटेड अरब रिपब्लिक. ३७) युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका ३८) रशिया. ३९) युगोस्लाव्हिया.

## परदेशांतील हायकमिशनर ऑफिसेस

१) ऑस्ट्रेलिया. २) कॅनडा. ३) सिलोन. ४) घाना. ५) मलाया. ६) न्युझीलंड. ७) पाकिस्तान. ८) ब्रिटन (अिंग्लंड).

## खास पारितोषिकें

भारत सरकारनें भाषा, साहित्य, मुद्रणकला आदींच्या विकासासाठीं पारि-तोषिकें ठेवलीं आहेत. दरवर्षी अखिल भारतीय पातळीवर स्पर्धा होऊन क्रमांका-नुसार हीं पारितोषिकें दिलीं जातात.

१) भारतांत असलेल्या भाषांमधून प्रसिद्ध होणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथास रु.५००० चा रोख पुरस्कार दिला जातो. २) संगीत, नृत्य, नाटक या कलांबद्दल लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट ग्रंथास पुरस्कार दिला जातो. ३) १० वर्षांखालील मुलांमुलींसाठीं उत्कृष्ट पुस्तक लिहिणाऱ्या लेखकास व ४) १० वर्षांवरील मुलांमुलींसाठीं उत्कृष्ट पुस्तक लिहिणाऱ्या लेखकास पुरस्कार दिला जातो. ५) उत्कृष्ट छपाअी व सजावट यांच्यासाठीं पुरस्कार. ६) सर्वाधिक खप, बातमी व छपाअी या दृष्टीनें अिंग्रजी वृत्तपत्रास व भारतीय भाषांमधील वृत्तपत्रास पुरस्कार भारत सरकार देत असते.

## परदेशांतील भारत सरकारच्या वकिलाती :-

१) अफगणिस्तान – काबूल.
२) अर्जेंटिना – ब्यूनॉसएअर्स
३) ऑस्ट्रिया – व्हिअेन्ना
४) बेलजम् – ब्रुसेलस्.
५) बोलिव्हया – लापाझ
६) ब्राझिल – रिओ द जानेरो
७) ब्रम्हदेश – रंगून.
८) कंबोडिया – फोनानपेंच
९) चीन – पेकिंग.
१०) झेकोस्लोव्हाकिया – प्राग.
११) डेन्मार्क – कोपनहॅगेन
१२) अेथिओपिया – अदिस अबावा
१३) फ्रॉन्स – पॅरिस.
१४) जर्मनी – बॉन.
१५) ग्रीस – अथेन्स
१६) अिंडोनेशिया – जाकर्ता.
१७) अिराण – तेहरान.
१८) अिराक – बगदाद.
१९) आर्यलंड – डब्लिन.
२०) अिटली – रोम.
२१) जपान – टोकियो.
२२) लाओस
२३) मेक्झिको – मेक्झिको.
२४) मंगोलिया – उलान बातोर
२५) मोरोक्को – मोरोक्को.
२६) नेपाळ – खाटमाडू
२७) नेदर्लंड – हेग.
२८) नॉर्वे – ओस्लो
२९) फिलिपाअीन्स – मॅनिला
३०) पोलंड – वार्सा
३१) रुमानिया – बखारेस्ट
३२) सौदी अरेबिया – रियाध
३३) स्पेन – माद्रिक
३४) सुदान – खार्टूम
३५) स्विडन – स्टॉकहोम.
३६) स्वित्झर्लंड – बर्न्स.
३७) थायलंड – बँकॉक
३८) तुर्की – अंकारा.
३९) युनायटेड अरब रिपब्लिक – कैरो
४०) अमेरिका – वॉशिंग्टन.
४१) रशिया – मॉस्को.
४२) युगोलाव्हिया - बेलग्रेड.
४३) ऑस्ट्रेलिया - कॅनबेरा
४४) कॅनडा - ओटावा
४५) सिलोन कोलंबो.
४६) घाना आक्रा.
४७) मलाया – क्वाला लंपूर

४८) न्युझिलंड – वेलिंग्टन
४९) पाकिस्तान – कराची.
५०) ब्रिटन – लंडन.
५१) अल्बेनिया – तिरान
५२) बल्गेरिया – सोफिआ
५३) क्युबा – हॅवाना
५४) फिनलंड – हेल्सिंकि
५५) हंगेरी – बुडापेस्ट.
५६) जॉर्डन – आम्मान
५७) लेबॅनॉन – बैरूट
५८) ब्रिटिश वेस्ट इंडिज् – त्रिनिदाद
५९) सेंट्रल आफ्रिकन फेडरेशन – लुसाका
६०) ईस्ट आफ्रिका – नैरोबी
६१) हाँगकाँग – हाँगकाँग.
६२) नायजेरिया – लागोस
६३) सिंगापूर – सिंगापूर.
६४) युगांडा – कंबाला.

अल्प रकमांवर आकर्षक व्याज देणाऱ्या योजना

स्थापना १९३५ ) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ( शेड्यूल्ड बँक

प्रत्येकीं रु. १००, रु. ५०० व, रु १००० चीं कॅश सर्टिफिकिटें
३ वर्षें मुदत सर्टिफिकिटांस खरेदी किंमत शेंकडा रु.८८.७५ व
५ वर्षें मुदत सर्टिफिकिटांस खरेदी किंमत शेंकडा रु. ८१
व्याजाचा दर चक्रवाढव्याजानें द. सा द. शें. अनुक्रमें चार व सव्वाचार टक्के

विशाल महाराष्ट्रांत व अन्यत्र ४६ शाखा

महाविदर्भ व मराठवाड्यांतील पुढील ठिकाणीं शाखा आहेत. तेथील जनतेनें त्यांच्या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा.
अकोला, अमरावती, औरंगाबाद, हिंगोली, जालना, खामगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, परळी वैजनाथ व यवतमाळ.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २

चिं. वि. जोग
मॅनेजर

फोन नं. १४२

# रोशन ट्रान्सपोर्ट

मोंढारोड, जालना

जालना ते मुंबई प्रांत, आंध्र प्रदेश, मध्य भारत, उत्तर प्रदेश, भारतांत सर्व ठिकाणीं किफायतशीर व काळजीपूर्वक माल पाठविला जातो.

टीपः– मुंबई अकोला सोलापूर डेली सर्व्हिस

: प्रोप्रायटर :

रोशनलाल अमरचंद नय्यर

तार : अग्रवाल फोन : ११० P.P. (२४ घंटे)

# हमारी विशेषतायें–

० अनाज, दाल, तेल और तिलहनके प्रमुख आडतिया

० हर पत्रका संतोषकारक एवम् शिघ्र जबाब देनेकी व्यवस्था।

० संतोषजनक कार्य एवम् हर संभव फायदा करनेकी व्यवस्था।

सेवामें– दत्तुलाल नंदुलाल

अग्रवाल अँड कंपनी, कादराबाद

जालना (C. Rly.)

सरकारी ऑफिसेस, सहकारी शैक्षणिक संस्था व तसेंच घरगुती लागणारें, अद्यावत पद्धतीचे सुंदर, टिकावू व सर्व प्रकारचें

## खुर्ची, टेबल, शो केसेस, अलमाऱ्या, सोफासेट इ.

## ० फर्निचर्स ०

उत्तम सागवानी लांकडापासून कुशल कारागिरांकडून तयार करून योग्य किमतींत पुरविणाऱ्या एकमेव

## सहकारी संस्थेकडेच आपली ऑर्डर नोंदवा

– भेटा अगर लिहा –

# विश्वकर्मा को–ऑ. फर्निचर्स सोसायटी लि.

क्रांति चौक, औरंगाबाद.

चेअरमन
रघुवीर सिंह

सेक्रेटरी
ताराकुमार टिवडीवाला,
(सदस्य नगरपालिका)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक 28303 दि.
क्रमांक 286 - दि.

# नित्योपयोगी माहिती

# नित्योपयोगी माहिती

नागरिकांच्या व्यवहाराचें क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. अेकाच व्यक्तीचा दिवसांतून अनेक व्यक्तींशीं, अनेक खात्यांशीं संबंध येतो. पोस्ट, रेल्वे, टेलिफोन आदि बाबी नागरिकांच्या दैनंदिन जीवनांतील महत्वाच्या गोष्टी ठरल्या आहेत. अशा दैनंदिन जीवनाशीं निगडीत असलेल्या गोष्टींची संक्षिप्त माहिती या प्रकरणांतून सादर करीत आहोंत.

## पोस्ट

**१ पोस्ट कार्ड :–** एकेरी :–१।। तोळयापर्यंत–५ नवे पैसे. (आकार ५$\frac{3}{8}$" × ४$\frac{1}{8}$" पेक्षां जास्त नाहीं वा ४" × २$\frac{1}{8}$" पेक्षां कमी नाहीं.)

पोस्टकार्ड दुहेरी:– उत्तरासाठीं जोडकार्ड १० नवे पैसे.

स्थानिक :– एकेरी पोस्टकार्ड– ३ नवे पैसे.

दुहेरी :– उत्तरासाठीं जोडकार्ड ६ नवे पैसे.

**२ आंतरदेशीय पत्र :–** १० नवे पैसे. (या पत्रासारखें आंतरदेशीय पत्र छापून घेतां येतें.)

**३ पाकिट :–** १।। तोळयांपर्यंत १५ नवे पैसे व पुढें प्रत्येक १।। तोळयास किंवा त्याच्या भागास १० नवे पैसे.

**४ बुक पोस्ट :–** १) छापील पुस्तकांकरितां, प्रेस मॅटर, प्रुफें आदिंसाठीं पांच तोळयांपर्यंत ५ नवे पैसे. पुढें प्रत्येक २।। तोळयांस व त्याच्या भागास ३ नवे पैसे.

२) सँपल (छापील) पाठविण्यासाठीं केलेल्या बुक पोस्टला पांच तोळयांपर्यंत ८ नवे पैसे व पुढें प्रत्येक २।। तोळयांना ३ नवे पैसे.

**५ एक्स्प्रेस डिलिव्हरी :–** योग्य टपाल हंशील अधिक १३ नवे पैसे.

**६ तिळगूळ पिशव्या २।। तोळेपर्यंत :–** सँपल पिशव्या १५ नवे पैसे.

**७ पार्सल :–** प्रत्येक ४० तोळयांस किंवा त्याच्या भागास ५० नवे पैसे. १००० तोळयांपर्यंतचें पार्सल पाठवितां येतें. ४० तोळयांवरचें पार्सल रजिस्टरनें पाठविणें अधिक योग्य.

**८ रजिस्ट्रेशन फी :–** योग्य टपाल–हंशील, अधिक ५० नवे पैसे. परतपोंच हवी असल्यास ६ नवे पैसे अधिक.

**९ सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग :–** आपण आपल्या वस्तु पाठविण्यासाठीं पोस्टाच्या हवालीं केल्या आहेत याचा ३ नवे पैसे देऊन दाखला मिळवितां येतो. पोस्टांतून मिळणाऱ्या मोफत फॉर्मवर ज्याला वस्तू पाठविली व ज्यानें वस्तू पाठविली त्यांचा उल्लेख करून वस्तू व फॉर्म पोस्टाच्या खिडकीवर द्याव्या. वस्तू ठेऊन घेऊन फॉर्मवर शिक्का मारून दाखला देण्यांत येतो.

**१० लेट फी :–** ठराविक वेळेच्या आंत टपाल पेटी मध्यें टपाल टाकलें न गेल्यास व त्याच दिवशीं टपाल जाणें जरूर असल्यास ३ नवे पैशांचीं जादा तिकीटें लावावीं लागतात. रेल्वे पोस्ट ऑफिसमध्यें ६ नवे पैशान्चें तिकीट लावावें लागतें.

**११ नॉटपेड पोस्टेज :–** योग्य टपाल हंशील नसल्यास किंवा अपुरें टपाल हंशील असल्यास टपाल घेणाऱ्या व्यक्तीकडून कमी असलेल्या हंशीलाच्या दुप्पट दंड भरून टपाल घ्यावें लागतें.

**१२ मनी ऑर्डर :–** १) **साधी**– प्रत्येक दहा रुपये किंवा त्याच्या भागास १५ नवे पैसे. ६०० रु. वरील रक्कम मनीऑर्डरनें जात नाहीं. २) **तारेनें**– साध्या मनी ऑर्डरप्रमाणें योग्य कमिशन अधिक १५ नवे पैसे. (अेक्स्प्रेस किंवा साधी) तारेचा खर्च दिल्यास तारेप्रमाणें रक्कम त्वरीत पाठवितां येते.

**१३ व्ही. पी. :–** वस्तूचें योग्य टपाल हंशील, अधिक रजिस्ट्रेशनचा खर्च व येणे असलेल्या रकमेचें मनिऑर्डर कमिशन, हें सर्व आधीं भरून एखादी वस्तू पाठवितां येते. व्ही. पी. नाकारली गेल्यास पोस्ट खातें जबाबदार नसतें. त्यासाठीं लागलेलें टपाल हंशील अर्थातच पाठविणारानें लावलेलेंच असतें.

**१४ अिन्शुअरन्स :–** अधिक महत्वाचा व जोखमी माल किंमतीनुरूप अिन्शु-अरन्स करून पाठविण्याची सोय आहे. अिन्शुअर्ड पाकीट वा वस्तू गहाळ झाल्यास टपाल खातें अिन्शुअरन्स केलेली रक्कम भरण्यास बांधलें गेलेलें असतें. अिन्शुअर-न्सचा खर्च पहिल्या १०० रुपयांपर्यंत सदतीस नवे पैसे व पुढील प्रतिशत किंवा त्याच्या भागास (५ हजारांपर्यंत) वीस नवे पैसे असा असतो.

**१५ पोस्टल ऑर्डर :–** अर्ध्या रुपयापासून अेक, दीड, दोन, अडीच अशा-प्रकारें दहा रुपयांपर्यंत २० प्रकारच्या पोस्टल ऑर्डरी पोस्ट ऑफिस-मध्यें विकत मिळू शकतात व वटवितां येतात. अर्ध्या रुपयापेक्षां कमी रकमेची पोस्टल ऑर्डर मिळत नसली तरी पुष्कळ किंवा अपूर्ण रकमेचीं दोन तिकीटें

पोस्टल ऑर्डरवर चिकटवून योग्य त्या रकमेची पोस्टल ऑर्डर तयार होऊं शकते. अर्ध्या रुपयापासून ५ रुपयांपर्यंतच्या पोस्टल ऑर्डरला पांच नवे पैसे व साडेपांच रुपयांपासून दहा रुपयांपर्यंत दहा नवे पैसे पडतात. कमिशन पोस्टल ऑर्डर खरेदी करतांना द्यावें लागतें. पोस्टल ऑर्डरला वटणावळ पडत नाहीं. ती पाठवितांना क्रॉस करून पाठविल्यास पोस्टांतील वा बँकेंतील खात्यावरच वटवितां येते. क्रॉस न केलेली पोस्टल ऑर्डर तिऱ्हाईताच्या हातीं पडल्यास त्याच्याकडून ती वटविली जाण्याची शक्यता असते.

**१६ पोस्ट ऑफीस सेव्हींग्ज बँक :–** हेड पोस्ट ऑफीस, सब् पोस्ट ऑफीस, कांहीं विशेष ब्रँच पोस्ट ऑफीसेस् मध्यें खातें उघडून आपली शिलकी रक्कम ठेवतां येते. कमीत कमी २ रुपये व जास्तींत जास्त १५ हजार रुपये या खात्यावर एका माणसास ठेवतां येतात. दोघांचें संयुक्त खातें असल्यास ३० हजार रुपये ठेवतां येतात. रक्कम काढतांना किंवा भरणा करतांना पूर्ण रुपयेच काढतां किंवा भरतां येतात. अन्य बँकांप्रमाणें सर्व व्यवहार या खात्यावर करतां येत नाहींत. बचत करून शिल्लक वाढविण्याच्या हेतूनें व सुरक्षितता म्हणून अनेक-जण खातें उघडतात. खात्यावरील रकमेवर २॥ टक्के व्याज दिलें जातें. आठ-वड्यांतून एकदांच रक्कम काढतां येतें. ज्या पोस्ट ऑफीसमध्यें खातें असेल त्याच पोस्ट ऑफीसमधून पैसे काढतां येतात. आपलें खातें दुसऱ्या गांवीं वदलून हवें असेल तर आपलें पासबुक टपालानें मोफत पाठवितां येतें. पासबुक हरवलें असतां त्वरीत पोस्ट ऑफीसला कळवावें. नाईलाज–परिस्थितीखेरीज इतर परिस्थितींत हरवलेल्या किंवा खराब झालेल्या पासबुकाऐवजीं दुसरें पासबुक देण्यास १। रु. फी आकारली जाते. ज्या खात्यांत पूर्ण ६ वर्षांत कोणताहि व्यवहार झालेला नसेल तीं खातीं "डेड अकौंटस्" म्हणून समजलीं जातात. हेड पोस्ट मास्तरांच्या आगाऊ हुकुमाशिवाय अशा खात्यांत नवीन ठेवी ठेवतां येत नाहींत किंवा त्यांतून पैसेहि काढतां येत नाहींत. "डेड अकौंटस्" सरकार जमा होत नाहीं. तो खाते-दारानें केव्हांहि अर्ज केला असतां पुन्हा सुरू करतां येतो व त्यानंतर त्यावर सांचलेलें सर्व व्याज पासबुकावरील मूळ रकमेंत मिळविलें जातें. खातेदारानें पत्ता कायमचा वदलला असल्यास त्याची माहिती दिली पाहिजे.

## १७ परदेशीं पत्र दर

**पत्र :–** १ औंसापर्यंत २५ नवे पैसे व त्यावरील प्रत्येक औंसास व त्याच्या भागास १५ नवे पैसे.

**पोस्ट कार्ड :– एकेरी–** १५ नवे पैसे. **दुहेरी–** ३० नवे पैसे. **छापील**

**कागदपत्र** – पहिल्या २ औंसांसाठीं ८ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

**१८ व्यापारी पत्रें :–** ८ औंसांपर्यंत २५ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

**१९ नमुना पाकीट :–** २ औंसांपर्यंत ८ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

## *तारेसंबंधीं उपयुक्त माहिती*

**२० तार :–** टपालानें पाठविलेलीं पत्रें वा वस्तू रेल्वे, मोटार, विमान आदि जलद वाहनांनीं जातात. क्वचित् ठिकाणीं सोय नसल्यास सायकलवरून अगर पायींहि टपाल पाठविलें जातें. या सर्व प्रकारच्या वाहतुकीमध्यें निदान एक दिवस तरी टपाल पोचण्यास लागतो. अत्यंत महत्वाचा संदेश टपालापेक्षां जलद जाणें आवश्यक असल्यास तारेचा उपयोग केला जातो.

तार आली कीं, कोणीतरी दगावलें असलें पाहिजे अशी समजूत झालेली दिसते. परंतु ती समजूत बरोबर नाहीं. ज्याप्रमाणें वाईट वार्ता तारेनें जाते त्याचप्रमाणें चांगलीहि वार्ता तारेनें जाते. अभिनंदन, आभार, शुभेच्छा, आशिर्वाद, कृतज्ञता आदि भाव तारेनें व्यक्त केले जातात. वृत्तपत्रांच्या ताज्या वार्ता मिळविण्यासाठीं तारेनें पाठवितात. बाजारभाव, हवामान, सावधानतेची सूचना वगैरे कारणांसाठीं तारेचा उपयोग होतो.

तारेनें रक्कमहि पाठवितां येतें. साधी व अेक्सप्रेस याप्रमाणें दोन प्रकारची तार पाठविण्याची सोय असते. दोनहि तारा जाण्यास सारखाच वेळ लागतो. परंतु घाईगर्दीच्या वेळीं अेक्सप्रेस तार अग्रहक्कानें पाठविली जाते. सुट्टीच्या दिवशीं अेक्सप्रेस तारच पाठवावी लागते. अेक्सप्रेस तारेचा बटवडा दिवसा आणि रात्रीं त्वरीत केला जातो. साधी तार सुटीच्या वेळांत पोचल्यास बटवडा दुसऱ्या दिवशीं कार्यालयीन वेळांत केला जातो. हा फरक नीट समजून न घेतल्यास क्वचित् प्रसंगीं साधें टपालहि तारेच्या आधी पोहोंचणें शक्य आहे.

अलीकडे अिंग्रजीऐवजीं नागरी लिपींत दिलेल्या ताराहि पाठविण्याची सोय होत आहे. हिंदी व मराठींतूनहि प्रमुख ठिकाणीं तारा पाठवितां येतात. तार करतांना याबद्दल चौकशी करून शक्यतों आपली तार स्वकीय भाषेंतच करावी.

वृत्तपत्र वार्ता तारेनें पाठविण्यास सवलतीचा दर असून अशा तारा वृत्त-पत्रांच्या अधिकृत प्रतिनिधींना व वार्ताहरांनाच पाठवितां येतात. अशा तारांचा एकच मजकूर एकाच गांवांत एकापेक्षां अधिक ठिकाणीं पाठविण्यास १०० शब्दांस

पोस्टल ऑर्डरवर चिकटवून योग्य त्या रकमेची पोस्टल ऑर्डर तयार होऊं शकते. अर्ध्या रुपयापासून ५ रुपयांपर्यंतच्या पोस्टल ऑर्डरला पांच नवे पैसे व साडेपांच रुपयांपासून दहा रुपयांपर्यंत दहा नवे पैसे पडतात. कमिशन पोस्टल ऑर्डर खरेदी करतांना द्यावें लागतें. पोस्टल ऑर्डरला वटणावळ पडत नाहीं. ती पाठवितांना क्रॉस करून पाठविल्यास पोस्टांतील वा बँकेंतील खात्यावरच वटवितां येते. क्रॉस न केलेली पोस्टल ऑर्डर तिऱ्हाईताच्या हातीं पडल्यास त्याच्याकडून ती वटविली जाण्याची शक्यता असते.

**१६ पोस्ट ऑफीस सेव्हींग्ज बँक :–** हेड पोस्ट ऑफीस, सब् पोस्ट ऑफीस, कांहीं विशेष ब्रँच पोस्ट ऑफीसेस् मध्यें खातें उघडून आपली शिलकी रक्कम ठेवतां येते. कमीत कमी २ रुपये व जास्तींत जास्त १५ हजार रुपये या खात्यावर एका माणसास ठेवतां येतात. दोघांचें संयुक्त खातें असल्यास ३० हजार रुपये ठेवतां येतात. रक्कम काढतांना किंवा भरणा करतांना पूर्ण रुपयेच काढतां किंवा भरतां येतात. अन्य बँकांप्रमाणें सर्व व्यवहार या खात्यावर करतां येत नाहींत. बचत करून शिल्लक वाढविण्याच्या हेतूनें व सुरक्षितता म्हणून अनेक-जण खातें उघडतात. खात्यावरील रकमेवर २॥ टक्के व्याज दिलें जातें. आठ-वड्यांतून एकदांच रक्कम काढतां येतें. ज्या पोस्ट ऑफीसमध्यें खातें असेल त्याच पोस्ट ऑफीसमधून पैसे काढतां येतात. आपलें खातें दुसऱ्या गांवीं बदलून हवें असेल तर आपलें पासबुक टपालानें मोफत पाठवितां येतें. पासबुक हरवलें असतां त्वरीत पोस्ट ऑफीसला कळवावें. नाईलाज–परिस्थितीखेरीज इतर परिस्थितींत हरवलेल्या किंवा खराब झालेल्या पासबुकाऐवजीं दुसरें पासबुक देण्यास १। रु. फी आकारली जाते. ज्या खात्यांत पूर्ण ६ वर्षांत कोणताहि व्यवहार झालेला नसेल तीं खातीं "डेड अकौंटस्" म्हणून समजलीं जातात. हेड पोस्ट मास्तरांच्या आगाऊ हुकुमाशिवाय अशा खात्यांत नवीन ठेवी ठेवतां येत नाहींत किंवा त्यांतून पैसेहि काढतां येत नाहींत. "डेड अकौंटस्" सरकार जमा होत नाहीं. तो खाते-दारानें केव्हांहि अर्ज केला असतां पुन्हा सुरू करतां येतो व त्यानंतर त्यावर सांचलेलें सर्व व्याज पासबुकावरील मूळ रकमेंत मिळविलें जातें. खातेदारानें पत्ता कायमचा बदलला असल्यास त्याची माहिती दिली पाहिजे.

## *१७ परदेशीं पत्र दर*

**पत्र :–** १ औंसापर्यंत २५ नवे पैसे व त्यावरील प्रत्येक औंसास व त्याच्या भागास १५ नवे पैसे.

**पोस्ट कार्ड :– एकेरी–** १५ नवे पैसे. **दुहेरी–** ३० नवे पैसे. **छापील**

**कागदपत्र** – पहिल्या २ औंसांसाठीं ८ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

**१८ व्यापारी पत्रें :–** ८ औंसांपर्यंत २५ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

**१९ नमुना पाकीट :–** २ औंसांपर्यंत ८ नवे पैसे व त्यावरील २ औंस व त्याच्या भागास ६ नवे पैसे.

## *तारेसंबंधीं उपयुक्त माहिती*

**२० तार :–** टपालानें पाठविलेलीं पत्रें वा वस्तू रेल्वे, मोटार, विमान आदि जलद वाहनांनीं जातात. क्वचित् ठिकाणीं सोय नसल्यास सायकलवरून अगर पायींहि टपाल पाठविलें जातें. या सर्व प्रकारच्या वाहतुकीमध्यें निदान एक दिवस तरी टपाल पोचण्यास लागतो. अत्यंत महत्वाचा संदेश टपालापेक्षां जलद जाणें आवश्यक असल्यास तारेचा उपयोग केला जातो.

तार आली कीं, कोणीतरी दगावलें असलें पाहिजे अशी समजूत झालेली दिसते. परंतु ती समजूत बरोबर नाहीं. ज्याप्रमाणें वाईट वार्ता तारेनें जाते त्याचप्रमाणें चांगलीहि वार्ता तारेनें जाते. अभिनंदन, आभार, शुभेच्छा, आशिर्वाद, कृतज्ञता आदि भाव तारेनें व्यक्त केले जातात. वृत्तपत्रांच्या ताज्या वार्ता मिळविण्यासाठीं तारेनें पाठवितात. बाजारभाव, हवामान, सावधानतेची सूचना वगैरे कारणांसाठीं तारेचा उपयोग होतो.

तारेनें रक्कमहि पाठवितां येतें. साधी व अेक्सप्रेस याप्रमाणें दोन प्रकारची तार पाठविण्याची सोय असते. दोनहि तारा जाण्यास सारखाच वेळ लागतो. परंतु घाओगर्दीच्या वेळीं अेक्सप्रेस तार अग्रहक्कानें पाठविली जाते. सुट्टीच्या दिवशीं अेक्सप्रेस तारच पाठवावी लागते. अेक्सप्रेस तारेचा बटवडा दिवसा आणि रात्रीं त्वरीत केला जातो. साधी तार सुटीच्या वेळांत पोचल्यास बटवडा दुसऱ्या दिवशीं कार्यालयीन वेळांत केला जातो. हा फरक नीट समजून न घेतल्यास क्वचित् प्रसंगीं साधें टपालहि तारेच्या आधीं पोहोंचणें शक्य आहे.

अलीकडे अिंग्रजीऐवजीं नागरी लिपींत दिलेल्या ताराहि पाठविण्याची सोय होत आहे. हिंदी व मराठींतूनहि प्रमुख ठिकाणीं तारा पाठवितां येतात. तार करतांना याबद्दल चौकशी करून शक्यतों आपली तार स्वकीय भाषेंतच करावी.

वृत्तपत्र वार्ता तारेनें पाठविण्यास सवलतीचा दर असून अशा तारा वृत्तपत्रांच्या अधिकृत प्रतिनिधींना व वार्ताहरांनाच पाठवितां येतात. अशा तारांचा एकच मजकूर एकाच गांवांत एकापेक्षां अधिक ठिकाणीं पाठविण्यास १०० शब्दांस

२५ नवे पैसे अधिक आकार पडतो. एखादी वार्ता दोनतीन वृत्तपत्रांस देतांना वार्ताहरांना या सोयीचा लाभ होतो.

तारेचा खर्च बराच पडत असल्यानें ती कमीतकमी शब्दांत लिहावी लागते. आपणांस अपेक्षित अर्थच तेवढा लिहिलेल्या शब्दांनीं व्यक्त होतो किंवा नाहीं, हें पाहणें आवश्यक असते. तार केव्हां पोहोंचेल याचा अंदाज करून लिहिलेला मजकूर उशीरा पोहचल्यास त्यामुळें घोटाळा होणार नाहीं याची दक्षता घेणें जरूर असते. तारेचा मजकूर अर्थपूर्ण पण सुटसुटीत तयार करणें हें कौशल्याचेंच काम आहे.

पत्ता लिहिण्याच्या कांहीं सोयी व तयार संदेशाचा मजकूर यामुळें तारेंतील शब्द कमी करतां येतात. पत्ता लिहितांना टेलिफोन नंबर लिहितां येतो. त्याचप्रमाणें तारेचा पत्ता नोंदला असल्यास मजकुरांत बचत होते. मोठ्या संस्था व बराच व्यवहार असलेले व्यापारी सोयीसाठीं वरील दोन्ही प्रकारच्या व्यवस्था करून ठेवतात. त्यामुळें अशा ठिकाणीं तार पाठवितांना थोड्या शब्दांत आपलें काम भागतें.

साध्या तारेस (पत्त्यासह) आठ शब्दास ८० नवे पैसे, पुढच्या प्रत्येक शब्दास ८ नवे पैसे. अेक्स्प्रेस तारेस साध्या तारेच्या दुप्पट आकार पडतो. सुटीच्या दिवशीं तार पाठवितांना अेक्स्प्रेस व लेट फी लावून तार करावी लागते. परदेशीं पाठवावयाच्या तारेचे दर वेगवेगळे असल्यानें पोस्ट ऑफीसांत चौकशी करावी.

तारेनें अभिनंदन किंवा शुभेच्छा व्यक्त करतांना खर्च वांचविण्यासाठीं २५ प्रकारचे तयार संदेश आवश्यकतेप्रमाणें वापरतां येतात. संदेशाचा केवळ क्रमांक तारेनें पाठविल्यास तार घेणारांस क्रमांकाऐवजी त्या त्या क्रमांकाचा संदेश पोहचविला जातो. हिंदी तारेचे तयार संदेश खालीलप्रमाणें—

१) दीपावली की हार्दिक शुभ कामनाएं।
२) अीद मुबारक।
३) विजयपर हार्दिक शुभ कामनाअें।
४) नववर्ष आपको शुभ हो।
५) अिश्वर करे यह शुभ दिन बार बार आये।
६) पुत्रजन्मपर हार्दिक बधाअी।
६ क) पुत्री भाग्यवती और चिरंजीवी हो।
७) आपको अिस सन्मानपर हार्दिक बधाअी।
८) सुखमय और चिरस्थाअी वैवाहिक जीवन के लिये हमारी शुभ **कामनाएं**।
९) क्रिसमस की हार्दिक कामनाअें।
१०) परिक्षा में सफलतापर हार्दिक बधाअी।
११) आपकी यह यात्रा आनंदमय और सकुशल हो।
१२) चुनाव में सफलतापर हार्दिक बधाअी।

१३) आपकी शुभ कामनाओंके लिये कोटिशः धन्यवाद !
१४) बधाओी।
१५) सप्रेम शुभ कामनाअें।
१६) वर–वधूपर परमात्मा की असीम कृपा हो।
१७) आप दोनों का दांपत्यजीवन सुखी तथा समृद्धिशाली हो।
१८) स्वतंत्रता दिनपर मंगल कामनाअें एवं संस्मरण।
१९) हार्दिक बधाओी– "अमर रहे जनतंत्र हमारा"।
२०) होली की शुभ कामनाअें।
२१) उत्सव के लिये हार्दिक शुभ कामनाअें।
२२) बधाओी संदेश के लिये अनेक धन्यवाद।
२३) परिक्षा में सफलता के लिये बधाओी।
२४) निर्वाचिन में सफलता के लिये बधाओी।
२५) वर–वधू को शुभ आशिर्वाद।

अशा प्रकारचें तयार संदेश वापरल्यास सहा शब्दांस ०–५० नवे पैसे व पुढें पत्त्यामुळें व स्वाक्षरीमुळें अधिक शब्द वाढविल्यास प्रत्येक शब्दास ०–८ नवे पैसे आकार पडतो. अेक्स्प्रेस तारेस दुप्पट आकार पडतो. तयार संदेशाचा सर्व मिळून एकच शब्द धरला जातो. या प्रकारच्या तारा सुशोभित कागदावर व पाकिटांतून-पाठविल्या जातात.

**२१ फोनोग्रॅम :–** वेळ वांचविण्यासाठीं फोनवरून तार करतां येते. पोस्ट ऑफीस-मध्यें फोन करून आपली तार मास्तरांना सांगावी. तार पाठविण्याच्या ठिकाणीं फोन असल्यास त्याचा क्रमांक कळविल्यावर तार पाठविण्याच्या गांवचा तारमास्तर कळविलेल्या पत्त्याच्या फोन क्रमांकास फोनवरूनच तार सांगतो. दर पंधरा मिनि-टांनीं फोन करूनहि १ तास कनेक्शन न मिळाल्यास तारेतील फोन क्रमांकावरून पत्ता शोधून त्या पत्त्यावर तार पोहोंचविली जाते.

आपण तार कळवून फोन बंद केल्यावर थोड्याच वेळांत तार–मास्तर आप-णांस फोनवरून तार खरी व बरोबर असल्याची खात्री करून घेतो व नंतरच पुढें पाठवितो. दुसऱ्या दिवशीं फोन केलेल्या आपल्या पत्त्यावर तारेचें बिल येतें. बटवड्याच्या ठिकाणचा फोन क्रमांक कळविला असल्यास ०–१२ नवे पैसे अधिक आकार पडतो.

**हें प्रथम लक्षांत ठेवा ! :–** टपाल शक्यतों लवकर पोचण्यासाठीं सामान्यतः पुढीलप्रमाणें काळजी घेतली पाहिजे. टपालाच्या पत्ता लिहिण्याच्या बाजूवर खालील कोपऱ्यांत उजव्या बाजूस पुरेसा पत्ता लिहावा. नांव, मुक्काम, पोस्ट, तालुका,

जिल्हा या क्रमानें पत्ता लिहावा. पत्त्यांतील गांव, जिल्हा आदि अनेकदां लिहून रेघा-फुल्या यांनीं गिचमिड करूं नये. डाव्या बाजूस खालील कोपऱ्यांत पाठविणाराचा पत्ता लिहावा.

डाव्या बाजूस वरील कोपऱ्यांत बुकपोस्ट, व्ही. पी., रजिस्टर, अंडर पोस्टींग सर्टिफिकेट, प्रसिद्धीसाठीं, आदिपैकीं आवश्यकतेप्रमाणें मजकूर लिहावा. उजव्या बाजूस तिकीटें लावावीं. कमी किंमतीची खूप तिकीटें लावण्याऐवजी आवश्यक रकमेचीं एकदोनच तिकीटें लावावीं.

योग्य हंशीलाचीं तिकीटें लावल्याविना टपाल टाकल्यास, अपुऱ्या रकमेच्या दुप्पट आकार बटवडा घेणारास पडतो. असा भुर्दंड भरण्यास बटवडा घेणारा तयार नसल्यास आपलें टपाल त्यांस पोचूं शकणार नाहीं. आंतरदेशीय पत्रांमध्यें चिठ्ठ्या किंवा अन्य कांहीं पाठवितां येत नाहीं. नियमाविरुद्ध बुकपोस्ट किंवा आंतर-देशीय पत्रांमध्यें कांहीं सांपडल्यास तें पाकिटांप्रमाणें समजलें जाईल.

व्ही. पी., मनिऑर्डर, तार, अेक्स्प्रेस वगैरेचा बटवडा घेतांना शाईनें स्वाक्षरी करावी, त्याचप्रमाणें तारीख व वेळ हेंहि व्यवस्थित लिहावें. बटवडा घेणारा पत्ता बदलून अन्यत्र गेला असल्यास त्याचा वरील जुना पत्ता खोडून "मालक परगांवीं" असें लिहून नवा पत्ता सुवाच्य लिहावा. असें करण्यानें टपाल विनाखर्च नव्या दुरुस्त पत्त्यावर जाईल. आपण घर बदलतांना आपला नवा पत्ता शेजाऱ्यांस दिल्यास आपलें टपाल परत न जातां आपणांस मिळेल.

मुंबई, नागपूर, कलकत्ता, मद्रास, दिल्ली आदि मोठ्या शहरांकडे जाणारें टपाल विमानानें जाते. अशा शहरांच्या वाटेवरील सोयींच्या सर्व ठिकाणीं जाणारें टपाल विमानानें जाते. यासाठीं कोणताहि जादा आकार पडत नाहीं. मुद्दाम विमानानेंच गेले पाहिजे अशा टपालासाठीं जादा आकार पडतो. अशावेळीं निळे अेअर मेल लेबल लावलें पाहिजे. परदेशी जाणारें टपाल अेअरमेलनें पाठविणेंच सोयीचें ठरतें.

आपल्या टपालाचा विमा उतरवितांना त्याची किंमत वाजवी असेल तीच धरावी. ती कमी धरणें नुकसानीचें व जास्त धरणें खर्चाचें ठरण्याचा संभव असतो.

**कांहीं महत्वाच्या सूचना :—** १ तुमच्या पत्राचें वजन करा. अंदाजानें तिकीट लावूं नका.

२ सुवाच्य पत्ता हीच पत्र बरोबर पोचण्याची खात्री होय.
३ पत्र टाकण्यास लवकर जा म्हणजे टपाल चुकण्याचें भय नाहीं.
४ पत्रावर कर पडूं नये म्हणून त्यावर टपाल हंशील आगाऊ भरावें.
५ फोनोग्राम सर्व्हिसनें अधिक जलद काम होतें.
६ तुमच्या पत्रांत किंवा बंगींत मौल्यवान वस्तु असल्यास त्यांचा विमा उतरवा.

७ पोस्ट ऑफीस दर रविवारी बंद असतें, हें लक्षांत असूं द्या.

८ दर रविवारी पत्रांच्या पेट्या उघडल्या जात नाहींत म्हणून त्यांत त्या दिवशीं पत्रें टाकूं नका.

९ महिन्याचा ४ था दिवस आणि शेवटचा दिवस या दरम्यान सेव्हिंग्ज बँकेंतील तुमची शिल्लक २५ रुपयांहून कमी होऊं देऊं नका. नाहींतर त्या महिन्याचें व्याज मिळणार नाहीं.

१० बिझिनेस रिप्लाय पद्धतीनें तुमच्या गिऱ्हाईकांस टपाल खर्च न येतां तुमच्याशी पत्रव्यवहार करतां येतो.

११ लहानसहान रकमा पाठविणेसाठीं अिंडीयन पोस्टल ऑर्डरी विकत घ्या.

१२ पोस्टींग सर्टिफिकेट घेऊन तुमचें पत्र टपालांत पडल्याची खात्री करून घ्या.

१३ चुका होऊं नयेत म्हणून तारा स्पष्ट रितीनें लिहा.

१४ रविवारी फक्त अेक्स्प्रेस डिलिव्हरी पत्रांचा बटवडा केला जातो.


स्वच्छतेचें माहेरघर !

चहा, कॉफी, ओव्हलटीन व कोको तसेंच
खारा शेव; चिवडा; पापडी; गाठी व असली खव्याचे
पेढे व जामुन तसेंच स्वादिष्ट व ताजी
मिठाई मिळण्याचें सर्वांचें आवडतें
व
* एकमेव ठिकाण *

आनंद विलास

शहागंज, औरंगाबाद
प्रो. राधाकिसन नंदराम सरवैये.

जिल्हा या क्रमानें पत्ता लिहावा. पत्त्यांतील गांव, जिल्हा आदि अनेकदां लिहून रेघा-फुल्या यांनीं गिचमिड करूं नये. डाव्या बाजूस खालील कोपऱ्यांत पाठविणाराचा पत्ता लिहावा.

डाव्या बाजूस वरील कोपऱ्यांत बुकपोस्ट, व्ही. पी., रजिस्टर, अंडर पोस्टींग सर्टिफिकेट, प्रसिद्धीसाठीं, आदिपैकीं आवश्यकतेप्रमाणें मजकूर लिहावा. उजव्या बाजूस तिकीटें लावावीं. कमी किंमतीची खूप तिकीटें लावण्याऐवजी आवश्यक रकमेचीं एकदोनच तिकीटें लावावीं.

योग्य हंशीलाचीं तिकीटें लावल्याविना टपाल टाकल्यास, अपुऱ्या रकमेच्या दुप्पट आकार बटवडा घेणारास पडतो. असा भुर्दंड भरण्यास बटवडा घेणारा तयार नसल्यास आपलें टपाल त्यांस पोचूं शकणार नाहीं. आंतरदेशीय पत्रांमध्यें चिठ्ठ्या किंवा अन्य कांहीं पाठवितां येत नाहीं. नियमाविरुद्ध बुकपोस्ट किंवा आंतरदेशीय पत्रांमध्यें कांहीं सांपडल्यास तें पाकिटांप्रमाणें समजलें जाईल.

व्ही. पी., मनिऑर्डर, तार, अेक्स्प्रेस वगैरेचा बटवडा घेतांना शाईनें स्वाक्षरी करावी, त्याचप्रमाणें तारीख व वेळ हेंहि व्यवस्थित लिहावें. बटवडा घेणारा पत्ता बदलून अन्यत्र गेला असल्यास त्याचा वरील जुना पत्ता खोडून "मालक परगांवीं" असें लिहून नवा पत्ता सुवाच्य लिहावा. असें करण्यानें टपाल विनाखर्च नव्या दुरुस्त पत्त्यावर जाअील. आपण घर बदलतांना आपला नवा पत्ता शेजाऱ्यांस दिल्यास आपलें टपाल परत न जातां आपणांस मिळेल.

मुंबई, नागपूर, कलकत्ता, मद्रास, दिल्ली आदि मोठ्या शहरांकडे जाणारें टपाल विमानानें जाते. अशा शहरांच्या वाटेवरील सोयींच्या सर्व ठिकाणीं जाणारें टपाल विमानानें जाते. यासाठीं कोणताहि जादा आकार पडत नाहीं. मुद्दाम विमानानेंच गेले पाहिजे अशा टपालासाठीं जादा आकार पडतो. अशावेळीं निळे अेअर मेल लेबल लावलें पाहिजे. परदेशी जाणारें टपाल अेअरमेलनें पाठविणेंच सोयीचें ठरतें.

आपल्या टपालाचा विमा उतरवितांना त्याची किंमत वाजवी असेल तीच धरावी. ती कमी धरणें नुकसानीचें व जास्त धरणें खर्चाचें ठरण्याचा संभव असतो.

**कांहीं महत्वाच्या सूचना :—** १ तुमच्या पत्राचें वजन करा. अंदाजानें तिकीटें लावूं नका.

२ सुवाच्य पत्ता हीच पत्र बरोबर पोचण्याची खात्री होय.
३ पत्र टाकण्यास लवकर जा म्हणजे टपाल चुकण्याचें भय नाहीं.
४ पत्रावर कर पडूं नये म्हणून त्यावर टपाल हंशील आगाऊ भरावें.
५ फोनोग्राम सर्व्हिसनें अधिक जलद काम होतें.
६ तुमच्या पत्रांत किंवा बंगींत मौल्यवान वस्तू असल्यास त्यांचा विमा उतरवा.

७ पोस्ट ऑफीस दर रविवारी बंद असतें, हें लक्षांत असूं द्या.

८ दर रविवारी पत्रांच्या पेट्या उघडल्या जात नाहींत म्हणून त्यांत त्या दिवशीं पत्रें टाकूं नका.

९ महिन्याचा ४ था दिवस आणि शेवटचा दिवस या दरम्यान सेव्हिंग्ज बँकेंतील तुमची शिल्लक २५ रुपयांहून कमी होऊं देऊं नका. नाहींतर त्या महिन्याचें व्याज मिळणार नाहीं.

१० बिझिनेस रिप्लाय पद्धतीनें तुमच्या गिऱ्हाईकांस टपाल खर्च न येतां तुमच्याशी पत्रव्यवहार करतां येतो.

११ लहानसहान रकमा पाठविणेसाठीं अिंडीयन पोस्टल ऑर्डरी विकत घ्या.

१२ पोस्टींग सर्टिफिकेट घेऊन तुमचें पत्र टपालांत पडल्याची खात्री करून घ्या.

१३ चुका होऊं नयेत म्हणून तारा स्पष्ट रितीनें लिहा.

१४ रविवारी फक्त अेक्स्प्रेस डिलिव्हरी पत्रांचा बटवडा केला जातो.


## स्वच्छतेचें माहेरघर !

चहा, कॉफी, ओव्हलटीन व कोको तसेंच
खारा शेव; चिवडा; पापडी; गाठी व असली खव्याचे
पेढे व जामुन तसेंच स्वादिष्ट व ताजी
मिठाई मिळण्याचें सर्वांचें आवडतें
व
* एकमेव ठिकाण *

# आनंद विलास

शहागंज, औरंगाबाद

प्रो. राधाकिसन नंदराम सरवैये.

# आकाशवाणी

आकाशवाणीचे (ऑल अिंडिया रेडिओचे) सोयीच्या दृष्टीनें चार प्रादेशिक-विभाग केलेले आहेत. प्रत्येक विभागांत प्रमुख प्रक्षेपण यंत्र असून त्याच्या आधिपत्या खालीं निरनिराळीं लहान प्रादेशिक केंद्रें काम करीत असतात.

परदेशांसाठीं विविध भाषांतून व परदेशांतील भारतीयांसाठीं भारतीय भाषांमधून खास कार्यक्रम दिल्ली केंद्रावरून प्रक्षेपित केले जातात.

प्रत्येक विभागामध्यें पुढीलप्रमाणें केंद्रें आहेत. केंद्रांच्या ध्वनीक्षेपणाचें लहरींचे नांवापुढें मीटर्स दिले आहेत.

१ उत्तर विभाग :– दिल्ली (अ) ३३७·१, ४१·१५, ३१·१५, दिल्ली (ब) २८०·४; लखनौ–३९४·७, अलाहाबाद–३०६·१, (लखनौ–अलाहाबाद संयुक्त प्रक्षेपण.) पाटणा–४८३·९, रांची–४१·९०, जालंदर–४२१·५, जयपूर–२६७·९, अजमेर–५००, सिमला–(ऑग्झिलिअरी स्टेशन) ४१·८४, ६३·०३, इंदूर ४६१·५, भोपाळ–४१·९६, ६०·७३.

२ पश्चिम विभाग :– मुंबई (अ) ४१·४४, २४३·९, मुंबई (ब)–५४·५५, नागपूर–५०८·५, अहमदाबाद–बडोदा–३५२·९, धारवाड–४०५·४, पुणें–३७५, राजकोट–३२९·७.

३ दक्षिण विभाग :– मद्रास–(अ) ३१९·१, मद्रास–(ब) २११·३ ३१·२८, ४८·४७, ४१·३२, तिरुचि–३८९·६, विजयवाडा–३५७·१, त्रिवेंद्रम–कोझीकोड–४५४·५, ४४१·२, त्रिचूर–५१७·२, हैद्राबाद–४११, बेंगलोर-४९१·८.

४ पूर्व विभाग :– कलकत्ता–(अ) ४४७·८, ३१·४८, ४१·६१, कलकत्ता-(ब) ३००, ४१·६१, ३१·४८, कटक–२२२·२, गोहत्ती–(अ)–३८४·६, (ब)–४२·११.

विविध भारतीचे कार्यक्रम :–

| | |
|---|---|
| सकाळीं ७ ते ९ | मिटर १९, ३१, ४१ |
| दुपारीं २ ते ७ | मिटर २५, ३१, ४१ |
| संध्याकाळीं ७ ते ९॥ | मिटर ३१, ४१ |

शनिवार संध्याकाळ जादा कार्यक्रम ९॥ ते ११ मिटर ४९

रविवार जादा कार्यक्रम दुपारी ३ ते ३॥ मिटर ३१, ४१

**इतर माहिती :–** रेडिओचा परवाना दरवर्षी पोस्टांत १५ रु. भरून काढावा लागतो. शाळांना सवलत असून त्यांना ३ रु.मध्यें परवाना मिळतो. हॉटेल्स्, खानावळी, वगैरे धंद्याच्या कामासाठीं रेडिओ वापरण्याचा परवाना ५० रु. ला मिळतो. ग्राम-पंचायतीस १० रु. स परवाना मिळतो. परवान्याची मुदत डिसेंबर अखेरपर्यंत असते. कोणत्याहि महिन्यापासून डिसेंबर अखेरपर्यंत परवाना मिळतो. आपला परवाना नव्या वर्षासाठीं जानेवारी महिन्यांत नवा (रिन्यू) करून घ्यावा. वेळेवर परवाना न घेतल्यास मासिक १। रु. दंड होतो.

अेका घरांत (अिमारतींत किंवा वाडयांत नव्हे) अनेक रेडिओसाठीं अेकच परवाना चालतो, परंतु निरनिराळया कुटुंबांना अेका वाडयांत आहेत अेवढयाच कारणासाठीं अेकच परवाना चालत नाहीं.

आपली करमणूक व ज्ञानार्जन यांसाठीं लावलेला रेडिओ दुसऱ्यांचें डोकें अुठविण्यास कारणीभूत होण्याचा संभव असतो.आपल्या रेडिओचा सदुपयोग करावा; तो अकारण चालू ठेवणें नुकसानीचें असतें.

**कांहीं सूचना :–** १) रेडिओचा परवाना काढल्याविना तो वापरूं नये. नादुरुस्त सेट घरांत ठेवण्यासहि परवाना काढावा लागतो. २) रेडिओमध्यें कोणताहि दोष दिसून आल्यास दुरुस्तीची चालढकल करूं नये. कारण अेखादी नादुरुस्ती अनेक बिघाड अुत्पन्न करूं शकते. ३) रेडिओ चालू असतांना धूर अगर लाख–रबर जळल्यासारखा वास आल्यास तो त्वरीत बंद करून रेडिओ–तज्ज्ञांना दाखवावा. ४) कोणत्याहि रेडिओला बाहेरील अेरियल आवश्यक असते. केवळ अपरिहार्य कारणासाठींच घरांत अेरियल लावावी ५) विद्युत्प्रवाहासाठीं चांगल्या तारा वापराव्या. अन्यथा धोक्याचा संभव असतो. ६) रेडिओच्या यंत्रणेमध्यें बिघडण्यासारखे अनेक भाग असून अगदी कोरा भाग सुद्धां पहिल्याच दिवशीं बिघडू शकतो. यासाठीं विश्वासू तज्ज्ञांची मदत घेणें अेवढाच मार्ग आहे.

शेजाऱ्याचा रेडिओ आपल्यापेक्षां अधिक चांगला आवाज देतो, असा अनेकांचा समज झालेला दिसून येतो. बऱ्याच वेळां शेजारचा रेडिओ चांगला किंवा भारी असतो, हें कारण नसून रेडिओ लावण्याची पद्धत आपणांस माहीत नसते हें कारण असते. मोठा आवाज ठेवणें किंवा फार जवळून अैकणें यामुळें आपल्या रेडिओंत गोंगाट किंवा खडबडाट अैकू येतो. कमींत कमी आवाज व ३–४ फुटांवरून अैकणें अशी पद्धत अवलंबिल्यास आपला रेडिओहि समाधानकारक आवाज देईल. शेजारचा रेडिओ लांबून अैकल्यामुळेंच बरेच वेळां चांगला वाटत असतो आणि आपल्या रेडिओसंबंधीं शेजाऱ्यांचें असेंच मत असल्याचें आढळून येतें.

# कोर्ट फी-स्टँप आदि संबंधींची माहिती

कोर्ट फी स्टँप दोन प्रकारचे असतात. १) २० रुपये किंमतीपर्यंत तिकीट-रूपाचे. २) चार आण्यापासून पुढील किंमतीचें स्टँपपेपर-रूपाचे असे हे प्रकार आहेत. खरेदीखत, गहाणखत, करारपत्र व रजिस्ट्रेशन आदि कामासाठीं जनरल स्टँप पेपर वापरतात. कोर्टातील अर्ज, प्रोसेस फीसाठीं तिकिटें वापरतात. कॉर्पोरेशन हद्दींत शेकडा ४।। रु., नगरपालिका व अर्बन हद्दींत शेकडा ३ व अन्यत्र शेकडा २। रुपये या दरानें स्टँप आकारणी होते. गहाणखतास सर्वत्र सारखी आकारणी केली जाते.

## कोर्ट फी स्टँप :–

| | रु. नवे पैसे |
|---|---|
| १) नकलेचे अर्ज– | ०–२० |
| २) त्वरीत नक्कल अर्ज– | ०–५० |
| ३) अितर कोणताहि अर्ज– | ०–६२ |
| ४) ॲफिडेव्हिट– | ४–०० |
| ५) कोर्ट फी स्टँप–१ ते ५.रु.स– | ०–५० |
| ६ ते १० रु.– | ०–९४ |
| १०० रु.पासून १००० रु. पर्यंत– | ९–३७ |

१० ते १०० रुपयांपर्यंत ५ रुपयांच्या भागांवर. १०१ ते १००० रुपयांपर्यंतच्या १० रुपयांच्या भागावर व १००१ च्या पुढें १०० रुपयांच्या भागांवर.– याप्रमाणें स्टँप घेणें.

**जनरल स्टँप :–** नगरपालिका हद्दींमध्यें १००० रुपयापर्यंत दर शेकडा १।। रु. प्रमाणें स्टँप घ्यावा लागतो. तसेंच पुढील ५०० रुपयांचे भागावर १५ रु. प्रमाणें स्टँप फी जादा द्यावी लागते. वरील स्टँप फी केंद्रीय सरकारची असून महाराष्ट्र सरकारची त्या स्टँपवर १।। पट आकारणी होते.

**प्रोसेस फी :–** (समन्स, नोटीसा आदिंसाठीं)

| | रु. नवे पैसे |
|---|---|
| १ ते २५ रु. पर्यंत– | ०–३१ |
| २६ रु. पासून ५० रु. पर्यंत. | ०–५० |
| ५० पासून २५० रु. पर्यंत– | ०–९४ |
| २५० पासून ५०० रु. पर्यंत. | १–२५ |
| ५०० रु.पासून १००० रु. पर्यंत– | १–८७ |
| १००० रु. पासून २००० रु. पर्यंत. | २–५० |
| २००० रु. पासून ३००० रु.पर्यंत– | ३–१२ |

| (समन्स, नोटीसा आदिसाठीं) | रु. नवे पैसे |
|---|---|
| ३००० रु. पासून ४००० रु. पर्यंत. | ३–७५ |
| ४००० रु. पासून ५००० रु. पर्यंत– | ४–३७ |
| ५००० रु. पासून ६००० रु. पर्यंत– | ६–२५ |

मनाई हुकूम, जप्ती वारंट, तुरुंग वारंट, विक्री वारंट, आदिसाठीं वरील फीच्या दुप्पट फी आकारली जाते. जाहीरनाम्यासाठीं २–५० पडतात.

## अितर सर्व साधारण :–

| | |
|---|---|
| दत्तकपत्र– | ३० रुपये |
| करारनामा– | १॥ रुपया |
| साठेखत– | १॥ रुपया |
| भागीपत्र– | १० आणि ३० रुपये |
| भागी–तोडपत्र– | १५ रुपये |
| बिनामी रिलीझ– | १५ रुपये |
| गहाण खत, बेचन पत्र– | १५ रुपये |
| मुखत्यार पत्र– | ३ रुपये व १५ रुपये |
| सोडचिठ्ठी– | १० रुपये |

## पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट :–

| | |
|---|---|
| अर्ज– | ०–६२ नवे पैसे |
| साक्षीदार समन्स– | ०–६२ नवे पैसे |

## रेव्हिन्यू तिकिटें :–

| | |
|---|---|
| २० रु. चे वर ते २५० रु. पर्यंत | १० नवे पैसे |
| २५१ रु. ते १००० रु. पर्यंत | २० नवे पैसे |
| १००१ रु. पासून पुढें – | २५ नवे पैसे |

**विक्रीस तयार !**

ग्रामपंचायत व सहकारी सोसायट्यांचे

**ऑफिस दप्तर व फॉर्म्स**

तयार व ऑर्डरप्रमाणें छापून दिले जातात

भेटा अगर लिहा—

**राका प्रेस, नासिक (शहर)**

# कोर्ट फी-स्टँप आदि संबंधींची माहिती

कोर्ट फी स्टँप दोन प्रकारचे असतात. १) २० रुपये किंमतीपर्यंत तिकीट-रूपाचे. २) चार आण्यापासून पुढील किंमतीचें स्टँपपेपर-रूपाचे असे हे प्रकार आहेत. खरेदीखत, गहाणखत, करारपत्र व रजिस्ट्रेशन आदि कामासाठीं जनरल स्टँप पेपर वापरतात. कोर्टांतील अर्ज, प्रोसेस फीसाठीं तिकिटें वापरतात. कॉर्पोरेशन हद्दींत शेकडा ४।। रु., नगरपालिका व अर्बन हद्दींत शेकडा ३ व अन्यत्र शेकडा २। रुपये या दरानें स्टँप आकारणी होते. गहाणखतास सर्वत्र सारखी आकारणी केली जाते.

कोर्ट फी स्टँप :–

| | रु. नवे पैसे |
|---|---|
| १) नकलेचे अर्ज– | ०–२० |
| २) त्वरीत नक्कल अर्ज– | ०–५० |
| ३) अितर कोणताहि अर्ज– | ०–६२ |
| ४) ॲफिडेव्हिट– | ४–०० |
| ५) कोर्ट फी स्टँप–१ ते ५.रु.स– | ०–५० |
| ६ ते १० रु.– | ०–९४ |
| १०० रु.पासून १००० रु. पर्यंत– | ९–३७ |

१० ते १०० रुपयांपर्यंत ५ रुपयांच्या भागांवर. १०१ ते १००० रुपयांपर्यंतच्या १० रुपयांच्या भागावर व १००१ च्या पुढें १०० रुपयांच्या भागांवर: याप्रमाणें स्टँप घेणें.

<u>जनरल स्टँप :–</u> नगरपालिका हद्दींमध्यें १००० रुपयापर्यंत दर शेकडा १।। रु. प्रमाणें स्टँप घ्यावा लागतो. तसेंच पुढील ५०० रुपयांचे भागावर १५ रु. प्रमाणें स्टँप फी जादा द्यावी लागते. वरील स्टँप फी केंद्रीय सरकारची असून महाराष्ट्र सरकारची त्या स्टँपवर १।। पट आकारणी होते.

<u>प्रोसेस फी :–</u> (समन्स, नोटीसा आदिंसाठीं)

| | रु. नवे पैसे |
|---|---|
| १ ते २५ रु. पर्यंत– | ०–३१ |
| २६ रु. पासून ५० रु. पर्यंत. | ०–५० |
| ५० पासून २५० रु. पर्यंत– | ०–९४ |
| २५० पासून ५०० रु. पर्यंत. | १–२५ |
| ५०० रु.पासून १००० रु. पर्यंत– | १–८७ |
| १००० रु. पासून २००० रु. पर्यंत. | २–५० |
| २००० रु. पासून ३००० रु.पर्यंत– | ३–१२ |

| ( समन्स, नोटीसा आदिसाठीं ) | रु. नवे पैसे |
|---|---|
| ३००० रु. पासून ४००० रु. पर्यंत. | ३—७५ |
| ४००० रु. पासून ५००० रु. पर्यंत— | ४—३७ |
| ५००० रु. पासून ६००० रु. पर्यंत— | ६—२५ |

मनाई हुकूम, जप्ती वारंट, तुरुंग वारंट, विक्री वारंट, आदिसाठीं वरील फीच्या दुप्पट फी आकारली जाते. जाहीरनाम्यासाठीं २—५० पडतात.

## अितर सर्व साधारण :—

| | |
|---|---|
| दत्तकपत्र— | ३० रुपये |
| करारनामा— | १॥ रुपया |
| साठेखत— | १॥ रुपया |
| भागीपत्र— | १० आणि ३० रुपये |
| भागी—तोडपत्र— | १५ रुपये |
| बिनामी रिलीझ— | १५ रुपये |
| गहाण खत, बेचन पत्र— | १५ रुपये |
| मुखत्यार पत्र— | ३ रुपये व १५ रुपये |
| सोडचिठ्ठी— | १० रुपये |

## पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट :—

| | |
|---|---|
| अर्ज— | ०—६२ नवे पैसे |
| साक्षीदार समन्स— | ०—६२ नवे पैसे |

## रेव्हिन्यू तिकिटें :—

| | |
|---|---|
| २० रु. चे वर ते २५० रु. पर्यंत | १० नवे पैसे |
| २५१ रु. ते १००० रु. पर्यंत | २० नवे पैसे |
| १००१ रु. पासून पुढें — | २५ नवे पैसे |


**विक्रीस तयार !**

ग्रामपंचायत व सहकारी सोसायट्यांचे

**ऑफिस दप्तर व फॉर्म्स**

तयार व ऑर्डरप्रमाणें छापून दिले जातात

भेटा अगर लिहा—

**राका प्रेस, नासिक (शहर)**

# रेल्वे

सारे लोक झोपेच्या आधीन झालेले असतात, तेव्हां रेल्वे खात्यांतील कामगार क्षणाचाहि विसावा न घेतां, घड्याळाच्या कांट्यासारखें अव्याहत काम करीत असतात. कधीं कधीं दूर अंतरावरून अैकूं येणारा तो शिटीचा अेकाकी आणि आर्त आवाज म्हणजे भारतीय रेल्वे आपलें काम अखंडपणें करीत असल्याची . . . . माल व माणसें, दूरवर विखुरलेल्या त्यांच्या त्यांच्या गांवीं नेत असल्याची खूणच होय.

राष्ट्रीय संपत्तीची निर्मिति आणि वितरण या गोष्टी रेल्वेवर अवलंबून आहेत. बंदरांना अंतर्प्रदेशांशीं जोडणें, औद्योगिक संस्थांना कच्च्या मालाचा पुरवठा करून त्यांनीं तयार केलेला पक्का माल परत घेऊन जाणें, आणि शेतकऱ्याला त्यानें पिकवलेलें धान्य बाजारांत न्यावयास मदत करणें या गोष्टी रेल्वे प्रामुख्यानें करीत असतात. हवा उत्तम असो कीं वादळी असो, दिवस रणरणत्या अुन्हाचे असोत कीं रक्त गोठून टाकणाऱ्या हिवाळ्याचे असोत, सुमारें ७५०० गाड्या राष्ट्राचा अुद्योग-व्यवसाय खांद्यावर घेऊन वेगानें पळत असतात. या गाड्या दर दिवशीं ४ कोटी अुतारूंची नेआण करीत असतात, आणि ३ लक्ष टनांपेक्षां अधिक अितका माल वाहून नेतात.

<u>पॅसेंजर व मेल–एक्सप्रेस :–</u> यांतून प्रवास करण्यासाठीं निरनिराळ्या वर्गांसाठीं वेगवेगळे दर आहेत. स्टेशन व्यतिरिक्त गांवांतील बुकींग ऑफिसमध्यें खरेदी केलेलें तिकिट दुसऱ्या दिवसापर्यंत वापरतां येते. आपलें लगेज रेल्वे अधिकाऱ्यांच्या ताब्यांत देतेवेळीं तिकिट खरेदी केलेलें असलें पाहिजे. ३ वर्षांच्या वरील व १२ वर्षांआंतील मुलांना अर्धे तिकिट पडतें. तिकिटाचें भाडें आकारतांना पूर्ण आणा गृहीत धरला जातो. मोठ्या रेल्वे स्टेशनवर प्लॅटफॉर्म तिकिटें वापरावीं लागतात. मासिक किंवा वार्षिक प्लॅटफॉर्म–पास स्वस्त दरानें मिळतात. वृत्तपत्र-प्रतिनिधींना निम्या दराची सवलत असते. गाडी सुटण्यापूर्वी पुरेसा वेळ अगोदर तिकिटे घेतल्यानें तिकिट व मोड बरोबर मिळते. तिकिटाची खिडकी गाडीच्या वेळेपूर्वी २ तास अगर जाहीर वेळीं बंद असल्यास तक्रार नोंदवावी. योग्य तिकिट घेऊनच प्रवासास आरंभ करावा. घेतलेल्या तिकिटापेक्षां वरच्या वर्गानें प्रवास करावयाचा असल्यास किंवा तिकिट आपणाजवळ नसल्यास अधिकाऱ्याच्या "तिकिट नंतर देऊं" या आश्वासनावर विसंबू नये. आपलें तिकिट दुसऱ्या कुणाच्याहि ताब्यांत देऊन गाडींत न बसतां फरकाचे पैसे भरून पावती व तिकिट ताब्यांत घ्यावें.

<u>सवलतीची व सिझन तिकिटें; पास :–</u> विद्यार्थी खेळाडू, क्रीडा प्रतिनिधी, यात्रेकरू आदिंना सवलतीच्या दरांत प्रवास करतां येतो. वीस रुपये पर्यंतच्या

पासासाठीं दोन रु. अनामत ठेवावे लागतात. अर्धवट वापरलेल्या पासचे पैसे परत मिळत नाहींत. मुदत संपल्यावर पास परत न केल्यास अनामत रक्कम बुडते.

खंडित प्रवास (ब्रेक ऑफ जर्नी) :– दोनशें मैलांहून अधिक प्रवास करणाऱ्या प्रवाशास पहिल्या दिडशें मैलानंतर मुक्काम करून त्याच तिकिटावर पुढें प्रवास करतां येतो. शंभर मैलांमागें १ दिवस याप्रमाणें प्रवासांत मुक्काम करतां येतो.

भाडें–परतीची योजना :– गाडींत जागा नसल्यानें प्रवास करणें अशक्य असल्यास स्टेशन मास्तरकडे आपलें तिकिट परत केल्यास सर्व पसे परत मिळतात. जागा असूनहि कांहीं कारणास्तव प्रवास न केल्यास २ आणे कापून बाकीचे पैसे परत मिळतात. तीन तासांत तिकिट परत न केल्यास आपण प्रवास केला असेंच समजलें जाईल. राखीव जागांचीं तिकिटें घेणाऱ्यांनीं प्रवासापूर्वी ३ दिवस तिकिटें परत केल्यास सर्व पैसे परत मिळतात. गाडीच्या वेळेपूर्वी २४ तास तिकिटें परत केल्यास ५ टक्के व गाडी सुटल्यावर ३ तासांत तिकिटें परत केल्यास १० टक्के रक्कम कापून बाकीचे पैसे परत मिळतात. तिकिटें परत दिल्यानें कापल्या जाणाऱ्या रकमेंत वरच्या वर्गासाठीं ५ रुपये व तृतीय वर्गास २ रुपये यांपेक्षां अधिक रक्कम कापली जाणार नाहीं. अर्धवट प्रवास केल्याम उरलेल्या तिकिटांत ५ ते १० टक्के रक्कम कापून बाकी रक्कम मिळू शकते. तिकिट हरवल्यानें जादा पैसे पडले तर ते परत मिळणार नाहींत. तिकिटापेक्षां खालच्या वर्गानें (सकारण) प्रवास केल्यास गार्डाचा दाखला घ्यावा व त्यासह अर्ज केल्यास फरकाचे पैसे परत मिळतात.

कांहीं सूचना :– १) प्रत्येक स्टेशनवर तक्रारपुस्तक ठेवलेलें असतें, त्याचा जरुरीच्या वेळीं अवश्य उपयोग करावा. २) कोणत्याहि योग्य व भरपूर कारणासाठीं सांखळी ओढून गाडी थांबवितां येते. गर्दी कमी करण्यासाठीं सांखळी ओढणें बेकायदा नाहीं; तरीहि अन्य प्रवाशांची खोटी होऊं नये म्हणून सारासारविवेक ठेवला पाहिजे. ३) रेल्वेच्या उपाहारगृहांत शिळें, बेचव, वजन–मापानें कमी खाद्यपेय मिळाल्यास त्याबद्दल तक्रार नोंदवावी. ४) अनोळखी प्रवाशानें देऊं केलेले खाद्यपदार्थ वा पेय सहसा स्वीकारूं नये. त्यामुळें आपल्या जीवितास व वित्तास धोका पोचण्याचा संभव असतो. ५) अनधिकृत हमालाकडून मालाची नेआण केल्यास ती 'महाग' पडल्याचीं उदाहरणें घडतात. हमाली दर हे वस्तूगणिक नसून एका मणाच्या दरडोई बोजांवर आकारलेले असतात. ६) कोणतीहि तक्रार नोंदतांना आपल्या तिकिटाचा नंबर, तारीख, प्रवासाची गाडी आदि माहिती आवश्यक आहे. ७) सर्व वर्गांच्या प्रवाशांच्या राखीव जागेची सोय गाडी निघण्याच्या मूळ ठिकाणापासून करण्यांत आलेली असते. ८) सिनेमाच्या फिल्म्स प्रवासांत बरोबर घेणें

धोक्याचें असतें. स्फोटक द्रव्यें, ओलीं कातडीं, अवाढव्य आकाराच्या वस्तू, तेल, तूप, रंग आदि वस्तू लगेज म्हणून नेतां येणार नाहींत ९) योग्य तऱ्हेनें बंद केलेलें सामान स्टेशनवर खास खोलींत (क्लोक रूम) ठेवतां येते. त्यासाठीं एका डागास पहिल्या २४ तासांस २ आणे व नंतर प्रतिदिन १ आणा आकार पडतो. ही सोय एका डागास १ महिन्यापर्यंत चालते. १०) गाडीस जोडलेल्या फराळाच्या डब्यांत सर्व वर्गाच्या प्रवाशांना फराळ करता येतो.

**प्रथमोपचार :–** प्रत्येक गाडींत प्रथमोपचाराची सोय गार्डजवळ केलेली असते. महत्त्वाच्या स्टेशनांवर वैद्यकीय मदत मिळूं शकते. आजारी व पंगु लोकांसाठीं स्ट्रेचरची सोय असून प्रथमोपचाराच्याबाबत गार्ड योग्य मार्गदर्शन करील.

**पार्सलसंबंधी सूचना –** १) अनोळखी व्यापाऱ्यानें देऊं केलेल्या रेल्वे रिसिटस् सहसा खरेदी करूं नयेत. खरेदी करावयाच्याच असल्यास ज्या ठिकाणाहून माल निघाला असेल त्या स्टेशनला 'रिप्लायपेड' तार करून माल खरोखरच चढला आहे, असें उत्तर आल्यावरच रिसिटस् खरेदी कराव्या. २) भाड्याचे बाबत रेल्वे जसा "अंडर चार्ज" काढते त्याचप्रमाणें कित्येकदां रिसिटमध्यें "ओव्हर चार्ज"हि निघतो. यासाठीं रिसिटस् तज्ञांकडून तपासून घ्याव्या. ३) माल 'ओनर्स रिस्क' असला तरी डिलीव्हरी ओपन मिळूं शकते. ओनर्स रिस्क मालाच्या बाबतींतहि नुकसान भरपाई कायद्यानें मिळूं शकते. ४) नुकसान भरपाईची नोटीस रेल्वे रिसीटच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आंत द्यावी लागते. ५) रेल्वेचा सर्व साधारण दावा एक वर्षांत करावा लागतो. नेहमीप्रमाणें तीन वर्षांची मुदत नसते. ६) मालाची नुकसानी होऊन माल आल्यास "नुकसानी ठरवून द्या" असें रेल्वेस सांगावें, "आम्ही माल घेत नाहीं" असें कधींहि लिहून देऊं नये. ७) ओनर्स रिस्क दरानें माल सहसा पाठवूं नये. ओनर्स रिस्क व रेल्वे रिस्क दरांत फारच थोडा फरक असतो. ८) पॅकिंगची काटकसर व पत्ते लिहिण्यास आळस हे व्यापाऱ्यांचे शत्रू होत.

**डबा रिझर्व करणेबाबत :–** प्रवासासाठीं डबा रिझर्व करावयाचा असेल त्यांनी आपल्या नजीकच्या किंवा ज्या स्टेशनवरून आपणांस प्रवास सुरू करावयाचा असेल तेथील स्टेशन मास्तरांना भेटून पुढील व्यवस्था करावी. डबा रिझर्व करणें ही स्टेशन मास्तरांच्या अधिकारांतील बाब नव्हे, परंतु योग्य तें सहकार्य करणें हें स्टेशन मास्तरांचें कर्तव्य आहे. डबा रिझर्व करण्यासाठीं चीफ ऑपरेटींग सुपरिटेंडेंट, व्ही. टी. मुंबई, यांच्याकडे अर्ज करावा लागतो व त्याच्या प्रति विभागीय अधिकारी, स्थानिक स्टेशनमास्तर, यांचेकडे कमीत कमी ४८ तास अगोदर पाठवाव्या लागतात. डबा रिझर्व करण्यासाठीं आपणांस अधिक आकार द्यावा

लागत नाहीं. रिझर्व केलेल्या डब्यांत उतारूंसाठीं जितक्या जागा असतील तेवढ्यांचेंच भाडें द्यावें लागेल. त्या डब्यांत जास्त उतारू आले तर त्यांचेंहि भाडें द्यावें लागेल. या डब्यांतील उतारूंनीं प्रवासापूर्वींच तिकिट घेतले पाहिजे नाहींतर दंड भरावा लागेल.

**गरम पाण्याची व्यवस्था :–** कोणत्याहि वर्गांतून प्रवास केला तरी खालील स्टेशनवर उपाहारगृहांमध्यें ४ आणे देऊन १ बादली गरम पाणी मिळूं शकते.

आग्रा, अहमदनगर, इगतपुरी, कर्जत, कुर्डुवाडी, कल्याण, खांडवा, ग्वाल्हेर, जालना, देवळाली, दौंड, नासिकरोड, नागपूर, नेरळ, निझामाबाद, परभणी, पूर्णा, परळी वैजनाथ, पुणें, बडनेरा, भोपाळ, भुसावळ, मुंबई, मनमाड, वर्धा, वाडी, विकाराबाद, सोलापूर, सिकंदराबाद, लोणावळा.

**प्रवासामध्यें जेवण :–** प्रवासामध्यें योग्य वेळीं ताजें अन्न मिळावें, चहा–कॉफी मिळावी, या दृष्टीनें रेल्वेनें बऱ्याच सोयी उपलब्ध करून ठेवल्या आहेत. पण आपणांस त्या सोयींची माहिती नसल्यानें पैसा असून किंवा इच्छा असूनहि अडचण सोसावी लागते.-

प्रवाश्यांच्या सोयीसाठीं रेल्वेनें ताज्या खाद्यपदार्थांचीं पाकिटें काढली असून शाकाहारी पाकिटाची किंमत २५ नये पैसे आहे. या पाकिटामध्यें सांबारभात, दहीभात, भातभाजी, भाजीपुरी असते. मांसाहारी पाकिटाची किंमत ३७ नये पैसे आहे. यांत मटण बिर्याणी, मटन चपाती असते. औरंगाबाद, बल्हारशा, भुसावळ, दौंड, जालना, जबलपुर, कटनी, कुर्डुवाडी, मनमाड, नाशिकरोड, नागपूर, पूर्णा, सिकंदराबाद, शहाबाद, सोलापूर, वर्धा, झांशी, इगतपुरी, पुणें, या स्टेशनांवर हीं खाद्य पाकिटें मिळूं शकतात.

रेल्वेनें प्रवास करीत असतांना रेल्वेस जोडलेल्या उपाहारगृह डब्याचा उपभोग सर्व प्रकारच्या उतारूंस घेतां येतो. ज्यांना आपल्या जागेवर बसून जेवण हवें असेल त्यांनीं वेटरला ऑर्डर दिल्यास तो जेवणाचें ताट आणून देईल. शाकाहारी ताटाचा दर १ रुपया व मांसाहारी ताटाचा दर १–२५ आहे. उपाहार गृहाच्या डब्यांत जाऊन जेवण करता येते. पण जेवण आटोपतांच व गाडी थांबतांच आपल्या जागीं जाणें जरूर आहे. जेवण आटोपल्याबरोबर न गेल्यास त्या डब्यांतून प्रवास केल्याबद्दल दर ताशीं ३ रुपये जादा आकार भरावा लागतो.

**कांहीं महत्वाच्या स्टेशनांमधील अंतर :–** मराठवाडा, मध्यप्रदेश वा उत्तर भारत या भागांत जाण्यासाठीं मनमाड हेंच जंक्शन स्टेशन आहे. म्हणून मनमाड ते प्रमुख स्टेशनांमधील अंतर खालील तक्त्यांत दर्शविलें आहे.

**मनमाडपासून :–**

पूर्णा १९९ मैल,
परभणी १८१ मैल
दिल्ली ७९५ मैल,
मद्रास व्हाया हैद्रावाद ६०२ मैल,
अमृतसर १०६३ मैल,
भोपाळ ३६२ मैल,
दौंड १४६ मैल,
पुणें व्हाया दौंड १९३ मैल,
इंदूर ५७७ मैल.

औरंगाबाद ७१ मैल,
नांदेड २१८ मैल,
कलकत्ता व्हाया नागपूर १०६१ मैल,
मद्रास व्हाया दौंड ७७३ मैल,
खांडवा १९१ मैल,
मुंबई १६२ मैल,
काशी ७५९ मैल,
मुदखेड २३२ मैल,

जालना ११० मैल,
दिल्ली (मुंबई मार्गे) ९८० मैल,
कलकत्ता व्हाया अलाहाबाद ११८० मैल,
अहमदावाद व्हाया मुंबई ४६८ मैल,
नागपूर ३५८ मैल,
पठाणकोट १०९६ मैल,
हैद्राबाद ३८६ मैल,
सुरत व्हाया भुसावळ ३२४ मैल,

**आणखी कांहीं अंतरें –**

पूर्णा ते अकोला १२७ मैल,
लातूर ते मिरज २०३ मैल,
मुबई ते मद्रास ७९४ मैल,

परळी वैजनाथ ते विकाराबाद १६७ मैल,
परळी वैजनाथ ते परभणी ४० मैल,
सोलापूर ते मद्रास ५११ मैल,

मुदखेड ते अदिलावाद १०१ मैल,
हैद्राबाद ते मद्रास २१६ मैल,
दौंड ते मद्रास ६२७ मैल.

मराठवाड्यांतील
उत्कृष्ट टर्नींग, मोल्डींग व लेथ काम करून देणारे
**व्ही. एम्. जोशी ॲण्ड कंपनी**
मिलजीन स्टोअर्स, मशिनरी सप्लायर्स
वर्कशॉप, जालना (मराठवाडा).

# स्टेट ट्रॅन्स्पोर्ट

भाड्याची आकारणी प्रवाशामागें दर मैलीं ९ पै या तत्त्वावर करण्यांत आली आहे. जे प्रवासी दोन टप्प्यांचे मध्येंच चढतील त्यांना मागील टप्प्यापासूनचा आकार द्यावा लागतो व जे दोन टप्प्यांचे दरम्यान उतरतील त्यांना पुढील टप्प्यापर्यंतचा आकार द्यावा लागतो.

३ ते १२ वर्षांपर्यंतच्या लहान मुलांना निम्मा आकार पडतो व त्यांच्यासाठीं एक जागा मिळते. विशिष्ट प्रवासासाठीं घेतलेलें तिकिट त्याच प्रवासासाठीं चालतें. प्रवासांत तिकिट हरविल्यास पूर्ण तिकिटाचे सर्व पैसे भरून नवें तिकिट खरेदी करावें लागते. फाटलेल्या अगर चोळामोळा केलेल्या तिकिटांच्या बाबतींत हाच नियम लागू आहे.

**रिझर्वेशन :–** प्रवासाकरतां आगाऊ जागा राखून ठेवण्याची सोय असून ४८ तास अगोदरपासून व गाडी सुटण्यापूर्वी अर्धा तास आधी रिझर्वेशन करतां येते. ८ आणेपर्यंतच्या तिकिटास १ आणा, ८ आणे ते १ रुपयापर्यंतच्या तिकिटास २ आणे, १ रुपया ते १॥ रुपयांपर्यंतच्या तिकिटास ३ आणे व १॥ रुपयांवरील तिकिटास ४ आणे असा रिझर्वेशनचा आकार आहे. सामान्यत: ज्या ठिकाणी जागा राखून ठेवण्यात आली असेल, त्या ठिकाणावरच प्रवाशानें बसले पाहिजे.

**प्रवाशाचें सामान :–** प्रत्येक प्रवाशाला आपल्याबरोबर १५ शेर वजनाचें सामान नेतां येईल. अधिक वजनास वेगळा आकार, विशेष सामानासाठी वेगळे दर आहेत.

**रिफंड :–** पुढील बाबतींत रक्कम परत (रिफंड) केली जाते.

१) कंडक्टरनें अधिक रक्कम घेतली असल्यास ती परत मिळूं शकेल. २) स्टेट ट्रॉन्स्पोर्टच्या आटोक्याबाहेरच्या कारणांमुळें अशक्य झाल्यास जागा राखून ठेवण्याच्या आकाराची पूर्ण रक्कम परत मिळेल. ३) गाडी नादुरुस्त झाली, व एस्. टी. तर्फे प्रवासाची सोय न झाल्यास तिकिट व सामान यांचा आकार परत मिळेल. ४) गाडींत बसून तिकिट घेतल्यावर प्रवास करणें अशक्य झाल्यास रिझर्वेशन तिकिटाच्या आकाराचा सोडून प्रवासाच्या पूर्ण तिकिटाच्या आकाराच्या १/१० कापून बाकीची रक्कम परत मिळेल. ५) योग्य वजनाच्या अभावीं सामानाचा आकार जास्त घेतला गेला असल्यास जादा रक्कम परत मिळेल. मात्र वजन अधिक भरल्यास जादा आकार भरावा लागेल. ६) एक्स्प्रेस गाडी नादुरुस्त झाल्यामुळें नेहमीच्या गाडीनें प्रवास केल्यास दोन्ही गाड्यांच्या तिकिटांमधील फरकाचे पैसे परत मिळतील.

खास सहलीकरतां, दौऱ्याकरतां, सामाजिक व धार्मिक कारणाकरतां खास

भाड्यांत खास गाड्या मिळण्याची सोय करण्यांत आली आहे. एस्. टी. च्या मोटारींत धूम्रपान करण्यास कायद्यानें बंदी केली आहे.

पार्सल :-- दर ४ मैलांस १ स्टेज मानण्यांत येते. अशा प्रत्येक स्टेजच्या माल-वाहतुकीसाठीं दर मणास १ आणा या पद्धतीनें आकारणी केली जाते. १० शेरांच्या हिशेबांत मणाचे भाग केले जातात. कोणतेंहि पार्सल १ मण २० शेरांहून अधिक असतां कामा नये. एका गांवासाठीं एकाच व्यक्तीनें एकाच पत्त्यावर पाठविलेलीं सर्व पार्सलें एकत्र वजन करून मगच त्यावर आकार ठरविला जातो.

१०० रुपयेपर्यंतच्या मालाच्या किंमतीवर १२ स्टेजीस्पर्यंत अर्धा आणा, १२ ते २४ स्टेजीस्पर्यंत १ आणा व २४ स्टेजीस् नंतरच्या कितीहि दूरच्या वाहतुकी-साठीं १॥ आणा याप्रमाणें सरचार्ज आकारला जातो. १०० रु. च्या पुढील किंमती-वर दुप्पट, तिप्पट, चौप्पट या पद्धतीनें आकारणी केली जाते.

हमालीसाठीं दरमणामागें १ आणा या पद्धतीनें आकारणी केली जाते. याबावत कमीत कमी हिस्सा अर्धा मणाचा धरला जातो. एस्. टी. ची पार्सल गुड्स्-योजना आहे.

गुड्स--योजना :-- गुड्स-योजनेमध्यें दर मैलांमागें दर मणास हा दर कमी जास्त होत असतो. याशिवाय खास सवलतीच्या दरानें कंत्राटी पद्धतीवरहि लॉऱ्यांमधून गुड्स पद्धतीनें माल-वाहतूक केली जाते. एस्. टी. च्या कांहीं स्टॅण्डवरच पार्सलें घेण्याची सोय सध्या उपलब्ध आहे.

काय नेणार नाहीं ? :-- एस्. टी. मार्फत कांचसामान, जडजवाहीर, स्फोटक पदार्थ, ॲसिडस् आदि माल पाठवितां येत नाहीं.

---

आपणास लागणाऱ्या......
"सोरा, गंधक, डांबर बत्ती, फायर वर्क्स केमिकल्स व हेवी केमिकल्स"
होलसेल डीलर्स व फॅक्टरी सप्लायर्स
**मे. एस्. व्ही. कुलकर्णी ॲण्ड कंपनी.**
मोती चौक, पुणें २ (फोन नं. २४४८)

# प्राप्तीकर

प्राप्तीकर (इन्कम् टॅक्स) :— सरकारी वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्चपर्यंत मानलें जातें व त्या वर्षासाठीं जाहीर झालेल्या दरानें मागील वर्षाच्या उत्पन्नावर हा कर घेतला जातो. (पगार व सिक्युरिटीचें व्याज यांच्यावर मात्र ज्याच्या त्याच्या वर्षाच्या दरानें कर आकारला जातो.) ज्यानें त्यानें आपल्या सोयीप्रमाणें आपल्या वहीखात्याच्या हिशेबाचें वर्ष ठरवावें. परंतु त्यांतला बदल प्राप्तीकर अधिकारी घालील त्या अटींवरच त्याच्या परवानगीनें करतां येतो.

प्राप्तीकर खात्याचे अधिकारी :— १) सर्व देशाला सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यू २) प्रत्येक प्रदेशाला कमिशनर ऑफ अिन्कम् टॅक्स ३) असि. कमिशनर ४) अिन्कम् टॅक्स ऑफीसर.

कर भरणाऱ्यांचे प्रकार :— १) सामाजिक हिंदु कुटुंब. २) रजिस्टर्ड कंपन्या ३) इन्कम्टॅक्स ऑफीस जवळ नोंदलेल्या पेढ्या किंवा भागिदाऱ्या (रजिस्टर्ड फर्म्स.) ४) रजिस्टर न केलेली साधी पेढी किंवा व्यक्तीसमूह. ५) व्यक्ती किंवा अिसम. सामाजिक हिंदु कुटुंबाच्या उत्पन्नावर व त्यांतील एकाद्या व्यक्तीच्या स्वसंपादित उत्पन्नावर स्वतंत्र रीतीनें भिन्न भिन्न कर बसविला जातो. क्रमांक २ ते ४ मधील उत्पन्नाचा हिस्सा एकाद्या व्यक्तीला मिळावयाचा असेल तर त्या व्यक्तीच्या उत्पन्नावर कराचा दर ठरवितांना तो हिस्सा विचारांत घेतला जातो. तशी गोष्ट सामाजिक हिंदु कुटुंबाच्या उत्पन्नांतील हिश्याबद्दल नाहीं. कर आकारणीच्या वेळच्या विभक्ताच्या तक्रारीचा विचार पुढील वर्षी होतो.

प्रत्येक कंपनीच्या मुख्य अधिकाऱ्यानें दरवर्षी आपण होऊन १५ जूनच्या आंत कंपनीच्या गतसालांतील एकूण उत्पन्नाचा तक्ता भरून पाठविला पाहिजे. उत्पन्न आकारणी करण्यास योग्य आहे असें अिन्कम् टॅक्स ऑफीसरला वाटल्यास तो नोटीस काढून उत्पन्नाचा तपशील देण्याविषयीं तक्ता पाठवितो व तो तक्ता भरून देण्यास निदान ३० दिवसांची मुदत देतो. अधिकारी समरी आकारणी करून पैसे भरण्याची आज्ञा देऊं शकतो. ही आज्ञा गैर आहे असें वाटल्यास त्या अधिकाऱ्याची आपणांस खात्री पटवावी लागेल. त्यावर अपील नाहीं. अन्यथा वरील तक्ता भरून त्वरीत पाठवावा म्हणजे अपीलाचा हक्क प्राप्त होतो. ३ वर्षांच्या हिशोबाच्या वह्या कागदपत्र अधिकारी मागूं शकतो व भरून दिलेला तक्ता बरोबर नाहीं असें वाटल्यास त्याच्या सिद्ध्यर्थ पुरावा मागूं शकतो.

आकारणी :— १) अविवाहित व्यक्तीच्या पहिल्या १ हजार उत्पन्नावर आणि विवाहित व्यक्तीच्या पहिल्या २ हजार उत्पन्नावर प्राप्तीकर आकारला जात नाहीं.

२) अविवाहितांच्या बावतींत नंतरच्या २ हजार रुपयांवर आणि विवाहितांच्या ३ हजार रुपयांवर प्रत्येक रुपयामागें ९ पै दरानें कर आकारणी केली जाते. त्याचप्रमाणें या दराच्या ३/१२ दरानें सरचार्जचीहि आकारणी केली जाते. ३) त्यानंतरच्या २॥—हजार रुपयांवर (एकूण उत्पन्नापैकी) दर रुपयामागें १॥। आणेप्रमाणें आकारले जातात व त्यांच्या १।२० अितकी रक्कम सरचार्ज म्हणून आकारली जाते. ४) त्यानंतरच्या २॥ हजार रुपयांवर (एकूण उत्पन्नापैकीं) दर रुपयामागें २। आणेप्रमाणें कर आकारला जातो व त्याच्या १।२० अितका सरचार्ज आकारला जातो. ५) त्यानंतरच्या ५ हजारांवर (एकूण उत्पन्नापैकीं) दर रुपयामागें ३। आणेप्रमाणें कर आकारला जातो व त्याच्या १।२० अितकी रक्कम सरचार्ज आकारला जातो. ६) एकूण उत्पन्नाच्या शिलकीवर दर रुपयामागें ४ आणे कर आकारला जातो व त्याच्या ३/१२ नें सरचार्ज आकारला जातो.

<u>सुपरटॅक्सची आकारणी</u> :— १) एकूण उत्पन्नापैकीं पहिल्या २० हजार रुपयांवर सुपरटॅक्स किंवा त्याचा सरचार्ज आकारण्यांत येत नाहीं. २) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या ५ हजारांवर दर रुपयामागें १ आणा व त्याच्या १/२० अितका सरचार्ज आकारण्यांत येतो. ३) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या १५ हजारांवर दर रुपयामागें ३ आणे सरचार्ज वरीलप्रमाणेंच आकारला जातो. ४) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या १० हजारांवर दर रुपयामागें ५ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें. ५) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या १० हजारांवर दर रुपयामागें ६ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें. ६) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या ३० हजार रुपयांवर दर रुपयामागें ७ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें. ७) एकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या २० हजार रुपयांवर दर रुपयामागें ८ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें. ८) अेकूण उत्पन्नापैकीं त्यानंतरच्या ५० हजारांवर दर रुपयामागे ९ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें. ९) अेकूण उत्पन्नाच्या शिलकीवर दर रुपयामागें ९॥ आणे सुपरटॅक्स, याखेरीज सरचार्ज वरीलप्रमाणें.

अिन्कम् टॅक्स व सुपरटॅक्स यांच्या आकारणींत कमी अधिक फरक करण्याचा अधिकार सरकारला असून नव्या बदलाप्रमाणें नवा कर आकारला जातो.

# बँक

दरघडीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत बँकेशीं प्रत्येकाचा संबंध येतोच. व्यापाऱ्यांचा तर बँकेशीं मोठ्या प्रमाणावर संबंध येतो. बँकेचे बहुतेक सर्व व्यवहार चेकनें होत असतात. चेकचे कांहीं प्रकार :—

१ बेअरर चेक :– ज्या बँकेचा हा चेक असेल त्या बँकेंत कोणाहि तिऱ्हाईत व्यक्तीला वटवितां येतो; पैसे मिळाल्याची फक्त सही करावी लागते.

२ क्रॉस चेक :– या चेकचे ३ प्रकार आहेत.

**१ क्रॉस बेअरर चेक** :– या चेकचे पैसे प्रत्यक्ष न मिळतां खात्यावर जमा होतात.

**२ ऑर्डर क्रॉस चेक** :– ह्या चेकचे पैसे रोख मिळत नाहींत. खात्यावर जमा करावे लागतात. हा चेक बेचन करतां येतो.

**३ स्पेशल क्रॉस चेक** :– हा चेक क्रॉस करतांना "पे अकांउंट" असा शिक्का मारला जातो. ज्याच्या नांवाचा हा चेक असतो त्याच्याच खात्यावर तो जमा केला जातो. हा चेक बेचन करतां येत नाहीं.

बँकेचे व्यवहार बरेच गुंतागुंतीचे असतात ; परंतु ते नियमाप्रमाणें चालविले जातात. बँकेचे अधिकारी कुशल असतात व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं त्यासंबंधींचीं पुस्तकेंहि उपलब्ध असतात. परंतु या सवलती सर्वसाधारण व्यापारी-वर्गाला सहजासहजीं उपलब्ध होण्यासारख्या नसल्यानें त्यांना खालील माहिती उपयुक्त ठरेल.

१) कांहीं व्यापारी निरनिराळ्या बँकांमध्यें आपलीं खातीं ठेवतात व त्यांची गुप्ततहि राखली जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनें असें करणें योग्यच आहे. आपले बँकेतील व्यवहार किती चोखपणाचे आहेत, हें तेथील अधिकाऱ्यांना माहित असते. तेव्हा आपण दुसऱ्या ओळखीच्या माणसास बँकेंत खातें उघडण्यास मदत करूं नये. कारण कांहीं वेळां यामुळें आपणांस निष्कारण त्रास होतो. २) बँकेच्या नियमाप्रमाणें खात्यांत कमीतकमी किती रक्कम ठेवली पाहिजे या संबंधींचे निर्बंध असतात. तेव्हां आपल्या खात्यांतील रक्कम ठरविलेल्या कमीतकमी मर्यादेच्या खालीं जाणार नाहीं, याबद्दल काळजी घ्यावी. ३) आपण एखाद्या बँकेमध्यें भागी-दार म्हणून आपलें खातें ठेऊन नंतर भागीदारी बंद केली असल्यास त्याप्रमाणें बँकेस कळविण्याची दक्षता घ्यावी. ४) आपण ज्या शाखेवर चेक दिला असेल तीच शाखा आपल्या चेकचे पैसे आदा करते किंवा नाहीं, तें पाहण्याची दक्षता

घ्यावी. ५) आपण खरेदी घेतलेला ड्रॉफ्ट जर हरवला तर त्याची रक्कम आदा करण्याची थांबविणें आपलें हातीं नाहीं, तेव्हां आपण तावडतोब ज्या बँकेतून तो ड्रॉफ्ट खरेदी केलेला असेल त्या बँकेला, सदर ड्रॉफ्टची रक्कम देऊं नये, असें कळवावें. अगर बँकेच्या सल्ल्याप्रमाणें दक्षता घ्यावी. ६) आपणांस खातें बंद करावयाचें असेल तर बँकेस तशी आगाऊ सूचना दिली पाहिजे. चालू खातें बंद करावयाचें असेल तर चेकबुक, पैसे भरण्याचें स्लिपबुक सुरक्षित ठेवावें. ७) पासबुकावर जमेच्या व खर्चाच्या नोंदी बरोबर आहेत वा नाहींत त्या वेळोवेळीं तपासून घ्याव्या. ८) चेकवर सही काळजीपूर्वक करावी. आपल्या सहीची नक्कल होण्याची शक्यता असते. ९) ज्यांचें बँकेंत खातें असेल त्यांना नेहमी क्रॉस चेक द्यावा. तसेंच चेक पोस्टानें पाठवावयाचा असल्यास तो क्रॉस करूनच पाठवावा. १०) चेकनें आपल्या खात्यांत भरलेली रक्कम जमा झाली आहे किंवा नाहीं, हें पाहण्याची दक्षता घ्यावी. नाहींतर आपला चेक परत येऊन नुकसान होण्याचा संभव असतो. ११) चेक सुवाच्य व खाडाखोड न करतां लिहीलेला असावा. जर खाडाखोड झाली असेल तर तेथें सही करावी. १२) कोणताही चेक खात्यांत जमा करतांना तो क्रॉस करून त्यावर बँकेचें नांव लिहून पाठवावा. १३) कोणत्याहि चेकची रक्कम हवी असल्यास त्यावर नुसती सही करून हजर करावा. म्हणजे पैसे मिळतील. पैसे मिळाल्याची स्वतंत्र पावती देण्याचें कारण नाहीं. १४) आपण बँकेंत मुदतीची ठेव म्हणून रक्कम ठेवली असल्यास त्याबद्दल आपणांस मिळालेली पावती जपून ठेवावी. ती पावती हरविल्यास रक्कम घेण्यास अडचण पडेल. ती कोणाचे नांवावर बदलून देतां येत नाहीं. परंतु मुदत संपतांच दुसऱ्यास पैसे घेण्याचें अधिकारपत्र दिल्यास रक्कम त्या असामास मिळूं शकेल. मुदत संपण्यापूर्वीं रकमेची मागणी केल्यास पूर्ण व्याज मिळणार नाहीं. रक्कम ज्या ऑफिसांत ठेवली असेल तेथूनच ती परत मिळेल. १५) आपण सेव्हिंग खात्यांत रक्कम ठेवली असेल तर बँकेचे नियमाप्रमाणें आठवड्यांतून एकदां किंवा दोनदां रक्कम काढतां येते. १६) परगांवी रेल्वे रसीद पाठविणें असल्यास ती बँकेमार्फत पाठवावी— ती तशी पाठविणेंच सुरक्षितपणाचें आहे. १७) आपणाजवळ कांही मौल्यवान वस्तु असल्यास त्या बँकेंत ठेवाव्या. सेफ डिपॉझिट लॉकर असल्यास तें भाड्यानें घेऊन तेथें वरील वस्तु ठेवाव्या म्हणजे चोराचें भय नाहीं. परंतु लॉकरची किल्ली जपून ठेवण्याची दक्षता घ्यावी. १८) आपण बँकेमार्फत कांही कर्ज घेतलें असल्यास कर्जपत्राची एक नक्कल आपलेजवळ ठेवावी. म्हणजे पुढें आपणांस त्याचा उपयोग होतो. तसेच रक्कम कोणत्या तारखेस परत करावयाची आहे त्याची नोंद आपलें डायरींत करून ठेवावी. रक्कम परत दिल्याबद्दल मिळालेली पावती जपून ठेवावी. १९) सोनें, चांदीचे मालावर आपण कांही कर्जाऊ रक्कम घेतली असल्यास पावती जपून ठेवण्याची दक्षता घ्यावी. २०) माल बँकेचें गोडाऊनमध्यें तारण ठेवून आपणांस कर्ज

घ्यावयाचें असल्यास त्या मालावर आपला पूर्ण मालकी हक्क असला पाहिजे. जर आपण घेतलेलें कर्ज परत केलें नाहीं तर बँक माल विकून आपली रक्कम वसूल करून घेते. अर्थात प्रत्यक्ष माल विकला जाण्यापूर्वी आपणांस तशी नोटीस दिली जाईल व आपण पैसे भरल्यास आपणांस माल परत घेतां येईल. माल बँकेचें गोडाऊनमध्यें असतांना त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी बँकेवर आहे. सर्वसाधारणपणें बँक आपणांस मालाचा विमा उतरविण्याविषयीं सूचना देईल, त्याप्रमाणें आपणांस विमा उतरावा लागेल. २१) बँकेंत आपलें खातें चालू असतां आपण जर दुसऱ्या इसमाचा क्रॉस चेक घेऊन आपले खात्यांत भरला, व त्यासंबंधीं जर कांहीं भानगड उपस्थित झाली तर त्याची जबाबदारी आपणांवर आहे.

तसेच जर कोणी बेअरर चेकनें पैसे दिले तर तो चेक जपून ठेवण्याची काळजी घ्यावी. कारण सदर चेक दुसऱ्याचे हातीं पडल्यास तो लबाडीनें सही करून पैसे घेईल व आपलें नुकसान होईल.

आमच्याकडे

मुद्रण-व्यवसायास नित्य लागणारे रूळ, ब्रासरूळ, लेड, नवीन बॉर्डर्स, जॉब प्रेस आदी सर्व साहित्य तसेंच उर्दू, मराठी, हिंदी, गुजराथी, इंग्रजी सर्व पॉइंटमधील टाईप व ब्लॉक तयार स्टॉकमधून मिळेल.

भेटा, लिहा--

शा. किकाभाई हरिवल्लभदास अँड सन्स

टाईप फाउन्ड्री

भांगवाडी थिएटरसमोर, काळबादेवी रोड, मुंबई २.

# सरकारी निमसरकारी सुट्या

जानेवारी :– इंग्रजी वर्षारंभ, मकर संक्रांत, विवेकानंद जयंति, प्रजासत्ताक दिन (ता. २६), म. गांधी पुण्यतिथि (ता. ३०).

फेब्रुवारी :– महाशिवरात्र, श्रीरामकृष्ण जयंति, श्रीशिव जयंति.

मार्च :– हुताशनी पौर्णिमा, धूलिवंदन, वर्षप्रतिपदा, रामनवमी, दासनवमी, तानाजी पुण्यतिथि, डॉ. हेडगेवार जयंति, तुकाराम बीज.

एप्रिल :– महावीर जयंति, हनुमान जयंति, गुड् फ्रायडे, रमझान ईद, अक्षयतृतिया, एकनाथ षष्टी, श्रीशिव पुण्यतिथि, जालियनवाला बाग दिन (ता. १३).

मे :– कामगार दिन (ता. १), अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथि, शंकराचार्य जयंति, सावरकर जयंति (ता. २८), शिवराज्याभिषेक (ता. ३१).

जून :– डॉ. हेडगेवार पुण्यतिथि, वटपौर्णिमा, आषाढी एकादशी, बकरईद.

जुलै :– गुरुपौर्णिमा, दीपपूजा, मोहरम्.

ऑगस्ट :– टिळक पुण्यतिथि (ता. १), रामकृष्ण पुण्यतिथि, श्री अरविंद घोष जयंति, स्वातंत्र्यदिन (ता. १५).

सप्टेंबर :– पार्शी वर्षारंभ, श्रीकृष्ण अष्टमी, गणेशचतुर्थी, अनंत–चर्तुदशी, संवत्सरी.

ऑक्टोबर :– गांधी जयंति (ता. २), सर्वपित्री अमावास्या, घटस्थापना, विजयादशमी, कोजागिरी पौर्णिमा, केळकर स्मृतिदिन.

नोव्हेंबर :– नरकचतुर्दशी, बलिप्रतिपदा, भाऊबीज, गोपाष्टमी, कार्तिकी एकादशी, त्रिपुरी पौर्णिमा, फुले पुण्यतिथि.

डिसेंबर :– आळंदी एकादशी, चंपाषष्टी, गीता जयंति, ख्रिसमस, श्रद्धानंद पुण्यतिथि.

# वजनें व मापें

## जडमापन

१६ ड्रॉम = १ औंस
१६ औंस = १ पौंड
१४ पौंड = १ स्टोन
२८ पौंड = १ क्वार्टर
४ क्वार्टर = १ हंड्रेडवेट
२८ हंड्रेडवेट = १ टन
५ तोळे = १ छटाक
१६ छटाक = १ शेर
४० शेर = १ मण

## औषधी कामांसाठीं वजनें

२० ग्रेन्स = १ स्क्रुपल
३ स्क्रुपल्स = १ ड्राम
८ ड्राम्स = १ औंस
१२ औंस = १ पौंड

## घनमापन

४ गिल्स = १ पिंट
२ पिंटस् = १ क्वार्ट
४ क्वार्टस् = १ गॅलन

१ गॅलन शुद्ध पाण्याचें वजन १० पौंड असतें. १ घनफूट पाण्याचें वजन १ हजार औंस भरतें.

## लांबीचीं परिमाणें

१२ इंच = १ फूट
३ फूट = १ यार्ड
२२०. यार्ड = १ फर्लांग
८ फर्लांग = १ मैल
१७६० यार्ड = १ मैल
५२८० फूट = १ मैल

## जमीनमापन

२७ इंच = १ गज
३६ इंच = १ यार्ड
१२१ चौ. यार्ड = १ गुंठा
४८४० चौ. यार्ड १ एकर

## कागद मोजणी

२४ ताव = १ दस्ता
२० दस्ते = १ रीम
१० रिमें = १ वेल

## कालमापन

६० अडपळें = १ विपळ
६० विपळें = १ पळ
६० पळें = १ घटका
६० घटका = १ दिवस
७ दिवस = १ सप्ताह
३० दिवस = १ महिना
१२ महिने = १ वर्ष
६० सेकंद = १ मिनिट
६० मिनिटें = १ तास
२४ तास = १ दिवस

## सर्वसामान्य

१२ वस्तु = १ डझन
१२ डझन = १ ग्रोस

## नाणीं

१ पै = १ नवा पैसा
२ पै = १ नवा पैसा
३ पै = २ नवे पैसे
६ पै = ३ नवे पैसे
९ पै = ५ नवे पैसे
१ आणा = ६ नवे पैसे
२ आणे = १२ नवे पैसे
३ आणे = १९ नवे पैसे
४ आणे = २५ नवे पैसे
५ आणे = ३१ नवे पैसे
६ आणे = ३७ नवे पैसे
८ आणे = ५० नवे पैसे
१० आणे = ६२ नवे पैसे
१२ आणे = ७५ नवे पैसे
१४ आणे = ८७ नवे पैसे
१ रुपया = १०० नवे पैसे

## मेट्रिक वजनें ( रूपांतर कोष्टक )

| छटाक ( १ छटाक = ५ तोळे. ) | ग्रॅम ( शक्य तितका जवळचा ) | छटाक ( १ छटाक = ५ तोळे. ) | ग्रॅम ( शक्य तितका जवळचा ) |
|---|---|---|---|
| १ | ५८ | ९ | ५२५ |
| २ | ११७ | १० | ५८३ |
| ३ | १७५ | ११ | ६४२ |
| ४ | २३३ | १२ | ७०० |
| ५ | २९२ | १३ | ७५८ |
| ६ | ३५० | १४ | ८१६ |
| ७ | ४०८ | १५ | ८७५ |
| ८ | ४६७ | | |

आपल्या मुद्रणकलेचें वैभव वाढविणारी, देवनागरी लिपीमध्यें नवीन वळणांची समृद्धि करणारी भारतांतील प्रमुख टाईप फौंड्री

म्हणजेच

# प्रकाश टाईप फौन्ड्री

४९५ नारायण, पत्र्या मारुतीजवळ, पुणें २.

**नवीन वळणें–** २४ पॉ. यशवंत, २४ पॉ. वसंत, १८ पॉ. बाळकृष्ण, १६ पॉ. ओतुरकर, १६ पॉ. प्रकाश, १२ पॉ. अशोक, १२ पॉ. रघुनाथ–**यांशिवाय**

**डिग्री टाईप–** १२ पॉ. ते १७ पॉ. पर्यंतचे उत्तम वळणाचे टाईप **तसेंच**

**मोनो टाईप–** १२ पॉ., १४ पॉ., १६ पॉ. टाईप **आणि**

**इंग्रजी टाईप–** बहुविध वळणांचे ६ ते ३६ पॉईंटपर्यंतचे टाईप व लेड, कोटेशनकरितां लिहा.

## मेट्रिक वजनें (रूपांतर कोष्टक)

| शेर (१ शेर = ८० तोळे.) | किलो-ग्रॅम | ग्रॅम (शक्य तितक्या जवळचे १० ग्रॅम) | शेर (१ शेर = ८० तोळे.) | किलो-ग्रॅम | ग्रॅम (शक्य तितक्या जवळचे १० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| १ | — | ९३० | २१ | १९ | ६०० |
| २ | १ | ८७० | २२ | २० | ५३० |
| ३ | २ | ८०० | २३ | २१ | ४६० |
| ४ | ३ | ७३० | २४ | २२ | ३९० |
| ५ | ४ | ६७० | २५ | २३ | ३३० |
| ६ | ५ | ६०० | २६ | २४ | २६० |
| ७ | ६ | ५३० | २७ | २५ | १९० |
| ८ | ७ | ४६० | २८ | २६ | १३० |
| ९ | ८ | ४०० | २९ | २७ | ६० |
| १० | ९ | ३३० | ३० | २७ | ९९० |
| ११ | १० | २६० | ३१ | २८ | ९३० |
| १२ | ११ | २०० | ३२ | २९ | ८६० |
| १३ | १२ | १३० | ३३ | ३० | ७९० |
| १४ | १३ | ६० | ३४ | ३१ | ७३१ |
| १५ | १४ | — | ३५ | ३२ | ६६० |
| १६ | १४ | ९३० | ३६ | ३३ | ५९० |
| १७ | १५ | ८६० | ३७ | ३४ | ५२० |
| १८ | १६ | ८०० | ३८ | ३५ | ४६० |
| १९ | १७ | ७३० | ३९ | ३६ | ३९० |
| २० | १८ | ६६० | | | |

## रोजंदारीचें कोष्टक

| दरमहा रुपये | २८ दिवस | २९ दिवस | ३० दिवस | ३१ दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | ० – ०४ | ० – ०३ | ० – ०३ | ० – ०३ |
| २ | ० – ०७ | ० – ०७ | ० – ०७ | ० – ०६ |
| ३ | ० – ११ | ० – १० | ० – १० | ० – १० |
| ४ | ० – १४ | ० – १४ | ० – १३ | ० – १३ |
| ५ | ० – १८ | ० – १७ | ० – १७ | ० – १६ |
| ६ | ० – २१ | ० – २१ | ० – २० | ० – १९ |
| ७ | ० – २५ | ० – २४ | ० – २३ | ० – २३ |
| ८ | ० – २९ | ० – २८ | ० – २७ | ० – २६ |
| ९ | ० – ३२ | ० – ३१ | ० – ३० | ० – २९ |
| १० | ० – ३६ | ० – ३४ | ० – ३३ | ० – ३२ |
| २० | ० – ७१ | ० – ६९ | ० – ६७ | ० – ६५ |
| २५ | ० – ८९ | ० – ८६ | ० – ८३ | ० – ८१ |
| ३० | १ – ०७ | १ – ०३ | १ – ०० | ० – ९७ |
| ४० | १ – ४३ | १ – ३८ | १ – ३३ | १ – २९ |
| ५० | १ – ७९ | १ – ७२ | १ – ६७ | १ – ६१ |
| १०० | ३ – ५७ | ३ – ४५ | ३ – ३३ | ३ – २३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम — ३०३ दि.
क्रमांक नों. दि. १९

# मराठवाड्यांतील महत्त्वाच्या सरकारी कचेऱ्या

## औरंगाबाद

१. असिस्टंट डायरेक्टर, अॅग्रिकल्चर डिपार्टमेंट, कॅन्टोमेंट औरंगावाद, फोन नंबर १६४.
२. सुपरिंटेंडेंट, अॅर्कॅलॉजिकल् डिपार्टमेंट, कॅन्टोमेन्ट, ओरंगाबाद, फोन ९.
३. जिल्हाधिकारी, सुभेदारी, गुलशन महल, औरंगाबाद, फोन ६५.
४. डिव्हिजनल ऑफीसर, मराठवाडा जुने सुभेदारी महल, औरंगाबाद, फोन ९४.
५. डेप्युटी सेंट्रल अिन्टेलिजन्स, अुस्मानपुरा, औरंगाबाद फोन १८३.
६. सुपरिटेंडेंट, अिलेक्ट्रिकल डिपार्टमेंट, भडकल दरवाजा, औरंगाबाद, फोन ६९
७. अेक्झिक्युटिव्ह अिंजिनियर, अिलेक्ट्रिकल् डिपार्टमेंट, औरंगाबाद, फोन १८८.
८. कमिशनर, अेक्साअिज डिपार्टमेंट, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद, फोन ६७.
९. सुपरिंटेंडेंट, अेक्साअिज, फजलीपुरा, औरंगावाद, फोन ८.
१०. फायर स्टेशन, औरंगाबाद, फोन ९९.
११. सुपरिंटेंडेंट, बेसिक अेज्युकेशन ट्रेनिंग कॉलेज, औरंगाबाद, फोन ४०.
१२. सुपरिंटेंडेंट, डिस्ट्रीक्ट जेल, हरसूल विभाग, औरंगाबाद, फोन ७६.
१३. सिव्हील हॉस्पिटल, औरंगाबाद, फोन ७९.
१४. रिजनल ऑफीसर ऑफ मेडिकल अँड पब्लिक हेल्थ, मिलिटरी बॅरॅक, औरंगाबाद, फोन १७७.
१५. असि. डायरेक्टर, पब्लिक हेल्थ, मराठवाडा, औरंगाबाद, फोन १७४.
१६. डेप्युटी अिन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, पश्चिम विभाग, औरंगाबाद, फोन १७३
१७. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, भडकल दरवाजा, औरंगाबाद, फोन २०.
१८. डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, सी. आय्. डी., भडकल दरवाजा, औरंगाबाद, फोन १८७
१९. पोलीस स्टेशन कॅन्टोमेंट अेरिया, औरंगावाद, फोन ११.
२०. पोलीस स्टेशन चौक, औरंगाबाद, फोन ७०.
२१. मराठवाडा प्रोजेक्ट सुपरिंटेंडिंग अिंजिनियर, औरंगाबाद, फोन १८०.
२२. सुपरिंटेंडिंग अिंजिनियर, पी. डब्लू. डी. उस्मानपुरा, औरंगाबाद, फोन ७३.

२३. डिव्हीजनल अिंजिनियर, औरंगाबाद, पद्मपुरा, फोन ७४.
२४. ट्रॅव्हलर्स बंगला, दिल्ली गेट, औरंगाबाद, फोन ३६.
२५. रिजनल एम्प्लॉयमेंट ऑफीस, पोस्ट ऑफीस रोड, औरंगाबाद, फोन ५९.
२६. रिजनल पब्लिसिटी ऑफीसर, फजलपुरा, औरंगाबाद, फोन १८५.
२७. रेव्हीन्यू ट्रिब्यूनल अॅडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीसर, सेशन कोर्ट, औरंगाबाद, फोन १७८.
२८. B. S. R. T. O. ऑफीसर, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद, फोन ११८.
२९. बस डेपो, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद, फोन ४.
३०. कमिशनर सेल्स टॅक्स, औरंगाबाद.
३१. सेल्स टॅक्स ऑफीसर, स्टेशन रोड, औरंगाबाद, फोन ३७.
३२. सिनियर लेबर ऑफीसर, उत्तर विभाग, मिलिटरी बॅरॅक, कॅन्टोमेंट. औरंगाबाद, फोन २५,
३३. सेशन् जज्ज कोर्ट, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद. फोन नं. ३९.
३४. स्टेट हॉटेल, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद, फो. नं. २९.
३५. टुरिस्ट अिन्फर्मेशन, ब्युरो, स्टेशन रोड, औरंगाबाद, फो. नं. १७.
३६. सुपरिंटेंडेंट, वॉटर वर्क्स डिपार्टमेंट, दिल्ली गेट, औरंगाबाद, फो.नं. १२.
३७. अेरोड्रम ऑफिसर, चिखलठाणा, औरंगाबाद, फो. नं. ९७.
३८. असि. अेक्स्ट्रॉ रिक्रूटिंग ऑफिसर, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद. फो. नं. ५२
३९. कॅन्टोन्मेंट अेक्झिक्युटिव्ह ऑफिसर, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद, फो. नं. ६
४०. सुपरिंटेंडेंट, सेंट्रल अेक्साअीज, औरंगाबाद, फो. नं. ३
४१. इन्कम् टॅक्स ऑफिस, कॅटोन्मेंट, औरंगाबाद, फो. नं. १३७
४२. सुपरिंटेंडेंट, पोस्ट ऑफिस, औरंगाबाद, फो. नं. ८५
४३. हेड पोस्ट ऑफिस, भडकल दरवाजा, औरंगाबाद, फो. नं. १४
४४. रेल्वे स्टेशन औरंगाबाद फो. नं. १५
४५. सुपरिंटेंडेंट ऑफ इंडस्ट्रीज् } औरंगाबाद फो. नं. १४२
४६. असि. डायरेक्टर, ऑफ इंडस्ट्रीज् } औरंगाबाद फो. नं. १४२
४७. डेप्युटी डायरेक्टर, शिक्षण-विभाग, औरंगाबाद फो. नं. ५७
४८. असि. डायरेक्टर, स्टेशनरी डिपार्टमेंट; औरंगाबाद, फो. नं. १९८.
४९. आयुर्विमा कॉर्पोरेशन औरंगाबाद, मिलसमोर, औरंगाबाद, फो. नं. ८२
५०. नगरपालिका, औरंगाबाद, फो. नं. १०६.
५१. सुपरिंटेंडेंट ऑफ फिशरीज्, औरंगाबाद.
५२. सब् डिव्हिजनल सॉईल कॉंझरवेशन, औरंगाबाद.
५३. इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज्, औरंगाबाद.
५४. ड्रग कंट्रोलर ऑफिस, कॅन्टोन्मेंट, औरंगाबाद

५५. डिस्ट्रिक्ट ॲनिमल हजबंड्री ऑफिसर, औरंगाबाद.
५६. ड्रिस्ट्रिक्ट कॉटेज् इंडस्ट्रीज्, औरंगाबाद.
५७. दारूबंदी विभाग, औरंगाबाद.
५८. सोशल वेलफेअर ऑफिस, औरंगाबाद.
५९. डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, औरंगाबाद.
६०. डेप्युटी रजिस्ट्रार्स ऑफिस, औरंगाबाद.
६१. असि. रजिस्ट्रार्स ऑफिस, औरंगाबाद.
६२. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६३. असिस्टंट कमिशनर, लेबर ऑफिसर, औरंगाबाद.
६४. डिस्ट्रिक्ट चीफ मार्केटींग ऑफिसर, औरंगाबाद.
६५. मार्केट कमेटी ऑफिस, औरंगाबाद.

## परभणी

६६. जिल्हाधिकारी, फो.नं. २ परभणी.
६७. असि. डायरेक्टर, शेती विभाग, नवामोंढा, फो. नं. ६२
६८. चीफ मार्केटींग ऑफिसर, नारायण रोड, फो. नं. ४
६९. सिव्हील हॉस्पिटल, जिंतूर रोड, फो. नं. ३७.
७०. जिल्हा सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस, स्टेशनरोड, फो. नं. ५६
७१. मार्केट कमेटी, नवामोंढा, फो. नं. ६
७२. ऍक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, पी. डब्ल्यू. डी. फो. नं. १२
७३. पब्लिक कॉल, पोस्ट ऑफीस फो. नं. १३

## नांदेड

७४. जिल्हाधिकारी फो. नं. २
७५. असि. डायरेक्टर, शेती विभाग, स्टेशन रोड, फो. नं. ८९.
७६. सिव्हिल हॉस्पिटल, स्टेशन रोड, फो. नं. ९
७७. कमर्शियल टॅक्स ऑफिसर, स्टेशन रोड, फो. नं. ९३
७८. डिस्ट्रिक्ट सेशन जज्ज कोर्ट, फो. नं. १४३
७९. सुपरिंटेंडेंट, इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट, स्टेशन रोड, फो. नं. ८५.
८० फायर स्टेशन, स्टेशन रोड, फो. नं ९९.
८१. सुपरिंटेंडेंट, जेल, मिल्रोड, फो. नं. ९०
८२. जिल्हा पोलिस प्रमुख, वजिराबाद, फो. नं. ४
८३. जिल्हा पोलिस प्रमुख, गुरुद्वार, फो. नं. २२
८४. इन्कम् टॅक्स ऑफिस, स्टेशन रोड, फो. नं. ४५
८५. रेल्वे स्टेशन, फो. नं. १००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

## बीड

८६. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
८७. सिव्हील हॉस्पिटल, बीड.
८८. डी. एस्. पी. ऑफिस, बीड.
८९. सेल्स टॅक्स ऑफिसर, बीड.
९०. डिस्ट्रिक्ट सोशल वेल्फेअर ऑफिस, बीड.
९१. मार्केट कमेटी, बीड.
९२. एक्झि. अिंजिनियर, पी. डब्ल्यू. डी., बीड.

## उस्मानाबाद

९३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.
९४. सिव्हील हॉस्पिटल, उस्मानाबाद.
९५. डी. एस्. पी. ऑफीस, उस्मानाबाद.
९६. डिस्ट्रिक्ट सोशल वेल्फेअर ऑफीसर, उस्मानाबाद.
९७. मार्केट कमेटी, उस्मानाबाद.
९८. एक्झि. अिंजिनियर, पी. डब्ल्यू. डी., उस्मानाबाद.

महाराष्ट्र राज्य विक्रीकर (१९५९) प्रमाणें
'सेल्स टॅक्स गाईडसचीं पुस्तकें व जमाखर्चाचीं कोरीं बुकें'
गांववार एजन्सीवर (२५ टक्के कमिशन) मिळतील.
लिहा—
डी. बी. बिनीवाले,
सेल्स टॅक्स अकौन्टन्ट
बोरकरवाडा, सिद्धेश्वर आळी, कल्याण (मुंबई).

११३८०

# ★ जाहिरातदारांची सूची ★


औरंगाबाद जिल्हा मार्केटींग सोसायटी लि. पहिली आंतील दोन पानें
औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ति बँक औरंगाबाद परिशिष्ट १

| | | | |
|---|---|---|---|
| अजिंठा दैनिक | औरंगाबाद | व्यापार | ५७ |
| आरोंदा केमिकल वर्क्स | मुंबई | प्रेक्षणीय स्थळें | १४ |
| आशा ट्रेडींग कंपनी | बिड | महाराष्ट्र | ५२ |
| अब्दूल मलीक हाजी अ. सत्तार | मालेगांव | रस्ते | १२ |
| अब्दुल लतीफ हबीबभाई एण्ड सन्स | मुंबई | मुद्रणालये | ४१ |
| अजिंठा पब्लीसिटी | औरंगाबाद | मुंबई | १९ |
| आनंद विलास हॉटेल | औरंगाबाद | नित्योपयोगी मा. | ९ |
| ओगले ग्लास वर्क्स | ओगलेवाडी | मुंबई | ४५ |
| ओरिएंटल केमिकल वर्क्स | इंदोर | मुंबई | १२ |
| अंथरुण पांघरुण भांडार | औरंगाबाद | महाराष्ट्र | ५२ |
| औरंगाबाद सिल्क मिल्स | ,, | यात्रा ऊरूस मेळावे | ५ |
| इलेक्ट्रीक ड्राय क्लीनर्स | ,, | ,, | ४ |
| इंडिया केमिकल वर्क्स | जळगांव | संत आणि कवि | २६ |
| कामाक्षी लॉजिंग व बोर्डींग | औरंगाबाद | मुंबई | २८ |
| काकडे अॅण्ड सन्स | पुणें | व्यापार | २९ |
| किर्ती क्लॉथ सेंटर | औरंगाबाद | रस्ते | ९ |
| किकाभाई हरिवल्लभदास अॅण्ड सन्स | मुंबई | नित्यपयोगी मा. | २५ |
| दि डेक्कन सिल्क फॅक्टरी | औरंगाबाद | व्यापार | ६१ |
| दि डेक्कन फ्लोअर मिल्स | औरंगाबाद | व्यापार | ४५ |
| के. एम्. प्रॉडक्टस् | नासिक | प्रेक्षणीय स्थळें | २१ |
| डि. बी. बिस्तोवाळ | कल्याण | नित्योपयोगी मा | ३४ |
| गौतम स्टोअर्स | औरंगाबाद | रस्ते | ८ |
| गांवकरी, अमृत, रसरंग | नाशिक | प्रकाशनें | ५ |
| जोशी ब्रदर्स बुक सेलर्स | औरंगाबाद | शिक्षण | ३५ |
| दत्तुलाल नंदलाल अग्रवाल अॅण्ड कं. | जालना | भारत | ३४ |
| दि. बँक ऑफ महाराष्ट्र | पुणें | भारत | ३३ |
| दि. न्यु आप्टीकल सर्व्हीस | औरंगाबाद | व्यापार | ५ |
| दि. हिमरु वीव्हर्स को-ऑ. सो. लि. | ,, | मुंबई | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| दिक्षित फोटो आर्ट स्टुडिओ | औरंगाबाद | मुंबई | ३१ |
| नांदेड जि. म. स. बँक | नांदेड | परिशिष्ट | ३ |
| नोगी आणि कंपनी | मुंबई | मुंबई | १६ |
| टोलीया ब्रदर्स | मुंबई | व्यापार | ५९ |
| ट्रीओ फर्मास्युटिकल वर्क्स | नाशिक | व्यापार | ३७ |
| पन्नालाल हिरालाल अग्रवाल | औरंगाबाद | प्रेक्षणीय स्थळें | १५ |
| पारिख फोटो स्टुडीयो | ,, | इतिहास | ५० |
| पुर्णीमा लॉज | ,, | भारत | १६ |
| बिड डि. सें. को. बँक | बिड | परिशिष्ट | ४ |
| बछराज छगनलाल शेटी | ,, | प्रेक्षणीय स्थळें | ८ |
| बॉंबे स्टेट होमीओपेथीक डॉ. ट्रे. ई. | नागपूर | व्यापार | ३९ |
| महाराष्ट्र फेअर प्राईस शॉप डिलर्स असोसिएशन | औरंगाबाद | मुंबई | २० |
| मराठवाडा इण्डस्ट्रीज | औरंगाबाद | व्यापार | ६१ |
| रवी फाईन आर्ट | ,, | शिक्षण | २२ |
| रचना साप्ताहिक | ,, | इतिहास | ५० |
| विश्वकर्मा को-ऑ. फर्निचर्स सोसायटी लि. | ,, | भारत | ३४ |
| शालेय साहित्य मंदीर | ,, | शिक्षण | २७ |
| एस्. एम. दरक अॅण्ड सन्स | ,, | संत आणि कवि | १९ |
| स्टॅंडर्ड सिल्क मिलस | ,, | मुंबई | ४६ |
| सिटी हॉटेल | ,, | प्रेक्षणीय स्थळें | ८ |
| पि. जी. हेरेकर | पुणें | शेती | ४ |
| पॉल केमिकल वर्क्स | पुणें | सहकारी चळवळ | २० |
| प्रकाश टाईप फौंड्री | पुणें | नित्योपयोगी माहिती | २८ |
| म्हात्रे प्राडक्ट | मुंबई | शिक्षण | २४ |
| फतेह फार्मसी | [illegible] | [illegible] | १४ |
| बि. ए. अॅण्ड ब्रदर्स | [illegible] | [illegible] | ४८ |
| भगवंतराव लॉज | [illegible] | [illegible] | ७ |
| एम्. एम्. यह्या | [illegible] | ...री चळवळ | १३ |
| माधवजी चिवडेवाले | ,, | सहकारी चळवळ | ३ |
| मोतीलाल गिरधारीलाल आघारकर | मालेगांव | मुंबई | ८ |
| राका प्रेस | नाशिक | नित्योपयोगी माहिती | १३ |

REFBK-0011397
REFBK-0011397

| | | | |
|---|---|---|---|
| रॉय आणि कंपनी | मुंबई | महाराष्ट्र | ५१ |
| रोशन ट्रान्सपोर्ट | जालना | भारत | ३४ |
| वर्मा फार्मसी | पुणें | संत आणि कवि | ११ |
| डॉ. वामन गोपाळ | मुंबई | मुंबई | ६ |
| वेस्टर्न इंडिया केमिकल | | दवाखानें | ३९ |
| व्यापारी मित्र | पुणें | महाराष्ट्र | ५२ |
| व्ही. एम् जोशी अॅण्ड कंपनी | जालना | नित्योपयोगी माहिती | १८ |
| वैद्य एच. के. खत्री | खामगांव | व्यापार | १९ |
| विश्वभारतीय | मालेगांव | परिशिष्ट | २ |
| चंद्रहास प्रकाशन | नासिक | प्रकाशन | ३ |
| श्रीकृष्ण होमीयो फार्मसी | पुणें | संत आणि कवि | ६ |
| सांडू ब्रदर्स प्रा. लि. | मुंबई | मुंबई | ४५ |
| एस्. व्हि. कुलकर्णी अॅण्ड कंपनी | पुणें | नित्योपयोगीमाहिती | २० |
| सी. सी. महाजन आणि कंपनी | मुंबई | मुंबई | ९ |
| सोलापूर मशिनरी अॅण्ड जनरल स्टोअर्स | जालना | व्यापार | २३ |
| सोनवणे फोटो आर्ट स्टुडीओ | नाशिक | प्रकाशने | ६ |
| होमिओ लेब्रोटरी | मुंबई | रस्ते | १३ |
| मे. माळी कंपनी | मालेगांव | रस्ते | १४ |
| उत्कर्ष प्रोसेस स्टुडीओ | नासिक | रस्ते | १४ |
| शाह आर्योषधी कारखाना | कोल्हापूर | रस्ते | १५ |
| अशोक लिथो प्रेस | नासिक | रस्ते | १५ |
| मे. काबरा अँड कंपनी | मालेगांव | रस्ते | १६ |
| हिंद सोप फॅक्टरी | नासिक | रस्ते | १६ |
| रॅपीड प्रोसेस वर्क्स | मुंबई | रस्ते | १७ |
| झंकार विद्यालय | औरंगाबाद | रस्ते | १७ |
| धुतपापेश्वर इन्डस्ट्रीज | पनवेल | रस्ते | १७ |
| शिवकिसन लक्ष्मीनारायण जाजू | मालेगांव | रस्ते | १८ |
| नागरिक | मालेगांव | रस्ते | १८ |
| डेक्कन आयुर्वेदाश्रम फार्मसी | हैद्राबाद | मुंबई | ३४ |
| भारत ओटो स्टोअर्स | औरंगाबाद | ,, | ३५ |
| हिंद मशिनरी व सुमतिराम एजन्सीज | औरंगाबाद | मुंबई | ३६ |

महाराष्ट्र राज्य मुंबई मागील कव्हर पान व आंतील परिशिष्ट नं. ३



● बचत योजनेंत गुंतविलेल्या रकमेवर अधिक दरानें व्याज मिळते. प्रतिवर्षी तुम्हाला मिळणाऱ्या मोबदल्याचें प्रमाण वाढत जातें.

● बचत योजनेंत गुंतविलेल्या रकमेवर जे व्याज मिळतें त्याच्यावर प्राप्तिकर आणि सुपरटॅक्स आकारला जात नाहीं. केवळ या सवलतीमुळे तुम्ही गुंतविलेल्या रकमेची किंमत वाढते.

# अगदीं साधीं सहा कारणें

● बचत योजनेंत रक्कम गुंतविल्यामुळें तुमच्या कुटुंबाचें भवितव्य सुरक्षित होतें. तुम्हांला घर बांधावयाचें असेल, मुली मजेत घालवावयाची असेल, मुला-बाळांच्या शिक्षणाची तरतूद करावयाची असेल तर कितीतरी दिवस अगोदरपासून तुम्हांला त्याची आंखणी करतां येईल.

● बचत योजनेमुळे तुमची रोख पैशांची गरज भागते. अडीअडचणीचे वेळीं पैशांची गरज भासल्यास तुम्हांला सर्टिफिकेटे वटविण्याची आवश्यकता नाहीं. शेडयूल्ड बँकेत तीं तारण ठेवून तुम्हांला कर्ज मिळू शकतें.

● बचत योजनेतील प्रत्येक रोख्याच्या पाठीशी सर्वंध राष्ट्राची पत आणि विश्वास आहे. इतका सुरक्षित आणि इतक्या सवलती असलेला गुंतवणुकीचा अन्य प्रकारच नाहीं.

● बचत योजनेमुळें तुम्हाला पंचवार्षिक योजनेला हातभार लावतां येतो आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यांत सहभागी होतां येतें.

# बचत योजनेंत पैसे गुंतवा

अधिक तपशीलासाठी खालील ठिकाणी चौकशी करा :

● बृहन्मुंबई डेप्युटी डायरेक्टर ऑफ स्मॉल सेव्हिंग्ज, सचिवालय, मुंबई

● जिल्हा भागांत त्या त्या जिल्ह्याचे कलेक्टर

● तालुक्याच्या ठिकाणीं त्या त्या तालुक्याचे मामलेदार अथवा महालकरी.